म. ग्रं. सं. ठा.
विषय इतिहास
सं. क्र.

दुर्मि० 222

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय)

वाचनालय/संदर्भ

इतिहास — दुर्मि० 222

शिवाजी आणि शिवकाल

ସାମ୍ବାଦିକ-୨୬

ତାରିଖ ୨୨


91.3. 22

छत्रपति शिवाजी महाराज

ऑर्मच्या इतिहासांत दिलेल्या तसबिरीचें मूळ व्हॅलन्टिनची तसबीर

(ही सन १७१२ सालीं विकत घेण्यांत आली होती)

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प ८९ वें.

सर यदुनाथ सरकारकृत

शिवाजी व शिवकाल

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण.

अनुवादक—

विनायक सदाशिव वाकसकर, बडोदें.

मार्च सन १९३० इसवी.

किंमत सवा दोन रुपये.

प्रकाशक

मंगेश नारायण कुळकर्णी,

मालक,

भारत-गौरव-ग्रंथमाला,

३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

मुद्रक

मंगेश नारायण कुळकर्णी,

कर्नाटक प्रेस, ३१८ ए,

ठाकुरद्वार, मुंबई नं. २.



प्रस्तावना.

ग्रँट डफनें मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केल्यास एकशें तेरा वर्षें होऊन गेलीं. एवढ्या अवधींत शिवाजीसंबंधीं प्रत्यक्ष माहितीचीं साधनें निरनिराळ्या आठ भाषांत प्रसिद्ध झालीं. त्या सर्वांचा कसोशीनें व परिपूर्ण अभ्यास करून त्याचें सार मी या पुस्तकाचे द्वारा वाचकांपुढें मांडीत आहें. त्या थोर पुरुषाचें जें हें तपशीलवार व संपूर्ण चरित्र मीं तयार केलें आहे तें सर्वथा बिनचूक असून, शिवाय त्यांत आधुनिक संशोधनाचा व विवेचक माहितीचा समावेश केला आहे. समकालीन अस्सल साधनांवरच मी मुख्य भिस्त ठेविली असल्यानें, खाफीखान (१७३४), मल्हार रामराव चिटणीस (१८१०), वगैरेंनीं रचलेलें अलीकडचें भारूड मी साफ सोडून दिलें आहे. तंजावरचा शिलालेख (१८०४) शिवदिग्विजय (? १८९५), जयासिंगाचें कवनबद्ध पत्र (ना. प्र. स.) अशा शुद्ध बनावट लिखाणांना मीं बिलकूल महत्त्व दिलेलें नाहीं. शिवाजीच्या आयुष्यांतील उपलब्ध प्रसंगांची कालवार टिपणी पूर्ण तयार करून तींत एकंदर तपशील शक्य तितके बिनचूक मांडले आहेत. समकालीन पाश्चात्य लेखकांचे आधार मीच प्रथम उपयोगांत आणले असल्यामुळें, त्या लोकोत्तर राजकर्त्याचा एकंदर आयुःक्रम या पुस्तकांत वाचकांस यथातथ्य कळून येईल, तसेंच इंग्रजांशीं त्याचे व्यवहार कसकसे बनत गेले तेंही स्पष्ट होईल. पुरंदरचे युद्धाचा भाग विशेष महत्त्वाचा असूनही त्याचें योग्य विवरण प्रचलित इतिहासांत बिलकूल नव्हतें; तसेंच कर्नाटक स्वारीचे विशिष्ट तपशील कांहीं थोड्या नांवांपलीकडे बहुधा माहीत नव्हते. म्हणून हे दोनही भाग उत्तरोत्तर कसे परिणत होत गेले तें मी फारसी व फ्रेंच भाषांतील अस्सल कागदांच्या आधारानें संगतवार दाखविलें आहे.

ग्रँट डफचा इतिहास स. १८२६ सालीं तीन भागांत प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथांतील छत्रपतींच्या कारभाराचा मुख्य भाग शाहजीपासून राजाराम अखेरचा (१६२५–१७००.) आतां खालील चार प्रकारच्या अस्सल साधनांनीं सर्वथैव दुरुस्त करणें जरूर पडलें. कारण डफ यास हीं साधनें माहीतच नव्हतीं:—

(१) समकालीन फारसी ऐतिहासिक ग्रंथ, म्हणजे मोगल बादशहांचे सरकारी अहवाल, त्यांच्या मुकामावरून सुटलेल्या अखबारात ऊर्फ बातमीपत्रें, खुद्द औरंगजेबाचीं व त्याच्या अंमलदाराचीं पत्रें, मीर्झा=राजा जयसिंगानें बादशहास पाठविलेल्या पत्रांचा संपूर्ण संच व त्यांचे वादशहाकडून गेलेले जबाब, सक्सीना कायस्थ भीमसेन व ईश्वरदास नागर ब्राह्मण या दोघां हिंदूंनीं खासगी राहे लिहिलेले औरंगजेबाच्या कारभाराचे दोन फारसी इतिहास, व सतराव्या शतकांत लिहिलेले आदिलशाहीचे दरबारी इतिहास, या सर्वांपैकीं भीमसेनाचे ग्रंथाचा अपुरा सारांश व शिवाजीचे मृत्युनंतर ५० वर्षांनीं बनलेला खाफीखानाचा ग्रंथ, एवढेच कायते डफनें उपयोगांत आणिले.

(२) श्रीयुत पांडुरंग स. पिसुर्लेकर यांनीं अविश्रांत श्रम करून उत्कृष्ट संशोधक दृष्टीनें प्रसिद्ध केलेले पोर्टुगीझ दप्तरांतले कागद, तसेंच पांदिचरीचा संस्थापक मार्टिन व राजापुरचा गुमास्ता व्यूरो डेस्लां या दोघांनीं फ्रेंच भाषेंत लिहिलेल्या आठवणी, (पैकीं दुसरा ग्रंथ अद्यापि अप्रकाशित आहे).

(३) इंग्रज वखारींचीं दप्तरें, (यांपैकीं स. १६७० पर्यंतचीं सर वु फॉस्टरनें छापलीं असून बाकीचीं इंडिया ऑफिसांत हस्तलिखित आहेत), व ऑर्मनें उतरून घेतलेल्या पत्रांच्या नकला (ज्यांचीं अस्सलें आतां उपलब्ध नाहींत).

(४) जेधे शकावली वगैरे कित्येक मराठी साधनें निःसंशय सतराव्या शतकांत बनलेलीं, तसेंच संस्कृत पर्णाल-पर्वतग्रहणाख्यान, शिवराज राज्याभिषेक कल्पतरु आणि शिवभारतापैकीं कांहीं थोडा भाग.

अशा प्रकारच्या नवीन साधनांनीं शिवाजीसंबंधीं खऱ्या माहितीचा विस्तार पूर्वीहून आतां पुष्कळच वाढला आहे, तो सर्व ध्यानांत घेऊन त्यांवरून पुष्कळसे प्रचलित असत्य ग्रह दुरुस्त करून, शिवाजीचें हें सत्य चरित्र मीं हल्लींच्या मनूंतील समाजापुढें मांडलें आहे, तेणेंकरून शिवाजी म्हणजे केवळ परमेश्वरही नव्हता, किंवा तो केवळ सैतानही नव्हता, तर आपल्यापैकींच तो असा एक मानवी राज्यकर्ता होऊन गेला कीं, मुसलमानी अंमलापासून आपल्या या हिंदु राष्ट्रांत एवढी थोर विधायक विभूति दुसरी झालीच नाहीं, असें आपणांस दिसून येईल.

शिवाजीच्या कर्तृत्वाचा मोठेपणा समजण्यास त्याची बिकट परिस्थिति लक्षांत बाळगावी लागते. एतदर्थ त्याच्या भोंवतालीं जीं मुसलमानी राज्यें चालू होतीं, त्यांची अंतःस्थिति व परराष्ट्र-व्यवहार यांची जी तपशीलवार माहिती मीं दिली

आहे, त्यावरून त्या राज्यांची क्रिया व प्रतिक्रिया शिवाजीच्या उद्योगावर कस-कशी घडत गेली तें समजून येईल. फारसी भाषेच्या अध्ययनामुळेंच शिवाजीच्या चरित्राचा हा भाग मला यथायोग्य रेखाटतां आला.

माझ्या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या दहा वर्षांत तीन आवृत्त्या निघाल्या. त्यांत संक्षिप्त अवतरण कांहीं थोड्या आख्यायिका वगैरे वाढवून गेल्या ऑक्टोबरांत मीं बंगालींत प्रसिद्ध केलें; आणि हल्लीं हें मराठी रूपांतरही माझ्या नजरेखालीं राजश्री विनायक सदाशिव वाकस्कर यांनीं तयार केलेलें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. मूळ इंग्रजीचें हें शब्दशः भाषांतर नाहीं. मूळांतील माहिती जमेस धरून हा गोषवारा सामान्य मराठी वाचकांस समजेल अशा सोप्या भाषेंत देण्याचा प्रयत्न केलेला आहे. कित्येक मराठी साधनांतले उतारेच ठिकठिकाणीं दिले आहेत. असा हा शिवचरित्राचा मराठी अवतार लोकप्रिय होईल अशी मी आशा बाळगितों.

कोणत्याही मुद्याचे आधार हुडकणें झाल्यास, किंवा आठ भाषांतील निरनिराळ्या साधनांचें चिकित्सक विवेचन पाहणें असल्यास, वाचकांनीं माझ्या इंग्रजी पुस्तकाची तृतीयावृत्ति पाहवी. या आवृत्तीनें पहिल्या दोन आवृत्त्या आतां रद्द झाल्या असून, पूर्वीच्यांतले दोष यांत दुरुस्त करण्यांत आले आहेत.

यदुनाथ सरकार।

व.क्र.८८८
दा. ५.९.१९३०
ठा. ने.

अनुक्रमणिका

प्रकरण		पृष्ठांक
‡ आनंदवनभुवन		१ ते ९
१ चतुःसीमा व पीकपाणी.		१
२ वसति.		२
३ राहणी.		३
४ स्वभाव.		४
५ साधुसंत.		५
६ वाङ्मय.		६
७ स्वाभाविक गुणदोष.		७
‡ उदय		१० ते ३१
१ पूर्वज		१०
२ शहाजी सन १६२५–१६३६		१२
३ पूर्वचरित्रकथनाची दुष्करता		१४
४ जन्म व बाल्य.		१५
५ पुण्याची जहागीर सन १६३७		१७
६ शिक्षण.		१९
७ बारा मावळें काबीज.		२०
८ भावी जीवनाचा अरुणोदय.		२१
९ स्वराज्याची मुहूर्तमेढ.		२३
१० शहाजीचा बंदिवास.		२४
११ सन १६५०–१६५५ तील चळवळी.		२७
१२ जावळें हस्तगत.		२८
१३ मोऱ्यांची भवितव्यता		३०
१४ अधिक लाभ.		३०

३ मोगल–विजापुरकरांना पहिली सलामी.	३२ ते ५५
१ सन १६५७ पर्यंत शिवाजी व मोगल यांचा संबंध.	३२
२ मोगली मुलुखावर पहिली स्वारी	३३
३ मोगलांशीं तह	३६
४ कोंकणवर स्वारी	३७
५ विजापुरकरांच्या मसलती	४०
६ अफजलखानाची स्वारी	४१
७ भयंकर संकट.	४३
८ कारस्थानें.	४५
९ काळभेट.	४८
१० खानाच्या सैन्याची दाणादाण.	५०
११ खानाविषयीं दंतकथा.	५१
१२ पोवाडा.	५२
१३ वध कीं खून ?	५३
४ युद्धाची धुमश्चक्री.	५६ ते ७७
१ शाइस्तेखानाची स्वारी.	५६
२ पन्हाळ्याचा वेढा.	५७
३ खानाचें पुण्यास अधिष्ठान.	६०
४ खानाची चाकणवर धाड.	६१
५ लढाया व रत्नागिरीकडील विजय.	६२
६ खानाची दुर्दशा.	६७
७ सुरतेचें वर्णन.	७१
८ इंग्रजांचें शौर्य.	७३
९ सुरतेची लूट.	७३
१० लुटीचा अंदाज.	७५
११ शिवाजीच्या खुनाचा प्रयत्न.	७५
१२ सन १६६४ मधील हालचाली.	७६
५ मध्यान्ह.	७८ ते १०२
१ जयसिंगाची रवानगी	७८
२ जयसिंगाचें चरित्र.	७९

३ जयसिंगाच्या अडचणी. ८३

४ शिवविरोधकांचा मेळा. ८३

५ रणभूमि. ८३

६ मोगलांचे मोर्चे ८३

७ युद्धाला प्रारंभ. ८४

८ पुरंदर. ८६

९ वेढ्यास सुरुवात. ८६

१० वज्रगड घेतला. ८७

११ मोगली फौजेची लुटालूट. ८७

१२ मराठ्यांचे पराक्रम, किल्ल्याचा बचाव. ८९

१३ पुरंदरचा झगडा. ९०

१४ मुरारबाजीचा पराक्रम. ९१

१५ तहाची वाटाघाट. ९२

१६ शिवाजी व जयसिंग यांची भेट. ९३

१७ पुरंदरचा तह सन १६६५. ९४

१८ मोगली बहुमान. ९६

१९ विजापुरावरील स्वारींत शिवाजीची मदत. ९८

२० पन्हाळ्याजवळ शिवाजीचा पराजय सन १६६६. १०१

६ सिंहाच्या गुहेंत. १०३ ते १२०

१ आशा निराशा. १०३

२ व्यवस्था. १०५

३ प्रवास. १०५

४ दरबारांत भेट. १०६

५ अटक. १०८

६ जयसिंगाची हालहवाल. ११०

७ पक्षि उडाला. १११

८ फुलादखानाची तारांबळ. ११३

९ प्रत्यागमनाचा मार्ग. ११४

१० प्रवासांतील संकटें. ११५

११ जयसिंगाची राजनिष्ठा. ११७

७ मोगलांचा समाचार (सन १६६७–१६७०). १२१ ते १३७

१ मोगली सत्तेची ओढाताण. १२१
२ मोगलांशीं तह सन १६६८. १२२
३ मोगलांशीं दुसरें युद्ध. १२५
४ मुअज्जम व दिलेर यांचें भांडण. १२७
५ सुरतेची दुसरी लूट सन १६७०. १३०
६ वणी दिंडोरीची लढाई तारीख १७–१०–१६७०. १३३
७ वऱ्हाड-बागलाणवर स्वारी. १३५

८ दुरंगी सामना. १३८ ते १५३

१ दोन खानांची दक्षिणेंत रवानगी. १६७१ १३८
२ साल्हेरची लढाई. १३९
३ कोळवनांतील विजय १६७२. १४२
४ सुरतेस चौथाईची धमकी. १४२
५ खानदेश वऱ्हाडवर मराठ्यांच्या स्वाऱ्या सन १६७२. १४४
६ देशावरील पळत्या लढाया सन १६७३. १४६
७ विजापुर व कानडा सन १६७३. १४६
८ उमराणीची लढाई सन १६७३. १४८
९ नेसरीची लढाई, प्रतापरावाचा मृत्यु सन १६७४. १४९
१० दिलेरचा पराभव, जानेवारी सन १६७४. १५१

९ राज्यारोहण. १५४ ते १६६

१ समारंभाची आवश्यकता. १५४
२ शिवाजीचें क्षत्रियत्व. १५५
३ समारंभाची सिद्धता. १५६
४ पूजा व प्रायश्चित्त. १५६
५ राज्याभिषेक व सिंहासनारोहण. १५७
६ स्वारीची मिरवणूक. १६१
७ मोगलांवर जंगी स्वारी. १६२
८ बहादुरखानाचा पराजय. १६४
९ मोगलांशीं पुन्हा झगडा व विजापुरकरांशीं सख्य. १६५

१० दक्षिणी दिग्विजय.
१ राजापुरावर पहिली स्वारी.
२ दक्षिण कोंकणांतील विजय सन १६६३.
३ वसनूरची लूट व कारवारला धमकी सन १६६५. १७३
४ अदिलशहाचा कारभार सन १६६५. १७४
५ शिवाजी आणि रुस्तम सन १६६६. १७५
६ गोवा सर करण्याचें कारस्थान सन १६६८. १७६
७ विजापुरी कानडा घेण्याचे निष्फळ प्रयत्न सन १६७३. १७७
८ कानडी मुलुखांतील यादवी सन १६७४. १७८
९ फोंडा सर व कानडा खालसा सन १६७५. १७९
१० कानड्यांत वरघांटीं मराठे. १८०
११ दर्यास पल्याण. १८२ ते १९७
१ पश्चिम किनाऱ्यावरील सीदी. १८२
२ सन १६६१ पर्यंत मराठ्यांचे विजय. १८३
३ शिवाजीचें आरमार. १८५
४ जंजीरा घेण्याचे मराठ्यांचे प्रयत्न. १८७
५ सीदी दंडा किल्ला परत घेतो सन १६७१. १८९
६ आरमारी लढाई सन १६७२–१६७५. १९०
७ जंजीऱ्यावर भयंकर मारा सन १६७५–१६७६. १९२
८ नौकायुद्ध सन १६७६–१६८०. १९२
९ खांदेरीसाठीं इंग्रजांशीं विग्रह सन १६७९. १९४
१० मुंबईकर इंग्रजांची चिंता व युक्ति. १९६
१२ सापत्न बंधूंची भेट. (सन १६७७–७८.) १९८ ते २२१
१ मद्रास किनारा व तेथील संपत्ति. १९८
२ वडिलोपार्जित संपत्तींत वांटा. २००
३ स्वारीची सिद्धता. २०१
४ हैदराबादेस प्रयाण. २०३
५ भेट. २०६
६ संधि. २०७
७ श्रीशैल दर्शन. २०८

८ वेलोरचा वेढा. २०९
९ शेरखान लोदीशीं लढाई. २११
१० कोलेरून नदीवर. २१२
११ मुलाखत. २१३
१२ महाराष्ट्रांत प्रत्यागमन. २१५
१३ व्यंकोजीशीं लढाई. २१७
१४ युरोपियन व्यापारी. २१८
१५ व्यंकोजीची खरी योग्यता. २२०

१३ महाप्रस्थान. —२२२ ते २४२

१ कर्नाटकच्या स्वारीनंतर. २२२
२ सन १६७७ तील मराठ्यांच्या चळवळी. २२३
३ तुंगभद्रेच्या उत्तरतीरावरील विजय. २२४
४ मोगल, विजापुरकर व शिवाजी सन १६७८. २२६
५ संभाजी मोगलांस मिळतो. २२७
६ विजापुर घेण्याचे मराठ्यांचे प्रयत्न. २२८
७ दिलेरखान भूपाळगड घेतो. २२९
८ शिवाजीचें औरंगजेबास पत्र. २३०
९ दिलेरची विजापुरावर स्वारी. २३४
१० दिलेरखानाचा उच्छाद व संभाजीचें पुनरागमन. २३६
११ शिवाजीची शेवटची स्वारी. २३८
१२ कौटुंबिक क्लेश. २३९
१३ मृत्यु. २४०
१४ बायका मुलें. २४१

१४ पाश्चात्यांशीं संबंध. २४३ ते २६१

१ इंग्रजांशीं धूळभेट स. १६६०. २४३
२ राजापुरचे इंग्रज वखारवाले शिवाजीचे कैदी. सन १६६१–१६६३. २४५
३ राजापुरच्या वखारीची नुकसानभरपाई. २४८
४ ले. उस्टिकची वकीली, सन १६७२. २५०
५ थॉमस निकोलसची शिष्टाई सन १६७३. २५१

६ हेनरी ऑक्सडेन याची मध्यस्थी सन १६७४.
७ राजापुरच्या इंग्रज व्यापाऱ्यांची भेट सन १६७५
८ राजापुरच्या भरपाईचा इतिहास.
९ शिवाजी आणि पोर्च्युगीज.

१५ राज्यव्यवस्था. २६२ ते २८१

१ राज्यविस्तार. २६२
२ स्वराज्याचें उत्पन्न व संपत्ति. २६३
३ सैन्यबळ. २६४
४ अष्ट प्रधान. २६५
५ सैन्य. २६७
६ मुलकी. २७०
७ देवस्थान धर्मादाय. २७२
८ रामदास स्वामी. २७३
९ शिवाजीच्या कारकीर्दीचा परिणाम. २७९

१६ योग्यता. २८२ ते २९९

१ राजनीति जुनीच होती काय ? २८२
२ शिवाजीला चिरस्थायी राज्य कां स्थापितां आलें नाहीं ? २८३
३ शिवकालीं राष्ट्रभावनेस अडथळे. २८६
४ आर्थिक उन्नतीकडेस मराठ्यांचें दुर्लक्ष. २९०
५ डावपेंच व कारस्थानें यांचा अतिरेक. २९१
६ शिवाजीचें वर्तन. २९२
७ शिवाजीच्या बुद्धीचें पृथक्करण. २९३
८ शिवाजीचें राजकीय ध्येय व अडचणी. २९५
९ राष्ट्रभावनेवर शिवचरित्राचा परिणाम. २९६

शिवचरित्रसाहित्याची चिकित्सा. ३००

सनावळी. ३१७ ते ३३०

सूचि. १ ते १४

बहूत लोक मेळवावे। एका विचारें भरवे॥

शिवराजास आठवावें। जीवित्व तृण समान मानावें।

इहलोकीं परलोकीं तरावें। कीर्तिरूपीं॥

शिवराजाचें आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा साक्षेप।

शिवराजाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं॥ [रामदास]

—सर यदुनाथ सरकार यांचें मराठी हस्ताक्षर

Acc. No. 2225

शिवाजी व शिवकाल. (Errata)

—०—

Page-line	अशुद्ध	शुद्ध
१५८–१७	पंधराव्या	दुसराव्या
२१३–२१	फिरण्याच्या	शौचाच्या
२३९—४	आनंद	हंविर
२४२—२	५ नांव प्रसिद्ध नाहीं परंतु	काशीवाई
३०६—४	अंबराचा	अंबर-कृत (or केलेला)
३१३–१४	शिलालेख	शिलाप्रेस
३१५–१०	कंपनीचा	चा (Omit company)



देवी भवानी शिवाजीस भवानी तलवार देते.

(मूर्तिकार करमरकर यांच्या शिवाजीच्या पुतळ्याच्या चबुतऱ्या-
भोंवतीं ब्रॉन्झवर खोदलेलें चित्र).



श्री
शिवाजी व शिवकाल

प्रकरण १ लें

आनंदवनभुवन

[१ चतुःसीमा व पीकपाणी. २ वसति. ३ राहणी. ४ स्वभाव. ५ साधुसंत. ६ वाङ्मय. ७ स्वाभाविक गुणदोष.]

चतुःसीमा व पीकपाणीः—सगळ्या जगांत देश या दृष्टीनें हिंदुस्थान हा जसा मोठा आहे तसाच हिंदुस्थानांत इतर प्रांतांच्या मानानें महाराष्ट्र हा विस्तीर्ण प्रांत आहे. याच प्रांताला समर्थ मोठ्या आवडीनें आनंदवनभुवन असें म्हणत असत. सोळाव्या शतकांत महाराष्ट्र ही संज्ञा दक्षिण हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यालाच लागत असे. आणि त्या वेळचें दक्षिण हिंदुस्थान म्हणजे गोदावरी व कृष्णा यांमधील प्रदेश एवढेंच होय. उत्तरेस तापी, दक्षिणेस वारणा आणि पूर्वेस सिना यांच्यामधील जो प्रदेश तो महाराष्ट्र. अर्थात् नाशिक, पुणें, सातारा जिल्हा, अहंमदनगर व सोलापुर यांचा कांहीं भाग आणि औरंगाबादेचा पश्चिम कोंपरा एवढ्या सुमारें २८ हजार चौरस मैलांच्या प्रदेशाला महाराष्ट्र अथवा आनंदवनभुवन ही संज्ञा दिलेली असे.

चतुःसीमा.

चारशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत दाट जंगल असल्यामुळें सहाजिकपणेंच वसति पातळ व विरळ असे. अनिश्चित पर्जन्यामुळें शेतीहि यथा-तथाच होई. फक्त खोऱ्यांतून जें कांहीं पीक येई तेंच खात्रीचें उत्पन्न असे. अशा जमिनींत भाताच्या पिकाची आशा करणें अगदींच वेडेपण होय. गहूं, बाजरी, ज्वारी इत्यादि पीक कांहींसें येई. आरंभीं थोडासा पाऊस पडून पुढें तो अगदींच थांबला कीं, उगवलेलीं रोपेंहि उन्हानें कोळपून जाऊन दुष्काळ ठरलेला असे. जमीन मूळचीच खडकाळ, त्यामुळें हिरवळीचें नांवच

पीक.

नको. अशा परिस्थितींत गुरें तरी कशावर जगणार ! दरवर्षाच्या दुष्काळांत त्यांचाहि संहार होतच असे हें निराळें सांगण्याची आवश्यकताच नाहीं.

विस्तार.

सिंध शिवायचा अर्धा अधिक मुंबई इलाखा, मध्यप्रांत, निजामचें राज्य आणि इतर प्रदेश मिळून एकंदर सुमारें दोन कोटि लोकांची भाषा मराठी ही आहे. छत्रपतीच्या काळापासून ही भाषा हळू हळू वृद्धिंगत होत असून इतर असंस्कृत भाषांचा आपोआपच लोप होत आहे. पूर्वी मराठ्यांची वसति विशेषतः कोंकणांतच असे. परंतु हल्लीं ठाणें जिल्हा, कुलाबा, रत्नागिरी आणि सावंतवाडी मिळून एकंदर दहा हजार चौरस मैलांच्या प्रदेशांत मुख्यतः मराठी भाषेचाच विशेष प्रचार आहे. सोळाव्या शतकांत यांपैकीं निंमे अधिक भागांत इतर जातींची वसति असून भाषाहि अर्थातच भिन्न होती.

रहदारी.

२ वसतिः—तुटलेले कडे आणि दाट व विपुल झाडी या योगें महाराष्ट्रांतील वसति विरळ होती हें मागें सांगितलेंच आहे; परंतु त्याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, अशा प्रदेशांतून प्रवास करणेंहि मोठें धोक्याचें व कठिण असे. गजबजलेल्या शहराचें येथें नांवच घ्यावयास नको. कापड, धातूचीं भांडीं आणि गोदावरी व कृष्णा यांच्या खोऱ्यांतील सुगंधी द्रव्यें या रस्त्यानें बंदरावर पोंचून तेथून युरोपांत रवाना होत, एवढ्याचमुळें याला व्यापारी पेठ म्हणावयाचें असेल तर खुशाल म्हणावें. परंतु खरी व्यापारी पेठ असल्या प्रदेशांत असणें शक्यच नाहीं. सैन्याच्या हालचालींनाहि हा प्रदेश फारच विकट. निसर्गतःच हा देश अनेक तुकड्यांत विभागलेला असल्यामुळें येथील वसतीहि स्वतंत्र व भागशः झालेली आहे. क्वचित् प्रसंगीं कोणी प्रवासी व्यापारी अगर एकादा लुटारू या बाजूला डोकावीत असे तेवढाच बाहेरच्या जगाशीं या लोकांचा संबंध येई; बाकी बाहेर जग आहे असें यांना वाटावयाचें कांहीं कारणच नसे. नाहीं म्हणावयाला इराण, अरबस्थान, तुर्कस्थान, अबिसीनिया आणि मध्य एशिया येथील लढाऊ लोक सैन्यांतील नोकरीच्या आशेनें गुलबुर्गा, बेदर, अहमदनगर, विजापूर आणि गोवळकोंडा या बादशाहीमध्यें याच प्रदेशांतून वारंवार जात असत हीच काय ती येथील रहदारी होय.

देशत्यागाचीं कारणें.

मराठे हे मूळचेच कांटक व हाडापेरानें मजबूत असल्यामुळें कोणत्याहि सैन्यांत त्यांचा सहज प्रवेश होई. त्यावेळीं दक्षिणेंत अनेक शाह्या असून त्या एकमेकींचा पाडाव करण्यासाठीं नेहमीं टपून बसलेल्या असत. मागें सांगितल्याप्रमाणें शेतकीची दैन्या-

वस्था व नोकरीची वर सांगितल्याप्रमाणें सुव्यवस्था असल्यामुळें मराठ्यांचें लक्ष साहजिकपणेंच शेतीवरून अगदींच उडून गेलें होतें. एकाद्यानें पुढारीपणा घेऊन शेंपन्नास पुंड लोकांची टोळी जमविली कीं, त्याला घाटेदारी किंवा सरदारी सहज मिळत असे. किंवहुना असा इसम आपल्याच नोकरींत असावा यासाठीं अहमहमिका सुरू होत असे. आणि अशा रीतीनें एकदां बाहेर जिवन गेलेले रहिवासी पुनः या प्रांतांत क्वचित्च परत येत असत. कारण जिकडे त्यांना जहागीर मिळे तिकडेसच ते कायमचे जाऊन रहात असत.

स्वातंत्र्यप्रियता.

मराठे जात्याच स्वातंत्र्यप्रिय आहेत. उंच शिखरें व तुटलेले कडे यांच्या जणूं मजवूत भिंतीच महाराष्ट्रास बनल्या असल्यानें कोणासहि येथील पठारावर येण्यास फार श्रम लागतात. त्यांतून अनेक संकटग्रस्त राजांनीं वेळोवेळीं याच स्थानाचा आश्रय घेऊन येथें मजबुती केलेली आहे. येथें बहुतेक ठिकाणीं जिवंत पाण्याचे झरे असून ऋतुपरत्वें पडणाऱ्या पावसाचें पाणी सांठवून ठेवण्याचीहि उत्कृष्ट सोय आहे. अशा प्रकारांनीं हा प्रदेश सुसंरक्षित असल्यामुळें मराठ्यांची मूळची स्वातंत्र्यप्रियता वृद्धिंगत झालेली आहे. महाराष्ट्रांतील अभेद्य किल्ले व दुर्गम वाटा यांनींहि स्वातंत्र्याकांक्षेची जोपासनाच केली आहे. एकाद्या सपाट प्रदेशाप्रमाणें हा प्रांत घोडदळाच्या जोरावर कोणी सर करूं म्हणेल तर ती आशाच नको. त्यांतूनहि एकाद्यानें यांतील कांहीं भाग हस्तगत केलाच तर तो, त्याची पाठ वळतांच पुनः येथील रहिवाश्यांच्या हातांत गेलाच म्हणून समजावें.

उद्योगीपणा.

३ राहणीः—अशा बिकट प्रदेशांतील रहिवासी आळशी व ऐदी असणें शक्यच नाहीं. खेड्यांतील पाटलांनासुद्धां स्वतःच्या जमिनीची मशागत करून बाकीच्या वेळांत करवसुली, पंचायत आणि गांवराखणीचें काम करावें लागत असे. लक्षाधीश असा येथें गवसणें मुळींच संभवनीय नाहीं. एकादा लहानसा व्यापारी कोठें कोठें आढळावयाचा व तोच व्याजबट्ट्याचाहि धंदा करी. मोठमोठ्या जमीनदार पाटलाजवळसुद्धां सोनें अगर नाणें दिसावयाचें नाहीं, धान्य मात्र मुबलग असे. माणसेंच जेथें अशीं द्रव्यहीन तेथें देव व देवळेंहि दरिद्रीच होतीं हें काय निराळें सांगावयास पाहिजे !

साधेपणा.

राजकारणांत मराठे पुढें सरसावले तरीहि त्यांना प्रजानुरंजन साधलें नाहीं. मुसलमानांच्या 'आप लीजिये, आप लीजिये' च्या मानमरातबापुढें मराठ्यांचें सरळ वर्तन उद्धटपणाचें वाटे. मरा-

ह्यांची सामाजिक राहणी अगदींच साधी, त्यामुळें चित्ताकर्षकपणा असा तिच्यांत नसे. डामडौल व ऐट मराठ्याला ठाऊक नाहीं. घोड्यावर बसण्यांत तो अत्यंत पटाईत खरा, परंतु त्याच्या बैठकींत मोहकपणा मुळींच नसे. मराठ्यांच्या कार-कीर्दींत कोणत्याहि नाजुक कलेची उन्नति अगर जोपासनाहि झालेली दिसत नाहीं. पेशव्यांनीं बांधिलेले वाडेसुद्धां अगदींच साधे आहेत. लहान लहान खोल्या, अरुंद जिने, भिकार बांधणी, ठेंगणा कद परंतु कोरीव काम मात्र पुष्कळ, असें या वाड्यांचें थोडक्यांत वर्णन सांगतां येईल. सारांश मराठ्यांचें लक्ष सौंदर्यापेक्षां उपयुक्ततेकडेस विशेष होतें हें यावरून सिद्ध होतें.

४ स्वभावः—वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्राची भूमि व हवा नाजुकपणाला प्रतिकूल असली तरी कित्येक बाबतींना ती फार अनुकूलहि आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. मराठ्याचा आत्मप्रत्यय, मराठ्याचें धैर्य, मराठ्याचा दीर्घोद्योग, मराठ्याचा कडक साधेपणा, मराठ्याचा न्यायीपणा, मराठ्याची सामाजिक समानता आणि मराठ्याचा स्वाभिमान हे सद्गुण अनन्य साधारण आहेत. ह्युएन्संग हा चिनी प्रवासी इसवी सनाच्या सातव्या शतकांत हिंदुस्थानांत आला होता. त्यानें मराठ्यांबद्दल पुढीलप्रमाणें लिहून ठेविलें आहे. " मराठा हा जातीनें मोठा मानी व युद्धोत्सुक असतो. उपकारकर्त्याविषयीं तो कृतज्ञ व अपकारकर्त्याचा सूड घेणारा असतो. शरणागतासाठीं तो प्राण देण्यास तयार असतो परंतु शत्रूचे प्राण हरण करण्यासहि तो मागें पाहत नाहीं. सूड उगविण्यास तो एका पायावर तयार असला तरी विश्वासघातानें तो कधींच कोणाचा सूड उगवीत नाहीं."

स्वभाव.

सातव्या शतकानंतर हिंदूंचें साम्राज्य नष्ट झालें, त्यांचा कोणी त्राता नव्हता, मुसलमानांच्या स्वाऱ्यांनीं देश उद्ध्वस्त केला गेला, लहान लहान संस्थानिक आपआपसांत भांडूं लागले इत्यादि अनेक आपत्तींमुळें सातव्या शतकांतील मराठ्यांचा स्वभाव सतराव्या शतकांतहि तंतोतंत कायम होता असें म्हणतां येत नाहीं. तथापि चपलता, धैर्य, आत्मप्रत्यय, स्वाभिमान आणि समानतेची आवड हे सद्गुण आजहि मराठ्यांत दिसतात. गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या कांठीं त्यांचीं असलेलीं विस्तीर्ण राज्यें चवदाव्या शतकांत नाहींशीं झाल्यावर ते पश्चिमेकडेस रूक्ष भूप्रदेशांत रेटले गेले व तेथें त्यांना दारिद्र्य व एकांतवास सहन करावा लागला. क्रूर श्वापदांशीं व निष्ठुर निसर्गाशीं त्यांना सतत झगडावें लागल्यामुळें त्यांच्या मूळच्या शौर्यांत आणि कांटकपणांत

सद्गुण.

दूरदृष्टीची व चातुर्याची भरच पडली. धैर्य, चातुर्य, सहनशक्ति, स्त्रीचे छापे घालणें, अडचणींतून निसटून जाणें, प्रसंगानुसार वरिष्ठाच्या हुकुमाचीहि वाट न पाहतां एकदम युद्धक्षेत्र वदलणें या गुणांत मराठ्यांची वरोबरी पंजिदान एखिया खंडांत तरी थोडीफार अफगाण लोकच करूं शकतील. इतर कोणीहि करूं शकणार नाहींत.

सामाजिक समानता.

सोळाव्या शतकांतील मराठ्यांत गरीब व श्रीमंत हा सामाजिक भेद मुळींच नव्हता. लढवय्या आणि मेहेनती या नात्यानें गरीवालाहि किंमत होती. बहुजन समाज साधारणतः गरीबच असल्यानें प्रत्येक गरीब मराठा स्वाभिमानी असे. विशेषतः दिल्ली-आग्र्याकडेस धंदेवाईक भिकारी जसे शेंकड्यानें मोजण्याइतके होते तसा स्वाभिमानशून्य प्रकार महाराष्ट्रांत मुळींच नव्हता. महाराष्ट्रांत पडद्याची चाल नसल्यानेंहि स्त्रीपुरुष निरोगी राहिले आणि त्यांची संततिसुद्धां तशीच निपजली.

५ साधुसंतः—या वेळच्या धार्मिक चळवळींचा हेतूहि समाजांतील उच्च नीच भावांचा लोप करण्याकडेसच विशेष होता. मनुष्याची थोरवी त्याच्या जन्मावर अवलंबून नसून कृतीवर अवलंवून आहे या मताचा प्रसार जोरानें झाला व वारकरी पंथानें या प्रसाराला फारच मोठी मदत केली असें म्हटलें पाहिजे. पंढरीला दरवर्षी आषाढी कार्तिकी एकादशीस फार मोठी यात्रा भरत असून त्या यात्रेंत समानता व प्रेम उचंबळून आलेलें अद्यापिहि दृग्गोचर होतें.

धार्मिक चळवळ.

सोळाव्या शतकांत ज्याप्रमाणें युरोपांत प्रॉटेस्टंट धर्मसुधारक निघाले त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि भाषा, समाज व धर्म यांच्यांत मोठी क्रांति घडवून आणणारे महन्त उत्पन्न झाले. विशेषतः हा क्रांतीचा प्रयत्न पंधराव्या व सोळाव्या शतकांत महाराष्ट्रांत अधिक परिणामकारक असा दृष्टीस पडतो. ही सुधारणा जुनी कर्मठ पद्धतीची नसून तिच्या उलट होती. या सुधारणेचा मूळ हेतु चित्तशुद्धि, सार्वत्रिक प्रेम व इतर सद्गुणांचा विकास व्हावा असाच होता. हें सुधारणेचें काम एका विशिष्ट वर्गानेंच केलें नसून सर्व समाजानें केलेलें आहे. या चळवळीचा पुढारीपणा साधु व सिद्ध, कवि आणि तत्त्ववेत्ते, शुद्धाचरणी व समाजनेते यांच्याकडेस होता. व आश्चय हें कीं, असले महात्मे सोनार, चांभार, कुंभार, शिंपी, न्हावी, वाणी किंबहुना महार जातींतसुद्धां उत्पन्न झाले, मग ब्राह्मण वर्णांत उत्पन्न झाले होते हें निराळें

संतांची कामगिरी.

सांगण्याची आवश्यकताच नाहीं. निवृत्ति–ज्ञानदेव–सोपान–मुक्ताबाई–एकनाथ–नामदेव–तुकाराम–रामदास–गोरा कुंभार–सेना न्हावी–नरहरि सोनार–चोखामेळा हीं संतमंडळींचीं नांवें महाराष्ट्रीयांच्या नित्य परिचयाचीं आहेत.

जत्रा.

कोणत्या तरी निमित्तानें विशिष्ट दिवशीं पुण्यक्षेत्रीं हजारों लोकांची जत्रा भरविणें यांत फार मोठा अर्थ भरलेला आहे. अशा जत्रांमध्यें जातिविषयक संकुचित भावनांचा अनायासें लोप होतो, विचारविनियम करितां येतो आणि सर्वांत महत्वाची बाब म्हणजे विशिष्ट मत व संस्कृति यांचा प्रसार सहज होतो.

पोथी–वाचन.

६ वाङ्मयः—महाराष्ट्रांत एक भाषेच्या योगानेंहि एकीला पुष्कळ मदत झालेली आहे. भारतरामायण हे सर्व हिंदूंना पूज्य ग्रंथ होत. या संस्कृत ग्रंथांच्या आधारानें मराठी काव्यें निर्माण झालीं. तुकाराम–रामदास–वामन–मोरोपंत यांचीं भक्तिपर काव्यें व नीतिबोधपर म्हणी यांचा प्रसार सर्व महाराष्ट्रांत आबालवृद्धांच्या तोंडीं झालेला आहे. पूर्वीं शीघ्र–प्रवासाचीं साधनें नसल्यानें पावसाळ्यांत लोक घरींच राहत असत. अशा वेळीं दक्षिणेंत आणि कोंकणांत प्रत्येक कुटुंबांत कोणती तरी एक पोथी नित्य नियमानें एकानें वाचून दाखवून बाकीच्यांनीं एकाग्रतेनें ती श्रवण करण्याचा प्रघात असे.

गद्य–पद्य.

समाजांतील समानता व साधेपणा यांचा ठसा भाषेवरहि उमटलेला दिसतो. संतकवींची कविता साधी, साधारणतः एकाच वृत्तांत रचलेली पण ठसकेदार व परिणामकारक अशी आहे. शब्दावडंबर, अलंकारांची गर्दी, व्याकरणनियमांचा चोखटपणा, नाजूक मनोवृत्तींना क्षोभकारक असले प्रकार बहुशः संतकवींच्या काव्यांत आढळावयाचे नाहींत. वाङ्मयाचे गद्य आणि पद्य असे दोन प्रकार आहेत. त्यांत राजकारणी पत्रव्यवहार वगळला तर अठराव्या शतकापर्यंत मराठी गद्य वाङ्मय फारसें नाहीं असेंच म्हणावें लागेल. अठराव्या शतकापर्यंत जो राजकीय पत्रव्यवहार आहे तोहि शुद्ध मराठी नसून फारसी भाषेची, म्हणींची व वाक्प्रचारांची त्यावर विशेष छाप पडलेली आहे असें दिसतें. शेंकडा ऐशीं फारसी शब्द प्राचीन राजकीय पत्रव्यवहारांत आहेत. संस्कृत शब्दप्रचुर असें ललित वाङ्मय जें आज मराठीमध्यें आहे तें इंग्रजी अंमलानंतर उदयास आलेलें आहे.

पोवाडे.

अनेक वृत्तांत नीतिपर व अनेक देवांच्या स्तुतिपर रचलेली नानाप्रकारची कविता मराठ्यांना फारशी ठाऊक नव्हती, किंबहुना अशा कवितेकडे त्यांचें चित्तहि वेधणें शक्य नव्हतें. त्यांचें चित्त

वेधण्याला एकटे पोवाडेच समर्थ होते. तरवारीच्या जोरावर सत्ता प्रस्थापित करणारा किंवा लढाईंत छातीवर शत्रूंचे वार झेलणारा बहादर मराठा हा पोवाड्याला जितका उत्तेजक विषय आहे तितका दुसरा कोणताहि नाहीं. आणि म्हणून असल्या वीराचे पोवाडे ऐकण्यास लोक अगदीं उत्सुक झाले [illegible] सह्याद्रीच्या कड्यावर किंवा खोल दरींतून गरीव गोंधळ्याची डफावरील थाप कानीं पडतांच आजसुद्धां त्यानें म्हटलेला पोवाडा ऐकण्यास जनसमाज उत्सुक झालेला असतो.

" रंगपंचमीच्या दिवशीं सायंकाळीं चावडीसमोर पिंपळाच्या पारावर फाटकी तुटकी वैठक घातली आहे; वुदलीनें ओतल्या जाणाऱ्या तेलानें पेटणारे हिलाल पाजळत आहेत; पायांत जोडा, डोक्यावर कंगणीदार पगडी, व त्यांत तुरा खोंवलेला अशी अर्धगोंधळी अर्धतमासगीर मंडळी तुणतुणीं खेंचून तिसऱ्या सप्तकांत सूर नेऊन गात व साथ करीत आहेत, कडकडीत डफावर डाव्या हाताची थाप मारून त्यांचा पुढारी एकाहून एक सरस असे पोवाडे आठ-आठवून म्हणत आहे; आणि सर्व श्रोते मंडळी तल्लीन होऊन तटस्थ झाली आहे-अशा अस्सल देशी थाटांत पोवाडे ऐकण्याची गोष्ट कांहीं वेगळीच आहे. तिचें स्वारस्य ज्यानें अनुभविले नसेल त्याला तें सांगून काय कळणार ?" (इतिहास विहार. पृ. ७४-७५) परंतु हे पोवाडे शिवकालांत व त्यानंतर उदयास आले असें आजतरी निदान वाटतें.

संघटना.

सतराव्या शतकांत मराठ्यांची भाषा आणि मराठ्यांचा समाज अशा प्रकारचा होता. आणि अशा समाजाची संघटना शिवाजीनें करून तीन वादशाहीशीं आजन्म टक्कर दिली व त्याच संघटनेच्या पायावर पेशव्यांनीं हिंदुपदपादशाही स्थापन करण्याचा जगड्व्याळ प्रयत्न केला. सारांश राजकीय क्षेत्रांत शिवाजीनें व धार्मिक क्षेत्रांत साधुसंतांनीं सप्रयोग असें सिद्ध करून दाखविलें कीं सर्व जातींना या दोनहि क्षेत्रांत आपआपल्या मगदुराप्रमाणें भाग घेतां येऊन कार्य करून दाखवितां येतें. आणि असें सर्वांनीं मिळून कार्य करणें म्हणजेच राष्ट्रीय भावना उत्पन्न होणें होय. अशा प्रकारची राष्ट्रीय भावना शिवाजीनें उत्पन्न केली व अठराव्या शतकाच्या शेवटीं जरी जातिभेद कायम होता तरी शिवाजीनें लाविलेल्या राष्ट्रीय भावनेच्या वीजाचा वृक्ष चांगलाच फोंफावला होता असें निःशंकपणें म्हणतां येतें.

७ स्वाभाविक गुणदोषः—शिवाजीच्या सैन्यांत मराठेमावळ्यांचा भरणा विशेष असे हें जगत्प्रसिद्धच आहे. कांहीं मावळे शेतकी करितात व कांहीं इतर धंदा करितात असे त्यांच्यांत दोन

वागणूक.

प्रकार आहेत. अशा सगळ्या मराठ्यांची संख्या पाऊण कोटि आहे. त्यांचे गुणावगुण पुढें दर्शविल्याप्रमाणें सांगतां येतात. मराठे हे साधे, मोकळ्या मनाचे, स्वतंत्र विचाराचे, सभ्य आणि विश्वासपात्र असे असतात. मराठे शूर व बुद्धिवान् असतात. पूर्व वैभवाविषयीं त्यांना अभिमान वाटतो व स्वभावानें ते आनंदी असतात. आपली गरीवी सहसा कोणालाहि दिसूं नये अशी त्यांची वागणूक असते. ते शरीरानें मजवूत व चपळ असतात. इंग्रजी सैन्यांत मराठ्याएवढा इतर कोणत्याच जातीचा भरणा दिसत नाहीं. मनानें उदार, स्वभावानें दिलदार, वागणुकींत आदरयुक्त व प्रवृत्तीनें धर्मशील अशी ही मराठ्यांची जात आहे. जे मराठे शेती करितात तेसुद्धां वर सांगितल्याप्रमाणेंच असतात. त्यांचा मिजास थंडा असतो व ते मेहेनती असतात. दक्षिणेंतील शेतकरी मराठे मजवूत, कांटक, कष्टाळु व पिळदार शरीराचे असतात. त्यांच्या वायकासुद्धां त्यांच्याचप्रमाणें सशक्त असतात.

दोष.

मराठ्यांच्या सद्गुणवर्णनानंतर त्यांच्या स्वभावांतील दोषहि दाखविणें क्रमप्राप्त आहे. मुख्य राजसत्ताच जेव्हां आपला व्यवहार लुटालुटीवर चालविते तेव्हां तिचे निरनिराळे अधिकारीहि थोड्याबहुत प्रमाणांत लांच वगैरेंचे रूपांत द्रव्यप्राप्ति करून घेत होते यांत नवल नाहीं. चाकरांचें नीतिशास्त्र धन्याच्या नीतिशास्त्रावरच अवलंबून असणार हा नियम प्रसिद्धच आहे. साधेपणा, कष्टाळूपणा, समदृष्टि या सद्गुणांत मराठे जसे प्राचीन स्पार्टन किंवा ग्रीक लोकांप्रमाणेंच होते तसेंच त्यांच्या द्रव्यप्राप्तीच्या रीतींतहि तंतोतंत साम्य होतें. मराठ्यांना आपल्या कारकीर्दीत व्यापार उद्योगाची वाढ करतां आली नाहीं, हा त्यांचा मोठाच दोष होय. एकहि प्रसिद्ध व्यापारी अथवा सावकार मराठी राज्यांत पुढें आल्याचें दिसत नाहीं. सारांश द्रव्योत्पादनशास्त्रांत मराठे अनभिज्ञ होते, व त्यामुळें त्यांची राज्यव्यवस्था त्या दृष्टीनें शेवटपर्यंत कमकुवत राहिली. जगताला आश्चर्यचकित करून सोडणारे पराक्रम करून पेशव्यांनीं विजय संपादन केले, परंतु त्यांचा कर्जबाजारीपणा त्यांस शेवटपर्यंत भोंवला. शिवाजीला व्यापाराकडेस लक्ष देण्यास विशेष अवधीच सांपडला नाहीं. परंतु त्याच्या नंतरच्या राज्यकर्त्यांनीं या अंगाचा विचार अवश्य करावयास पाहिजे होता.

अद्वितीयत्व.

तथापि हिंदुस्थानामध्यें मराठ्यांना आज अद्वितीय ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे. त्यांच्या अगदीं अलीकडच्या पूर्वजांनींसुद्धां शेंकडों लढाया मारून धारातीर्थीं आपले देह ठेविले आहेत. व्यवस्थित रीतीनें मोठमोठ्या फौजांच्या हालचाली केल्या आहेत, विलक्षण राज-

कारणें लढविलीं आहेत, राज्याची फडणिशी यशस्वीपणें करून साम्राज्यांतील महत्त्वाचे राजकीय प्रश्न उलगडून दाखविले आहेत; सारांश त्यांनीं आपल्या कृतीनें हिंदुस्थानचा अगदीं अलीकडचा इतिहास वनविला आहे. या सर्व पराक्रमाचें स्मरण हेंच मराठ्यांच्या वैभवाचें निदर्शक आहे. बुद्धीची तीक्ष्णता, दीर्घोद्योग, साधी राहणी, उच्च विचारसरणी, कोणताहि सुविचार आचारांत आणण्याची धमक, चारित्र्य, वसुधैव कुटुंबकवृत्ति इतक्या सर्व सद्गुणांचा सन्निपात मराठ्यांच्या ठिकाणीं झालेला असल्यामुळें आजतरी हिंदुस्थानांत त्यांच्यापेक्षां वरचढ कोणी असेल अशी कल्पनासुद्धां करण्याचें कारण नाहीं. वरील सद्गुणसमुच्चयांत जर मराठ्यांमध्यें संघटनेचें चातुर्य, सहकारिता, आधुनिक यांत्रिक कलेचें ज्ञान आणि आहे त्याहून अधिक दूरदृष्टि इतक्या सद्गुणांची भर पडेल तर पृथ्वीच्या पाठीवर त्यांची बरोबरी कोणीहि करूं शकणार नाहीं !

प्रकरण २ रें

उदय

सन १६२७–१६५६

—०—

[१ पूर्वज. २ शहाजी १६२५–१६३६. ३ पूर्वचरित्रकथनाची दुष्करता. ४ जन्म व बाल्य. ५ पुण्याची जहागीर १६३७. ६ शिक्षण. ७ बारा मावळें काबीज. ८ भावी जीवनाचा अरुणोदय. ९ स्वराज्याची मुहूर्तमेढ. १० शहाजीचा बंदिवास. ११ स. १६५०–१६५५ तील चळवळी. १२ जावळी हस्तगत. १३ मोऱ्यांची भवितव्यता. १४ अधिक लाभ.]

पूर्वज:—मराठ्यांमध्यें भोंसले हें एक जातिवंत कुळ असून त्या कुळाच्या शाखा पश्चिम हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं पसरलेल्या आहेत. मराठ्यांतील पुष्कळ कुटुंबें शेती करितात त्याचप्रमाणें भोंसले हेहि पूर्वी शेतीच करीत असत. परंतु पंधराव्या शतकाच्या शेवटीं बहामनी राज्य लयास गेलें व सतराव्या शतकाच्या उदयाबरोबर निजामशाहीचा अस्त झाला त्यामुळें त्या त्या राज्यांतील कर्तृत्ववान् पुरुषांनीं आपल्या मुत्सद्दीपणाच्या व शौर्याच्या बळावर आपला उदय करून घेतला. यासंबंधीं भोंसले या कुटुंबाचें उदाहरण अगदीं डोळ्यांत भरण्यासारख आहे. प्रथम शेतकरी, नंतर लुटारू, पुढें पागेदार, पश्चात् सरंजामी सरदार अशा पायऱ्या पायऱ्यांनीं या घराण्यांतील पुरुष वैभवाच्या शिखरावर चढून शेवटीं छत्रपति पदावर त्यांनीं आरोहण केलें.

पूर्वकथन.

इसवी सनाच्या १६ व्या शतकांत भोंसल्यांचा मूळ पुरुष बावाजी हा 'मौजे हिंगणी बेरडी व देउळगांव वगैरे तालुके पाटस परगणे पुणें*' येथें आपली लहानशी शेती व पाटिलकीचें वतन संभाळून सुखानें नांदत होता. त्याला मालोजी व विठोजी असे दोन मुलगे होते. यांचें व भाऊबंदांचें कांहीं भांडण झाल्यामुळें या उभयतां बंधूंनीं 'बाइकासहवर्तमान कसबें वेळुरास नजीक दौलताबादेस येऊन*' वसति केली. डोंगरपायथा असल्यानें

मूळपुरुष.

---

* ९१ कलमी

वेरूळची जमीन शेतीला फारशी अनुकूल नव्हती, म्हणून हे उभयतां 'चाकरीच्या उमेदवारीनें कसवें सिंदखेडास आले. लुखजी जाधवराव देसमूख सरकार दौलताबाद व मनसवदार निसबत निजामशहा पातशहा बारा हजार घोडियाची दौलत होती त्यांस भेटोन चाकरी दरवजियावरी भोये बारगिरी कबूल करून राहिले*.' तेथें असतांना मालोजीचा मुलगा शहाजी हा पांच वर्षांचा झाला आणि लुखजी जाधवरावांची कन्या जिजाऊ तीन वर्षांची झाली त्या सुमारची तेथें घडलेली पुढील आख्यायिका प्रसिद्ध आहे.

वाङ्निश्चय.

'सिमगा सण आला....राग रंग कलावंत नाच मांडिला. जाधवराऊ यांणीं दोघांजणांस (=शहाजी व जिजाबाईस) मांडीवर घेऊन गुलाल बुक्का पुढें ठेवून खेळूं लागलीं. तमासा कवतुक जाधवराऊ पाहूं लागले. मांडीवर मुलें दोघे आहेत तों चित्तामध्यें उद्गार आठवून सभेमध्यें बोलिले जे जिजाऊसारिखें रत्न कन्या श्रीनें पैदा केली आहे. ईस वर चित्तायोग्य शाहाजी हें मूल उत्तम ईजोगा होये तर बरें आहे*.' जाधवरावाचें हें भाषण ऐकतांच मालोजी व विठोजी तेथें सभेंतच ताडकन उभे राहून सर्व मंडळीस मोठ्यानें ओरडून म्हणाले. 'आजीपासून जाधवराऊ आमचे व्याही जाले...तुम्ही समस्त साक्ष असा...जिजाऊ आमची सून झाली*.' परंतु 'कुणबी, पाटील बारगीर देशनिकाले' यांस मुलगी देणें गिरिजाबाईस पसंत न पडल्यानें जाधवरावानें मालोजी व विठोजीस चाकरीवरून दूर केलें.

मालोजीचा पराक्रम.

याप्रमाणें नोकरी गेल्यावर हे उभयतां बंधु परत वेरुळास आले व पुनः शेती करूं लागले. एके रात्रीं मालोजी शेताची राखण करीत असतां त्याचा डोळा लागला. तत्काळ भवानीनें स्वप्नांत येऊन 'या वारुळांत सर्प आहे....त्यास नमस्कार करून वारुळ खणोन सात कढया माल घेणें'* असें सांगितलें. दुसरे दिवशीं त्यानें तेथें उकरून पाहिलें तों सात कढया द्रव्य त्यास मिळालें व त्यामुळें जाधवरावाशीं सोयरीक करण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याची आशा वाटूं लागली. मालोजीनें हें द्रव्य चांभारगोंद्याच्या शेषापा नाइकाजवळ ठेव ठेविलें. कारण हा नाईक मालोजीचा पूर्वपरिचित असून मोठा इमानी म्हणून प्रसिद्ध होता. मालोजीनें कांहीं द्रव्य खर्च करून 'हजार घोडीं उत्तम कारवानापासून खरेदी केलीं. बारगीर व खासदार व जीन

---

* ९१ कलमी.

खोगीर सिले व पाखरा उत्तम तयार केलें. डेरे पालखिया तयार करून*' तो एक फौजबंद लढवय्या बनला व कोणाचीहि सरदारी पतकरण्यास सिद्ध झाला. 'जगपालराव निंबाळकर फलटणकर बारा हजार फौज त्यापाशीं पुंडावे करून मधेंच होते*.' त्यास मालोजी जाऊन मिळाला व लवकरच इतका प्रसिद्धीस आला कीं, मोडकळीस आलेल्या निजामशहानें मालोजीस आपल्या पदरीं ठेवून घेतलें. हा प्रकार सोळाव्या शतकाच्या शेवटल्या दसक्यांत घडला. म्हणजे याच सुमारास अकबर बादशहाच्या विजयानें अहमदनगरच्या निजामशाहीस मोठाच धक्का मिळाला होता व त्यामुळें अनेक लहान लहान पथकवाले कोणाच्या तरी पदरीं राहून आपलें शौर्य गाजविण्याची संधि पाहूं लागले होते. मालोजीनें याप्रमाणें सरदारी मिळविल्यामुळें जाधवरावाला आतां त्याच्याशीं सोयरीक करण्यांत मुळींच अडचण राहिली नव्हती. त्यामुळें शहाजी-जिजाबाईचा विवाह मोठ्या थाटानें झाला. मालोजी व विठोजी यांची निष्ठा 'श्रीशंभूमहादेव यांचे भजनीं बहूत होती. त्यास शिखरीं यात्रा चत्रमासीं भरते. पांच सात लक्ष माणसें मिळतात. पाणियाचें बहुत संकट. उदक नाहीं. तीन कोशांवरून उदक आणितात. लोक श्रमी बहुत होतात. म्हणून राजश्री मालोजीराजे यांनीं तेथें जागा पाहून तळें एक थोर बांधिलें. सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें. अपरिमित द्रव्य खर्च केलें. तळें संपूर्ण उदकानें भरलें*.' अशा उदार व पुण्यकारक कृत्यांमुळें मालोजीची कीर्ति फारच वाढली. पुढें कांहीं कालानें मालोजी मरण पावला त्यावेळीं त्याची पूर्वीची हजार स्वारांची पागा पुष्कळच अधिक वाढली होती. मालोजीच्या जागीं निजामशाही सरदारांत विठोजीची नेमणूक झाली व सुमारें सन १६२३ मध्यें विठोजी निवर्तल्यावर त्या जागीं मालोजीचा वडील पुत्र शहाजी हा निजामशाही सरदार झाला. विठोजीच्या आठ मुलांपैकीं खेलोजी, परसोजी, मलोजी व संभाजी असे चौघेजण यापूर्वीच शहाजहानच्या नोकरींत शिरले होते.

२ शहाजी १६२५-१६३६:—स. १६२६ मध्यें निजामशाही वजीर मलिकंबर मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा फातखान हा वजीर झाला. सन १६२८ मध्यें निजामशहाच्या ताब्यांतील पूर्वखानदेशावर मोंगलांनीं स्वारी केली. त्यावेळीं त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं फातखानानें निजामशाहीतर्फे शहाजीस पूर्वखानदेशांत मोंगलांवर पाठविलें होतें. आणि इतिहासांत शहाजीचें नांव याच वेळीं प्रथमच

शहाजीचें पूर्ववृत्त.

* ९१ कलमी.

येतें. याच सुमारास दक्षिणेंत अनेक कुटिल कारस्थानें चालू झालेलीं होतीं. निजामशहा व त्याचा वजीर फातखान हे एकमेकांविरुद्ध कांहीं कारस्थानें रचीत होते (एप्रिल १६३०). निजामशहानें लुखजी जाधवरावाचा खून कपटानें केला (१६३०). मोंगलांचा अहमदनगर येथील सुभेदार खानेजहान लोदी यानें मोंगली मुलुखाचा कांहीं भाग विश्वासघातानें निजामशहास दिला (१६२७). पुढें मोगलांनीं निजामशहावर स्वारी केली (१६२८). भग्न झालेल्या अहंमदनगरच्या राज्यापैकीं शक्य तेवढा हिस्सा आपल्या राज्यास जोडून घेण्यासाठीं विजापुरच्या अदिलशहाचे प्रयत्न चालू होते. असा एकंदर सर्वत्र कपटनाटकाचा खेळ सुरू असल्यामुळें निजामशाही राज्यांत सर्वत्र अंदाधुंदी व गोंधळ माजून तें अगदीं खिळखिळें होऊन गेलें होतें. शहाजीसारख्या कार्यक्षम, साहसी व महत्त्वाकांक्षी पुरुषाला आपलें कर्तृत्व दाखविण्याला ही सोन्यासारखीच संधि होती. आपला सासरा जो जाधवराव त्याचा निजामशहानें खून केला हें ऐकतांच शहाजीनें निजामशहाची नोकरी सोडून दिली व कांहीं फौज जमवून तो जुन्नरपासून अहंमदनगरपर्यंतचा प्रदेश कावीज करण्याच्या प्रयत्नास लागला. निजामशाही, अदिलशाही व मोंगली अशा तीनहि राज्याच्या सरहद्दी त्या ठिकाणीं एकमेकांस भिडलेल्या होत्या व तेथील चौकी पहाराहि पाहिजे तसा मजबूत नव्हता म्हणून शहाजीनें तेथें फारच धुमाकुळ उडवून दिला. नंतर म्हणजे सन १६३० च्या शेवटीं शहाजी आपला मोठा मुलगा संभाजी व लहान भाऊ शरीफजी यांच्यासह मोंगलांच्या नोकरींत शिरला. परंतु जून १६३२ मध्यें त्यानें ती नोकरी सोडून विजारपुरकरांचा आश्रय घेतला, व तेथील कारभारी मुरार जगदेव याचा शहाजी हा उजवा हात बनला. विजापुरास या वेळीं खवासखान हा प्रधान होता व मुरार जगदेवावर त्याचा पूर्ण भरंवसा असे.

शहाजीचा पराक्रम.

सन १६३२ च्या फेब्रुवारींत वजीर फातखान यानें बुऱ्हाण निजामशहा याचा खून करवून हुसेन निजामशहास गादीवर बसविलें. परंतु सन १६३३ तारीख १७ जून रोजीं मोगलांनीं निजामशाही राजधानी दौलताबाद जिंकून हुसेन निजामशहास आपल्या ताब्यांत घेतलें. आणि यामुळें एके वेळीं प्रख्यात असलेलें निजामशाही राज्य लयास गेलें. निजामशाहीच्या स्थानिक सुभेदारांनीं या संधीचा फायदा घेऊन स्वातंत्र्य पुकारिलें. पुणें चाकणपासून अहंमदनगर नाशिकपर्यंत निजामशाही प्रदेश शहाजीनें आपल्या ताब्यांत घेऊन आसपास सर्वत्र लुटालूट आरंभिली. विजा-

पूरच्या पादशहाच्या मदतीनें सन १६३३ च्या ऑगस्टमध्यें निजामशहा नांवाच्या एका मुलास शहाजीनें प्रेमगड ऊर्फ शहागड येथें निजामशाही राज्यावर स्थापून या बालराजाच्या नावें तीन वर्षें राज्यकारभार चालविला. निजामशाहीची राजधानी दौलताबाद पडल्यावर निजामशाही फौज साहजिकच बेकार झाली होती. ती बारा हजार फौज शहाजीनें पुनः नोकरींत ठेविली आणि उत्तर कोंकणपर्यंतचा मुलुख पुनः आपल्या कबजांत घेतला व मोंगलांनीं सतावून सोडलेल्या बिदर दौलताबादेपर्यंतच्या मुलुखावर तो स्वाऱ्या करूं लागला.

शहाजी अदिलशाहींत जातो.

परंतु सन १६३६ च्या फेब्रुवारींत मोगलांनीं एक फार मोठें सैन्य शहाजीच्या पारिपत्यासाठीं रवाना केलें. या स्वारींत शहाजीनें मोंगली सैन्याला पुष्कळच दमविलें. परंतु शेवटीं त्याचा पराजय होऊन ऑक्टोबर महिन्यांत त्याला, बालराजा निजामशहा यास मोंगलांच्या स्वाधीन करणें भाग पडलें. शहाजीनें या वेळीं आपले सात किल्लेहि मोगलांस दिले व तो स्वतः विजापूरच्या नोकरींत शिरला. या वेळीं शहाजीची चाळिशी उलटून गेली असल्यानें त्याची स्वतंत्र कर्तृत्वाची धमक साहजिकपणेंच मंदावली होती व शिवाजी या वेळीं आठ नऊ वर्षांचा असून त्याच्या भावी पराक्रमाचीं चिन्हेंहि दिसूं लागलीं होतीं, या दोनहि कारणांमुळें शहाजीचें नांव यापुढें इतिहासांत दुय्यम म्हणूनच येतें व मुख्य कर्तृत्व शिवाजीचेंच दृष्टीस पडतें.

साधनांचा अभाव.

२ पूर्वचरित्र कथनाची दुष्करताः—पुरेशा विश्वसनीय साधनांच्या अभावीं सन १६२७ पासून सन १६५७ पर्यंत तीस वर्षांचा शिवाजीचा इतिहास सांगणें प्रायः कठिण झालें आहे. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढी आहे कीं, पूर्वचरित्राच्या तपशिलांतच मतभेद आहे. मुख्य रूपरेषा कांहीं कोणाला अमान्य नाहीं. इसवी सन १६३७-१६३८ या दोन वर्षांत शिवाजी पुण्यास होता कीं विजापुरास होता ? मावळ्यांना आपल्या लगामी लाविण्याचें कार्य दादोजी कोंडदेवानें केलें कीं शिवाजीनें केलें ? दादोजी कोंडदेवाचा मृत्यु सन कोणता ? विजापुरकरांचा कोणता किल्ला शिवाजीनें पहिल्या प्रथम कोणत्या सनांत घेतला ? शहाजीनें जे किल्ले प्रथम शिवाजीच्या ताब्यांत दिले नव्हते ते कोणत्या सालांत शिवाजीच्या ताब्यांत आले ? सन १६५९ मध्यें जे चाळीस किल्ले शिवाजीच्या ताब्यांत होते ते कोणत्या क्रमानें व कोणकोणत्या सालांत त्याच्याकडेस आले इत्यादि बारीक सारीक माहितीसंबंधीं निश्चित असें कांहीं विधान आजतरी करितां येत नाहीं. तथापि या सर्व गोष्टी घडलेल्या आहेत

याबद्दल मुळींच दुमत नाहीं. वरील तपशिलासंबंधीं उपलब्ध साधनांचा योग्य विचार करून मीं माझें मत जें ठरविलें आहे तें यापुढें क्रमशः देणार आहें. हें मत ठरवितांना परस्पर विरोधी अशा शक्याशक्यतेचा अवश्य तेवढा विचार करण्यांत आलेला आहे.

४ जन्म व बाल्यः—शहाजीला जिजाबाईच्या पोटीं संभाजी व शिवाजी असे दोन पुत्र झाले. त्यांपैकीं थोरला संभाजी हा अल्पवयांतच निवर्तल्यानें इतिहासांत त्याचा फारसा संबंध येत नाहीं. पुण्याच्या अगदीं उत्तरेस जुन्नर येथें शिवनेरी किल्ल्यावर शिवाजीचा जन्म झाला. शिवा भवानी देवीच्या कृपाप्रसादानें हा पुत्र झाला असल्यानें याचें नांव शिवाजी असें ठेविण्यांत आलें. शिवजन्ममित्तीसंबंधानें विश्वसनीय असा समकालीन लेख उपलब्ध नाहीं. कृष्णाजी अनन्त सभासदानें आपली बखर सन १६९४ मध्यें लिहिली, तथापि तोहि जन्ममित्तीसंबंधानें मुग्धच आहे. हल्लीं दोन निरनिराळ्या शिवजन्ममित्ती भिन्न भिन्न लेखकसंघांनीं दिलेल्या प्रसिद्ध आहेत. त्यांतील शिवाजीच्या चिटणीसाच्या वंशजांनीं सांगितलेली मित्ति ग्राह्य समजावी असें मला वाटतें. ती म्हणजे तारीख १० एप्रिल सन १६२७ ही होय.

शिव—जन्म-मित्ति.

शिवजन्मानंतर शहाजी व जिजाबाई यांच्या संबंधीच्या कथा व शिवाजीचें वय वीस वर्षांचें होईपर्यंतच्या हकीकती, ज्या, नंतर लिहिल्या गेलेल्या बखरींतून वर्णन केलेल्या आहेत त्यांचा उपलब्ध असलेल्या विश्वसनीय इतिहासाशीं मेळ बसत नाहीं, किंबहुना कित्येक स्थळीं त्या विरुद्धच आहेत असें दिसतें. समकालीन मुसलमानी इतिहासावरून आपणांस अस दिसतें कीं, सन १६३० पासून सन १६३६ पर्यंत शहाजीचा काळ इकडून तिकडे व तिकडून इकडे निव्वळ भटकण्यांत गेला. या काळांत त्याच्या अनेकजणांशीं चकमकी झडल्या व वारंवार त्याला स्थलांतर करावें लागलें. अशा परिस्थितींत त्यानें जिजाबाईस चिमुकल्या शिवबासह शिवनेरी सारख्या मजबूत किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविणें अगदीं साहजिक आहे. आणि यामुळें वस्तुतः ह्या मायलेकांकडेस त्याचें दुर्लक्षच झालें होतें असें म्हणणें भाग पडतें. याच सुमारास शहाजीनें तुकाबाईशीं लग्न केलें. जिजाबाईच्या मानानें तुकाबाई फारच तरुण असल्यान शहाजीचा ओढा तुकाबाईकडेस अधिक असणें निसर्गसिद्धच होय. तुकाबाईच्या पोटीं शहाजीला व्यंकोजी हा पुत्र झाला. व शहाजीनें आपुलें पुढील सर्व आयुष्य तुकाबाई व व्यंकोजी यांच्याच सहवासांत घालविलें. किंबहुना शहाजीनें आपली सर्व संपत्तीहि व्यंकोजीसच देऊन टाकिली.

शहाजीचें दुर्लक्ष.

दादोजीस सोंपणूक.

इ. स. १६३६ च्या मार्च महिन्यांत जिजाबाई व शिवाजी शिवनेरीस राहत होते असें पादशहानामा या समकालीन इतिहासांत स्पष्टच लिहिलें आहे. सन १६३६ च्या ऑक्टोबरमध्यें झालेल्या तहांत शहाजीनें जे सात किल्ले मोंगलांस दिले त्यांत शिवनेरी हा एक असल्यानें सन १६३६ नंतर फार दिवस जिजाबाई त्या किल्ल्यांत राहणें शक्य दिसत नाहीं. या तहानंतर शहाजी लागलाच विजापुरच्या नोकरींत शिरला व त्या दरबारनें त्याला तत्काळ खालीं दक्षिणेंत मोहिमेवर पाठविलें. विजापुरच्या बादशहानें शहाजीराजास "कुल मुलूक प्रांत जुन्नर चाकण किल्ला व पुणें तहद वांई सिरवल सुपें इंदापूर हा प्रांत जहागीर दरोबस्त दिधली. ते समयीं शहाजी राजे याणीं दादाजी कोंडदेव कुलकर्णी मौजे मलठण (यांस) इमानी जाणून त्यांचे स्वाधीन मुलूक (करून) सांगितलें जे 'चिरंजीव (शिवबा) व स्त्री (जिजाबाई) जुन्नरीं आहेत. त्यांस आपल्यापाशीं आणून माहाल बांधून उभयतांस अन्नवस्त्रें देऊन चिरंजीवास शहाणें करणें*."

पुण्यास आगमन.

याप्रमाणें सन १६३७ च्या आरंभीं शिवाजी पुण्यास येऊन राहिला. वरील विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, शिवाजी शिवनेरीवर असतांना शहाजी हंमेश भटकतच राहिला. त्यामुळें कधींकाळीं क्वचित् प्रसंगीं तो शिवनेरीवर गेला असेल तेवढीच या पितापुत्रांची भेट. त्याशिवाय उभयतांचें एकमेकांस दर्शनसुद्धां नव्हतें. आणि शिवाजी पुण्यास आल्यावर तर या बापलेकांची भेट दुर्लभच झाली. 'तो (दादोजी कोंडदेव) वेंगरुळास महाराजांचे (शहाजीचे) भटीस गेला. त्याबरोबर राजेश्री शिवाजीराजे व जिजाबाई आऊ ऐशीं गेलीं. ते समयीं राजियांस (शिवबास) वर्षें बारा होतीं†. ' हा प्रसंग अर्थात्च सन १६३९ मधील होय.

याप्रमाणें नवऱ्यानें टाकिलेली जिजाबाई कथापुराणश्रवणांत आपला काळ घालवून मनाचें कसेंतरी सांत्वन करीत असे. तिची ही धार्मिक प्रवृत्ति लहानग्या शिवबांतहि तंतोतंत उतरली. शिवनेरीसारख्या एकांत स्थळीं ना भाऊ ना बंद अशा असहाय स्थितींत शिवबाचें बाळपण गेलें. मायलेकांचें प्रेम सर्वत्रच असतें, परंतु जिजाबाई व शिवबा यांना एकमेकांशिवाय जवळचा असा आप्त शिवनेरीवर व पुण्यासहि दीर्घकालपर्यंत एकहि नसल्यानें या मायलेकांचें प्रेम अनन्यसाधारण होतें. इतकें कीं, शिवबास जिजाबाई ही एक देवताच आहे असें होऊन गेलें.

---

* १.१ बखरी वगैरे. † शकावली.

शिवबाची ही मातृभक्ति शेवटपर्यंत तशीच कायम होती. लहानपणापासूनच शिवबाला अनायासेंच स्वावलंबनी असें रहावें लागलें. त्यामुळें कोणाच्याहि मदतीची अपेक्षा न करितां आपले हेतू एकाकी तडीस नेणें, स्वतःच कोणत्याहि नवीन कार्याचा उपक्रम करणें आणि स्वतंत्रतेची निरतिशय आवड असणें हे पुढील कर्तृत्वास पोषक असे सद्गुण शिवबानेंहि बाल्यावस्थेंतच प्राप्त करून घेतले.

पुण्याची स्थिति.

५ पुण्याची जहागीर, सन १६३७:—चाकणपासून इंदापुर, सुपें, शिरवळ व वांई येथपर्यंतचा पुणें परगण्यांतील मुलुख व पश्चिमेस घाट, उत्तरेस घोडनदी, पूर्वेस भीमा आणि दक्षिणेस नीरा-नदी अशा चतुःसीमेचा भूप्रांत शहाजीस अदिलशहापासून जहागीर म्हणून मिळाला होता. हा सगळा प्रदेश पूर्वी निजामशाही अमलाखालींच होता. परंतु नुकताच तो अदिलशहाकडेस गेला व त्यानें तो शहाजीस जहागिरींत दिला. या जहागिरीची व्यवस्था पहाण्यास जेव्हां दादोजी कोंडदेव आला तेव्हां हा सगळा प्रदेश अगदीं ओसाड पडलेला होता. सहा वर्षपर्यंत याच प्रांतांत युद्धाची धुमश्चक्री चालल्यानें याची ही अशी दशा झालेली होती. आणि युद्धें थांबल्यावर राहिल्यासाहिल्याची नासाडी लुटारूंच्या टोळ्यांनीं करून देश अगदीं उद्ध्वस्त करून टाकिला होता. निजामशाहीकडून अदिलशहाकडेस हा प्रांत जरी गेला होता तरी त्यावर प्रत्यक्ष अशी सत्ता कोणाचीच नव्हती, म्हणून एकाद्या फौजबंद व करड्या जहागीरदाराशिवाय इतर कोणासहि आपली सत्ता त्या प्रांतावर बसवून तेथें शांतता व सुबत्ता प्रस्थापित करणें अशक्यप्रायच होतें. आणि सन १६३० पासून १६३६ पर्यंतच्या काळांत संकटें व विग्रह यांनीं पूर्णपणें ग्रासल्यामुळें शहाजीच्या हालचाली फारच जलद होऊन त्याचे मुक्काम वारंवार बदलत असत. त्यामुळें त्याला या प्रांताकडेस लक्ष देण्यास फुरसतच सांपडली नाहीं. म्हणून विजापुरच्या राज्याचे वायव्येकडील पुणें व ठाणें हे परगणे प्रत्यक्ष कोणाच्याच अमलाखालीं नसल्यानें तेथें सगळी बेबंदशाही माजून राहिली होती.

प्रांताची नासाडी.

सासरा जाधवराव याचा खून निजामशहानें कपटानें केल्यामुळें शहाजीनें रागानें पुण्याच्या आसपासचा निजामशाही प्रांत सन १६३० मध्यें लुटला, हें मागें सांगितलेंच आहे. पुढें लवकरच विजापुरच्या सैन्यानें पुणें, इंदापुर वगैरे शहाजीचीं गांवें लुटून तो प्रांत अगदीं वैराण करून टाकिला. तथापि शहाजीनें बळजबरीनें तेथें आपला अंमल पुनः बसविला. परंतु लागलीच दुर्दैवानें सन १६३०–३१ मध्यें दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडला.

सन १६३४-१६३६ मध्यें मोगलांनीं पुण्याच्या उत्तरेकडेस जुन्नरावर वारंवार अनेक स्वाऱ्या केल्या. सन १६३६ च्या जुलई-ऑक्टोबरमध्यें खानेजमान यानें शहाजीवर स्वारी केली व तो थेट पुण्यापर्यंत चाल करून गेला. परंतु यावेळीं लुटण्याला किंवा जाळपोळ करण्याला तेथें कांहींच उरलें नव्हतें. याच सुमारास म्हणजे निजामशाहीच्या विनाशकालीं 'का॥ पुणें येथें मोरो तानदेव होनफ देशपांडे भुमेगिरी करीत होते. मवासगिरी करून होते.....त्याउपर रायेराऊ दिवाण नि॥ मुरार जगदेव यांणीं स्वारी करून पालत राखून रानांतून धरून आणिलें*.' याप्रमाणें पुण्याच्या बाजूस धामधूम चालू होती व या धामधुमीचा परिणाम म्हणजे वांई शिरवळपर्यंत सर्वत्र ओसाड मुलुख झाला होता.

दादोजी कोंडदेवाची कारकीर्द.

याप्रमाणें हा प्रांत माणसांनींच निर्मनुष्य केल्यामुळें श्वापदांच्या संचाराला अनायासेंच मोकळा झाला. पुण्याच्या पश्चिमेस सह्यपर्वताची रांग आहे, त्या बाजूस लांडग्यांचा उपद्रव फारच सुरू झाला. त्यायोगें तिकडेस धड वसतीहि होईना व शेतीचेंहि नुकसान होऊं लागलें. म्हणून ' दादोजीपंतीं...मुलखास कौल दिला. मावळे बारा उजाड पडलीं होतीं. तेथें लांडगे होते. अशी ताकीद केली कीं, जो लांडगे मारील त्यासि सिरपाव देऊं. त्याजवरून लोकांनीं कस्त करून लांडगे मारिले. मुलुख निरुपद्रव केला. मावळे लोकांस ताकीद केली जे, तुम्हांस वतनाची गरज असली तर वसती करणें...दादाजी पंतांनीं रयतेस कौल दिला त्याचा तपशीलः-पहिले सालीं दर बिघा× रुका १ एक, दुसरे सालीं रुके ३ तीन, तिसरे सालीं दर बिघा रुके ६ सहा, चवथे सालीं दर बिघा रुके ९ नऊ, पांचवे सालीं दर बिघा रुके १० दहा, सहावे सालीं दर बिघा रुके २० वीस, सातवे सालींहि रुके २० च त्याजवर आठवे सालीं मलिकंबरी जमाबंदी ठरली÷.' याप्रमाणें सगळ्या जमिनीची लागवड केली. जेव्हां दादोजी कोंडदेवास पुण्याच्या जहागिरीवर पाठविलें तेव्हां तेथील उत्पन्न चाळीस हजार होनांचें म्हणजे हल्लींच्या दरानें एक लक्ष साठ हजार रुपयांचें होतें. परंतु तें फक्त कागदींच होतें. प्रत्यक्ष वसूल असा फारच थोडा येई. दादोजी कोंडदेवाची कारकीर्द मोठी चिरस्मरणीय झाली. ' राजश्री दादाजीपंतीं...चोर नाहींसे केले, मवास मारिले, चोर, लांडगे, वाघर नाहींसे केले. अदल इनसाफ बहुत होता. क॥ खेडे बारे त्या स्थलीं सिवापूर पेठ वसविली. बागशाही आंबराई वगैरे झाडें इरसाल महाराज शाहाजीराजे त्यांचे नांवें केला.

* ९१ कलमी बखर. × बिघा कीं चाहूर ? ÷ म. सा. छो. ब.

अंबा (स्वतः) घेतला म्हणून आपला हस्त तोडीत होते. मग लोकांनीं अर्ज करून अस्तनी लांडी केली. दयानतदार सातसे होन मुशारा त्याखेरीज जें मिळालें तें पडलें पान दिवाणांत जमा यैसा बहुत दिवस कारभार केल*'.

६ शिक्षण:— " दादोजीपंतांनीं शिवनेरीहून जिजाबाई व शिवबास आणून पुणें वसवून लालमहाल बांधोन उभयतांस बरे इज्जतीनें ठेविलें. शिवबास पंतोजी ठेविले. तालिमखाना व घोडें फिरविणें यांत तयार केलें×." शिवाजीस लिहितां वाचतां येत होतें किंवा नव्हतें हा एक वादग्रस्त मुद्दा आहे. कारण शिवाजीचें हस्ताक्षर अद्यापि उपलब्ध झालें नाहीं व समकालीन युरोपियन व्यापाऱ्यांनीं शिवाजीस औरंगजेबाप्रमाणें लोकांचे अर्ज वाचतांना अगर त्यावर स्वतः हुकुम लिहितांना पाहिल्याचें नमूद करून ठेविलें नाहीं. उलट, रुजू झालेले अर्ज शिवाजी स्वतः न वाचतां आपल्या चिटणीसास वाचावयास सांगत असे असें लिहून ठेविलेलें आहे. यावरून शिवाजीस विशेष लिहितां वाचतां येत नसावें असें मानण्याकडेस प्रवृत्ति होते. मध्ययुगीन भारतांतील अकबर, हैदरअली, रणजीतसिंग हे जगत्प्रसिद्ध वीरहि शिवाजीपेक्षां अधिक लेखनपटु होते असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. रामदासीपत्रव्यवहारांतील एका पत्राच्या शेवटचें एकाद दुसरें अक्षर शिवबाचें असावें असा धुळ्यांच्या रा. देवांचा आग्रह आहे. परंतु शिवाजीच्या तीस चाळीस वर्षांच्या कारकीर्दीपैकीं त्याचा एकाद दुसराच लिखितशब्द उपलब्ध व्हावा व त्याचा शिवबाच्या साक्षरतेला पुरावा देणें संशोधकास भाग पडावें हें कांहीं मोठेंसें स्पृहणीय प्रमाण नव्हे.

साक्षरता.

प्रत्यक्ष लिहितां वाचतां येण्यासंबंधानें जरी याप्रमाणें अनिश्चित माहिती आहे तरी महाभारत व रामायण ह्या दोनहि राष्ट्रीय ग्रंथांची माहिती शिवबास लहानपणापासूनच देण्यांत आलेली होती च या दोनहि राष्ट्रीय ग्रंथांतील नीतितत्त्वें त्यास उत्तम प्रकारें अवगत होतीं याबद्दल मुळींच शंका नाहीं. श्रीरामचंद्र आणि पांडव यांनीं सोशिलेलीं दुःखें, केलेले कष्ट, दाखविलेला स्वार्थत्याग आणि गाजविलेला पराक्रम यांचा खोल ठसा शिवाजीच्या अंतःकरणावर स्पष्टपणें उमटलेला होता. शिवाजीला भजन, कीर्तन, पुराण मनापासून आवडत असे. आणि हिंदु अगर मुसलमान साधु संतांच्या सहवासासाठीं तो नेहमीं प्रयत्न करीत असे. सारांश शिवाजीच्या ठिकाणीं पुस्तकीविद्येचा

संस्कृति.

---

* ९१ कलमीं. × म. सा. छो. ब.

अभाव होता असें जरी गृहीत धरिलें तरी निरक्षर मनुष्याप्रमाणें त्याचें अंतःकरण असंस्कृत व भावनाशून्य न राहतां शिवाजी मोठा कार्यक्षम व कर्तृत्ववान् असा जगद्विख्यात पुरुष झाला.

७ बारा मावळें काबीजः—पुण्याच्या पश्चिमेकडेस ९० मैल लांब व १२ पासून चोवीस मैल रुंद असा जो एक पट्टा आहे त्याला मावळ हें अन्वर्थक नांव दिलेलें आहे. हा प्रदेश रूक्ष व डोंगराळ असून त्याच्या चोहोंबाजूंस दऱ्या आहेत. या दऱ्यांतून लहान मोठे व विविध आकाराच्या टेकड्यांचे सुळके वर गेले असून त्या सुळक्यांची दगडी सपाटी पाण्याच्या मारानें घांसून गुळगुळीत गच्चीवजा झालेली दृष्टीस पडते. तेथें झाडी इतकी दाट आहे कीं, ती तुडवून बाहेर पडणें शक्यच नाहीं. मावळच्या उत्तरेकडील खोऱ्यांत कोळी राहत असून दक्षिणेकडेस मराठ्यांची वसति आहे. येथील लोक रंगानें काळे परंतु हाडा पेरानें भक्कम असतात. येथील हवा कोरडी व निरोगी असून पश्चिम किंवा दक्षिण हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रदेशापेक्षां हा प्रदेश अधिक थंड आहे. याच प्रदेशाच्या बारा भागांना बारा मावळें अशी संज्ञा आहे. हा प्रांत शेतकीप्रधान आहे व येथें व्यापार मुळींच नाहीं हें पहिल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. मावळे लोक शरीरानें बळकट, स्वभावानें कांटक आणि राहणीनें साधे व निर्व्यसनी असे असतात. शिवकालीं इकडेस ग्रामपंचायतीची व्यवस्था असल्यानें प्रत्येक खेडें जवळ जवळ स्वतंत्रच असे. पाटील, देशपांडे हेच येथचे राजे. पाटलानें गांवचा वसूल जमवून देशमुखास द्यावा अशी येथील पद्धति. व या मेहेनतीबद्दल प्रत्येकास कांहीं पगार व शिवाय सरकारांतून जमीन देण्यांत आलेली असे.

मावळ.

गांवचे देशमुख बहुधा मराठे. त्यांचे कारभारी ब्राह्मण आणि चिटणीस व फडणिस प्रभु अशी व्यवस्था असे. आपल्या गांवचें रक्षण करण्यासाठीं प्रत्येक देशमुखाजवळ लहानशी फौज असे व या फौजेंत त्या गांवांतीलच शेतकऱ्यांच्या मुलांचा भरणा होई. क्वचित् प्रसंगीं हा देशमुख राजाच्या मदतीसाठीं निराळें पथकहि उभारी व त्याच्या खर्चाबद्दल त्याला निराळी जहागीर व नालबंदीहि मिळे.

देशमुख देशपांडे.

याप्रमाणें एकंदर व्यवस्था असल्यानें शिवाजीचा उदय मावळे लोकांना फारच फलप्रद झाला. नुसत्या शेतकीनें त्यांना फार तर संपत्तीच मिळे परंतु शिवाजीच्या सहवासानें त्यांना संपत्ति, सत्ता व मानमरातबहि प्राप्त होऊं लागला. त्यामुळें शिवाजीच्या संगतीची त्यांना

साथीदार.

अधिकाधिक गोडी वाटूं लागली. आणि मावळ्यांच्या संगतींत शिवाजी वारंवार सह्याद्रीच्या दऱ्यांतून भटकूं लागल्यानें ही मैत्री दिवसेंदिवस दृढ होत चालली. शिवाजीच्या शब्दासाठीं ते जीव देण्यासहि सिद्ध असत. सारांश, मावळप्रांत हा शिवाजीच्या विजयाचा पाळणा असून मावळे हेच त्याचे मुख्य साथीदार होते. दादोजी कोंडदेवानें या मावळ्यांना आपल्या ताब्यांत आणिलें होतें, देशपांड्यांना वेळोवेळीं बक्षिसें वगैरे देऊन आपल्या भजनीं लाविलें होतें, कृष्णाजी बांदला-सारख्या शिरजोर देशमुखासहि जेध्यासारख्यांच्या मध्यस्थीनें दादाजीनें आपणां-कडेस वळवून घेतलें होतें; आणि सामदामानें जे वळले नाहींत त्यांच्यावर दंडा-चाहि प्रयोग करण्यांत आला होता. याप्रमाणें दादोजी कोंडदेवानें शांतता व सुबत्ता प्रस्थापित केल्यानें पुण्याची जी जहागीर पूर्वी आंतबट्ट्याची व त्रासदायक वाटत होती तीच आतां कामधेनूप्रमाणें इष्ट मनोरथ पूर्ण करणारी अशी झाली. याच जहागिरींतून शिवाजीस रणगाजी शिपाई मिळाले व एकनिष्ठ सेवक प्राप्त झाले. एसाजी कंक, बाजी पासलकर, तान्हाजी व सूर्याजी मालुसरे हे शिवाजीचे आधार-स्तंभ होते आणि यांच्याच जोरावर त्यानें तीन बादशहांशीं आजन्म झगडा केला.

८ भावी जीवनाचा अरुणोदय:—मावळ्यांच्या संगतींत शिवाजीनें पौगंड-

बालकडु.

(= दहा पासून पंधरा वर्षांच्या) वयांत सह्यपर्वतराजी अनेक वेळां भटकून दऱ्या खोऱ्यांतील प्रदेश पायवाटांनीं अगदीं मळवून टाकिला. यामुळें त्यांतील अवघड वाटा व गुप्त दऱ्या यांची शिवाजीला चांगलीच माहिती झाली. शिवाजी स्वत:च याप्रमाणें भटकल्यानें त्याच्या अंगीं भरपूर कांटकपणाहि आला. भारतरामायणांतील नीतिबोधांचाहि ठसा मातुश्री जिजाबाईच्या चारित्र्यानें व सतत सहवासानें त्याच्या अंत:करणावर परिणामकारक असा वज्रलेपाप्रमाणें उमटला. पतीनें केलेल्या उपेक्षेनें परंतु पतीच्या विरहानें दु:खी जिजाबाई आपला सर्व काळ देवदेवतार्चनांतच घालवीत असल्यानें तिच्या उदास वृत्तीचा परिणाम बालशिवाजीच्या कोमल मनावर फारच विलक्षण रीतीनें होऊन म्लेंच्छसेवेचा त्याला तिटकारा आला व स्वातंत्र्याकडे साहजिकच त्याचें मन ओढ घेऊं लागलें. मुसलमानांच्या जुलुमामुळें हिंदूना त्यावेळीं फारच त्रास सोसावा लागत असे. परंतु त्या जुलुमांतून आपल्या हिंदुबांधवांना मुक्त कर-ण्याचीहि कल्पना याच वेळीं बालशिवाजीच्या मनांत उत्पन्न होऊन दृढमूल झाली होती कीं काय, हें खात्रीलायक सांगणें कठिण आहे. एक स्वतंत्र राज्य स्थापन करावें ही कल्पना मात्र शिवाजीच्या मनांत घोळत असावी असें दिसतें.

परस्परविरुद्ध राजकारणें, कुटिलकारस्थानें आणि रक्तपात या त्रिदोषानें निजा-

सुखस्वप्नें.

मशाही लयास गेली व अदिलशाहीसुद्धां त्याच पंथाला लागलेली होती. शिवाजीचा चुलत चुलाता खेलोजी याला औरंगजेबानें ठार मारविल्यापासून दक्षिणेंतील हिंदूंना अदिलशाहीपेक्षां दिल्लीच्या मोगलाईचा वचक अधिक वाटूं लागला होता. शिवाय मोगलांचें ऐश्वर्य व त्यांची नियंत्रणा यांनीं दक्षिणी लोकांचे डोळे दिपून गेले होते. कारण मोगलांच्या पुढें सर्वच बाबतींत विजापुरचे सुलतान फिके पडले होते. उलट, दक्षिणेला दिल्ली फार दूर पडत होती व त्यामुळें दक्षिणेकडील हिंदूंचा अगर मुसलमानांचा दिल्लीदर-बाराशीं जो व्यवहार व्हावयाचा तो दिल्लीच्या अंमलदारांच्या मार्फतीनेंच होत असे. आणि हे अंमलदार तर गरज सरो आणि वैद्य मरो या न्यायानें वागणारे असल्या-मुळें कामापुरतेच दक्षिणी लोकांना हाताशीं धरीत व काम संपतांच दूर लोटून देत. अशी एकंदर राज्यघटना व लोकस्थिति त्यावेळीं होती. अशा परिस्थितींत स्वातंत्र्य स्थापण्याचा उद्योग करणें फारच धोक्याचें होतें. परंतु हा उद्योग सिद्धीस गेला तर कल्पनातीत सुखालाहि तो कारणीभूत होणार होता, हें शिवाजीला स्पष्ट दिसत होतें.

शिवाजीच्या या स्वातंत्र्य संपादनाच्या विचारामुळें त्याचा व दादोजी कोंड-

दादोजीची शेवटची शिकवणूक.

देवाचा खटका उडाल्याची आख्यायिका प्रसिद्धच आहे. दादोजी मोठा इमानी नोकर असे, जमीन धाऱ्याच्या कामीं तो फार दक्ष असे, व्यवस्थित रीतीनें वागणारा असे, सदा-चरणी व पापभीरु असे; तथापि उच्च ध्येय, दूरदृष्टी आणि साहसी महत्त्वाकांक्षा हीं त्याच्यांत मुळींच नव्हतीं. शिवाजीची स्वातंत्र्यप्रीति व धाडसी स्वभाव दादोजीला मुळींच हितपरिणामी वाटले नाहींत. त्यानें शिवाजीची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. अदिलशाहीमध्यें आपल्या वापाप्रमाणेंच मानमरातबास चढून सरदारी करावी असा त्यानें कळकळीचा उपदेश केला, परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्यानें शहाजीकडेसहि कागाळी नेली. शेवटीं काळजीनें व वृद्धापकाळामुळें दादाजी आसन्नमरण झाला. तेव्हां शिवबास बोलावून त्यानें पुढील उपदेश केला. " आपण आक्रम घालणें (त्याचा) पाया घातला हें युक्त नव्हे. दैवावर भार ठेवून हें कर्म आरंभिलें परंतु आपलें स्वामित्व तें किती ? पादशहाती चार चहूंकडे. दिल्लीचा सुभा साहेबजादाच (औरंगजेब) येऊन औरं-गाबादेंत (राहिला) आहे. महाराज (शहाजी) वारंवार लिहितात. केलें कर्म

सिद्धीस न गेल्यास फार वांकडें पडेल...आम्हीं बहुतां दिवसांचे पदरचे सेवक, आमचा शेवट जालाच. परंतु वडिलीं वाढविलीं माणसें व मुलूख, द्रव्य (आम्हीं) जतन केलें. (पुढें) साहेब खावंद (आहेत) सर्व पाहून जतन करावें." या प्रमाणें निरवानिरव करून सन १६४७ मध्यें दादोजी कोंडदेव निवर्तला.

राज्यकारभाराचा ओनामा.

९ स्वराज्याची मुहूर्तमेढः—दादोजी कोंडदेवाच्या मृत्यूमुळें शिवाजी अगदींच स्वतंत्र झाला. मर्दानी खेळ व राज्यकारभार या दोहोंतहि तो तरबेज झाला होता. ज्या लोकांवर सत्ता चालवावयाची ते लोक आणि ज्यांच्या जोरावर लढाया मारावयाच्या त्या फौजा या दोघांशींहि शिवाजीचा परिचय त्याच्या वडिलांच्या जहागिरीमुळें चांगलाच झाला होता. स्वतंत्रपणें कोणत्याहि कार्याचा उपक्रम करणें आणि आपल्या इच्छेनुसार दुसऱ्यास वांकावयास लाविणें या दोनहि गुणांची वाढ शिवाजीमध्यें लहानपणापासूनच झालेली होती. बाराव्या वर्षीं शिवाजी पुण्यास आल्यावर त्याच्याच नांवानें सन १६३९ पासून सनदा दिल्याचें सिद्ध आहे. म्हणजे शिवाजीला बाराव्या वर्षापासूनच राज्यकारभाराचें बाळकडू दिलेलें होतें.

शहाजीची व्यवस्था.

सन १६३९ मध्यें शिवाजीस पुण्याच्या जहागिरीवर पाठविलें तेव्हां त्याच्याबरोबर शहाजीनें "शामराज नीळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत नारोपंत दीक्षिताचे चुलत भाऊ मजमुदार दिले व सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस ऐसे देऊन राजियांसीं पुण्यास रवाना केलें.* " शिवाजीनें या चौघांत आणखी दोघांची भर घातली. एक तुकोजी चोर यास सरनौबती दिली व नारोपंतास कारभारी केलें. याप्रमाणें 'बहुत सावधपणें चौकशीनें वर्तणूक करीत चाललेः.'

निर्माल्यवत् महमद अदिलशहा.

सन १६४६ हें वर्ष विजापूरच्या इतिहासांत मोठें क्रांतिकारक होय. या वर्षीं बादशहा अतिशय आजारी झाला व त्याची कोणालाहि कांहीं कालपयत मुळींच आशा वाटत तव्हती. या नंतर जरी तो दहा वर्षें जीवंत होता तरी तो असून नसून सारखाच होता. त्यावेळीं अशी समजूत प्रचलित होती कीं, बादशहाचें आयुष्य संपलें असून त्याचीं हीं दहा वर्षें शाह हाशिम उलुवी नांवाच्या एका फकीरानें आपल्या आयुष्यांतील बादशहास दिलेलीं आहेत. आणि या दहा वर्षांच्या दीर्घकालावधींत महंमद अदिलशहा बादशहानें एकहि महत्त्वाचें काम केलेलें नाहीं. कर्नाटकाच्या

* सभासद.

वाजूला राज्यविस्ताराचें काम वादशहाचे सरदार करीत होते व खुद्द विजापुरास सगळी राज्यव्यवस्था बेगम वडी साहेवा पाहत होती, एवढाच विजापूरचा या दहा वर्षांचा इतिहास आहे.

स्वराज्याचा उपक्रम.

शिवाजीला स्वातंत्र्य पुकारण्याला हा काल अत्यंत अनुकूल असाच होता. आणि म्हणून दादोजी कोंडदेवाच्या हयातींतच त्यानें मुलूख सर करण्याला प्रारंभ केला होता. कांहीं युक्तिप्रयुक्तीनें त्यानें सन १६४६ मध्यें अगदीं पहिल्या प्रथम तोरणा किल्ला हस्तगत केला. या ठिकाणीं त्याला दोन लक्ष होन सांपडले. तोरणा किल्ल्याचेंच नांव प्रचंडगड ठेविलें परंतु तें नांव पुढें फारसें प्रचारांत असलेलें दिसत नाहीं. तोरण्याच्या पूर्वेस पांच मैलांवर राजगड किल्ला वांधिला. 'त्या गडाच्या चार माच्या वसविल्या*.'

हेतु.

शिवाजीच्या या धामधुमीची वार्ता विजापुराला लागलीच कळली. परंतु दरवारांतील कांहीं मुत्सद्यांना शिवाजीनें यापूर्वीच आपणांकडेस वळवून घेतलें असल्यानें, त्यांनीं शिवाजीचीच तरफदारी केली; त्यामुळें विशेष असें कांहीं झालें नाहीं. आपल्या वडिलांची सगळी जहागीर आपल्या ताब्यांत घेऊन तिचें एक लहानसें संस्थानच बनवावें असा शिवाजीचा हेतु पहिल्यापासून होता. आणि दादोजी कोंडदेवाच्या मृत्यूनंतर या हेतूच्या सिद्धीसाठीं त्याचे प्रयत्न सुरू झाले. तथापि तो पूर्णपणें सिद्ध होण्याला पुष्कळ कालावधी लागणार होता. कारण एकाच वेळीं पुष्कळसें सैन्य ठेवून चोहोंकडे लढाया सुरू करणें शक्यहि नव्हतें व योग्यहि नव्हतें.

'चाकणचें ठाणें दादाजीपंतांचें होतें. तेथें फिरंगोजी नरसाळा हवालदार÷' होता.

चाकण सर.

त्यास वश करून घेऊन तें ठाणें त्याच्याकडेसच ठेविलें. वारामती, इंदापूर हीं ठाणींहि मुकाट्यानें हस्तगत झालीं. 'मग किल्ले कोंडाणा इदलशाही होता, तो भेद करून घेतला. ठाणें आपलें ठेविलें×.' हा सर्व प्रकार सन १६४७ च्या सुमारास झाला असावा असें वाटतें.

१० शहाजीचा बंदिवास:—याप्रमाणें पुण्याच्या जहागिरीची सुव्यवस्था

कारणें.

मोठ्या दूरदृष्टीनें ज्यावेळीं शिवाजी करीत होता त्याच वेळीं कर्नाटकांत अर्काटच्या दक्षिणेस असलेल्या जिंजी किल्ल्याला विजापुरी सैन्यानें वेढा घातला होता. मुस्तफाखान हा तेथें सेनापति होता व

---

* सभासद. ÷ म. सा. छो. ब. × सभासद.

शहाजी त्याचा मदतनीस होता. वेढ्याचें काम चालू असतांना शहाजी आपली अवज्ञा करितो असें मुस्तफाखानास वाटल्यावरून त्यानें तारीख १५ जुलई सन १६४८ रोजीं त्याला एकदम कद केलें. याप्रमाणें शहाजीला बंदिवास झाल्याची बातमी पुण्यास शिवाजीला कळतांच तो एकदम उद्विग्न झाला व त्यामुळें त्याच्या हालचाली कांहीं काळपर्यंत बंद पडल्या. शिवाजीच्या पुण्याकडील हालचाली व शहाजीची कद हे प्रकार लागोपाठ झाल्यामुळें मागाहूनच्या इतिहासलेखकांनीं या दोहोंचा कार्यकारणभाव जोडून दिलेला आहे. परंतु समकालीन महंमदनामा निराळींच कारणें सांगतो. विजापुरचा पादशहा महंमद अदिलशहा याच्या हुकुमावरून हा महंमदनामा जहूर या लेखकानें लिहिलेला आहे. त्यांतील महत्त्वाची हकीकत पुढीलप्रमाणें आहेः–"जिंजीच्या वेढ्याचें काम रेंगाळल्यामुळें लढण्याचें काम अंदाजापेक्षां वाढलें होतें. अशा परिस्थितींत शहाजीनें विश्रांतिसाठीं स्वदेशीं जाण्याची परवानगी मागितली. परंतु अशा ऐन प्रसंगीं शहाजीसारख्या फौजबंद सरदारानें वेढ्यांतून आपलें अंग काढून घेणें म्हणजे बाकीच्या सैन्याचे हातपाय मोडण्यासारखेंच असल्यानें मुस्तफाखानानें शहाजीला रजा देण्याचें नाकारिलें. त्यावरून 'धान्याच्या टंचाईमुळें यापुढें आपल्या सैन्याला येथें राहून श्रम करणें शक्य नाहीं म्हणून परवानगीची अपेक्षा न ठेवितांच आपण येथून निघून जाणार' असा निरोप शहाजीनें मुस्तफाखानाला कळविला. शहाजी बोलल्याप्रमाणें खरोखरीच करील व त्यामुळें आपल्या फौजेचा घात होईल हें जाणून मुस्तफाखानानें मोठ्या शिताफीनें अत्यंत गुप्त मसलत करून शहाजीस एकदम कैद केलें व शहाजीची सर्व संपत्ति जप्त केली. असें न करितां बळजबरीनें शहाजीस कैद करण्याचें मुस्तफाखानानें मनांत आणिलें असतें तर शहाजी स्वतः लढवय्या व फौजबंद सरदार असल्यानें मुस्तफाखानास फार जड गेलें असतें."

बुसातीने सलातीन.

बुसातीने सलातीन या नांवाच्या विजापुरच्या इतिहासांत शहाजीच्या गिरफदारीसंबंधानें पुढील अधिक तपशील मिळतोः–"शहाजी मुस्तफाखानाशीं बेपरवा वागूं लागला हें पाहून नबाब मुस्तफाखानानें बाजी घोरपडे आणि यशवंतराव आसदखानी या दोन सरदारांना फौजेसह एकेदिवशीं पहांटेस शहाजीच्या गोटावर पाठविलें. पूर्वरात्रीं नाच तमाशा असल्यानें शहाजीस जागरण झालें असून तो पहांटेस झोंपला होता. परंतु फौजेची गडबड ऐकून जागा झाला व आपणांस कैद करण्यास हे आले आहेत अस समजतांच एकटाच घोड्यावर बसून भरधांव निसटला. परंतु

वाजी घोरपड्यानें लागलीच पाठलाग करून त्यास पकडलें आणि मुस्तफाखानापुढें रुजू केलें. शहाजी याप्रमाणें कैद होतांच त्याच्या तीन हजार फौजेची पांगापांग झाली. शहाजीला पकडल्याची बातमी विजापुराला कळतांच दरबारांतून अफजलखानाला पाठविण्यांत आलें. त्यानें येऊन शहाजीला विड्या घालून विजापुरास नेलें. यावेळीं शहाजीचा मोठा मुलगा संभाजी हाहि शहाजीबरोबर होता. ''

सुटकेचा विचार.

शिवाजी यावेळीं जरी मोकळा होता तरी तो मोठ्या बुचकळ्यांत पडला. अदिलशाहीपेक्षां बलाढ्य सत्तेशीं संधान बांधिल्याखेरीज आपल्या बापाची सुटका होणें शक्य नाहीं, हें त्याला ठाऊक होतें व दिल्लीच्या मोगलांशिवाय दुसरी कोणतीहि सत्ता अदिलशाहीपेक्षां बलवत्तर नव्हती हेंहि त्याला दिसत होतें. मोंगलांच्या मनांतून अदिलशाहि चिरडून टाकण्याचें असल्यानें अदिलशाहीविरुद्ध कोणत्याहि बंडखोरास मोगली आश्रय मिळणें अत्यंत सुलभ होतें; मात्र त्या बंडखोरानें दक्षिणेंत मोगली सत्तेच्या उत्कर्षासाठीं झटण्याचें कबूल केलें पाहिजे. या सर्व गोष्टी शिवाजीला पूर्णपणें विदित असल्यामुळें त्या मार्गानें प्रयत्न करण्याचें त्यानें ठरविलें.

मुरादशीं पत्रव्यवहार.

त्यावेळीं शहाजादा मुरादबक्ष हा दक्षिणेंत मोगलांचा सुभेदार होता. त्याला शिवाजीनें पत्र लिहून कळविलें कीं, 'मोगल बादशहानीं शहाजीराजांस त्यांचे मागील अपराध क्षमा करून पुढें अभयवचन दिल्यास आपण मोगलांची चाकरी पत्करण्यास तयार आहोंत.' यावरून मुरादनें वकील पाठवून बोलणें करण्यास तारीख १४ मार्च १६४९ रोजीं शिवाजीस लिहिलें. शिवाजीनें तत्काळ हेजीब पाठविला. त्यावरून मुरादबक्षानें ही सर्व हकीकत दिल्लीस कळवून तिकडील संमतीनें तारीख १४ ऑगस्ट सन १६४९ रोजीं 'शहाजीसह शिवाजीनें मोगलांचे चाकरींत येऊन राहिल्यास शहाजीला पूर्वींची मनसब दिली जाईल व शिवाजीस पंचहजारी सरदार करण्यांत येईल ' असें कळविलें. पुढें तारीख ३१ ऑक्टोबर सन १६४९ रोजीं ही सगळी हकीकत मुरादनें शहाजीस कळवून ' आपण लवकरच दिल्लीस जाणार आहोंत तेव्हां यासंबंधानें बादशहाचें लेखी फर्मान घेऊं ' असेंहि अभिवचन दिलें. ' शहाजीनें हें फर्मान घेण्यासाठीं आपल्या (मुरादच्या) दरबारांत वकील पाठवावा ' असें मुरादनें शहाजीस कळवून बहुमानाचा पोषाखहि पाठविला. या पत्रांत शहाजीचा ' वडील मुलगा संभाजी बादशहाच्या कृपेस पात्र होऊन पेशजीप्रमाणें मनसबा व नूतन सरफराज्या पावतील ' असा उल्लेख आहे.

याप्रमाणें शिवाजीनें रघुनाथपंत कोर्डे यास मुरादवक्षाच्या दरबारीं पाठविलें व जुन्नर आणि अहमदनगर येथील देशमुखीची मागणी केली. मुरादनें तारीख ३० नोव्हेंबर १६४९ च्या पत्रानें उलट कळविलें कीं, "तुमचें पत्र राघोपंत याजबरोबर पावलें, आणि बादशाही कृपेस पात्र झालें. जुन्नर व आमदानगर येथील देशमुखीविषयीं लिहिलें, त्यास आम्ही हुजूर गेल्यानंतर हा मजकूर घडोन येईल." अदिलशाहाला धाकदपटशहा दाखवून शहाजहाननें शहाजीची मुक्तता करविली कीं काय हें संशयास्पद आहे. कारण एकहि इतिहासकार असा उल्लेख करीत नाहीं. आणि सन १६३३ पासून सन १६३६ पर्यंतच्या तीन चार वर्षांत शहाजीनें मोंगलांना जो कांहीं पराकाष्टेचा त्रास दिला होता त्यामुळें मोंगली दरबारांत शहाजीवद्दल मुळींच प्रेम राहिलें नव्हतें. उलट, खुद्द शहाजहान बादशहाच्या मनांत अदिलशहावद्दल थोडासा तरी आदर शिल्लक होता. अशा परिस्थितींत शहाजहान यानें शहाजीबद्दल अदिलशहाजवळ मध्यस्थी केली असेल असें मुळींच संभवत नाहीं. दुसरें, मोगल दरबार व विजापुर दरबार यांच्यांत जो तह झाला होता त्यांत 'अदिलशहाचा कोणीहि नोकर मोंगली दरबारांत घेतला जाणार नाहीं, किंवा त्याला अदिलशहाविरुद्ध संरक्षणहि दिलें जाणार नाहीं' असें स्पष्ट ठरलेलें होतें. या एकंदर कारणामुळें ऐतिहासिक दृष्टीनें असेंच निष्पन्न होतें कीं, सर्जाखानाच्या मध्यस्थीनें व रणदौलाखानाच्या जामीनगिरीमुळें सन १६४९ च्या अगदीं अखेरीस शहाजीची सुटका झाली असावी. शहाजी मुल्ला अहंमदच्या ताब्यांत कैदी म्हणून होता. व या मुल्लानेंच शहाजीचें मन वळवून सुलतानाच्या इच्छेप्रमाणें त्यास कोंडाणा, बंगलोर व कंडापीं हे किल्ले शहाजीकडून देवविल्यावर शहाजीची सुटका झाली असें महंमदनाम्यावरून दिसतें. सुटकेनंतर शहाजी म्हैसूरच्या उत्तरेकडेस असलेल्या आपल्या जहागिरींत कांहीं दिवस राहून तेथील बंडखोरांचें त्यानें पारिपत्य केलें. येथेंच असतांना कनकगिरीच्या वेढयांत शहाजीचा वडील पुत्र संभाजी कामास आला, तथापि शहाजीनें किल्ला सर केलाच. संभाजीच्या मृत्यूशीं अफजलखानाचा संबंध कित्येकांनीं जुळवून दिला आहे तो काल्पनिक होय.

वकील पाठविला.

११ इ. स. १६५० ते १६५५ तील चळवळी:—शहाजीच्या सुटकेनंतर सहा वर्षांच्या कालावधींत शिवाजीच्या चळवळी विशेष जोराच्या अशा दिसत नाहींत. साधारणतः जावळी सर करीपर्यंत शिवाजी दमादमानेंच कार्यभाग उरकीत होता असें दिसतें. आणि याच

पुरंदर काबीज.

काळांत पुरंदर घेतला असावा असें वाटतें. पुरंदरचा मजबूत किल्ला पुण्यापासून १८ मैलांवर आहे. 'निलोजी नीळकंठराऊ निजामशाही (अदिलशाही ?) चाकर वतनीं नाईकवाडी किले पुरंदर तेथें होते. गड हाकुन भोंवताला मुलूख तेथील खंडणी घेत होते....शहाजीराजे यांचा भाऊपणा होता....त्यास भाऊ धाकटेदेखील तिघेजण. पिलाजी नीळकंठराऊ व शंकराजी नीळकंठराऊ...वडील निळोजी कुल किल्लयांचा व गावगन्ना कारभार करीत होते. धाकट्याभावास वांटा देत नव्हते....धाकट्या भावाचें मनोगत येकांतीं भेद शिवाजीराजे त्यांकडे अनुसंधान लागलें होतें. त्यांस दिपवाळी सणाबद्दल मातुश्री जिजाबाई व सिऊबा समेत कुल लोकांस गडावर घेऊन गेले. तीन दिवस न्हाणें व भोजनें दिलीं. प्रतिपदेस रात्रीं जागरण झालें. नीळकंठराऊ स्त्रीसह वर्तमान निद्रा केली. त्यांस पायीं बिडी घातली तेच समयीं त्यांचे दोघे भाऊ तेहि पाईं शृंखला घालून खोलीमध्यें ठेवून गडाचे दर्वाजे बंद केले. लोक मावले पाठवून गडावर जागां जागां चौकी पाठविली. तीन रोज कैद करून ठेवून... त्रिवर्गास इनाम देऊन मौजे चामळीस ठेविलें. अद्यापि त्यांचें वतन सरनायकीचें त्यांच्या वंशांत चालत आहे*.' 'महादाजीपंताचे वडील पुत्र...सांगितल्या बुद्धीचे होते. पण त्यांची वायको मोठी धूर्त जहांबाज होती. शंकराजीपंत हे अक्कलवंत व कामसू होते. पण भावजयीपुढें त्यांचें चालत नसे...उभयतां बंधु एकत्र होते. तेव्हां शंकराजीपंत हे धाकटे बंधु असतां सर्व कारभार तेच करितात हें उत्तम नाहीं असें समजून निळोपंताचे स्त्रीनें घरचे लोक व गडकरी वगैरे यांस फितवून...शंकराजीपंतास धरावें अथवा मारावें असें ठरविलें...परंतु ते हस्तगत होईनात...एके प्रातःकाळीं शंकराजीपंत सदरेस तोंड धूत बसले तों निळोपंतांनीं चाळीस पन्नास माणसांनिशीं त्यांचेवर चाल करून त्यांस जखमी केलें×' व किल्ला आपले ताब्यांत घेतला. तेच समयीं शिवाजीस दिवाळीच्या निमित्तानें किल्लयावर बोलाविलें होतें. त्यानें तेथें येऊन एके रात्रीं सर्व बंधूस कैद केलें. परंतु चिंचवडच्या मोरया गोसाव्यांच्या मध्यस्थीनें त्यांची सुटका करून वर चांबळीगांव इनाम दिलें व त्यांच्यापैकीं एक पिलाजी यास आपले पदरीं ठेविलें.

१२. जावळी हस्तगत, सन १६५६:—सातारच्या अगदीं वायव्य टोंकाला जावळी हें खेडें आहे. शिवकालीं हेंच खेडें सभोवतालच्या प्रांतांत मुख्य असें गणलें जात होतें. जावळी हा प्रांत डोंगराळ असून तेथें झाडीहि दाट आहे. सह्याद्रीचा अरुंद सुळका समुद्र-

वर्णन.

* म. सा. छो. व. × भावे, सहविचार ऑगस्ट १९२३, पृ. ३६.

सपाटीपासून चार हजार फूट उंच गेलेला असल्यानें जावळीच्या पश्चिमेकडेस त्याची एक नैसर्गिक भिंतच बनलेली आहे. दऱ्यांमध्येंहि दाट जंगल उगवलेलें असतें. येथें साठ मैलांच्या टापूमध्यें आठ निरनिराळ्या वाटा आहेत. त्यांपैकीं दोन रस्ते भारदारी गाडे जाण्यायेण्यासारखे असून हल्लीं महाड चिपळूणकडे याच रस्त्यांनीं मोठा व्यापार चालू आहे. त्याशिवाय कोंकणांत जाणाऱ्या पायवाटा तर शेंकडों आहेत.

मोरे.

इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या आरंभीं विजापुरच्या सुलतानानें या प्रांतांत मोऱ्यांची स्थापना केली. आपल्या तरवारीच्या जोरावर या क्षत्रिय घराण्यानें आसपासच्या मुलुखावर सतत आठ पिढ्यांपर्यंत चांगलाच दरारा बसविलेला होता. एवढ्या दीर्घकालामध्यें मोऱ्यांनीं संपत्तीहि पुष्कळच जमविली होती. मोऱ्यांच्या तैनातींत बारा हजार शूर मावळ्यांचें पायदळ जय्यत असे. मूळ पुरुषाच्या असाधारण शौर्यामुळें या घराण्याला चंद्रराव ही पदवी मिळाली होती.

कट्यारीचे वार.

स्वराज्य स्थापनेच्या कामीं चंद्रराव शिवाजीस अनुकूल होईना. त्यामुळें शिवाजीच्या महत्त्वाकांक्षेला जावळीचा मोठाच अडथळा आला. "कोंकणांत चंद्रराव मोरे म्हणून राज्य करीत होते. व शृंगारपुरीं सुर्वे राज्य करीत होते. त्यांचे प्रधान शिर्के होते. असे जबरदस्त गड, कोट, दहा-बारा हजार लष्कर, हाशम समेत राज्य करीत असत. त्यांजकडे रघुनाथ बल्लाळ सबनीस बोलावून पाठविले. विचार करितां 'चंद्रराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हांवांचून हें कर्म कोणास न होय. तुम्हीं त्याजकडेस हेजिबीस जाणें.' ऐसें सांगितलें. बराबर निवडक शें सवाशें माणूस निवडून दिलें. ते स्वार होऊन जावळी नजीक जाऊन पुढें चंद्ररायास सांगून पाठविलें कीं, 'आपण राजियाकडून आलों आहों. कित्येक बोलणें चालणें तहरह कर्तव्य आहे.' असें सांगून पाठविलें. उपरि त्यांनीं त्यांस आपणांजवळ बोलावून भेट घेतली. कित्येक बाह्यात्कारी बोलणें जालें. प्रसंग पाहून चंद्रराव व सूर्याजीराव दोघां भावांस कटारीचे वार चालविले. जमातीनिशी निघोन चालिले. पाठीवर लाग जाहला. त्यास मारोन निघोन चालिले. खासाच पडलियावरि लोक काय चालून येतात ? असें कर्म करून परतोन राजियाकडे भेटीस आले. तोंच खासा राजा चालोन जाऊन जावळी सर केली*." (तारीख १५ जानेवारी १६५६)

* सभासद.

चंद्ररावाचे दोन मुलगे कद केले. परंतु 'हणमंतराव म्हणून चंदररायाचा भाऊ चतुर्बेट म्हणून जागा जावळीचा होता, तेथें बळ धरून राहिला. त्यास मारल्याविना जावळीचें शैल्य तुटत नाहीं, असें जाणून संभाजी कावजी म्हणून महालदार राजियाचा होता त्यास हणमंतराव याजकडे राज्यकारणास पाठवून, सोइरिकीचें नातें लावून, एकांतीं बोलीचालीस जाऊन संभाजी कावजी यानें हणमंतरायासि कटारीचे वार चालवून जिवें मारिलें. जावळी काबीज केली*." जावळी सर झाल्यानें सगळी दक्षिण आतां मोकळी झाली.

१३ मोऱ्यांची भवितव्यता—सभासदानें आपली बखर शिवनिधनानंतर चौदा वर्षांनींच लिहिली असून तिच्यांतून जावळी सर केल्याचा उतारा वर घेतला आहे. व तोच सर्वांत अधिक विश्वसनीय आहे. जावळी सर केल्यावर चंद्रराव रायगडावर पळून गेला. परंतु शिवाजीनें त्याशीं सामोपचाराचें बोलणें लावून रायगडहि आपल्या स्वाधीन करून घेतला. त्याचे दोन मुलगे कृष्णाजी आणि चंद्रराव व भाऊ बाजीराव मोरे या तिघांना कैद करून पुण्यास पाठविलें. तेथें कदेंत असतांना कृष्णाजीनें अदिलशाहाशीं कांहीं पत्रव्यवहार केल्याचें उघडकीस आल्यावरून त्याचा शिरःच्छेद करण्यांत आला. धाकटा बंधु चंद्रराव व बाजी मोरे हे शिवाजीच्या कैदेंतून तारीख २८ ऑगस्ट सन १६५६ रोजीं निसटले. पुढें सन १६६५ मध्यें मिर्झा राजा जयसिंगानें शिवाजीवर स्वारी केली तेव्हां हे उभयतां मोरे त्यास सामील झाले होते. अंबाजी गोविंदराव मोरे नांवाचा तिसरा एक मोरेहि जयसिंगास मिळाला होता. हा वृत्तांत पुढें ओघानें येईलच. स्वराज्य आणि स्वधर्म यांच्या संस्थापनेच्या बाल्यावस्थेंत जीं जीं विघ्नें आड येतील तीं तीं हर प्रयत्नानें नष्ट करणें हेंच संस्थापकाचें मुख्य कार्य असल्यानें व जगाच्या इतिहासांत हेच प्रकार आढळत असल्यानें प्रस्तुत प्रकरणीं शिवाजीला दोष देतां येणार नाहीं.

शिरःच्छेद.

१४ अधिक लाभ—जावळी सर झाल्यानें शिवाजीला सगळी दक्षिण मोकळी झाली. चंद्ररावाची फौज त्यानें आपल्याच तैनातींत ठेवून घेतली. आणि आपल्या फौजेंत चंद्ररावाच्या प्रजेंतील उत्तम व लढाऊ लोकांची भरती केली. चंद्ररावाचा अफाट खजिनाहि शिवाजीस मिळाला. याप्रमाणें अनेक लाभ आपोआप झाले.

फायदे.

---

* सभासद.

जावळीच्या पश्चिमेस दोन मैलांवर प्रतापगड नांवाचा किल्ला शिवाजीनें बांधिला.

प्रतापगडावर देवीची स्थापना.

तेथें, "राजियानें गंडकी नदीस द्रव्य गाडियावरी घालून, गंडकी पाषाण आणून श्रीभवानी सिद्ध करून, प्रतापगडावर देवीची स्थापना केली. धर्मदान उदंड केला. देवीस रत्न-खचित अलंकार भूषणें नानाप्रकारें करून दिलीं. महालमोकाशे देऊन सचंतर हवालदार व मुजुमदार व पेशवे देवीचे करून महोत्सव चालविला. नवस यात्रा सर्वदा तुळजापुरच्या प्रमाणें तेथें चालती झाली*."

जावळीनंतर लागलीच एप्रिल १६५६ मध्यें शिवाजीनें रायगड हा प्रचंड

रायगड, सुपें वगैरे हस्तगत.

डोंगरी किल्ला हस्तगत केला. आणि मराठी साम्राज्याची राजधानी म्हणून हाच किल्ला पुढें प्रसिद्धीस आला. तारीख २४ सपटेंबर १६५६ रोजीं शिवाजीनें पुण्याच्या ईशान्ये-कडेस ३५ मैलांवर असलेलें सुपें नेहमींच्याच युक्तीनें कबजांत घेतलें. 'मग सुपें महाल येथें कोणे येके जागां संभाजी मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ मामा होता. तो महाराजांनीं महालावरी ठेविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त मागावयास म्हणोन गेले. मामास कैद करून ठेविलें. त्याचे तीनशें घोडे पागेचे होते व द्रव्यहि बहुत होतें. वस्तभाव कापड हस्तगत करून सुपें देश साधिला*." संभाजी मोहित्यानें शिवाजीची चाकरी करण्याचें नाकारिल्यामुळें त्याला कुटुंबासुद्धां शहाजीकडेस पाठवून देण्यांत आलें.

सुपें, बारामती, इंदापूर हे महाल हस्तगत झाल्यानें पुणें परगण्याच्या आग्नेयी

रोहिडा.

दिशेकडील बाजू मजबूत झाली आणि पुरंदर, राजगड, कोंडाणा व तोरणा या डोंगरी किल्ल्यांच्या योगानें स्वराज्याच्या दक्षिणेकडील प्रदेश निर्भय झाला. त्या बाजूचाच रोहिडा किल्लाहि पुढें लवकरच शिवाजीनें जिंकून घेतला. वायव्येकडील तिकोना, लोहगड आणि राजमाची हेहि किल्ले शिवाजीनें हस्तगत केले.

तारीख ४ नोव्हेंबर सन १६५६ रोजीं विजापुरचा बादशहा महंमद आदिल-

योग्य संधि.

शहा मरण पावला, त्यायोगें एकंदर अदिलशाहीमध्यें फारच मोठी क्रांति घडून आली. शिवाजीनें या संधीचा कसा उप-योग करून घेतला हें आतां क्रमशः सांगावयाचें आहे.

---

१ सभासद.

प्रकरण ३ रें

मोगल-विजापुरकर यांना पहिली सलामी

[१ सन १६५७ पर्यंत शिवाजी व मोगल यांचा संबंध. २ मोगली मुलुखावर पहिली स्वारी. ३ मोंगलांशीं तह. ४ कोंकणावर स्वारी. ५ विजापुरकरांच्या मसलती. ६ अफजलखानाची स्वारी. ७ भयंकर संकट. ८ कारस्थानें. ९ काळभेट. १० खानाच्या सैन्याची दाणादाण. ११ खानाविषयीं दंतकथा. १२ पोवाडा. १३ वध कीं खून.]

सन १६५७ पर्यंत शिवाजी व मोंगल यांचा संबंधः—शिवाजीनें स्वातंत्र्याचा झेंडा उभारला तेव्हां शहाजादा औरंगजेब हा दक्षिणेचा सुभा असून त्याचा दरारादेखील मोठाच होता. शिवाय भावी काळांत आपणांस स्वराज्य स्थापन करावयाचें असल्यानें आरंभींच मोंगल बादशहा आणि अदिलशहा या दोघांनाहि दुखवून त्यांचें वैर संपादन करणें मुळींच शहाणपणाचें नाहीं हेंहि शिवाजी पूर्णपणें जाणून होता; म्हणून पहिलीं दहा वर्षें म्हणजे सरासरी सन १६५७ पर्यंत मोगलांशीं शिवाजीचें सख्यच असे. सन १६५६ च्या पहिल्या तीन महिन्यांत औरंगजेब गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशीं लढण्यांत गुंतला आहे असें पाहून शिवाजीनें जावळीचे मोऱ्यांचा पाडाव करून रत्नागिरीच्या उत्तरेकडील कोंकणप्रांत हस्तगत केला. येथूनच पुढें मोंगलांशीं झगडा चालविणें सोईस्कर आहे असें त्यानें ठरविलें.

दशवार्षिक सख्य.

तारीख ४ नोव्हेंबर सन १६५६ रोजीं विजापूरचा पादशहा महमद अदिलशहा मृत्यु पावतांच विजापुर जिंकण्यास ही संधि योग्य आहे असें औरंगजेबास वाटलें व त्यानें विजापुरी सरदार वश करून घेण्याचा उद्योग आरंभिला. यावेळीं मोंगलांच्या तर्फेनें अहमदनगरास मुलतफतखान हा सुभेदार होता. त्यास पत्र पाठवून शिवाजीनें कळविलें कीं, 'आपणांस कांहीं सवलती द्याल तर आपणहि मोगलांस सहाय्य करण्यास सिद्ध आहों.' शिवाजीचें हें म्हणणें खानानें औरंगजेबास कळविलें. परंतु त्यानें निश्चित असा कांहीं जबाब न देतां गुळमुळीत उत्तर पाठविलें.

साम.

२. मोंगली मुलुखावर पहिली स्वारीः—इकडे शिवाजीनें प्रत्यक्ष औरंगजेबालाहि पत्र लिहून सन १६५७ च्या मार्च महिन्यांत आपला वकील सोनाजीपंत यास त्याच्याकडेस पाठविलें. या वेळीं औरंगजेब बेदरला वेढा घालून बसला होता. त्यानें वेळ मारून नेण्यासाठीं सोनाजीपंतास उत्तर दिलें कीं, (१) शिवाजीच्या ताब्यांत असलेले विजापुरकरांचे किल्ले व (२) शिवाजीनें हस्तगत केलेलें दाभोळ बंदर व सभोंवारचा प्रांत हें सर्व शिवाजीकडेसच राहूं देणें या दोनहि मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्यांत येईल. आणि अशाच अर्थाचें निराळें पत्रहि औरंगजेबाकडून शिवाजीकडेस पाठविण्यांत आलें. औरंगजेब कल्याणीच्या वेढ्यासाठीं निघण्याच्या तयारींत असतां तारीख २३ एप्रिल सन १६५७ रोजीं त्यानें वरील अर्थाचें पत्र शिवाजीस लिहून आणखी असेंहि कळविलें कीं, 'तुम्हीं इकडे निघून यावें व मोंगल बादशाहीशीं तुमची निष्ठा आहे म्हणतां ती व्यक्त करून दाखवावी.'

पत्रव्यवहार.

परंतु अशा संदिग्ध किंवा अनिश्चित वचनांनीं शिवाजी भुलून जाईल हा औरंगजेबाचा तर्कच अगदीं चुकीचा होता. विशेषतः 'गरज सरो आणि वैद्य मरो' ही मोंगलांची राजनीति आतां सर्वत्र मशहूर झाली होती. त्यामुळें सर्वांचाच त्यांच्यावरील विश्वास उडालेला होता. शिवाजीनें यावेळीं मोंगलांशीं युद्ध करण्याचें योजिलें होतें. औरंगजेबाची फौज कल्याणीच्या वेढ्यांत गुंतली आहे तोंपर्यंतच दक्षिणेकडील मोंगलांच्या मुलुखांवर स्वारी करण्याचें, व त्यायोगें विजापुर दरबारालाहि अप्रत्यक्षपणें मदत करण्याचें शिवाजीनें निश्चित केलें. कांहीं खलबताचें निमित्त करून प्रथम त्यानें मोंगली दरबारांतला आपला वकील सोनोपंत यास सन १६५७ च्या एप्रिलमध्यें परत बोलाविलें, आणि लागलीच मोंगलांशीं युद्ध पुकारिलें.

युद्धाची सिद्धता.

मीनाजी भोंसले व काशी या दोन सरदारांनीं तीन हजार घोडेस्वारांसह एकदम भीमा उतरून चांभारगोंदें व राशीन हे मोंगली प्रांत लुटले व ते अहमदनगरापर्यंतचा मुलूख बेचिराग करीत गेले. नगरची पेठ लुटावी असा त्यांचा हेतु होता. परंतु नगरच्या किल्ल्यांत पुष्कळ शिबंदी असल्यानें मराठ्यांना तेथून परत फिरावें लागलें. मराठ्यांच्या या अचानक धाडीमुळें मोंगल किल्लेदार मुलतफतखान हा इतका गर्भगळित झाला कीं, त्यानें शहरांतील संपत्ति व वसति एकदम किल्ल्यावर सुरक्षित स्थळीं आणून ठेविली. याप्रमाणें अहमदनगरचा पूर्वेकडील प्रांत मीनाजी लुटीत असतां स्वतः शिवाजी

हल्ले.

जुन्नरच्या उत्तरेकडेस लुटालूट करीत होता. तारीख ३० एप्रिल सन १६५७ रोजीं अंधाऱ्या रात्रीं शिवाजीनें जुन्नरच्या तटाला माळा लावून शहरांत प्रवेश केला व 'जुन्नर शहर मारिलें. घोडे दोनशें पाडाव केले. तीन लक्ष होनांची मत्ता, खेरीज कापड जिन्नस, जडजवाहीर हस्तगत करून पुण्यास आले.'* आपल्या मुलखाची याप्रमाणें नासाडी होत असलेली ऐकतांच औरंगजेब पुष्कळ संतापला. त्यानें तेथील ठाणेदारांना सपाटून दोष दिला आणि तिकडील प्रांताच्या संरक्षणासाठीं अधिक फौजेची रवानगी केली.

मोंगली व्यवस्था.

नासिरीखान, इरजखान व इतर कांहीं सरदार तीन हजार स्वारांनिशीं औरंगजेबानें एकदम नगरकडेस रवाना करून दिले. औरंगजेबाच्या मदतीसाठीं रावकर्ण हा नगरहून बेदरकडेस येत होता त्यास परत नगरासच जाण्याचा हुकूम केला. आपल्या फौजेपैकीं एकहजार लोक शाइस्ताखानानें नगराकडेस पाठवावेत असें फर्माविण्यांत आलें. या प्रमाणें तिकडील बंदोबस्तासाठीं औरंगजेबानें अनेक तजविजी केल्या. परंतु नासिरीखानाची फाजील ढिलाई अगदीं संतापजनक होती. तो तारीख ३० एप्रिल रोजीं बीड येथें गेला व तेथें चार दिवस रेंगाळून मग अष्टीकडे रवाना झाला. यामुळें अहमदनगर-जुन्नरकडे जाऊन मराठ्यांना तेथून घालवून देण्यास फारच दिरंगाई झाली.

मीनाजीचा पराजय.

इकडे, तारीख २८ एप्रिल १६५७ रोजीं मुलतफतखान हा नगरच्या किल्ल्यांतून एकदम निघून चांभारगोंद्याजवळ मीनाजी भोंसल्याचा त्यानें पराभव केला व तेथें मराठ्यांच्या तावडींत सांपडलेल्या मोंगली फौजेची सुटका केली. तथापि मराठे तेथेंच आसपास कांहीं दिवस घिरट्या घालीत राहिले. परंतु लवकरच मुलतफतखान व मिर्झाखान यांच्या सैन्यानें त्यांना तेथून हांकलून दिलें.

मराठे सटकले.

शिवाजीला जुन्नरच्या बाजूलाहि असेंच कित्येक दिवसपर्यंत लुटालूट करण्याला अगदीं मोकळें रान सांपडलें. रावकर्ण आणि शाइस्ताखान हे तेथें जाऊन पोंहोंचल्यावर त्यांनीं शिवाजीला पकडून चिरडून टाकण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु शिवाजी त्यांच्या हातून निसटला व अहमदनगर प्रांतांत जाऊन लुटालूट करूं लागला. मे १६५७ च्या अखेरीस नासिरीखान मराठ्यांच्या पाठीवर अचानक चालून गेला. त्याची व शिवाजीची

* सभासद.

तारीख ४ जून रोजीं चांगलीच चकमक उडून तींत पुष्कळ मावळे कामास आले. हें पाहून शिवाजी तेथून सटकला. यावेळीं नासिरीखानानें त्याचा पाठलाग करणें अवश्य होतें. परंतु मोगलांची फौज लांब लांब मजलींनीं व नुकत्याच झालेल्या चकमकीनें अगदीं थकून गेल्यामुळें पाठलाग होऊं शकला नाहीं. लांब लांब मजली मारून निकराचा सामना देऊन निसटून जाणें हें मराठ्यांनाच उत्तम साधत असे.

पादशहाचा क्रोध.

औरंगजेबाचीं या वेळचीं पत्रें मात्र अगदीं रागानें जळफळून लिहिलेलीं दिसतात. 'कसेंहि करून शिवाजीचा सूड उगवावा, त्याचा मुलूख जाळून पोळून लुटून टाकावा, त्याच्या प्रजेची सरसहा कांहींएक दयामाया न दाखवितां कत्तल करावी, पुणें व चाकण हे शिवाजीचे प्रांत मारून जमीनदोस्त करावेत, त्याच्या प्रजेपैकीं जे जिवंत हातीं सांपडतील त्यांस गुलाम करावेत आणि मोंगलांकडील ज्या गांवचे पाटील अथवा कुळंवी शिवाजीस अनुकूल झाले असतील त्यांचीं डोचकीं उडवावींत' असे कडक हुकूम औरंगजेबानें नासिरीखान वगैरे सरदारांना त्यावेळीं लिहिलेले आढळतात.

निष्फळ प्रयत्न.

औरंगजेबानें आपल्या पश्चिम-सरहद्दीचा मात्र मोठ्या चातुर्यानें बंदोवस्त केलेला दिसतो. जुन्नरजवळ कार तलबखानास ठेविलें, अबदुल मुनीम याची स्थापना गड नमुना येथें केली, आणि नासिरीखान व रावकर्ण यांना चांभारगोंदें, कारा व अष्टी यांच्या संरक्षणासाठीं परिंड्याच्या समोर पोंडा येथें ठाणें देऊन बसण्यास सांगितलें. हे सगळे सरदार मोंगलांचा मुलुख पाठीशीं घालून शिवाजीच्या फौजेशीं लढण्यासाठीं सिद्ध होऊन बसले. संधि पाहून शिवाजीचा मुलुख बेधडक लुटावा असेंहि यांना हुकुम देण्यांत आलेले होते. परंतु लागलीच जोराचा पावसाळा सुरू झाल्यानें औरंगजेबाचे सगळे बेत जागच्या जागींच गारठून गेले. त्याला इतरहि जीं काय कारणें झालीं तीं आपण थोडक्यांत पाहूं. १६५७ चे जून जुलई व ऑगस्ट या तीन महिन्यांत पावसाळ्यामुळें मोंगलांस कांहींच हालचाल करितां आली नाहीं. पुढें सप्टेंबर महिन्यांत दिल्लीस शहाजहान बादशहा आजारी पडल्याची बातमी दक्षिणेंत येऊन पोंहोंचल्यानें सवत्र गडबड उडून गेली. शिवाजीला जिंकून त्याचा प्रांत हस्तगत करण्यापेक्षां खुद्द बापालाच ताब्यांत घेऊन दिल्लीचें तख्त सर करण्याकडेस औरंगजेबानें आपली दृष्टी वळविली. विजापुरकरांनीं याच वेळीं मोंगलांशीं तह करून टाकिला. तथापि आपल्या सरदारांनीं शिवाजीचे बाबतींत यत्किंचित्हि गाफील राहूं नये अशा

ताकिदी औरंगजेब सप्टेंबर महिन्यांत वारंवार देत होता. कारण औरंगजेबाला असें वाटत होतें कीं, आपले सरदार थोडेसे जरी गाफिल राहिले तरी तेवढ्यांत शिवाजी आपला मुलूख लुटून निघून जाईल. ऑक्टोबरच्या मध्याचे सुमारास त्यानें अहमदनगरच्या सुभेदारास स्पष्ट लिहून कळविलें कीं, ' नासिरीखान परत जातांच तूं युद्धाचे तयारीनें जय्यत असावें. नाहींतर शिवाजी पुनः तुझ्या प्रांतांत शिरून धुमाकूळ उडवून देईल !'

तहाची वाटाघाट.

३ मोंगलांशीं तहः—सप्टेंबर महिन्यांत विजापुरच्या बादशहानें मोंगलांशीं तह केला हें पाहिल्यावर आपण एकट्यानेंच आतां दिल्लीपतीशीं झुंजत राहणें उलट आपणांसच अनिष्ट आहे हें शिवाजीच्या तेव्हांच लक्षांत आलें, आणि त्यानें लागलीच नासिरीखानाशीं तहाचें बोलणें लाविलें. खानालासुद्धां हेंच हवें होतें. त्यानें तत्काळ शिवाजीचें म्हणणें मान्य केलें. व वकील पाठवून देण्याबद्दल त्यास लिहून औरंगजेबासहि ही हकीकत खानानें कळविली. परंतु या निरोपानिरोपांत दिवसगत मात्र गेले, प्रत्यक्ष असें कांहींच ठरलें नाहीं. हें पाहून शिवाजीनें रघुनाथपंतास औरंगजेबाकडेसच वकील म्हणून पाठविलें. शहाजादा औरंगजेब यावेळीं दिल्लीचें तख्त सर करण्यासाठीं उत्तरेकडेस चालला होता. त्यानें शिवाजीस उत्तर लिहिलें कीं, "तुमचे अपराध जरी अक्षम्य आहेत तरी मी तूर्त तुम्हांला क्षमा करितों. तुम्हीं आपल्या पत्रांत असें कळवितां कीं, ' वडिलोपार्जित जहागीर तुमच्याकडेस राहूं द्यावी आणि आम्हीं निजामशाही प्रांत खालसा केल्यानंतर कोंकणांतील किल्ले व मुलुख तुम्हांस द्यावा म्हणजे पांचशें स्वारानिशीं सोनो पंडित आमच्या चाकरीस येईल. ' तरी सोनो पंडितास प्रथम पाठवून द्यावें म्हणजे तुमच्या मागणीचा विचार सहानुभूतीपूर्वक केला जाईल."

औरंगजेबाचा जळफळाट.

वरप्रमाणें जरी औरंगजेबानें शिवाजीस पत्र लिहिलें तरी आंतून तो शिवाजीवर अगदीं जळफळत होता. शिवाजीचें धाडस व धूर्तपणा यांची औरंगजेबाला बालंबाल खात्री पटल्यामुळें त्याच्या बंदोबस्ताची तजवीज मोठ्या कडकपणानें त्यानें केली. सन १६५७ च्या डिसेंबरमध्यें त्यानें मीरजुमला याला पुढील ताकिदीचें पत्र लिहिलें. " नासिरीखान नगरकडून निघून गेल्यामुळें तो प्रांत उघडा पडला आहे. म्हणून तिकडे चांगलें लक्ष द्या. कारण ही कुत्र्याची अवलाद अशा संधीची वाट पाहत टपून बसली आहे. " आपल्या सरदारांनाच फक्त पत्रें लिहून तो थांबला नाहीं.

त्यानें अदिलशहालाहि पुढील विनंतीपत्र पाठविलें. "माझ्या गैरहजिरींत या प्रांताचें संरक्षण नीटपणें करा. इकडील कांहीं किल्ले शिवाजीनें वळकाविले आहेत तरी त्यास तेथून हांकलून लावा. त्याला आपल्या चाकरींत ठेवावा अशीच तुमची इच्छा असली तर दूर कर्नाटकांत त्याला जहागीर द्या म्हणजे आमचा तरी त्रास अनायासें नाहींसा होईल." शिवाजीच्या एकाच स्वारींतील धाडसाच्या चुणुकीनें औरंगजेबासारखा पराक्रमी शहाजादाहि किती भेदरून गेला होता याचें प्रतिबिंब वरील पत्रव्यवहारांत स्पष्टपणें दिसतें. शिवाजीचें प्रस्थ जर वाढूं दिलें तर मोंगलांच्या पादशाहीला खात्रीनें धक्का बसेल असें धूर्त औरंगजेबाच्या तेव्हांच लक्षांत आलें होतें व शेवटीं तेंच खरें झालें.

इत्यर्थ.

याप्रमाणें तह न करितां व शांतताहि प्रस्थापित न करितां औरंगजेब उत्तरेकडेस निघून गेला. त्याच्या हुकुमाप्रमाणें मोंगलांच्या सरदारांनीं पेडगांवच्या पडक्या किल्ल्याची दुरुस्ती करून शक्य ती मजबुती केली व ते युद्धास तोंड देण्यास सिद्ध होऊन बसले. परंतु उत्तरेकडेस दिल्लीच्या तख्तासाठीं दायविभागाच्या यादवींत स्वतः औरंगजेब सन १६५८-५९ या दोन वर्षांत अखंड गुंतून राहिल्यामुळें दक्षिणेंत मोंगलांचा वचक अगदींच नाहींसा झाला आणि त्यामुळें शिवाजीच्या स्वराज्यवृद्धीला तितका अधिक अवसर सांपडला.

शिवाजीचा अंदाज.

४. कोंकणावर स्वारीः—इसवी सन १६५७ च्या उत्तरार्धांत महाराष्ट्रांत मोठ्याच घडामोडी झालेल्या दिसतात. शहाजादा औरंगजेब हिंदुस्थानच्या पादशाहीच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन नशीबाची परीक्षा पाहण्यासाठीं उत्तरेकडेस निघून गेला; अर्थात् दिल्लीकडेस आपआपसांत या सर्व शहाजाद्यांच्या मोठ्या चुरशीच्या लढाया होणार हें शिवाजीला स्पष्ट दिसलें; मोंगल व विजापुरकर यांची जी नुकतीच मोठी लढाई झाली, तींत झालेल्या पराजयानें विजापुरी सरदारांत वितुष्ट उत्पन्न होऊन अखेर विजापुरी वजीर खान महंमद याचा खून झाला, त्यामुळें अदिलशाहीमध्यें बेबंदशाही माजणार हें शिवाजीला स्पष्ट दिसलें. म्हणजे मोंगल व विजापुरकर हे आपल्याच विवंचनेंत राहणार हें पाहून शिवाजीनें आपल्या हालचालींना ही संधी योग्य जाणून तशा उपक्रमाची तत्काळ सिद्धता केली. कारण तूर्त शिवाजीला कोणाचीच धास्ती बाळगण्याचें कारण नव्हतें.

त्यानें तारीख ३१ जुलई सन १६५७ रोजीं रघुनाथपंताला जंजिऱ्याच्या सीदीवर पाठविलें. आणि पावसाळा संपतांच स्वतः तो कोंकणांत उतरला. यावेळीं कोंकणच्या उत्तरेकडील कल्याण प्रांतावर विजापुरकरांच्या तर्फे मुल्ला अहंमद हा अंमल चालवीत होता. परंतु कांहीं कामासाठीं तो यापूर्वीच विजापुरला गेला असून, महंमद अदिलशहाच्या चेंगट दुखण्यामुळें तो तिकडेच अडकून पडला होता; आणि कल्याणच्या बाजूचा निजामशाही मुलुख अदिलशहाच्या ताब्यांत नुकताच आला असून त्यावर अंमल वसविण्याचें काम अद्यापि चालू होतें. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन शिवाजीनें एकदम कल्याण आपल्या ताब्यांत घेतलें. मुल्ला अहंमदची सून याच ठिकाणीं मराठ्यांच्या हातीं सांपडली होती. तिचा आपल्या दुहितेप्रमाणें सन्मान करून तिला शिवाजीनें विजापुरास पाठवून दिल्याचें वृत्त प्रसिद्धच आहे. "मशारनिल्हे (आबाजी सोनदेवा) स मुसलमानाची स्त्री चांगली सांपडली होती ती महाराजांस नजर केली. महाराजांनीं उत्तर केलें कीं, 'जिजाऊ साहेबांचें स्वरूप असें सुंदर असतें तर आम्हीं याप्रमाणेंच जालों असतों' असें बोलोन तिजला कन्येप्रमाणें मोजून वस्त्रें अलंकार देऊन समागमें पांचशें स्वार दिले आणि विजापुरास पोहोंचविली."*

मराठ्यांच्या हालचाली.

कल्याण घेतल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तारीख २४ ऑक्टोबर सन १६५७ रोजीं भिवंडी सर केली. या दोनहि शहरांस त्यावेळीं कोट वगैरे कांहीं नव्हता. शिवाजीला याठिकाणीं पुष्कळ संपत्ति मिळाली. तारीख ८ जानेवारी सन १६५८ रोजीं त्यानें माहुली किल्लाहि हस्तगत केला. पूर्वी शहाजी याच किल्ल्यावर राहत असे या दृष्टीनें हा किल्ला हस्तगत करण्यांत शिवाजीला महत्त्व वाटणें साहजिक होतें. असो. याप्रमाणें उत्तर कोंकणामध्यें शिवाजीचा शिरकाव होऊन पुढें एका वर्षाच्या आंतच त्यानें तेथें स्थिरस्थावर केलें. दक्षिण कोंकणांतील जहागीरदारहि मुसलमानी अंमलाला कंटाळलेले होते असें दिसतें. 'सोंडवळकर व कोंडवळकर व जंजीरकर व राजपुरीकर तर्फेचे लोकांनीं तमाम कागद पाठवून वर्तमान जाणविलें कीं, महाराजांनीं कोंकणांत आल्यावर आपण भेटीस येऊं. त्याउपर महाराज कोंकणांत उतरले. सोंडवळकर व कोंडवळकर येऊन भेटले. सुरगड, बिरवाडी, तळा, घोसाळगड, सुधागड, कांगोरी,'* हीं सगळीं स्थळें शिवाजीनें भराभर सर केलीं. आणि सर्वांत अजिंक्य असा राय-

कोंकण सर.

* म. सा. छो. ब.

गड किल्लाहि काबीज केला. येथेंच नंतर छत्रपतींची राजधानी स्थापन झाली. याप्रमाणें जंजीऱ्याच्या सीदीचा कुलाबा परगण्यापैकीं पूर्वेकडील अर्धा प्रांत शिवाजीच्या हस्तगत झाला. बिरवाडी आणि लिंगाणा येथें शिवाजीनें लवकरच मजबूत किल्ले बांधिले. कल्याण येथून शिवाजीच्या फौजा पोर्तुगीजांच्या प्रदेशांत वारंवार शिरून लुटालूट करूं लागल्या, तेव्हां शिवाजीशीं लढाई करून त्याला जिंकणें अशक्य आहे असें पाहून पोर्तुगीज गव्हर्नरानें वार्षिक खंडणी देण्याचें कबूल करून आपला प्रांत सुरक्षित केला. कल्याण व भिवंडी हीं लवकरच मराठ्यांच्या आरमाराचीं ठाणीं झालीं. आणि येथूनच जंजीऱ्याच्या सीदीशीं पुढें खटका उडाला, त्याची हकीकत यथा स्थळीं देण्यांत येईल. या नवीन जिंकलेल्या प्रदेशावर सुभा म्हणून आबाजी सोनदेवाची नेमणूक केली. 'आवाजी सोनदेव यांनीं साराच आटोप केला.'

सिंहावलोकन.

येथपर्यंत राज्यविस्ताराची बाल्यावस्थाच होती असें म्हटलें पाहिजे. येथून पुढें मराठी साम्राज्याला तारुण्य प्राप्त होणार, म्हणून येथेंच सिंहावलोकनानें या बाल्यावस्थेच्या विस्ताराचा आढावा घेणें योग्य होईल. अगदीं आरंभीं म्हणजे सन १६४७ मध्यें शहाजीची जी कांहीं थोडीशी जहागीर पुणें व पुण्याच्या पश्चिम बाजूला होती तोच पुढच्या स्वराज्याचा पाया होय. पुढें सहा महिन्यांत विजापुरकरांचा पुण्याच्या दक्षिणेकडील कांहीं प्रांत शिवाजीनें बळकावून आपली जहागीर वाढविली. त्यामुळें उत्तरेस घोडनदीपर्यंत हें चिमुकलें स्वराज्य जाऊन पोहोंचलें. अर्थात्च या बाजूचा मोंगली मुलुख स्वराज्यांत नव्हता. जुन्नर, विसापुर, पारनेर यांशिवाय वेड्यावांकड्या रेषेंत येणारा प्रांत स्वराज्यांत सामील झाला होता. जुन्नर व चांभारगोंदें मोंगलांकडेस होतें, आणि चाकण मात्र स्वराज्यांत दाखल झालें होतें. इंदापुर, बारामती आणि राजगड, तोरणा व बहुशः कोंडाणासुद्धां इतकी स्वराज्याची दक्षिण मर्यादा होती.

राज्यविस्तार.

याप्रमाणें सन १६४८ त शहाजीच्या राज्याची चतुःसीमा होती. परंतु पुढील दहाच वर्षांत म्हणजे सन १६५९ पर्यंत हें राज्य कितीतरी पटीनें वाढलें हें पाहण्यासारखें आहे. उत्तरेकडेस डोंगर ओलांडून हें स्वराज्य देशावर पोंचलें, आणि दक्षिणेस सातारा जिल्हा आणि कोंकणांत माहुलीपासून महाडापर्यंत असें हें शिवाजीचें स्वराज्य विस्तीर्ण दिसूं लागलें. मात्र यांत बंदर व पश्चिम किनाऱ्याचा प्रदेश यांचा समावेश अझून व्हावयाचा

होता. पश्चिम किनारा, बंदरें व मुलुख हीं विजापुरकर, सीदी आणि पोर्तुगीज यांच्या ताब्यांत होतीं. ठाण्याच्या अगदीं उत्तरेकडील व महाडच्या दक्षिणेकडील प्रदेशहि अझून जिंकावयाचा होता.

राज्यव्यवस्था.

याप्रमाणें विस्तार पावलेल्या स्वराज्याची व्यवस्था शिवाजीनें प्रयत्नपूर्वक व विचारपूर्वक इतकी उत्तम प्रकारची लावून दिली कीं, तीपासून लोकांस सुख होऊन ते अगदीं निर्भय झाले. "मोरो त्रिंबक ब्राह्मण यांनीं बहुत मेहेनत केली, त्याजवरून शामराज नीळकंठ यांची पेशवाई दूर करून मोरोपंतास दिली व निळो सोनदेव यांणींहि मेहेनत केली म्हणोन त्यास सुरनिशी सांगितली. गंगाजी मंगाजी म्हणोन होते त्यास वाकनिशी सांगितली. लष्करचा सरनौवत नेताजी पालकर केला. नेताजी सरनौबदी करीत असतां सात हजार पागा व तीन हजार शिलेदार अशी दहा हजार फौज जाली. मावळे लोकांची संचणी दहा हजार पावेतों झाली. यांसि सरनोबत येसाजी कंक म्हणून केला. ऐसें राज्य चौकशी बंदोबस्त करून राहिले.*" जुने व नवे मिळून एकंदर चाळीस किल्ले सन १६५९ मध्यें स्वराज्यांत मोडत होते. 'राजियाची स्त्री निंबाळकर यांची कन्या सईबाई केली होती ती प्रसूत जाहली. पुत्र जाहला. त्याचें नांव संभाजी राजा म्हणून ठेविलें. बहुत उत्साह केला. धर्म बहुत केला. राजगडीं राहिले.*' संभाजी राजाचा जन्म तारीख १४ मे सन १६५७ रोजीं जाहला. अत्यंत क्रूरपणें औरंजेबानें ज्याचा पुढें बत्तीस वर्षांनीं वध केला तोच हा हुतात्मा राजपुत्र होय.

विजापुरची हालहवाल.

५. विजापुरकरांच्या मसलतीः—इ. स. १६५७ मध्यें मोंगलांच्या स्वारीचें संकट तर कसेंबसें दूर झालें, व शहाजादा औरंगजेब पादशाही मिळविण्यासाठीं उत्तरेकडेस निघून गेला; त्यामुळें विजापुरच्या पादशाहीला थोडी विश्रांति मिळून पुनः मजबुती करण्यास सवड सांपडली. तेव्हां मुख्य प्रधान खान महंमद हा औरंगजेबाला सामील आहे या संशयावरून तारीख ११ नोव्हेंबर १६५७ रोजीं त्यास इतर सरदारांनीं ठार मारिलें. तथापि त्याच्यानंतर मुख्य प्रधानाच्या जागी आलेला खवास खान हा मोठा राजकार्यधुरंधर होता. शहाजादा अली अदिलशहा हा गादीवर बसला असून त्याची मातुश्री बडी साहिबा हीच विजापूरचीं राज्यसूत्रें हालवीत होती. ही बाई मोठी धोरणी व करारी असे. पुढें सन १६६०

मध्यें मक्केच्या यात्रेंत अपघातानें हिचा शेवट झाला तोंपर्यंत राज्यांतील सर्व व्यवस्था हीच पाहत असे. सरहद्दीवर वारंवार होणाऱ्या मोंगलांच्या त्रासांतून मुक्त होतांच विजापुर दरबारानें बंडखोर सरदारांना वठणीवर आणण्याचा उद्योग आरंभिला. " विजापुर (येथें) अली इदलशहा पादशाही करूं लागले व बडी साहेबीण, सुलतान महंमद याची वायको ही कारभार कुल करीत असतां त्यांस हें (शिवाजीच्या धामधुमीचें) वर्तमान कळून बहुत कष्टी जाहली. पातशाही किल्ले घेतले, देशहि काबीज केला. एक दोन राज्यें बुडविलीं. हा पुंड जाहला. त्यास मारून गर्दीस मेळविण्याचें कसें करावें, म्हणून विचार करून राजश्री शाहाजी राजे बेंगरुळाकडे होते, त्यांस पत्रें लिहिलीं, महालदार रवाना केले कीं, 'तुम्हीं पातशाही चाकर, आणि शिवाजी लेंक पुण्याकडे पाठवून त्यांणीं पादशहाशीं बदलून हरामखोरी केली. चार किल्ले पादशाही घेतले. देश मुलूख काबीज केला व मारिला. एक दोन राज्यें बुडविलीं व एक दोन राजे पादशाहासी रुजुवात होते ते मारिले. आतां लेंकास कदवार ठेवणें, नाहीं तरी पादशाही हवाला घेतील.' असें लिहून पाठविलें. मग महाराजांनीं उत्तर दिलें कीं, ' शिवाजी आपला पुत्र, परंतु आपणांजवळून पळोन गेला. तो आपल्या हुकुमांत नाहीं. आपण तों पादशाहाशीं रुजुवात एक निष्ठेनें आहों. शिवाजी आपला पुत्र याजवरि हल्ला करावी, मन मानेल तें करावें, आपण दरमियान येत नाहीं. ' असें उत्तर पाठविलें.* " म्हणून शिवाजीला चिरडून टाकण्याचा विचार सुरू झाला.

परंतु हें कांहीं सामान्य काम नव्हतें. शिवाजीची फौज अगदीं जय्यत होती, आणि मावळच्या घाटांत जाऊन लढण्याचा हिय्या विजापुरी सरदारांत नव्हता. " तेव्हां बडी साहेबीण हिणें कुल वजीर उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजी राजियावरी रवाना करावे म्हणोन पुसतां कोणी कबूल केलें नाहीं. अफजलखान वजीर यांणीं कबूल केलें कीं, ' शिवाजी काय ? चढे घोडियानिशीं जिवत कद करून घेऊन येतो.* ' असें म्हणून खानानें पैजेचा विडा उचलिला."

अफजलखानाची प्रतिज्ञा.

६ अफजलखानाची स्वारीः—अबदुल्ला भटारी ऊर्फ अफजलखान हा विजापुर दरबारामध्यें पहिल्या प्रतीचा सरदार होता. हा महमद अदिलशाहाच्या कारकीर्दीत प्रसिद्धीस आला. बहलोलखान व रणदौलाखान यांच्या ताब्यांतील हा सरदार असून मोठा शूर व लायक

खानाचें प्रयाण.

* सभासद.

सेनापति होता. नुकत्याच मोंगलाशीं झालेल्या लढाईंत यानें चांगलीच तरवार गाजविली होती. परंतु या युद्धामुळें विजापूर दरबार अगदींच खालावलें होतें व स्त्रीराज्यामुळें तेथें दुसरीहि बरीच अव्यवस्था झाली होती. तथापि दहा हजार घोडेस्वार बरोबर घेऊन अफजलखान विजापुराहून निघाला. शिवाजीजवळ यासमयीं साठ हजार मावळे गोळा झाले होते असें म्हणतात. तसेंच विजापूर दरबारांतून यावेळीं नोकरी सोडून आलेले पांचशें पठाणहि शिवाजीनें आपल्या पदरीं चाकरीस ठेविले होते. शिवाजीच्या बळाची कल्पना विजापुरास वडेसाहेबीण हिजला असल्यामुळें तिनें ' सरळपणें न जमल्यास फसवूनहि शिवाजीचा घात करण्यास ' अफजलखानास गुप्तपणें सांगितलें होतें.

अत्याचार.

" शिवाजी काय ? चढे घोड्यानिशीं जिवंत कद करून घेऊन येतो." अशी फुशारकी अफजलखानानें भर दरबारांत मारिली. परंतु हें काम किती विकट होतें याची त्याला लवकरच कल्पना आली. म्हणून मावळांच्या कांहीं देशमुखांना त्यानें शिवाजी विरुद्ध उठविलें व शिवाजीला चिरडून टाकण्याचीं कारस्थानें सुरू केलीं. अफजलखान उत्तरेकडून तुळजापुरावरून पुण्याकडेस येण्यास निघाला. ' तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन औरस चौरस लष्कर उतरलें. आणि पुढें तुळजापुरास आलें. तेथें येऊन मुकाम केला. श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून, जातियांत घालून, भरडून पीठ केलें. पुढें लष्कर कूच करून श्री पढरीस आलें. भीमातीरीं उतरलें.*' आणि तेथेंहि देवास असाच त्रास दिला. व लवकरच खान वांईस पोंचला. खान हा गेलीं दहा बारा वर्ष वांईचा सुभेदारच होता. तेथें येऊन त्यानें आपले पुढील बेत रचण्यास सुरुवात केली. जे देशमुख शिवाजीस अनुकूल होते त्यांस नानाप्रकारें आपणांकडेस वळवून घेण्याचा प्रयत्न त्यानें पहिल्या प्रथम केला. व खंडोजी खोपडे वगरे देशमुख त्याला सामीलहि झाले. तथापि सात देशमुख शिवाजीकडेसच राहिले. अफजलखानानें खंडोजी खोपड्याची नेमणूक आपल्या बिनीवर केली. मावळ्यांच्या देशमुखांना आपल्याकडेस वळवून घेण्यासाठीं विजापुर दरबार व शिवाजी यांनीं कसकसें प्रयत्न केले याचा नमुना जेधे शकावलींत दिला आहे. ' पातशहा यांचें फरमान मावळच्या देशमुखांस आलें कीं अफजलखानास सामील होणें. त्यांस केदारजी खोपडे अफजलखानाजवळ होते. खंडोजी बिन धर्मोजी खोपडे देशमुख तााा उत्रोली हे अफजखानाकडे गेले.'

* सभासद.

प्रत्यक्ष स्वारीला सुरुवात पावसाळ्यानंतरच व्हावयाची होती. तोंपर्यंत अफजल-

खानाचा निरोप.

खान वांईस तळ देऊन राहिला व आपले पुढील बेत रचण्यांत अगदीं गढून गेला. शिवाजी यावेळीं प्रतापगडावर होता. अशावेळीं अफजलखानानें " विचार केला कीं, ' राजियाकडे हेजिबास पाठवून, सल्ला करून, पातेजून जिवंत हातीं धरावा. ' अशी मनांत योजना करून कृष्णाजी भास्कर हेजीब यास बोलावून आणून सांगितलें कीं, ' तुमचे वाप महाराज त्यांचा आमचा भाईचारांत पुरातन स्नेह चालला आहे. त्याजमुळें तुम्हीं कांहीं आपणांस इतर नाहीं. तुम्ही येऊन आपल्यास भेटणें. आपण पादशहाजवळून तुम्हांस तळ कोंकणचें राज्य व जहागिरी देववितों. गडकोट किल्ले घेतले ते करार करवितों. वरकडहि नांवाजितों. जितके तुमचे मनांत असेल तेणेंप्रमाणें सरंजाम देववितों. पादशहाशीं भेट घेणें तरी घ्या, नाहींतरी मुलाजमत माफ करवितों.*" याप्रमाणें मोठ्या साळसूदपणानें निरोप सांगून खानानें कृष्णाजी भास्कर यास शिवाजीकडेस रवाना करून दिलें.

७ भयंकर संकटः—अफजलखानाच्या या स्वारीची वार्ता सर्वत्र पसरून

संकटाची भीषणता.

शिवाजीच्या मावळ्यांत मोठी चलबिचल उडून गेली होती. आजपर्यंत त्यांनीं किल्ले सर केले, गांवें मारिलीं व किरकोळ चकमकींत सरशीहि प्राप्त करून घेतली. परंतु हल्लींचा प्रसंग मोठा बांका होता. अफजलखान हा नांवाजलेला सेनापति होता, त्याच्याबरोबर दहा हजार करोल घोडेस्वार होते व तोफा वगैरे इतरहि युद्धोपयोगी सामान तो बरोबर घेऊन आला होता. अशा जय्यत तयारीनिशी आलेल्या विजापुरच्या सैन्याशीं शिवाजीच्या मावळ्यांची गांठ पडावयाची होती. शिवाय विजापुरापासून वांईपर्यंत अफजलखान बिनहरकत चाल करून लुटालूट करीत व मूता फोडीत आला होता, परंतु त्याला या प्रवासांत कोणीहि अडथळा करूं शकलें नाहीं. यावरून त्याच्याबद्दल एकप्रकारचा दरारा त्यावेळीं बसला होता असें दिसतें. अफजलखानाच्या अंगीं प्रचंड शक्ति आणि राक्षसी क्रौर्य वास करीत आहे अशाहि कित्येक गोष्टी सर्वत्र पसरल्या होत्या. सेऱ्याचा राजा कस्तुरी रंग हा सन १६३९ मध्यें अदिलशहास शरण येण्याच्या उद्देशानें अफजलखानाच्या गोटांत आला असतां खानानें विश्वासघातानें त्याचा खून केल्याचेंहि प्रसिद्धच होतें. यामुळें सहसा कोणीं त्याच्या वाटेस गेला नाहीं. परंतु नासधूस करीत, मूर्तींचा विध्वंस करीत

* सभासद.

व गांवें लुटीत अफजलखान येतो आहे असें पाहतांच शिवाजी 'राजानें आपली कुल फौज लष्कर मुस्तेद (=तयार) करावें आणि जावळीस युद्ध करावें, आपण प्रतापगडास जावें, हा विचार केला. तेव्हां सर्वांनीं निवारिलें कीं, झुंज देऊं नये, सल्ला करावी.*' युद्ध करून जय मिळेलच असें मंत्र्यांना वाटलें नाहीं. व प्राणनाश मात्र निष्कारण होईल असें त्यांचें मत पडलें. आणि म्हणून त्यांनीं अफजलखानाशीं तह करण्याचीच सल्ला दिली.

शिवाजीची चिंता.

स्वराज्यस्थापनेच्या उपक्रमांत हा प्रसंग मोठा आणीबाणीचा असून जगावें कीं मरावें असा वैकल्पिक प्रश्न शिवाजीपुढें होता. यावेळीं अफजलखानाच्या आहारीं जाऊन त्याला शरण गेल्यास आजपर्यंत माजविलेल्या बंडाळीबद्दल विजापुरच्या बादशहाकडून कदाचित् माफी मिळेल. परंतु त्यावरोबरच भावी स्वातंत्र्याचे मनोरथ व थोरपणाच्या आशा यांवर कायमचें पाणी सोडून बाकीचें सर्व आयुष्य विजापुरकरांच्या पदरचा एक सरदार या नात्यानें काढावें लागणार हें निश्चित होतें. बरें, यावेळीं खानाशीं समरांगणावर दोन हात करणें म्हणजे विजापुरची सत्ता आपण उघडपणें झुगारून दिली असेंच कृतीनें जगास दाखविणें होतें. व अशा रीतीनें विजापुरकरांशीं कायमचें वैर संपादिल्यावर त्यांची व शिवाजीची गोडी राहणें शक्यच नव्हतें. याप्रमाणें उघडपणें विजापुरकरांशीं शत्रुत्व संपादिल्यावर मोंगल, विजापुरकर व इतरहि अशाच अनेक शत्रूंशीं जन्मभर झगडून स्वराज्य व स्वातंत्र्य यांचें संरक्षण करण्यासाठीं स्वतः सिद्ध असणें हें क्रमप्राप्तच होतें. शिवाय या कामांत शिवाजीला कोणाची मदतहि मिळणें शक्य नव्हतें. त्यानें एकट्याच्या हिंमतीवर या सगळ्या संकटांना तोंड देण्याची तयारी करणें अवश्य होतें. शिवाजीच्या मंत्रीमंडळानें या सगळ्या संकटांचा विचार करून अफजलखानाशीं तह करण्याची सल्ला दिली हें वर आलेंच आहे. स्वतः शिवाजीलासुद्धां या संकटाची भीषणता मोठी भीतिप्रद भासली. तथापि तो स्वतः लोकोत्तर पुरुष असल्यामुळें अफजलखानाला शरण जाण्याची कल्पना त्याला अगदींच नामर्दपणाची वाटली. एक सबंध रात्रभर त्यानें या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून अवतारी पुरुषाला शोभेल अशा प्रकारचा निश्चय कायम केला. या प्रसंगींची पुढील दंतकथा प्रसिद्ध आहेः—" तों रात्रीं श्रीभवानी तुळजापुरची (इणें) मूर्तिमंत दर्शन दिलें आणि

---

* सभासद.

बोलिली कीं, 'आपण प्रसन्न जाहलों. सर्वस्वें साह्य तुला आहे. तुझे हातें अफझुल मारवितों. तुजला यश देतों. तूं कांहीं ।चता करूं नको.*"

शिवाजीनें यावेळीं आपल्या मनाचा पूर्ण निश्चय करून मंत्रीमंडळास धीर दिला.

निश्चय.

शिवाजीचें असाधारण धैर्य आणि दैवी साक्षात्काराचा पाठिंबा यायोगें लोकांसहि मोठा उत्साह वाटला व ते युद्धास सिद्ध झाले. शिवाजीनें आपल्या फौजांच्या हालचाली मोठ्या चातुर्यानें व दूर दृष्टीनें केल्या. 'जर अफजलखान मारून जय जहाला तर माझा मीच आहे. एखादे-समयीं युद्धीं प्राणनाश जहाला, तरि संभाजी राजे आहेत. त्यांस राज्य देऊन त्यांचे आज्ञेंत तुम्हीं राहणें.*' अशी राज्याची निरवानिरव केली. " मातुश्रीच्या पायांवर डोई ठेवून, निरोप घेतला. मातुश्रींनीं आशीर्वाद दिला कीं, 'शिवबा ! विजयी होशील.'*" याप्रमाणें मातुश्रीचा आशीर्वाद घेतल्यावर 'नेताजी पालकर सरनोबत यास लष्कर घेऊन वर घाटावरि येणें म्हणोन सांगितलें.'* आणि मोरो-पंतास कोंकणांतून बोलाविलें व प्रतापगडाच्या आसपास सैन्यासुद्धां पाळतीवर राहण्यास सांगितलें.

८ कारस्थानें:—अफजलखानानें पहिल्याप्रथम आपला वकील कृष्णाजी भास्कर यास शिवाजीकडेस भेटीचें बोलणें करण्यासाठीं पाठविलें. शिवाजीनें त्याला मोठ्या सत्कारानें वागविलें आणि मध्यरात्रीं एकांतीं त्याला भेटीस बोलावून खानाचा अंतस्थ हेतु काय आहे असें पंताला त्याच्या हिंदुत्वाची-त्याच्या ब्राह्मण्याची-आठवण देऊन सांगण्यास, शुद्ध व निष्कपट अंतःकरणानें, विनविलें. कांहींतरी कपटी हेतु खानाचा आहे इतकें कृष्णाजीपंतानें पुष्कळ आढेवेढे घेतल्यावर सुचविलें. पुढें परत भेटीसाठीं म्हणून शिवाजीनें आपला वकील पंताजी गोपीनाथ याला 'आपण भेटीस तयार आहोंत, मात्र आपल्या सुरक्षितपणाची हमी खानानें द्यावी' अस सांगून कृष्णाजी भास्करा-बरोबर खानाकडेस पाठविलें.

वकीलांच्या भटी.

अफजलखानाचें सैन्य किती आहे, त्याची तयारी कशी काय आहे, खानाचें अंतरंग शुद्ध आहे कीं नाहीं इत्यादि प्रकारचीहि उपयुक्त माहिती पंताजीनें मिळवावी असें शिवाजीनें त्याला बजाविलें होतें. आपण खानास कांहींएक दगा करणार नाहीं आणि खानानेंहि आपणांशीं तसेंच वागावें असें पंताजीबरोबर शिवाजीनें खानास

---

* सभासद.

सांगून पाठविलें होतें. खानाच्या छावणींत गेल्यावर पंतानें आपल्या पिशवीचें तोंड मोकळें सोडल्यामुळें त्याला खात्रीलायक अशी माहिती मिळाली कीं, 'समोरा समोर लढाई करून शिवाजी हस्तगत होणें अशक्य आहे म्हणून प्रत्यक्ष भेटींतच त्याला कैद करावें असा व्यूह खानानें रचलेला आहे.' याप्रमाणें माहिती मिळविल्यावर पंताजीपंत परत आला व त्यानें शिवाजीस स्पष्ट सांगितलें कीं, 'खानाच्या मनांत दुष्टबुद्धि आहे. सल्ला करून, तुम्हांस भेटीस आणून, दगा करून, कैद करून, विजापुरास धरून न्यावें ऐसें आहे. जर तुम्हांस हिंमत असली तरी खानास नानाप्रकारें भेद करून जावलीस घेऊन येतों. तुम्हीं हिंमत धरून एकांतीं एकांगी करून मारणें आणि लष्कर सर्व लुटणें.'*

शिवाजीचा निरोप.

पंताजीपंताकडून खानाच्या दुष्ट बेतांची निःसंदेह व निश्चित अशी बातमी कळल्यावर शिवाजीला आपला विचार ठरविणें फार सोइस्कर झालें. खानाच्या दराऱ्यानें आपण अगदीं भेदरून गेलों आहोंत व त्यामुळें आपणांस वांईस येणें मुळींच शक्य नाहीं. खानानें वचनपूर्वक आणभाक केल्याशिवाय आपण भेटण्यास येणारच नाहीं अस त्यानें दर्शविलें. व ती भेटहि जवळ येथेंच आसपास व्हावी असें सुचविलें. आपल्याला शिवाजी भ्याला आहे हें खानास सत्यच वाटलें व त्यानें शिवाजीच्या सगळ्या मागण्या एकदम कबूल केल्या. खान भेटीस येणार हें निश्चित ठरल्यावर शिवाजीनें वांईपासून प्रतापगडापावेतोंचा रस्ता, झाडें झुडपें कापून स्वच्छ आणि रहदारीला सुगम असा केला. रस्त्यानें येतांना खानाच्या सैन्यालासुद्धां अडचण पडूं नये म्हणून टप्प्या टप्प्यावर सैन्याच्या खाण्यापिण्याची सोय केली. रडतोंडीच्या घाटानें अफजलखान प्रतापगडाच्या पायथ्याशीं एक मैलावर पार येथें आला. व सैन्यासुद्धां त्यानें तेथें मुक्काम केला. "प्रतापगडाखालीं डेरे देऊन राहिले. आसपास चौगर्दा वारा हजार लष्कर व बंदुखी, आराबियाच्या गाड्या, हत्ती, सुतरनालाच्या गाड्या, जागां जागां पाणी पाहून उतरले. पंताजीपंतास राजियाकडे गडावरी पाठविलें कीं, 'भेटीस येणें'."*

सैन्याची योजना.

याप्रमाणें ऐन भेटीची धामधूम चालू होती त्यावेळीं शिवाजीनें आपल्या निवडक सैन्याची जी योजना केली होती तीहि येथें सांगणें अवश्य आहे. "अंतस्थें विचार कान्होजी जेधे व सरकारकून बैसोन राजश्री स्वामींनीं विचार केला कीं,

* सभासद.

मुसलमान बेमान आहे बादलचा जमाव जाउळीस व पारच्या रानांत राहणें. कदाचित् भेटीचे समयीं त्याणें बेइमानी केली तरी त्यांचें लष्कर पारांत आहे तें डोंगरास चढूं न देणें आणि निवडक माणूस घेऊन आपली मदत करणें. कदाचित् श्रीअंबेच्या वरदें अफजलखान मृत्यु पावला तरी इशारतीचे आवाज गडावरी होतील. तेव्हां पारावरी चालून घेऊन अगदीं लष्कर बुडविणें. हैबतराऊ व बाळाजी नाा सिलीमकर जमावानिसी बोचेघोलीचे घाटी ठेविले आहेत ते घाट लष्करास चढूं देणार नाहींत. यैसा अंतस्थे विचार जाला आणि बंदोबस्ती केली."*

भेटीची सिद्धता.

पंताजीपंतानें गडावर जाऊन खान गडाच्या पायथ्याशीं येऊन ठेपिल्याची वर्दी दिली. दुसऱ्या दिवशीं उभयतांच्या भेटी व्हावयाच्या असें निश्चित झालें. 'गडाजवळच किल्लयाच्या बुर्जाखालीं सदरेस जागा तयार केली. ही जागा अशा ठिकाणीं होती कीं, गडावरून तेथें चाललेला तमाशा सर्वांस सहज दिसावा. गडाच्या तटावरील तोफांच्या भोंकांतूनहि ही सदरेची (=कचेरीची) जागा व अफजुलखानाच्या लष्करचा गोट अगदीं सहज स्पष्ट दिसतात. सदर तयार केली होती ती फार उंची व अफजुलखानाचे इतमामास शोभेल अशीच केली होती. डेरे, बिछाने व आस्मानगिरी, गिर्द्या, तक्ये ठेवून जागा सजविली होती. त्या डेऱ्यास चंदराई कळस सोन्याचे लाविले होते. व मोत्याच्या झालरी सोडल्या होत्या. सर्वभर उंची मखमाली पडदे लाविले होते. या तंबूंत एक चौत्रा करून त्यावर खाशांस बसण्यास सोय केली. हा चौत्रा पूर्वपश्चिम ३३ फूट रुंद व दक्षिणोत्तर ४० फूट लांब इतका होता×.' याप्रमाणें एकंदर सिद्धता झाल्यावर भेटीच्या दिवशीं शिवाजीन आपली सज्जता पुढील प्रमाणें केली. "आणि खासा राजियांनीं जरीचीं (= लोखंडी कड्यांचीं) कुडतीं घातलीं. डोईस मंदील बांधिला त्यांत तोडा बांधिला. पायांत चोळणा घालून कास कसली. व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें‡.' 'दाढी लहान बाल छाटून केली÷.' 'आणि वराबर जिऊ महाला म्हणून मर्दाना होता त्याजवळ एक पट्टा व एक फिरंग व ढाल, तैसाच संभाजी कावजी महालदाराजवळ पट्टा व फिरंग व ढाल ऐसे दोघे माणसें मर्दानी आपणावराबरी भटीस घेतलीं. वरकड आसपास धारकरी लोक जागां जागां जाळीत उभे केले. आणि राजियानें स्नान करून भोजन केलें. सिद्ध होऊन गडाखालीं भेटीस जावयास उतरले÷.' इतक्यांत साक्षात् देवीच अशी मातुश्री जिजाबाई सामोरीं आली. तिला पाहतांच शिवाजीनें

---

* जेधे शकावली. × भावे. ‡ सभासद. ÷ ९१ कलमी.

गद्गद् अंतःकरणानें तिच्या पायांवर डोकें ठेविलें. तिनेंहि ' विजयी भव ' असा आशीर्वाद देऊन ' शिवाजीस नीट संभाळा ' असें वरोवरच्या मंडळीस बजावून सांगितलें. मंडळींनींहि 'आज्ञा प्रमाण' म्हणून मातुश्रीला नमन केलें व याप्रमाणें आशीर्वादरूपी कवच चढवून ही सर्व मडळी गडावरून खालीं उतरूं लागली.

खानाचा मस्सर.

९ काळभेटः—" गोटांतून भटीस यावयास खानहि सिद्ध होऊन चालिले. बराबरी लष्कर हजार दीड हजार बदुखी मुस्तेद (=तयार) होऊन चालिले. मोठे मोठे धारकरी लोक समागमें निघाले. इतक्यांत पंताजीपंत पुढें होऊन अर्ज केला कीं, 'इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धाशत खाईल. माघारा गडावरी जाईल. भेटी होणार नाहीं. शिवाजी म्हणजे काय ? यास इतका सामान काय करावा ? राजा दोघां माणसांनिशीं तिकडोन येईल. तुम्हीं इकडोन दोघांनिशीं चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथें तदवीज करणें ती करा.' असें सांगितल्यावरी अवघा जमाव दूर (करून) वाणाचे टपियावरि (ठेविला) खासा खान एक पालखी, दोघे हुद्देकरी व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढें चालिले. सैदवंडा म्हणोन पटाईत एक लष्करी समागमें घेतला. पंताजीपंतहि बराबरी आहेत असे सदरेंत गेले. सदर देखोन खान मनांत जळाला कीं, 'शिवाजी म्हणजे काय ? शहाजीचा लेक वजीर यास असा जरी बिछाना नाहीं ! अशी मोतीलग सदर म्हणजे काय ? पादशहास असा सामान नाहीं, येणें जातीचा त्यानें सामान मिळविला.' असें बोलतांच पंताजीपंत बोलिला जे, 'पादशाई माल पादशहाचे घरीं जाईल. त्याची इतकी तजवीज काय ?' अस बोलून सदरेस बैसले. राजियास सिताब आणवणे म्हणून जासूद दरकारे रवाना केले."*

भेटीच्या वेळीं असलेलीं माणसें.

"राजे गडाचे पायीं (= पायथ्याशीं) उभे होते. तेथून हळू हळू चालिले. समाचार घेतां खानावरोवर सैदबांडा मोठा धारकरी आहे हें ऐकून उभे राहिले. आणि पंताजीपंतास बोलावूं पाठविलें. ते आले. त्यास म्हणूं लागले जे, 'जैसे महाराज (=शहाजी) तैसे खान. आपण खानाचा भतीजा (= पुतण्या.) होय. ते वडील. सैदवंडा खानाजवळ आहे. त्याकरितां शंका वाटते. हा सैदबंडा इतका दूर पाठवणें.' म्हणोन पंताजीपंतास सांगितलें. त्यावरून पंताजीपंत (यांनीं) जाऊन कृष्णाजीपंताकडून खानास सांगोन सैदबंडाहि दूर पाठविला. खान व दोघे हुद्देकरी

* सभासद.

राहिले. तेव्हां राजेहि हिकडून जिऊ महाला व संभाजी कावजी दोघे हुद्देकरी (यां) सहित गेले."* म्हणजे भेटीच्या ठिकाणीं खान, त्याचे दोघे हुद्देकरी व कृष्णाजी भास्कर अशीं चार व शिवाजी, (जिऊ महाला व संभाजी काऊजी हे) दोघे हुद्देकरी आणि पंताजीपंत अशीं चार मिळून एकंदर आठच माणसें हजर होतीं.

खानाचें कपट.

शिवाजी सदरेंत प्रवेश करीत होता तेव्हां खान पूर्वीच तेथें येऊन बसला होता; खान चांगल्या प्रकारें वागला तर आपणहि भलेपणेंच वागावें हा विचार शिवाजीच्या मनांत घोळत होता तेव्हां, कसेंहि करून निदान शिवाजीला कैद करून विजापुरास न्यावें हा खानाचा निश्चय झाला होता; स्वराज्य स्थापनेच्या सत्कृत्यांत आपणांस परमेश्वरी सहाय्य आहे असा शिवाजीचा विश्वास होता तर शिवाजीशीं कराव्या लागणाऱ्या कपटाला विजापुरच्या राजमातेचें पूर्ण सहाय्य आहे असा खानास भरंवसा होता; खान शक्तीच्या घमेंडींत होता तर शिवाजी मातुश्रीच्या चरणीं लीन झालेला होता; खानानें नुसताच झगा घातलेला होता तर शिवाजीनें स्वसंरक्षणाची पूर्ण काळजी घेतलेली होती; खान उंच व धिप्पाड होता तर शिवाजी ठेंगणा पण चपळ होता. अशी या उभयतांची अंतर्बाह्य स्थिति होती. शिवाजी आला हें पाहतांच 'खानहि उभे राहून, पुढें सामोरा येऊन राजियास भेटला. राजियानें भेटी देतां' शिवाजीचें डोकें तो ठेंगणा असल्यामुळें खानाच्या खांद्याला लागलें. तत्काळ, "खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांकेखालीं धरिली. आणि हातीची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली. तों अंगांत जरीची कुडती होती त्यावरी खरखरली. अंगास लागली नाहीं. यावेळीं खानाच्या पोलादी हाताचा विळखा शिवाजीच्या मानेला पडून खानानें ती मान घट्ट आंवळून धरल्यामुळें शिवाजीची गळचेपी होऊन क्षणमात्र तो गुदमरून गेला, परंतु तत्काळ सावध होऊन, राजयांनीं डावे हाताचें वाघनख होतें तो हात पोटांत चालविला. खानानें अंगांत झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करितांच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हातचे बिजवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून, मुंडी आसडून, चौथरियाखालें उडी घालोन निघोन गेले.*"

तरवार चाली.

"खानानें गलबला केला कीं, 'मारिलें ! मारिलें ! दगा दिधला ! बेगी धांवा !' ऐसें बोलतांच भोयांनीं पालखी आणिली. आणि पालखींत घालून, उचलून चालविला. इतकियांत संभाजी कावजी

* सभासद.

महालदार यानें भोयांचे पाय मारिले. आणि पालखीखालें भोयांस पाडिलें. खानाचें डोचकें कापिलें. हातीं घेऊन राजिया जवळ आला. इतक्यांत सैदबंडा पटाईत धावला. त्यानें राजे जवळ केलें. पट्याचे वार राजियावरी चालविले. तों राजियानें जिऊ महालियाजवळ आपला हुदियाचा पट्टा (होता तो) घेऊन, पट्टा व बिचवा असे कातर करून सैदबंडा याचे चार वार ओढिले. पांचवे हातानें राजियानें सैद-बंडा मारावा तों इतकियांत जिऊ महाला याणें फिरंगेनें खांद्यावरि सैदबंडियासि वार केला. तो पटियाचा हात हत्यारा समेत तोडिला आणि खानाचें शिर घेऊन राजे सिताब गडावरी जिऊ महाला व संभाजी कावजी महालदार असे गेले.*" हा प्रकार शके १५८१ मार्गशीर्ष शु॥ ७ म्हणजे तारीख १० नोव्हेंबर सन १६५९ गुरुवार रोजीं घडला.

१० खानाच्या सैन्याची दाणादाण:—याप्रमाणें मुख्य संकटांतून मुक्त होतांच शिवाजीनें गडावर जाऊन 'भांड्याचा (=तोफेचा) आवाज केला तोंच गडाखालील लोक व घांटावरील लोक व लष्कर व कोंकणांतून (आलेले) मोरोपंत व मावळे असे चौतर्फी चोहोंकडून चालोन खानाचे गोटावरी आले. ही खबर कळोन कुल खानाचे बारा हजार लष्कर धास्त घेऊन अवसान खस्त जालें. इतकियांत राजियाच्या फौजा चौतर्फा मारीत चालले.*' हें काय होत आहे याची खानाच्या लोकांस उमजच पडेना. मराठी फौज आपल्याच मुलुखांत असोन खानाचें सैन्य मात्र अनोळखी जागेंत कोंडलें गेलें होतें. 'मोठें घोरांदर दोन प्रहर युद्ध जाहलें. खानाकडील महदीन व उज-दीन पठाण, रोहिले आणि आरब यांस मारून भुईस रगडून टाकिलें. मोठमोठे वजीर व लष्करी यांना जम निदान करून भांडण दिधलें. मोठें क्षेत्र जाहलें. राजियाचे लष्करी लोकांनीं व मावळे लोकांनीं पाय उतारा होऊन मारामारी केल्या.*' ज्यांनीं दातीं तृण धरिलें त्यांनाच फक्त सोडिलें बाकीच्यांना मराठी तरवारीचें पाणी चांगलेंच दाखविलें. खान पहिल्या धडाक्यांतच मारला गेल्यानें मुसलमानी सैन्याला नेता असा कोणींच राहिला नव्हता. त्यामुळें त्यांची शिस्त अगदींच बिघडून गेली व मराठी सैन्य अगदीं शिस्तीनें व ठरीव कार्यक्रमाप्रमाणें लढलें त्यामुळें मुसलमानांचे तीन हजार लोक या युद्धांत ठार झाले. 'हत्ती तोडिले, कित्येक हत्तींचीं पुच्छें तोडिलीं, कित्येक हत्तींचे दांत पाडिले, कित्येक हत्तींचे पाय तोडिले. तसेंच घोडे एकाच वारानें जिवें मारिले. तसेंच उंटें मारिलीं.

युद्धक्षेत्र.

* सभासद.

मारीत असतां रण अपार पडलें. रक्ताच्या नद्या चालिल्या. रणकंदन ऐसें जालें.*' शामराज पद्मनाभी व त्रिंबक भास्कर प्रधान हे शिवाजीचे दोन मोठे सरदार यावेळीं कामास आले. या एकंदर युद्धाचें आधुनिक शास्त्रीय दृष्टीनें निरीक्षण करून ग्वाल्हेरचे कॅ. मोडक यांनीं एक सुंदर ग्रंथ लिहिलेला आहे तो वाचकांनीं एकवार अवश्य वाचावा.

लूट.

या युद्धांत शिवाजीला लूटहि पुष्कळच मिळाली. तोफा, गाडे, दारूगोळा, तंबू, सामान वाहून नेणारीं तट्टें व इतर सामान अगणित मिळालें. ६५ हत्ती, चार हजार घोडा, १२०० उंट, २००० गठ्ठे कापडाचे आणि रोकड व जवाहीर मिळून दहा लाख रुपये किमतीचें इतकी लूट शिवाजीला मिळाली. विजापुर दरबारचे कांहीं सरदारहि मराठ्यांनीं कैद केले. त्यांपैकीं एक सरदार तर पहिल्या प्रतीचा होता. 'लांबाजी भोंसले, अफजलखानाचे दोन पुत्र, त्याच्या नाटकशाळेचे मुलगे, झुंजारराव घाडगे,' याप्रमाणें मुख्य मुख्य लोक होते. शरण आले ते, बायका, मुलें, भटब्राह्मण, गोरगरीब यांना सोडून देण्यांत आलें. अफजलखानाची बायको व मुलगा फजलखान हे खंडोजी खोपड्याच्या मदतीनें कोयना कांठानें कऱ्हाडकडे पळून गेले. खंडोजीला याबद्दल शिवाजीनें पुढें हातपाय कापून कडक शासन केलें. "राजा खासा प्रतापगडाखालीं उतरोन कुल आपले लोक व अफजलखानाचे लोक त्याचे पुत्र भांडते माणूस होते तितकियास भेटून पोटाशीं धरून दिलासा करून, भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लेंकास चालविलें. पुत्र नाहीं त्यांच्या बायकांस निमे वेतन करून चालवावें असें केलें. जखमी जहाले त्यांस दोनशें होन व शंभर होन, पंचवीस होन, पन्नास होन, दर आसामीस जखम पाहून दिधलें. हस्तकडीं, कंठमाला, तुरे, पदकें, चौकडे, मोत्यांचे तुरे, कित्येकांस बक्षिस दिले. कित्येकांस गांव मोकासे बक्षिस दिधले.* "

११ खानाविषयीं दंतकथाः—अफजलखानाविषयीं अनेक दंतकथा प्रचलित आहेत. अर्थातच त्या त्याच्या मृत्यूनंतर निघालेल्या असाव्यात. खुद्द त्याच्या अफजलपुर गांवींसुद्धां पुढील विलक्षण दंतकथा प्रसिद्ध आहे. तो जेव्हां स्वारीवर निघाला तेव्हांच त्याला आपलें भविष्य दिसूं लागलें कीं, या स्वारींतून आपण सुखरूप परत येणार नाहीं; म्हणून त्यानें निघण्यापूर्वी आपल्या जनानखान्यांतील ज्येसष्ट बिब्यांना कडेलोट

प्रचलित कथा.

* सभासद.

करून ठार मारून टाकिलें व सारख्या आकाराचीं त्यांचीं थडगीं बांधिलीं. हीं थडगीं अद्यापि अफजलपुर गांवीं दिसतात. या कथेंत कितपत तथ्य असेल हें सांगणें दुष्कर आहे. तथापि थडगीं तेथें आहेत एवढें मात्र खरें आहे. हल्लीं ही जागा अगदीं ओसाड पडलेली आहे. जेथें त्याचा राजवाडा पूर्वी होता तेथें आतां दाट जंगल उगवलेलें असून माणसांनीं गजबजलेली ती जागा आतां अगदीं निर्मनुष्य अशी झालेली आहे. इमारतींचे अवशेष मात्र तेथें आजहि दिसतात. तो स्वारीवर निघाला तेव्हां निघतांच त्याचें निशाण मोडलें, हत्ती आंधळा झाला, त्याच्या गुरूच्या दर्शनाला तो गेला तेव्हां गुरूनें त्याला 'या स्वारींत अपयश येणार' असें सांगितलें इत्यादि अनेक दंतकथा हल्लीं सर्वतोमुखीं आहेत. या सर्वांच्या सत्यतेबद्दल मन साशंक होतें हें खरें असलें तरी अबे कॅरे नांवाचा फ्रेंच प्रवासी सन १६७३ मध्यें अफजलपुर पाहण्यास गेला होता. त्यानेंसुद्धां आपल्या प्रवासवृत्तांत, स्वारीवर निघण्यापूर्वी अफजलखानानें आपल्या दोनशें स्त्रिया मारून टाकिल्याचें, स्पष्ट लिहिलें आहे. स्वारींत अपयश येऊन आपण प्राणास मुकलों तर या स्त्रियांनीं परपुरुषाशीं रत होऊं नये या विचारानें अफजलखानानें त्यांचा शिरच्छेद आपल्या समक्ष करविला होता असें हा फ्रेंच प्रवासी म्हणतो. मानवी असूया काय न करील हें सांगणें कठिण आहे !

१२ पोवाडा:—अफजलखानाच्या वधामुळें मराठ्यांना अतिशय आनंद झाला किंवहुना स्वातंत्र्य स्थापनेच्या उषेचा उदयच झाला असें त्यांना वाटलें. अफजलखान हा विजापुरकरांचा मुख्य सरदार असल्यानें त्याच्या नाशामुळें विजापुरकरांचा पूर्णपणें पराजयच झाला. विजापुरकरांकडील मनुष्यवधहि पुष्कळ होऊन त्यांची लूटहि फारच झाली. मराठ्यांच्या इतिहासामध्यें हा प्रसंग मोठा क्रांतिकारक असल्यानें महाराष्ट्र कवींना यावर कवनें रचण्यास स्फूर्ति उत्पन्न झाली आणि ठिकठिकाणीं गोंधळी अफजल-खानाचा पोवाडा मोठ्या आवेशानें म्हणून दाखवूं लागले. राजापासून रंकापर्यंत हा पोवाडा सर्वांस फारच प्रिय झाला व शिवाजी या राष्ट्रीय विभूतीचा हा पहिला पराक्रम सर्वजण मोठ्या आवडीनें वारंवार ऐकूं लागले. विजापुरी दरबारांतील पैज, अफजलखानाचा गर्विष्ठपणा, त्यानें मूर्तीवर केलेले अत्याचार, ज्या मार्गानें तो आला त्या मार्गाचें वर्णन, परस्परांनीं परस्परांकडेस पाठविलेल्या वकीलांचीं भाषणें, दैवी साक्षात्कार, मंत्र्यांची सल्लामसलत, फौजांच्या हालचाली, जिजाबाईचें वीरमातृत्व, शिवाजीचा निश्चय व दूरदर्शीपणा, अफजलखानाचा घमेंडखोरपणा,

मराठ्यांचा हर्ष.

भेटीच्या कचेरीच्या श्रीमंती शृंगाराचें वर्णन, उभयतांची भेट, तेथें झालेली बोलाचाली व शेवटची हातघाई या सर्व प्रकारांचें रसभरित व काव्यमय वर्णन थोडक्या पण ठसकेदार शब्दांत ऐकण्यासाठीं कोणता स्वदेशभक्त उत्सुक होणार नाहीं ? एकंदर पोवाडा संपतांच श्रोत्यांच्या उच्च मनोवृत्ती उचंबळून येऊन जणूं आपण स्वतःच त्या प्रसंगांतील एक व्यक्ती आहोंत असेंच प्रत्येकास वाटत असे. इतका अफजलवधाचा पोवाडा लोकप्रिय झालेला होता व अद्यापिहि आहे.

जशास तसें.

मुसलमानांचे अत्त्याचार व त्यांचा मूर्तिभंजक स्वभाव वारंवार दृग्गोचर होत असल्यामुळें अफजल वधाचा प्रसंग सर्व हिंदूंस व विशेषतः मराठ्यांस मोठा अभिमानास्पद वाटतो. अफजलखान धीट आणि दुष्ट, विश्वासघातकी आणि भयंकर, हिंदुधर्माचा द्वेष्टा व मूर्तिभंजक होता अशी हिंदूंची खात्री पटलेली होती. त्यांच्या दृष्टीनें अफजलाचा वध म्हणजे शिवाजीच्या शहाणपणाचें, धैर्याचें व शरीरचापल्याचें यशस्वी उदाहरण होय. अफजलखानाचा कावा ओळखून त्याचें कुढें त्याच्याच पुढें शिवाजीनें ठेविलें, आणि जो खाडा खणतो तोच त्याच्यांत पडतो ही म्हण खरी करून दाखविली. शिवाजीनें खानाचा खून केला नसून जशास तसें वागून त्याचें पारिपत्य केलें अशीच मराठी बखर लेखकांची बालंबाल खात्री पटलेली होती असें दिसतें.

पन्हाळा सर.

खान व त्याचें सैन्य यांचें पारिपत्य केल्यावर मराठे साहजिकपणेंच विजयानें उत्साहित झाले व त्यांनीं एकदम दक्षिण कोंकण व कोल्हापुर प्रांत यांवर स्वारी करून विजापुरी फौजांचा फडशा उडविला आणि पन्हाळा किल्ला सर केला. परंतु याच सुमारास शिवाजीवर दुसरेंच एक मोठें संकट प्राप्त झालें होतें त्याची माहिति पुढील भागांत देऊं.

मीमांसा.

१३ वध कीं खून:—अफजलखानाला शिवाजीनें ठार मारिलें याबद्दल दुमत नाहीं. पण कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, शिवाजीनें हा खून केला. यांत शौर्य असें मुळींच नाहीं. या आरोपाचाहि विचार आपणांस येथेंच केला पाहिजे. अगदीं त्रयस्थ, निःपक्षपाती व समकालीन इंग्रज लेखकानें या प्रकारानंतर एकच महिन्यानें म्हणजे तारीख १० डिसेंबर १६५९ रोजीं लिहिलेल्या व राजापूर फॅक्टरींत विद्यमान असलेल्या पत्रांत 'शिवाजीशीं मैत्रीचें सोंग करून त्याला कबजांत' घेण्याबद्दल बडेसाहेबिणीनें अफजलखानास हडसून खडसून सांगितल्याचें नमूद केलें आहे. सभासद

आणि दत्ताजीपंत वाकेनिवीस या शिवकालीन लेखकांनींहि अफजलखान कपट करण्यास आला होता परंतु शिवाजीच्या विश्वासराव नानाजीसारख्या हेरांनीं त्याच्या गोटांत जाऊन ही अत्यंत गुप्त बातमी मिळवून आणली व अफजल-खानाचा वकील कृष्णाजी भास्कर यानेंहि जवळ जवळ असेंच सांगितलें असें आपापल्या बखरींतून लिहून ठेविलेलें आहे. या वखर लेखकांना शिवाजीबद्दल कितीहि प्रेम असलें तरी शिवाजीचे दोष त्यांनीं झांकून ठेविलेले नाहींत. चंद्र-रावाच्या खुनाचें त्यांनीं समर्थन केलें नाहीं. तंजावर घेण्यांत शहाजीनें 'बेमानी' केली असें लिहिण्यासहि ते कचरले नाहींत. यावरून अफजलखानाचा खूनच खरोखरी शिवाजीनें केला असता अथवा पहिला वार शिवाजीनेंच केला असता तरीहि हे बखरकार तसेंच लिहून ठेविण्यास कधींहि कमी न करते. अफजल-खानाच्या मनांत कपट होतें व त्यानेंच प्रथम आगळीक करून जमदाड चालविली अशी त्यांची खात्री झाली असल्यानें त्यांनीं तसेंच लिहून ठेविलें आहे व तेंच खरें आहे. विसाव्या शतकांतील विद्वान् लोक राष्ट्रीय पुरुषाच्या दोषांचेंहि वाटेल तसें समर्थन करितात तसा प्रकार बखरलेखकांना ठाऊक नव्हता. जें सरळ दिसलें व बुद्धीला पटलें तेंच त्यांनीं लिहून ठेविलेलें आहे.

शंका समाधान.

जर शिवाजीच्या मनांतून अफजलखानास मारण्याचें नव्हतें तर त्यानें सैन्याची इतकी जुळवाजुळव कां केली ? असें कित्येक विचारतात. याला उत्तर असें कीं, प्रत्येक कार्यकर्ता अशाच सावधगिरीनें वागतो. वाघाच्या शिकारीची तयारी ठेवूनच सशाच्या शिकारीला जातो आणि यांतच त्याच्या भावी विजयाचें बीज व आत्मप्रत्ययाची जाणीव असते. अशी तयारी शिवाजीनें केली नसती तर त्यांत त्याचा वेडेपणा दिसला असता. शिवाय खून, गुप्त कट हे प्रकार पडत्या बादशाहींत होतात. उगवत्या साम्राज्यांत कधींहि होत नाहींत हें कोणताहि इतिहास सांगूं शकेल. विजापुरची बादशाही डबघाईस आली होती व मराठ्यांचें साम्राज्य उदयाचलावर येत होतें अशा स्थितींत अफजलखानाचा झालेला मुत्यु हा खून नसून वधाच्याच सदरांत जातो. या बाबतींत शिवाजीला दोष देण्यासाठीं म्हणून विजापुरच्या इतिहास-कारानें अफजलवधाची घडलेली यथातथ्य गोष्ट लपवून 'शिवाजीनें खानास भोजनास बोलावून विषप्रयोग केला व त्यामुळें त्याला मृत्यू आला' इत्यादि अगदींच बनावट हकीकत लिहून ठेविलेली आहे. त्यावरूनच स्पष्ट दिसतें कीं, विजापुरकरालासुद्धां सरळ मार्गानें शिवाजीला या प्रकरणीं दोष देतां आला नाहीं.

विश्वासघातास प्रवृत्त झालेल्या अफजलखानाशीं शिवाजी अगदीं सरळपणें वागला असता तर इतिहासकारांनीं त्यालाच दोष दिला असता.

खानाचा गैरसावधपणा.

'अफजलखानाच्या मनांतून जर विश्वासघातच करावयाचा होता तर त्यानें त्या बेतानें आपलें सैन्य तयार कां ठेविलें नाहीं ?' असा एक प्रश्न प्रो. रहमान यांनीं विचारलेला आहे. यावर असा जबाब आहे कीं, अफजलखानाचा स्वतःच्या बळावर फाजिल विश्वास व शिवाजीच्या शक्तीचा चुकीचा अंदाज अशीं याला दोन कारणें आहेत. या दोनहि बाबतींत खान गाफिल राहिला. पहिल्याच भेटींत शिवाजीला आपण चिरडून टाकूं व पुढारी मारला गेल्यावर फौज कसली लढते या घमेंडींतच खान राहिला. शिवाय नेताजी पालकर आणि मोरोपंत हे आपआपल्या फौजांनिशी मोठमोठ्या मजली मारून आपल्या जवळ येऊन ठेपले आहेत याची खानाला दादहि नव्हती. या एकंदर गैरसावधगिरीमुळें व फाजिल आत्मविश्वासामुळें खानाचा नाश झाला.

सारांश—

१. खानानेंच प्रथम कपट करण्याचें योजिलें होतें.
२. खान फाजिल आत्मविश्वासानें पछाडला गेला होता.
३. शिवाजीच्या बळाची व तयारीची त्याला कल्पना नव्हती, तरीहि
४. खानानेंच प्रथम आगळीक करून हत्त्यार चालविलें,
५. त्यामुळें हिऱ्यानें हिरा कापावा तसें शिवाजीनें खानास ठार केलें.

असा एकंदर या प्रकरणाचा निष्कर्ष आहे.

प्रकरण ४ थें

युद्धाची धुमश्चक्री

सन १६६०—१६६४

—०—

[१ षाइस्तेखानाची स्वारी. २ पन्हाळ्याचा वेढा. ३ खानाचें पुण्यास अधिष्ठान. ४ खानाची चाकणवर धाड. ५ लढाया व रत्नागिरीकडील विजय. ६ खानाची दुर्दशा. ७ सुरतेचें वर्णन. ८ इंग्रजांचें शौर्य. ९ सुरतेची लूट. १० लुटीचा अंदाज. ११ शिवाजीच्या खुनाचा प्रयत्न. १२ सन १६६४ मधील हालचाली.]

षाइस्तेखानाची स्वारीः—सन १६५९ च्या जुलई महिन्यांत औरंगजेब दुसऱ्यानें तख्तनशीन झाला. याप्रमाणें पादशाहीवर आरोहण करतांच त्यानें एकंदर राज्यकारभारांत बऱ्याच घडामोडी व फेरबदल्या केल्या. त्यांपैकीं एक म्हणजे त्याचा मामा षाइस्तेखान याची नेमणूक दक्षिणच्या सुभ्यावर केली ही होय. षाइस्तेखान हा मोठा हुषार व शूर असा सेनापति होता व त्यानें माळव्यावर उत्तम प्रकारें सुभेदारीचें काम केलें होतें. पूर्वी तो दक्षिणेंतहि कांहीं दिवस सुभेदार होता व तेथेंहि त्याची कारकीर्द यशस्वी झाली होती. नुकतीच थोडे दिवसांवर औरंगजेबानें गोवळकोंड्यावर जी स्वारी केली होती त्यावेळींहि या सरदारानें चांगलीच तरवार गाजविली होती. याच्या पूर्वी दक्षिणेंत राजपुत्र मुअज्झम हा सुभेदार होता. षाइस्तेखानाला दक्षिणेंत सुभेदार नेमण्यांत जे अनेक हेतु औरंगजेबाचे होते त्यांतील शिवाजीला चिरडून टाकावें हाहि एक होता व षाहिस्तेखानाला त्याप्रमाणें स्पष्ट सूचनाहि दिलेल्या होत्या. दक्षिणेंत येतांच त्याच्या सुदवानें विजापुरकरहि त्याला अनुकूल झाले व दोघांनीं मिळून शिवाजीला नाहींसा करण्याचा उपक्रम केला. याप्रमाणें दोन बादशाही फौजा शिवाजीवर चालून आल्यानें शिवाजीलाहि आपल्या फौजांचे दोन भाग करून दोघांच्या तोंडावर पाठवावें लागलें.

योग्यता.

अफजलखानाला ठार करून त्याच्या सैन्याची वाताहत उडवून रुस्तमजमा आणि फजलखान यांना सैन्यासह पराभूत केल्यावर शिवाजीनें कोल्हापुर प्रांतांतील पन्हाळा किल्ला हस्तगत केला व

सीदी जोहर.

रत्नागिरीकडीलहि कांहीं प्रांत स्वराज्यास जोडला; इत्यादि हकीकत अली अदिलशहाला कळतांच तो खवळून गेला व स्वतःच बंडखोर शिवाजीची खोड मोडण्यासाठीं स्वारीवर निघण्याची तयारी करूं लागला. इतक्यांत सीदी जोहराकडून एक विनंति अर्ज विजापुर दरबाराकडेस आला. जोहर हा सीदी जातीचा असून मूळचा गुलाम होता. पण दैवरेषा उमटल्यानें तो एक सरदार बनला व त्यानें विजापुरकरांची सत्ता उघडपणें धाब्यावर बसवून कर्नूलची जहागीर बळकाविली. विजापुरकर त्याचीहि बंडाळी मोडण्याच्या विचारांत होते. इतक्यांत त्यानें शिवाजीच्या धामधुमीचा व अफजलखानाच्या वधाचा फायदा घेऊन विजापुर दरबारास असें कळविलें कीं, "आपले अपराध क्षमा करून आपणांस सरदारी दिल्यास आपण शिवाजीवर स्वारी करून त्याचें पारिपत्य करूं." विजापुर दरबारला ही संधि अनायासेंच मिळाली. कारण शिवाजी व जोहर हे दोघेहि विजापुरकरांच्या दृष्टीनें बंडखोरच होते. त्यांपैकीं एक दुसऱ्यावर जर स्वारी करीत आहे तर अनायासेंच कांट्यानें कांटा निघून जाईल हें उघडच होतें. असा सर्व विचार करून विजापुर दरबारानें सीदी जोहरास 'सलाबतखान' असा किताब देऊन आपला सरदार असें मान्य केलें आणि त्याच्या समागमें मोठी फौज देऊन त्याला शिवाजीवर पाठविलें. ही सीदी जोहराची धाड येतांच थोडक्या चकमकीनंतर मोकळ्या मैदानावर त्याच्याशीं लढण्याचें बंद करून शिवाजी पांच हजार फौजेनिशीं तारीख २ मार्च १६६० रोजीं पन्हाळ्यावर जाऊन बसला. हें पाहून पंधरा हजार सैन्यानिशीं जोहरानें पन्हाळा किल्ल्याला वेढा दिला.

२ पन्हाळ्याचा वेढा:—हा पन्हाळ्याचा वेढा सहा महिने चालू होता. आणि जोहरानें असा कडक बंदोबस्त ठेविला होता कीं, त्या योगें शिवाजीचा कोंडमाराच झाला. बाहेरच्या जगाशीं या सहा महिन्यांत त्याचा सर्वस्वीं संबंध तुटलेला होता. हें पाहतांच शिवाजीनें गुप्तपणें एक पत्र लिहून सीदीची मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न केला. आणि तहाचें बोलणें करण्यासाठीं वारंवार गडावरून खालीं ये जा करावी लागेल येवढ्यासाठीं एक परवाना मागितला. जोहरला तरी विजापुरकरांबद्दल कुठें प्रेम होतें ! शिवाय तो विश्वासघातकी व मूर्खहि असल्यामुळें शिवाजीचा डाव त्याला कळला नाहीं. शिवाजीच्या सहाय्यानें आपण स्वतःच स्वतंत्र पादशाही स्थापूं असे मनोरथ तो रचूं लागला व त्यानें शिवाजीस परवाना वगैरे देऊन त्याच्या सुरक्षिततेची हमीहि घेतली. दुसऱ्याच दिवशीं शिवाजी दोन तीन सरदारांसह

कोंडमारा.

जोहरच्या गोटांत मध्यरात्रीं जाऊन त्याला भेटला. जोहरानें त्याचा चांगलाच आदर सत्कार केला आणि उभयतांच्या मैत्रीच्या आणाशपथा तेथें झाल्या. लगलीच शिवाजी किल्ल्यावर परत आला. वेढ्याचें काम नित्याप्रमाणें चालूच होतें, पण आतां त्यांत चुरशीचें पाणी दिसत नव्हतें. पन्हाळगडच्या वेढ्याच्या समयीं शिवाजी व सीदी या दोघांनींहि इंग्रजांकडून दारूगोळा विकत घेतला होता. शिवाजीनें दारूगोळ्याची किंमत तत्काळ दिली असून सीदीनें मात्र कांहीं तरी निमित्तानें ती देण्याची टाळाटाळ चालविली होती अस इग्रजी व्यापाऱ्यांच्या पत्रांवरून दिसतें. इग्रजांनीं केलेली लेखी तकरार आज आपल्यापुढें आहे, त्यामुळें सीदी इतर व्यापाऱ्यांशीं कसा वागत असे याची चांगली कल्पना आपणांस होते व शिवाजीचा व्यवहार कसा चोख असे हेंहि यावरून स्पष्ट दिसतें.

पावनगडावर मारा.

पन्हाळा हा किल्ला विशाळ व मजबूत असल्यानें तो सहज हस्तगत होणें शक्यहि नव्हतें. पंधरा हजार सैन्यानिशीं सीदीनें जरी किल्ल्यावर एकदांच लगट केली असती तरीहि त्याचा किल्ल्यांत प्रवेश होणें अशक्य होतें. या फौजेंत सीदी जोहराशिवाय अफजलखानाचा मुलगा फजलखान आणि त्याचा मित्र सीदी हलाल हे दोन विजापुरी सरदार होते व ते अफजलखानाच्या वधापासून शिवाजीचे कट्टे शत्रू बनले होते. त्यांनीं आरंभीं आरंभीं माऱ्याचें काम फार जोरानें चालविलें. परंतु शिवाजीनें रात्रीं बेरात्रीं वारंवार विजापुरी फौजांवर जोराचे व निकराचे हल्ले करून शेंकडों माणस कापून काढून या सरदारांना अगदीं हैराण करून टाकिलें. तेव्हां या हल्ल्याच्या कामांत कडतोजी गुजरानें चांगली मर्दुमकी गाजविल्यानें त्याला शिवाजीनें प्रतापराव ही पदवी दिली व सरनौबत केलें. मराठ्यांच्या प्राणघातक हल्ल्यांनीं विजापुरी फौज अगदीं भेदरून गेली व पन्हाळगडचा नाद सोडून त्यांनीं आपला मोर्चा पावनगडाकडेस वळविला व जवळच एका टेंकडीवर तोफा चढवून त्यांनीं पावनगडावर मारा चालविला. किल्ल्याच्या आंत जेव्हां तोफांचे गोळे येऊन पडूं लागले तेव्हां तेथील किल्लेदार घाबरला व त्यानें शिवाजीकडेस फार निकडीनें अधिक फौजेची मागणी केली.

शिवाजी निसटला.

'आतां पन्हाळ्यावर अधिक दिवस घालविणें योग्य नव्हे, कारण पावनगड पडतांच पन्हाळ्याचा वेढा अधिक सख्त होईल व मग येथून निसटणें अशक्य होईल हें जाणून तारीख १३ जुलई १६६० रोजीं रात्रीं निवडक फौजेनिशीं शिवाजी पन्हाळ्यावरून

निघून पावनगडाच्या बाजूला असलेल्या विजापुरी सैन्यावर एकदम तुटून पडला व त्यांची फळी फोडून २७ मैलांवर असलेल्या विशाळगडाकडेस चालता झाला.

महाराष्ट्राची थर्मापिली.

"त्याउपर विशाळगडच्या मार्गें पायीं चालतां चार कोस गड उरला. तों प्रातःकाळ जाली.*" मराठे गजापुर खिंडींत आले. महताबा लावून फार मोठी विजापुरी फौज आपला पाठलाग करीत आहे हें त्यांच्या लक्षांत आलें. यावेळीं, सगळ्या रात्रीच्या पळण्यानें मराठी फौज अगदीं थकून गेली होती. अशा समयीं लढाई देणें अशक्य होतें व विशाळगड अझून आठ मैल दूर राहिला होता. फजलखान सूडाच्या भावनेनें 'घे घे मार' करीत मागाहून येत होता. सगळ्या मराठी साम्राज्याची मूर्तिमंत आशा जो शिवाजी तो अशा संकटांत सांपडला होता. अशावेळीं जिवावर उदार होऊन कांहीं लोक खिंडींत लढण्यास सिद्ध झाले तरच विजापुरी फौज तेथें खिंडींतच अडकून पडेल व शिवाजीस सुखरूपपणें विशाळगडावर जातां येईल. अशा विवंचनेंत शिवाजी असतां "तेसमयीं बाजी प्रभु, देश कुलकर्णी, हिरडस मावळकर, धारकरी, राजे यास म्हणो लागले जे 'तुम्हीं निमे लोक घेऊन गडावर जाणें व तोफेचा आवाज करणें. तोंपावेतों या खिंडीमध्यें आपण निमे मावले घेऊन दोन प्रहर पावेतों पाठीवर फौज येऊं देत नाहीं. साहेबीं निघोन जाणें.*" यावेळीं अधिक विचार करण्यास वेळच नव्हता. तत्काळ शिवाजीनें बाजी प्रभूस जीवितनिरपेक्ष अशा निवडक लोकांसह खिंडींत ठेवून आपण पुढें प्रयाण केलें. या खिंडींत विजापुरी फौजेचा व बाजीचा सामना मोठ्या निकराचा होऊन फजलखानाचे जोराचे तीन हल्ले बाजीनें आपल्या बहादर मावळ्यांच्या साहाय्यानें परतविले. पण या झटापटींत बाजीला प्राणांतिक जखमा झाल्या. तथापि शिवाजी सुखरूप गडावर पोंचल्याच्या तोफा अद्यापि ऐकूं न आल्यामुळें त्या स्वामिनिष्ठ बाजीचा प्राण त्याची कुडी सोडून जाईना. आसन्न मरण स्थितींतहि तो विशाळगडाकडेस आतुरतेनें पाहत होता. "कुल सरदार येऊन खिंडी सन्निध भांडों लागले. बहुत युद्ध केलें. प्रहर दीड प्रहर पावेतों फौजेस खिंड चढों दिधली नाहीं. तों राजे गडावर जाऊन तोफ मोठी सोडून आवाज दोन तीन करितां बाजी प्रभु म्हणों लागले जे 'याउपर जीव गेला तरी कांहीं धोका नाहीं' त्याउपर फौजेतील प्यादे कानडे मागून आले त्याणीं*" बंदुकांच्या मारानें मावळ्यांचा मोड केला. बाजीच्या प्रेताला घेऊन मावळे तेथून निघून गेले व फजलखान

* ९१ कलमीं.

खिंड ओलांडून विशाळगडाखालीं फौजेसह जाऊन उभा राहिला. "परंतु त्या स्थळीं पाणी नाहीं. कोंकण कुवल जागा देखोन याउपर शिवाजी सांपडत नाहीं. येथें अगर पन्हाळा राहिल्यां फौजेवर छापा घालून बुडवील हा विचार करून*" विजापुरी फौजेनें वेढा उठवून परत विजापुरास मोठ्या शहाणपणानें प्रयाण केलें.

अदिलशहाचा संताप.

सीदी जोहराच्या विश्वासघाताची व त्यानें शिवाजीशीं केलेल्या संगनमताची बातमी अली अदिलशहाला कळतांच तो संतापानें अगदीं लाल होऊन गेला आणि सीदी व शिवाजी या दोघांचेंहि पारिपत्य करण्यासाठीं स्वतः तारीख ५ ऑगस्ट १६६० रोजीं विजापुराहून निघून मिरजेस येऊन पोंचला आणि येथून आपली बिनी त्यानें पन्हाळ्यावर पाठविली. आतां यापुढें शहाला थापा देणें अशक्य आहे हें जोहरानें पाहून तारीख २२ सप्टेंबर १६६० रोजीं पन्हाळा आपल्या ताब्यांत घेतला व लागलीच शहाकडून आलेल्या सरदाराच्या हवालीं तो केला. त्यावेळीं मराठी राज्याची दक्षिण सरहद्द पन्हाळा व उत्तर सरहद्द चाकण होतें. दक्षिण सरहद्दीवरील पन्हाळा विजापुरकरांकडेस गेल्यावर सरासरी एकच महिन्यानें म्हणजे तारीख १५ ऑगस्ट सन १६६० रोजीं उत्तर सरहद्दीवरील चाकण किल्ला मोगलांच्या ताब्यांत गेला. त्यासंबंधीचा वृत्तांत आतां कथन करावयाचा आहे.

३ खानाचें पुण्यास अधिष्ठानः—इसवी सन १६६० च्या आरंभीं षाइस्तेखान भल्या मोठ्या फौजेनिशीं दिल्लीहून निघाला. निघतांना त्यानें विजापुरकरांनाहि पत्रें लिहून शिवाजीवर मोहीम करण्यास तयार केलें. म्हणजे दक्षिणेकडून विजापुरकर व उत्तरेकडून आपण अशा दोघांच्या कातरींत शिवाजीचा भुसा उडवून द्यावा असा षाइस्तेखानाचा बेत होता. तारीख २५ फेब्रुवारी १६६० रोजीं खान आपल्या अवाढव्य फौजेसह अहंमदनगराहून निघाला व पुण्याच्या पूर्वेकडील प्रदेश काबीज करीत व तेथें आपलीं ठाणीं बसवीत मोठ्या हुषारीनें व धोरणानें पुण्यापर्यंत येऊन ठेपला. सोनावाडी–सुप्यावरून खान तारीख ५ एप्रिल रोजीं बारामतीस येऊन दाखल झाला. बारामतीहून होळ व तेथून निराकांठानें खानानें शिरवळ गांठलें व तेथून राजगडाभोंवतालचा मुलुख मारण्यास त्यानें आपले सरदारहि पाठविले. शिरवळहून खान शिवापुरास आला व तारीख १ मे १६६० रोजीं खान सासवडास येऊन दाखल झाला.

सासवडास आगमन.

* ९१ कलमीं.

पाइस्तेखान दक्षिणेंत आल्यावर त्याला मराठ्यांनीं आरंभीं अडथळा केलेला दिसत नाहीं. वेळीं अवेळीं कांहीं छापे घालून ते मोगली फौजेचा दाणागोटा लुटण्याचें किरकोळ काम यावेळीं करीत होते. परंतु शिवापुराहून गराड्याला जाणाऱ्या रस्त्यावर मराठ्यांनीं पहिला सामना दिला. तारीख ३० एप्रिल १६६० रोजीं राव भाऊ सिंगाच्या नेतृत्वाखालीं तीन हजार मराठा घोडेस्वारांनीं मोंगलांच्या पिछाडीवर जोराचा हल्ला केला. परंतु त्यांत त्यांस यश आलें नाहीं. सासवडाहून लहान लहान तुकड्या पाठवून खानानें पुरंदरच्या पायथ्याशींच खेडीं लुटण्याचा उपक्रम चालू केला. मराठ्यांनीं त्यांच्यावरहि मारा केला पण अडचणीच्या जागीं मोंगली फौज मोठ्या शौर्यानें लढली. इतक्यांत तिला मागाहून मदतहि येऊन पोंचली. त्यामुळें मराठी फौज वितळून गेली व पुरंदरवरून तोफांचा मारा जोरानें चालू असतांहि मोंगली फौज विजयोन्मादानें पुरंदरपर्यंत चाल करून गेली व सायंकाळीं परत आली. या चकमकींत त्यांचीं पन्नास माणसे मारिलीं गेलीं. नंतर राजवाहा येथें चार दिवस मुकाम करून तारीख ९ मे सन १६६० रोजीं पाइस्तेखानानें पुण्यास अधिष्ठान ठेविलें.

पुण्यास मुक्काम.

४ खानाची चाकणवर धाडः—यावेळीं पुणें हें लहानसें खेडेगांव होतें. तथापि खानानें पावसाळा तेथेंच काढण्याचें ठरविलें. खान पुण्यास येणार हें नक्की समजल्यावर मराठ्यांनीं तेथील व आसपासचा सगळा दाणा गोटा आणि गवत काडी जाळून पुणें अगदीं ओसाड करून टाकिलें होतें. या व्यवस्थेमुळें खानाच्या फौजेस दाणावैरणीची फारच अडचण भासूं लागली. दिवस ऐन पावसाळ्याचे असल्यानें बाहेरून दाणा वैरण आणण्याचीहि सोय नव्हती. कारण नदी–नाले अगदीं तुडुंब भरून जोरानें वाहत होते. या अडचणीचा विचार करून खानानें चाकण येथें मुक्काम करण्याचें निश्चित केलें. अहंमदनगराहून चाकणला दाणा वैरण पुरविणें मोंगली अंमलदारांस शक्य होतें. "चाकण हें शहर वरघाटी असल्यामुळें तें विशेष सोयीचें होतें. शिवाय तें अहमदनगरच्या वाटेवर असल्यामुळें मूळ सन्याच्या तुकडीशीं संबंध ठेविण्यास उपयोगी असून, ठिकठिकाणीं ठेवलेल्या सैन्यावर नजर पोंचवतां येण्याजोगें होतें. तसेंच तेथला किल्लाहि चांगला मजबुतीचा असल्यामुळें तो मराठ्यांच्या हातांत राहूं देणें धोक्याचें होतें. याकरितां त्यानें चाकणचा किल्ला काबीज करण्याचें योजिलें*."

विचार.

---

* भावे षा. मो. ५.

तारीख १९ जून रोजीं खान पुण्याहून निघाला व तारीख २१ जून रोजीं चाकणसमोर येऊन त्यानें वेढ्याच्या कामास सुरुवात केली.

चाकण सर.

चाकणचा किल्ला चौकोनी बांधणीचा असून त्यावर फिरंगोजी नरसाळा हा किल्लेदार होता. खानानें ठिकठिकाणीं सोयीवार जागा पाहून मोर्चे लाविले व ५४ दिवसांनीं बुरुजाचे ईशान्य बाजूस सुरुंगहि नेऊन भिडविला. वरून पाऊस मुसळधार पडत होता व किल्ल्यावरून तोफांचा मारा जोरानें होत होता. त्यामुळें वेढ्याच्या कामीं खानाला फार अडथळा झाला. परंतु शेवटीं सुरुंगानें बुरुजाला एक मोठें भगदाड पाडिलें. पण आंत दुसरा कोट मराठ्यांनीं बांधिला असल्याचें विस्मयकारक वृत्त खानास कळलें. त्या कोटावरून मराठे दगड, काठ्या, वंदुका इत्यादि अनेक साधनांनीं मोंगली फौजेवर मारा करीत होते. परंतु तेवढाहि सोसून मोगल रात्रभर त्या ठिकाणीं चिकाटीनें उभे राहिले. तारीख १५ ऑगस्ट रोजीं सकाळीं मोगलांनीं दोरीच्या शिड्या लावून किल्ल्याचा मुख्य दरवाजा सर केला व शेवटीं सर्व किल्ला खानाच्या ताब्यांत आला, पण यांत मोगली फौजेचा फार नाश झाला. त्यांचे २६८ लोक मेले व ६०० लोक जखमी झाले.

यावेळीं शिवाजी पन्हाळ्यांत अडकलेला होता. त्यामुळें इकडे मोगलांशीं लढण्यास त्याच्याजवळ फौजहि नव्हती. फिरंगोजीनें किल्ला शक्य तों लढवावा व अगदीं निरुपाय होतांच सोडून निघून यावें असें शिवाजीनें त्याला सांगून ठेविलें होतें. स्वामीच्या आज्ञेप्रमाणें फिरंगोजीनें किल्ला फारच शौर्यानें लढविला व शेवटीं दोन दिवस तर प्रत्येक तसूभर जागेसाठीं सुद्धां मोगलांना आपलें रक्त सांडावें लागलें. सरते-शेवटीं हताश होऊन त्यानें किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला. शाइस्तेखानानें फिरंगोजीच्या शौर्याची फार प्रशंसा केली व आपल्या पदरीं मोठ्या पगारावर राहण्याचाहि त्यास आग्रह केला. परंतु त्या निमकहलाल सेवकानें हें म्हणणें मान्य केलें नाहीं. तेव्हां त्याला त्याच्या लोकांसह शिवाजीकडेस जाण्याची खानानें परवानगी दिली.

फिरंगोजीचें शौर्य.

२ लढाया व रत्नागिरीकडील विजयः—चाकण, पन्हाळा या दोन ठिकाणीं मराठ्यांचा या वेळीं पराजय झाला व त्या नंतर पुढील तीन महिने शिवाजीनें राजगडावर स्वस्थ बसून झालेल्या नुकसानीची भरपाई कशी करितां येईल याचा विचार करण्यांत घालविले. यावेळीं कोंकणांत विजापुरकरांचा अंमल अगदींच क्षीणबल झाला होता.

कोंकण.

तेथें अनेक लहान लहान सरदार होते पण त्यांना नेता असा कोणीच नव्हता. ही एकंदर परिस्थिति पाहून कोंकणांतच दंगल उडवून देण्याचें शिवाजीनें ठरविलें.

परेंडा सर.

चाकण सर केल्यावर ऑगस्टच्या शेवटीं षाइस्ताखान पुण्यास येऊन राहिला, आणि बाकीचा सगळा पावसाळा त्यानें नाइलाजानें विश्रांतींत घालविला. चाकण सर करण्यांत त्याचीं नऊशें माणसें कामास आलीं हें पाहून तर त्याची छातीच दडपून गेली व मग दुसरा कोणताहि किल्ला सर करण्याच्या फंदांत तो पडला नाहीं. पावसाळ्यांत स्वस्थ बसल्याबसल्या मात्र विजापुरकरांचा परेंडा किल्ला भलीभक्कम लांच देऊन त्यानें तारीख २० नोव्हेंबर रोजीं मोठें सैन्य पाठवून आपल्या ताब्यांत घेतला.

कल्याणचा वेढा.

सन १६६० च्या एप्रिलपासून इस्माइलखानाच्या हाताखालीं तीन हजार मोगली फौजेनें कल्याणला वेढा दिला होता. परंतु अद्यापपयत त्या फौजेची कांहीं तेथें डाळ शिजली नव्हती हें पाहून सन १६६१ च्या आरंभीं षाइस्तेखानानें कल्याण सर करण्याचें ठरविलें. इस्माइलखानानें कांहीं प्रांत काबीज केला होता त्याच्या संरक्षणासाठीं सलाबतखान दक्षिण्याच्या हाताखालीं बाबाजी भोसले, रघूजी, शंभूजी कावजी आणि बाबाजीराव होनप देशपांडे यांना नेमून खानानें इस्माइलखानाला मोकळें केलें.

संभाजी कावजीचा वध.

यांतील संभाजी कावजी हा मूळचा शिवाजीचा मनुष्य पण तो यावेळीं षाइस्तेखानास मिळाला होता असें दिसतें. याच्या शरीरसामर्थ्याची मोठी तारीफ लिहून ठेवलेली आहे. "घोडा चहूं पायीं धरून तो उचलीत असे. त्यावरून खानानें त्याला मौंजे मलकर येथें ठाणेदार नेमिलें. व त्याला मनसबहि दिली." असला इसम शत्रुपक्षांत असणें योग्य नव्हे हें जाणून शिवाजीनें प्रतापराव गुजराकडून त्याच्यावर छापा घालविला व त्याला ठार केलें.* (तारीख १३ मे सन १६६१).

कारतलबखानाचा पराजय.

षाइस्तेखानाच्या मनांतून कोंकणांत शिवाजीचें नांव निशाणसुद्धां राहूं द्यावयाचें नव्हतें, पण आतांपर्यंतच्या त्याच्या हालचालींनीं तसा कांहीं एक परिणाम झाला नाहीं. त्यामुळें पुष्कळ मोगली फौज कोंकणांत आणून उतरवावी असें त्यानें ठरविलें. सन १६५७ मध्यें औरंगजेबाचें दाराशीं (= जसवंत सिंगाशीं) जें युद्ध झालें त्यांत

---

* ९१ कलमीं.

कार तलबखान नांवाचा एक इसम शौर्य गाजवून पुढें आला होता. यावेळीं तो चार हजारी सरदार होता. त्याच्याबरोबर शाइस्तेखानानें आपल्या पदरचे मुसलमान व रजपूत सरदार व वऱ्हाडांतील माहूरचा जाहागीरदार उदाराम याची विधवा रायबागीण हिलाहि सैन्यासह देऊन कोंकणांत पाठविलें. पुण्याहून लोहगडच्या मार्गानें कार तलबखान भोरघाटाच्या दक्षिणेकडून कोंकणांत उतरला. त्याच्या सैन्याबरोबर तोफा वगैरे अवजड सामान पुष्कळच होतें. आणि या अवजड सामानासह दाट झाडींतून प्रवास करितांना सैन्याला फार आयास होत होते. व शिवाजीची धास्तीहि वाटत होती. याप्रमाणें प्रवास करीत हें सैन्य तुटलेले कडे व अरुंद वाटा यांच्यामध्यें उंबर खिंडीजवळ येऊन पोहोंचलें. आणि या ठिकाणींच शिवाजीनें कार तलबखानाला गांठून हैराण केलें. त्याचा पुढें जाण्याचा व माग परतण्याचा मार्गहि बंद करून टाकिला. अशा स्थितींत कार तलबखानाला तारीख ३ फेब्रुवारी सन १६६१ रोजीं लढाई देण्यास भाग पाडून शिवाजीनें त्याचा पुष्कळ नाश केला. सर्व नाशाच्या वेळीं अर्ध्याचा त्याग करावा या सुभाषिताप्रमाणें कारतलबखानानें आपल्या जवळील सर्व चीजवस्त शिवाजीचे स्वाधीन करून वर बराचसा दंडहि भरून या अडचणींतून आपली सुटका करून घेतली.

कोंकणावर स्वारी.

याप्रमाणें मोगली फौजेवर विजय मिळतांच शिवाजीनें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक भाग नेताजी पालकराच्या हाताखालीं मोगलांचे तोंडावर देऊन दुसरा भाग आपल्याबरोबर घेतला व एकदम कोंकणांत स्वारी करून शहरामागें शहरें काबीज केलीं. दंडाराजपुरीपासून खारेपाटणपर्यंतचा किनाऱ्या लगतचा सगळा विजापुर दरबारच्या ताब्यांतील पट्टा सर करून पन्हाळ्याच्या वाजूला झालेलें नुकसान भरून काढलें. पुढें गोव्यापर्यंतचा प्रदेश शिवाजीच्या ताब्यांत आल्यासारखाच होता. शिवाजीच्या हालचाली अतिशय जलद होत होत्या व कोंकणांतील जमीनदार अगदीं असहाय होते त्यामुळें त्याला अडथळा असा कोठेंच झाला नाहीं. विजापुराकडील मदत येऊन शिवाजीशीं सामना करणें अशक्य जाणून बहुतेकांनीं शिवाजीला खंडणी देण्याचें कबूल केलें.

अधिक विजय.

पुढें निजामपुरावर शिवाजीनें स्वारी केली. तेथून सन १६६१ च्या फेब्रुवारींत दाभोळवर चालून जाऊन दळव्यांना पदच्युत केलें. पूर्वी सीदी जोहरच्या स्वारीच्या वेळीं पल्लीवनाचा राजा जसवंतसिंग यानें सीदीस मदत केली होती. शिवाजी कोंकणांत आला हें ऐकतांच

या राजानें प्रभावल्लीच्या सूर्यरावाजवळ जाऊन आश्रय घेतला. त्याची राजधानी शृंगारपुरास होती. संगमेश्वरचा मुसलमान सुभेदार व इतर ठिकाणचे अधिकारी शिवाजीचें नांव ऐकतांच पळून गेले. पिलाजी नीलकंठ व तानाजी मालुसरे यांना संगमेश्वर हस्तगत करण्यास पाठविलें व सूर्यरावास त्याचा पाठपुरावा करण्यास सांगून स्वतः शिवाजी चिपळूणवरून देवरुखावर घसरला. जातां जातां त्यानें चिपळुणास परशुरामाची यात्राहि केली. शिवाजीच्या विजयी सैन्यानें पुनः राजापुर लुटून तारीख ३ मार्च सन १६६१ रोजीं तें व खारेपाटणपर्यंतचा दक्षिणप्रदेश आपल्या ताब्यांत घेतला. रत्नागिरी प्रांतांतील बहुतेक शहरांनीं शिवाजीला चौथाई देऊन आपलें संरक्षण करून घेतलें.

पल्लीवन काबीज.

इकडे अदिलशाहाकडून शृंगारपुरच्या राजाला तंबी मिळाल्यामुळें त्यानें मराठ्यांच्या फौजेवर एके रात्रीं छापा घातला परंतु तान्हाजीच्या शौर्यामुळें त्याला परत फिरावें लागलें. शिवाजीनें या सुमारास उत्तरेकडेस वळून पल्लीवन काबीज केलें व तेथून पूर्वी पळून गेलेल्या लोकांना परत बोलावून तेथें लागवड करविली. तेथचा मूळचा किल्ला चिरदुर्ग हा दुरुस्त केला आणि पालघरचा किल्ला नवीन बांधिला.

सूर्यराव.

इसवी सन १६५६ मध्यें शिवाजीनें जावळी सर केल्यापासून शृंगारपुरचा राजा सूर्यराव हा अडचणीच्या वेळीं शिवाजीशीं नम्रता दाखवून त्याचें वर्चस्व कबूल करून स्वतःचें संरक्षण करून घेई. परंतु वेळ निघून जातांच आपलें वचन मोडून अदिलशाहाकडेस जाई. अशा या कपटी सूर्यरावाचें पारिपत्य करण्याला आजपर्यंत शिवाजीला अवसर सांपडला नव्हता. परंतु कोंकणांतील विजय संपादन केल्याबरोबर शिवाजीनें अचानकपणें शृंगारपुरावर हल्ला चढवून सूर्यरावाला विस्मयचकित करून सोडिलें. या वेळीं सूर्यराव अगदीं गाफिल होता व त्याचे सरदारहि रजेवर होते. त्यामुळें सूर्यरावाला सकुटुंब पळून जाण्यासहि फार आयास पडले. शिवाजीनें तारीख २९ एप्रिल १६६१ रोजीं शृंगारपुरांत प्रवेश करून तेथें आपला सरदार त्रिंबक भास्कर यास सुभेदार नेमून तें त्याच्या स्वाधीन केलें; आणि जवळच्या प्रचीतगड किल्लयाच्या दुरुस्तीचें काम सुरू केलें.

शिकें.

मराठ्यांनीं ज्या ज्या प्रांतावर स्वाऱ्या केल्या तेथील लोकांना मराठ्यांचें शौर्य, धडाडी, शीघ्र हालचाली, उग्रता इत्यादि गुणांची चांगलीच ओळख पटून मराठ्यांचा दरारा उत्तम प्रकारें बसला होता.

शृंगारपुरचा कारभारी शिर्के याला शिवाजीनें यावेळीं आपल्याकडेस वळवून घेऊन पुढें त्याच्याशीं सोयरीकहि केली. नागरिक ब्राह्मणांना मोठा दानधर्महि केला आणि शृंगारपुरास सर्व स्थिरस्थावर केलें.

बुलाखीचा पराजय.

कोंकणांत याप्रमाणें विजय प्राप्त होत असतां इकडे वर मे सन १६६१ मध्यें कल्याणसारखें मोठें शहर मोगलांनीं काबीज केलें. हें पुढें नऊ वर्षेंपर्यंत मोगलांकडेसच राहिलें. कल्याण परत घेण्यासाठीं शिवाजीनें महाड येथें सन्य जमवून प्रयत्न करून पाहिला परंतु त्यांत यश आलें नाहीं. म्हणून जून अखेरीस तो वर्धनगड येथें येऊन राहिला व सगळा उन्हाळा त्यानें तेथें स्वस्थपणें घालविला. पेण तालुक्यांतील देइरीगड किल्ल्याला यावेळीं मुसलमान सेनापति बुलाखी यानें वेढा दिला होता. म्हणून शिवाजीनें कावजी कोंढाळकराच्या हाताखालीं सैन्य पाठविलें. तारीख २१ ऑगस्ट १६६१ रोजीं कावजीनें हल्ला चढवून चारशें लोकांना कापून काढिलें व बुलाखीला पळवून लाविलें.

नामदार खान.

इ. स. १६६२ च्या आरंभीं शिवाजीच्या हालचाली पुनः सुरू होऊन त्यानें मिऱ्या डोंगरांत नामदार खानावर पहिला हल्ला चढविला व तेथून पेणवर स्वारी केली. परंतु मोगलांची तयारी बरी असल्यानें यावेळीं शिवाजीला फारसें यश आलें नाहीं. सन १६६२ चें सगळें वर्ष व सन १६६३ चे पहिले तीन महिने म्हणजे सुमारें सव्वा वर्ष विशेषतः मोगल सेनापति नामदार खान यानें मराठ्यांच्या हालचालींना बराच पायबंद घातला होता. सन १६६३ च्या मार्च महिन्यांत मोगलांनीं चौल येथें बारा हजार व रहमतपुरास सात हजार घोडेस्वार ठेवून तेथील बंदोबस्त पक्का केला. आणि कल्याण येथेंहि अधिक फौज पाठवून तेथील मजबुती केली. या एकंदर व्यवस्थेचा परिणाम इतकाच झाला कीं, उत्तर कोंकणांत शिवाजीला या दोन वर्षांत कांहीं गडबड करितां आली नाहीं. दक्षिण कोंकण मात्र त्याच्याच ताब्यांत राहिलें. मराठ्यांचा सरनौबत नेताजी पालकर यानें सन १६६३ च्या मार्च मध्यें मोगलांच्या मुलुखांत लुटालूट चालविली; त्यामुळें मोगलांनीं सात हजार घोडेस्वारांनिशीं त्याचा पाठलाग मोठ्या चुरशीनें केला. परंतु अशा आणीबाणीच्या प्रसंगीं मराठा घोडेस्वार एका दिवसांत पन्नास पन्नास मैल सहज निघून जातो हें यावेळीं सर्वांना कळून चुकलें. ही ससेहोलपट विजापुरापर्यंत आली. पुढें अडचणींत नेऊन या फौजेचें पारिपत्य करावें असा नेताजीचा बेत होता असें दिसतें.

पण रुस्तमजमान यानें मोगली सेनापतीस भेटून पुढील बिकट रस्त्यांची माहिती सांगून संकटाचें स्वरूप लक्षांत आणून दिल्यामुळें मोगली फौज येथूनच परत फिरली. या चकमकींत नेताजीचे तीनशें स्वार कामास येऊन तो स्वतःहि जखमी झाला होता.

सारांश.

नेताजीच्या या दिखाऊ पराजयाचें सुद्धां उसनें बरोबर एकच महिन्यानें शिवाजीनें मोगलांच्या प्रसिद्ध सेनापतीला इतक्या जोराचा चपेटा लगावून फेडिलें कीं, त्यायोगें सगळेच स्तंभित होऊन गेले. मोगलांचा दक्षिणचा महा पराक्रमी सुभेदार षाइस्ताखान याला त्याच्याच छावणींत मध्यभागीं शयनागारांत वीस हजार फौजेच्या कड्यांत शेंकडो देहसंरक्षकांसमोर शिवाजीनें जखमी केलें. या वार्तेनें कोण आश्चर्यचकित होऊन जाणार नाहीं ! ! हा विलक्षण बेत रचण्याचें चातुर्य, तो कृतींत उतरविण्याची कुशलता व सिद्धीस नेण्याची कार्यक्षमता यायोगें मोगल दरबारांत शिवाजीच्या अद्भुत सामर्थ्याविषयीं विलक्षण दरारा उत्पन्न झाला. अफजलखानाच्या पारिपत्यानें विजापुरी दरबारास जसा धाक बसला तसाच धाक षाइस्ताखानास लगाविलेल्या चपेट्यामुळें मोगली दरबारासहि बसला.

६ खानाची दुर्दशाः—सन १६६० च्या मे महिन्यांत षाहिस्ताखानानें आपला तळ पुण्यास दिला व चाकण सर केल्यावर ऑगस्ट-मध्यें तो तेथेंच येऊन राहिला, इतका वृत्तांत मागें आलाच आहे. त्यानें पुण्यास शिवाजीच्या लालमहालांतच मुक्काम ठेविला. त्याच्याबरोबर त्याचा जनानखानाहि होता. वाडा लहान असल्यानें बाहेरच्या बाजूस डेरे राहुट्या लावून तेथें खानाचे देहरक्षक, पाहरेकरी, पडघमवाले इत्यादींच्या राहण्याची व्यवस्था केली होती. आणि सिंहगडच्या पायथ्याशीं दहा हजार घोडेस्वारांसुद्धां महाराजा जसवंतसिंग याची छावणी ठेविली होती.

व्यवस्था.

अशा ठिकाणीं प्रवेश करण्यास शौर्य व धडाडी यांच्याबरोबर चपलता आणि धूर्तता यांचीहि फार जरूरी होती. "राजियांनीं...आपले लष्करांत व मावळे हुजूर लोकांत निवड करून, चखोट धारकरी माणूस निवडिले. निवडक हजार माणूस काढिलें. वरकड लष्करामध्यें हजार दोन हजार सडे सडे राऊत फौजेंत निवडिले. शास्ताखान पुण्यास आला ही खबर तहकीक आणविली. आणि राजे राजगडावरून (सिंहगडावरून) सडे होऊन, खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. बावाजी बापूजी

छावणींत प्रवेश.

व चिमणाजी वापूजी देशकुलकर्णी तर्फ खेड हे दोघे बहुत शहाणे व शूर राजियाचे प्रीतिपात्र, हे दोघे बंधु बरोबरी घेतले. राजियांनीं नेताजी पालकर पागा देखील एक फौज केली. शिलेदार व हाशम मावळे मिळोन एक फौज पेशवे (यांची) अशा दोन फौजा शास्ताखानाच्या गोटाबाहेर अर्ध कोशावर दोन तर्फां उभ्या केल्या. (आणि खासा राजे) नबाबाचे गोटांत चालिले.×" सिंहगडाहून निघून रात्र पडण्याच्या सुमाराला ते पुण्यास येऊन दाखल झाले. " बाबाजी वापूजी व चिमणाजी बापूजी खेडकर पुढें चालिले. त्यांचे पाठीवर कुल लोक व राजे चालिले. तांब्राचें दळ थोर. जागां जागां लष्करांत राजियासि 'कोणाचे लोक ? कोण ? कोठे गेले होते ?' म्हणून पुसतात. 'कटकांतील लोक, चौकी पाहन्यास गेलो होतो' असें भाषण बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी बोलत चालिले.× " पुण्यास आल्यावर वाड्यांत प्रवेश कसा व कोठून करावा हा प्रश्न होता. पण तो अगोदरच सोडवून ठेविलेला होता. " माळी पुणेंकर तो फुलें नित्य शास्ताखानास देत होता. त्याचा मेहुणा राजे यापासीं होता. त्याच्या हातें भेद केला. पांचसे होन देऊं केले. लाल महाल तेथें खिडकी बागेमध्यें जावयाची होती. त्यास्थलीं घर माळ्याचें होतें. (राजे यांनीं) रात्रीं येऊन अंबिलवोहोळ तेथें स्वार घोडीं ठेऊन अंबराईंतून पायीं मावले जागां जागां ठेऊन माळी समागमें घेऊन खिडकी समीप खुद्द राजे आले....खिडकी उघडून लाल महालांत गेले.*"

सौम्यिक पर्व.

हा दिवस चैत्र शुद्ध ८ तारीख ६ रमजानचा असल्यानें मध्यरात्रीनंतर अंधार पडलेला होता. हा रोज्याचा महिना, त्यामुळें दिवसभर उपास करून रात्रीं सुग्रास अन्न सेवनानंतर हे लोक स्वस्थ विश्रांति घेत पडलेले असणार हें जाणूनच शिवाजीनें हा दिवस मुद्दाम निवडलेला होता. मराठ्यांनीं वाड्यांत प्रवेश केला तेव्हां मध्यरात्र उलटून गेली असल्यानें मुसलमानी रिवाजाप्रमाणें पहांटेच्या खान्याची व्यवस्था करण्यासाठीं कांहीं बवर्ची (मुसलमान आचारी) उठून चुली वगैरे पेटवून तयारी करीत होते. परंतु मराठ्यांनीं तत्काळ त्यांना कापून टाकिलें. हा गलबला खानाच्या कानावर घालण्याचा प्रयत्न झाला परंतु किरकोळ बाबत म्हणून खानानें झोंपेच्या अंमलांत तिकडे दुर्लक्ष केलें. आंत प्रवेश केल्यावर " दोनशें माणूस त्यामध्यें निवडून खासा राजियानें आंगेंच चिमणाजी बापूजीस सांगोन वाड कटारीनें चिरून आंत शिरले

डेरियांत डेरे, सात बाडाचे फेरे, तितकेहि फाडून चिरून आंत गेले.*" याप्रमाणें शिवाजी आपल्या निवडक लोकांसह खानाच्या जनानखान्यांत शिरला. या परक्या लोकांना तेथें पाहतांच बायका फारच घाबरून जाऊन त्यांनीं मोठाच गलबा केला. इतक्यांत कांहींजणींनीं मोठ्या शहाणपणानें तेथील दिवे मालवून अंधार केला. त्यामुळें फारच गोंधळ उडाला. अंधारांत मराठ्यांनीं सारखी तरवार चालविली; कारण तसें केल्याशिवाय त्यांना दुसरा मार्गच नव्हता. या कापाकापींत न कळत कांहीं बायकाहि मराठ्यांच्या तरवारीला वळी पडल्या. "असें दोन घटका होतें. इतक्यांत सवड पाहून नबाब बायकांतून एकीकडे होऊन तरवारीस हात घालावयासि गेला. ती नदर राजियानें धरून वार केला. खानाचीं बोटें तीन उडालीं. तेव्हां गलबा थोर जहाला.*"

वाद्यांचा गजर.

वाड्यांत उडालेली गड़बड बाहेरच्या लोकांस कळूं नये म्हणून बाहेर असलेल्या शिवाजीच्या लोकांनीं आणखी एक युक्ति केली होती. तारीख ६ रमजान हा दिवस औरंगजेबाच्या राज्यारोहणसमारंभाच्या आठवड्यापैकीं एक असल्यानें त्या निमित्तानेंहि उत्सव चालू होता. या उत्सवांत मोठमोठीं वाद्यें दिवस रात्रींतून दहावीस वेळां वाजवून मोगली सेना आनंद करीत असे. बाहेर असलेल्या शिवाजीच्या लोकांनीं अर्धवट गुंगीनें पेंगलेल्या पाहरेकऱ्यांस यमसदनास पोहोंचवून सरकारी नगारखान्यांत प्रवेश केला व तेथील नगारे वगैरे वाद्यें ते जोरजोरानें वाजवूं लागले. त्यामुळें लालमहालांतील गडबड कोणासच ऐकूं येईनाशी झाली.

फातखान व इतर.

खानाच्या शेजेच्या बिब्यांनीं केलेला आकांत खानाचा वडील मुलगा फातखान यानें ऐकला व तत्काल तो खानाच्या मदतीस तरवार घेऊन धांवून आला. पण मराठ्यांनीं त्याला तेव्हांच लोळविलें. दुसरा एक मोगल सेनापति असाच खानाच्या मदतीस आला पण त्यालाहि मराठ्यांनीं फातखानाच्या भेटीला स्वर्गांत पाठवून दिलें. याप्रमाणें बरीच कापाकापी झाली तेव्हां साहजिकच खानाच्या सगळ्या सैन्यांत ही बातमी पसरून लोक जागे झाले. हें पाहून आतां येथें अधिक वेळ राहणें शहाणपणाचें नाहीं असें सांगून आपल्या लोकांसह शिवाजी एकदम परत फिरला. या धामधुमींत वाड्यांतील एका हौदांत एक दोन मराठे गडी चुकून पडून प्राणास मुकले. बाकीच्या लोकांसह शिवाजी सिंहगडावर परत येऊन दाखल झाला.

मराठे आले कोणीकडून व गेले कोणीकडे याचा कांहींच अंदाज नसल्यामुळें मोगलांनीं पुण्यांतच पुष्कळ शोधाशोध केली पण तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं. षाइस्ताखानाची ही दुर्दशा तारीख ५ एप्रिल सन १६६३ रोजीं रात्रीं झाली.

या सौप्तिकपर्वांत शिवाजीनें पूर्णपणें यश मिळविलें. त्याचा पाठलाग करण्यांतहि मोगलांना कांहीं फायदा झाला नाहीं. या वेळीं मराठ्यांचे

प्राणनाश.

सहा गडी प्राणास मुकले व चाळीस जखमी झाले. आणि शास्ताखानाचा मोठा मुलगा फातखान ठार झाला, दुसरे दोन मुलगे जखमी झाले, स्वतः खानाचीं बोटें तुटलीं, चाळीस माणसें प्राणास मुकलीं, सहा बायका कापल्या गेल्या व आठ जखमी झाल्या. ही हकीकत शिवाजीनेंच एका पत्रांत रावजी पंडितास कळविलेली आहे.

शिवाजीच्या या धाडसानें त्याची कीर्ति फार पसरली. किंवहुना तो देवाचा

खानाची नाचक्की.

अवतार आहे व वाटेल तेव्हां वाटेल तेथें प्रवेश करूं शकतो अशी साधारण जनतेची सहज समजूत झाल्यानें शिवाजीच्या शत्रूला कोठलीहि जागा सुरक्षित नाहीं असें सर्वांना वाटलें. षाइस्ताखान मोगलांच्या दरबारांतील पहिल्या प्रतीचा सरदार असून अमीरुल् उमराव अशी त्याला पदवी होती. तो प्रत्यक्ष औरंगजेब बादशहाचा मामा होता. तथापि या प्रकारामुळें मोगलांच्या दरबारांत त्याची नाचक्की झाली, व बादशहाच्या कुटुंबांतसुद्धां त्याची कांहीं किंमत उरली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे तारीख ६ एप्रिल रोजीं खानाच्या समाधानासाठीं भर-

उपरोधिक भाषण.

लेल्या दरबारांत महाराजा जसवंतसिंगाला पाहून खान टोंचून उपरोधिकपणें त्यास म्हणाला, "काय ! आज महाराजा जसवंतसिंगाला मी येथें जिवंत पाहत आहें ! काल रात्रीं शिवाजीला लालमहालांत पाहतांच मला वाटलें कीं, महाराजा जसवंतसिंगाला दहा हजार लढाऊ रजपूत वीरांसह ठार मारून हा मराठा येथें आलेला असला पाहिजे. कारण जसवंतसिंग जिवंत असेपर्यंत सिंहगडाकडून शिवाजीचें येणें शक्यच नव्हतें. पण महाराजा तर येथें आज माझ्याच समाधानाला दरबारांत हजर ! जसवंतसिंगाच्या गाफिलपणामुळेंच शिवाजीला पुण्यांत प्रवेश करतां आला असें खानाला वाटलें. परंतु वस्तुतः सगळ्यांच्याच गाफिलपणाचा म्हणा, कीं फाजिल आत्मविश्वासाचा म्हणा, तो परिणाम होता, त्यामुळें एकालाच दोष देण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

अमीरुल्उमराव षाइस्ताखान तर दुःख आणि अपमान यांनीं अगदीं मेल्यासारखा झाला व अधिक सुरक्षिततेसाठीं औरंगाबादेस जाऊन राहिला. औरंगजेब या सुमारास हवाफेरासाठीं काश्मीरास जाण्यास निघाला होता. त्याला मे महिन्यांत षाइस्ताखानाच्या दुर्दशेची बातमी मिळाली. त्यालाहि खानाबद्दल अनुकंपा उत्पन्न होण्याच्या ऐवजीं खानाच्या गाफिलपणाचा रागच आला, व शिक्षा म्हणून त्यानें तारीख १ डिसेंबर १६६३ रोजीं खानाची बंगालच्या सुभ्याच्या जागीं बदली केली. जानेवारी १६६४ मध्यें खान बंगालमध्यें जाण्यास निघाला, व त्याचे जागीं शाहजादा मुअज्झम हा दक्षिणचा सुभेदार झाला. यावेळीं औरंगजेबानें खानाची भेटसुद्धां घेतली नाहीं.

सुभ्यांची बदली.

७ सुरतेचें वर्णनः—औरंगाबादेस मोगलांच्या सुभ्याची वर सांगितलेली अदलाबदल होत होती, त्याच वेळीं इकडे गुजराथेंत शिवाजीनें निराळाच व्यूह रचून सर्वांना थक्क करून सोडिलें. शिवाजीच्या या साहसानें तर या पूर्वीच्या त्याच्या शौर्यावरहि कडी केली. तारीख ६ जानेवारी पासून तारीख १० जानेवारी (सन १६६४) पर्यंत त्यानें सावकाशपणें सुरत शहर लुटलें.

साहस.

शिवकालीं हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर सुरते एवढें श्रीमंत असें दुसरें कोणतेंहि बंदर नव्हतें. अरबस्थानांत जाण्याला मुसलमान प्रवासी येथूनच प्रयाण करीत असत. सुरतेचा मजबुत किल्ला तापी नदीच्या दक्षिण तीरावर समुद्रापासून बारा मैलांवर होता. परंतु शहर मात्र अगदींच उघडें होतें. त्याला साधीसुद्धां भिंत नव्हती. शहरांत वसति गरीब लोकांचीच फार असे, व त्यांचीं घरें म्हणजे काड्यामाड्यांचींच केलेलीं असत. मधून मधून श्रीमंतांचे भव्य व मजबूत वाडे बांधिलेले दिसत. सुरतेचे रस्तेहि अरुंद व वांकडे तिकडे होते. तथापि शहर त्यावेळीं अत्यंत संपत्तिमान् म्हणून प्रसिद्ध असे. एकट्या जकातीचेंच तेथलें उत्पन्न सालीना बारा लक्ष रुपये मोगलांना मिळत असे.

वर्णन.

शहराची लांबी रुंदी जवळ जवळ चार चौरस मल असून वसति मात्र दोन लक्ष लोकसंख्येची होती. मुख्य रस्त्यावरून सुद्धां झोंपड्याच दिसत असत. विटांचीं घरें क्वचित्च दृष्टीस पडत. कृत्रिम अगर नैसर्गिक असें कोणतेंच संरक्षण या शहरास नसे. मधून मधून कांहीं दरवाजे

क्षेत्रफळ.

किंवा गोपुरें उभीं केलेलीं दिसत. परंतु तीं फक्त शोभेचींच असत. शहरांत कांहीं ठिकाणीं खंदकहि खणलेले होते. परंतु त्यांत पाणी मुळींच नसल्यानें ते असून नसून सारखेच होते.

पूर्वानुभव.

मंगळवार तारीख ५ जानेवारी सन १६६४ रोजीं सकाळींच शिवाजी गणदेवी येथें येऊन पोचल्याची भीतिजनक वार्ता सुरतेस पोंचतांच लोक अगदीं हवालदिल होऊन गेले. कारण गुजराथेचा मोगल सुभेदार शहाजादा मुरादबक्ष यानें भावाशीं लढण्यासाठीं दिल्लीकडेस जातांना सुरतेच्या प्रजेला लुटल्याला नुकतींच सात वर्षें झालीं असल्यानें लुटलें जाण्याचा अनुभव सुरतकरांस ताजाच होता. शिवाजी पुढें चाल करून येत आहे हें कळतांच लोक भयचकित होऊन बायकांमुलांसह नदी पार पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. श्रीमंत लोकांनीं किल्लेदाराला लांच वगैरे देऊन किल्ल्यांत प्रवेश करून घेतला. इतक्यांत शिवाजी अधिक जवळ येऊन पोंचल्याची बातमी तिसरे प्रहरीं येऊन दाखल झाली. आणि सुरतेपासून पांच मैलांवर येऊन शिवाजीनें मुक्काम केला असें रात्रीं कळलें. या वेळीं इनायतखान हा सुरतेचा फौजदार होता. शिवाजीनें कांहीं दंड घेऊन सुरत लुटूं नये असें बोलणें करण्यासाठीं इनायतखानानें आपला वकील शिवाजीकडेस पाठविला. परंतु शिवाजीनें त्याला आपल्याच फौजेंत अडकवून ठेविलें. हें कळतांच इनायतखान घाबरून गेला. शहराच्या संरक्षणासाठीं पांचशें शिबंदीचा पगार इनायतखान स्वतः घेत असे. परंतु एकहि शिपाई त्यानें नोकरीस ठेविला नव्हता. तो स्वतः भित्रा, लबाड व लोभी होता. आपल्या वकीलास अडकावून शिवाजी जोरानें चाल करून सुरतेवर येत आहे हें कळतांच इनायतखान स्वतः किल्ल्यावर पळून गेला व सगळें सुरत शहर संरक्षणशून्य असें शिवाजीला अनायासेंच सांपडलें.

वसति.

सुरतेची वसति म्हणजे व्यापारी लोकांची. हे लोक मूळचेच द्रव्यलोभी असल्यानें द्रव्योत्पादनाशिवाय इतर कोणत्याच गोष्टीकडेस यांचें लक्ष नसे. याशिवाय बाकीची वसति म्हणजे गरीब कारागीर, नेमनिष्ठ अग्निपूजक आणि सर्प विंचू यांना मारिलें तरीहि जीवहत्या होते असे मानणारे जैन या लोकांची असल्यानें शिवाजीचा प्रतिकार करील असा सुरतेस कोणीहि नव्हता. श्रीमंत व्यापाऱ्यांनीं आपल्या खर्चानें स्वसंरक्षणासाठीं कांहीं शिबंदी आपल्या पदरीं ठेवावी पण तेंहि त्यांनीं केलें नव्हतें. सारांश याप्रमाणें सुरत शहर अगदीं असाहाय्य असें होतें.

८ इंग्रजांचें शौर्यः—या वेळीं सुरतेस इंग्रज व डच यांच्या वखारी होत्या.

इंग्रज.

इंग्रजांना जहाजांत बसून पळून जाणें शक्य होतें. पण त्यांनीं तेथेंच राहून स्वतःचा बचाव करण्याचें ठरविलें. दोघांच्याहि वखारी अगदीं उघड्यावर होत्या; तथापि वाटेल तें झालें तरी आपल्या वखारींचा बचाव करावयाचाच असें या दोघांनींहि ठरविलें. कारण वखारींतील माल व रोकड संपत्ति मागें ठेवून पळून जाणें हें त्यांस नामर्दपणाचें वाटलें.

व्यवस्था.

सर जॉर्ज आक्सडेन हा इंग्रज वखारीचा मुख्य होता. इंग्रजांचा कोणताहि कारभार कौन्सिलच्या मतानें होत असतो. आक्सडेन हा त्या कौन्सिलचा अध्यक्ष होता. वखारीचें संरक्षण करण्याचें कौन्सिलांत ठरल्यावर त्यानें सहा तोफा मिळविल्या. गलबतावरील खलाशी व इतर मिळून २१० लोक वखारींत सशस्त्र असे जमले. हाजी सैयद बेग या श्रीमंत व्यापाऱ्याचा भक्कम वाडा वखारी शेजारींच होता. इंग्रजांनीं छपरावर चार तोफा चढवून चोहों बाजूंचे रस्ते रोखून टाकून त्या वाड्याचेंहि रक्षण करण्याचें ठरविलें. दुसऱ्या दोन तोफा मुख्य दरवाज्याच्या मागच्या बाजूस ठेवून वखारींत जाण्याचा रस्ता अडवून धरिला. तितक्या धांदलींत अन्नपाण्याची जेवढी सामुग्री त्यांना जमवितां आली तेवढी त्यांनीं जमविली. कित्येकांना शिसें गाळावयास लाविलें, कित्येक तुकडे करावयास लागले, कित्येक गोळ्या पाडूं लागले. सारांश निरुद्योगी असा तेथें कोणीच नव्हता. वखारीच्या एका बाजूस मंदिर व दुसऱ्या बाजूस मशीद होती. त्या दोनहि इमारती इंग्रजांनीं ताब्यांत घेऊन वखारीचा विशेष बंदोबस्त बाहेरूनहि केला. नंतर अध्यक्ष आक्सडेन यानें तारीख ६ जानेवारी रोजीं सकाळीं आपली दोनशें लोकांची चिमुकली फौज बड वगैरे वाजवीत सर्व शहरांतून फिरवून आपण शिवाजीशीं सामना करणार असल्याचें जाहीर केलें.

डच.

डच लोकांची वखार इंग्रजांच्या वखारीपासून मैलभर दूर असल्यानें इंग्रज व डच यांना परस्परांस सहाय्य करितां येत नव्हतें. तथापि त्यांनींहि आपल्या संरक्षणाचा असाच बंदोबस्त केला. या दोघांचें उदाहरण पाहून तुर्की आणि आर्मेनियन व्यापाऱ्यांनींहि स्वसंरक्षणाचा निश्चय केला.

९ सुरतेची लूटः—तारीख ६ जानेवारी सन १६६४ रोजीं बुधवारीं

सुरतेस दाखल.

सकाळीं ११ वाजतां शिवाजीनें सुरतेबाहेर बऱ्हाणपुर दरवाजानजीक पूर्वेकडील बागेंत येऊन तंबू राहुट्या ठोकून

मुक्काम केला. त्यापूर्वी एकच दिवस त्याच्या स्वारीची वातमी लोकांत पसरली होती. सारांश इतक्या गुप्तपणें लांव लांव मजली मारून तो नलदुर्ग, माहुली, कोहज या रस्त्यानें जव्हार रामनगरवरून सुरतेस येऊन दाखल झाला होता. आरंभीं शिवाजीजवळ चार हजार निवडक घोडेस्वार होते. पुढें रस्त्यांत त्याला दोन राजे लुटीच्या आशेनें मिळाले, त्यांच्या फौजा व इतर लोक यांसुद्धां त्याच्याजवळ आतां दहा हजार घोडेस्वार जमले होते.

निरोप.

सुरतेस येऊन दाखल होण्याच्या पूर्वदिवशीं म्हणजे मंगळवारीं रात्रीं शिवाजीनें सुरतेच्या फौजदारास व हाजी सैयद वेग, वहरजी वोहरा आणि हाजी कासिम या तीन प्रसिद्ध व श्रीमंत व्यापाऱ्यांस निरोप पाठवून दंडाची रक्कम नक्की करण्यास समक्ष बोलाविलें होतें, व असेंहि सांगून पाठविलें होतें कीं, आपल्या हुकुमाप्रमाणें कोणीहि न आल्यास आपण सुरत शहर लुटून धुळीस मिळवूं. पण एकहि व्यापारी न आल्यानें शिवाजीला सुरत शहर लुटणें भाग पडलें. किल्ल्यावरील लोकांनीं आपणांस अडथळा करूं नये एतदर्थ बरकंदाजांची एक तुकडी किल्ल्यावर पाठवून हल्ला करविला. त्यायोगें किल्ल्यावरील शिबंदी त्या लोकांशींच लढण्यांत गुंतून गेली. परंतु किल्ल्यावरील सुटलेल्या तोफांनीं मराठ्यांची कांहींच हानि न होतां सुरत शहरच अधिक उद्ध्वस्त झालें. तारीख ६ ते ९ जानेवारी म्हणजे बुधवार, गुरुवार, शुक्रवार व शनिवार असे चार दिवस शिवाजीनें सुरत शहर सावकाशपणें लुटलें. या चार दिवसांत त्यानें सुरत शहर जाळून पोळून लुटून उद्ध्वस्त करून टाकिलें.

बहरजी बोहरा.

डच वखारीजवळ वहरजी बोहऱ्याचा मोठा चिरेबंदी वाडा होता. हा बोहरी त्यावेळीं सर्वांत श्रीमंत असल्याबद्दल प्रख्याती होती व याची मालमत्ता ऐंशी लक्षांची होती असें म्हणतात. या बोहऱ्याला लुटून त्याचा वाडा मराठ्यांनीं जमीनदोस्त करून टाकिला. या वाड्यांतून शिवाजीला हिरे, पाचू, माणिक व रोकड द्रव्य तर पुष्कळच प्राप्त झालें. पण चांगलीं टपोरीं अशीं अठ्ठावीस शेर मोत्यें मिळालीं !!

सैयद बेग.

इंग्रजांच्या वखारीजवळ हाजी सैयद बेग या दुसऱ्या श्रीमंत व्यापाऱ्याचे प्रशस्त मकान होतें. तेंहि मराठ्यांनीं दोन दिवस यथेच्छ लुटलें. इंग्रजांची मराठ्यांची या वेळीं थोडी चकमक झाली तींत एक मराठा व दोन इंग्रज घायाळ झाले. शिवाजी इंग्रजांच्या विशेष वाटेस गेला नाहीं, तथापि त्यांनाहि दहशत बसावी म्हणून त्यानें तीन लक्ष रुपये दंडाची

त्यांचे जवळ मागणी गेली. इंग्रजांनीं ही मागणी स्वीकारिली नाहीं व शिवाजीनेंहि तिच्याबद्दल आग्रह धरलेला दिसत नाहीं.

१० लुटीचा अंदाजः—मराठ्यांनीं सोनें, रुपें, मोत्यें, पाचू, हिरे इत्यादि शिवाय इतर कोणत्याहि वस्तूला हात लाविला नाहीं. सुरतेच्या लुटींत सुमारें एक कोट रुपये किंमतीचें जडजवाहीर शिवाजीला मिळालें असा अंदाज आहे. शिवाजीनें कित्येकांचे हात पाय कापले व कित्येकांचीं डोचकीं उडविलीं असें कांहीं इंग्रज लेखकांनीं शिवाजीच्या कौर्याचें उदाहरण म्हणून लिहून ठेविलेलें आहे. या लुटीबद्दल कित्येकांनीं त्याला दोषहि दिलेला आहे व वखारी सुरक्षित राहिल्यानें इंग्रजांनीं आपल्या शौर्याची तारीफहि नमूद करून ठेविलेली आहे. परंतु मोगल हे शिवाजीचे शत्रू होते व त्यांच्या प्रजेला लुटावें, इतरांना त्रास देऊं नये हा शिवाजीचा हेतु इंग्रज, डच, तुर्क, आर्मेनियन यांच्या वखारी न लुटल्यानें व्यक्त होत आहे. आपल्या शौर्यामुळें आपण आपला बचाव केला असें वरील चौकडीपकीं कोणीं कितीहि म्हटलेलें असलें तरी त्यांत तथ्य नाहीं. कारण शिवाजीच्या निवडक दहा हजार घोडेस्वारांपुढें दोनचारशें मशकांचा काय हिशेब होता ? सुरतेस शिवाजी येऊन दाखल झाल्यावर आपणांस फक्त मोगलांच्या प्रजेलाच लुटावयाचें आहे व औरंगजेबाच्या सरदारांना ठार करावयाचें आहे असें त्यानें जाहिरच केलें होतें. यावरूनहि वरील सिद्धान्तासच पुष्टि मिळते. कंपनीचा नोकर स्मिथ नांवाचा एक इंग्रज, मराठ्यांच्या कैदेंत यावेळीं सांपडला होता व इतर कव्यांबरोबर त्याचा उजवा हात तोडावा असा शिवाजीनें हुकूमहि दिला होता, पण हात तोडण्याऐवजीं आपलें डोचकेंच उडवून द्यावें असें त्यानें मोडक्या तोडक्या हिंदींत शिवाजीस सांगितलें व आपली टोपी उतरली. तेव्हां 'हा इंग्रज मनुष्य आहे यास सोडून द्या' असा शिवाजीनें हुकुम दिला व तो वखारींत निघून गेला. या उदाहरणावरूनहि शिवाजीच्या जाहिरनाम्याची सत्यताच प्रतीतीस येते.

एकंदर लूट.

११ शिवाजीच्या खुनाचा प्रकारः—इनायतखान हा सुरतेचा फौजदार भागूबाई प्रमाणें किल्ल्यावर पळून गेला होता हें मागेंच सांगितलें आहे. त्यानें गुरुवारीं तारीख ७ जानेवारी रोजीं सकाळीं एक मारेकरी, शिवाजीशीं तहाचें बोलणें करण्याच्या निमित्तानें पाठविला. त्यानें शिवाजीची भेट घेऊन कांहीं तरी वेडगळ अटी सांगितल्या. त्या ऐकून शिवाजीस राग आला व त्यानें 'असल्या अटी मान्य करावयास मराठे कांहीं

मारेकरी.

इनायतखानाप्रमाणें भागूबाई नाहींत ' असें त्यास स्पष्ट सांगितलें. शिवाजीचे हे उद्गार ऐकतांच तो इसम एकदम जामिया काढून शिवाजीवर धांवून गेला. पण जवळ नंगी समशेर घेऊन पाहरा करीत असलेल्या मराठा गड्यानें तरवारीच्या एकाच झटक्यानें त्या मारेकऱ्याचा जामियाचा हात उडवून दिला. पण त्या मारेकऱ्याचा आवेश इतका जोराचा होता कीं, तो तसाच जाऊन शिवाजीच्या अंगावर पडला. त्यामुळें शिवाजीहि रक्तानें भरून गेला. त्यामुळें इतर लोकांस शिवाजीचा खूनच झाला असें वाटून सगळ्या सुरतेची कत्तल करण्यास मराठे सरसावले. इतक्यांत शिवाजीनें उठून सर्वांचें निवारण केलें व गुन्हेगारास योग्य शिक्षा केल्या.

इनायतखान.

सुरतेच्या रक्षणासाठीं मोगली फौज येत आहे ही वातमी शिवाजीला रविवारीं तारीख १० जानेवारी रोजीं लागली. तत्काळ रात्रीं तो सुरतेहून निघाला व पुनः लांव लांव मजली मारून आपल्या लुटीसह सुरक्षितपणें कोंकणांत येऊन दाखल झाला. शिवाजी निघून गेल्यानंतर एक आठवड्यानें मोंगलांची फौज सुरतेच्या रक्षणासाठीं येऊन दाखल झाली. व ती आल्यावर इनायतखान किल्ल्यांतून वाहेर पडला. त्याला पाहतांच लोकांनीं त्याच्या भित्रेपणावद्दल त्याची छीः थूः करून त्याला शेणमारहि केला. त्यामुळें त्याच्या मुलानें एका हिंदु व्यापाऱ्याला गोळी घालून ठार मारिलें. इंग्रजांच्या वहादुरीची अर्थात्च प्रशंसा झाली. सुरतेच्या लुटीमुळें लोकांचें झालेलें नुकसान भरून येण्यासाठीं औरंगजेवानें सुरतेच्या व्यापाऱ्यांना एक वर्षपर्यंत जकातीची माफी केली, व इंग्रज व्यापाऱ्यांनाहि अर्ध्या टक्याची सूट दिली.

शहाजादा मुअज्झिम.

१२ सन १६६४ मधील हालचालीः—शाइस्ताखान वदलून त्याच्या जागीं शहाजादा मुअज्झम हा दक्षिणचा सुभेदार झाला. परंतु शहाजादा चैनी असल्यामुळें त्याचा सगळा वेळ नाच तमाशे आणि शिकार खेळण्यांत जात असे. त्यामुळें मराठ्यांना आतां थोडीशी स्वस्थता मिळाली होती. महाराजा जसवंतसिंग हा शहाजाद्यावरोवर दक्षिणेंत राहिला होता व तोच सध्यां मुख्य सेनापति होता. सन १६६३ च्या नोव्हेंवरांत त्यानें आपल्या राजपूत सैन्याकडून सिंहगडाला वेढा घालविला. परंतु किल्ला सर करणें हें रजपुतांना कधींहि साधत नसे. कारण किल्ला सर करण्यांत शक्तीपेक्षां युक्तीचीच अधिक जरूरी असे. हा सिंहगडचा वेढा सहा महिने चालू होता, व एके दिवशीं रजपुतांनीं अविचारानें किल्ल्यावर हल्ला चढविला तेव्हां अचानकपणें एक सुरंग उडून हजारों सैनिकांचा नाश झाला. यामुळें

महाराजा जसवंतसिंग व त्याचा मेहुणा भाऊसिंग हाडा यांची वाचाबाची होऊन तारीख २८ मे सन १६६४ रोजीं मोंगली सैन्य वेढ्याचें काम बंद करून औरंगाबादेस निघून आलें.

अहंमदनगरची लूट.

याप्रमाणें मोगलांची धडपड बंद पडली असें पाहून शिवाजीनें भर पावसाळ्यांत अहमदनगर शहर लुटलें. या वेळच्या शिवाजीच्या हालचाली इतक्या जलद व यशस्वी होत्या कीं, त्यायोगें त्याचा दरारा फारच वाढला. त्याच्यांत कांहीं दैवी शक्ति आहे, कोठेंहि जाणें, व कोणताहि प्रांत सर करणें त्याला अशक्य नाहीं. किंबहुना अनेक रूपांनीं तो अनेक ठिकाणीं एकाच वेळीं हजर असतो अशी सर्वत्र समजूत पसरलेली होती. द्रव्य, सत्ता, मनुष्यबळ, फौज व पराक्रम या सर्व बाजूंनीं मराठ्यांचा यावेळीं सारखा उत्कर्षच होत होता.

बसवापट्टणकडील शहाजीचा मृत्यु.

कांहीं पाळेगारांचा बंदोबस्त करण्यासाठीं याच सुमारास शहाजी तिकडेस गेला होता. त्याचा मुक्काम होद्दीगिरी या गांवीं असतां तारीख २३ जानेवारी १६६४ रोजीं तो शिकारीस गेला असतां घोड्याचा पाय भंडोळींत अडकून घोड्यासह तो पडला व तत्काळ त्याचा प्राण गेला. या वेळीं शहाजी सत्तराव्या घरांत गेलेला होता. शहाजीच्या पश्चात् त्याचा धाकटा मुलगा व्यंकोजी हा त्याच्या कर्नाटकांतील सगळ्या जहागिरीचा मालक झाला.

होता. खडकीच्या वाजूला या कुरेशीची नेमणूक झाली होती. परंतु यांच्या देखत मराठ्यांची एक टोळी खिडकींतून किल्ल्यांत गेली, परंतु या कुरेशीनें तिला कांहीं अडथळा केला नाहीं. यामुळें दिलेरखान आणि कुरेशी यांचें वैमनस्य आलें. तें पाहून जयसिंगानें दाऊदखानाला आपल्याजवळ घेऊन त्याच्या जागीं पुरदिलखान व शुभकर्ण बुंदेला यांची नेमणूक केली. परंतु या व्यवस्थेचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण शुभकर्णाचें चित्त वेढ्यांत अगदीं नव्हतें, किंबहुना तो शिवाजीला मदतच करीत असे. इकडे खानानें जयसिंगाच्या फौजेंत निराळीच कारवाई सुरू केली. तो म्हणूं लागला–हा पुरंदर किल्ला कधींच कोणाला सर होणार नाहीं. येथें वेळ, पैसा, माणसें, व्यर्थ दवडण्यांत काय अर्थ आहे ? दाऊदखानाच्या या रडगाण्याचा हेतु असा होता कीं, त्याच्या या नाउमेदीच्या भाषणानें जयसिंगानेंहि जयाविषयीं निराश होऊन दिलेरखानास मदत करण्याचें बंद करावें व असें झालें म्हणजे वेढ्याचा सर्वच भार आपोआप दिलेरखानावर पडेल. या सगळ्या कुचेष्टा बंद करण्यासाठीं जयसिंगानें लुटालुटीच्या कामावर दाऊदखानाचीच योजना करून त्याला आपल्या सैन्यांतून दूर रवाना करून दिलें.

जाळपोळ.

तारीख २५ एप्रील १६६५ रोजीं दाऊदखान सहा हजार फौज व त्याशिवाय राजा रायसिंग शर्जाखान (हा विजापूरी सरदार मोगलांकडेस आलेला होता), अमरसिंग चोंडावत, अचलसिंग कचवाहा आणि जयसिंगाच्या सैन्यापैकीं ४०० स्वार बरोबर घेऊन राजगड, सिंहगड आणि रोहिडा यांच्या आसपासचा प्रांत लुटण्यास व जाळून पोळून बेचिराग करण्यास निघाला. याच वेळीं कुतुबुद्दीनखान व लुदीखान यांनीं हाच प्रांत उत्तरेकडून लुटीत यावें असें जयसिंगानें ठरवून दिलें होतें. दाऊदखानाच्या तुकडीनें ता. २७ एप्रिल रोजीं रोहिडा किल्ल्याच्या आसपास लुटालूट करून पन्नास खेडीं जाळून टाकिलीं. जयसिंग यांचा पाठपुरावा करीतच होता. त्यामुळें तेथें डोंगराच्या आश्रयानें असलेलीं इतर खेडींहि धुळीस मिळालीं, व पुष्कळ शेतकऱ्यांना कदी म्हणून या सैन्यानें आणिलें. जनावरेंहि व इतरहि लूट रगड प्राप्त झाली. येथें एक दिवस मुक्काम करून ही लुटारूंची टोळी तारीख ३० एप्रिल रोजीं अशीच जाळपोळ करीत राजगडाकडेस निघून गेली. राजगडाला वेढा देण्यासारखी या टोळीची तयारी नसल्यानें ती फक्त लूटालूटच करीत होती व किल्ल्यावरील शिवंदी या टोळीस अडथळा करण्यास असमर्थ असल्यानें ही जाळपोळ ती मुकाट्यानें पाहत होती. हा सगळा प्रदेश डोंगराळ असल्यानें ही मोगली फौज रात्रीच्या वेळीं चार मैल मागें

फिरून गुंजणखोऱ्याजवळ एका सपाट मैदानावर मुक्काम करून राहिली. व दुसरे दिवशीं तारीख १ मे रोजीं शिवापुराला निघून गेली. नंतर दाऊदखान स्वतः सिंहगडावर चालून गेला. इतक्यांत लोहगडावर सैन्याची जमवाजमव करून शिवाजी आसपासच्या प्रदेशांत लुटालूट करीत असल्याची बातमी जयसिंगास कळली. तेव्हां लागलीच त्यानें दाऊदखानास पुण्यास परत बोलाविलें व त्याप्रमाणें तो तारीख ३ मे रोजीं येऊनहि पोहोंचला. यावेळेस कुतुबुद्दिनखान पुरखोरें व तसीखोरें येथें लूट करीत होता त्यासहि जयसिंगानें तांतडीनें परत बोलाविल्यावरून तोहि जाऊन दाऊदखानास मिळाला.

चकमक.

मोगल सैन्य दोन टोळ्यांनीं जयसिंगानें पाठविलें. त्या दोनहि टोळ्या चिंचवडावरून तारीख ५ मे रोजीं लोहगडास जाऊन दाखल झाल्या. तों त्यांच्यावर पांचशें मराठे घोडेस्वार व एक हजार पायदळ यांनीं एकदम हल्ला केला. या हल्ल्यांत मोगली फौजेची चटणीच उडावयाची, परंतु जयसिंगानें मोठ्या धूर्तपणानें आपल्या सैन्याचा पाठपुरावा केल्यामुळें निकराच्या चकमकीनंतर मराठ्यांना मागें फिरावें लागलें. याप्रमाणें मराठी फौज निघून गेल्यावर लोहगड, विसापुर, तिकोना आणि तंगई या चोहोंबाजूच्या चार किल्ल्यांमधील प्रदेशांतील खेडीं मोगली फौजांनीं लुटून उद्ध्वस्त करून टाकिलीं. त्याचप्रमाणें वालाघाट व पाईनघाट येथील खेड्यांची तीच अवस्था केली. बरेचसे कैदी पकडून नेले व जनावरेंहि पुष्कळ नेलीं. इतकें झाल्यानंतर कुतबुद्दिनखान पुण्यास गेला व दाऊदखान तारीख १९ मे रोजीं मुख्य फौजेस जाऊन मिळाला.

१२ मराठ्यांचे पराक्रम, किल्ल्याचा बचाव:—मराठेहि या वेळीं पुरंदर किल्ल्याच्या बचावाचा प्रयत्न आपल्याकडून करीत होते. परंतु कुतबुद्दीनखान, दाऊदखान, कुबेदखान हे मोगली सरदार रात्रंदिवस टेहळणीवर असल्यानें मराठी फौज विशेष कांहीं करूं शकत नव्हती. नेताजी पालकरानें एकदां परिंड्यावर मारा करण्याचा प्रयत्न केला, परंतु फार मोठी मोगली फौज त्याच्यावर चालून गेल्यानें तो एकदम निसटून गेला. या धामधुमींत दाऊदखानानें तीनशें कैदी व ३००० गुरें काबीज केलीं, व तो यां सर्वांसह पुण्यास आला.

प्रयत्न.

जयसिंग जेर.

मराठ्यांनीं या वेळीं जयसिंगास अगदीं जेरीस आणिलें होतें. 'पुष्कळ वेळां आम्हांस मराठ्यांच्या हालचालीपुढें अगदीं मेटाकुटीस यावें लागलें,' असें प्रत्यक्ष जयसिंगहि लिहितो. मराठ्यांचें अक-

सारांश, त्यावेळच्या मानानें जयसिंग प्रति भीष्मच असून त्याच्यापुढें शिवाजी म्हणजे अर्जुनासारखा शोभत होता. गेल्या दहा पंधरा वर्षांतच शिवाजीनें पराक्रम गाजवून जगाला आश्चर्यचकित केलें, विजापुर दरबाराला तर त्यानें अगदीं हतवीर्य करून सोडिलें, व दिल्लीच्या मोगलांनाहि खडे चारिले. म्हणून या अर्जुनाचा रेंच उतरण्यासाठीं औरंगजेबानें जयसिंग या भीष्माची इंद्रप्रस्थाहून रवानगी करून दिली.

भीष्मार्जुन.

२ जयसिंगाच्या अडचणीः—शिवाजीवर स्वारी करून त्याला वठणीवर आणणें हें काम कांहीं सोपें नव्हतें. शिवाय आजपर्यंत शिवाजीला जिंकण्यासाठीं म्हणून जे जे गेले ते सर्व त्याच्यापुढें हतवीर्य होऊन पराभूत झाले होते. षाइस्ताखानासारखा नामांकित व पराक्रमी सरदारहि शिवाजीपुढें फिका पडून तेजोहीन झाला. विजापुरच्या अफजलखान, फजलखानासारख्या पराक्रमी सरदारांची शिवाजीनें राळ उडवून दिली होती. सर्व यावनी विजयोन्मादाला दक्षिणेंत मूठमाती देण्यासाठींच जणूं शिवाजी अवतरला आहे कीं काय असें त्यावेळीं सर्वांना वाटूं लागलें होतें. शिवाजी या वेळीं अवघा सदतीस वर्षांचा होता. शौर्य, दूरदृष्टि व राजकारणपटुत्व यांतहि त्यानें कीर्ति संपादन केलेली होती. त्यानें तयार केलेल्या मावळ्यांनीं मोठमोठ्या व्यवस्थित फौजांना तरवारीचें पाणी चाखवून त्यांच्यावर मात केली होती. सारांश शिवाजीच्या शत्रूंचे अपमानास्पद पराभव आणि शिवाजीचे विजयी पराक्रम जयसिंगाला मूर्तिमंत दिसत होते. याशिवाय त्याला दुसरीहि अशी एक भीति वाटत होती कीं, एवढें मोठें मोगली सैन्य घेऊन आपण दक्षिणेंत उतरतांच विजापुर व गोवळकोंडे या दोनहि ठिकाणच्या पादशहांना धास्ती वाटून ते शिवाजीस आपल्या विरुद्ध सामील होतील. या सगळ्या अडचणींचें निवारण करावयाचें असल्यानें जयसिंगाला फार सावधपणा व जागरूकता ठेवावी लागत होती. ' ज्या कामासाठीं मी आलों आहें, त्या कामापुढें रात्रंदिवस एक क्षणहि मला विश्रांति किंवा शांतता मिळत नाहीं.' असें तो वारंवार औरंगजेबास लिहून कळवीत होता. जयसिंगा. या समयीं किती धूर्तता वापरली, कशी दूरदृष्टि ठेविली, किती संधानें संभाळलीं, अनेक बाजूंनीं कशा हालचाली केल्या, नाना तऱ्हेचीं कारस्थानें कशीं रचिलीं आणि आपल्या फौजा युक्तीनें नाचवून शिवाजीला कसें जेरीस आणिलें हें त्याच्या उपलब्ध पत्रव्यवहारावरून चांगलें निदर्शनास येतें.

अडचणी.

शिवाजी व विजापुरकर यांना आपल्याविरुद्ध एक होतां येऊं नये म्हणून जय-

दूरदर्शित्व.

सिंगानें मोठ्या शहाणपणानें या उभयतांच्या दरमियान म्हणजे शिवराज्याच्या पूर्वभागांत आपला तळ दिला. युद्ध-कलेच्या दृष्टीनें ही जागा त्यानें इतकी उपयुक्त निवडली होती कीं, येथून त्याला शिवाजीवर लक्ष ठेवून विजापुरकरांना सहज शह देतां येत होता. जयसिंगानें आपला तळ येथून उठवून कोंकणांत स्वारी करावी असें औरंगजेबानें वारंवार लिहून पाठविलें, परंतु येथें राहूनच शिवाजीवर विजय संपादन करितां आला तर कोंकणांतील त्याच्या नाड्या सहज आंखडतील अशी जयसिंगाची बालंबाल खात्री असल्यानें त्यानें बादशहाच्या पत्रांकडेस मुळींच लक्ष दिलें नाहीं.

४ शिवविरोधकांचा मेळा:—सन १६५७ मध्यें मोगल व विजापुरकर

शत्रुसमूह.

यांच्यामध्यें तह होऊन विजापुरकरांनीं मोगलांस दरसाल खंडणी देण्याचें ठरलें होतें. ही खंडणीची रक्कम कमी होईल तर विजापुरकरांस पाहिजेच होती. आपण ही रक्कम कमी करवितों व बादशहाची मेहेरबानी होईल अशी तजवीज करतों असें मधाचें बोट विजापुरकरांस लावून जयसिंगानें त्यांना आपल्या लगामी लावून घेतलें, व याप्रमाणें विजापुरकर शिवाजीविरुद्ध मोगलांस मदत करण्यास सिद्ध झाले. शिवाजी व विजापुरकर यांच्यांत तळ देणें व विजापुरकरांना आपणांकडेस वळवून घेणें या दोन गोष्टी केल्यानंतर जयसिंग शिवाजीच्या शत्रूंचें एकीकरण करण्याकडेस वळला. त्या सर्व शत्रूंनीं एक होऊन सर्व बाजूंनीं शिवाजीवर एकसमयावच्छेदेंकरून हल्ला चढवावा असा जयसिंगाचा प्रयत्न होता. व दक्षिणेंत येण्याचें ठरल्यापासून जयसिंगानें या कारवाईस प्रारंभहि केला होता. सन १६६५ च्या जानेवारींतच त्यानें फ्रान्सिल व डिग मेलो या दोन पोर्च्युगीज कप्तानांना पत्रें देऊन गोवा, सुरत व मुंबई येथील पोर्च्यु-गीज वखारवाल्यांकडेस पाठवून आरमाराची मदत मागितली. मे १६६५ मध्यें तो औरंगजेबास लिहितो. "आमची फौज पुण्यास असल्यामुळें कोंकणकिनाऱ्याविषयीं शिवाजी अगदीं निर्धास्त आहे. या वेळीं जर गुजराथेकडून एखादें आरमार पश्चिम किनाऱ्यावर येईल तर शिवाजीच्या प्रदेशांतून आपणांस पुष्कळ लूट मिळेल."

जानेवारी महिन्यांतच त्यानें दक्षिणेंतील सरदारांकडेस ब्राह्मण वकील पाठवून

इतर प्रयत्न.

त्यांना शिवाजी विरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. विजापुर-करांना शह देण्यासाठीं कर्नाटकांतील जमीनदारांनाहि त्यानें आपल्याकडेस वळवून घेण्याची खटपट चालविली होती व तिला अंशतः यश

येऊन शिवाप्पा नाईक व बसवापट्टणचा जमीनदार सन १६६५ च्या एप्रिलमध्यें जयसिंगाला येऊन भेटलेहि होते. जयसिंग येत आहे हें कळतांच जव्हारच्या राजानें जानेवारीमध्येंच आपला वकील जयसिंगाकडेस वऱ्हाणपुरास पाठवून 'आपण मोगल सैन्यांत दाखल होण्यास सिद्ध' असल्याचें कळवून ठेविलें होतें. जयसिंगानें त्याची विनंति मान्य करून त्याच्या मुलाला फौजेंत दाखल होण्यास सैन्यासह बोलाविलें होतें. जावळीच्या मोऱ्यांचे वंशज बाजी चंद्रराव व अंबाजी गोविंदराव यांनींहि 'आपणांस द्रव्य मिळाल्यास मोगल सैन्यांत दाखल होण्याची इच्छा' प्रदर्शित केली. जयसिंगानें तत्काळ पसे पाठवून त्यांना बोलावून घेतलें. माणकोजी धनगरहि त्यांच्याच बरोबर येऊन मार्च अखेरीस दाखल झाला. अफजलखानाचा मुलगा फजलखान हा तर शिवाजीचा कट्टा शत्रू. तोहि मोगलांच्या फौजेंत नोकरीस राहिला. जयसिंगाच्या तोफखान्यावर मनुची हा मुख्य होता. त्याच्या मार्फतहि कल्याणच्या उत्तरेकडील कोळीराजे जयसिंगास येऊन मिळाले होते.

लांच.

शिवाजीच्या सरदारांनाहि लांच लुचपत देण्याचा त्यानें प्रयत्न केला व त्यांत त्याला यशहि आलें. आत्माजी व त्याचे दोन बंधु आणि कहर कोळी हे तीन हजार घोडेस्वारांनिशीं पुरंदरचा पायथा संभाळीत होते. हे लांच खाऊन जयसिंगाला अनुकूल झाले. तसेंच राम व हणमंत ह्या प्राचीन पिढीजात सरदारांना इकडील प्रदेशाची चांगली माहिती असल्यानें जयसिंगानें त्यांनाहि आपल्या पदरीं ठेवून घेतलें.

सर्वाधिकार.

या वेळीं जयसिंगानें बादशहाकडून सर्व प्रकारचे अधिकार स्वतःकडे मोठ्या आग्रहानें मागून घेतले होते. आरंभीं फक्त त्याजकडेस समरभूमीसंबंधींचेच अधिकार दिलेले होते. व सगळे मुलकी अधिकार म्हणजे, कोणाला शिक्षा करणें, बढती देणें, कोणाची बदली करणें, पगार वांटणें, जहागीर देणें हे सर्व अधिकार औरंगाबादेच्या सुभ्याकडेस सोंपलेले होते. परंतु घोड्याची लगाम स्वाराच्याच हातीं पाहिजे या न्यायानें हे सगळे अधिकार जयसिंगाच्याच हातीं असणें अवश्य होतें. अहंमदनगर व परिंडा या किल्लयांवरील लष्करानेंहि जयसिंगाच्याच हुकमतींत राहावें असेंहि बादशाही फर्मान जयसिंगानें मागून आणविलें.

तांतड.

तारीख ३ मार्च १६६५ रोजीं जयसिंग पुण्यास पोहोंचला, अर्थात् पावसाळ्याला अद्यापि दोन तीन महिने अवधि होता आणि याच दोन तीन महिन्यांत जयसिंगानें कांहीं हालचाल करणें शक्य

होतें. पावसाळा सुरू झाल्यावर त्याला अगदीं स्वस्थच राहणें भाग होतें. कारण पश्चिम महाराष्ट्रांत पावसाळा जोराचा असल्यानें सैन्याच्या हालचाली अगदीं अशक्य होतात. म्हणून जयसिंगानें एकहि दिवस फुकट न घालवितां सर्व कामें मोठ्या तांतडीनें व लगबगीनें चालविलीं.

समरांगण.

५ रणभूमिः—पश्चिम घाटांच्या नैसर्गिक व अभेद्य भिंतीमुळें दक्षिणेंतील राज्यें त्या दिशेनें अगदीं सुरक्षित होतीं. त्या घाटांत अनेक दऱ्या आहेत. त्यांतून पाण्याचे लहान लहान अनेक ओहोळ निघून गोदावरी किंवा कृष्णेला मिळतात. या दऱ्या पूर्वेकडेस रुंदावत जाऊन विजापुराजवळच्या मैदानांत विलीन होतात. शिवाजीचे दुर्गम किल्ले पश्चिम घाटावरच असून येथूनच तो समोरच्या मैदानांत वारंवार संचार करून शत्रूवर 'गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरूनि पन्नगा झडपी' तसा अकस्मात् झडप घालीत असे.

भूवर्णन.

अहंमदनगरच्या पश्चिमेस ५५ मैलांवर जुन्नर आहे. जुन्नरच्या दक्षिणेस मोगली सरहद्द ओलांडिली कीं इंद्रायणीचें खोरें लागतें. त्याच्या वरच्या बाजूस पश्चिमेस लोहगड व तिकोना हे किल्ले असून मध्यभागीं चाकणचा किल्ला आहे. त्यानंतर भीमेचें खोरें लागतें. याच खोऱ्यांत पुणें वसलेलें आहे. पुढें दक्षिणेकडेस कऱ्हेचें खोरें लागतें. तेथें मैदानांत सासवड व सुपें असून पश्चिम टेंकडीवर सिंहगड, व दक्षिणेकडेस खडकावर पुरंदर असे किल्ले वसलेले आहेत. या टेंकड्यांच्या पलीकडेस निरेचें खोरें लागतें. निरेच्या कांठावर शिरवळ आहे. त्याच्या पश्चिमेस राजगड व तोरणा आणि वायव्य दिशेस रोहिडा आहे. पुण्याच्या वायव्येस लोहगड व दक्षिणेस राजगड हे किल्ले पुण्यापासून सरासरी सारख्या अंतरावर आहेत. सासवडाहून पुरंदर, सिंहगड व राजगड या किल्ल्यांवर उत्तम प्रकारें मारा करितां येतो. आणि सासवडच्या पूर्वेस जें मैदान आहे त्यांत घोडेस्वारांच्या हालचाली उत्तम प्रकारें करतां येऊन विजापुरकरांच्या मुलुखावर चालून जातां येतें. किंवा तिकडून येणाऱ्या फौजेस अडथळाहि करितां येतो. आतांसुद्धां पांच मुख्य रस्ते येऊन सासवड येथेंच मिळतात.

नाकेबंदी.

६ मोगलांचे मोर्चेः—जयसिंगानें एकंदर या भूप्रदेशाचा विचार करून आपल्या छावणीचा तळ सासवडास ठेविला. पुण्याचीहि नाकेबंदी चांगली केली. लोहगडाच्या समोर एक मोर्चा ठोकून जुन्नर वगैरेकडील बंदोबस्त केला. आणि आजूबाजूचा प्रदेश उद्ध्वस्त करण्यासाठीं फौजांच्या तुकड्या मुकरर केल्या. सासवडच्या पूर्वेकडेस शिवाजी व

विजापुरकर यांच्या हद्दी एकमेकांस लागलेल्या होत्या व जवळच सुप्यास मोगलांची बिनी तळ ठोकून बसलेली होती, त्यामुळें पूर्वेकडून जयसिंगास मुळींच भीति नव्हती.

पुण्यास तारीख ३ मार्च सन १६६५ रोजीं जयसिंग येऊन दाखल झाला. आणि लागलीच त्यानें मोर्चे वगैरे कोठें कोठें कसे कसे लावावयाचे हें ठरविलें. कुतबुद्दीनखान नांवाच्या सरदारास सात हजार स्वारांसह उत्तरेस लोहगडाच्या समोर ठेविलें. त्यानें जुन्नरपासून कोंकणपर्यंतच्या प्रदेशाची राखण करावयाची होती. खुद्द लोहगडास तीन हजार फौज ठेवून मजबुती केली. नलदुर्गाजवळहि असेंच सैन्य ठेवून तिकडील नाकेबंदी केली आणि या सर्वांवर देखरेख ठेविण्यासाठीं निराळेंच एक लहानसें सन्य नेमून टाकिलें. चार हजार स्वारांसह एहेतेशामखान यास पुण्याच्या संरक्षणार्थ ठेविलें. पुण्यापासून लोहगडापर्यंतचा रस्ता २८ मैलांचा असून तो फार बिकट आहे. तेथें दोन हजार स्वार नेमून टाकिले. आणि सय्यद अबदुल अजीज यास दोन हजार स्वारांसह शिरवळच्या ठाण्याच्या संरक्षणार्थ नेमिलें. तसेंच दक्षिणेंतून पुरंदरास कांहीं मदत जात असल्यास त्यानें ती अडवावी असेंहि त्यास बजावून ठेविलें होतें. त्याच्याच मदतीला बाजी चंद्रराव, अंबाजी गोविंदराव व माणकोजी धनगर हे दिलेले होते. सुप्याच्या ठाण्यावर सय्यद मुनव्वरखान व इतर कांहीं हिंदु मुसलमान सरदार पूर्वीच नेमून ठेविलेले होते.

व्यवस्था.

७ युद्धाला प्रारंभः—वर प्रमाणें एकंदर सैन्याची व्यवस्था करून पुरंदराला वेढण्यासाठीं तारीख १४ मार्च १६६५ रोजीं जयसिंग पुण्यांतून बाहेर निघाला. परंतु लगेच त्यास कळलें कीं, कुतबुद्दीनखान हा जुन्नरहून येत असलेल्या खजीन्याच्या संरक्षणासाठीं गेला असून खुद्द शिवाजी लोहगडावर येऊन आपली पाठ पुण्याकडेस केव्हां फिरते याची वाट पाहत बसला आहे. अर्थातच त्याला पुण्याच्या नजीक कांहीं दिवस काढावे लागले. त्यानें कुतबुद्दिन यास लवकर परत बोलावून लोहगडावर व तेथें असलेल्या शिवाजीच्या हालचालीवर नीट नजर ठेविण्यास सांगितलें व मग तारीख २३ मार्च रोजीं तेथून पुढें जाण्यास निघून त्यानें लुणीस जाऊन मुक्काम केला. लुणी मुक्कामीं तीन दिवसांत एक लहानशी निवाऱ्याची जागा उभारून तेथें राम व हणमंत यांना तीनशें स्वार व १०० बरकंदाज यांसह ठेवून पुण्याचा रस्ता व इतरहि मार्ग सुरक्षित ठेविण्याविषयीं बजावून सांगितलें.

तयारी.

कूच.

सासवडच्या अलीकडेस एका मुक्कामावर तारीख २९ मार्च रोजीं जयसिंग आला व त्यानें तोफा वगैरे अवजड सामानासह दिलेरखानाला पुढें पाठवून चार मैलांवर थांबण्यास सांगितलें. व आपण स्वतः दुसरे दिवशीं ती टेकडी ओलांडून दिलेरखानाला जाऊन मिळाला. आणि दाउदखानाला पायथ्याशीं ठेवून नंतर सर्व पुढें सरकले. पिछाडीच्या सैन्यानें मागें रेंगाळत असलेल्या लोकांना घेऊन यावें असें ठरवून दिलें होतें.

चकमक.

तारीख ३० मार्च रोजीं सकाळींच दिलेरखान आपल्या बिनीच्या सैन्यासह सासवडास जाऊन जागेची वगैरे व्यवस्था पाहण्यांत गुंतला होता. व तो फिरतां फिरतां पुरंदराजवळ येऊन पोंचला. परंतु तेथें जवळच माचीवर कांहीं मराठे वरकंदाज आधींच जमले होते त्यांनीं खालीं येऊन एकदम या मोगली सैन्यावर हल्ला केला. परंतु या चकमकींत मराठे हरले व दिलेरखानानें माची अखेरीस सर केली. तेथील घरें दारें जाळून मोगली फौजेनें किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्याच्या वाहेर तेथेंच मुक्काम केला. इतक्यांत ही वातमी जयसिंगाला कळली व त्यानें तत्काळ रायसिंग, कीरतसिंग, कुवदखान, मित्रसेन, इंद्रमणि वुंदेला व अशाच इतर सरदारांच्या हाताखालीं तीन हजार स्वार देऊन त्यांना दिलेरखानाच्या मदतीस भरधांव रवाना करून दिलें. कदाचित् ही कुमक आल्यामुळेंहि मराठे बरकंदाज पसार झाले असतील. जयसिंगानें दाऊदखानास एकदम तेथें वोलावून तळावर देखरेख करण्याची आज्ञा केली व आपण स्वतः वेढ्याच्या कामावर देखरेख ठेविण्यास जाण्याची तयारी केली. परंतु दाऊदखानानें दिलेरखानच्या हालचालीची बातमी ऐकतांच जयसिंगाला न भेटतांच परभारें दिलेरखानाकडेस प्रयाण केलें होतें त्यामुळें जयसिंगालाच तळावर राहणें भाग पडलें. कारण तेथें दुसरा कोणीहि जवाबदार सरदार नव्हता. त्यानें तळावर राहून दारूगोळा, मोर्च्यांचें सामान, भिस्ती वगैरे सर्व रवाना करून दिलें होतें.

पुरंदर

दुसरे दिवशीं म्हणजे तारीख ३१ मार्च रोजीं जयसिंगानें तळावरील सर्व सामान सासवड आणि पुरंदर यांच्या मध्यभागीं व्यवस्थित तळ देऊन जाबत्यानें ठेविलें. आणि नंतर तो दाऊदखान व कीरतसिंग यांच्या बाजूला जाऊन वेढ्याची पाहणी करूं लागला. पुरंदर हा एकच एक किल्ला नसून अनेक टेकड्यांवर मजवूत असे अनेक किल्ले बांधून त्यांचा एक किल्ला बनविलेला आहे असें त्याला दिसलें. अर्थात् अशा किल्ल्याला वेढा घालून रसद बंद करणें अगदीं अशक्य होतें.

८ पुरंदरः—सासवडच्या नैर्ऋत्येस सहा मैलांवर टेकड्यांचा एक समूह आहे. त्यांतील सर्वांत उंच टेकडी समुद्रसपाटीपासून ४५६४ फूट व पायथ्यापासून २५०० फूट उंच आहे. पुरंदर हा एक किल्ला नसून भुलेश्वर, रुद्रमाळ, वज्र-गड, मोरगिरि आणि केळणा हे सगळे किल्ले मिळून एक पुरंदरचा किल्ला बनलेला आहे. पुरंदरचा परीघ चार मैलांचा आहे. माचीपासून वर डोंगर तीनशें फूट आहे. आणि दोनहि ठिकाणीं किल्ले आहेत. किल्लयाच्या उत्तरेकडेस शिपायांस राहण्याच्या खोल्या आणि कचेऱ्या आहेत. याच बाजूस पूर्वेकडेस भैरवखिंड आहे. आणि याच खिंडीच्या पूर्वेस सुमारें मैलभर अंतरावर रुद्रमाळ किल्ला आहे.

वर्णन.

किल्लयावरील शिबंदी याच रुद्रमाळावर राहत असून येथून माचीवर चांगला मारा करितां येतो. हा रुद्रमाळ अथवा वज्रगड किल्ला जयसिंगानें प्रथम हस्तगत केल्यामुळेंच मुख्य पुरंदर किल्ला सहज त्याच्या स्वाधीन झाला. या सन १६६५ मध्यें घडलेल्या इतिहासाचीच पुनरावृत्ति इंग्रजांनीं सन १८१७ मध्यें करून पुरंदर मराठ्यांपासून हस्तगत केला.

पुनरावृत्ति.

९ वेढ्यास सुरुवातः—अफगाण फौजेसह दिलेरखानानें पुरंदर व रुद्रमाळ यांच्या मध्यभागीं छावणी दिली. हरिभान व उदयभान गौर हे त्यांच्याबरोबर होते. त्यांच्या पुढें तुर्कतजखान हा तोफखान्याचा मुख्य होता. त्याच्या जवळच जयसिंगानें पाठविलेले कीरतसिंग वगैरे सरदार तीन हजार फौजेसह पुरंदरच्या दिल्ली दरवाजासमोर उभे होते. उजवीकडेस राजा नारसिंग गौर, कर्ण राठोड, नरवरचा जगत्सिंग आणि सय्यद मकबुल आलम यांनीं खंदक खणून तेथें मुक्काम ठोकिला होता. पुरंदरच्या मागील बाजूस परंतु खिडकीच्या समोर दाऊदखान, रायसिंग, सालीहतारखान, रामसिंग (हाडा ?) शेरसिंग राठोर, राजसिंग गौर वगैरे मंडळी मोर्चे लावून बसली होती. याच ठिकाणची उजवी बाजू रसूल बेग रोजबानी व त्याचे साथीदार हे संभाळीत होते. रुद्रमाळेच्या समोर चतुर्भुज चव्हाण हा दिलेरखानाच्या अनुयायांसह उभा ठाकला होता. आणि मागें मित्रसेन, इंद्रमण बुंदेला आणि त्याचे साथीदार हे त्यांची पाठराखणी करीत होते.

प्रारंभ.

याप्रमाणें चोहों बाजूंनीं मोर्चे लावून जयसिंगानें स्वतः पायथ्याशीं येऊन आपला तळ दिला. आसपासच्या सगळ्या टेकड्या मोगली फौजांनीं अगदीं फुलून गेल्या. जयसिंग स्वतः रोज खंदकांत

तोफा.

फिरून लोकांस उत्तेजन देत असे आणि व्यवस्थेवर देखरेखहि करीत असे. अगदीं आरंभीं जयसिंगानें टेकड्यांवर तोफा चढविण्याचें ठरवून अबदुल्लाखान नांवाची तोफ तीन दिवसांनीं रुद्रमाळा समोरच्या टेकडीवर आणून ठेविली. फात लष्कर ही तोफहि आणखी साडे तीन दिवसांनीं वर घेतली. तिसरी हाहेली तोफहि वर चढविली. या तोफांच्या माऱ्यानें रुद्रमाळ बराच ढांसळून पडला. लागलीच जयसिंगानें त्याच्या पायथ्याशीं सुरंग लावण्याची तजवीज चालविली.

गड पडला.

१० वज्रगड घेतलाः—ता. १३ एप्रिल १६६५ रोजीं मध्यान्हीं दिलेरखान याच्या सैन्यानें हल्ला करून रुद्रमाळावरील लोकांस आंतल्या बाजूस हांकून दिलें. या हल्ल्यांत सातजण कामास आले व चौघेजण जखमी झाले. जयसिंगानें ताबडतोब आपले रजपूत पाठवून दिलेरखानाचा पाठपुरावा केला. दुसरे दिवशीं मोगलांनीं माऱ्यास सुरुवात करून माळा लाऊन किल्ला घेण्याचा प्रयत्न सुरू केला. किल्लयावरील शिबंदीनें वरून तोफांचा भयंकर मारा केला. परंतु त्यांचें तेथें कांहीं चाले ना. मोगली फौज किल्लयावर चढली आणि तिनें वरील सर्व लोकांस निःशस्त्र केलें. जयसिंगानें मोठ्या धूर्तपणानें सगळ्या कैद्यांना, त्यांच्या योग्यतेप्रमाणें मान सन्मान करून, मोकळे सोडून आपआपल्या घरीं जाण्यास परवानगी दिली. हेतु हा कीं, पुरंदरावरील बाकीची शिवंदी या योगानें आपणांस सहज वळावी. या झटापटींत मोगलांचे ८० लोक पडले व १०९ जखमी झाले, तेव्हां रुद्रमाळ ताब्यांत आला.

लूट.

११ मोगली फौजेची लुटालूटः—वज्रगड म्हणजे एकंदर पुरंदर किल्लयाचें नाकच होय. किंवा पुरंदर हस्तगत करण्याची ती किल्लीच होती. याप्रमाणें मुख्य किल्ली सर केल्यावर दिलेरखान बाकीचे किल्ले सर करण्याच्या तयारीस लागला. आणि जयसिंगानें स्वराज्यांत लुटालूट करण्याकडेस चित्त वळविलें. असें करण्यांत त्याचे दोन मुख्य हेतु होते. एकतर आपल्याजवळ अगणित फौज आहे म्हणून आपण तिच्याकडून एकेच वेळीं किल्लयास वेढाहि घालूं शकतों व प्रांतांत लुटालूटहि करूं शकतों, हे मराठे व विजापुरकर यांना कळावें. व दुसरा म्हणजे शिवाजीला याप्रमाणें सगळीकडून सळो कीं पळो करून सोडावें.

संशय.

या दोन उघड कारणाशिवाय, तिसरेंहि एक गुप्त कारण असें होतें कीं, मोगल फौजेंत काहीं सरदार फितूर झाले असावेत असा जयसिंगास संशय आला होता. दाउदखान कुरेशी हा अशांपैकीं एक

स्मात् प्रगट होणें, विलक्षण धाडसानें मोगलांवर चालून येणें, रात्रीं बेरात्रीं छापे घालणें, मोगली फौजेस हुलकावण्या दाखवून एकदम गुप्त होणें व फौजेचा रस्ता बंद करणें, जंगलांना आगी लावून देणें यायोगानें मोगली फौजेला मराठ्यांनीं अगदीं हैराण करून सोडिलें होतें. या स्वारींत मोगलांचा नाशहि पुष्कळच झाला.

निश्चय.

वज्रगड सर केल्यावर दिलेरखानानें माचीकडेस मोर्चा वळविला. आणि आपले खंदक किल्ल्याच्या आग्नेय दिशेकडेस पुढें सरकाविले. एके रात्रीं किल्ल्यावरील शिबंदीनें कीरतसिंगावर चालून घेतलें. पण तो स्वतः सावध असल्यानें शिबंदीस परत फिरावें लागलें. दुसऱ्या एका रात्रीं रसूल बेग रोजबानी याच्यावर शिबंदीनें रात्रीं छापा घालून त्याच्या तोफांच्या कानांत खिळे ठोकून त्या निरुपयोगी केल्या. तथापि त्यास मदत पोंचून मराठ्यांस परत फिरावें लागलें. तिसऱ्या दिवशीं पुनः मराठ्यांनीं जोराचा हल्ला करून अधल्या रात्रीं तेथें कामास आलेल्या आपल्या गड्यांचीं प्रेतें घेऊन जाण्यासाठीं निकराची लढाई दिली. मोगलांकडील आठ माणसें या वेळीं कामास आलीं. परंतु वाटेल तें झालें तरी पुरंदर सर करावयाचाच अशा निश्चयानें दिलेरखान तेथें बसल्यामुळें मराठ्यांचा फारसा उपाय चालेना. मोगली फौजेकडून तो या वेळीं अत्यंत सक्तीनें काम घेत होता.

लाकडी बैठक.

१३ पुरंदरचा झगडाः—वर सांगितल्याप्रमाणें जेव्हां मोगलांचे खंदक पुरंदरच्या पायथ्याशीं येऊन भिडले आणि वरील दोन पांढरे बुरूज जेव्हां सुरुंगानें उडून गेले तेव्हां वरील शिबंदीला आणीबाणीचा समय येऊन ठेपला. तिनें वरून मोगली फौजेवर बाण, दारूगोळे तापलेलें तेल वगैरेंचा मारा करून तिचें पाऊल तेथें ठरेना असें करून सोडिलें. याप्रमाणें मोगली फौज हतवीर्य झालेली पाहून जयसिंगानें किल्ल्यावर मारा करण्याची नवीन कल्पना रचिली. पुरंदरच्या समोरच्या बाजूस मोठी लाकडी बैठक तयार करून तीवर तोफा चढवून तेथून मारा करण्याचें ठरविलें. याप्रमाणें बैठक तयार करतांनाहि मराठ्यांनीं त्यांना पुष्कळच सतावून सोडिलें. एक दोन वेळां तर बैठकीचें अर्धवट झालेलें काम मराठ्यांनीं जाळून टाकिलें. तेव्हां सगळी बैठक निराळ्या ठिकाणीं तयार करून तुकड्यातुकड्यांनीं ती ठरलेल्या जागीं बसविण्यांत आली. असें करतांनाहि रूपसिंग राठोड, गिरधर पुरोहित आणि इतर शेंकडो रजपुतांनीं निकराच्या सामन्यांत मराठ्यांना गुंतवून ठेवून बैठकीचें काम तारीख ३० मे रोजीं संध्याकाळच्या सुमारास पुरें केलें.

याप्रमाणें माऱ्याची जागा तयार होतांच किल्ल्याचा बुरुज सहज हस्तगत होईल असें कित्येक रोहिल्या शिपायांस वाटून त्यांनीं संध्याकाळच्याच वेळेला दिलेरखानालाहि न विचारतां एकदम बुरुजावर हल्ला चढविला. हें पाहून किल्ल्यावरील लोकांनीं त्यांचेवर जोराचा मारा करून त्यांस परत पिटाळून लाविलें. इतक्यांत ही वातमी दिलेरखानास कळून त्यानें तत्काळ मदत पाठविली व बुरुजावर जोराचा मारा सुरू केला. दोनहि बाजूंच्या खंदकांतून लोक एकदम बाहेर आले व त्यांनीं शिड्या लावून वर चढून जाण्याचा प्रयत्न जोरानें चालविला. या झटापटींत उजवे बाजूस जयसिंगाच्या ५०० स्वारांचा पथक्या सरदार भूपतसिंग पवार व इतर रजपूत मारले गेले आणि डावे बाजूस बाळकृष्ण सख्तावत आणि दिलेरखानाचे कांहीं अफगाण हे झगडा करीतच होते. त्यांना अचलसिंग व कीरतसिंग यांची मदत येऊन पोंचली. त्यामुळें हा हातघाईचा झगडा फारच जोराचा झाला. परंतु यांत शेवटीं मराठ्यांचे पुष्कळ लोक पडले व त्यांना माघार घ्यावी लागली. मराठ्यांनीं आतां हा सफेत बुरुज सोडून मागें शहाबुरुजावर आपलें ठाणें दिलें आणि तेथून मोगली फौजेवर जोराचा मारा सुरू केला. अशा राक्षसी माऱ्यांत पुढें चाल करणें अशक्य जाणून जयसिंगानें फौजेस तेथेंच खंदक खणून मुक्काम करण्याचा हुकुम केला. नंतर दोन दिवसांत लाकडी ओटा पूर्णपणें तयार करण्यांत आला. त्यावर दोन तोफा चढविण्यांत येऊन तेथून उंचावरून शहाबुरुजावर मारा करण्यास सुरुवात झाली. अर्थात्च मराठ्यांना हताश होऊन तो बुरूजहि सोडून आणखी मागें जाऊन राहावें लागलें. याप्रमाणें खालच्या किल्ल्याचे पांच बुरुज मोगलांच्या स्वाधीन झाले.

घाई.

आतां पुरंदरचा मुख्य किल्ला पडल्यासारखाच होता. पुरंदरच्या वेढ्याच्या सुरुवातीस जयसिंगानें बादशहास पत्र लिहून मोठमोठ्या व पल्लेदार तोफा मागविल्या होत्या. त्याहि याच वेळेस पुरंदरास येऊन पोंचण्याच्या बेतांत होत्या. किल्ल्यावरील शिबंदीहि आतां अगदीं कमी झाली होती. कारण तिच्यापैकीं बरेच लोक लढाईंत आतांपर्यंत कामास आले होते. आणि वेढ्याच्या आरंभींच त्यांचा किल्लेदार मुरार बाजी हा पडला होता.

निराशा.

१४ मुरार बाजीचा पराक्रमः—पुरंदरच्या वेढ्याला प्रारंभ झाला त्याच वेळीं एके दिवशीं दिलेरखान आपले पांच हजार पठाण आणि इतर कांहीं सैन्य यांसह किल्ल्यावर चढून जाण्याच्या तयारींत होता. तें पाहून किल्लेदार मुरार बाजी यानें आपले बरोबर 'निवड करून

मुरार बाजी.

सातशें माणूस घेऊन गडाखाले दिलेलखानावरी आले...(आणि दिलेलखानाच्या फौजेंत) सरमिसळ जाले. मोठें घोरांदर युद्ध जहालें. मावळे लोकांनीं व खासा मुरार बाजी यांनीं निदान करून भांडण केलें. पांचशें पठाण लष्कर ठार जहालें. खासा मुरार बाजी परभु दिलेलखानाच्या देवडी पावेतों साठी माणसानिशीं मारीत शिरले. दिलेलखान देवडी सोडून माघारा जहाला. आणि लोकांस सांगून तोफखाना व तिरंदाज बरच्या व आड हत्यारी एक हजार लोक यांजकडून मार करविला. त्यांमध्यें साठी लोक पडले. मुरार बाजी परभु यांनीं ढाल फिरंग घेऊन दिलेलखानावरी चालोन आले. महाराजांचे नांवाजलेले लोक ते खर्च जहाले आतां तोंड काय दाखवावें ? म्हणोन नीट चालोन जावें असें मनांत आणोन खानाशीं गांठ घातली. तेव्हां दिलेलखान बोलिला जे, 'अरे तूं कौल घे. मोठा मर्दाना शिपाई, तुज नांवाजितों.' ऐसें बोलतां मुरार बाजी बोलला जे, 'तुझा कौल म्हणजे काय ? मी शिवाजी राजाचा शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय ?' म्हणून नीट खानावरी चालिला. खानावर तरवारीचा वार करावा तों खानानें आपले आंगें कमाण घेऊन, तीर मारून पुरा केला. तो पडला. मग खानानें तोंडांत आंगोळी घातली कीं, 'असा शिपाई खुदानें पैदा केला.' मुरार बाजी बरोबर तीनशें माणूस ठार जहाले. वरकड चारशें माणूस गडावर परत गेले....किल्ल्याचे लोक मुरार बाजी पडला म्हणोन गणना न करितां शरतीनें भांडूं लागले. 'एक मुरार बाजी पडला तरि काय झालें ? आम्हीं तैसेच शूर आहों. ऐशीं हिंमत धरून भांडतों'."*
(मुरार बाजीचा रण यज्ञ तारीख ३० मार्च १६६५ रोजीं झाला असावा.)

१५ तहाची वाटाघाट:—आतां किल्ल्यावरील शिबंदी अगदींच विरळ होऊन गेली होती. गेल्या दोन महिन्याच्या सतत लढाईनें लोकहि अगदीं मेटाकुटीस आले होते. मोगली फौज लुटालूट करून जाळपोळहि करीतच होती. पांचहि बुरुज मोगलांच्या ताब्यांत जाऊन सगळीं मराठी कुटुंबें मुख्य पुरंदरावर येऊन राहिलीं होतीं. पुरंदर सर करण्याचा जयसिंगाचा पक्का निश्चय व्यक्त होत होता व तो निश्चय सिद्धीस जाण्यास आतां फक्त थोडक्याशा अवकाशाचाच प्रश्न होता. किल्ल्यावर मदत पाठविणेंहि शिवाजीला शक्य नव्हतें. अशा स्थितींत लढाई चालू ठेवणें म्हणजे किल्ल्यावरील बायकापोरांचे हाल करणें व प्रसंगीं त्यांच्या बेअब्रूसहि कारणीभूत होण्यासारखें होतें. हा सगळा विचार शिवाजीपुढें यावेळीं उभा राहिला.

चर्चा.

---

* सभासद.

बोलाचाली.

जयसिंग पुण्यावर चालून येत आहे हें कळतांच आरंभापासूनच शिवाजीनें आपले वकील त्याच्याकडेस पाठविण्याची सुरुवात केली होती. परंतु जयसिंगानें तिकडेस मुळींच लक्ष दिलें नाहीं. जयसिंग पावळास येऊन पोंचला तेव्हांहि शिवाजीचा वकील त्यास भेटला. पण त्यालाहि जयसिंगानें दाद दिली नाहीं. नंतर एक लांबलचक हिंदी पत्र लिहून तें शिवाजीनें कर्माजी नांवाच्या विश्वासू वकिलाबरोबर जयसिंगाकडेस पाठविलें. तें पत्र जयसिंगानें वाचावें अशी कर्माजीनें विनंति केल्यावरून जयसिंगानें तें वाचून पाहिलें. त्यांत शिवाजीनें असें लिहिलें होतें कीं, 'मोगलदरबाराशीं आपण राजनिष्ठेनें वागूं आणि विजापुरकरांविरुद्ध आपण मोगलांस मदत करूं.' यावर जयसिंगानें 'शिवाजीला जीविताची जर आशा असेल तर त्यानें प्रथम मोगलांच्या नोकरींत शिरावें' असें उत्तर पाठविलें होतें. याप्रमाणें सलूखाच्या वाटाघाटी चालत होत्या; परंतु आतांपर्यंत नक्की असें कांहींच ठरलें नव्हतें.

निरोप.

तारीख २० मेच्या सुमारास शिवाजीनें पुनः एकदां आपला सर न्यायाधीश रघुनाथ बल्लाळ यास जयसिंगाकडेस पाठविलें. तेव्हां जयसिंगानें स्पष्टच सांगून पाठविलें कीं, 'शिवाजीनें प्रथम अगदीं बिनशर्त शरण यावें आणि मग त्याला मेहरबानी दाखविण्याचा आपण विचार करूं.' अर्थातच यानंतरहि कांहीं दिवस तसेच गेले. परंतु तारीख २ जून रोजीं खालचा बुरूज पडल्यावर आतां तहाची वाटाघाट लांबविण्यांत अर्थ नाहीं असें शिवाजीस स्पष्ट दिसूं लागलें. त्यानें पुनः जयसिंगाकडेस वकील पाठवून तहाच्या नवीन अटी कळविल्या व असेंहि सांगून पाठविलें कीं, 'या अटी जर अमान्य असल्या तर आपण अदिलशहास मिळून कोंकणांत जाऊन मोगलांशीं लढण्याची तयारी करूं.'

निश्चय.

शिवाजीशीं कोणत्याहि तऱ्हेनें तहाची वाटाघाट करावयाची नाहीं असें औरंगजेबानें जयसिंगास स्पष्टपणें बजावून ठेविलें होतें. तथापि वरप्रमाणें निरोपानिरोपी चालूच होती. शेवटीं 'आपण तुमच्या भेटीस समक्ष येतों. मात्र आपल्या अटी न जुळल्या तर मला सुरक्षितपणें परत जाऊं द्यावें' असें शिवाजीनें जयसिंगास कळवून त्याची भेट अत्यंत गुप्तपणें घेण्याचें ठरविलें.

भेट.

१६ शिवाजी व जयसिंग यांची भेटः—तारीख ९ जून रोजीं रघुनाथ बल्लाळ परत आला. आणि 'दुसरे दिवशीं शिवाजी जयसिंगाच्या भेटीस येईल' असें त्यानें तारीख १० जून रोजीं जयसिंगास सांगून पाठविलें. तारीख ११ रोजीं सकाळीं नऊ वाजतां जयसिंग

आपल्या तंबूंत कांहीं खलबत करीत वसला असतां शिवाजी पालखींत वसून सहा ब्राह्मण वरोवर घेऊन सडाच भेटीस आल्याची वर्दी रघुनाथ बल्लाळानें येऊन सांगितली. जयसिंगानें तत्काळ उदयराज व उग्रसेन कचवाहा यांना सामोरे पाठवून 'सगळे किल्ले आपल्या स्वाधीन करण्यास शिवाजी तयार असल्यास त्यानें भेटीस यावें, हें कवूल नसल्यास परत जावें' असें सांगून पाठविलें. शिवाजीनें सर्वसाधारणपणें हें म्हणणें कबूल केलें व वरोवर दोनच सरदार घेऊन तो पुढें येण्यास निघाला. तंबूच्या दाराशीं जयसिंगाचा मुजुमदार त्याला सामोरा येऊन त्यानें शिवाजीला आंत जयसिंगाजवळ नेलें. जयसिंग स्वतः उठून दोन पावलें सामोरा आला, त्यानें शिवाजीस भेटून आलिंगन दिलें व आपल्याजवळ वसविलें. भोंवतालीं सशस्त्र रजपूत जयसिंगाच्या रक्षणासाठीं उभे राहिले होते.

यावेळीं जयसिंगानें दुसरीहि एक युक्ति योजून ठेविली होती. शिवाजी भेटीस येणार हें त्यास निश्चित कळल्यामुळें त्यानें आपला तंबू अशा ठिकाणीं ठोकला होता कीं, तंबूंत वसल्या वसल्या पुरंदरावर चाललेल्या हल्ल्याचा देखावा स्पष्ट दिसावा. इकडे दिलेरखानास त्यानें असें सांगून पाठविलें होतें कीं, आपल्याकडून इशारत येतांच एकदम पुरंदरावर हल्ला चढवावा. तोंपर्यंत नुसत्या तयारीनें असावें. अशी एकंदर सिद्धता ठेवून शिवाजी येऊन वसतांच जयसिंगानें दिलेरखानास इशारत केली. तत्काळ त्यानें पुरंदरावर हल्ला चढविला. वरील शिवंदीनेंहि जोराचा प्रतिकार केला. पण त्यांत त्यांचीं ऐशीं माणसें पडलीं व त्यांस माघार घ्यावी लागली. जयसिंगाच्या तंबूंतून हा सर्व प्रकार शिवाजी प्रत्यक्ष पाहतच होता. अशा रीतीनें निष्कारण मनुष्यहानि होणें वरोवर नाहीं असें त्यास वाटलें. व असें वाटावें म्हणूनच जयसिंगानें ही योजना करून ठेविली होती. पुरंदर ताब्यांत देण्याचें शिवाजीनें एकदम कबूल केलें. जयसिंगानें तत्काळ मीरतुजुक व गाजीबेग यांना दिलेरखान व कीरतसिंग यांचेकडेस पाठवून हल्ल्याचें काम थांववून वरील फौजेस सुरक्षितपणें निघून जाऊं द्यावें असें सांगून पाठविलें. शिवाजीनेंहि गाजीबेग बरोबर आपला एक सरदार पाठवून पुरंदर खाली करून द्यावा असें वरील लोकांस सांगून पाठविलें. वरील लोकांनीं विश्रांतीसाठीं एक रात्रीची मुदत मागून घेतली.

युक्ति.

१७ पुरंदरचा तह १६६५:—जयसिंगास भेटण्यासाठीं शिवाजी सडाच आल्यानें मोगलांच्या तळावर त्याचा मुक्काम जयसिंगाच्या तंबूंतच ठेवण्यांत आला. शिवाजीबरोबर सामानसुमान

तह.

असें कांहींच नव्हतें. तहांतील कलमावद्दल उभयतांची मध्यरात्रीपर्यंत वाटाघाट चालली होती. पुरंदर पडल्यामुळें परस्परांस परस्परांच्या बळावळाची योग्य कल्पना झाली होती. त्यामुळें जयसिंग कोणत्याच बाबतींत मागें घेण्यास् तयार नव्हता. अखेरीस २३ किल्ले आणि त्या खालचा ४ लक्ष होन उत्पन्नाचा मुलुख बादशहास देऊन राजगडासह १२ किल्ले व एक लक्ष होन उत्पन्नाचा मुलुख शिवाजीकडेस ठेवावा आणि याच्या मोबदला शिवाजीनें बादशहाची चाकरी करावी असें ठरलें.

अटी.

बादशहाच्या दरबारांत इतर सरदार ज्याप्रमाणें प्रत्यक्ष राहून नोकरी करितात त्याप्रमाणें आपणांस नोकरीसाठीं दरबारांत राहणें भाग न पाडावें व आपणांऐवजीं आपल्या मुलाकडून नोकरी घ्यावी असें शिवाजीनें ठरवून घेतलें. उदेपूरच्या राण्यालाहि अशाच तऱ्हेची मेहेरबानी दाखविलेली होती. या वेळचें शिवाजीचें मागणें पुढीलप्रमाणें होतें:—"आजपर्यंत मी वेडेपणानें वागून राजद्रोह केला, त्यामुळें बादशहास मला तोंड दाखविण्यास शरम वाटते. तथापि पांच हजार स्वारांसह माझा मुलगा बादशहाच्या दरबारांत राहून चाकरी करील अशी तजवीज मी करीन. त्याच्या इभ्रतीप्रमाणें त्याला जहागीर मिळावी. मी स्वतः बादशहाचा गुन्हेगार असल्यानें मला जहागीर वगैरे कांहीं देऊं नये व मजजवळून ठरीव चाकरीची अपेक्षाहि करूं नये. तथापि दक्षिणेंत जेव्हां जेव्हां युद्धाचा प्रसंग येईल तेव्हां तेव्हां मला सोंपविण्यांत येणारी लढाईंची कामगिरी मी बिनबोभाट पार पाडीन." शिवाजीनें आणखीहि एक अट अशी घातली होती कीं, 'विजापूरच्या राज्यांतील जेवढा प्रांत औरंगजेबास जिंकावयाचा आहे तेवढा जिंकिल्यावर तळ कोंकणांत चार लक्ष व वरघाटी पांच लक्ष होनाच्या उत्पन्नाचा मुलुख आपणांस बादशहाकडून फर्मानानें मिळाला तर तेरा वर्षांत चाळीस लक्ष होन आपण बादशहास हप्त्याहप्त्यानें भरणा करूं.' हा सगळा मुलूख विजापुरकरांच्या राज्यापैकींच सर करून शिवाजीच्या ताब्यांत यावयाचा होता. शिवाजीची ही मागणी जयसिंगास अनेक दृष्टींनीं हितावह वाटली. (१) चाळीस लक्ष होन औरंगजेबास मिळतील. (२) विजापुरकरांपासून शिवाजी अगदीं निराळा होईल. आणि (३) इकडील प्रांत जिंकण्याचें काम स्वतः शिवाजीच पतकरणार असल्यानें महाराष्ट्राच्या बिकट प्रदेशांत मोगली फौजांना पडणारा त्रास साफ बंद पडेल. असा तिहेरी कायदा होणार होता. शिवाजीचें हें मागणें मंजूर ठेविलें म्हणजे त्याचे मोबदल्यांत शिवाजी विजापुरकरांवरील स्वारीस

मोगलांस मदतीदाखल म्हणून दोन हजार स्वारांसह संभाजीस पाठवून सात हजार पायदळांसह स्वतःहि हजर राहणार होता.

पोषाख.

१८ मोगली बहुमानः—हा सगळा प्रकार पाहून दिलेरखान अगदीं चडफडून गेला. विशेषतः शिवाजी आपणांकडेस न येतां जयसिंगाकडेस गेला याचें त्याला फारच वैषम्य वाटलें. शिवाजीनें त्याच्या मार्फत बादशहाची क्षमा मागितली नाहीं व जयसिंगाकडेस जाऊन दिलेरखानाच्या बहादुरीवर सगळें पाणी फिरविलें यामुळें दिलेरखान मनांत फारच जळून गेला. आणि खंदक सोडून बाहेर येण्याचें अगर युद्ध बंद करण्याचें त्यानें साफ नाकारिलें. हें पाहून युक्तिबाज जयसिंगानें दिलेरखानाचा राग शांत करण्याची युक्ति योजिली. शिवाजी जयसिंगाच्या तंबूंत होता ही गोष्ट फारशी कोणास ठाऊक नसल्यानें जयसिंगानें त्याला तारीख १२ जून रोजीं हत्तीवर बसवून खानाकडेस पाठवून दिलें. या योगें खान खूष झाला व त्यानें शिवाजीस दोन घोडे, तलवार, जडावाचें काम केलेला खंजीर आणि दोन भरजरी सणगें नजर दिलीं. आणि नंतर स्वतः शिवाजीस घेऊन खान जयसिंगाकडेस आला व आपण होऊन त्यानें शिवाजीचा हात जयसिंगाच्या हातांत दिला. जयसिंगानेंहि शिवाजीस पोषाख, घोडा, हत्ती व तलवार नजर दिली. शिवाजी निःशस्त्रच तेथें आलेला असल्यानें त्यानें ती तलवार आपल्या कमरेला लटकाविलीसें करून काढून खालीं ठेविली व "मी निःशस्त्र राहूनच बादशहाची सेवा एकनिष्ठेनें करीन" असें सांगितलें.

पुरंदर खाली केला.

पूर्वी ठरल्याप्रमाणें तारीख १२ जून रोजीं पुरंदरावरून चार हजार लढाऊ लोक व तीन हजार बायकामुलें मिळून सात हजार मनुष्यें निघून गेलीं व दाणागल्ला, हत्यारें पात्यारें, दारूगोळा यांच्यासुद्धां किल्ला मोगलांच्या ताब्यांत आला. इतर पांच किल्ले ताब्यांत देण्यासाठीं शिवाजीनें आपले लोक मोगली अंमलदारांवरोबर रवाना करून दिले.

फर्मान.

तहाच्या वाटाघाटीसाठीं शिवाजीकडून ब्राह्मण वकील जयसिंगाकडेस जाऊ लागले तेव्हांच जयसिंगानें नेहमीच्या दूर दृष्टीनें पुढील अंदाज ओळखून शिवाजी शरण आल्यावर त्यास देण्याचा बहुमान पोषाख व बादशाही फर्मान मागविलें होतें. शिवाजी शरण आला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं कर्मधर्मसंयोगानें पोषाख व फर्मान येऊन दाखल झालें. दरबारी

पद्धतीप्रमाणें जयसिंगाच्या इछेनुसार शिवाजीनें सहा मैल सामोरें जाऊन पोषाख व फर्मानाचा स्वीकार केला.

इतर गड.

तारीख १४ जून रोजीं जयसिंगानें शिवाजीस एक हत्ती व दोन घोडे नजराणा म्हणून दिले व दाऊदखानाशीं रीतीप्रमाणें भेटी परत भेटी झाल्यावर त्यास कीरतसिंगाबरोबर राजगडाकडेस पाठवून दिलें. ही मंडळी तारीख १४ रोजींच दुपारीं प्रथम कोंडाण्यास पोंचून तो किल्ला शिवाजीनें कीरतसिंगाच्या स्वाधीन केला व आपण स्वतः राजगडाकडेस निघून गेला. तारीख १५ रोजीं शिवाजी राजगडावर पोंचला. आणि त्यानें तारीख १७ जून रोजीं संभाजीला राजगडावरून उग्रसेन कचवाहाबरोबर जयसिंगाकडेस पाठवून दिलें. संभाजी व उग्रसेन तारीख १८ रोजीं जयसिंगाकडेस येऊन दाखल झाले.

२३ किल्ले.

पुरंदरच्या तहानें शिवाजीचे पुढील किल्ले मोगलांकडेस आले. दक्षिणेंतील किल्ले (१) रुद्रमाळ अथवा वज्रगड. (२) पुरंदर. (३) कोंडाणा. (४) रोहिडा. (५) लोहगड. (६) विसापुर. (७) टांकी (टक्कमक ?). (८) तिकोनां. कोंकणांतील किल्ले (९) माहुली. (१०) मुरंजन. (११) खिरदुर्ग. (खेडदुर्ग ऊर्फ सागरगड.) (१२) भंडारदुर्ग. (?) (१३) तुलसी खुल. (?) (१४) नरदुर्ग. (१५) खैगड अथवा अंकोला. (१६) मार्गगड अथवा अत्रा. (?) (१७) कोहज. (१८) वसंतगड. (१९) नंग (?) (२०) कर्नाळा. (२१) सोनगड. (२२) मानगड. (२३) कोंडाण्याजवळचा खडकाळा.

विनंति.

या तहाच्या अटी, शिवाजीकडून एक शरणपत्र (वस्तुतः हें पत्र जयसिंगाचा चिटणीस उदयराज यानेंच लिहिलें होतें) आणि तहाच्या अटी मान्य करण्याबद्दल जयसिंगाचें शिफारसपत्र व शिवाजीला देण्यासाठीं एक बहुमान पोषाख पाठविण्याबद्दल विनंतिपत्र याप्रमाणें पत्रें औरंगजेबास पाठविण्यांत आलीं तीं तारीख २३ जून रोजीं दिल्लीस बादशहास पोंचलीं. हीं पत्रें पाहून बादशहा फार खूष झाला व जयसिंगाची सगळी विनंति त्यानें मोठ्या आनंदानें मान्य केली.

विजयी जयसिंग.

एकंदरींत मिर्झा राजा जयसिंग यानें ही मोहीम अवघ्या तीनच महिन्यांत संपवून शिवाजीसारख्या अजिंक्य वीरास शरण आणिलें व त्याला बादशाही ताबेदार केलें हा जयसिंगाचा मोठाच विजय समजला पाहिजे. शिवाजीनेंसुद्धां पुढें बादशहाच्या

तफनें विजापुरकरांशीं मोठ्या निकराचा संग्राम केला याजबद्दल जयसिंगानेंच वेळोवेळीं बादशहास लिहिलेल्या पत्रांतून उल्लेख आहेत. सारांश, तहांतील वचन पाळण्यास शिवाजीनें मुळींच कसूर केली नाहीं.

१२ विजापुरावरील स्वारींत शिवाजीची मदतः—शिवाजीवरील स्वारींत पुरंदरच्या तहानें संपूर्णपणें विजय प्राप्त केल्यावर मोगली फौजेस चैन करण्यासाठीं मोकळें न सोडितां जयसिंगानें एकदम विजापुरकरांवर स्वारी करण्याची तयारी केली. जयसिंगानें शिवाजीसाठीं केलेलें मागणें मंजूर होऊन बादशाही शिक्का, फर्मान व पोषाख यांसह तें सप्टेंबरमध्यें जयसिंगाकडेस येऊन दाखल झालें. यावेळीं शिवाजी अदिलशाही कोंकणांत होता. त्याला जयसिंगानें तत्काळ बोलाऊं पाठविलें व तो लागलीच तारीख २७ सप्टेंबर १६६५ रोजीं जयसिंगाजवळ येऊन पोंचला. तारीख ३० रोजीं जयसिंगानें आपला मुलगा कीरतसिंग व मुजुमदार जानीबेग यांना शिवाजीबरोबर सामोरें पाठवून बादशहाच्या पत्राचा योग्य सत्कार करविला.

सत्कार.

जयसिंगाकडेस आल्यापासून शिवाजीनें शस्त्रसंन्यास केला होता. प्रस्तुत प्रसंगाच्या निमित्तानें जयसिंगानें शिवाजीस रत्नजडित तलवार व जामिया नजर करून यापुढें त्यानें निःशस्त्र राहूं नये असें त्यास आग्रहानें सांगितलें व असें सांगणें म्हणजेच बादशहाची मेहरबानी झाली असें दर्शविणें होय. याप्रमाणें शिवाजीवर औरंगजेबाची मेहरबानी होऊन तो पुनः शस्त्रें धारण करूं लागला. मुसलमानी रीतिरिवाजाप्रमाणें हा सर्व विधि होणें अवश्य असल्यानें तो जयसिंगानें करून शिवाजीस पुनः सशस्त्र केलें. नंतर त्यानें शिवाजीस दोन लक्ष रुपये देऊन पुढील स्वारीची तयारी करण्यासाठीं रजा दिली. शिवाजीनें जयसिंगास नऊ हजार फौजेसह स्वारीच्या वेळीं येऊन मिळण्याचें वचन दिलें व तो निघून गेला.

शस्त्रधारण.

नंतरच्या महिन्या दीड महिन्यांत जयसिंगानें पुढील स्वारीची तयारी केली. नोव्हेंबरांत शहाजादा मुअज्जम दक्षिणच्या सुभेदारीचा हवाला जयसिंगास सोंपून दिल्लीस निघून गेला. आणि तारीख २० नोव्हेंबर सन १६६५ रोजीं जयसिंग पुरंदराहून विजापुरावर स्वारी करण्यासाठीं निघाला. नऊ हजार शूर शिपायांसह नेताजी पालकराला बरोबर घेऊन शिवाजी जयसिंगास येऊन मिळाला. नेताजी म्हणजे प्रति

विजापुरावर चाल.

शिवाजीच होय अशी त्यावेळीं दक्षिणेंत सर्वत्र समजूत होती. मोगल सैन्याच्या डावीकडेस या मराठा सैन्याची नेमणूक झाली होती.

परंतु कुचाच्या वेळीं जयसिंगानें या मराठा सैन्याची रवानगी अघाडीवर केली.

शिवाजीचा पराक्रम.

त्यामुळें पहिल्या महिन्यांत मोगल सैन्याला कुठेंच अडथळा असा झाला नाहीं. पुरंदरापासून मंगळवेढ्यापर्यंत ५२ मैलांचा प्रदेश तर ह्या सैन्यानें सहज हस्तगत केला. कारण अघाडीवर असलेलें शिवाजीचें सैन्य येत आहे असें ऐकतांच किल्लेदारांनीं भयानेंच किल्ले खाली करून दिले. पुरंदराहून आग्नेयीस चाळीस मैलांवर असलेलें फलटण तारीख ७ डिसेंबर रोजीं सर झालें. फलटणच्या नैर्ऋत्येस चौदा मैलांवर असलेला ताठोरा अथवा संतोषगड किल्ला तारीख ८ डिसेंबर रोजीं घेतला. फलटणच्या दक्षिणेस पंचवीस मैलांवर असलेलें खटाव एक आठवड्यानंतर पडलें. आणि मंगळवेढ्याचा किल्ला तारीख १८ डिसेंबर रोजीं हस्तगत झाला. मोगलांच्या सैन्यांत शिवाजीनें ही जी अप्रतिम कामगिरी केली तीबद्दल बादशहाकडून त्यास स्तुतिपर पत्र, पोषाख व रत्नखचित जमिया नजर करण्यांत आला.

सामना.

याप्रमाणें हें सैन्य निष्प्रतिबंधपणें तारीख २४ डिसेंबर १६६५ पर्यंत सारखें पुढें पुढें चाललें होतें. तारीख २५ रोजीं दिलेरखान व शिवाजी आपल्या तळापासून दहा मैल पुढें गेले तों विजापुराकडील प्रख्यात सेनापति शर्जाखान, खवासखान आणि विजापुरी सरदार कल्याणीचे जाधवराव आणि शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी हे बारा हजार फौजेसह आडवे झाले. विजापुरी सैन्यानें आपल्या फौजेच्या टोळ्या करून मोगली सैन्यावर चोहोंकडून हल्ले चढविले व त्याला फार बेजार करून सोडिलें. परंतु शेवटीं दिलेरखान व शिवाजी यांचे सतत श्रम व धैर्य यांनीं विजापुरकरांचा पराजय झाला. या झटापटींत विजापुरकरांचा प्रख्यात सीदी सेनापति याकुदखान व इतर पंधरा सरदार रणांगणावर पडले आणि त्यांचे घोडे, सामानसुमान, शस्त्रास्त्रें च निशाण मोंगलांच्या हातीं सांपडलें. परंतु या विजयी सैन्याची पाठ वळतांच विजापुराकडील मराठी फौजेनें मोगली सैन्याच्या पिछाडीवर फारच निकराचे हल्ले पुनः चढविण्यास सुरुवात केली. आणि पिछाडीस नेताजी पालकर असल्यानें त्याच्याचवर हा सगळा मारा पडला. परंतु तो सगळा मार सहन करून नेताजी तेथेंच गाडून उभा राहिला. इतक्यांत त्याच्या मदतीला कीरतसिंग व फातजंगखान हे एकदम धांऊन आले त्यामुळें विजापुरी फौज पळून गेली. या रणधुमाळींत

कल्याणीचा जाधवराव गोळी लागून पुढें पांच सहा दिवसांनीं मरण पावला. शिवाजी व व्यंकोजी विरुद्ध बाजूनें परस्परांशीं लढले ते याच वेळीं होय.

पराजय.

दोन दिवस मुक्काम करून तारीख २७ डिसेंबर १६६५ रोजीं जयसिंगानें पुढें कूच केलें. तारीख २८ रोजीं त्यानें एके ठिकाणीं मुक्काम केला. आणि आसपास जमलेल्या विजापुरी फौजांना हाकून देण्यासाठीं आपल्या फौजेच्या टोळ्या रवाना करून दिल्या. जयसिंगाचा मुलगा कीरतसिंग व शिवाजी हे या वेळीं एकाच हत्तीवर बसून आघाडीवरच चालत होते. इतक्यांत मोगली व विजापुरी फौजांची लढाई सुरू होऊन पुढें मोठीच धुमश्चक्री माजली. इतकी कीं, स्वतः जयसिंगहि युद्धांत सामील झाला. शेजटीं विजापुरी सैन्याचा पराजय होऊन तें पळून गेलें. या युद्धांत विजापुरचीं शंभर माणसें कामास आलीं आणि पुष्कळ जखमी झालीं.

जयसिंगाची निराशा.

तारीख २९ डिसेंबर १६६५ रोजीं जयसिंग विजापुरापासून उत्तरेस दहा मैलांवर मखनापुर येथें येऊन पोंचला. येथें जयसिंगाची गति खुंटली व लढाई न करितां कांहीं युक्तिप्रयुक्तीनें विजापुर सर करण्याची त्याची आशा लय पावली. कारण विजापुराला वेढा घालून तें सर करण्याची त्याची तयारी नसल्यामुळें तारीख ५ जानेवारी १६६६ रोजीं त्याला तेथून परत फिरावें लागलें. अंतर्भेद करून आपण विजापुरांत अंतःकलह पेटवून देऊं व मग तें सहज सर करूं अशी जयसिंगाला घमेंड असल्यानें त्यानें मोठमोठ्या तोफा मुळींच बरोबर घेतल्या नव्हत्या. व अशा भारी सामानाशिवाय विजापुरासारखी राजधानी हस्तगत होणें शक्यच नव्हतें. शिवाय या वेळीं अदिलशहानेंहि विजापुरच्या संरक्षणाची मोठी जय्यत तयारी केली होती. तटाच्या भिंती दुरुस्त करून किल्ल्यांत भरपूर दाणागोटा व दारूगोळा भरून ठेविला. किल्ल्यावर तीस हजार नवीन कर्नाटकी पायदळ चाकरीस ठेविलें. विजापुराभोंवतालचा सात मैलांचा प्रदेश अगदीं ओसाड करून टाकिला. पाण्याचीं तळीं फोडून पाणी काढून टाकिलें व झाडेंहि तोडून टाकिलीं. तसेंच आपली कांहीं फौज मोगली मुलखांत लुटालूट करण्यास रवाना करून दिली. या एकंदर कारणामुळें जयसिंगाला तेथून परत फिरणें भाग पडलें. तारीख २७ जानेवारी १६६६ रोजीं जयसिंग परिंड्यापासून १६ मैलांवर येऊन राहिला. या ठिकाणीं त्यानें २४ दिवस मुक्काम केला. जयसिंगाच्या पुढील हालचालीचा शिवाजीच्या चरित्राशीं संबंध नसल्यानें जयसिंगाला आपण येथेंच सोडून शिवाजीकडेस वळूं.

२० पन्हाळ्याजवळ शिवाजीचा पराजय सन १६६६:—विजापुराची कारण. अशी जय्यत तयारी पाहिल्यावर जयसिंगानें निराळाच व्यूह रचिला. जयसिंग बादशहास लिहितो, "माझ्या पत्राप्रमाणें बादशहाकडून बहुमानाचा पोषाख व रत्नखचित जमिया शिवाजीसाठीं आला (ता. २५ डिसेंबर १६६५) हें उत्तम झालें. 'विजापुराला वेढा दिल्यास आपण अवश्य मदत करूं' असें शिवाजी म्हणतो. परंतु विजापुराला वेढा घालणें आपल्याला फायदेशीर होणार नाहीं म्हणून वेढयाचा विचार तूर्त बाजूस ठेविला आहे. शिवाजीचें दुसरें असें म्हणणें आहे कीं, 'पन्हाळा किल्ल्याची आपणांस उत्तम माहिती आहे. आंत बाहेर जाण्यायेण्याचे मार्ग आपणांस ठाऊक आहेत. आणि किल्ल्यावरील शिबंदी अगदींच गाफिल आहे. तरी आपणांस पन्हाळ्यावर पाठवावें म्हणजे तिकडेस मारे दंगल उडवून देऊं. आणि याप्रमाणें हुलकावणी दाखविली म्हणजे विजापुरकरांना अर्थात्च तिकडे लक्ष द्यावें लागेल व तिकडच्या संरक्षणासाठीं मोठी फौज पाठवावी लागेल.' शिवाजीचें हें म्हणणें मला योग्य वाटून मी त्याला तिकडेस पाठविलें आहे."

शिवाजीला याप्रमाणें दूर पाठविण्यास आणखीहि एक कारण होतें. दिलेर-**अंतस्थ कलह.** खानाच्या मनांतून शिवाजीला ठार मारून त्याचा कांटा समूळ उपटून टाकावयाचा होता व जयसिंगाचा कोणास संशयहि न येतां हें काम आपण पार पाडूं असें तो म्हणत होता. परंतु जयसिंगाला ही कल्पना मुळींच पसंत नव्हती. त्यामुळें दिलेर व जयसिंग यांच्यांत वितुष्ट आलें होतें. विजापुरावरील एका हल्ल्यांत शिवाजीला दिलेरच्या या दुष्ट बेताचा वास लागल्यानें तो तत्काळ तेथून सटकला. शिवाजी विजापुरकरांशीं कांहीं संगनमत करीत आहे आणि म्हणून आपणास येथें यश येत नाहीं अशी दिलेर तक्रार करूं लागला. व शिवाजीस या विश्वासघाताबद्दल कैद करावें असें त्याचें म्हणणें पडलें. अशा फाटाफुटीच्या परिस्थितीकडेस लक्ष देऊन जयसिंगानें शिवाजीला एकदम दूर पन्हाळ्यावर पाठवून दिलें.

तारीख ११ जानेवारी १६६६ च्या सुमारास शिवाजी जयसिंगाजवळून **पराजय.** निघाला आणि पांच दिवसांनीं पन्हाळ्याजवळ पोंचला. लागलीच दिवस उजाडतां उजाडतां त्यानें पन्हाळ्यावर हल्ला चढविला. परंतु वरील शिबंदी सावध असल्यानें शिवाजीचे सुमारें हजार शिपाई मारले गेले व त्याला तेथून परत फिरावें लागलें. पन्हाळ्याला झोंबण्यांत कांहीं

अर्थ नाहीं हें पाहून शिवाजी विशाळगडावर जाऊन राहिला व तेथून विजापुरी मुलखावर वारंवार स्वाऱ्या करूं लागला. यामुळें सीदी मसाऊद व रणदौलाखान या विजापुरी सरदारांना सहा हजार फौजेसह कायमचें पन्हाळ्याच्या आसपास तळ देऊन शिवाजीच्या बंदोवस्तासाठीं रहावें लागलें.

पन्हाळ्यावर शिवाजीचा झालेला पराजय तारीख २० जानेवारी १६६६ रोजीं जयसिंगास कळला. इतक्यांत कांहीं कारणावरून नेताजी पालकर रुसून विजापुरकरांस मिळाला व त्यानें मोगलांचा मुलुख लुटण्यास प्रारंभ केला. नेताजीसारखा लढवय्या आपल्याकडून निघून जाऊन विजापुरकरांस मिळावा हें जयसिंगास मुळींच पसंत पडलें नाहीं. म्हणून त्यानें, नेताजीनें जें मागितलें तें त्याला देऊन पंच हजारी सरदार केलें आणि अडतीस हजाराची रोकड जहागीर त्यास दिली. यावेळीं विजापुरचा अदिलशहा आणि गोवळकोंड्याचा कुतुबशहा एक झाले होते. आणि याच वेळीं नेताजी फुटून विजापुरकरांकडेस गेला होता. अशाच रीतीनें शिवाजीहि जर आपणांपासून फुटून गेला तर मोंगलांच्या फजीतीस पारावार नाहीं, हें जाणून जयसिंगानें बादशहास लिहिलें, " अशा प्रसंगीं शिवाजीचें मन कसेंहि करून वळवून त्याला, बादशहाला भेटण्यास, उत्तरेकडेस पाठविणें अवश्य आहे." औरंगजेबानें जयसिंगाची ही विनंति मान्य केली व शिवाजीचें मन वळविण्यास स्वतः जयसिंगच सिद्ध झाला.

नवीन प्रलोभन.

प्रकरण ६ वें

सिंहाच्या गुहेंत

[१ आशा निराशा. २ व्यवस्था. ३ प्रवास. ४ दरबारांत भेट. ५ अटक. ६ जयसिंगाची हालहवाल. ७ पक्षि उडाला. ८ फुलादखानाची तारांबळ. ९ प्रत्यागमनाचा मार्ग. १० प्रवासांतील संकटें. ११ जयसिंगाची राजनिष्ठा.]

आशानिराशाः—शिवाजीचें मन वळवून त्याला दिल्लीच्या मोगल बादशहाबद्दल आपलेपणा वाटेल असें करून बादशहाला भेटण्यासाठीं त्याची उत्तरेकडेस रवानगी करून द्यावयाचें बिकट काम जयसिंगानें पतकरिलें होतें. परंतु, तें वाऱ्याची मोट बांधण्यासारखेंच होतें. शिवाय पुरंदरच्या तहांत शिवाजीनें स्पष्ट अस कलम घातलें होतें कीं, 'आपणांस मोगलाची मनसब नको व आपण मोगली दरबारांत कधीं येणारहि नाहीं.' असें कलम मुद्दाम घालण्याला अनेक कारणें होतीं. त्यांत मुख्य कारण असें कीं, औरंगजेबाच्या दुष्टपणाबद्दल दक्षिणेंतील सर्व लोकांची खातरी पटली असून कोणतेंहि क्रूर कर्म करण्यास तो केव्हांहि मागें घेणार नाहीं अशी त्यांची दृढ समजूत झालेली होती. दुसरें, शिवाजीची मनोवृत्ति लहानपणापासूनच मुसलमानी दरबारांत 'हें शिर लववेना मातें' असेंच म्हणण्याकडेस असून त्यानें आतांपर्यंत कोणत्याहि पादशहाला मुजरा केलेला नव्हता. स्वतंत्र वातावरणांत आतांपर्यंत तो आपल्या अंकित अशा संवगड्यांमध्यें वाढलेला असल्यानें मोगली दरबारांतील गुलामी वागणुकीचा त्याला गंधहि ठाऊक नव्हता. मातुश्रीच्या निकट सान्निध्यानें व कथापुराणश्रवणानें त्याचें अंतःकरण श्रद्धायुक्त बनलें होतें व आजपर्यंत कोणाचीहि ताबेदारी न करितां स्वतंत्र पराक्रम गाजवून त्यानें स्वराज्य स्थापन केलें होतें. म्हणून पहिल्या प्रथम तर त्यानें पादशहाच्या भेटीला जाण्याचें नाकारिलेंच.

मनोवृत्ति.

परंतु जयसिंगानें फारच आग्रह केला व दिल्लीस गेल्यानें पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे असेंहि सांगितलें. कदाचित् दक्षिणची सुभेदारीहि शिवाजीसच मिळेल असेंहि जयसिंगानें सांगि-

फायदे.

तल्याचें वखरी म्हणतात. "इकडील दक्षिणच्या बादशाही इदलशाही व कुतुबशाही व निजामशाहीवरी आपणांस नामजाद करणें. तीन बादशाही फत्ते करूं. एक पादशाही निजामशाही त्यांही फत्ते केलीच आहे. दोन बादशाही तुम्हांस घेऊन देतों. म्हणून शिवाजीराजे जयसिंगास बोलिले." असें सभासद म्हणतो. औरंगजेबानें मात्र कोणतेंच वचन दिलेलें नव्हतें. जयसिंगाच्या पत्रांतहि दक्षिणची सुभेदारी शिवाजीस देण्याबद्दलची शिफारस–अगर त्यानें तसें वचन दिल्याचेंहि–दिसत नाहीं. तथापि जयसिंग मोठा मायावी व कपटी होता. त्यानें दक्षिणच्या सुभेदारीची लालूच दाखविली असेल हें अगदीं संभवनीय आहे. कारण, सन १६५६ पासून १६६६ पर्यंतच्या दहा वर्षांत औरंगजेबाचे मोठमोठे नामांकित सेनापति दक्षिणेंत येऊन नामोहरम होऊन गेले होते. आणि त्यामुळें अलीकडेस औरंगजेब स्वतःच दक्षिणेंत येऊन इकडील सुलतानाशीं लढाई देण्याचा विचार करीत होता. अशा प्रसंगीं शिवाजीसारखा जातिवंत लढवय्या व प्रख्यात विजयी सेनापति जर औरंगजेबाला मिळाला तर तो त्याचीच नेमणूक दक्षिणच्या सुभ्यावर करून दिल्लीहून मनुष्य व द्रव्य यांचा यथेच्छ पुरवठा त्यास करील व दक्षिणेंतील सुलतानांना जेरीस आणील अस जयसिंगाला वाटणें अशक्य नाहीं. आपलीसुद्धां डाळ दक्षिणेंत शिजत नाहीं याचा प्रत्यक्ष त्यालाच अनुभव आलेला असल्यानें दक्षिण जिंकण्याला दक्षिणीच कोणी पाहिजे अशी त्याची खातरी झालेली होती. अशा एकंदर परिस्थितीमुळें शिवाजी दक्षिणचा सुभेदार नेमिला जाण्याचा संभव जयसिंगास वाटणें साहजिक होतें व समक्ष भेटींत या गोष्टी नक्की होतील असें त्यानें शिवाजीस सांगितलें असेल.

स्वार्थ.

बादशहाला भेटण्यांत स्वतः शिवाजीचाहि एक हेतु असून तो प्रत्यक्ष भेटीशिवाय पार पडण्यासारखा नव्हता. तो हेतु असा कीं, 'जंजिरा आपणांकडेस यावा' अस शिवाजीच्या मनांत फार दिवसांपासून होतें व त्यानें बादशहाकडेस तशी मागणीहि केली होती. परंतु तिकडून टाळाटाळीचेंच उत्तर आलें होतें. हल्लीं जंजिऱ्याचा सीदी औरंगजेबाचा नोकर म्हणवूं लागला असल्यानें बादशहाकडून आपणांस जंजिरा मिळेल; परंतु त्यासाठीं आपण त्यास समक्षच भेटलें पाहिजे असें शिवाजीस वाटत होतें. बादशहास भेटल्यानें असे एकंदर लाभ होण्याचा संभव होता तरी शिवाजीचा निश्चय असा कांहीं होईना. त्याच्या मंत्रीमंडळालाहि ही आग्र्याची सफर फारशी पसंत नव्हती. सहा वर्षांपूर्वी अफजलखानाच्या भेटीच्या वेळीं जी मनोवृत्ति

मंत्रीमंडळाची होती तीच आज पुनः प्राप्त झाली. आग्र्यास जाणें म्हणजे सिंहाच्या गुहेंतच प्रवेश करणें होय असें त्यांस वाटत होतें. जयसिंगानें शिवाजीच्या सुरक्षितपणाबद्दल शपथपूर्वक वचन प्रमाण केलें. त्याचा मुलगा रामसिंग दरबारांत होता त्यानेंहि शपथा घेतल्या. त्यामुळें अखेरीस सिंहाच्या गुहेंत प्रवेश करण्याचें शिवाजीनें ठरविलें.

२ व्यवस्थाः—आपल्या गरहजरींत राज्याची व्यवस्था शिवाजीनें मोठी

कौन्सिल. नमुनेदार अशी केली. यदाकदाचित् दैववशात् आपणांस आग्र्यास अपघात झाला अगर आपण कैद झालों तरी राज्यव्यवस्था आपणावांचून अडून राहूं नये अशी योजना मोठ्या विचारानें व दूरदृष्टीनें शिवाजीनें करून ठेविली. आपल्या प्रतिनिधींना त्यानें पूर्ण स्वातंत्र्य देऊन ठेविलें होतें. आणि सर्व राजप्रतिनिधिमंडळाचें मुख्यत्व मातुश्री जिजाबाईकडेस दिलें होतें. मोरोपंत पेशवे, निलोजी सोनदेव मुजुमदार व सेनापति नेताजी पालकर यांनीं मातुश्रीच्या आज्ञेंत राहून राज्यकारभार चालवावा असें ठरवून दिलें. किल्लेदारांनीं डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस किल्ल्यांची राखण करावी व आपण घालून दिलेले कायदे कडकपणें पाळावेत असें फर्मावि‌ण्यांत आलें. मुलकी अंमलदारांनींहि चालू कायदे आणि चालीरीति व्यवस्थितपणें पाळाव्यात असें निश्चित करण्यांत आलें.

यानंतर आपल्या चिमुकल्या राज्यांत एकदां फिरून शिवाजीनें सर्व व्यवस्था

दौरा. नीटपणें पाहून तेथील अंमलदारांना हुषारीनें वागण्याबद्दल ताकिदी देऊन तो परत राजगडास आला, व सर्वत्रांच्या भेटी घेऊन मार्च १६६६ च्या तिसऱ्या आठवड्यांत उत्तर हिंदुस्थानांत जाण्यासाठीं तो निघाला. पुत्र संभाजीसहि बरोबर घेतलें होतें. त्याशिवाय "राजियांनीं बरोबरी घेतले कारकून व हुजरे तपशीलः—

निराजी राऊजी शाहाणा. १ त्रिंबकजी सोनदेव. १ माणको हरि सबनिस. १ दत्ताजी त्रिंबक. १ हिरोजी फर्जंद. १ राघोजी मित्रा. १ दावलजी गाडगे. मावळे लोक एक हजार, लष्कर तीन हजार." याप्रमाणें शिवाजी बरोबर घेऊन निघाला. बादशहाच्या हुकुमानें त्याला वाटखर्ची म्हणून जयसिंगानें दक्षिणच्या खजिन्यांतून एक लक्ष रुपये दिले, व गाजीबेग नांवाचा एक सरदार त्याच्या मदतीस दिला.

३ प्रवासः—बादशहानें शिवाजीस तारीख ५ एप्रिल १६६६ रोजीं आग्र्याहून

प्रयाण. लिहिलेलें पत्र त्यास रस्त्यांत मिळालें. त्यांत असें लिहिलें होतें कीं, "तुम्हीं आग्र्याला येण्याला निघाल्याबद्दल लिहिलें

तें कळलें. तुम्हांला संशय बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. स्वस्थ चित्तानें परंतु लवकर भेटीस यावें. येथें भेट झाल्यावर लागलीच तुम्हांस परत जाण्याची परवानगी देण्यांत येईल. या पत्रासोबत बहुमान पोषाख पाठविला आहे."

शिवाजी लौकरच औरंगाबादेस पोंचला. तेव्हां असला पराक्रमी पुरुष पाहण्यास लोकांचे थवेच्या थवे शहराबाहेर आले. परंतु तेथील फौजदार सेक शिकनखान आपल्याच मोठेपणाच्या घमेंडींत घरींच बसून राहिला व शिवाजीनें आपणांस भेटून जावें असा निरोप आपल्या पुतण्यावरोबर त्याजकडेस पाठविला. शिवाजी म्हणजे एक जमीनदार. त्याचा आपणांस हिशोब काय ? याच घमेंडींत तो राहिला. परंतु शिवाजीनें त्याच्याकडेस व त्याच्या निरोपाकडेसहि अगदींच दुर्लक्ष करून ठरलेल्या ठिकाणीं जाऊन मुक्काम केला. तेव्हां आपोआपच सेक शिकनखान आपल्या अंमलदारांसह त्याला भेटण्यास गेला. शिवाजीनेंहि दुसरे दिवशीं परत भेटीस जाऊन दरबारी चालीरीतींप्रमाणें सर्वांचा मान सन्मान केला. येथें कांहीं दिवस मुक्काम झाला. बादशहाच्या हुकुमाप्रमाणें मराठी सैन्याला स्थानिक अंमलदारांनीं दाण्यागोट्याचा बंदोबस्त करून दिला व खुद्द शिवाजीस नजराणे वगैरेहि दिले. यानंतर शिवाजी तेथून निघाला तो तारीख ९ मे १६६६ रोजीं आग्र्याचे बाहेर येऊन तेथें त्यानें मुक्काम केला, कारण यावेळीं बादशाही दरबार आग्र्यास भरत असत.

सत्कार.

४ दरबारांत भेटः—तारीख १२ मे रोजीं चांद्रमानानें औरंगजेबाचा पन्नासावा वाढदिवस होता. व याच दिवशीं दरबारांत शिवाजीची भेट व्हावी असें ठरविण्यांत आलें. दरबार दिवाणखाना उत्तम रीतीनें मुद्दाम शृंगारण्यांत आला होता. दरबारी लोक भपकेबाज पोषाखांत सजून आले होते. औरंगजेब बादशहाची त्या दिवशीं सोन्यांत व चांदींत तुळा व्हावयाची असून सर्व सिद्धता झाली होती. दिवाणखान्याच्या छताला मूल्यवान् झालरी लाविलेल्या होत्या. त्याच्या तीनहि बाजूस राज्यांतील झाडून सारे अमीर उमराव आणि सरदार दरखदार खेटून उभे राहिले होते. या दिवाणखान्याचें नांव दिवाणी–आम असें होतें.

दरबार.

शिवाजी, संभाजी व त्यांचे दहा सरदार यांना कुमार रामसिंग यानें दरबार दिवाणखान्यांत नेऊन त्यांची ओळख करून दिली. शिवाजीनें पंधराशें मोहरांचा नजराणा व सहा हजार रुपयांचा सतका (निसार) केला. औरंगजेब मोठा खूष झाला व त्यानें 'या या शिवाजी राजे'

मुजरा.

असा शिवाजीचा आदरसत्कार केला. शिवाजीनें मयूर सिंहासनाजवळ जाऊन तीनवेळां बादशहास सलाम केला. येथपर्यंत सर्व कांहीं ठीक झालें. पण याच्या पुढेंच बिनसलें. इतकें झाल्यानंतर बाहशहानें इशारा केल्यावरून शिवाजीला मागील बाजूस तिसऱ्या वर्गाच्या सरदारांत नेऊन उभें केलें. पुढें दरबारी कामकाजांत शिवाजीची कोणालाच आठवणहि राहिली नाहीं.

संताप.

जयसिंगाशीं झालेल्या अनेक मुलाखतींत शिवाजीचीं जीं भाषणें झालीं त्यावरून असला तुच्छ पाहुणचार आपणास मिळेल असें शिवाजीस मुळींच वाटलें नव्हतें. आग्ऱ्याला आल्यापासून विशेषतः त्याला प्रसन्नता अशी वाटेनाशीच झाली होती व याला अनेक कारणें होतीं. बादशहाच्या दरबारांत रामसिंग व मुखलिसखान यांना अनुक्रमें अडीच हजारी व दीड हजारी सरदार असा फक्त किताब होता. आग्ऱ्याजवळ शिवाजी पोंचतांच हेच दोन सरदार त्याला बादशहाच्या तर्फेनें सामोरे आले होते. कुठेंहि न नमणारें शिवाजीचें मस्तक मयूर सिंहासनापुढें लवल्यावरसुद्धां अमूल्य नजर नजराणा, एकादा मोठा किताब किंवा बहुमानपुरस्सर वागणूक यांपैकीं त्याला कांहींच देण्यांत आलें नाहीं. भर दरबारांत त्याला सगळ्यांच्या मागें नेऊन उभें करण्यांत आलें, त्या योगानें बादशहाचें तोंडसुद्धां त्याला दिसेनासें झालें. आपण पंच हजारी सरदारांमध्यें उभे आहोंत असें रामसिंगाकडून त्याला कळलें तेव्हां तर तो अगदीं खवळून गेला, व म्हणाला, "काय? माझा सात वर्षांचा शंभू दरबारांत न येतांहि पंच हजारी सरदार बनविण्यांत आला. माझा चाकर नेताजी पालकरहि पंच हजारी सरदार आहे. आणि माझी सुद्धां तितकीच योग्यता काय?" त्याच्या पुढें महाराजा जसवंतसिंग उभा होता त्याला पाहून शिवाजी म्हणाला, "जसवंतसिंगासारखा उमराव! याच्या पाठीं माझ्या लष्करांनीं पाहिल्या असतील. याचे खाले आपण उभें रहावें म्हणजे काय?"*

स्फोट.

शिवाजीला हा भरदरबारांतील अपमान फार झोंबला व तो मोठमोठ्यानें बोलूं लागला. अशा अपमानांत जिवंत राहण्यापेक्षां मरण बरें असें त्याला वाटलें. शिवाजीची रागीट मुद्रा व क्रोधयुक्त मोठमोठ्यानें केलेलें भाषण यायोगें बादशाही दरबारांत तर सगळे चकितच झाले. रामसिंग तर हा अनपेक्षित प्रकार पाहून अगदींच गोंधळून गेला. शिवाजीला यावेळीं इतका संताप आला कीं, तो तेथें मूर्च्छितच पडला. "हें पाहून पादशाह

* सभासद.

म्हणूं लागले कीं, 'काय जहालें ?' रामसिंग बोलला कीं, 'जंगली वाघ हयवान, त्यास गर्मा जहाला. कांहीं करीणा जहाला.' असें बोलतांच पादशहाचे मनांत शंका उत्पन्न जहाली. काय होईल तें न कळे."* रामसिंगानें शिवाजीविषयीं पादशहाजवळ रदबदली केली कीं, 'यानें कधीं पादशाही दरबार पाहिला नाहीं. याच्या चालीरीती दक्षिणी लोकांच्या आहेत.' बादशहानें त्याला जवळच्या खोलींत पाठवून गुलाबपाणी वगैरे शिंपडण्यास सांगितलें. शिवाजी सावध झाल्यावर दरबार खलास होण्यापूर्वीच त्याला मुक्कामावर जाण्यास परवानगी देण्यांत आली.

५ अटकः—नजरकैद. शिवाजीचा संताप फारच अनावर झाला होता. त्यानें मुक्कामावर आल्यावरहि वचनभंगाबद्दल औरंगजेबास सपाटून दोष दिला. अर्थातच या सगळ्या गोष्टी बादशहाच्या कानावर गेल्या व औरंगजेबाला शिवाजीचा राग आला. त्यानें, शिवाजीला शहरावाहेर नेऊन जयपूर वंगल्यांत ठेवावें, असें रायसिंगास सांगून शिवाजीला त्याच्याच कबजांत दिलें. शिवाजीला दरवार वंद झाला. संभाजी मात्र रामसिंगाबरोबर दरबारास जात असे. याप्रमाणें जयसिंगानें दाखविलेल्या सगळ्या आशा नष्ट होऊन शिवाजी औरंगजेबाचा कदी मात्र झाला.

विचार. "राजियांनीं आपले कारकुन, हुजरे व रघुनाथपंत कोरडे यांसि वोलावून आणून विचार केला, 'पुढें तजवीज काय करावी ? पादशहाची मजलस कळली. तेथून यश पावून निरोप घेऊन कैसें जावें ? पादशहाजवळ कांहीं एक कार्य कबूल करून गेलियाविना पादशहा निरोप देत नाहीं.' (मग) रघुनाथपंत कोरडे यांस सांगोन पाठविलें कीं, 'तुम्हीं पादशहास उद्यां जाऊन अर्ज करणें कीं, स्वामीशीं आमचा दुसरा विचार नाहीं. आपण निखालस आपले पुत्र घेऊन देखील भेटीस आलों. सेवकाजवळोन चाकरी घ्यावी. दक्षिणेस कुल अदलशाई व कुल कुतवशाई दोनी पातशाही घेऊन हजरतीस देतो. वरकड सुभे रवाना करतां त्यांची कामगिरी पाहणें आणि आपली कामगिरी पाहणें.' ऐसें किती एक गोष्टी बोलून एकांतीं घुसलखानियांत भेटीस बोलाविलें (म्हणजे) भेटी घेऊन कित्येक मजकूर बोलूं, म्हणून अर्ज करणें म्हणून सांगितलें, त्याजवरून रघुनाथपंत कोरडे दुसरे दिवशीं पादशहाजवळ जाऊन येणेंप्रमाणें करीणा लिहून पाठविला. पातशहानें रोखा वाचून चित्तांत विकल्प

---

* सभासद.

धरिला. आणि पत्राचे पाठीशीं जाब लिहिला कीं, सवुरी करणें. तुमच्या मुद्यामाफक करूं.' असा जाब लिहिला.*" बादशहाच्या या जबाबाचा अर्थ चाळवाचाळव करणें एवढाच आहे हें शिवाजीच्या लक्षांत आलें.

जादुगारी.

शिवाजी हा जादुगिरीच्या विद्येंत निष्णात असून चाळीस पन्नास गज उंच अशी उडी तो सहज मारतो असें तेव्हां प्रसिद्ध झालें होतें. आणि म्हणून औरंगजेबानें त्याची एकांतीं भेट घेऊं नये असें षाइस्ताखानानें दिवाण जाफर खानामार्फत मुद्दाम पादशहास पत्र पाठवून कळविलें होतें असें सभासद म्हणतो. परंतु औरंगजेबाला हें कोणी सांगावयास पाहिजे होतें असें नाहीं. दहा हजार शिपायांच्या देखत ज्यानें अफजलखानाला ठार मारिलें व वीस हजार मोगली फौजेच्या मजबूत कड्यांत शिरून भर जनान-खान्यांत ज्यानें षाइस्ताखानाचीं बोटें तोडिलीं त्या शिवाजीला एका लहानशा खोलींत थोडक्याशा संरक्षकांच्या पाहऱ्यांत भेटण्याइतका औरंगजेब कांहीं वेडा नव्हता.

जाफरखान.

"दुसरे दिवशीं राजे यांस कळलें कीं, जाफरखान दिवाणानें आपला गिल्ला पादशहाजवळ केला. असें कळोन रघुनाथपंत कोरडे यास जाफरखानाकडे पाठविलें कीं, 'आपले भेटीस येतों.' त्यानें बहुत वेळ मनांत तजवीज करून 'वरें येऊं द्या' म्हणोन सांगितलें. त्यावरून राजे जाफरखानाचे भेटीस गेले. सन्मान बहुत केला. कित्येक आपले सरंजामाविशीं सांगितलें, परंतु त्याचे मनांत आलें नाहीं. बाहेर 'बहुत वरें' म्हणून बोलला. जाफरखानाची बायको ती षास्ताखानाची बहिण. तिनें खानास आंतोन सांगोन पाठविलें कीं, 'शास्ताखानाचीं बोटें तुटलीं, अफजलखान मारिला, तसें तुम्हांसहि शिवाजी मारील. त्यास लवकर निरोप देणें.' मग राजास वस्त्रें देऊन निरोप दिला. 'पादशहास अर्ज करून सरंजाम करवितों' ऐसें बोलिला. मग राजे डेरियास आले. 'जाफरखानहि दिलखुशानें बोलिला नाहीं. बरें, श्री करील तें खरें.' म्हणून बोलून राहिले."*

स्वावलंबन.

आतां शिवाजीला स्वावलंबनाशिवाय कोणताच मार्ग मोकळा नव्हता. इतक्यांत त्याला पूर्वीपेक्षांहि अधिक बंदिस्त करण्यांत आलें. "दुसरे दिवशीं पादशहा याणीं राजापाशीं पांच हजार स्वार व

---

* सभासद.

पायदळ फुलादखान कोतवाल यास (नेमून) हुकुम केला कीं, 'तूं राजाच्या डेऱ्याभोंवतीं चौकी देऊन खबरदारीनें राहणें.' त्यावरून कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला. मग राजे घाबरे झाले. कष्टी होऊं लागले. संभाजीराजे यांस पोटाशीं धरून बहुत खेद केला.*"

करार.

६ जयसिंगाची हालहवाल:—शिवाजीला आग्र्यास कैद केलें त्यानंतर दक्षिणेंत जयसिंगाची स्थिति काय झाली हें आतां आपण पाहूं या. पहिल्या भेटीनंतर शिवाजीला एक हत्ती, बहुमानाचा पोषाख व रत्नखचित जमिया नजर द्यावयाचा बादशहाचा विचार होता. परंतु पहिल्याच भेटींत शिवाजीनें उडवून दिलेल्या गडबडीनें दरबारच्या रीतिरिवाजांचा मोठा भंग झाला, त्यामुळें औरंगजेबानें आपला विचार पुढें बदलला. 'पादशहानें वचनभंग केला' असा शिवाजीचा त्याच्यावर आरोप होता. यावर पादशहानें जयसिंगास विचारून 'शिवाजीस काय काय वचनें दिलीं आहेत' याचा खुलासा मागविला. 'पुरंदरच्या तहांतील अटीबाहेर आपण एक अक्षरहि कबूल केलेलें नाहीं' असें जयसिंग वारंवार विनवून कळवूं लागला.

सुरक्षितपणा.

शिवाजीच्या अटकेमुळें जयसिंग मोठ्याच कचाट्यांत सांपडला. दक्षिणेंतून एकदांची शिवाजीची ब्याद टळावी या हेतूनें जयसिंगानें अनेक प्रलोभनें दाखवून शिवाजीस उत्तरेस पाठविलें हें जरी खरें होतें तरी त्याच्या सुरक्षितपणाबद्दल त्यानें शपथपूर्वक हमी घेतलेली होती. म्हणून त्यानें बादशहाला वारंवार कळविलें कीं, "शिवाजीनें आपल्या राज्याची इतकी सुंदर व्यवस्था केली आहे कीं, त्याच्या गैरहजिरींतहि त्याचें राज्य उत्तम प्रकारें चाललें आहे. त्याची उणीव अशी मुळींच भासत नाहीं. म्हणून शिवाजीची मैत्री करून जर त्याला सुरक्षितपणें राहूं दिलें तर दक्षिणेंत मोगली पादशाहीचा फायदा होऊन पादशहाच्या अंमलदारांचीहि इभ्रत वाढेल." शिवाजीच्या जिवाला कोणत्याहि प्रकारचा धोंका पोंचणार नाहीं याबद्दल सक्त खबरदारी घेण्याला तो वारंवार रामसिंगाला लिहीत असे.

उपदेश.

एकंदर हा सगळाच प्रकार कल्पनातीत झाला होता. व औरंगजेबाची कपटनीति कोणीहि बदलणें शक्य नव्हतें. जयसिंग झाला तरी तो नुसतीं पत्रें लिहून नम्रपणें विनंति करण्यापलीकडे

---

* सभासद.

काय करणार होता ! शिवाजीवर कडक नजर ठेवून त्याला आग्र्यांत डांबून ठेवावें एवढाच प्रथम बादशहाचा हेतु होता. दक्षिणेंत गेलेल्या मोगली फौजा तिकडेस विजयी झाल्यानंतर शिवाजीस सोडून द्यावें असाहि त्याचा विचार होता. शिवाजी-बद्दल रामसिंगानें जामीन व्हावें असें बादशहाचें म्हणणें पडलें. परंतु जयसिंगाला हें पटेना. व एका हिंदु राजाला दुसऱ्या हिंदु राजाच्या स्वाधीन करणें अगर त्याला जामीन घेणें हें बरोबर नाहीं असें औरंगजेबाच्या लक्षांत आल्यानें त्याचा पूर्वीचा विचार फिरला. आणि शिवाजीला महाराष्ट्रांतूनच नव्हे तर हिंदुस्थानांतूनहि दूर अफगाणिस्थानांत पाठवून द्यावें असा विचार दरबारांत होऊं लागला. नेताजीला याचप्रमाणें पुढें औरंगजेबानें अफगाणिस्थानांत पाठवून दिलेंच होतें. शिवाजी अफगाणिस्थानांत गेल्यानें पुनः परत येण्याची आशाच नको असें बादशहाला वाटत होतें. परंतु हा विचारहि पुढें कायम राहिला नाहीं. शिवाजीला आग्र्याच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवून रामसिंगाला तेथें किल्लेदार नेमावें आणि आपण स्वतः दक्षिणेंत मोहिमेवर जावें असा एक विचार औरंगजेबाचे मनांत घोळूं लागला. परंतु रामसिंगाची योजना किल्लेदाराच्या जागीं व्हावी हें जयसिंगास मुळींच पसंत पडेना. तथापि शिवाजीबद्दल मात्र त्यानें बादशहास कळविलें कीं, "शिवाजीला सोडून द्यावें असें मी जेव्हां मागें लिहिलें होतें तेव्हांपेक्षां हल्लींची स्थिति मोठी बिकट झाली आहे. सगळी दक्षिण आतां आपल्यावर उलटली आहे. म्हणून यावेळीं शिवाजीला तिकडेसच अडकवून ठेविणें इष्ट आहे. तथापि त्याला अशा रीतीनें वागविण्यांत यावें कीं, त्यायोगें त्याचे दक्षिणेंतील अंमलदार खूष राहून विजापुरकरांना मिळणार नाहींत व आपणांशींच इमानी राहतील. शिवाजीला आग्र्यास ठेवावें व दक्षिणेंत लवकरच बोलावून घेण्यांत येईल असें त्यास सांगावें. आणि त्याचा मुलगा संभाजी मात्र बादशहानें आपल्याजवळ ठेवावा. त्यायोगें राजकीय दृष्ट्याहि मोठा फायदा आहे. अनायासें शिवाजीची जामीनगिरी आपल्या-जवळ राहील व त्यायोगें त्याचे सरदार आपल्याशीं राजनिष्ठ राहतील." दक्षिणेंत मात्र दिवसेंदिवस मोगली फौजेची पीछेहाट होत चालली व त्यायोगें शिवाजीच्या मुक्ततेची आशाहि कमी कमी वाटूं लागली.

७ पक्षि उडाला: कारस्थान.—याप्रमाणें अनन्यगतिक झाल्यावर शिवाजी स्वतःच मुक्ततेचा विचार करूं लागला. कांहीं दिवस बंदिवास भोगल्यावर आपणांस पश्चात्ताप झाला आहे असें तो म्हणूं लागला व सगळ्या दरबारी लोकांना क्रमाक्रमानें भेटून त्यांनीं आपल्याबद्दल

बादशहाकडेस रदबदली करावी असा त्यानें प्रयत्न सुरू केला. परंतु त्यांतहि कांहीं यश आलें नाहीं. तथापि " पातशहास अर्ज करून प्रतापराऊ गुजर व पागा व मावले वगैरे लोक देशास जातील. पातशाही दस्तक वाटेचे करून देणें. आम्ही उभयेतां पातशाही कैदेंत आहों. वरकडास जाऊं देणें."* या शिवाजीच्या मागण्यांस दरबारांतून मान्यता मिळाली व त्याचे लोक दक्षिणेंत निघून गेले. शिवाजीचीं माणसें याप्रमाणें निघून गेल्यानें तो एकटा राहिला, आपल्यालाहि नजर ठेविण्याला तेवढा त्रास कमी पडेल व आपल्याला तेवढे थोडे शत्रू इकडेस राहतील असा तिहेरी विचार औरंगजेबानें करून शिवाजीच्या माणसांस परत जाण्याची त्यानें परवानगी दिली. पण येथेंच तो चकला.

शिवाजीचे अंमलदार लवकरच परत स्वदेशीं लहान लहान टोळ्या करून आले.

मिठाई.

याप्रमाणें शिवाजी अनुयायांविषयीं निष्काळजी झाल्यावर स्वतःच्या मुक्ततेचा विचार करूं लागला. त्यानें आजारी असल्याचें सोंग केलें; व आपलें व्याधिनिवारण होण्यासाठीं त्यानें साधु-बैरागी व ब्राह्मण यांना मेवामिठाईचे मोठमोठे पेटारे भरून धर्मादाय म्हणून पाठविण्यास सुरुवात केली. दरबारच्या अमीरउमरावांकडेसहि तो मिठाईचे पेटारे याप्रमाणें पाठवूं लागला. " नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून १० पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे दोघे मजूर लावून, मध्यें लाकूड घालून मेवा वजीरांस पाठविला. चौकीच्या लोकांनीं पुशिलें कीं, 'पेटारे कोणाचे ? कोठें जातात ? ' मजुरांनीं उत्तर दिलें कीं, ' राजे यांणीं चौघां वजीरांस मेवा पाठविला आहे. ' त्यांणीं एक दोन उघडून पाहिले तों मेवा खरा. मग जाऊं दिलें. असा रावता रोज लाविला. "× मग तारीख १९ ऑगस्ट सन १६६६ रोजीं सायंकाळीं पाहरेकऱ्यांस सांगून पाठविलें कीं, " आपण फार आजारी आहोंत. कोणी आपणांस उठवूं नये. असें सांगून शिवाजी निजावयास गेला. ते वेळीं आपला साज सर्व उतरून, हिरोजी फरजंद यास घालून आपले पलंगावरी निजविला.÷ एक पोरगा (मदारी मेहेतर) रगडावयास ठेविला. आणि आपण उभयतां पेटारियांत बसून चालिले. चौकीचे लोक होते त्यांनीं एक दोन पुडीचे पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघडितां जाऊं दिले. शहराबाहिर दोन कोसावरि जाऊन पेटारे टाकून पायउतारा होऊन चालिले. "× आग्र्यापासून सहा मैलांवरील एका खेड्यांत जाऊन पोंचले. तेथें त्यांचा सरन्यायाधीश निराजी

* ९१ कलमीं. × सभासद. ÷ शहाजीचा दासीपुत्र.

रावजी हा वाटच पाहत बसला होता. घोडेहि तेथें तयार ठेविले होते. शिवाजीनें एकंदर लोकांच्या दोन टोळ्या केल्या. शिवाजी, संभाजी, निराजी रावजी, दत्ताजी त्रिंबक व राघो मित्रा यांनीं अंगाला राख फासून बैराग्याचा वेश घेतला व ही मंडळी मथुरेकडेस वर निघून गेली. बाकीच्या मंडळीस सरळ खालीं दक्षिणेंत जाण्यास सांगितलें.

८ फुलादखानाची तारांबळः— "हिरोजी फर्जंद पलंगावरी निजला होता. तो चार प्रहर रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चाकीचे पोलादखानाचे लोक कोठडींत येऊन पाहतात तों राजे शेला पांघरून निजले. पोर पाय रगडीत होता. पोरास लोक पुसतात कीं, 'राजे आज फार वेळ निजले?' पोर म्हणतो कीं, 'शिर दुखतें.' ऐसें पाहोन लोक जातात. तैसाच तीन प्रहर दिवस हिरोजी निजला होता. तो प्रहर दिवस असतां (तारीख २० ऑगस्ट रोजीं) हिरोजी उठोन, आपलीं पांघरुणें चोळणा मुडासें घालून, पोर बराबरी घेऊन बाहेर आला. चौकीदारांनीं पुशिलें त्यास हिरोजीनें सांगितलें कीं, 'शिर दुखतें, कोणी कोठडींत जाऊं लागेल त्यास मना करणें. आपण औषध घेऊन येतों.' म्हणून चौकीदारास सांगून दोघे बाहेर गेले."*

चकविलें.

९ शोध. "नऊ तास दिवस आला. नववे तासा चौकीचे लोक म्हणत होते कीं, 'आज माणसाचा राबता नाहीं. राजा श्रमी जहाला आहे म्हणून चाकर सांगतात. त्याजवर कोणी जात येत नाहीं, काय वर्तमान?' म्हणून कोठडींत पहावयासि गेला तों पलंगावरी कोणी नाहीं. राजा पळाला ऐसें जाहलें. हें देखोन पोलादखानानें पादशहाजवळ वर्तमान सांगितलें कीं, 'राजा कोठडींत होता, वरचेवर जाऊन पाहत असतां एकाएकीं गयब जहाला. पळाला, किंवा जमिनीमध्यें घुसला, कीं अस्मानामध्यें गेला, हें न कळे. आम्हीं जवळ आहों. देखत देखत नाहींसा झाला. काय हुन्नर जहाला न कळे."* परंतु जादूगिरीच्या असल्या थापांवर औरंगजेबाचा विश्वास बसणें शक्यच नव्हतें. त्यानें एकदम शिवाजीच्या शोधार्थ शेंकडों घोडेस्वार वऱ्हाड खानदेशच्या मार्गानें दक्षिणेकडेस पिटाळले. त्रिंबकपंत डबीर, रघुनाथपंत कोरडे व शिवाजीचीं इतर माणसें जेथें जेथें आढळलीं तेथें तेथें त्यांना कैद केलें. ठिकठिकाणच्या स्थानिक

शि. ८ * सभासद.

अंमलदारांना, ही पलायनाची बातमी कळवून शिवाजीला पकडण्याची तजवीज केली. परंतु यावेळीं शिवाजीस आग्र्याहून निसटून चोवीस तास होऊन गेले असल्यानें तो उत्तरेकडेस पुष्कळच दूर निघून गेला होता.

तपास.

सूक्ष्म तपासाअंतीं शिवाजी कसा पळाला हें आढळून आलें. शिवाजीची जबाबदारी घेण्याला रामसिंग टाळाटाळी करीत होता यामुळें शिवाजीला पळविण्यांत त्याचाच हात असावा असा संशय बादशहाला आला. आणि शिवाजीच्या कित्येक लोकांनीं पोलिसांजवळ आपणास रामसिंगाचें सहाय्य असल्याबद्दल कबुलीहि दिली. ही कबुली पोलिसांनीं मिळविली होती हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. परंतु बादशहाला रामसिंगाचा संशय पक्का येऊन त्याला एकदम दरबार बंद झाला व लवकरच नोकरीवरून दूर करण्यांत आलें. त्याचा बाप जयसिंग हा निवर्तल्यानंतर म्हणजे शिवाजीच्या पलायनानंतर अकरा महिन्यांनीं त्याला पुनः चार हजारी सरदार करून आसामांत लढाईवर पाठविण्यांत आलें. हेतु हा कीं, तिकडच्या वाईट हवेनें तो तिकडेसच खपून जावा. असो.

मार्ग.

९ प्रत्यागमनाचा मार्गः—आग्र्याहून निघाल्यावर सरळ दक्षिणेकडेस आपण गेलों तर तत्काळ झालेल्या पाठलागाच्यायोगें आपण सहज पकडले जाऊं म्हणून प्रथम कांहीं दिवस उत्तरेकडेस जाऊन मग दक्षिणेकडेस वळावें असा अत्यंत दूरदर्शीपणाचा विचार करून शिवाजी प्रथम मथुरेस गेला. तेथून पूर्वेकडेस वळून प्रयाग, काशी, गया इकडेस जाऊन नंतर शेवटीं दक्षिणेकडेस वळला व गोंडवन, गोवळकोंडा या मार्गानें राजगडाला परत आला. " पुढें राजे व राजपुत्र मजल दरमजल चालोन मथुरेस गेले. मथुरेमध्यें ओळखीचें माणूस शोधितां कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधु ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे, त्यांस निराजीपंत ओळखीत होते, त्यांणीं जाऊन, त्यांची भेट घेऊन वर्तमान सांगितलें. "* औरंगजेबाच्या गैरमर्जीची परवा न करितां त्यांनीं संभाजीला आपल्याजवळ ठेवून घेतलें. देशासाठीं व धर्मासाठीं शिवाजीला मदत करणें आपलें कर्तव्य आहे ही भावना त्यावेळीं चांगलीच प्रचलित झालेली दिसते. या तीन बंधूंपैकीं एक कृष्णाजीपंत हा तर शिवाजीबरोबर काशीपर्यंतहि आला. आग्र्याहून निघतांना किंमती जडजवाहीर व सोनेंनाणें शिवाजीनें बरोबर घेतलें होतें. तें कपड्यांत शिवून किंवा

* सभासद.

जोड्यांत लपवून ठेविलें होतें. कांहीं किंमती हिरे शिवाजीचीं माणसें सदोदित तोंडांतच ठेवीत असत. अशा सावधगिरीनें त्यांचा प्रवास चालू होता. दाढी मिशा काढून टाकून संन्याशाचा वेश घेतल्यामुळें रात्रींबेरात्रीं केव्हांहि प्रवास करणें त्यांना शक्य झालें.

वेशांतर.

१० प्रवासांतील संकटें:—शिवाजीला वस्तुतः दक्षिणेकडेस जावयाचें होतें. परंतु तो आपल्या चाळीस पन्नास साथीदारांच्या टोळीसह पहिल्या प्रथम अगदीं विरुद्ध दिशेस म्हणजे उत्तरेकडेसच गेल्यानें त्याचा कोणास संशय आला नाहीं. शिवाय बैरागी, गोसावी, उदासी, व्यापारी असे अनेक प्रकारचे वेश त्यांनीं घेऊन प्रवास केल्यामुळें तर त्यांचा प्रवास थोडा सुकर झाला, आणि मोठमोठ्या संकटांतून ते बचावून गेले.

एका गांवच्या लांच.

एका गांवच्या फौजदाराला सरकारी हुकूम येण्यापूर्वींच खासगी रीतीनें शिवाजीच्या पलायनाची बातमी कळली होती. त्यानें या टोळीस संशयावरून पकडून कैद केलें व प्रत्येकाची झडती घेण्याचें ठरविलें. तेव्हां रात्रीं एकांतीं त्या फौजदारांस भेटून शिवाजीनें लाख रुपये किंमतीचे जडजवाहीर दिलें व आपली मुक्तता करून घेतली.

प्रयाग स्नान.

प्रयागास त्रिवेणी संगमावर स्नान करून शिवाजी काशीस गेला. तेथें मोठ्या पहांटेस भागीरथीवर जाऊन त्यानें एका ब्राह्मणास हिऱ्यामोत्यांची दक्षिणा देऊन धार्मिक कृत्यें पार पाडिलीं. इतक्यांत शिवाजीला पकडण्यासाठीं शिपायांची धांवपळ सुरू झाली. तत्काळ शिवाजी तेथून निसटला. पुढें ज्या ब्राह्मणास हिरे मोत्यांची दक्षिणा मिळाली होती त्यानें सुरतेस येऊन चांगलें घर खरेदी करून कायमची वसति केली. हा ब्राह्मण, इतिहासकार खाफीखानास भेटला होता.

घोडा खरेदी.

गयेहून शिवाजी दक्षिणेकडेस वळला. गोंडवन, हैदराबाद, विजापुर, या प्रांतांतून तो पायीं प्रवास करीत जात असतांना एकदां एक घोडा विकत घेण्याचें त्यानें ठरविलें. घोडा पसंत करून त्याची किंमत देतांना पुरेसे मोकळे रुपये शिवाजीजवळ नसल्यानें त्यानें कांहीं मोहोरा व्यापाऱ्यास दिल्या. यावेळीं शिवाजी आग्ऱ्याहून निसटून गेल्याची बातमी सर्वतोमुखीं झाली होतीच. इतक्या मोहोरा याच्याजवळ आहेत यावरून हा शिवाजीच असावा असा त्या व्यापाऱ्याला संशय आला व तो त्यानें बोलूनहि दाखविला.

त्या व्यापाऱ्यानें विशेष बोभाटा करूं नये म्हणून शिवाजीनें त्याला मोहोरांची पिशवीच बक्षिस दिली व आपली सुटका करून घेतली.

पाटलीण.

शिवाजी आदि मंडळी "देवगडच्या मार्गें चांदे प्रांताहून गंगा-इंदूर प्रांतीं उतरून बालेघाट उतरोन कडेवलीतांत आले. तों अगोधर अनंदराऊ व तेलंगराऊ त्यांची फौज येऊन गुरें तमाम त्या गांवचीं नेलीं होतीं. त्याच गांवास हे झुंडी गेली. गांवांत एक पाटलीण. तिच्या घरास जातां तीस म्हणों लागले जे, 'बाई स्थल द्याल तर राहूं.' ते म्हणों लागली जे, 'गोठा खाली पडला. सिवाजीच्या स्वारांनीं गुरें तमाम नेलीं. सिवाजी कैदेंत दिल्लीस तैसाच पडो.' नाना प्रकारें सिव्या देऊं लागली. निराजीपंताकडेस पाहून (शिवाजीराजे) हांसो लागले. तिचें नांव गांव लेहून घेतलें. त्याउपर त्याच वेशें भीमा उतरोन स्वराज्यांत आले."* मागाहून त्या बाईस बोलावून आणून तिची नुकसान भरपाई करून दिली.

रायगडीं.

शिवाजी "भीमा उतरून पांचाडी येऊन रायगडच्या दरवाजियास दाखल झाले. जिजाऊस खबर केली जे, बैरागी झुंडी उत्तरेकडून आले. हें वर्तमान ऐकतांच परवानगी जाली. जिजाऊच्या दर्शनास बैरागी वेशें गेले. निराजीपंतें आसीर्वाद केला. सिवाजीराजे त्याणीं मातुश्रीस जाऊन पायांवर डोई ठेविली. मातुश्रीनें वळखिलें नाहीं. राजे जाऊन मांडीवर बसले. डोईची टोपी काहाडिली. तेव्हां वलखिले. ते समयीं आनंद झाला.*" तारीख २० नोव्हेंबर १६६६ रोजीं शिवाजी रायगडावर येऊन पोहोंचला. शिवाजी आग्र्याहून सुटून आला हा एक दैवी चमत्कारच समजला पाहिजे. तो खुद्द राजधानींत येऊन पोहोंचल्यावर सर्वांना किती आनंद वाटला असेल याची कल्पनाहि व्हावयाची नाहीं. सर्व राज्यांत मोठा उत्सव होऊन तोफा वगैरे सोडून आनंदाचें प्रदर्शन करण्यांत आलें. "राजगडास आलियावर थोर धर्म मोठा महोत्सव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीनें व कारकुनांनीं व लष्कर, गड, कोट, हशम सर्वांनीं संतोष करून खुशाली केली.*"

संभाजी.

याप्रमाणें शिवाजी एकटाच राजगडास सुखरूप परत आला व संभाजी वाटेंतच मृत्यु पावला असें त्यानें सर्वत्र प्रसिद्ध करून त्याचें उत्तर कार्यहि केलें. त्यामुळें मोगलांचा शोध मंद पडून मार्ग

---

* अस्सल.

निष्कंटक झाला; हें पाहून शिवाजीनें, "मथुरेस माणसें व पत्रें पाठविलीं. त्याजवरून कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहित संभाजी राजियास जानवें व वस्त्रें नेसवून, आपला भाचा म्हणवून राजगडास आले*" "येतांना मार्गीं चौकीवर चाहूल जाली कीं, संभाजीराजे यांजला ब्राह्मण नेतात. तेव्हां उभतांनीं निराकरण करून दहींपोहे त्रिवर्गपंतांनीं एक स्थळीं भक्षिलें आणि घेऊन आले÷" "आणि राजियास भेटले. मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर जहाला. मोठा दानधर्म केला. आणि कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूंस 'विश्वासराव' हा किताब दिला. लक्ष होन बक्षिस दिले. तिघा बंधूंस दहा हजार होन तैनात केली. मातबर लोकांत आसामी घातली. मोकाशे महाल दिधले. तसेच निराजीपंत हे बराबरी बहुत श्रमसाहस करून आले व दत्ताजीपंत बरोबरी होते व राघो मित्राहि बरोबरि होता.*" त्या सर्वांचा उत्तम परामर्ष घेऊन त्यांना राज्यांत हुद्याच्या जागा दिल्या. "समागमें जे जे लोकीं श्रमसाहस केला त्यांस नावाजिलें.*"

पश्चात्ताप.

आपल्या हातांत सांपडलेला शिवाजी निसटून गेला हें शल्य औरंगजेबास जन्मभर सतत टोंचत होतें. तो शेवटीं अहंमदनगर येथें मृत्यु पावला त्यापूर्वी त्यानें जें आपलें मृत्युपत्र केलें आहे त्यांत एक कलम पुढीलप्रमाणें आहे. "सर्व राज्यांत हेर ठेवून सूक्ष्म बातमी ठेविणें हेंच राज्याच्या बळकटीचें मुख्य साधन आहे. यांत क्षणभरहि दुर्लक्ष झालें कीं, राजाला जन्मभर पश्चात्ताप करीत मोठ्या दुःखांत आयुष्य कंठावें लागतें. स्वतः माझेंच उदाहरण पाहा ! माझ्या थोडक्याशा निष्काळजीपणामुळें शिवाजी आग्र्याच्या कैदेंतून निसटला आणि त्यामुळें माझ्या मरत्या काळांत मला दक्षिणेंत येऊन राहावें लागलें."

११ जयसिंगाची राजनिष्ठाः—आतां आपण दक्षिणेंत जयसिंग काय करीत होता हें पाहूं या. शिवाजीला आग्र्यास कैद केल्यावर बादशहाशीं व कुमार रामसिंगाशीं जयसिंगाच्या झालेल्या पत्रव्यवहाराचें सार मागें दिलेंच आहे. त्यानंतरचा वृत्तांत आतां कथन करावयाचा आहे. तारीख १९ ऑगस्ट सन १६६६ रोजीं शिवाजी आग्र्याहून निघाला व त्यानंतर जयसिंगाचे दिवस लागलेच फिरले. त्याला विजापुर सर करितां आलें नाहीं म्हणून बादशाही दरबारांत त्याची नाचक्की झाली. आणि शिवाजीला

चिंता.

---

* सभासद. ÷ म. सा. छो. ब.

पळविण्यांत रामसिंगाचें अंग आहे असा वादशहास संशय आला. हें ऐकून तर जयसिंगास फारच दुःख झालें. तो वादशहास लिहितो, 'अनेक युक्त्या करून व आमिषें दाखवून मी शिवाजीस उत्तरेकडेस पाठविलें त्याचा असा विपरीत परिणाम होऊन मलाच त्याबद्दल जवाबदार धरण्यांत यावें हा दैवदुर्विलास होय. पण नशिबांत जें लिहिलें असेल तें कोण मिथ्या करूं शकेल ! रामसिंगाची जहागीर जप्त केली व त्यास चाकरीवरून काढून टाकिण्याचें घाटत आहे असें मला कळतें. आणि याला कारण म्हणजे शिवाजीच्या कांहीं ब्राह्मण सरदारांनीं 'रामसिंगानें शिवाजीस पळून जाण्यास मदत केली.' अशी कबुली दिली हें आहे असें समजतें. पण हें सगळें बनावट आणि माझ्या वाइटावर असलेल्या दरबारी लोकांचें कृत्य आहे. शिवाय शिवाजीच्या लोकांवर तरी इतका विश्वास कां ठेवावा ? ते कशावरून खोटें सांगत नसतील ? खरें म्हटलें तर असें अराजनिष्ठ कृत्य माझ्या मुलाच्या हातून कधींहि होणार नाहीं. ज्याच्या हातून होईल त्याचा सत्यनाश होवो ! ! "

शोध.

आग्ऱ्याहून निघाल्यावर शिवाजी दक्षिणेंत येणार हें नक्कीच होतें. व त्यायोगें जयसिंग अगदीं भयभीत होऊन गेला होता. तारीख ५ नोव्हेंबर १६६६ च्या पत्रांत तो लिहितो. 'माझे ग्रह आतां फिरले असे दिसतात. रात्रंदिवसाच्या काळजीनें मी अगदीं खंगत चाललों आहें. तहाच्या वाटाघाटींत विजापुरकर निष्कारण कालहरण करीत आहेत. शिवाजीची बातमी काढण्यासाठीं मी देशोदेशीं हेर पाठविले आहेतच.'

रोहिडा.

याचवेळीं शिवाजीचे सरदारहि कांहीं चळवळ करूं लागले होते असें दिसतें. तो म्हणतो, 'किल्ल्यावर दाणागोटा अगर दारूगोळा यांची मुळींच बेगमी नाहीं. आणि येथें जवळच शिवाजीच्या लोकांनीं लढाईची चांगलीच तयारी केली असून ते लवकरच अदिलशाही प्रांतावर चालून जाणार आहेत असें ऐकतों. कदाचित् हें निमित्त असेल व ते रोहिड्यावरच चालून येतील. ही बातमी ऐकतांच जयसिंगाचें धावें दणाणलें. त्यानें रोहिड्यावर एकदम दारूगोळ्याची भरती करवून सुखमल चव्हाणाच्या हाताखालीं पांचशें शिबंदी नवीन रवाना करण्याचें ठरविलें, व 'कायमचा किल्लेदार उदयभाण येईपर्यंत तरी किल्ल्यावर सावधगिरीनें राहा' असा निरोप पाठविला.

शिवाजी राजगडास येऊन पोंचल्याची निश्चित बातमी जयसिंगास सन १६६६ च्या डिसेंबरांत जाऊन पोहोंचली. त्याचा चिटणीस दरबारास लिहितो, 'शिवाजी राजगडास येऊन पोहोंचला असें खात्रीलायक कळतें. परंतु संभाजी त्याच्याबरोबर नाहीं त्यामुळें तो मोठ्या काळजींत आहे. मोगल बादशहास शरण येऊन त्यांची नोकरी पतकरण्याचें तो म्हणतो. परंतु खरोखर त्याचे मनांत काय आहे हें कोणासच कळत नाहीं. शिवाजीचा जांवई महादाजी निंबाळकर यानें अलीकडे पुण्याच्या बाजूला आम्हांला त्रास दिला होता. त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं मिर्झा राजा जयसिंगानें तानाजी (बाबाजी ?) भोंसल्याला सुप्यास, हालालखानास इंदापुरास, गालिबखानास चांभारगोंद्यास, हसनखान, अबदुल रसूल इत्यादिकांनासुद्धां त्याच बाजूस आणि त्रिंबकजी भोंसले वगैरेंना राशीनकडेस रवाना करून दिलें. तानाजी भोंसले सगळ्यांच्या अगोदर जाऊन पोहोंचला व त्यानें महादाजी निंबाळकराशीं एकदम गांठ घातली. त्यांत महादाजीचा पराभव होऊन त्याचे पुष्कळ साथीदार मारले गेले आणि त्याचा जरीपटका, तुरा व दीडशें घोडे तान्हाजीच्या हातीं सांपडले. तुरा आणि जरी पटका यांजवर मराठ्यांचें फार प्रेम असल्यानें महादाजीनें शरण येऊन ते परत मागितले; परंतु तान्हाजीनें ते देण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां महादाजीनें विजापुराकडून मदत आणवून तान्हाजीवर एकदम हल्ला केला व त्याला ठार मारून टाकिलें. अण्णाजी (दत्ताजी ?) देशमुख हा महादाजीचा सरदारहि या चकमकींत पडला व खुद्द महादाजीहि जखमी झाला आहे असें कळतें. ही बातमी येतांच जयसिंग स्वतःच महादाजीवर चालून जाण्यास सिद्ध झाला होता परंतु असें केल्यानें विजापुरकरांना अधिक जोर येईल असें त्यास सांगून त्याचें मन वळविलें व महादाजीवर जाण्याचा बेत रहित करविला. त्यामुळें त्यानें अबदुल हमीद यास पांच हजार सैन्यानिशीं त्या बाजूस पाठविलें आहे.'

चढाई.

यानंतर जयसिंगाचें एक महत्त्वाचें पत्र देऊन हें प्रकरण पुरें करूं. मुख्य दिवाण जाफरखान यास जयसिंग लिहितो. " विजापुर, गोंवळाकोंडा व शिवाजी यांची खबर घेण्यांत मी आतांपर्यंत यत्किंचित्हि कसूर केली नाहीं व पुढेंहि करणार नाहीं. शिवाजीचा कांटा कायमचा दूर करण्यासाठीं मी एक युक्ति योजिली आहे. ती बादशहास पसंत असल्यास मी ती अंमलांत आणण्याचा प्रयत्न करीन. आम्ही रजपूत लोक मराठ्यांस फारच हलके समजतों व त्यांच्याशीं रोटीव्यवहारसुद्धां करीत नाहीं. मग

युक्ति.

बेटीव्यवहाराचा प्रश्नच कशास पाहिजे ? तथापि शिवाजीची मुलगी मी माझ्या मुलास करतों असें बोलणें लावून त्या निमित्तानें शिवाजीस मी आपल्या गोटांत बोलावून आणून माझ्या माणसाकडून त्याला ठार मारून टाकितों. मात्र हा माझा विचार अत्यंत गुप्त ठेविणें अवश्य आहे. तरी या बाबतींत बादशहाचा हुकूम मला ताबडतोब पाठवावा म्हणजे पुढील तजविजीस लागतां येईल."

सतराव्या शतकांतल्या राजकारणाच्या नीतिमत्तेवर या पत्रानें पुष्कळ प्रकाश पडतो. अफजलखानाच्या भेटींत खानानें शिवाजीस ठार मारिलें नसतें असे कित्येक भोळे लोक म्हणतात त्यांनीं, स्वतःची राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठीं जयसिंग शिवाजीचा खून करण्यास तयार झाला होता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

निष्कर्ष.

प्रकरण ७ वें

मोगलांचा समाचार

सन १६६७–१६७०

[१ मोगली सत्तेची ओढाताण. २ मोगलांशीं तह सन १६६८. ३ मोगलांशीं दुसरें युद्ध. ४ मुअज्जम व दिलेर यांचें भांडण. ५ सुरतेची दुसरी लूट सन १६७०. ६ वणी दिंडोरीची लढाई ता. १७–१०–१६७०. ७ वऱ्हाड वागलाणवर स्वारी.]

मोगली सत्तेची ओढाताणः—सन १६६६ च्या मार्चमध्यें शिवाजी दक्षिणेंतून आग्र्यास जाण्यास निघाला व नोव्हेंबरमध्यें तो परत दक्षिणेंत आला. परंतु त्या नऊ महिन्यामध्यें दक्षिणेंत मोगलांच्या सत्तेंत जमीन अस्मानाचें अंतर पडलें होतें. मराठ्यांशीं सामना देण्याची जयसिंगांत आतां धमक उरली नव्हती. तो म्हातारा तर होताच पण जन्मभर श्रम केल्यानें तो आतां थकूनहि गेला होता. कौटुंबिक काळजीनें तो जर्जर झाला होता व विजापूर सर न झाल्यानें त्याची नाचक्की झाली होती. या सर्वांचा परिणाम त्याच्या शरीरयष्टीवर होऊन 'म्हातारा आतां फार दिवस काढीत नाहीं' असच प्रत्येकास वाटूं लागलें. शेवटीं सन १६६७ च्या मे मध्यें शहाजादा मुअज्जम यानें येऊन दक्षिणच्या सुभेदारीचा हवाला सोंपून घेऊन जयसिंगास मोकळें केलें. तत्काळ जयसिंग परत जाण्यास निघाला. त्याला हा अपमान असह्य झाला व जगाच्या दृष्टीनेंहि त्याची राजनिष्ठा तुच्छ ठरली; यामुळें त्याला अत्यंतिक मानसिक यातना होऊन तो रस्त्यांतच बऱ्हाणपुर येथें तारीख २ जुलई सन १६६७ मध्यें निवर्तला. जयसिंगानें आजन्म मोगली साम्राज्याच्या हितासाठीं जीवापाड मेहनत केली पण तिचें असें चीज झालें !!!

जयसिंगाचा मृत्यु.

शहाजादा मुअज्जम हा आळशी व मूर्ख होता. आणि महाराजा जसवंतसिंगावर त्याचा विशेष लोभ असे. असे हे दोघेजण दक्षिणेंत मोगलांचे मुख्य अधिकारी म्हणून आल्यानें शिवाजी यांच्या बाबतींत निर्धास्त झाला. पुढें लवकरच म्हणजे सन १६६७ च्या ऑक्टोबर महिन्यांत मोगलांचा प्रख्यात शूर सेनापति दिलेरखान हा गोंड प्रांतांतून येऊन

शहाजादा.

मुअज्जम यास मिळाला. दिलेरखान हा मराठ्यांचा कट्टा शत्रु होता. तथापि त्याचें बादशाही दरवारांत अतोनात वजन असलेलें शहाजादा मुअज्जम यास मुळींच खपत नव्हतें. त्यामुळें मुअज्जम दिलेरचा अत्यंत द्वेष करीत असे. एकदां दिलेरनें जसवंतसिंगाचा भर दरवारांत कांहीं कारणावरून अपमान केल्यानें तर मुअज्जम दिलेरवर फारच संतापून गेला होता. बिकानेरचा राणा राव कर्ण राठोड हा दिलेरच्या सैन्यांत एक सरदार होता. त्याचे रजपूत शिपाई सैन्यांत लुटालुटी करीत व दरोडे घालीत. त्यामुळें राव कर्ण यास एकदम कैद करावें असा बादशहाचा दिलेरला हुकुम आलेला होता. दिलेर बिदरवर चालून गेला, तेव्हां राव कर्ण त्याचे बरोवर होता. परंतु रावानें शहाजाद्याच्या हुकुमानें औरंगाबादेस मुक्काम केला. शहाजादा त्याला पैशाची वगैरे मदत करीतच असे. सारांश शहाजाद्याचें व दिलेरचें असें फाटत जाऊन दिलेरचे शत्रु शहाजाद्याच्या आश्रयानें राहूं लागले.

याप्रमाणें शहाजादा व दिलेर यांचीं मनें एकमेकांविषयीं कलुषित झालीं होतीं;

इराणी शहाची स्वारी.

हें खरें असलें तरी, शहाजाद्याहून अधिक कर्तृत्ववान् असा सुभेदार जरी यावेळीं दक्षिणेंत असता तरी, त्याची पाठराखणी दिल्लीहून मुळींच झाली नसती. कारण शिवाजी आग्र्याहून निघून गेल्यावर बरोबर दोनच आठवड्यांनीं पंजाबकडून अशी बातमी आली कीं, इराणचा पादशहा हिंदुस्थानावर चालून येत आहे. इराणी शहाच्या स्वारीची भीति पुढें डिसेंवर अखेरपर्यंत होतीच. आणि ती कमी होते तोंच सन १६६७ च्या मार्चमध्यें पेशावरास युसफझाई लोकांनीं बंड केल्याची वार्ता येऊन पोहोंचली. या बंडाच्या निवारणार्थ पुढें वर्षभरपर्यंत औरंगजेबाला पेशावराकडेस सारख्या फौजा वारंवार पाठवाव्या लागत होत्या. सारांश अशा धामधुमीच्या काळांत शिवाजीकडेस लक्ष देण्यास बादशहास सवडहि नव्हती व शिवाजीस दुखविणें त्याला इष्टहि नव्हतें.

२ मोगलांशीं तह १६६८:—इकडे शिवाजीलासुद्धां मोगलांशीं झगडा करण्याची तूर्त फारशी हौस नव्हती. आग्र्याहून परत आल्यावर तीन वर्षेंपर्यंत त्यानें स्वस्थ राहून आपल्या राज्याची योग्य व्यवस्था केली. राज्याचा वसूल व्यवस्थित रीतीनें गोळा होणें, किल्ल्याची दुरुस्ती करून तेथें बेगमी करून ठेविणें, पश्चिम किनाऱ्यावर आपला अंमल बसविणें इत्यादि महत्त्वाच्या कामासाठीं शिवाजीला स्वस्थता पाहिजेच होती.

स्वस्थता.

सन १६६७ च्या एप्रिलमध्यें त्यानें औरंगजेब पादशहास पत्र लिहून कळविलें

पत्र.

कीं, 'बादशाही सैन्य आपल्यावर चालून आल्याचें कळल्यापासून आपण अगदीं घाबरून गेलों आहोंत. आपण बादशहास शरण आलों आहोंत व चारशें लोकांनिशीं पुत्र संभाजी हा बादशहाच्या फौजेंत सामील होण्यास केव्हांहि तयार आहे.'

परंतु औरंगजेबानें या पत्राकडेस मुळींच लक्ष दिलें नाहीं. तेव्हां शिवाजीनें

संधान.

महाराजा जसवंतसिंगाकडेस संधान बांधून त्याच्या मध्यस्थीनें मोगलांशीं तह करण्याचा प्रयत्न चालविला. शिवाजी जसवंतसिंगास लिहितो, "बादशहाची माझ्यावर खप्पा मर्जी झाली आहे, त्यामुळें मला फार वाईट वाटतें. मी माझ्या एकट्याच्या हिंमतीवर काबूल, कंदाहार सर करून बादशहास द्यावें असा माझा हेतु होता, पण आतां त्याचें काय ? आम्यास माझ्या जिवाला अपाय होईल असें मला निश्चितपणें वाटल्यामुळें मी तेथून निसटून आलों. माझा पुरस्कर्ता मिर्झा राजा जयसिंग हा आतां मरण पावला असल्यानें माझा त्राता असा तुमच्या (जसवंतसिंगा) शिवाय दुसरा कोणीच नाहीं. तरी तुमच्या मध्यस्थीनें मला माफी मिळाल्यास माझा मुलगा बादशाही मनसब पतकरून शहाजादा मुअज्जम याचे सैन्यांत फौजेनिशीं येऊन दाखल होईल."

महाराजा जसवंतसिंग व शहाजादा यांचेवर या पत्राचा अवश्य तो परिणाम

किताब.

होऊन त्यांनीं बादशहाकडेस शिवाजीची शिफारस केली. आणि बादशहानें ती मान्य करून शिवाजीला राजा हा किताब दिला.* परंतु त्याच्या किल्ल्यांपैकीं मात्र एकहि किल्ला त्यास परत दिल्याचें दिसत नाहीं. यावेळीं झालेल्या तहाच्या अटी कोठेंहि प्रसिद्ध नाहींत. तथापि हा तह पुढें दोन वर्षेंपर्यंत टिकला.

तहांत ठरल्याप्रमाणें शहाजादा मुअज्जम याच्या दरबारीं औरंगाबादेस संभाजीला

संभाजीचा सत्कार.

पाठविण्यांत आलें. तारीख ४ नोव्हेंबर १६६७ रोजीं त्याची व शहाजाद्याची भेट होऊन दुसरेच दिवशीं संभाजीला परत घरीं जाण्याचा हुकुम झाला. निराजी रावजी व प्रतापराव गुजर यांना अनुक्रमें तारीख २ व ५ ऑगस्ट रोजीं फौजेसह औरंगा-

---

* मुअज्जमचें ता. ९–३–१६६८ चें शिवाजीस पत्र.

बादेस पाठविण्यांत आलें. संभाजीला पंच हजारी सरदार बनविण्यांत येऊन एक हत्ती व एक रत्नखचित जमिया त्यास बादशहाकडून देण्यांत आला, व वऱ्हाडांत जहागीरहि देण्यांत आली. संभाजीच्या फौजेपैकीं अर्धी फौज औरंगाबादेस ठेवून बाकीची अर्धी वऱ्हाडांत जहागिरीचा वसूल करण्यासाठीं निघून गेली. याप्रमाणें दीड वर्षपर्यंत सगळें सुरळीत चाललें होतें.

व्यवस्था.

सन १६६७, १६६८ व १६६९ या तीनहि वर्षांत शिवाजीराजा अगदीं स्वस्थ होता. मोगलांशीं झालेल्या तहाप्रमाणें तो वागत होता व शहाजाद्याच्या हुकुमाप्रमाणें वेळोवेळीं मोगलांना शक्य ती मदत करीत होता. विजापुरकरांशीं जरी त्याचा यावेळीं तह झाला नव्हता तरी त्यांच्याशींहि तो मित्रत्वानेंच वागणूक ठेवीत होता. विजापुरी प्रांतावर त्यानें यावेळीं स्वाऱ्या वगैरे कांहींहि न केल्यामुळें कारवार वगैरेकडील प्रांत मोठ्या सुखांत नांदत होता. विजापुरी अंमलदारहि शिवाजीच्या वाटेस जात नव्हते. यावेळीं शिवाजी राजगडावर राहत असे. तारीख १७ जुलई १६६९ च्या पत्रांत हुबळीचे इंग्रजी व्यापारी शिवाजीच्या या शांततेच्या वागण्याबद्दल प्रशंसापूर्वक उल्लेख करितात. या तीन वर्षांत शिवाजीनें आपल्या राज्याची उत्तम व्यवस्था लाविल्याचें दिसतें.

कुरापत.

सन १६६९ मध्यें औरंगजेब पैशाच्या मोठ्या अडचणींत आल्यानें सगळ्या राज्यांत त्यानें खर्च कमी करण्याचा हुकुम फर्माविला. दक्षिणेंतील मोगली फौज त्यामुळें एकदम कमी करण्यांत आली. शिवाजीनें लागलीच ती सगळीच्या सगळी फौज आपल्या पदरीं ठेविली. सन १६६६ मध्यें जेव्हां शिवाजी औरंगजेबाच्या भेटीसाठीं उत्तरेकडेस जाण्यास निघाला तेव्हां त्यास वाटखर्चासाठीं म्हणून जयसिंगानें दक्षिणच्या मोगली खजिन्यांतून एक लक्ष रुपये दिले होते. (पृष्ठ १०५ पहा). ही रक्कम शिवाजीकडून वसूल करून घ्यावी अशीहि दुर्बुद्धि याच वेळीं औरंगजेबास सुचून, रक्कमवसुलीसाठीं त्यानें संभाजीला दिलेली वऱ्हाडांतील जहागीर एकदम जप्त केली. हिंदुस्थानांतील सगळीं देवळें पाडून टाकण्याचा हुकूम औरंगजेबानें याच वेळीं म्हणजे तारीख ९ एप्रिल १६६९ रोजीं काढिला व त्याप्रमाणें सप्टेंबर महिन्यांत काशीच्या विश्वेश्वराचें देऊळ जमीनदोस्तहि करण्यांत आलें. औरंगजेबाचा हा उपक्रम पाहून शिवाजीनें प्रतापराव गुजराला औरंगाबादेहून गुप्तपणें परत बोलाविलें व वऱ्हाडांतील फौजहि परत आली. मात्र तिनें येतांना वाटेंत पुष्कळ लुटालूट केली. शिवाजीची लष्करी तयारीहि यावेळीं उत्तम प्रकारची झालेली होती.

३ मोगलांशीं दुसरें युद्ध. १६७०:—तीन वर्षापूर्वी झालेला तह सन १६७० च्या जानेवारींत वरप्रमाणें उघडपणें मोडला. याच्या कांहीं पूर्वी चार मराठा सरदारांनीं दक्षिणच्या मोगली फौजेंतील नोकरी सोडल्याचें वर्तमान औरंगजेबास तारीख ११ डिसेंबर सन १६६९ रोजींच कळलें होतें. म्हणून त्या फौजेच्या मजबुतीची त्यानें व्यवस्था चालविली. तारीख २६ जानेवारी सन १६७० रोजीं त्यानें गोंड प्रांतांतील देवगड येथें असलेल्या दिलेरखानास एकदम औरंगाबादेस जाण्याचा हुकुम पाठविला. खानदेशचा योग्य बंदोबस्त करून नंतर शहाजादा मुअज्जम याचे मदतीस जाण्यास दाऊदखानास फर्मांविण्यांत आलें. व इतरहि अनेक अंमलदारांच्या बदल्या करण्यांत आल्या.

तयारी.

बंडाळी.

इकडे शिवाजीनेंहि 'मोगल देश मारून धुंद उठविली.' पुरंदरच्या तहांत जे किल्ले मोगलांना दिले होते त्यांच्यावरहि हल्ले करण्यास सुरुवात केली. मोगलांचे बरेच किल्लेदार या चकमकींत मारले गेले आणि एकामागून एक किल्लेहि मराठ्यांच्या स्वाधीन झाले. "चहू महिन्यांत सत्तावीस गड घेतले. मोठी ख्याति केली. हें औरंगजेबास कळोन मनांत चिंतातुर झाला.*" कोंडाणा ऊर्फ सिंहगड येथें मोगलांच्या तर्फे उदयभान हा शूर रजपूत किल्लेदार होता. परंतु तोहि किल्ला हशमांचा सुभेदार तान्हाजी माळुसरा यानें तारीख ४ फेब्रुवारी सन १६७० रोजीं अचानकपणें घेतल्यानें सगळे आश्चर्य-चकित होऊन गेले. अंधाऱ्या रात्रीं कांहीं कोळ्यांचे सूचनेवरून कल्याण दरवाजाच्या बाजूला किल्ल्याच्या तटास घोरपड लावून तीनशें शूर मावळ्यांसह तान्हाजी किल्ल्यावर गेला, आणि त्यानें एकदम कापाकापीस सुरवात केली. उदयभानचे शूर १२०० रजपूत किल्ल्याचें संरक्षण करीत होते. ते या मावळ्यांवर तुटून पडले. परंतु हरहर महादेव या गर्जनेनें मावळेहि जिवावर उदार होऊन लढले. प्रत्यक्ष उदयभान आणि तान्हाजी यांचें द्वंद्व अत्यंत चुरशीचें होऊन दोघेहि एकमेकांच्या तरवारीस बळी पडले. याप्रमाणें पुढारी पडतांच मावळे पळून जाण्याच्या बेतांत होते. परंतु इतक्यांत कांहीं मावळ्यांनीं कल्याण दरवाजा उघडून दिल्यामुळें तान्हाजीचा भाऊ सूर्याजी हा पुष्कळ सैन्यानिशीं आंत आला, व त्यानें किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. यावेळीं शिवाजी तेथून ९ मैल दूर रायगडावर राहात होता. सूर्याजीनें किल्ला सर केल्यावर तेथील झोंपड्यांना आग

* सभासद.

लावून दिली, व किल्ला सर केल्याची ही खूण शिवाजीस समजली. तान्हाजीच्या मृत्यूवद्दल शिवाजीला फार वाईट वाटलें व "गड आला पण सिंह गेला" असे उद्गार त्याच्या तोंडांतून निघाले. कोंडाणा घेण्याचा हुकूम तान्हाजी यास केला तेव्हां तो आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारींत होता, परंतु हुकुम पावतांच घरचें कार्य वाजूस ठेवून राष्ट्रीय कार्यासाठीं प्राणहि देण्यास तो सिद्ध झाला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तान्हाजीच्या बरोबर त्याचा ८० वर्षांचा वृद्ध शेलारमामा हाही होता. उदयभानानें तान्हाजीस प्रथम मारल्यावर शेलारमामानें उदयभानास मारिलें असें पोवाड्यांत लिहिलें आहे.

धुंद.

ता. ८ मार्च १६७० रोजीं निळोपंतानें पुरंदर कावीज केला व तेथील किल्लेदार राझीउद्दीनखान यास कैद केलें. पुढें थोडे दिवसांनीं मराठ्यांनीं चांदोर लुटलें. तेथील किल्लेदार किल्ल्यावर पळून गेला. या लुटींत मराठ्यांना एक हत्ती, बारा घोडे आणि चाळीस हजार रुपयांचा मोगली खजिना प्राप्त झाला. राजा विट्ठलदास याचा पुतण्या मनोहरदास गौर हा माहुली येथें मोगलांच्या तर्फे किल्लेदार होता. हा जातीनें रजपूत असून मोठा शूर होता. माहुलीला शिवाजीनें स्वतः सन १६७० च्या फेब्रुवारींत वेढा घातला आणि एका रात्रीं ५०० शें निवडक मावळे किल्ल्याच्या भिंताडावर शिड्यांच्या सहाय्यानें चढवून दिले. परंतु मनोहरदास किल्ल्यावर सावध होता. तो एकदम या लोकांवर चालून आला व त्यानें मावळ्यांची कत्तल केली. हें पाहून शिवाजीनें माहुलीचा नाद सोडून दिला व तो कल्याण भिवंडीवर चालून गेला. तेथील ठाणेदार उजबेगखान याला मारून कल्याण भिवंडी सर केली. कोंकणांतील फौजदाराला पिटाळून लाविलें आणि नांदेडचा मोगल फौजदार मराठ्यांच्या भीतीनें पळून गेला.

याप्रमाणें दक्षिणेंत शिवाजीनें मोगली सैन्याला अगदीं जर्जर करून टाकिलें.

कुरेशी.

नाहीं म्हणावयाला दाऊदखान कुरेशी यानें मोगलांची अब्रू थोडीशी संभाळण्याचा प्रयत्न केला. दाऊदखान हा स. १६६५ मध्यें जयसिंगाबरोबर दक्षिणेंत आला होता. तो दिलेरखानाच्या खालोखाल पराक्रमी होता. शिवाजीनें दक्षिणेंत प्रळय करून सोडला आहे हें पाहून दाऊदखानानें आपल्या मुलाला खानदेशांत ठेविलें. व तो स्वतः २८ मार्च १६७० रोजीं अहंमदनगरमध्यें येऊन दाखल झाला. यावेळीं शिवाजीचें सैन्य पारनेर, जुन्नर आणि माहुली येथें लुटालूट करीत होतें. त्याच्यावर दाऊद-

खान २ एप्रिल १६७० च्या सुमारास सात हजार स्वारांसह चाल करून गेला व त्यानें पारनेर व जुन्नर आपल्या ताब्यांत घेतलें. शिवाजीनें यावेळीं तीन मोगली किल्लचांना वेढा दिला होता. दाऊदखान त्याचेवर चालून गेला. हमीदखान आणि लुदीखान असे दाऊदखानाचे दोन शूर मुलगे फौजेच्या बिनीवर होते. ते आपलें सैन्य घेऊन मराठ्यांवर चाल करून जातांच मराठे वेढा उठवून पळून गेले. यानंतर हे दोन सरदार, माहुलीपासून वीस मैलांवर एका किल्लयाची मराठे दुरुस्ती करीत होते, त्यांवर चालून गेले, व त्यांनीं किल्ला जमीनदोस्त करून टाकिला. एप्रिलच्या अखेरीस दाऊदखान स्वतः माहुलीला गेला. आणि किल्लयावर पुरेशी बेगमी करून जुन्नरला परत आला. या पराक्रमाबद्दल मोगली दरबारांत दाऊदखानाची मोठी प्रशंसा झाली. परंतु याच वेळीं म्हणजे एप्रिलच्या अखेरीस शिवाजी अहंमदनगर, जुन्नर आणि परेंडा यांच्या जवळचीं खेडीं लुटीत होता.

माहुली.

माहुलीला मनोहरदास हा किल्लेदार होता व त्यानें एकदां मोठ्या शौर्यानें किल्ला लढविला हें माग सांगितलेंच आहे. परंतु मनोहरदास ह्याला तो हुरूप आतां राहिला नव्हता. किल्लयावरील भिकार बेगमी, तुटपुंजी शिबंदी, मोगलांचा सर्वत्र होत असलेला पराजय आणि मराठ्यांची सरशी यामुळें मनोहरदासहि खचून गेला व त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्याच्या जागीं आलावर्दीबेग याची नेमणूक करण्यांत आली. शिवाजीनें ही संधि पाहून ता. १६ जून १६७० रोजीं एकदम किल्लयावर हल्ला केला व दोनशें लोकांसह नवीन किल्लेदारास ठार मारून माहुली किल्ला सर केला.

इतर किल्ले.

तारीख १३ मे रोजीं लोहगड, १५ जून रोजीं हिंदोळा, २२ जून रोजीं करनाळा आणि २४ जून रोजीं रोहिडा असे एकामागून एक किल्ले शिवाजीनें सर करून ऑगस्ट महिन्यांत मोगली मुलुखांत लुटालूट केली व जुन्नरला वेढा दिला.

४ मुअज्जम व दिलेर यांचें भांडण:—यावेळीं दक्षिणेंत असलेल्या मोगलांच्या अंमलदारांचें एकमेकांशीं भांडण लागलें होतें. त्या भांडणांतच स. १६७० चे पहिले सहा महिने गेले. दिलेरखान यावेळीं गोंड प्रांतांत मोगलांची सत्ता प्रस्थापित करीत होता, व त्यांत त्याला यशहि येत होतें. परंतु त्यानें एकदम शहाजादा मुअज्जम याजकडे जावें असे औरंगजेबानें वारंवार हुकुम पाठविल्यामुळें तो ता. २ मार्च १६७० रोजीं नागपुराहून निघाला. तो १२ एप्रिल रोजीं औरंगाबादेस पोहोंचेल असें

कारण.

वाटत होतें. त्याचें आणि शहाजाद्याचें अगदीं वांकडें होतें. व स. १६६७ मध्यें या दोघांची चकमक उडाली होती हें माग (पृष्ठ १२२ पहा) सांगितलेंच आहे. ता. ८ एप्रिलच्या सुमारास दिलेरखान औरंगाबादेपासून २६ मैलांवर पाथरी येथें येऊन पोंचला. आपणांस येऊन भेटण्याबद्दल शहाजाद्यानें त्यास येथेंच हुकुम पाठविला. येथें कांहींतरी काळेंबेरें आहे व प्रत्यक्ष भेटींत आपला खून होईल किंवा निदान आपणांस कैद तरी होईल अशी शंका दिलेर यास येऊन त्यानें आजारीपणाच्या निमित्तानें शहाजाद्याच्या भेटीस जाण्याची टाळाटाळ चालविली. हें पाहून शहाजाद्यानें दिलेरखान बंडखोरी करूं लागला आहे अशी तक्रार औरंगजेबाकडेस केली. शहाजाद्याचा हस्तक महाराजा जसवंतसिंग यानेंहि शहाजाद्याच्या तकरारीस पुष्टी दिली. इकडे दिलेरनेंहि मुअज्जमविरुद्ध अशी फिर्याद केली कीं, 'शहाजाद्यानें दक्षिणेंत मोगली मुलुखाच्या संरक्षणासाठीं कांहीं-एक तजवीज केली नाहीं, इतकेंच नव्हे पण, तो शिवाजीस सामील झालेला आहे. म्हणून जर उत्तम तोफखाना आणि वेढ्याचें सामान पुरवून दोन वर्षेंपर्यंत दक्षिणची सुभेदारी आपणांस सोंपण्यांत आली तर आपण मराठ्यांचा अगदीं नायनाट करून टाकूं.'

चौकशी.

अशा दोघांच्याहि तकरारी जेव्हां बादशाही दरबारांत जाऊन पोहोंचल्या तेव्हां त्यांचा विचार करणें औरंगजेबाला भाग पडलें. विशेषतः शहाजाद्यानें शिवाजीशीं काय संगनमत केलें आहे व तो आणि दिलेर यांपैकीं खरा बंडखोर कोण आहे याची चौकशी करणें अवश्य होतें. म्हणून त्यानें आपला कंचुकी (=Chamberlain=खानसामा) इत्फिखरखान याला चौकशीसाठीं पाठविलें. त्यानें दक्षिणेंत येऊन चौकशी करण्याचे ऐवजीं भांडणाच्या आगींत तेल मात्र ओतलें. त्यानें शहाजादा व दिलेर या दोघांनाहि खूष करण्याचा प्रयत्न केला. दिलेरच्या मनांत शहाजाद्या-विषयीं द्वेष भरला आहे असें शहाजाद्यास त्यानें सांगितलें व भेटीस गेल्यास शहाजादा दिलेरला कैद करील असें दिलेर यास कळविलें. यामुळें या दोघांतील वैर अधिकच वाढलें.

सिद्धता.

दिलेरखान उघड रीतीनें आपले हुकुम धाब्यावर बसवितो व त्याची अफगाण फौज कूच करीत असतांना मोगली मुलुखांतच लुटालूट करिते अशी शहाजाद्यानें पुनः बादशहाकडेस फिर्याद नेली, आणि स्वतंत्र बातमीपत्रांतूनहि सदर तकरार बादशहास कळली. आपण यापुढें

दक्षिणेंत राहणें अगदीं अशक्य आहे अशी दिलेरखानाची खात्री होऊन तो परवानगीची अपेक्षा न करितां उत्तरेस बादशाही दरबारांत परत जाण्याचा विचार करूं लागला. परंतु हा त्याचा विचार मुअज्जम यास कळतांच उत्तरेकडेस दंगल उडवून देण्यासाठींच दिलेर जात आहे असें त्यानें बादशहास कळविलें. तत्काळ तेथून हुकुम आला कीं, 'दिलेरखानास दक्षिणेंतच अडकवून ठेवावें.' झालें. हा हुकूम येतांच दिलेरशीं लढाई देण्याची सिद्धता शहाजादा करूं लागला. दूर असलेलें मोगली सैन्य त्यानें जवळ बोलाविलें व सैन्यांत नवीन भरतीहि करण्याची सुरुवात केली. यावेळीं दिलेरखान गोदावरीच्या कांठीं मराठ्यांशीं लढण्यांत गुंतला होता. त्याला वरील बादशाही फर्मानाची खबर कळतांच तो अगदीं घाबरून गेला. राजपुत्रावद्दल पूर्वी त्याला जी धास्ती वाटत होती ती आतां दुणावून तो उद्विग्न झाला. ऑगस्ट महिना असल्यानें भर पावसाळा होता तरी त्यानें तंबू वगैरे सगळें सामान एकदम जाळून टाकिलें व शहाजाद्याच्या भयानें तो उत्तरेकडेस माळव्यांत पळून चालला.

पाठलाग.

दिलेरखान सडा होऊन पळत आहे हें पाहून शहाजादा व जसवंत या दोघांनीं शक्य तेवढें सैन्य उभारून त्याचा तापीनदीपावेतों पाठलाग केला. या पाठलागांत त्यांनीं शिवाजीलाहि मदतीस बोलाविलें होतें. सारांश, याप्रमाणें मोगली फौजेंत या वेळीं अनिर्वचनीय अशी यादवी माजून राहिली होती.

शकुनी.

इतक्यांत सप्टेंबर १६७० मध्यें शहाजाद्यास बादशहाचें पत्र मिळालें. त्यांत, शहाजाद्यानें औरंगबादेसच राहावें, असें फर्माविण्यांत आलें होतें. आणि शकुनी जो जसवंत त्याला शहाजाद्यापासून वेगळें करून बऱ्हाणपुरास ठेवण्यांत आलें. शहाजादा मुअज्जम हा बापाच्या आज्ञेप्रमाणें तत्काळ सप्टेंबर अखेर औरंगाबादेस जाऊन राहिला.

लुटालूट.

मोगल अंमलदारांच्या अशा यादवीनें दक्षिणेंत मोगली अंमल नाममात्र राहिला होता. आणि शिवाजीनें या संधीचा फायदा घेऊन आपले किल्ले भराभर सर केले हें मागें सांगितलेंच आहे. त्याच्या घोडेस्वारांच्या टोळ्या आतां मोगली मुलखांत निर्भयपणें लुटालूट करीत फिरूं लागल्या. आणि तो स्वतः तीस हजार सैन्यासह शत्रूंच्या मुलुखावर स्वाऱ्या करून देश काबीज करूं लागला. शहाजादा मुअज्जम त्याच्या आसपास असला

तरी शिवाजीच्या वाटेस जाण्याची त्याची छाती होत नसे असें सुरतेच्या इंग्रजानें लिहून ठेविलें आहे.

५ सुरतेची दुसरी लूट १६७०:—शिवाजी कदाचित् पुन्हा सुरत लुटील म्हणून सुरतेच्या रक्षणासाठीं स. १६७० च्या एप्रिलमध्यें बहादुरखान ५००० हजार सैन्यानिशीं सुरतेस गेला. ऑगस्टमध्यें शहाजादा मुअज्जम बापाविरुद्ध बंड करून सुरत काबीज करण्यासाठीं येत आहे अशा गप्पा उठलेल्या होत्या. शिवाजीशीं लढण्यासाठीं विजापुरकरांनीं १२००० हजार घोडेस्वार आणि मुंबईच्या इंग्रजांनीं कोरीद्रु (?) किल्ल्याच्या संरक्षणासाठीं कांहीं दारूगोळा द्यावा अशा मागण्या मोगलांनीं दोघांहिकडेस केल्या होत्या. पावसाळा थांबल्यावर आणि मुलुखगिरी सुरू होण्याच्या वेळीं मोगल कशा रीतीनें वागतात इकडे सर्वांचे डोळे लागून राहिलेले होते. परंतु शिवाजीनें नेहमींप्रमाणें ता. ३ ऑक्टोबर रोजीं अचानकपणें पुन्हां सुरत लुटून सर्वांना आश्चर्यचकित करून सोडिलें.

बोलाचाली.

गुजराथवर स्वारी करण्यासाठीं सगळा सप्टेंबर महिना शिवाजी कल्याण येथें आपल्या घोडदळाची जमवाजमव करीत होता. ही बातमी सुरतेच्या इंग्रजांना लागतांच त्यांनीं तेथल्या आपल्या वखारींतील माल व रोकड दूर नेऊन सुरक्षित स्थळीं ठेविण्यासाठीं १२ सप्टेंबर रोजीं नक्की केलें. त्यांचें कौन्सिलसुद्धां आक्टोबरच्या प्रारंभीं स्वाले येथें निघून गेलें होतें. तथापि मोगल सुभेदारानें मात्र सुरतेच्या रक्षणास अवघे तीनशें लोकच ठेविले. ता. २ ऑक्टोबर रोजीं घोडेस्वार व पायदळ मिळून १५००० लोकांसह शिवाजी सुरतेपासून २० मैलांवर येऊन उतरला आहे अशी भयंकर बातमी सुरतेस आली. ती ऐकतांच शहरांतील सर्व व्यापारी आणि मोगली अंमलदार सुरतेहून पळून गेले. मागें स. १६६४ मध्यें शिवाजीनें सुरत लुटल्यानंतर औरंगजेबानें सुरतेला नुकताच पक्का कोट घातला होता. ता. ३ ऑक्टोबर रोजीं थोडक्याशा चकमकीनंतर मराठ्यांनीं मोगली फौजेला कोटावरून पळवून लाविलें व शहरांत प्रवेश केला. फ्रेंच वखारीनें मराठ्यांना बराच मोठा नजराणा भरून आपलें रक्षण केलें. काशगरचा पदच्युत राजा अबदुल्लाखान नुकताच मक्केच्या यात्रेहून सुरतेस आला होता. त्याच्यावर मराठ्यांनीं हल्ला करून त्याचें किंमती जडजवाहिर, सोन्याची पालखी व औरंगजेबानें त्यास दिलेला किंमती नजराणा या सर्वांची यथेष्ट लूट केली. इंग्रजांच्या वखारींत त्यांनीं कांहीं ठेविलेंच

चकमकी.

नव्हतें. तथापि ५० खलाशी वखारीच्या इमारतीच्या संरक्षणासाठीं इंग्रजांनीं ठेविले होते. त्या खलाशांनीं मराठ्यांवर तोफांचा मारा करण्यास सुरवात केल्यानें मराठे त्यांच्या वाटेस गेले नाहींत.

डच व तार्तरी.

डच वखारवाल्यांना शिवाजीनें असें सांगून पाठविलें होतें कीं, मराठ्यांच्या वाटेस न जातां ते जर आपल्या वखारींतच बसून राहतील तर मराठेहि त्यांच्या वाटेस जाणार नाहींत. डच लोकांनीं हें कबूल केलें होतें, त्यामुळें त्यांची वखार सुरक्षित राहिली. तार्तरी लोकांनीं मोठ्या शौर्यानें आपलें संरक्षण केलें.

" प्रतापराव सर नौबत व व्यंकाजी दत्तो व मकाजी आनंदराव व वरकड सरदार १०,००० पागा व १०,००० शिलेदार असे २०,००० जमाव लष्कर तसेंच सात पांच हजार मावळे लोक निवडक व सर कारकून मोरोपंत पेशवे व निळोपंत व दत्ताजीपंत व बाळप्रभु चिटणीस असे बरोबर घेतले. कोळवनांतून नीट पांचगांव, सातगांव, एकमजल करून सुरतेस पावले. सुरतेचे लोक गैरहुशार होते. चढे घोड्यानिशी सुरतेच्या दरवाजाजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलांचीहि फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहली. तांब्राकडील लोक बहुत मारिले. आणि सावकारांचे वाडे काबिज करून...शहर दोन दिवस अहोरात्र लुटले "*

शरणागति.

इंग्रजांच्या खलाशांची रग जिरविण्यासाठीं तिसऱ्या दिवशीं म्हणजे ५ ऑक्टोबर रोजीं सकाळीं मराठा फौजेनें आपला मोर्चा इंग्रजांच्या वखारीकडेस वळविला. हें पाहून दोन इंग्रज शिवाजीला जाऊन भेटले. आणि त्यांनीं तरवारी, सुऱ्या व शेंदरी कापड यांचा नजराणा त्याच्यापुढें ठेवून वखारीचें रक्षण करण्याची त्याला विनंति केली. यावेळीं शिवाजीनें त्या दोन इंग्रजांना मोठ्या प्रेमळपणानें वागविलें. त्यांच्या हातांत हात घालून इंग्रज आपले मित्र आहेत म्हणून त्यांना आपल्यापासून मुळींच उपद्रव पोंचणार नाहीं असें शिवाजीचे उद्‌गार सुरतेस हेज याच्या रोजनिशींत लिहून ठेविले आहेत.

धमकी.

याप्रमाणें सुरत पूर्णपणें लुटल्यावर ५ ऑक्टोबर रोजीं दुपारीं. शिवाजी लूट बरोबर घेऊन, मोगली फौज त्यावर चालून येण्याचीं चिन्हें दिसत नसतांनाहि, एकदम सुरतेहून परत जाण्यास निघाला.

---

* सभासद.

जातांना त्यानें सुरतेच्या व्यापाऱ्यांना सांगून पाठविलें कीं, दरसाल बारा लक्ष रुपये खंडणी दाखल त्यांनीं आपणास द्यावेत असें न झाल्यास पुढच्या वर्षी पुन्हां आपण येऊन सुरत लुटूं.'

इतर लुटारू.

सुरतेहून शिवाजी निघून गेल्यावर इतर लुटारूंचें चांगलेंच फावलें. त्यांत इंग्रजांचे खलाशीहि सामील होऊन त्यांनी गरीब व निराश्रित लोकांच्या मालमत्तेवर सपाटून हात मारिला.

संशय.

या लुटीमध्यें इंग्लिश, फ्रेंच आणि डच या तीन युरोपियन वखारींशिवाय बाकी सगळ्यांना शिवाजीनें लुटल्यामुळें या तिघांनीं शिवाजीशीं संगनमत केलें असावें असा औरंगजेबाला संशय आला व त्याला यांचा रागहि आला. १६६४ च्या लुटीनंतर त्यानें इंग्रजांना कांहीं सवलती दिल्या होत्या. पण यावेळीं वरील संशयामुळें या युरोपियन व्यापाऱ्यांना कोणतीहि सवलत मिळाली नाहीं.

लुटीचा अंदाज.

या वेळच्या सुरतेच्या लुटींत, रोकड, मोत्यें आणि इतर जिन्नस मिळून खुद्द सुरतेहून त्रेपन्न लक्ष किंमतीचा माल आणि जवळच्या नवल शाहु, हरिशाहु आणि इतर खेड्यांतून मिळून तेरा लक्ष किंमतीचा माल याप्रमाणें एकंदर सहासष्ट लक्षांची लूट शिवाजीस मिळाली.

घास्ती.

परंतु या लुटीपेक्षां अधिक महत्वाचें नुकसान म्हणचे सुरतेचा व्यापार अगदीं डबघाईस आला हें होय. कोणतीहि मराठीफौज सुरतेजवळ आली, किंवा आली आहे असें ऐकिलें तरीहि सुरतेचे लोक व व्यापारी आणि इंग्रज वखारवालेसुद्धां घाबरून जाऊन एकदम पळापळ सुरू होई. प्रत्येक व्यापारी आपला माल खेड्यांपाड्यांतून नेऊन ठेवी. अशा अस्थिरतेमुळें बाहेरचे व्यापारी सहाजिकपणेंच सुरतेस माल पाठविनासे झाले, व त्यामुळें हें बंदर अगदीं मोडकळीस आलें.

बेबंदशाही.

या लुटीनंतर एक महिना पर्यंतसुरतेस अगदीं, बेबंदशाही माजून राहिली होती. आणि रोज नव्या नव्या गप्पा उठत होत्या. ता. १२ जून रोजीं, शिवाजी वीस हजार फौजेसह पुन्हां सुरत लुटण्यासाठीं येत आहे, अशी गप्प पसरतांच सर्वत्र जी धांवपळ सुरू झाली, ती सांगतां पुरवत नाहीं. १६७० च्या नोव्हेंबर आणि डिसेंबर मध्येंहि शिवाजी सुरत लुटण्यास येत आहे अशा गप्पा उठल्या होत्या. स. १६७२ च्या जूनमध्यें

मोरोपंतानें रामनगरावर जय मिळविल्यामुळें तो आतां सुरत लुटण्यास येईल अशी सुरतकरांना रात्रंदिवस काळजी वाटत होती, त्यानें उघडपणें सुरतेच्या फौजदाराकडेस चौथाईची मागणी तर केलीच होती. आणि त्यामुळें सुरतकर अधिकच घाबरून गेले. पुढें १६७२ च्या फेब्रुवारी आणि ऑक्टोबर महिन्यांत सुरतकर असेच भीतमानस झाले होते. १६७३ च्या सप्टेंबरांत अशीच भीती त्यांना वाटली होती. १६७४ च्या ऑक्टोबरांत तीच धास्ती त्यांना उत्पन्न झाली होती. आणि १६७९ च्या डिसेंबरांत याच चिंतेनें त्यांना पछाडिलें होतें. सारांश सुरतेचा व्यापार या लुटीमुळें आणि शिवाजीच्या त्रासामुळें याप्रमाणें सपशेल बसला.

६ वणी दिंडोरीची लढाई. ता १७ ऑक्टोबर १६७०:—तापीपर्यंत

बातमी.

दिलेरखानाचा पाठलाग करून बादशहाच्या हुकुमाप्रमाणें शहाजादा मुअज्जम औरंगाबादेस येऊन दाखल झाल्यावर लागलीच त्याला सुरतेच्या लुटीची बातमी समजली. त्यानें एकदम बऱ्हाणपुराहून दाउदखानास बोलावून शिवाजीवर पाठविलें. इकडे शिवाजी सुरतेहून निघून बागलाणमध्यें शिरला. तेथें मुल्हेरच्या पायथ्याशीं असलेलीं खेडीं लुटून तो पुढें निघाला. दाउदखानानें वैजापुराहून आपलें जड सामानसुमान औरंगाबादेस परत पाठवून चांदोरकडे कूच केलें. इतक्यांत हेरांनीं बातमी आणली कीं, शिवाजी मुल्हेरहून निघाला असून कांचन-पांचन घाटानें पुढें चालला आहे. दाऊदखान रात्रीं नऊ वाजण्याचे सुमारास चांदोरच्या किल्लयाजवळ येऊन पुढील बातमीची वाट पाहत बसला. मध्यरात्रीच्या सुमारास हेरांनीं पुनः बातमी आणिली कीं, शिवाजीनें आपल्या फौजेच्या दोन तुकड्या केल्या असून एकीसह तो घांट उतरून पुढें नाशकास गेला व दुसरी, घाटांत मागें रेंगाळत असलेल्या लोकांस घेण्यासाठीं त्यानें ठेविली आहे. ही बातमी कळतांच दाऊदखान एकदम निघाला. पहांटे ३ वाजण्याच्या सुमारास चंद्र मावळून गेल्यानें अंधारांत मोगली फौज थोडी पांगून अव्यवस्थित झाली.

इखलासखान.

यावेळीं दाऊदखानाच्या बिनीवर इखलासखान मियाणा हा पठाण सरदार होता. तो टेकडीवरून खालीं उतरत असतां मराठी सैन्य मैदानावर लढाईच्या तयारीनें उभें असल्याचें त्याला आढळलें. तत्काळ त्यानें आपल्या सैन्यास युद्धाची सूचना दिली. तो स्वतः उन्मत्तपणानें एकदम मराठ्यांवर जाऊन पडला. यावेळीं मराठा सैन्यांत प्रतापराव गुजर, व्यंकोजी दत्तो व मकाजी आनंदराव (शाहाजीचा अनौरस मुलगा) असे

प्रख्यात सेनापति होते. त्यांनीं चुसत्या लीलेनें इखलासखानास जखमी करून घोड्या-खालीं आणिलें. थोड्या वेळांत दाऊदखान स्वतः येऊन पोहोंचला. त्यानें इखलास-खानाचे मदतीस राव मकरंद याला पाठविलें, व आपलें सामानसुमान मागें उंच एका खेड्यांत नीट व्यवस्थेनें फौजेच्या पिछाडीला ठेविलें.

लढाई.

ही वणी दिंडोरची लढाई तारीख १७ ऑक्टोबर रोजीं झाली. ही कित्येक तासपर्यंत मोठ्या आवेशानें चालली होती. मोगलांचे सरदार संग्रामखान घोरी वगैरे जखमी झाले व बरेच लोक कामास आले. मराठ्यांनीं नेहमींच्या पद्धतीनें पळती लढाई देऊन मोगलांना अगदीं जेरीस आणिलें. मोगली सैन्यांतील बुंदेला पायदळानें बंदुकीच्या योगें मोगलांचे पुष्कळच रक्षण केलें. स्वतः दाऊदखानहि या वेळीं गर्दीत शिरला होता. त्याच्या तोफखान्यानें याप्रसंगीं चांगलीच कामगिरी केली. व त्यामुळेंच इखलासखान मराठ्यांच्या हातून जिवंत सुटला.

त्र्यंबक किल्ला सर.

युद्धक्षेत्राच्या दुसऱ्या बाजूस तोफखान्याचा दरोगा मीर अबदुल माबूद हा एकटाच थोडक्याशा सैन्यानिशीं मराठ्यांशीं झगडत होता. त्याचा एक मुलगा व कित्येक सैनिक कामास आले, आणि तो स्वतः व दुसरा मुलगा आणि इतर कांहींजण जखमी झाले. " मराठ्यांनीं मोठी कत्तल केली आणि मोगल मारून मुरदे पाडिले. दोन प्रहर युद्ध जाहलें. तीन हजार मोंगल मारिले. तीन चार हजार घोडे पाडाव केले. असे फत्ते करून आले.*" याप्रमाणें वणी दिंडोरी येथें मोगलांचा पराजय करून मराठे कोंकणांत सुखरूप येऊन पोहोंचले. ही लढाई झाल्यानंतर एकच आठवड्यानें मोरोपंतानें त्र्यंबकचा किल्ला सर केला.

जमवाजमव.

दिंडोरीच्या पराजयानें मोगली सत्ता अगदींच डळमळित झाली. निदान एक महिनाभर तरी मोगली सत्तेचें अस्तित्व कोणासच भासलें नाहीं. पराजयाच्या दुसऱ्याच दिवशीं दाऊदखान नाशकास आला व तेथें एक महिनापर्यंत आपल्या फौजेंत भरती करण्यांत तो गुंतला होता. त्यानें जखमी लोकांना औरंगाबादेस पाठवून दिलें. नोव्हेंबर महिन्यांत तो अहमद-नगरास गेला, परंतु डिसेंबरांत त्याला पुनः चांदोरच्या बाजूस मराठ्यांनीं धामधुम उडवून दिल्यामुळें यावें लागलें.

---

* सभासद.

७ वऱ्हाड बागलाणवर स्वारीः—सुरतेच्या दुसऱ्या लुटीहून परत आल्यावर सन १६७० च्या नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांत शिवाजीनें जंजिऱ्यावर स्वारी केली. परंतु शिवाजीच्या जलयुद्धाचें एक स्वतंत्रच प्रकरण यावयाचें असल्यानें येथें त्याची माहिती न देतांच आपण पुढें जाऊं या. सन १६७० च्या डिसेंबरच्या प्रारंभीं बागलाण-मधील अहिवंत, मार्कंडा, रवळा आणि जावळा हे किल्ले सर करून शिवाजी खानदेशांत उतरला. लांब लांब मजली मारून त्यानें बऱ्हाणपुराहून दोन मैलांवर असलेलें बहादुरपुर खेडें लुटलें. खानदेशच्या राजधानीचें शहर खुद्द बऱ्हाणपुर येथें महाराजा जसवंतसिंग सन १६६९ च्या सप्टेंबरपासून तळ ठोकून बसला होता, हें शिवाजीस ठाऊक असल्यानें तो बऱ्हाणपुरावर चालून गेला नाहीं. परंतु वऱ्हाडमधून जाऊन त्यानें अचानकपणें श्रीमंत आणि भरभराटींत असलेलें कारंजा शहर सावकाशपणें लुटलें. येथें शिवाजीस एक कोटि रुपयांची मत्ता सांपडली. गेल्या पन्नास वर्षांत या बाजूस स्वस्थता नांदत असल्यामुळें पुष्कळ द्रव्य येथें जमलें होतें, तें सर्व शिवाजीच्या हातीं आयतेंच मिळालें. वीस हजार सैन्यासह औशावर स्वारी करून तोहि प्रांत लुटला. शिवनेरीलाहि या वेळीं वेढा घातला होता, पण तो किल्ला हस्तगत झाला नाहीं. (जेधे शकावली.)

इतर लूट.

याप्रमाणें मोगली मुलुखांत लुटालूट करीत असतांनाहि मोगल सुभेदार खाने-जमान हा कांहींच हालचाल करीत नव्हता. त्यानें देवगड येथें येऊन मुक्काम ठोकला. खानदेशचा सुभेदार दाऊदखान हा अहंमदनगराकडेस कामगिरीवर गेला असून त्याचा मुलगा अहंमदखान हा बऱ्हाणपुर येथें मुखत्यारीनें कारभार पाहत होता. महाराजा जसवंतसिंग शहाजादा मुअज्जम याच्या खर्चासाठीं रक्कम उभी करण्याच्या खटपटींत होता. खानदेशच्या खजिन्यांतून पांच लक्ष रुपये देण्याबद्दल त्यानें दाऊदखानाचा मुलगा अहंमदखान याजकडेस मागणी केली. बादशहाच्या हुकुमा-शिवाय एक पैहि मिळणार नाहीं असें त्यानें स्पष्ट सांगितलें. त्यामुळें महाराजा जसवंतसिंग संतापून जाऊन त्यानें बऱ्हाणपूर लुटण्याची धमकी घातली.

आपसांत भांडणें.

दाऊदखान अंकाईटंकाईजवळ होता तो लगबगीनें बऱ्हाणपुराकडेस वळला. फरदापुराजवळ येतांच त्याला कळलें कीं, मराठे वऱ्हाडांतून परत फिरून बऱ्हाणपुराच्या बाजूनें बागलाणकडेस निघून गेले. ता. १ जानेवारी १६७१ रोजीं मोगलांचा प्रख्यात सेनापति मोहबतखान

महाबतखान.

हा बऱ्हाणपुराजवळ आल्यानें मोगलांची बाजू बरीच सांवरली. महावतखानानें जसवंतसिंगास आपल्याबरोबर घेतलें होतें.

दाऊदखान फरदापुराहून निघून मराठ्यांच्या पाठीवर वागलाणांत शिरला.

इतर किल्ले.

एकीकडे शिवाजी कारंजा लुटीत असतां दुसरीकडे मोरोपंत पश्चिम खानदेश आणि बागलाण यांच्यावर सपाटून हात मारीत होता. या दोन्ही मराठी फौजा साल्हेरजवळ एक होऊन मुल्हेर किल्ल्याच्या आसपासच्या खेड्यांत लुटालूट करून त्यांनीं साल्हेर किल्ल्यास वेढा घातला. दाऊदखान मुल्हेरजवळ रात्रीं ८ वाजतां येऊन पोंचला. परंतु त्याचें सैन्य आणि सामान मागें असल्यानें तो त्यावेळीं कांहीं करूं शकला नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं तो शिवाजीवर चालून जाण्याची तयारी करूं लागला. परंतु तितक्यांत साल्हेर पडल्याची वार्ता त्याला कळतांच तो कांचनमांचनकडे आपल्या मुक्कामावर येण्यास निघाला. शिवाजीनें पायदळ व घोडेस्वार यांच्या वीस हजार फौजेनिशीं साल्हेरला वेढा घातला होता. ता. ५ जानेवारी १६७१ रोजीं रात्रीं शिड्या लावून त्यानें साल्हेर किल्ला सर केला. साल्हेरचा किल्लेदार फातुल्लाखान हा लढाईत मारला गेला व त्याच्या मेहुण्यानें किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन केला. मुल्हेर, चोरगड, तालुलगड (?) या किल्ल्यांवरहि मराठे छापे घालूं लागले. बागलाणच्या भोंवतीं मराठी फौजा हमेश फिरत राहिल्यानें बागलाणचा फौजदार नेक नामखान याची रसद आपोआपच बंद झाली. मराठ्यांनीं धोडप किल्ल्यालाहि वेढा घातला. याप्रमाणें शिवाजी एकामागून एक विजय मिळवीत चालला.

बुंदेलखंडाच्या पूवस महेवा या नांवाचें एक लहानसें संस्थान आहे. तेथें

छत्रसाल.

चंपतराय बुंदेला या नांवाचा एक संस्थानिक होता. सन १६६१ मध्यें औरंगजेबाच्या हुकुमावरून त्याचा पाठलाग करण्यांत आला, तेव्हां तो पळून गेला. त्याला पांच मुलगे होते. त्यांतील छत्रसाल हा चवथा होता. त्याचा जन्म स. १६५० मध्यें झाला होता. हा छत्रसाल आरंभीं मोगली सैन्यांत जयसिंगाच्या हाताखालीं नोकरींत शिरला व गोंड प्रांतावर मोगलांनीं केलेल्या स्वारींत त्यानें चांगला पराक्रम गाजविला. परंतु त्या पराक्रमाची चीज न झाल्यानें तो अतिशय नाराज झाला आणि एके दिवशीं शिकारीच्या निमित्तानें आपल्या पत्नीसह तेथून निघून मोठा प्रवास करून गुप्तपणें महाराष्ट्रांत येऊन पोंचला आणि सन १६७०-७१ चे हिंवाळ्यांत तो शिवाजीस भेटला, व सैन्यांत चाकरी मागूं लागला. शिवाजीनें त्याचा

चांगला आदरसत्कार करून त्याच्या शौर्याची मोठी प्रशंसा केली. आणि त्याला असा सल्ला दिला कीं, " औरंगजेबच्या सगळ्या शत्रूंनीं दक्षिणेंत एकाच ठिकाणीं जमण्यापेक्षां निरनिराळ्या ठिकाणीं राहून औरंगजेबास त्रास दिला तर त्याचा अधिक उपयोग होणार आहे. मी ज्याप्रमाणें महाराष्ट्रांत उचल केली आहे त्याप्रमाणें तूंहि बुंदेलखंडांत आपल्या जहागिरींत राहून मोगली मुलुखाला त्रास देशील तर औरंगजेबास लवकर नरम करितां येईल. औरंगजेब बुंदेलखंडांत तुझ्यावर चालून गेला, कीं मी महाराष्ट्रांत दंगल उडवून देईन व तो माझ्यावर चालून आला कीं तूं बुंदेलखंडांत धामधूम सुरू कर. याप्रमाणें आपणांस परस्परांस सहाय्य करितां येऊन, मोगलाना हराण करितां येईल." यानंतर छत्रसाल थोडा नाराज होऊन बुंदेलखंडांत परत गेला. उत्तरेकडील लोकांवर शिवाजीचा विशेष विश्वास नसल्यानें तो त्यांना सैन्यांत हुद्याच्या जागा देत नसे, यामुळेंहि छत्रसाल यास परत जावें लागलें असावें, असें समकालीन इतिहासकार भीमसेन हा म्हणतो.

प्रकरण ८ वें

दुरंगी सामना

सन १६७१-१६७४

—:०:—

[१ दोन खानांची दक्षिणेंत रवानगी १६७१. २ साल्हेरची लढाई. ३ कोळवनांतील विजय १६७२. ४ सुरतेस चौथाईची धमकी. ५ खानदेश वऱ्हाडवर मराठ्यांच्या स्वाऱ्या १६७२. ६ देशावरील पळत्या लढाया १६७३. ७ विजापुर व कानडा १६७३. ८ उमराणीची लढाई १६७३. ९ नेसरीची लढाई, प्रतापरावाचा मृत्यु १६७४. १० दिलेरचा पराभव, जानेवारी १६७४.]

दोन खानांची दक्षिणेंत रवानगी. १६७१:—शिवाजीनें पुन्हां सुरत लुटलें आणि वागलाणवर स्वारी केली हें ऐकून, त्यानें दक्षिणेंत प्रस्थान करून सोडला असला पाहिजे, अशी औरंगजेबाची खात्री झाली. आणि म्हणून त्यानें तावडतोब म्हणजे ता. २८ नोव्हेंबर स. १६७० रोजीं आपला प्रख्यात सेनापति महाबतखान याला दक्षिणेंत तांतडीनें पाठविलें. इकडे डिसेंबर १६७० मध्यें शिवाजीनें वऱ्हाडवर स्वारी केली हें ऐकून तर तो अधिकच चिंताग्रस्त झाला. ता. ९ जानेवारी १६७१ रोजीं औरंगजेबानें, गुजराथचा सुभेदार बहादुरखान यालाहि दक्षिणेंत जाण्याचा हुकुम केला. दिलेरखानानेंहि बहादुरखानाजवळ रहावें असें फर्माविण्यांत आलें. सांपडेल तेथें शिवाजीस चिरडून टाकावें असा सक्त हुकुम दाऊदखान यास देण्यांत आला. अमरसिंग चोंडावत आणि इतरहि शूर रजपूत यांचें ठाणें दक्षिणेंत ठेविण्यांत आलें. १६७१ च्या जानेवारीमध्यें बागलाणकडेहि मदत पोहोंचविण्याची तजवीज झाली. स्वतः औरंगजेबहि दक्षिणेंत जाऊन शिवाजीशीं युद्ध करण्याचा विचार करीत होता, परंतु तो पुढें तसाच राहिला.

औरंगजेबाची चिंता.

जसवंत.

ता. ३ जानेवारी १६७१ रोजीं जसवंतसिंग याला बरोबर घेऊन महाबतखान बऱ्हाणपुराहून निघाला, तो औरंगाबादेस ता. १० रोजीं पोहोंचला, व शहाजादा मुअज्जम याला भेटून पुढें चांदोर-

कडे रवाना झाला. दाऊदखान याला महाबतखानाचा दुय्यम नेमिलें होतें. परंतु ही जागा त्याला कमीपणाची वाटून तो दिल्लीस परत जाण्याचा प्रयत्न करूं लागला.

याप्रमाणें औरंगजेबाची तयारी चालू असतां चांदोरकडे शिवाजी काय करीत होता हें आतां आपण पाहूं. डिसेंबर १६७० मध्यें मराठ्यांनीं धोडपकिल्ल्यास वेढा घातला होता, म्हणून २८ डिसेंबर रोजीं दाऊदखान मराठ्यांवर चालून गेला. इतक्यांत किल्लेदार महंमद झमान यानें मराठ्यांवर हल्ला करून त्यांचा पराजय केलाच होता. यानंतर दाऊदखान साल्हेरकडे चालून गेला. तिकडेहि त्याचा उपयोग झाला नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. (पृ. १३६ पहा). १६७१ च्या जानेवारीमध्यें दाऊदखानानें कांचनघाटाजवळ मुक्काम करून चोहोंकडे मराठ्यांवर तो आपल्या फौजेच्या टोळ्या पाठवीत होता. याप्रमाणें बागलाणमध्यें त्यानें सुव्यवस्था प्रस्थापित करावी असा त्याला बादशहाचा हुकुम होता असें दिसतें. एके रात्रीं हतगडजवळ त्यानें मराठ्यांवर हल्ला करून त्यांचे सातशें लोक कापून काढिले.

चांदोर.

शिवाजीनें नुकत्याच सर केलेल्या या अहिवंत किल्ल्याला महाबतखान आणि दाऊदखान यांनीं १६७१ च्या जानेवारीमध्यें चांदोर येथून निघून वेढा घातला. एक महिनाभर वेढ्याचें काम चालू होतें. व शेवटीं दाऊदखानानें तो किल्ला सर केला. परंतु आपणांस यश न मिळाल्यामुळें महाबतखान संतापून गेला. अलीकडे या उभयतांचें जमेनासें झालें होतें. आणि अहिवंत प्रकरणामुळें तर तें फारच बिनसलें. महाबतखान वेढ्याचें काम तसेंच टाकून तीन महिने नाशकाला राहिला व पुढें पावसाळ्यांत पारनेरला राहाण्यास गेला. इकडे जून महिन्यांत दाऊदखानास परत दरबारांत बोलाविण्यांत आलें. या मोहिमेंत मोगलांनीं जावळा, मार्कंडगड, अचलगिरी आणि अहिवत हे किल्ले एप्रिल–मे मध्यें सर केले असें दिसतें.

महाबतखान.

या वर्षीं अतिशय पाऊस पडून रोगराई उत्पन्न झाली व त्यायोग मनुष्यें आणि जनावरें यांचा संहार उडाला. परंतु याच वेळीं महाबतखान, सरदारांच्या मेजवान्या व अफगाणिस्थानांतून आलेल्या चारशें कलावंतिणी यांच्यांत दंग होऊन गेला होता.

चैन.

२ साल्हेरची लढाई:—१६७१–७२. औरंगजेबाला महाबतखानाचा मोठा भरंवसा होता. परंतु १६७१ च्या पहिल्या तीन महिन्यांत त्यानें कांहींहि केलें नाहीं, हें पाहून बादशहा फार नाराज

साल्हेर.

झाला. इतकेंच नव्हे, परंतु महाबतखान शिवाजीशीं मिळून वागत आहे, असाहि त्याला बळकट संशय आला. म्हणून त्यानें येत्या हिवाळ्यांत बहादुरखान आणि दिलेरखान यांना दक्षिणेंत मोहिमेवर पाठविलें. या उभयतां सरदारांनीं सुरत् बागलाणमधून येऊन मराठ्यांच्या ताब्यांत गेलेल्या साल्हेरला एकदम वेढा दिला. आणि इखलासखान मियाणा, राव अमरसिंग चोंडावत व इतर अंमलदार यांच्यावर वेढ्याचें काम सोंपवून ऑक्टोबर महिन्यांत ते अहंमदनगराकडेस रवाना झाले.

इखलासखान.

बहादुरखान अहंमदनगराहून सुप्याकडेस वळला आणि १६७१ च्या डिसेंबरच्या अखेरीस दिलेरखानानें पुणें सर करून तेथील नऊ वर्षांवरील सर्व लोकांची कत्तल केली. १६७२ च्या जानेवारीमध्यें शिवाजी महाड येथें वसून सैन्याची जमवाजमव करून मोगलांना तोंड देण्याच्या विचारांत होता. "त्याजवर इखलासखान नबाब यांनीं येऊन साल्हेरीस वेढा घातला. हें वर्तमान राजे यांस कळून, राजे यांनीं, प्रतापराव सर नौबत लष्कर देऊन मोगलाईत पाठविले होते. त्यांस पत्र व जासूद पाठविलें कीं, तुम्हीं लष्कर घेऊन, सीतावीनें वरघाटें, साल्हेरीस जाऊन मोगली फौजेवर छापा घालणें. आणि कोंकणांतून मोरोपंत पेशवे, यांस हषमानिशीं रवाना केलें. हे इकडोन येतील आणि तुम्ही वर घाटे येणें, असे दुतर्फा चालून घेऊन गनिमास मारून गर्दीस मेळविणें. त्यावरून प्रतापराव लष्कर घेऊन वरघाटे आले. मोरोपंत पेशवे कोंकणांतून आले. उभयतां साल्हेरीस पावले. एक तर्फे लष्करांनीं घोडीं घातलीं. एका तर्फेनें मावळे लोक शिरले. आणि मारामारी केली. मोंगल, पठाण, रजपूत, रोहिले, यांच्याशीं तोफांचा आराबा घालून मोठे युद्ध चार प्रहर दिवस जाहलें तीन कोश औरस चौरस आपलें व परकें माणूस दिसत नव्हतें. हत्ती रणास आले. दुतर्फा दहाहजार मुर्दा पडला. सहा हजार घोडे राजियाकडे आले. सवाशे हत्ती सांपडले. सहा हजार उंटें सांपडलीं. मालमत्ता, खजाना, जडजवाहिर, कापड अगणित बिछाईत हातास लागली. बेवीस वजीर नामांकित धरिले. या युद्धांत, प्रतापराव सर नौबत, आनंदराव, व्यंकाजी दत्तो, रूपाजी भोसले, सूर्यराव काकडे, शिदोजी निंबाळकर, खंडोजी गोंदजी व संताजी जगताप, मानाजी मोरे, विसाजी बल्हाळ, मोरो नागनाथ, मुकुंद बल्लाळ व वरकड बाजे, वजीर, उमराव यांनीं कस्त केली. युद्ध करतां सूर्यराव काकडे पंच हजारी मोठा लष्करी धारकरी, जंबूरियाचा गोळा लागून पडला. वरकडहि नामांकित, शूर पडले. असें युद्ध होऊन फत्ते जाहली. ही खबर घेऊन जासूद आले. त्यांचे हातीं राजे यांनीं,

सोन्याचीं कडीं घातलीं. सर्वांना बक्षिस दिधलीं. मोगलांकडील जे वजीर पाडाव झाले त्यांस, वस्त्रे अश्व देऊन सोडणें म्हणोन हुकुम पाठविला.* " या लढाईंत मोगलांकडील राव अमरसिंग चोंडावत मारला जाऊन त्याचा मुलगा मुहुकमसिंग, इखलासखान मियाणा, व इतर तीस मुख्य मुख्य सरदार जखमी होऊन मराठ्यांच्या हातीं लागले होते. ही हृदयविदारक बातमी बहादुरखान यास कळतांच तो बागलाणांतून परत फिरून तांतडीनें साल्हेरकडेस येण्यास निघाला. " दिलेरखान येऊन रवळा-जवळ्यास लागले. गडकरी बरे भांडले. मोठें युद्ध जाहलें. गड हातास आला नाहीं. मोरोपंत पेशवे यांनीं उपराळी यास मावळे लोक बाराहजार रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. ऐसा घाबरा केला. रामाजी पांगेरा म्हणून हषमांचा हजारी. त्यानें हजार लोकांनिशीं कणेरगडाखानें दिलेरखानाशीं युद्ध केलें. हजार लोक थोडे देखून दिलेरखानें यानें फौजेनिशीं चालून घेतलें. रामाजी पांगेरे यानें निदान करावयाचें ठरवून सातशें माणूस निवडून घेतलें, आणि भांडण दिधलें. दिलेरखान याची फौज चालून आली. तिनें चौफेरा मावळे लोक वेढले. एक प्रहर टिपरी जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडले. दिलेरखानाचे वाराशें पठाण रणास आणिले. मग सातशें माणूस व रामाजी पांगेरा सर्वहि उघडे बोडके होऊन एकेकास वीस वीस तीस तीस जखमा तीराच्या बरचीच्या लागल्या. लोक मेले. पण दिलेरखान यांनीं तोंडांत आंगोळी घालून आश्चर्य केलें.* " परंतु यापुढें दिलेरखानाची गडबड शांत झाली. साल्हेर येथें मोगलांचा संपूर्ण पराजय करून मोरोपंतानें लगेच मुल्हेर सर केलें. नंतर साल्हेर-मुल्हेरच्या किल्ल्यावर जरूर तो बंदोबस्त करून स. १६७२ च्या जानेवारी फेब्रुवारी मध्यें मोरोपंत सुरक्षितपणें कोंकणांत निघून गेला. मराठ्यांच्या या विजयानें शिवाजीची सत्ता दृढमूल होऊन त्याचा दरारा सर्वत्र पसरला. शिवाजीनें बागलाण हस्तगत केल्यानें सुरतेला कायमचाच शह बसला. बहादुर आणि दिलेरखान यांची तर या वेळीं मराठ्यांनीं अगदीं रेवडी उडवून दिली, त्यामुळें त्यांची फारच अपकीर्ति झाली व ते परत फिरले.

निर्धास्तपणा.

मराठ्यांच्या रेंट्यापुढें यावेळीं बहादुरखान आणि दिलेरखान नामोहरम होऊन पळून गेले, त्यामुळें त्यांची फारच अपकीर्ति झाली. पुढें मार्चांत उत्तर हिंदमध्यें सत्नामी लोकांचें बंड झालें आणि एप्रिलमध्यें खैबर घाटांत पठाणांनीं धामधुम उडविली. त्यामुळें औरंगजेबास

* सभासद.

दक्षिणेंत लक्ष देण्यास सवडच सांपडली नाहीं. म्हणून सगळें १६७२ हें वर्ष शिवाजीस निर्वास्तपणें आपल्या राज्याची व्यवस्था करण्यांत व तें वाढविण्यांत घालवितां आलें.

बहादुरखान.

वहादुरखान वागलाणांतून पळाल्यावर भीमेच्या कांठीं कांहीं दिवस राहून अहमदनगरास गेला. सन १६७२ च्या मे मासांत महाबतखान व जूनमध्यें शहाजादा मुअज्जम असे दोघेहि, मराठ्यांनीं केलेल्या पराजयामुळें, शरमिंदे होऊन उत्तरेकडेस निघून गेले. त्यामुळें दक्षिणची सुभेदारी सन १६७३ च्या जानेवारीमध्यें बहादुरखानाकडेस आली, ती सन १६७७ च्या ऑगस्टपर्यंत त्याच्याचकडे राहिली.

३ कोळवनांतील विजय १६७२:—साल्हेर जवळील विजयानें मराठ्यांचा

उत्साह.

उत्साह इतका वाढला कीं, त्या सालच्या उन्हाळ्यांत व पावसाळ्यांतहि त्यांच्या मोहिमा सुरूच राहिल्या. ता. १९ जूनच्या सुमारास मोरोपंत पिंगळ्यानें जव्हारचा राजा विक्रमशहा याच्यावर स्वारी करून त्याचा सतरा लक्ष रुपयांचा खजिना व जव्हारचें राज्य हस्तगत केलें. तेथून रामनगरावर स्वारी करून ता. १९ जून रोजीं तेंहि सर केलें. तेथील राजा सोमशहा हा चिंतलीस पळून गेला. मराठ्यांच्या भीतीनें गणदेवीसुद्धां उजाड पडली. परंतु तेवढ्यांत दिलेरखान स्वारीची तयारी करीत आहे, असें मराठ्यांना कळतांच ते रामनगरहून मागें फिरले. इतक्यांत जोराचा पावसाळाहि सुरू झाला, त्यामुळें मराठ्यांना कांहीं दिवस स्वस्थ बसणें भाग पडलें. मोरोपंतानें लवकरच पंधरा हजार फौजेनिशीं पुन्हां रामनगरहून स्वारी करून जुलैच्या पहिल्या आठवड्यांत तें सर केलें. तेथील राजा सोमशहा या वेळीं दमण येथें पोर्च्युगीजांच्या आश्रयाला जाऊन राहिला. हल्लींचें धरमपुर संस्थान हेंच पूर्वीचें रामनगर होय.

निर्वेध मार्ग.

जव्हार व रामनगर मराठ्यांनीं सर केल्यानें, कल्याणहून उत्तर कोंकणांत निर्वेधपणें प्रवेश करण्यास त्यांना मार्ग मोकळा झाला. परंतु यामुळें सुरतेची स्थिति मोठी करुणाजनक झाली. एकादें मराठी सैन्य त्या बाजूनें जात असल्याचें वर्तमान सुरतेस कळलें कीं सुरतकरांची पांचावर धारण बसत असे.

४ सुरतेस चौथाईची धमकी:—सुरतेनें चार लक्ष रुपये चौथाई दाखल

मोरोपंत.

देण्याबद्दल मोरोपंतानें रामनगराहून तीन पत्रें शिवाजीचा मुख्त्यार या नात्यानें सुरतकरांस पाठविलीं. त्यांतील तिसरें

पत्र प्रत्यक्ष शिवाजीनेंच लिहिलें आहे असें दिसतें. त्यांत शिवाजी लिहितो, " तुम्हीं चौथाई वसूल, ताबडतोब माझ्याकडेस भरणा करावा, यासाठीं हें शेवटचें पत्र पाठवित आहें. औरंगजेबबादशहा माझ्या प्रजेला त्रास देत असल्यामुळें त्याच्या पारिपत्यासाठीं मला ही एवढी फौज ठेवणें भाग पडलें आहे. अर्थात् त्या फौजेसाठीं होणारा खर्च त्याच्याच प्रजेकडून मी वसूल करणार. तरी चौथाईबद्दल चार लक्ष रुपये ताबडतोब पाठवून द्यावेत. ते न आल्यास मी स्वतः सुरतेस येऊन चौथाई वसूल करून घेईन. या कामीं प्रत्यक्ष औरंगजेबसुद्धां मला अडथळा करण्यास समर्थ नाहीं, हें तुम्हीं लक्षांत ठेवा. "

मोगल फौजदार.

मराठ्यांनीं रामनगर सर केलें ही बातमी सुरतेस कळतांच सुरतेच्या मोगल फौजदारानें पांचशें स्वार व तीन हजार पायदळ इतकें नवीन सैन्य ठेवून सुरतेचें रक्षण करावयाचें आहे, असें हिंदु व मुसलमान व्यापाऱ्यांना सांगून त्यांच्याकडून फौजेच्या खर्चासाठीं पंचेचाळीस हजार रुपये वसूल केले. आणि एकहि शिपाई नवीन न ठेवितां सगळीच रक्कम त्यानें स्वतःच खिशांत टाकिली.

फौजदाराचा लोभ.

मागें सांगितल्याप्रमाणें शिवाजीकडून तिसरें पत्र आल्यावर सुरतेचे लोक अगदीं भेदरून गेले. कांहीं श्रीमंत व्यापारी फौजदाराकडे जाऊन भडोचेस निघून जाण्याची परवानगी मागूं लागले. मध्यरात्रीपयत त्यांना तिष्ठत ठेवून परवानगी तर दिली. परंतु सकाळीं ती परत रद्द केली. त्यानें सर्व व्यापाऱ्यांना बोलावून सांगितलें कीं, व्यापाऱ्यांनीं आपल्या जवळचे एक लक्ष रुपये द्यावेत व देसायांनीं शेतकऱ्यांपासून दोन लक्ष रुपये वसूल करून द्यावेत. यासंबंधीं एक सबंध दिवस व एक रात्र वाटाघाट होऊन तीन लक्षांच्या ऐवजीं साठ हजार रुपये द्यावेत असें बोलणें फौजदारानें लाविलें. ही रक्कम शिवाजीला मिळणार नसून हा फौजदारच मधल्यामध्यें गडप करणार आहे, हें लोकांच्या लक्षांत आलें. व एक पैहि न देतां ते उठून निघून गेले. शिवाजी सुरतेवर चालून येत आहे, अशी जेव्हां जेव्हां वातमी उठली तेव्हां तेव्हां ते लोक पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु प्रत्येक वेळीं फौजदारानें सुरतेचे दरवाजे बंद केल्यामुळें लोकांचा निरुपाय झाला.

जव्हार.

मराठ्यांनीं जव्हारचें राज्य जून १६७२ त खालसा केलें हें वर सांगितलेंच आहे. त्यानंतर तेथील राजा विक्रमशहा हा मोगली हद्दींत नाशकाकडेस पळून गेला. धारराय कोळी नांवाचा दुसरा

एक संस्थानिक असाच मराठ्यांनीं पळवून लाविला होता. विक्रमशहाचा मुलगा धाररायाला सामील झाला. आणि याप्रमाणें हे कोळी राजे मराठ्यांच्या मुलुखाला वारंवार त्रास देऊं लागले. पण मराठ्यांनीं धारराय व त्याचा साथीदार यांना तत्काळ पकडून त्यांचा शिरच्छेद केला.

५ खानदेश-वऱ्हाडवर मराठ्यांच्या स्वाऱ्या १६७२:—रामनगर. मराठ्यांचा तळ आतां रामनगरास राहूं लागला. सन १६७२ च्या जुलई महिन्यांत मोरोपंतानें तेथून घाट ओलांडून नाशकांत शिरून लुटालूट केली व तेथेंच आपला मुक्काम केला. यावेळीं नाशकास लुखजी जाधवरावाचा पणतु म्हणजे शिवाजीच्या मामेभावाचा मुलगा चार हजार फौजेनिशीं मोगलांच्या तफ नेंनाशिक-त्रिंबकास ठाणेदार असून वणी दिंगेरी येथें सीदी हलाल हा ठाणेदार होता. मोरोपंतानें या दोघांनाहि एकएकटे गांठून यांचा पराजय केला. या लढायांत मोगली फाजेचा फार नाश झाला व सीदी *हलाल तर सर्वस्वीं लुटला गेला. ही वार्ता दक्षिणचा सुभेदार बहादुरखान याला कळतांच त्यानें या दोनहि ठाणेदारांची सपाटून खरडपट्टी काढिली. त्यामुळें हे दोघेहि रागावून दुसरे दोन सरदार आणि घोडेस्वारांच्या चार पलटणी यांसह मराठ्यांस जाऊन मिळाले. आणखीहि कांहीं सरदार मराठ्यांना मिळतील असें चिन्ह दिसू लागलें, तेव्हां गुजराथचा सुभेदार दिलेरखान याच्या तर तोंडचें पाणीच पळालें. कारण याप्रमाणें मोगली फौज निघून जाऊन मराठ्यांस सामील होऊं लागली तर गुजराथचा बचाव तरी कोणाच्या जोरावर करावयाचा हा त्याला मोठाच प्रश्न पडला.

लूट. तारीख २५ ऑक्टोबर रोजीं एक भली मोठी मराठी फौज रामनगरास येऊन दाखल झाली. हें ऐकतांच सुरतकरांचें पुनः धाबें दणाणलें. ही फौज पुढें चिखलीस गेली. व तेथून मोगली प्रांतावर विद्युद्वेगानें स्वाऱ्या करून तिनें सपाटून लुटालूट केली व ती परत फिरली. हें वृत्त ऐकल्यावर सुरतकरांचा जीव खालीं पडला.

तेलंगण. सन १६७२ डिसेंबरमध्यें शिवाजीनें एक लहानशी घोडेस्वारांची टोळी वऱ्हाड तेलंगण लुटण्यासाठीं पाठविली. दक्षिणचा सुभेदार बहादुरखान याला ही बातमी कळतांच तो अहंमदनगरहून निघून

---

* हा मूळचा विजापुरी सरदार अफजलखानाबरोबर होता. पुढें तो मोगलांस सामील झाला तरी शिवाजीशीं त्याचें सख्य होतें व तो शिवाजीस मोगली सैन्यांतील बातम्या पुरवी, असें मुसलमान लेखक म्हणतात; पण तें खरें दिसत नाहीं.

बीर आणि कंदाहर येथें भारी सामान ठेवून मराठा स्वारांचा पाठलाग करीत मोठ्या झपाट्यानें रामगीरकिल्ल्याजवळ येऊन पोंचला. परंतु मराठे स्वार त्याच्या पूर्वी दोन दिवस येऊन किल्ल्याच्या पायथ्याचीं खेडीं लुटून, कांहीं लोकांना पकडून घेऊन चालते झाले होते. अर्थात् बहादुरखान हें पाहून गोंधळून गेला, व इंदूर ऊर्फ निजामाबाद या रस्त्यानें परत फिरला; आणि कुतुबशाही मुलुखांत शिरून दिलेरखानाच्या सांगण्यावरून त्यानें तेथें लुटालूट केली. मराठ्यांनीं परत जातांना आपल्या फौजेच्या दोन टोळ्या करून एक गोवळकोंड्यावरून दक्षिणेंत रवाना केली. व दुसरी उत्तरेस चांद्यावरून जाऊन मोगली मुलुखांत शिरली. दिलेरखान पहिल्या टोळीवर चालून गेला, व बहादुरखान दुसरीच्या मागें लागला.

सुजनसिंग.

बहादुरखानानें आपलें जड सामान औरंगाबाद येथें ठेवून तो पडतुर, शेलोडे, पिंडोला या मार्गानें अंतुरच्या घाटांत येऊन दाखल झाला. यावेळीं त्याच्या बिनीवर सुजनसिंग बुंदेला हा सरदार होता. घाटांत मोगली सैन्य येऊन दाखल होतांच मराठ्यांनीं मागें वळून बिनीवर हल्ला चढविला. परंतु सुजनसिंगानें त्यांचा पराजय करून त्यांच्या जवळील सर्व लूट परत मिळविली, आणि संध्याकाळपर्यंत त्यांचा पाठलाग केला. दुसऱ्या दिवशीं मोगल सैन्यानें दुर्गापुराला येऊन तळ दिला.

बाकापुर.

तिसरे दिवशीं मोगली सैन्य औरंगाबादेला जाण्यास निघालें. वाटेंत मोगलांच्या दहाहजार सैन्यांवर साडेसातशें मराठा स्वारांनीं बाकापुरच्या घाटांत जोरानें हल्ला केला. मोगली सैन्य अगोदरच संख्येनें पंधरावीसपट अधिक होतें आणि बहादुरखानानें वेळेवर मदतहि पाठविली. त्यामुळें त्यांची व मराठ्यांची निकराची लढाई होऊन चारशें मराठे कामास आले आणि बाकीचे पळून गेले. मोगलांना मिळालेल्या या विजयाचें श्रेय शुभकरणाच्या हाताखालीं लढणाऱ्या बुंदेल्यांस आहे. त्याचा मुलगा दलपतरावहि या वेळीं जखमी झाला होता.

पाथ्री.

दिलेरखानानेंहि असाच पराक्रम करून अदिलशाहीमध्यें शिरलेल्या मराठा स्वारांवर विजय मिळवून सगळी लूट परत घेतली व पाथ्री येथें येऊन मुक्काम केला. सारांश १६७२ च्या नोव्हेंबर–डिसेंबरमधील खानदेश वऱ्हाडवरची मराठ्यांची स्वारी अगदीं व्यर्थ गेली. मराठ्यांनीं पुन्हा खानदेशांत उतरूं नये म्हणून बहादुरखानानें मुख्य मुख्य घाटांवर तोफा वगैरे ठेवून पूर्ण बंदोबस्त केला. शिवाजीचा व्याही (मुलीचा सासरा) बजाजी नाईक निंबाळकर हाहि यावेळीं मोगलांना जाऊन मिळाला होता.

६ देशावरील पळत्या लढाया स. १६७३:—याप्रमाणें खानदेश वऱ्हाडकडचा रस्ता बंद झाल्यावर मराठ्यांनीं तिसऱ्याच ठिकाणीं प्रवेश करण्याचें ठरविलें: प्रथम ते पुणें प्रांतांत एकत्र झाले. हें ऐकतांच बहादुरखान आपलें जड सामान चांभारगावांस ठेवून त्यांच्यावर चालून गेला. मराठ्यांची व मोगलांची चांगलीच जुंपली. परंतु मराठे हरले. बहादुरखानानें यावेळीं मराठी फौज लुटून ती लूट राव दलपत बुंदेल्याबरोबर बादशहाकडेस पाठविली. तारीख २२ ऑक्टोबर १६७३ रोजीं बादशहानें ती पाहून संतोष व्यक्त केला. ही लढाई कोठें झाली हें कळत नाहीं. नंतर भीमेच्या उत्तर तीरावर पेडगांव येथें खानानें मुक्काम केला. हें ठिकाण चांभारगोंद्याच्या दक्षिणेस आठ मैलांवर आहे. हें फार सोईचें स्थळ असल्यानें पुढें कित्येक वर्षें खानाचा तळ येथेंच राहिला होता. खानानें येथें शहर वसवून एक किल्लाहि बांधिला. औरंगजेबानें त्या किल्ल्यास बहादुरगड असें नांव देण्याची परवानगी दिली.

दलपत बुंदेला.

वहुशः याच वर्षी म्हणजे सन १६७३ मध्यें शिवाजीनें पुनः एकदां आपलें जन्मस्थान जो शिवनेरी किल्ला तो सर करण्याचा प्रयत्न केला होता. पूर्वीचा आबाभट आतां बाटून अबदुल अझीज नांव धारण करून औरंगजेबाचा मोठा विश्वासु नोकर बनला होता. व हाच शिवनेरीवर किल्लेदार होता. शिवाजीनें याला पुष्कळशी लांच देऊन किल्ला ताब्यांत घेण्याचें ठरविलें. राजनिष्ट अबदुल अझीजनें शिवाजी जवळून लांच घेऊन त्यास किल्ल्याचा ताबा घेण्यास एके रात्रीं सात हजार घोडेस्वार पाठविण्यास सांगितलें, आणि बहादुरखानास ही सगळी हकीकत कळवून फौज घेऊन येऊन मराठ्यांचें पारिपत्य करण्यास बोलाविलें. ठरल्याप्रमाणें मराठे घोडेस्वार किल्ल्याचा ताबा घेण्यास येतांच त्यांस वरून अबदुल अझीजनें व खालून बहादुरखानानें कैचींत पकडून सपाटून मार दिला. यांत मराठ्यांचें बरेंच नुकसान झालें व बाकीचे लोक पळून गेले.

शिवनेरी.

७ विजापुर व कानडा. १६७३:—विजापुरचा बादशहा अली आदिलशहा तारीख २४ नोव्हेंबर सन १६७२ रोजीं निवर्तला व चार वर्षांचा शिकंदर गादीवर बसला. सीदी खवासखान हा पालक व मुख्य प्रधान वनला. या वेळीं आरंभीं असा करार होता कीं, मुख्य राजधानी पालकानें संभाळावी व माजी वजीर अबदुल महंमद यानें पूर्वेकडील प्रांत, बहलोलखानानें पश्चिमेकडील प्रांत आणि मुजफरखानानें कानडा प्रांत यांचें रक्षण

शिकंदर.

करावें. परंतु हा करार मोडून खवासखानानें स्वतःच सर्व अधिकार बळकाविला. त्यामुळें हे बाकीचे तिघेजण निघून गेले व राज्यांत सर्वत्र यादवी माजली.

पुंडे.

अशी अनायासें चालून आलेली संधि कोण दवडील! शिवाजीनें आपला विजापुर दरबारांत असलेला वकील बाबाजी नाइक पुंडे यास एकदम परत बोलावून विजापुरशीं भांडण उपस्थित केलें. त्यानें अण्णाजी पंताच्या हाताखालीं निवडक फौज देऊन त्याला गुप्तपणें पुढें रवाना केलें. राजापुरच्या दाट जंगलांत या सैन्यानें तळ ठोकला. या फौजेपैकीं एक तुकडी कोंडाजी फर्जंदाच्या हाताखालीं देऊन तिजजवळ शिड्या वगैरे सामान देऊन किल्ला सर करण्यास पुढें रवाना केली होती. कोंडाजीनें गुप्तपणें रात्रीं चाल करून किल्ल्यापर्यंत जावें, व अण्णाजीनें रत्नागिरीच्या जंगलांत दबा धरून बसावें अशी व्यवस्था ठरली होती.

पन्हाळा.

तारीख ६ मार्च १६७३ च्या रात्रीं अंधार गर्द पडला होता. कोंडाजी तशा अंधारांत पन्हाळ्याच्या पायथ्याशीं जाऊन पोंचला आणि आपल्या बरोबरच्या लोकांपैकीं अत्यंत शूर व साहसी असे साठ मावळे निवडून घेऊन शिड्यांच्या सहाय्यानें एकमेकांस मदत करून त्यांच्यासह तो पन्हाळ्यावर चढला. नंतर हे साठ लोक निरनिराळ्या ठिकाणीं कर्णे वाजवीत फिरले व त्यांनीं किल्ल्यावरील शिबंदीवर निकराचा हल्ला केला. किल्ल्यावरील लोक गैरसावध असल्यानें त्यांच्यांत पराकाष्ठेचा गोंधळ उडाला आणि सगळ्या रात्रभर हातघाईची लढाई झाली. कोंडाजीनें किल्लेदाराला ठार केलें व मुजुमदार नागोजी पंडित पळून गेला. दिवस उगवतां उगवतां कोंडाजीनें किल्ला सर केला व वरील अंमलदारांना पकडून यथेच्छ चोप दिला व त्यांच्याकडून द्रव्य कोठें कोठें लपवून ठेविलें आहे हें समजून घेतलें. लांच देऊन पन्हाळा घेतला असें जेधेशकावलींत आहे तें संभवनीय दिसतें.

अण्णाजी दत्तो.

इकडे कोंडाजी फर्जंदाच्या विजयाची वार्ता कळतांच अण्णाजी आपल्या सैन्यासह चालून आला व गडावर येऊन दाखल झाला. शिवाजीहि राजगडाहून पन्हाळ्यास आला आणि एक महिनाभर तेथें राहून त्यानें किल्ल्यावर दारूगोळ्यांची भरपूर सामग्री जमवून किल्ल्याला अजिंक्य स्वरूप आणिलें. नंतर तारीख १ एप्रिल रोजीं मराठ्यांनीं परळी हस्तगत करून तारीख २७ जुलई रोजीं साताराहि सर केला.

८ उमराणीची लढाई. १६७३:—पन्हाळा गमावतांच विजापूरचें दरबार खडवडून जागें झालें. व प्रधान खवासखान याला राज्याचा बंदोबस्त व रक्षण करितां येत नाहीं असें पाहून त्याला दरबारानें फार दोष दिला. पन्हाळा किल्ला परत घेण्यासाठीं दरबारानें बहलोल-खान याची रवानगी केली व इतर तीन नामांकित सरदारांना त्याला मदत करण्याची आज्ञा पाठविली. तसेंच मोगलांनाहि आपणांकडेस वळवून घेऊन सर्वांनीं एकदांच शिवाजीवर घसरून त्याला वुडवून टाकावें असा प्रयत्न विजापुरकडून सुरू झाला. परंतु शिवाजीनें नेहमींप्रमाणेंच जोराचा पहिला तडाखा लगावून विजापुरचे सगळे मनोरथ धुळीस मिळवून दिले. " विजापुराहून बहलोलखान बारा हजार स्वारांनिशीं हिकडे चाल करून आला ही खबर राजियास कळोन कुल लष्कर (पंधरा हजार फौज व इतर निवडक सरदार) प्रतापराव याजबरोबर देऊन हुकुम केला कीं, 'विजापुरचा बहलोलखान येवढा वळवळ करीत आहे. त्यास मारून फत्ते करणें. ' त्यानें दोन रात्रीं मोठमोठ्या मजली मारून ता. १५ एप्रिलचे सुमारास विजापुरापासून पश्चिमेस ३६ मैलांवर उंबराणीस नबाबास गांठिलें. चौतर्फा राजियाचे फौजेनें कोंडून उभा केला. पाणी नाहीं. असा जेरी केला. सकाळीं युद्धास सुरवात होऊन सगळा दिवसभर युद्धहि थोर जहालें. (बहलोलचे पुष्कळ पठाण यावेळीं कामास आले. त्या मानानें मराठ्यांचें नुकसान थोडें झालें.) इतक्यांत अस्तमानहि जाहला. मग निदान करून नबाब पाणि-यावरी जाऊन पाणी प्याला. त्याजवरि प्रतापराव सर नौवत यास अंतस्त कळविलें कीं, ' आपण तुम्हांवरी येत नाहीं. पादशहाचे हुकमानें आलों. या उपरी आपण तुमचा आहे. हरएक वक्तीं आपण राजियाचा दावा न करी. ' ऐसें कितीएक ममतेचें उत्तर सांगोन सल्ला केला. (तेव्हां प्रतापरावानें आपली फौज मागें बोलाविली आणि बहलोल यास त्याच्या तळावर तिकोटा येथें जाऊं दिलें. यावेळीं एक लढाऊ हत्ती व कांहीं सामान मराठ्यांच्या हातीं आलें.) मग राजि-याचें लष्कर निघोन गेलें. राजियास खबर कळोन लष्करास ताकीद करून फजीत केलें कीं, ' सल्ला काय निमित्य केला ? "

खवासखान.

उमराणी नंतर प्रतापराव " फौजेनिशीं मोगलाईत भागानगरचा देश देवगड, रामगिरी व इतर देश मारून लुटून माघारे आले. त्याज-वरी मागती विजापुराहून बहलोलखान पन्हाळ प्रांतास बादशहांनीं रवाना केला." त्याची तयारी यावेळीं बरी होती. त्यामुळें त्यानें कित्येक

प्रतापराव.

ठिकाणीं मराठ्यांचा पराभव करून त्यांना कानड्यांतून हुसकून लाविलें. स. १६७३ च्या जून जूलै आणि ऑगस्टमध्यें त्यानें मराठ्यांना बरेंच चेपिलें असें दिसतें. परंतु सप्टेंबरमध्यें तो मिरजेस आजारी पडला. आणि याच वेळीं, मोगलांचा सेनापति बहादुरखान विजापूर व गोवळकोंडा यांच्यावर चालून येत असल्यानें त्याच्या प्रतिकारासाठीं या दोन्हीहि बादशहांनीं उलट शिवाजीचीच मदत मागितली. मुंबई कौन्सिलचा अध्यक्ष जिराल्ड ऑन्जीयर १६ सप्टेंबरच्या पत्रांत लिहितो, 'शिवाजी आपल्या सर्व शत्रूंना तुच्छ लेखीत आहे. मोगलांचें सैन्य आणि विजापुरचा बहलोलखान हे शिवाजीच्या राज्यावर कादाचित् दोन बाजूंनीं चालून जातील. परंतु त्यांच्याजवळ पुरेशी सामुग्री नसल्यामुळें कोणीहि तेथें फार दिवस तळ देऊन राहाणार नाहीं. शिवाय शिवाजीची पळती फौज वारंवार हल्ले करून त्यांना चैनहि पडूं देणार नाहीं. आणि हे सरदार स्वतःच्या फायद्यासाठीं शिवाजीचा नाशहि करणार नाहींत. फक्त बादशाही खर्चानें वारंवार स्वाऱ्या करतील एवढेंच.'

दशाहारा.

पावसाळा संपतांच तारीख १० ऑक्टोबर रोजीं म्हणजे दशाहाराला प्रारंभ झाला त्यादिवशीं शिवाजीनें कानडा सर करण्यासाठीं मोठें लष्कर पाठविलें. डिसेंबरमध्यापर्यंत हें लष्कर तिकडेच होतें. परंतु बहलोल, सर्जा आणि इतर विजापुरी सेनापति यांच्या माऱ्यामुळें त्या सैन्याला परत फिरावें लागलें.

९ नेसरीची लढाई, प्रतापरावाचा मृत्यु. सन १६७४:—उमराणी येथें विजापुरी सेनापति बहलोलखान चांगला सांपडला असून त्याला कायमचें चिरडून न टाकितां सोडून दिल्यामुळें शिवाजी प्रतापरावावर खप्पा झाला होता. सन १६७४ च्या जानेवारींत त्यानें पुनः प्रतापरावास बहलोलखानावर पाठविलें. यावेळीं त्याला सक्त ताकीद केली होती कीं, "बहलोलखानाशीं गांठ घालून (त्यास) बुडवून फत्ते करणें. नाहींतर तोंड न दाखविणें.*"

राग.

हल्ला.

शिवाजीच्या या हुकुमानें प्रतापरावाला मोठा चटका लागून गेला. आणि तारीख १४ फेब्रुवारी सन १६७४ रोजीं त्यानें बहलोलखानाला नेसरीजवळ दोन टेंकड्यांमध्यें खिंडींत गांठलें. प्रतापराव म्हणजे शिवाजीचा पराक्रमी सेनापति. पण शिवाजीच्या ताकिदीच्या पत्रानें

---

* सभासद.

जें शल्य त्याच्या अंतःकरणांत बोंचलें होतें त्यायोगें खिंडींत बहलोलखानाला पाहतांच तो संतापानें इतका वेडा होऊन गेला कीं, आपण सेनापति आहोंत याचेंहि त्याला भान राहिलें नाहीं, व साध्या पाइकाप्रमाणें तो अवघ्या सहा जणांसह। बहलोलखानाच्या अफाट सैन्यावर एकदम तुटून पडला. प्रतापरावाच्या या कृत्यानें मराठी सेना तर विस्मयानें मूढ होऊन गेली आणि हें काय होत आहे व आपण काय करावें हेंच तिला कळेना. इकडे प्रतापरावासह सहा सात जणांची तर अफाट विजापुरी फौजेनें तेव्हांच चटणी उडवून दिली. मुख्य सेनापतीच पडल्यावर मराठी फौजेची दुर्दशा मग बघावयासच नको. तिचीहि धूळधाण होऊन गेली. प्रतापरावाच्या मृत्यूच्या वार्तेनें शिवाजीलाहि फार वाईट वाटलें. शिवाजीनें त्याच्या वारसांचा योग्य परामर्ष घेतला व पुढें सहा वर्षांनीं त्याची मुलगी राजारामाला केली. हिचें नांव जानकीबाई होय.

आनंदराव.

प्रतापराव पडल्यावर त्याचा नायब सरनौबत आनंदराव यानें फौजेची जमवाजमव करून तिला कशीतरी परत फिरविली. शिवाजीनें आनंदरावाला तात्पुरता सेनापति नेमून पुनः बहलोलवर पाठविला व त्याचा पराजय केल्याशिवाय परत फिरूं नकोस अशी आज्ञा केली. आनंदराव आपली घोडेस्वारांची पलटण घेऊन बहलोलचा शोध करीत विजापुरकरांच्या प्रांतांत थेट शिरला. इतक्यांत मोगल सेनापति दिलेरखान आपला अफगाण देशबंधु बहलोल याच्या सहाय्यासाठीं तावडतोब धांऊन आला. या दोनहि सैन्याशीं एकाच वेळीं लढणें अशक्य जाणून आनंदराव रोजीं पंचेचाळीस मैलांच्या दौडीनें कानड्याकडेस निसटून गेला. व इतक्या चपळाईनें धांवणाऱ्या मराठ्यांस दोघेहि अफगाण वीर आटोपूं शकले नाहींत. मराठे गेले हें पाहून बहलोल कोल्हापुराकडेस गेला व दिलेर पन्हाळ्याजवळ पांच दिवस राहून त्याला वेढा घालणें अशक्य जाणून आपल्या तळावर (पारनेर येथें ?) निघून गेला.

संपगांव.

यानंतर तारीख २३ मार्च रोजीं आनंदरावानें कानडी मुलुखांत शिरून बहलोलच्या जहागिरींतील संपगांवची पेठ लुटून दीड लक्ष होनांची मत्ता मिळविली. ही लूट तीन हजार बैलांवर लादून तो परत येत असतां दोन हजार घोडेस्वार व इतर पायदळ यांनिशीं बहलोल व खिजर यांनीं त्याला बंकापुराजवळ गांठलें. येथें उभय सैन्याची मार्च अखेरीस निकराची लढाई होऊन खिजरखानाच्या भावाला आनंदरावानें मारून विजापुरी

सेना उधळून लाविली. या लढाईंत आनंदरावाला पांचशें घोडे, दोन हत्ती व इतरहि लूट पुष्कळच मिळाली.

लूट.

हत्ती लुटले गेल्यानें बहलोलखानाला फार कमीपणा वाटला. व त्यानें ताज्या दमाची फौज घेऊन आनंदरावाला पुनः गांठून त्याचे एक हजार घोडे सर केले व पुष्कळ दूरपर्यंत त्याचा पाठलाग केला. इकडे आनंदराव बहलोलच्या हातून निसटून सगळी लूट घेऊन स्वराज्यांत येऊन दाखल झाला. मिळविलेली लूट सुरक्षित जागीं ठेवून एप्रिलच्या प्रारंभीं तो बालेघाट चढून दुसरीं शहरें लुटण्यास शिवाजीच्या हुकुमाप्रमाणें निघून गेला.

पाहणी.

तारीख ८ एप्रिल १६७४ रोजीं शिवाजीनें स्वतः "लष्करची पाहणी करून लहान थोर लष्करास व पायदळ लोकांस खजीना फोडून वांटणी केली. आणि सरनौबतीस माणूस पाहतां हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्यें जुमला होता. बरा शहाणा, मर्दाना, सबुरीचा, चौकस शिपाई, मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' किताबती देऊन सरनौबती सोंपिली.*" तारीख २४ एप्रिल रोजीं केळंजा किल्ला सर केला.

१० दिलेरचा पराभव. जानेवारी १६७४:—विजापुरी सैन्य पन्हाळ्याला झोंबत असतां दिलेरखानाच्या हाताखालीं मोगली सैन्य जानेवारी १६७४ च्या अखेरीस कोंकणांत उतरून दंगल उडवून देण्याचा प्रयत्न करूं लागलें. हें पाहून शिवाजीनें कोंकणांत जाण्याचे सगळे रस्ते मोठमोठीं टेंकाडें पाडून बंद करून टाकिले व जे अवघड रस्ते होते तेथें सक्त चौक्या बसविल्या. तरी दिलेरखानानें तशाहि रस्त्यानें कोंकणांत उतरण्याचा यत्न केलाच. पण त्यांत त्याला एक हजार पठाणांचे जीव खर्ची घालून अपयश घेऊन परत फिरावें लागलें. मराठ्यांचीहि प्राणहानि पांच सहाशेंपर्यंत झाली असें इंग्रज लेखक म्हणतात. सन १६७३ च्या डिसेंबर पासून सन १६७४ च्या मार्चपर्यंत तीन चार महिने अदिलशहा व सीदी यांच्याशीं मराठ्यांचें सतत युद्ध चालू होतें त्यामुळें फौजा अगदीं कंटाळून गेल्या होत्या. या वर्षीं अतिवृष्टीमुळें दुष्काळ पडून सर्वत्र अतिशय महागाई झाली व घांसकाडीहि कोठें मिळेनाशी झाली. त्यामुळें शिवाजीनें आपल्या पागेंतील घोडे स्वराज्यांत अनेक ठिकाणीं वांटून दिले होते.

पराजय.

---

* सभासद.

मोगली सत्ता.

पुढें लवकरच खैबर घाटांतील अफगाणांच्या बंडानें भीषण स्वरूप धारण केल्यानें, स्वतःच्या देखरेखीखालीं युद्ध चालविण्यासाठीं औरंगजेब बादशहा तारीख ७ एप्रिल १६७४ रोजीं दिल्ली-हून हसन अवदल येथें जाण्यास निघाला. व दिलेरखानाला त्यानें उत्तरेकडेस बोलावून ईशान्येची सरहद्द संभाळण्यास सांगितलें. त्यामुळें दक्षिणेंत एकटाच बहादुरखान राहिला व त्याच्याजवळ फौजहि बेताचीच होती. या सर्व कारणांनीं दक्षिणेंत यावेळीं मोगली सत्ता अगदींच क्षीण म्हणजे नाममात्रच राहिली होती. आणि अर्थात्च शिवाजीलाहि ही वेळ स्वस्थपणें राज्याभिषेक करून घेण्याला उत्तम होती.

चतुःसीमा.

राज्याभिषेकाच्या वेळीं म्हणजे सन १६७४ मध्यें शिवाजीच्या राज्याची काय चतुःसीमा होती हें आतांच पाहणें मोठें आनंददायक आहे. सन १६४८ व सन १६५९ या वर्षी या राज्याची मर्यादा काय होती हें मागें ३ ऱ्या प्रकरणांत (पृष्ठ ३९वर) सांगितलेंच आहे. सन १६५९ च्या नोव्हेंबरपासून सन १६६० च्या फेब्रुवारीपर्यंत जो मुलुख त्यानें काबीज केला, त्यापैकीं दक्षिण कोंकण फक्त त्याजकडेस राहिलें. बाकीचा प्रदेश लवकरच त्याचे ताब्यांतून गेला. दक्षिण कोंकणांत राजापुर व वेंगुर्ला या दोन बंदरांशिवाय रत्नागिरी तालुक्यांतील पश्चिम किनाऱ्यावरचीं सगळीं बदरें त्याच्या ताब्यांत आलीं. व राजापुर व वेंगुर्ला हीं बंदरें सन १६६३ मध्यें शिवाजीनें घेतलीं. पुढें वाडीच्या सांवतांशीं त्याचा झगडा होऊन त्यांचा वराच प्रांत शिवाजीनें स्वराज्यांत सामील केला व दक्षिण कोंकणाचा तो एकटाच अधिपति बनला. कुलाब्याच्या पश्चिमे-कडील किनाराहि सीदीपासून त्यानें हस्तगत केला.

प्रांत.

सन १६६५ च्या पुरंदराच्या तहानें शिवाजीचा जो प्रांत मोगलांकडेस गेला होता तो सन १६७०--७१ मध्यें त्यानें परत मिळविलाच. सन १६६४ पासून मराठ्यांच्या स्वाऱ्या कानडी मुलुखांत कारवार, हुबळी, बेदनूरपर्यंत होऊं लागल्या होत्या. परंतु तो प्रांत सन १६७५ पर्यंत त्यांचे ताब्यांत आला नव्हता.

स्वराज्य.

सन १६७१–७२ मध्यें वागलाण, जव्हार, रामनगर हे प्रांत शिवाजीनें स्वराज्यास जोडले. चांदोरचा डोंगरी किल्ला मात्र मोगल व मराठे यांच्यापैकीं कोणाहि कडेस कायम असा कांहीं दिवसहि राहिला नाहीं. खानदेश–बागलाणच्या उत्तरेकडील मार्गाच्या सुरक्षिततेच्या

दृष्टीनेंच फक्त या किल्ल्याचें महत्त्व शिवाजीस वाटत होतें. बाकी विशेष असें यांत कांहीं नव्हतें.

दक्षिण.

सन १६७३ मध्यें पन्हाळा व कोल्हापूर आणि सन १६७५ मध्यें फोंडा स्वराज्यांत सामील केल्यानें दक्षिणेकडेस शिवाजीचा अंमल दृढमूल झाला. आणि सन १६७५ मध्यें हा राज्यविस्तार कोल्हापुरापलीकडे गेला असून वर घांटीं कर्नाटकांत जाऊन पोंचला होता. याप्रमाणें राज्यारोहणसमयीं स्वराज्याची मर्यादा वाढलेली होती.

प्रकरण ९ वें

राज्यारोहण

[१ समारंभाची आवश्यकता. २ शिवाजीचें क्षत्रियत्व. ३ समारंभाची सिद्धता. ४ पूजा व प्रायश्चित्त. ५ राज्याभिषेक व सिंहासनारोहण. ६ स्वारीची मिरवणूक. ७ मोगलांवर जंगी स्वारी. ८ बहादुरखानाचा नादानपणा. ९ मोगलांशीं पुनः झगडा व विजापुरकरांशीं सख्य.]

समारंभाची आवश्यकता:—शिवाजीनें अचाट पराक्रम केले, पुष्कळ प्रांत जिंकले, अगणित संपत्ति मिळविली, शूर फौजा पदरीं बाळगिल्या, लढाऊ जहाजें बांधिलीं, यामुळें परमेश्वरी संकेताप्रमाणें हजारों लोकांचें जीवित त्याच्या इच्छेवर अवलंबून राहिलें, तथापि त्याला अभिषेकपूर्वक राजा ही पदवी प्राप्त झालेली नसल्यामुळें राजकीय संबंधांत इतर बादशहांशीं वागतांना त्याला मोठीच अडचण भासत असे. त्याच्या अलोट साहसानें व प्रखर बुद्धिशालित्वानें सर्व जग थक्क होऊन गेलें होतें तरी औरंगजेब बादशहा त्याला एक लहानसा जमीनदार समजत असे व अदिलशहाच्या दृष्टीनें तर तो पदरच्या सरदाराचा बंडखोर पुत्र ठरलेला होता. गोवळकोंड्याची कुतुबशाही दक्षिणेंतीलच असल्यानें तेथील बादशहाचीहि शिवाजीविषयीं भावना अदिलशहाहून भिन्न असण्याचें कारणच नव्हतें.

भावना.

यथाशास्त्र राजा ही पदवी प्राप्त झाली नसल्यानें ज्या लोकांवर तो स्वपराक्रमानें राज्य करीत होता त्यांच्यापासून राजनिष्ठेचीहि अपेक्षा त्याला करितां येत नव्हती. राजपद हें वंशपरंपरा चालणारें असल्यानें राजाचें वचन विश्वासपात्र समजतात. त्या दृष्टीनेंहि शिवाजीची कुचंबणा होत होती. राजा या नात्यानें त्याला कोणत्याहि तहावर सही करता येत नव्हती, व कोणासहि कायमच्या देणग्या देतां येत नव्हत्या. त्यानें जिंकिलेल्या प्रदेशावर जरी तो निष्कंटकपणें सत्ता चालवीत असे तरी त्याचें सर्वमान्य स्वामित्व अझून प्रस्थापित व्हावयाचें होतें. त्याच्या भगव्या झेंड्याखालीं जमलेली फौज कोणत्या तरी राजाची प्रजा असल्यानें व शिवाजी हा राजा

अडचणी.

नसल्यानें राजद्रोहाच्या आरोपांतून मुक्त होत नव्हती. व पूर्वीच्या राजाचें वर्चस्व झुगारून देण्यासहि समर्थ नव्हती. सारांश या सर्व अडचणींचा निरास होऊन प्राप्त स्थितीला स्थैर्य येण्यासाठीं शिवाजीला सशास्त्र राजपद धारणाची आवश्यकता होती.

जरूरी.

भोसले हे मूळचे इतर मराठा सरदारांसारखेच होत. परंतु शिवाजीमुळें त्यांचा अकस्मात् कल्पनातीत उत्कर्ष झाल्यामुळें इतर मराठे सरदारांना त्यांचा हेवा वाटूं लागला होता. हे मत्सरी सरदार स्वतःस मोठ्या अभिमानानें मोगलांचे अगर अदिलशहाचे राजनिष्ठ चाकर म्हणवून घेत असत व शिवाजीला वंडखोर, लुटारू म्हणून नांवें ठेवीत असत. या सर्वांचीं तोंडें बंद करून औरंगजेब व कुतुबशहा, अदिलशहा यांच्या बरोबरीनें मांडीशीं मांडी ठोकून वसण्याचा मान मिळविण्यासाठीं राज्यारोहणसमारंभाचीच खास आवश्यकता होती.

क्षत्रियत्व.

गागा भट्टाच्या मतें " मुसलमान पादशहा तक्तीं बसवून छत्र धरून पातशाही करितात आणि शिवाजी राजे यांनींहि चार पादशाही दबविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गड कोट असें (मेळविलें) असतां त्यांस तक्त नाहीं, या करितां मऱ्हाटा राजा छत्रपति व्हावा असें चित्तांत आणिलें. " याप्रमाणें थोर समजूतदार लोकांच्याहि भावना झाल्या होत्या. शिवाजी हा हिंदु धर्मरक्षक आहे, या भावनेनें हिंदु लोक त्याच्याकडेस पाहात होते. अर्थात् हिंदुधर्माचा जगांत मानसन्मान व्हावा व त्याची सर्वतोपरी उन्नति व्हावी अशीच त्यांची भावना असणें सहाजिक होतें.

२ शिवाजीचें क्षत्रियत्वः—परंतु अशा तऱ्हेच्या राज्याभिषेकाला एक मोठी धार्मिक अडचण उपस्थित झाली. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें क्षत्रियालाच फक्त राज्यारोहणाचा अधिकार आहे. शिवाजीचे पूर्वज शेतकरी असल्यानें, क्षत्रियांचे अधिकार त्यांना नव्हते. शिवाय कलियुगामध्यें ब्राह्मण आणि शूद्र असे दोनच वर्ण अस्तित्वांत असून क्षत्रिय आणि वैश्य यांचा संपूर्ण क्षय होऊन ते बीजमात्र शिल्लक आहेत असें कांहीं लोक मानितात. या सर्व आक्षेपांचा निरास होऊन शिवाजीचें क्षत्रियत्व प्रस्थापित होईपर्यंत राज्यारोहणाचा अधिकार त्याला प्राप्त होत नव्हता. याप्रमाणें सर्व शंकांचा निरास करून क्षत्रियत्व प्रस्थापित करण्यासाठीं विद्वान् व सर्वमान्य अशा पंडिताची आवश्यकता होती. व असा पंडित त्यावेळीं काशीस एक गागाभट्टच होता. तो अनायासें यावेळीं महाराष्ट्रांत शिवाजीच्या भेटीसाठीं आला होता. " त्यास राजे व सरकारकुन सामोरे जाऊन भेट घेऊन

सन्मानें आणिलें. त्यांची पूजा नानाप्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती, देऊन द्रव्यहि उदंड देऊन पूजिलें. गागाभट्ट बहुत संतुष्ट जाहले. (स्वतः गागाभट्ट) गोसावी थोर पंडित चार वेद, सहा शास्त्रें, योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलियुगींचा ब्रह्मदेव असे होते. त्यांनीं राजियाचे वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्रिय शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. " त्यावरून शिवाजी सूर्यवंशांतील असून भोसले हे शुद्ध क्षत्रिय असल्याबद्दल गागानें स्वतःची खात्री करून घेतली.

आधार.

३ समारंभाची सिद्धताः—याप्रमाणें शिवाजीचें क्षत्रियत्व सिद्ध झाल्यावर राज्याभिषेकाच्या विधीचा तपास सुरू झाला. कारण अलीकडेस पुष्कळ वर्षांत हा विधि झाला नसल्यानें त्याचा सर्वांनाच विसर पडलेला होता. ग्रंथांतरींचे आधार शोधून काढून उदेपुर जयपुर कडून चालू पद्धतीची माहिती घेऊन येण्यासाठीं मुद्दाम माणसेंहि पाठविलीं.

लक्ष समाज.

समारंभासाठीं हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणचे विद्वान् ब्राह्मण मुद्दाम बोलाविण्यांत आले. आणि हा अभूतपूर्व समारंभ पाहण्यासाठींहि शेंकडों लोक आपण होऊन आले. एकंदर अकरा हजार ब्राह्मण सकुटुंब सपरिवार रायगडावर जमले होते. म्हणजे त्यांचीच संख्या पन्नास हजारांजवळ गेली होती. त्या सर्वांना पचपक्वान्नांचें जेवण नित्यहि मिळत असे. त्याशिवाय इतर पाहुणे, सरदार व आप्तमंडळी, राज्यांतील बहुतेक अंमलदार, इतर राजांचे वकील, परदेशीय व्यापारी व प्रवासी ही सगळी मंडळी मिळून सुमारें पन्नास हजारांची संख्या झाली होती. याप्रमाणें राज्यारोहणासाठीं सरासरी एक लक्ष लोक जमले असून प्रत्यहीं दोन वेळां रायगडावर लक्ष भोजन होत होतें. आणि स्वाऱ्या करण्यांत, देश जिंकण्यांत आणि राज्याची व्यवस्था लाविण्यांत जसें शिवाजीचें चातुर्य पदोपदीं दिसतें तसेंच तें या एक लक्ष लोकांच्या राहण्याची व जेवणाखाणाची वरदास्त ठेविण्यांतहि दिसतें. इतक्या लोकांच्या सुखसोईचा अगाऊ पूर्ण विचार करून सर्व व्यवस्था करण्यांत निःसंशय शिवाजीची दूरदृष्टि प्रतीतीस येते, असें तत्कालीन इंग्रज लेखकांनींहि लिहून ठेविलें आहे.

पूजा.

४ पूजा व प्रायश्चित्तः—राज्याभिषेकापूर्वी शिवाजीनें निरनिराळ्या क्षेत्रीं जाऊन तेथील देवतांचें दर्शन घेतलें. सन १६७४ च्या मे मध्यें तो चिपळुणास गेला व तेथें परशुरामाची पूजा करून तारीख १२ रोजीं रायगडास परत आला. चार दिवसांनंतर प्रतापगडावरील

'रामवरदायिनी माते'च्या दर्शनास शिवाजी गेला. तुळजापुरची भवानी ही भोसल्यांचें कुळदैवत. पण ती फार दूर असल्यानें या देवीची स्थापना करण्यांत आली होती हें प्रसिद्धच आहे. या देवीला शिवाजीनें छप्पन हजार रुपये किमतीची दीड मण वजनाची सुवर्णाची छत्री अर्पण केली, व इतरहि बरीच देणगी दिली.

प्रायश्चित्त.

तारीख २१ मे रोजीं दोन प्रहरीं तो रायगडावर परत आला व भोसल्यांचा कुलोपाध्याय प्रभाकरभट्टाचा मुलगा बाळंभट याच्या अनुज्ञेनें महादेव, भवानी आणि इतर देवस्थानें यांच्या पूजा शिवाजीनें यथासांग केल्या. हा पूजाक्रम बरेच दिवस चालला होता. हें कृत्य संपल्यावर गागाभट्टानें शिवाजीकरवीं यथाशास्त्र प्रायश्चित्त करवून त्यास शुद्ध करून घेतलें. नंतर तारीख २८ मे रोजीं उपनयनसंस्कार करून गायत्रीमंत्राचा उपदेशहि केला.

तुला.

दुसरे दिवशीं म्हणजे तारीख २९ मे रोजीं ज्ञाताज्ञात दोषपरिहारार्थ सप्त धातू व सप्त धान्य यांत शिवाजीची तुला करून त्यावर एक लक्ष होन दक्षिणा ठेवून तेंहि सर्व ब्राह्मणांस अर्पण केलें. यानंतर एक विधि होण्याचा बाकी राहिला आहे असें दोन पंडितांनीं मध्येंच उठून सुचविलें. तो म्हणाले, "शिवाजीनें निरनिराळीं शहरें लुटलीं व जाळपोळ केली. त्यांत ब्राह्मण, गायी, स्त्रिया व मुलें यांची हत्या झालेली आहे. तिचें परिमार्जन होणें अवश्य आहे, व तें प्रायश्चित्तपूर्वक ब्राह्मणांना दक्षिणा दिल्याशिवाय इतर कोणत्याही मार्गानें होणार नाहीं." त्या दोन पंडितांचें हें म्हणणें सर्वांस पटून या निमित्त आठ हजार रुपये दक्षिणा ब्राह्मणांस देण्याचें ठरवून हाहि अडथळा दूर करण्यांत आला.

५ राज्याभिषेक व सिंहासनारोहण:—ब्राह्मणांना प्रत्यक्ष सुवर्ण दक्षिणा देऊन सर्व प्रकारचीं प्रायश्चित्तें करून शुद्ध झाल्यावर शिवाजीला आतां राज्यारोहणाचा अधिकार प्राप्त झाला.

पूर्वदिवस.

शालिवाहन शके १५९६ आनंदनाम संवत्सरे, ज्येष्ठ शुद्ध १३, शनिवार तारीख ६ जून सन १६७४ हा दिवस राज्याभिषेकासाठीं निश्चित करण्यांत आला. पूर्वदिवशीं म्हणजे शुद्ध १२ स त्यानें गंगोदकानें स्नान केलें. शिवाजीनें त्यादिवशीं उपोषण करून ब्राह्मणांस दक्षिणा दिली. गागाभट्टास याच दिवशीं पांच हजार होन दक्षिणा देण्यांत आली, आणि इतर ब्राह्मणांस शंभर शंभर होन मिळाले.

जिजाबाईंचें सुख.

शुद्ध १३ हा समारंभाचा मुख्य दिवस. आजपर्यंत रोज कांहींना कांहीं धार्मिक विधि असून त्यांतच शिवाजीचा बहुतेक वेळ जात असे. आज पहांटेपासूनच विधीस सुरुवात होणार होती. सचैल

व समंत्रक असें शुद्धोदकानें स्नान केल्यावर शिवाजीनें कुलस्वामीचें दर्शन घेतलें. कुलोपाध्याय, गागाभट्ट आणि इतर विद्वान् ब्राह्मण यांना नमस्कार केला आणि समर्थ रामदास स्वामी व मातुश्री जिजाबाई यांना वंदन केलें. यावेळीं जिजाबाईच्या आनंदाला सीमाच नव्हती. तिचें बालपण सुखांत गेलें होतें. परंतु तरुणपणांत शहाजीनें तिला टाकून दुसरें लग्न केल्यानें साहजिकच ती दुःखी होती. आणि पुढें शिवाजीच्या पराक्रमानें तिला आनंद वाटत असला तरी तिचा काल मोठ्या चिंतेंतच गेला होता. ती आतां ऐशींच्या घरांत आली असून, अत्यंत वृद्ध झाली होती. तथापि तिचे डोळे झांकण्यापूर्वी शिवाजीला प्राप्त झालेली पदवी व सुख पाहून तिचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा होणें साहजिक होतें. मनुष्यजन्मांत अधिकांत अधिक जें ऐश्वर्य मिळणें शक्य आहे तें शिवाजीनें स्वपराक्रमानें प्राप्त करून घेतलें होतें. ज्या देशांत तो जन्मला तेथील शत्रूंना पादाक्रांत करून तो सशास्त्र राज्यावर आरोहण करणार होता. शिवाजी हा अजिंक्य योद्धा असून जिजाबाईला शिवाजीपेक्षांहि प्रिय असलेल्या धर्माचा तो संरक्षक असल्याबद्दल त्याची प्रसिद्धि झाली होती. या एकंदर कारणांमुळें जिजाबाईच्या सुखाला तर पारावारच नव्हता. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत अशा दोनच भाग्यवंत माता दिसतात. एक पंधराव्या शतकांतील आंध्रराजा शातकर्णी याची मातुश्री गौतमी देवी व दुसरी सतराव्या शतकांतील ही जिजादेवी होय. या समारंभानंतर अवघ्या वाराच दिवसांनीं जिजाबाई मृत्यु पावली. यावरून हा समारंभ पाहाण्या-साठींच परमेश्वरानें तिला आजपर्यंत जिवंत ठेविलें होतें असें म्हणावें लागतें. निःसीम मातृभक्त, पौरजनांचा त्राता, त्यांच्या सुखदुःखांत संविभागी, शक यवन पल्हव यांचा नाश करणारा, गोब्राह्मणप्रतिपालक, चातुर्वर्णरक्षक, अनेक समरांत शत्रुसमुदायास पराजित करणारा, सत्पुरुषांचें आश्रयस्थान, श्रीचें अधिष्ठान व दक्षिणापथाचा राजा हीं सगळीं गोतमीपुत्र शातकर्णींचीं नाशिक शिलालेखांतील विशेषणें शिवाजीसहि पूर्णपणें लागू पडतात.*

---

* महादेव्या गोतमी बालश्री मातुः राजराजस्य श्रीशातकर्णेः गोतमे पुत्रस्य-आविपन्न मातृ शुश्रूषा कस्य-पौरजन निर्विशेष समसुखदुःखस्य-शक यवन पल्हव-निसूदनस्य द्विजावर-कुटुंब विवर्धनस्य खखरात वंश निरवशेषकारस्य-विनिवर्तित-चातुर्वर्णसंकरस्य-अनेक समरावजित शत्रुसंघस्य-सत्पुरुषाणां आश्रयस्य-श्रिया अधिष्ठानस्य-दक्षिणापथेश्वरस्य.

राज्यारोहणसमारंभांत अभिषेक हा मुख्य विधि असून त्यानंतर छत्रचामर धारण केलें म्हणजे छत्रपति ही पदवी प्राप्त होते. अभिषेक-समयीं शिवाजीचा पोषाख शुभ्र असून त्याच्या गळ्यांत फुलांचे हार घातले होते. कपड्यावर सुवासिक द्रव्यें शिंपडलीं असून इतरहि भूषणें तो ल्याला होता. याप्रमाणें वस्त्रालंकारयुक्त होऊन तो अभिषेकासाठीं सुवर्ण-चौकीवर येऊन बसला. ही चौकी दोन फूट उंच व दोन फूट चौरस होती. त्याच्या डाव्या बाजूस पट्टराणी सोयराबाई व मागच्या बाजूस युवराज संभाजी बसला होता. सोयराबाईच्या पदराची शिवाजीच्या शेल्याशीं गांठ मारलेली होती. "सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांब्ये केले. आठ कलश व आठ तांब्ये यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक" सप्त महानद्या व समुद्र यांच्या उदकांनीं मंत्रोच्चाराच्या गजरांत व मंगलवाद्यांच्या घोषांत केला. (ब्राह्मणवर्णीय) सोळा सुवासिनींनीं राजास पंचारती ओंवाळली. याप्रमाणें अभिषेकाचा विधि यथासांग पार पडला. यानंतर शिवाजीनें कपडे बदलले. वर सोनेरी कलाबतूंनीं विणकाम केलें होतें असा शेंदरी अंगरखा त्यानें अंगांत घातला. रत्नजडित सुवर्णालंकारांनीं तो विभूषित झाला. मोत्यांचा कंठा व फुलांचा हार यावेळीं त्याच्या गळ्यांत रुळत होता. आणि मोत्यांचा तुरा असलेली उंची पगडी त्याच्या मस्तकावर होती. ढाल तलवार व धनुष्यबाण यांची पूजा केल्यावर त्यानें पुनः गुरुजनांना वंदन केलें व नंतर ज्या दालनांत सिंहासन ठेविलें होतें त्या दालनांत तो सुमूहुर्तावर प्रविष्ट झाला.

अभिषेक.

राज्यारोहण जेथें व्हावयाचें तें दालन उत्तम प्रकारें शृंगारलें होतें. भिंतीवर धार्मिक आज्ञेप्रमाणें निरनिराळ्या अशा बत्तीस आकृति (स्वस्तिकें ?) व कित्येक शुभ वृक्षांचीं चित्रें काढिलीं होतीं. दालनाला भरजरीचें छत असून त्याला मोत्यांची झालर लाविलेली होती. खालीं मोठमोठे गुजामे पसरले होते. आणि मध्यभागीं सुंदर नकस काम केलेलें सिंहासन ठेविलें होतें. "तख्त सुवर्णाचें बत्तीस मणाचें सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तख्तास जडाव केलीं. जडित सिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव रायगड म्हणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. गडावरी तक्त बसवावें असें केलें.*" बत्तीस मण म्हणजे चौदा लक्ष रुपयांचें सोनेंच झालें. रत्नाची किंमत त्याशिवाय. हें सिंहासन तयार करीत असतांना दिल्लीचें मयूर सिंहासन शिवाजीच्या दृष्टीपुढें असावें. हें

सिंहासन.

* सभासद.

सिंहासन अतिशय मूल्यवान होतें असें तत्कालीन इंग्रज लेखकहि म्हणतात. सिंहासना (-च्या अष्टकोनां) स अष्ट खांब रत्नजडित केले. " छत्र जडावाचें मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें." व्याघ्रांवरावर मखमल लावून तें व्याघ्रांवर सिंहासनावर आंथरलेलें होतें. सारांश या दालनांत आर्यपद्धतीचा साधेपणा व मोगली पद्धतीचा विलासीपणा यांचें मिश्रण मोठें हृदयंगम दिसत होतें.

चिन्हें.

सिंहासनाच्या उभय बाजूंस सुवर्णाचे त्रिशूळ उभे केले असून त्यावर निरनिराळीं राजचिन्हें लटकविलेलीं होतीं. उजवीकडेस देवमाशांचीं भव्य सुवर्ण-मस्तकें अडकवून ठेविलीं होतीं. या मत्स्यांचे दांत फारच मोठे होते. डावीकडेस एका त्रिशुळावर तुर्कांच्या पद्धती-प्रमाणें घोड्यांच्या शेंपट्या लटकावून दिलेल्या होत्या व दुसऱ्यावर न्यायदर्शक चिन्ह म्हणून आडव्या सरळ रेषेंत दांडी असलेली तराजू लोंवत होती. राज-वाड्याच्या मुख्य दरवाजाजवळ उदकांनीं भरलेले कुंभ ठेविले असून त्यांवर वृक्ष-पल्लव पसरले होते. तसेंच गोपुराजवळ एक कलभ (हत्तीचें पिलूं) आणि दोन सुंदर घोडे उभे केले होते. घोड्याची लगाम व सामान सोन्याचें केलेलें होतें. हीं सगळीं शुभचिन्हें म्हणून प्रसिद्ध आहेत.

छत्रपतित्व.

शिवाजी सिंहासनावर आरूढ होतांच दरबारी मंडळींनीं त्यावर सुवर्ण पुष्पांची व रत्नपुष्पांची वृष्टि केली. नंतर (ब्राह्मणवर्णीय) सोळा सुवासिनींनीं पंचारती ओंवाळिली. आणि ब्रह्मवृंदांनीं वैदिक मंत्रांच्या घोषांत शिवाजीला शुभ आशीर्वाद दिले. शिवाजीनें त्यांना भक्तिपूर्वक नमन केलें, व सर्वांनीं " शिवाजी महाराजकी जय " म्हटलें. या जयघोषानें आकाश दुमदुमून गेलें. सर्व वाद्यें एकाच वेळीं वाजविण्यांत आलीं व त्यांच्या आवाजानें नभोमंडळ भेदून गेलें. राज्यांतील सर्व किल्ल्यांवर राज्यारोहणाच्या ठरविलेल्या वेळीं तोफांची सरबत्ती झाली. या समारंभाचा मुख्य पुरोहित गागाभट्ट, वर मोत्यांचा तुरा लाविलेला भरजरीचा राजमुकुट हातांत घेऊन, सिंहासनाजवळ गेला व तो मुकुट त्यानें शिवाजीच्या मस्तकावर ठेवून ' शिवछत्रपती की जय ' असा घोष केला.

अष्टप्रधान.

नंतर इतर वेदोनारायण पुढें होऊन त्यांनीं शिवाजीवर आशीर्वादांची वृष्टि केली. या वेळीं शिवाजीनें सर्वांना मिळून २४ हजार होनांची दक्षिणा वांटिली. तीपैकीं ७ हजार होन एकट्या गागासच मिळाले. " कित्येक नवरत्नादिक सुवर्णकमलें व नानासुवर्णफुलें, वस्त्रें उदंड दिधलीं.

दान पद्धतीप्रमाणें षोडश महादानें इत्यादिक दानें केलीं. अष्टप्रधानांस लक्ष होन दर असामीस, त्या खेरीज एक एक हत्ती, घोडा, वस्त्रें अलंकार असें देणें दिलें. अष्टप्रधानांचीं मुसलमानी नांवें बदलून मुख्य प्रधान, मंत्री, अमात्य, सुमंत, पण्डितराव, सचिव, सेनापति, न्यायाधीश अशीं संस्कृत ठेविलीं व तींच प्रचलित केलीं."

थाट.

युवराज संभाजी, मुख्य प्रधान मोरो त्रिंबक पिंगळे आणि मुख्य राजगुरु गागा भट्ट असे तिघेजण सिंहासनाच्या किंचित् खालच्या बाजूला पण सर्वांना दिसतील असे बसले. बाकीचे सात प्रधान सिंहासनाच्या उजव्या डाव्या अशा दोन बाजूंस दोन ओळींत उभे राहिले. बाकीची दरबारी मंडळी व पाहुणे आपआपल्या योग्यतेप्रमाणें मोठ्या आदबीनें उभे राहिले होते.

ऑक्सडेन.

राज्यारोहणाचा सर्व विधि समाप्त झाला त्या वेळीं सकाळीं आठांचा सुमार झाला होता. नंतर निराजीपंतानें इंग्रज वकील हेनरी ऑक्सडेन यास सामोरें आणून उभें केलें. हेनरीनें शिवाजीस खालीं लवून मुजरा केला आणि त्याचा दुभाष्या नारायण शेणवी यानें इंग्रजांतर्फे हिऱ्याची आंगठी राजांस नजर केली. शिवाजीनें हेनरीस सिंहासनाजवळ मानाचा पोषाख दिला व मग त्यास रजा दिली.

६ स्वारीची मिरवणूकः—सर्वांचा नजराणा झाल्यावर शिवाजी सिंहासनावरून खालीं उतरला व बाहेर येऊन आपल्या घोड्यावर स्वार झाला. घोड्यावरील सामान मोठें किमती होतें. शिवाजी घोड्यावरून राजवाड्याच्या मैदानांत आला. तेथें खालीं उतरून त्यानें आपल्या आवडत्या हत्तीवर आरोहण केलें. हत्तीवरील सामान व झूल याच प्रसंगासाठीं अतिशय किंमती अशी मुद्दाम तयार केलेली होती. हत्तीच्या आसपास अष्टप्रधान, मागें सगळा फौजफाटा, आणि जरीपटका, व भगवा झेंडा सर्वांच्या पुढें दोन हत्तीवर, त्या मागें आपआपल्या तुकडीचे पृथक् पृथक् झेंडे घेऊन सज्ज झालेलें पायदळ, नंतर तोफखान, त्यांतच वाद्यें, असा या स्वारीचा थाट होता. रायगडावर या वेळीं प्रत्येक घर ध्वजापताकांनीं व तोरणांनीं शृंगारलें होतें. ही स्वारी राजरस्त्यानें निघाली तेव्हां घरोघरच्या सुवासिनींनीं राजावरून मंगलदीप ओंवाळिले व लाह्या, फुलें, दूर्वा, यांचा राजावर पाऊस पाडिला. रायगडावरील अनेक मंदिरांत राजानें जाऊन दर्शन घेतल्यावर ही स्वारी राजमहालांत परत फिरली

स्वारी.

तारीख ७ जून रोजीं परदरबारचे वकील व पाहुणे यांना पोषाख दिले.

इतर दानधर्म.

इतर ब्राह्मणांना-पुरुषांना ३ पासून पांच रुपयांपर्यंत व मुलांना रुपया दोन रुपये-दक्षिणा वांटिली. आणि इतर भिकाऱ्यांनाहि बराच दानधर्म केला. हें दानधर्माचें कृत्य बारा दिवसपर्यंत सारखें चालू होतें. व अर्थात्च या दिवशींहि सर्वांना सरकारांतूनच जेवण मिळत होतें.

या प्रसंगीं रायगडावर बाहेरचेच एक लक्ष लोक आले होते, व महिना ज्येष्ठाचा

वर्षा.

होता. त्यामुळें ऊष्मा अतिशय होत असेल यांत शंकाच नाहीं. परंतु राज्याभिषेक व राज्यारोहण समारंभ झाल्यावर एक दोन दिवसांनींच मुसळधार पाऊस पडून सर्वांच्या सुखशांतीला वृद्धिंगत करिता झाला. मेघराजाहि जणूं काय या राज्यारोहणानें संतुष्ट झाला असेंच सर्वांना वाटलें. पुढें तारीख ८ रोजीं शिवाजीनें एक लग्न केलें व नंतर थोडे दिवसांनीं आणखी दोन लग्नें केलीं.

हा मंगल समारंभ संपल्यानंतर थोडे दिवसांनीं म्हणजे तारीख १८ जून रोजीं

जिजाबाईंचा मृत्यु.

मातुश्री जिजाबाई स्वर्गवासी झाली. सुखाची परमावधि व वयाची परिपक्वता झाल्यामुळें हा मृत्यु तिलाहि आनंदप्रद झाला असला पाहिजे. जिजाबाईची खासगी संपत्ति पंचवीस लक्ष होनांची निघाली असें म्हणतात. मातुश्रीची उत्तरक्रिया झाल्यानंतर राज्यारोहणाचा समारंभ पुनः करण्यांत आला.

राज्याभिषेक व राज्यारोहण यानिमित्त " संपूर्ण खचाची संख्या एक क्रोड

खर्च.

बेचाळीस लक्ष होन झाले " असें सभासद म्हणतो. म्हणजे दहा कोटि दहा लक्ष रुपये खर्च झाला असें दिसतें. आणि लाख दीड लाख लोकांना एक महिनाभर सुग्रास भोजन, दक्षिणा, देणगी, इतर धर्मादाय, सुवर्णसिंहासन, कचेरीचा व नगराचा शृंगार, मेजवान्या, जिजाबाईच्या मृत्यूनंतर लहान प्रमाणांत कां होईना पण दुसरा समारंभ या सर्वांना इतका खर्च होणें साहजिक दिसतें.

७ मोगलांवर जंगी स्वारीः—स्वस्थपणें विश्रांति घेणें हें शिवाजीला

जरूरी.

कधींच आवडत नव्हतें. व राज्यारोहणाच्या समारंभांत खर्चहि मनस्वी झाला होता. त्यामुळें कोठेंतरी मुलुखगिरीवर निघावें असें त्यानें ठरविलें.

दिलेरखानास उत्तरेकडेस बोलाविल्यामुळें दक्षिणेंत मोगली सत्ता अगदीं कम-

लूट.

ताकत झाली होती म्हणून तिकडेच प्रथम स्वारी करावी असा विचार मराठा दरबारांत आज दोन महिन्यांपासून घोळत होता. तदनुसार भर पावसाळ्यांत मराठे स्वारीवर निघाले. पहिल्याप्रथम जुलईच्या मध्यास दोन हजार घोडेस्वारांची टोळी बहादुरखानावर पेडगांव येथें चालून गेली. खानानें अर्थात्च तिचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. या टोळीनें खानाला हुलकावणी दाखवून, त्याच्या तळापासून चांगला पन्नास मैल दूर नेला. आणि इकडे निराळ्याच रस्त्यानें सात हजार स्वारांनीं खानाचा गोठ सावकाशपणें लुटून एक कोटि रुपयांची मालमत्ता आणि औरंगजेबास नजर करण्यासाठीं खानानें जमविलेले दोनशें उमदे घोडे मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेऊन ते खानाचा गोठ जाळून निघून गेले.

विजापुरशीं मराठ्यांचें युद्ध चालूच होतें. पण तें इतकें जोरांत नव्हतें.

कोळवन.

विजापुरकरांचा एक सेनापति–बहुधा दुसरा रुस्तमेजमान–हा जुलईमध्यें कोंकणांत उतरून मराठ्यांपासून राजापुर परत घेण्यासाठीं कोल्हापुराजवळ घांटावर सैन्य जमवून तयार होता. ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर या तीन महिन्यांत मराठी फौजा कोळवणामध्यें घिरट्या घालीत होत्या व सुरतेला दमदाटी देत होत्या. परंतु तीन चार हजार कोळी सैन्यानें या वेळीं मराठ्यांना चांगलेंच अडवून धरिलें. पुढें मराठ्यांनीं त्यांस एक लक्ष रुपयांपर्यंत लांच देण्याचाहि प्रयत्न केला. पण तोहि व्यर्थ झाला. तेव्हां या बाजूच्या किल्ल्यांचा योग्य बंदोवस्त करून ही मराठी फौज औरंगाबादेस मुख्य फौजेस मिळण्यास निघून गेली, त्यामुळें सुरतेला स्वास्थ्य प्राप्त झालें. स्वतः शिवाजी औरंगाबादेजवळ मोठी फौज घेऊन आला होता. त्यानें बहादुरखानाच्या गोठापर्यंत चाल करून औरंगाबादेजवळील कित्येक गांवें लुटून नंतर तो बागलाण-खानदेश मध्यें शिरला. आणि डिसेंबर मध्यापर्यंत तेथेंच राहिला. यावेळीं शिवाजीनें धरण-गांव व तेथील इंग्रजांची वखारहि लुटली. येथील फौजदार कुतबुद्दीनखान खेजगी यानें मराठ्यांना थोडा अडथळा केला. परंतु त्याचे तीन चारशें लोक त्यांत पडले व तो स्वतः औरंगाबादेस पळून गेला. बहुशः याच स्वारींत शिवाजीनें जुन्नर-जवळ तळ दिला होता. परंतु तटावरील तोफेनें मराठ्यांचा एक सरदार अकस्मात् उडवून दिल्यानें शिवाजी तत्काळ तेथून परत फिरला.

खंडणी.

सन १६७५ च्या जानेवारींत दत्ताजीच्या हाताखालीं तीन हजार मराठे स्वार कोल्हापुरच्या वाजूला फिरत होते. हें पाहून कोल्हापुरानें १५०० होन आणि शेवगांवानें पांचशें होन खंडणी दत्ताजीस देऊन आपली मुक्तता करून घेतली. फेब्रुवारीच्या मध्याच्या सुमारास मोगली सेना घाट ओलांडून कल्याण येथें आली. तेथें खोज्यांच्या वगैरे घरांची तिनें बरीच जाळपोळ केली आणि ती लागलीच परत फिरली. मराठ्यांनीं लगेच तेथे येऊन कल्याण आपल्या कबजांत घेतलें.

तहाची हूल.

८ बहादुरखानाचा नादानपणाः—यानंतर म्हणजे १६७५ च्या मार्च ते मे पर्यंतच्या तीन महिन्यांत शिवाजीनें एक गमतीचें राजकारण करून बहादुरखानाला अगदीं चीत करून टाकिलें. त्याच्याशीं प्रथम तहाचें बोलणें सुरू केलें. एवढी मोठी दक्षिण, अत्यंत चपळ अशा मराठ्यांच्या धडाडीपासून, रक्षण करण्यास बहादुरखान असमर्थ झाला होताच. त्यानें शिवाजीचें तहाचें बोलणें एका पायावर मान्य केलें. हें पाहून शिवाजीनें त्याला तसाच झुलवीत ठेविलें. व आपण मोगलांशीं तह करीत आहोंत हें विजापुरकरांस कळवून त्यांना दहशत उत्पन्न केली आणि फोंड्याच्या वेढयाच्या वेळीं उत्तर सरहद्द आपल्या ताब्यांत राहील अशी तजवीत केली. याप्रमाणें तहाच्या निमित्तानें कागदीं घोडे नाचवीत असतांना मिळालेल्या अवकाशांत फौजेला विश्रांति देऊन पुढील स्वारीची जय्यत तयारीहि करण्यांत आली. आणि अदिलशहापासून कांहीं द्रव्यहि मिळविण्याचा प्रयत्न झाला.

अटी.

बहादुरखानाला कळविलेल्या तहाच्या अटी पुढीलप्रमाणें होत्या. स्वराज्यापैकीं १७ किल्ले मोगलांस देणें आणि फौजेसह संभाजीला मोगलांच्या सुभेदाराच्या हाताखालीं लढाईस पाठविणें. याच्या मोबदल्यांत औरंगजेवानें संभाजीस सहा हजारी सरदार बनवावें आणि भीमेच्या दक्षिणेकडचा सगळा प्रांत शिवाजीकडेस ठेवावा. ही तहाची वाटाघाट मुद्दामच शिवाजीनें लांबविली होती. बहादुरखानानें या अटी बादशहास कळविल्या व त्यानेंहि त्या मान्य करून शिवाजीचे पूर्वापराध क्षमा केल्याबद्दलचें आज्ञापत्र पाठवून दिलें. त्या आज्ञापत्राचा योग्य मानमरातवानें स्वीकार करावा असें बहादुरखानानें शिवाजीस सांगून पाठविलें. या वेळीं म्हणजे सन १६७५ च्या जुलईमध्यें मराठ्यांनीं फोंडा सर केला असल्यानें लगेच शिवाजीनें आपलें खरें स्वरूप प्रगट करून मोगलांच्या वकीलास स्पष्ट आणि टोंचून सांगितलें कीं, "बहादुरखानाच्या कोणत्या

पराक्रमाला भिऊन मीं त्याच्याशीं तह करावा असें तुम्हांला वाटतें ! जा, येथून लवकर काळें करा ! नाहीं तर तुमची धिंड काढण्यांत येईल. " यानंतर तत्काळ मोगल वकील निघून गेले हें सांगणें नलगे !

यादवी.

हा एकंदर प्रकार पाहून बहादुरखान तर अगदीं गुंग होऊन गेला आणि शरमेनें त्याला मरणप्राय दुःख झालें. राजकारणांत झालेल्या या फजितीचा पुरता सूड घेण्याचा त्यानें निश्चय करून विजापुरचा मुख्य प्रधान खवासखान याच्याशीं झटपट ऑक्टोबरमध्यें तह केला. आणि विजापुर व मोगल या दोघांच्या सैन्यानें शिवाजीला दांतीं तृण धरावयास लावावयाचें असें ठरविलें. बहादुरखानाची ही कल्पना औरंगजेबालाहि पसंत पडली. आणि विजापूरकरांनीं बहादुरखानास शिवाजीविरुद्ध यावत् शक्य मदत केल्यास विजापूरकरांची एक वर्षाची खंडणी माफ करण्यांत येईल असें औरंगजेबानें सांगून पाठविलें. परंतु इतक्यांत मोगलांच्या दुर्दैवानें ता. ११ नोव्हेंबर १६७५ रोजीं बहलोलखानानें मुख्य प्रधान खवासखान याला पदच्युत करून सर्व सत्ता स्वतःच बळकाविली. आणि नंतर आदिलशाहीमध्यें अनेक पक्ष उत्पन्न होऊन त्यांच्यांतच यादवी सुरू झाली, व मोगलहि त्या पक्षांना मदत करूं लागले. त्यामुळें बहादुरखानाचा शिवाजीला चिरडून टाकण्याचा सगळा व्यूह पत्त्याच्या इमारतीसारखा जागच्याजागीं कोसळून पडला. मोगलांशीं तहाचें बोलणें चालू असतां मराठ्यांचा वेढा फोंड्याला पडला होता, हें मागें सांगितलेंच आहे. मार्चमध्यें शिवाजीनें कोल्हापुर सर केलें. परंतु रायबाग त्याच्या हातीं आला नाहीं. यानंतर थोडे दिवसांनीं पूर्वेकडेस दूरवर जाऊन त्यानें विजापुर व गोवळकोंडा यांचा प्रांत विशेषतः यादगिरी व हैद्राबादेजवळील दोन गांवें लुटलीं. तेथें त्याला पुष्कळ संपत्ति मिळाली आणि दंड वसूलीसाठीं त्यानें कांहीं श्रीमंत लोकांनाहि पकडून आणिलें. एप्रिलच्या मध्याच्या सुमारास त्यानें पोर्चुगीजांचे कुंकोलिम आणि वेरोडा हीं गांवें लुटलीं. १६७५ च्या उत्तरार्धांत मराठ्यांनीं कोंकण व कर्नाटकांत स्वाऱ्या केल्या, त्याचें वर्णन पुढें देण्यांत येईल.

आजार.

९ मोगलांशीं पुन्हां झगडा व विजापुरकरांशीं सख्य:—१६७५ च्या नोव्हेम्बरमध्यें औरंगजेबानें बहादुरखानाची, शिवाजीनें त्याला चकविल्यामुळें, सपाटून खरडपट्टी काढिली. त्यामुळें तो संतापून जाऊन त्यानें एकदम कल्याणवर स्वारी केली आणि शिवाजीला उत्तरकोंकणापर्यंत जोरानें रेंटीत नेलें. १६७६ च्या जानेवारीमध्यें मराठ्यांची एक

तुकडी औरंगाबादेजवळ आली होती. परंतु बहादुरखानानें फक्त सुटसुटीत सैन्य आपल्या बरोबर घेऊन लासूर येथें त्या तुकडीचा पराभव केला आणि जुन्नरकडे तिला पिटाळून लाविलें. याच सुमाराला शिवाजी फार आजारी पडला. तो तीन महिनेपर्यंत बिछान्यावर पडून होता. मार्च अखेरीस तो चांगला बरा झाला ! व लागलीच एप्रिलमध्यें विजापुरापासून त्रेचाळीस मैलांवर असलेलें अथणी शहर मराठ्यांनीं लुटलें. विजापुरास दक्षिणी आणि पठाण असे दोन पक्ष पडून त्यांच्यांत यादवी सुरू झाली होती, तिचा फायदा घेऊन शिवाजीनें आपली चार हजार स्वारांची टोळी विजापुरीप्रांतांत लुटालूट करण्यास पाठविली. व ती बिनधोकपणें लुटीचें काम करीत होती.

मोरोपंत.

१६७६ च्या मे मध्यें मुख्य प्रधान मोरो त्रिंवक यानें रामनगरच्या राजास हांकून देऊन पिंडोळ आणि पायनेका सर केलें. तेथून सुरत तीन दिवसांच्या वाटेवर आहे. परंतु पावसाळा जवळ आल्यानें विशेष हालचाली न करितां चार हजार फौज तेथें रक्षणासाठीं ठेवून बाकीच्या फौजेसह मोरोपंत मे महिन्याच्या अखेरीस परतला.

अस्तित्व.

अफगाण पक्षानें विजापुरचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें हें पाहून बहादुरखानानें विजापुरावर जोराची स्वारी केली. यामुळें विजापुरचा नवीन प्रधान बहलोलखान यानें जुलै महिन्यांत गोवळकोंड्याचा मुख्य प्रधान मादन्ना याच्या मार्फतीनें शिवाजीशीं तह केला. त्या तहाची कलमें अशीं होतीं कीं, विजापुरानें शिवाजीस तीन लक्ष रुपये प्रथम द्यावेत. आणि पुढें दरसाल एक लक्ष होन खंडणी द्यावी. शिवाय कोल्हापुरासुद्धां कृष्णेच्या पश्चिमेकडील सगळा प्रदेश शिवाजीकडेस राहूं द्यावा. आणि या सर्वांच्या मोबदल्यांत शिवाजीनें विजापुरकरांचें मोगलांपासून संरक्षण करावें. परंतु हा तह फार दिवस टिकला नाहीं. आणि ज्या राज्यांत नेहमीं यादवी सुरू असते व कोणताही एक पक्ष अधिकारावर स्थिर नसतो तेथील राजानें केलेले कोणतेहि करार मदार असे अल्पजीवीच असावयाचे. शिवाजीला स्वतःला या तहाबद्दल हर्षविशाद असा कांहींच वाटला नाहीं कारण त्याचें लक्ष या वेळीं कर्नाटकावरील स्वारीच्या राजकारणाकडेस वेधलें होतें.

प्रकरण १० वें

दक्षिणदिग्विजय

[१ राजापुरावर पहिली स्वारी. २ दक्षिण कोंकणांतील विजय १६६३. ३ बसनूरची लूट व कारवारला धमकी. १६६५. ४ आदिलशहाचा कारभार १६६५. ५ शिवाजी आणि रुस्तम. १६६६. ६ गोवा सर करण्याचें कारस्थान. १६६८. ७ विजापुरी कानडा घेण्याचे निष्फळ प्रयत्न. १६७३. ८ कानडी मुलुखांतील यादवी. १६७४. ९ फोंडा सर व कानडा खालसा. १६७५. १० कानड्यांत वर घांटीं मराठे.]

राजापुरावर पहिली स्वारीः—विजापुरी सरदार रणदौलाखान याला रुस्तमेजमान् ही पदवी वंशपरंपरा दिलेली होती. हा रुस्तमेजमान अदिलशाहीच्या नैर्ऋत्य प्रदेशावर सुभेदार होता. त्याचा अंमल पश्चिम किनाऱ्यावर रत्नागिरीपासून खालीं गोवा, कारवार, मिर्जन पर्यंत असून इकडे खुष्कीवर रत्नागिरीचा दक्षिण प्रदेश, कोल्हापुर, बेळगांव, धारवाड आणि पश्चिमेकडेस कानडी मुलखापर्यंत चालत असे. त्याचें मुख्य ठाणें मिरजेस असून पन्हाळा किल्लाहि त्याच्याच ताब्यांत मोडत असे. परंतु बादशहा प्रत्यक्ष त्यावर अंमल चालवीत असे. कारवार आणि राजापुर हीं दक्षिणोत्तर बंदरें रुस्तमच्या ताब्यांत असून येथून युरोपशीं फार मोठा व्यापार चालत असे. व या दोनहि ठिकाणीं इंग्रजांच्या वखारी होत्या. रुस्तमच्या ताब्यांतील पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांतून इराण, बटेविया, जपान, सीलोन इत्यादि ठिकाणीं मिरे, मझलीनचें कापड, खारवलेलें धान्य, सुपारी, दालचिनी, कॅलिको कापड, रेशीम, धान्य, कच्ची लाख इत्यादि वस्तू फार मोठ्या प्रमाणांत पाठविण्यांत येत असत. ईस्ट इंडिया कंपनीनें या प्रदेशांत पन्नास हजार कोष्टी कापड विणण्यासाठीं नोकरीस ठेविले होते. गिरसाप्पाचे मिरे व हुबळीचें कापड उत्कृष्ट म्हणून या वेळीं फार प्रसिद्ध होते. सारांश याप्रमाणें हा प्रदेश श्रीमंत असून यावर रुस्तमेजमान याची सत्ता चालत होती.

रुस्तमेजमान.

तारीख १० नोव्हेंबर १६५९ रोजीं प्रतापगडाखालीं अफजलखानास ठार मारून त्याच्या फौजेचा शिवाजीनें चक्काचूर करून टाकिला हें कळतांच डिसेंबरमध्यें रुस्तमेजमान तीन हजार घोडे-

मैत्री.

स्वारांसह शिवाजीवर चालून आला. परंतु शिवाजीची चांगली तयारी पाहून तो परत फिरला. विजापुरची राजमाता बडेसाहेबिणीचें मत रुस्तमविषयीं शुद्ध नसल्यामुळें रुस्तमनें स्वतःच्या बचावासाठीं शिवाजीशीं गुप्तपणें मैत्री केली होती असा त्या वेळीं लोकप्रवाद होता. व रुस्तम शिवाजीवर चालून आला तो फक्त बाह्यात्कारी देखावा होता, लढाई करण्याचा त्याचा मुळींच उद्देश नव्हता असें इंग्रज लेखक म्हणतात. मात्र लढाईचा उद्देश असता तरी त्याचें शिवाजीपुढें कांहीं चाललें नसतें हेंहि त्या लेखकांनीं प्रांजलपणें कबूल केलें आहे.

लूट.

अफजलवधानंतर तारीख २८ नोव्हेंबर १६५९ रोजीं शिवाजीनें पन्हाळा सर केला, व तो रत्नागिरीवर चालून गेला. इकडील विजापुरी अंमलदार राजापुरास पळून गेले. कारण हें बंदर शिवाजीचा मित्र रुस्तम याचें होतें व यावर शिवाजी स्वारी करणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. बाकी बहुतेक बंदरें शिवाजीनें आपले ताब्यांत घेतलीं. शिवाजीनें दाभोळ घेतल्यावर तेथील फौजदारानें, अफजलखानाचीं तीन जहाजें अनुक्रमें ३००, ३५०, ४५० टन वजनाचीं तेथें होतीं तीं आपल्या ताब्यांत घेऊन तो जलमार्गें राजापुरास गेला. रुस्तमनें त्याला तेथें चांगला आश्रय दिला. रुस्तम आणि अफजलखानाचा मुलगा फजलखान यांच्या संयुक्त सैन्यानें तारीख २८ डिसेंबर १६५९ रोजीं कोल्हापुराजवळ शिवाजीवर निकराचा हल्ला केला. परंतु मराठ्यांनीं त्यांना अगदीं नामोहरम करून टाकिलें. फजलखानाच्या फौजेचा फार नाश झाला व त्याचे पुष्कळ सोबती कामास आले. मराठ्यांना या वेळीं दोन हजार घोडे व बारा हत्ती या लुटींत मिळाले. या पराजयानंतर रुस्तमेजमान हुकेरीस जाऊन राहिला. इकडे मराठे खुशाल विजापुरी प्रांत लुटीत होते पण रुस्तम त्यांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न यत्किंचितहि करूं शकला नाहीं.

राजापुर.

कोल्हापुरच्या पराजयाची वार्ता राजापुरास पोहोंचतांच तेथील रुस्तमच्या फौजदाराच्या तोंडचें पाणींच पळालें व त्यानें अफजलखानाचें एक जहाज घेऊन इंग्रजी वखारीचा मुख्य हेनरी रेव्हिंग्टन याच्या मदतीनें दूर समुद्रांत पलायन केलें. आणि मग मराठ्यांनीं सावकाश राजापुर लुटलें. परंतु ही हकीकत शिवाजीस कळतांच त्यानें राजापुरची लूट सगळी परत देवविली व आपला सरदार दोरोजी यास चाकरीवरून काढून टाकिलें. रुस्तम हा शिवाजीचा मित्र असल्यानें राजापुर बंदरसुद्धां त्याचें त्यास परत सोंपिलें.

या वेळीं शिवाजी वेंगुर्ल्यापासून चार मैलांवर सैन्यासह येऊन धडकला होता. परंतु कुडाळच्या देसायांनीं त्याला परत पिटाळूस लाविलें असें एक डच लेखक म्हणतो. सन १६६० च्या आरंभीं एक मराठी फौज विजापुरापर्यंत चाल करून गेली होती. परंतु विजापुर आणि गोवळकोंडा यांच्या संयुक्त सैन्यानें जोराचा सामना देऊन त्याहि टोळीस पळवून लाविलें.

देसाई.

सिंहावलोकन.

सन १६६१ च्या फेब्रुवारीपासून एप्रिलपर्यंत मराठ्यांनीं रत्नागिरीवर स्वारी केली तो इतिहास मागें ४ थ्या प्रकरणांत दिलाच आहे. सन १६६३ च्या मार्चमध्यें मोगलांनीं नेताजी पालकराचा पराजय केल्याचें वर्णन मागें पृष्ठ ६६ वर आलें आहे. या पराजयामुळें कानडी मुलुखाच्या उत्तर प्रदेशावर चाल करून जाण्याचा शिवाजीचा बेत त्याला तहकूब करावा लागला.

या सुमारास विजापुरी फौजा बेदनूरवर चालून गेल्या होत्या. त्याची पाठराखणी करण्यासाठीं तारीख १ मार्च १६६३ रोजीं स्वतः दुसरा अलीअदिलशहा बंकापुरला जाण्यास निघाला. तेथें पोंचल्यावर त्यानें बहलोलखान व शहाजी व इतर सरदार यांना कर्नाटकांतून एकदम बोलाविलें. ते लांब लांब मजलीनें वर्धेच्या कांठीं येऊन पोहोंचले, तोंच जून १६६३ च्या अखेरीस बहलोल आणि शहाजी यांच्या हातांत हातकड्या घालून त्यांना कैद करण्यांत आलें. परंतु दोन दिवसांनींच शहाजीची मुक्तता केली; तरी त्याची सरदारी त्याला लवकर दिली नाहीं. कानडी मुलुखावर विजापुरकरांची स्वारी या वेळीं जोरांत होती.

बेदनूर.

२ दक्षिण कोंकणांतील विजय. १६६३:—बेदनुरास शिवाप्पा नायकानें सन १६१८ पासून १६६२ पर्यंत म्हणजे चव्वेचाळीस वर्षें राज्य केलें. या अवधींत त्यानें आपल्या राज्याचा विस्तारहि बराच केला. दक्षिण कानडा, म्हैसूरचा वायव्य कोंपरा आणि गंगावती नदीपर्यंत भिर्जण बंदरासुद्धां उत्तर कानडा इतकी शिवाप्पाच्या राज्याची शेवटीं शेवटीं चतुःसीमा झाली होती. त्यानें विजापुरी सरदारांचे सौंद वगैरे किल्ले सर करून बंकापुरापर्यंत आपलें राज्य वाढविल्यानें त्याची सरहद्द विजापुरकरांच्या सरहद्दीच्या बोकांडीं बसूं पहात होती. इतक्यांत शिवाप्पा मरण पावला व त्याचा मुलगा भद्राप्पा गादीवर बसला. परंतु वडिलाचें शौर्य त्यांत नाहीं हें पाहून सादेच्या

शिवाप्पा.

राजानें अदिलशहाच्या मदतीनें त्यावर स्वारी करून त्याला शरण आणिलें व त्याच्याकडून सौंदे वगैरे किल्ले परत घेतले, सात लक्ष होन खंडणी उकळली आणि तारीख २१ नोव्हेंबर १६६३ रोजीं अदिलशहा परत फिरला.

कानडी मुलुख.

वरप्रमाणें अलीअदिलशहा बेदनुरकडे गुंतला असतां शिवाजीनें दक्षिण कोंकण व वायव्य कानड्यावर स्वारी केली. कोल्हापुर–कुडाळ या रस्त्यानें तो मे १६६३ मध्यें वेंगुर्ल्यास जाऊन पोहोंचला. या वेळीं शिवाजीनें लोकांस सुरक्षिततेबद्दल कौल दिले व ते अक्षरशः पाळिले, त्यामुळें पुष्कळ प्रांत त्याला अनुकूल झाला. शिवाजी येत आहे असें ऐकून संके-लिम-बिचोलिमपर्यंतचे सगळे मुसलमान फौजदार आपआपलीं ठाणीं टाकून पळून गेले त्यामुळें तिकडेस अराजकता माजून चोर लुटारूंचें पुष्कळच फावलें. जून १६६४ मध्यें शिवाजी, वेंगुर्ल्यास दोन हजार शिबंदी ठेवून, परत फिरला. फोंड्याच्या फौजदारानें वाडीच्या सावंतांच्या मदतीनें खारेपाटणांतून मराठ्यांना हांकलून लावावें असा अदिलशहाचा हुकूम जुलईमध्यें आला. परंतु त्यांच्यांतच यादवी चालू असल्यामुळें ते कांहीं करूं शकले नाहींत व मराठे तसेच तेथें चिकटून राहिले.

फजलखान.

रुस्तमेजमानानें शिवाजीशीं मैत्री केल्यामुळें अदिलशहानें त्याला नोकरींतून कमी केलें व त्याच्या जागीं महंमद इखलासखानाची नेमणूक केली. आणि दाभोळ व चिपळूण येथें फजलखान यास नेमिलें. याच सुमारास राजापुर शिवाजीच्या ताब्यांत कायमचें गेलें.

इंग्रज.

जुलई सन १६६३ मध्यें रुस्तमच्या हस्तकांनीं कारवार येथील इंग्रजांच्या वखारीला अतिशय त्रास देऊन तिच्यापासून पुष्कळ द्रव्य उकळलें. पुढें हा त्रास असह्य झाल्यानें वखार हुबळीस नेण्याचे विचारांत कंपनी होती. वखार गेल्यानें आपलें अतिशय नुकसान होईल हें रुस्तम व बादशहा जाणून असल्यानें बादशहानें कंपनीस फर्मान पाठवून कळविलें कीं, कंपनीपासून पूर्वीइतकीच जकात घेण्यांत येईल. अधिक मुळींच मागण्यांत येणार नाहीं. हें फर्मान आल्यावर वखार कारवारास कायम राहिली.

तम्मया.

सन १६६४ मध्यें बेदनूरचा राजा भद्राप्पा याचा खून त्याच्या ब्राह्मण कारभाऱ्यांनीं करून त्याचा लहान मुलगा बसव यास गादीवर बसविलें. व सर्व राज्यकारभार त्याची मातुश्री

चेन्नम्माजी व तिचा प्रियकर तम्मय्या नायक यांच्या हातीं आला. हा तम्मय्या मूळचा ताडीविक्या होता. बेदनूरची ही परिस्थिति लक्षांत घेऊन अदिलशहानें बहलोलखान व सय्यद लियास शर्जाखान या दोन सेनापतींना एकदम बेदनूरवर पाठविलें. याच सुमारास रुस्तमेजमान पुनः अदिलशहाच्या मर्जीत शिरला असें दिसतें. महंमद इखलासखानाची बादशहानें कारवारांतून बदली करून पुनः रुस्तम यास ऑगस्ट १६६४ मध्यें तेथें सुभेदार नेमिलें व शिवाजीला कारवारांतून हांकलून लावावें असा हुकुम केला. परंतु त्यानें कांहींहि केलें नाहीं.

यादवी.

या वेळीं अलीअदिलशहाचें लक्ष बेदनूरकडेस वेधलें असल्यानें व १६६४ च्या ऑक्टोबर मध्यें बारा हजार स्वारांनिशीं शर्जाखानाच्या मदतीसाठीं तो स्वतः बेदनूरला चिरडून टाकण्यास जाण्याच्या विचारांत असल्यानें शिवाजीकडेस लक्ष देण्यास त्याला फुरसतच नव्हती. तसेंच याच वेळीं दक्षिणेंत व किनाऱ्यावर अशी कांहीं यादवी माजून राहिली होती कीं, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. त्यामुळें तेथें शिवाजी निर्धास्तपणें मुलूख काबीज करीत होता. त्याच्या पराक्रमानें तो सर्वांसच अनिवार्य असा वाटत होता. व त्याला सगळेच भीत होते असें इंग्रज लेखक म्हणतात.

खवासखान.

नंतर, भाटकल येथें शिवाजीचें आरमार होतें त्यांत बसून पश्चिम किनाऱ्यावरचीं शहरें लुटावींत असा शिवाजीचा विचार होता. परंतु मध्येंच खवासखान त्याला आडवा आला. तारीख २५ ऑक्टोबर १६६४ रोजीं या उभयतांची निकराची लढाई झाली. या लढाईच्या निकालासंबंधानें जेधे शकावली व बुसातीने सलातीन यांच्यांत मतभेद आहे. एक म्हणतो खवासखान पळाला तर दुसरा त्याचे उलट म्हणतो. शिवाजीच्या सैन्यांतून अडचणींत सांपडलेल्या खवासखानाच्या सैन्यावर बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव होत होता इतक्यांत खवासखान तरवार घेऊन थोड्या लोकांनिशीं मराठ्यांवर चालून गेला व त्यामुळें मराठ्यांचा मोड झाला असें बुसातीने सलातीनकार म्हणतो. परंतु हें शक्य दिसत नाहीं. या प्रसंगीं विजय शिवाजीसच मिळाला परंतु त्याचींहि पुष्कळ माणसें कामास आल्यानें त्याला आपला पुढील बेत तहकूब करावा लागला असेल, इतकें यांत संभवनीय दिसतें.

सावंत.

" कोंकणांत कुडाळीं लखम सावंत देसाई म्हणोन पुंड होता. बारा हजार हशमांनिशीं राहत असे. कुडाळ म्हणजे अदिलशाही. त्यानें विजापुरास सांगून पाठविलें कीं, फौज, घोडा, राऊत

हशाम मेळवून आपण (शिवाजी) राजियावरी चालून जातों. आणि कोंकण सोडवितों. त्याजवरून विजापुरीहून खवासखान सरलष्कर, मोठा योद्धा, दहा हजार स्वारांनिशीं कुडाळास आला. लखम सावंत वारा हजार हशमांनिशीं सामील होऊन कोंकण सोडवीत चालले. इतकियांत राजास खबर कळून लष्कर व हशम निवड करून नीट चालून त्याजवर घेतलें. खवासखानास विजापुराहून मदतीस बाजी घोरपडे, दीड हजार स्वारांसह येत होते. घाट उतरोन कोंकणांत राहिले. त्याजवर राजियांनीं लष्कर पाठवून छापा घालून, बाजी घोरपडे कुल् भाऊबंद सहवर्तमान बुडविलें. वाराशें घोडीं पाडाव केलीं. मोठें युद्ध जहालें. (हें वर्तमान सन १६६४ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्यें झालें) पुढें कुडाळावरी खावासखानावरी जावें, त्यासहि यासारिखें बुडवावें, तों त्यांनीं हें वर्तमान ऐकिलें. बाजी घोरपडे दीड हजार घोडे समवेत बुडविले. ही खवर ऐकून धास्त खाऊन घाटावर पळून गेला. कुडाळ देश राजियांनीं कावीज केला.''* सन १६४८ मध्यें शहाजीला कैद केलें तेव्हां या बाजी घोरपड्यानेंच त्याला हातकड्या घालून विजापुरास आणिलें होतें. त्यावरून शिवाजीनें बाजीचा सूड उगविलाच पाहिजे असें शहाजीनें त्यास सांगून पाठविलें होतें व त्याप्रमाणें शिवाजीनें हा सूड उगविला अशी एक प्रचलित समजूत आहे. कसेंहि असलें तरी बाजी घोरपडे हा विजापुरकरांशीं मोठ्या इमानें इतबारें वागणारा सरदार होता व त्यामुळें शिवाजीला त्याचा मोठाच अडथळा होत असला पाहिजे एवढें यावरून स्पष्ट दिसतें.

फूट. सन १६६४ च्या नोव्हेंबरमध्यें ''लखम सावंतावरी राजियांनीं नामजादी केली. त्याचीहि फौज कित्येक मारिली. यावरि लखम सावंत कुडाळ प्रांत सोडून फिरंगण देशांत (=गोव्यांस) गेला. कुडाळ देश राजियांनीं काबीज केला. फिरंगी (पोर्च्युगीज) यास राजियाचा धाक. (म्हणून तो लखम सावंताला आपल्या येथें) ठेवून घेईना. जागा कोठें नाहीं. *'' असें झालें. केशव नायक, पेर्नमचा केशव प्रभु आणि बिचोलिमचा रावळ शेणवी हेहि आपली जहागीर सोडून रानांत पळून गेले. जहागीर शिवाजीच्या ताब्यांत आली. हे सगळे देसाई गोव्यास मोठ्या कष्टानें राहत असत व मधून मधून आपली जहागीर परत मिळविण्याचा प्रयत्न करीत असत. परंतु त्यांत त्यांना शेवटपर्यंत यश आलें नाहीं. लखम सावंताचा प्रतिस्पर्धी कृष्ण सावंत हा शिवाजीस येऊन भेटला, त्याला शिवाजीनें कुडाळची देशमुखी देऊन मुख्य नेमिलें.

* सभासद.

वेंगुर्ला येथें मोठा व्यापार चालत असून तें पोर्च्युगीजांमुळें मोठें श्रीमंत बंदर झालें होतें. शिवाजीनें तें लुटून अपार संपत्ति मिळविली. नंतर दुसरें एक शहर (बहुधा मालवण असावें) लुटलें. सन १६६४ च्या डिसेंबरमध्यें त्यानें फक्त तीनशें स्वार हुबळी लुटण्यास पाठविले. ते येतात हें एकून हुबळीकर शहर सोडून पळून गेले व मराठे हुबळी लुटून परत गेल्यावरहि पुष्कळ दिवस परत आले नाहींत. या लुटींत रुस्तमचे लोकहि मराठ्यांस सामील झाले होते असें इंग्रज लेखक म्हणतात. सारांश, सन १६६५ च्या आरंभीं शिवाजीनें कानडी मुलुखांत अगदीं प्रळय करून सोडिला होता. दक्षिणेंतील आठ नऊ बंदरें आपल्या ताब्यांत घेऊन तेथून इराण, बसरा, मक्का इत्यादि ठिकाणीं त्याच्या तर्फे व्यापार सुरू झालेला होता.

वेंगुर्ला.

३ बसनूरची लूट व कारवारला धमकी १६६५:—तारीख ८ फेब्रुवारी १६६५ रोजीं शिवाजी लहान मोठी मिळून ८ लढाऊ जहाजें घेऊन मालवणहून निघाला तो गोव्यावरून बसनूरला जाऊन पोहोंचला. त्या वेळीं बेदनूरच्या राज्यांत बसनूर हें मुख्य बंदर होतें. अचानकपणें शिवाजी तेथें गेल्यानें त्याला अगणित लूट तेथें मिळाली. नंतर तेथून परत येतांना त्यानें गोकर्ण महाबळेश्वराची यात्रा केली. येथून त्यानें आपलीं बहुतेक जहाजें परत पाठवून फक्त बाराच जवळ ठेविलीं. आणि चार हजार पायदळांसह तो अंकोला येथें चालून गेला. तारीख २२ फेब्रुवारी रोजीं तो कारवार येथें पोंचला. तेथील वखारींच्या इंग्रजी व्यापाऱ्यांना शिवाजीच्या हालचालींची बित्तंबातमी हेरांच्या मार्फत मिळत असल्यानें त्यांनीं शिवाजी येण्यापूर्वीच आपल्या वखारींतील सगळी चीजवस्त व रोकड रक्कम एका लहानशा शंभर टनाच्या जहाजांत भरून दुसरीकडेस पाठवून देण्याची तयारी करून ठेविली होती. तें जहाज मस्कतच्या एका इमामाचें असून इमान्युएल डोनाव्हॅडो हा त्यावर कप्तान होता.]

शेरखान.

'तुमचा माल आपण सुरक्षितपणें घेऊन जाऊं' असें त्या शूर कप्तानानें इंग्रजांस धीराचें अभिवचनहि दिलें होतें. इंग्रज व्यापारीसुद्धां जहाजांतच जाऊन सुरक्षिततेसाठीं राहिले. इतक्यांत इखलासखानाचा मुलगा व वहलोलखानाचा हस्तक शेरखान हा त्याच दिवशीं म्हणजे तारीख २२ फेब्रुवारी रोजींच रात्रीं कारवारास कांहीं कामासाठीं येऊन पोहोंचला. येथें आल्यावर त्याला शिवाजीच्या आगमनाची वार्ता कळली. लागलीच त्यानें आपल्या पांचशें लोकांनिशीं शहाराचा बंदोबस्त करून शिवाजीस तसें सांगून पाठविलें. त्यामुळें कारवार लुटण्याचा बेत फसला व शिवाजी तेथून

निघून कालानदीच्या मुखाजवळ जाऊन राहिला. व इंग्रज व्यापाऱ्यांना आपल्या स्वाधीन करून द्यावें असा शेरखानास निरोप पाठविला. शेरखानानें हा निरोप इंग्रजी व्यापाऱ्यांस कळविला. त्यांनीं जहाजावर सुमारें आठ हजार होनांचा माल भरला असतांना सुद्धां साळसूदपणें सांगून पाठविलें कीं जहाजावर फक्त दारूगोळा आहे. सोनें नाणें कांहींहि नाहीं. शिवाजीची इच्छा असल्यास त्यानें तो दारूगोळा घेऊन जावें. याच सुमारास शहरच्या व्यापाऱ्यांनीं भली मोठी रक्कम जमविली. तींत इंग्रजांनींहि एकदम ११२ पौंड दिले होते. ही सगळी रक्कम शिवाजीकडेस पाठवून दिली. ती घेऊन तारीख २३ फेब्रुवारी रोजीं तो तेथून निघून वेंगुर्ल्यास गेला. या सालच्या शिमग्याची लूट शेरखानानें मध्यें पडून बिघडविली असें मात्र शिवाजीस वाटलें व तसें त्यानें बोलूनहि दाखविलें. याच सुमारास जगसिंग चढाई करून आल्यामुळें शिवाजीला आपल्या स्थळीं परत जावें लागलें.

४. अदिलशाहाचा कारभार. १६६५:—तारीख १२ जून सन १६६५ रोजी पुरंदरचा तह होऊन शिवाजी व मोगल यांचा सल्ला झाला व विजापुरी प्रांत लुटण्याला शिवाजी मोकळा झाला.

विषप्रयोग.

अदिलशाही दरबारांत या वेळीं अव्यवस्था अगदीं कळसाला पोंचली होती. कर्नाटकाच्या लढाईंतून बहलोलखानाला अदिलशहानें परत बोलाविलें. व तो विजापुरास येतांच आठ दिवसांच्या आंत जून–जुलाईमध्यें एकाएकीं मरण पावला. बहलोलखानाच्या पदरीं दहा हजार लढाऊ पठाण होते. अदिलशहाला खानाचें हें बळ पाहवत नव्हतें. म्हणून त्यानें त्या बहलोलच्या मुलांत व पुतण्यांत वैमनस्य पेरून दिलें. परंतु शेरखानानें आपल्या शौर्यानें व न्यायी वर्तनानें सर्वांना कह्यांत ठेविलें होतें. इतक्यांत अदिलशहानें त्यालाहि विषप्रयोगानें ठार मारिलें. त्यामुळें बहलोलच्या मुलांत तंटा उपस्थित झाला व अदिलशहानें त्याची जहागीर घशांत टाकिली. विजापुरी दरबार तर आतां ऱ्हासाच्या घसरणीलाच लागलें होतें.

पुरंदराकडेस जयसिंगाच्या स्वारीची धामधुम चालत असतां खवासखानाचा भाऊ इखलासखान यानें दाभोळ व दक्षिण कोंकणांतील

इखलास खान.

बरींच स्थळें मराठ्यांपासून परत घेतलीं. परंतु लागलीच नोव्हेंबरमध्यें शिवाजीनें इखलासखानाचे दोन हजार शिपाई कापून काढून त्यानें सर केलेलीं सगळीं स्थळें परत मिळविलीं. फक्त वेंगुर्ला आणि कुडाळ विजापुरकराकडेसच राहिलें आणि राजापुर व खारेपाटण शिवाजीकडेस आले. मात्र कारवारच्या आसपासचा मुलूख मराठे सतत लुटीत होते.

५. शिवाजी आणि रुस्तम १६६६:—मोगलांच्या तर्फेनें शिवाजी पन्हाळ्यावर चालून गेला पण त्याचा तेथें ता. १६-१-१६६६ रोजीं पराजय झाला हें मागें पृष्ठ १०१ वर आलेंच आहे. नंतर शिवाजी खेळण्यास जाऊन राहिला. व एका मुसलमान सरदाराच्या हाताखालीं दोन हजार फौज देऊन त्याला फोंड्याला वेढा घालण्यास पाठविलें. दोन महिन्यांनंतर किल्ल्यांतील लोक शरण आले व सहा तासांत किल्ला खालीं करून देण्याचें त्यांनीं कबूल केलें. इकडे विजापुरकरांनीं पांच हजार घोडेस्वार व एक हजार पायदळ देऊन सीदी मसाऊद, सीदी जोहरचा मुलगा अबदुल अजीज आणि रुस्तमे-जमान या तीन सरदारांस पन्हाळ्याकडेस शिवाजीवर पाठविलें. त्यांनीं गुप्तपणें जाऊन शिवाजीवर छापा घालावा असें ठरविलें. व त्याप्रमाणें ते ज्या टेकडीवर शिवाजी होता ती चढूं लागले. रुस्तम सर्वांच्या पुढें होता. त्यानें थोडीशी टेकडी चढल्यावर एकदम आपल्या नौबदी वाजविल्या. त्याबरोबर शिवाजी सावध होऊन सैन्यासह तेथून निसटला. परंतु सीदी मसाऊद यानें सहाशें लोकांनिशीं त्याचा पाठलाग करून त्याचे दोनशें मावळे कापून काढिले व तो परत फिरला. कारण शिवाजी त्याच्या हातीं लागणें शक्यच नव्हतें. परत आल्यावर त्याला रुस्तम व शिवाजी यांचा कांहीं पत्रव्यवहार हातीं लागला. तो त्यानें अदिलशहाकडेस रुजू केला. त्यावरून शहानें रुस्तम यास लिहून पाठविलें कीं, 'तुमचें हें कपटी वर्तन पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. तथापि फोंड्याच्या किल्ल्याला असलेला शिवाजीचा वेढा जर तुम्हीं उठविला तर तुम्हांला क्षमा करण्यांत येईल. नाहीं तर तुम्हांला नोकरींतून बडतर्फी मिळेल.' हें निर्वाणीचें फर्मान पाहून रुस्तम घाबरला. व त्यानें एकदम आपला हस्तक महंमदखान याला कसेंहि करून वेढा उठवून लाविण्यास लिहिलें. या वेळीं महंमदखानानें मोठी नामी युक्ति योजिली. तो लहानशी फौज घेऊन फोंड्याच्या जवळच एका खेड्यांत राहिला. व इकडील जहागिरीची व्यवस्था लाविण्यास आपण आलों आहोंत असें त्यानें शिवाजीच्या सेनापतीस सांगून पाठविलें. महंमदखानाचा धनी रुस्तम हा आपला धनी शिवाजी याचा स्नेही आहे हें शिवाजीच्या लोकांस ठाऊक असल्यानें त्यानीं महंमदखानाकडेस अगदींच दुर्लक्ष केलें. एके शुक्रवारीं शिवाजीचा मुसलमान सरदार सगळ्या मुसलमान शिपायांना घेऊन दूर एक मैलावर निमाज पढण्यासाठीं गेला. ही संधि साधून महंमदखानानें आपल्या निवडक लोकांनिशीं एकदम मराठ्यांवर चाल केली व त्यांना तेथून पिटाळून लाविलें. फोंडा किल्ल्याबरील लोक गेले तीन दिवस

फोंडा.

मुसता झाडपाला खाऊन राहिले होते. त्यामुळें त्यांना ही मदत अगदीं ऐनप्रसंगीं येऊन पोहोंचली व ते संकटमुक्त झाले. यानंतर रुस्तमनें फोंडा, कुडाळ, बांदा, संकेलिम व बिचोलिम व आणखी पांच प्रसिद्ध शहरें शिवाजीपासून हस्तगत केलीं. परंतु शिवाजी व रुस्तम यांची मैत्री या प्रकारापासून तुटली.

६ गोंवा सर करण्याचें कारस्थान. १६६८:—स. १६६६ च्या मार्चमध्यें शिवाजी आग्र्यास गेला. व त्यानंतर ४ वर्षेंपर्यंत कोणालाहि त्याचा फारसा उपसर्ग पोंचला नाहीं. फक्त १६६८ च्या ऑक्टोबर मध्यें त्यानें गोंवा सर करण्याचा एक लहानसा प्रयत्न करून पाहिला. सुमारें हजार लोक गोव्यास गुप्तपणें इतस्ततः पसरून त्या सर्वांनीं एकदम गोवा सर करावा अशी युक्ती त्यानें योजिली. आणि तीप्रमाणें चार पांचशें लोक त्यानें गोव्यास पाठविलें. परंतु शिवाजीचें हें कारस्थान गोव्याचा पोर्चुगीज व्हाइसरॉय कोंडे याला कळली. त्यानें तत्काळ शिवाजीच्या लोकांस कैद केलें आणि शिवाजीच्या वकीलांना बोलावून ही सर्व हकीकत सांगितली व त्याच्या श्रीमुखांत भडकाविल्या, आणि सर्वांना गोंव्याबाहेर हाकलून दिलें. पुढें लवकरच तारीख २७ आक्टोबर १६६८ रोजीं कोण्डे मरण पावला. शिवाजीला ही हकीगत कळतांच त्यानें दहा हजार पायदळ व एक हजार घोडेस्वार जमवून गोंव्यावर स्वारी करण्याची तयारी केली. तो राजापुराहून वेंगुर्ल्यास गेला. वाटेंतील सर्व किल्ल्यांची तपासणी केली. परंतु पोर्चुगीजांची तयारी पाहून त्यानें पुढील स्वारीचा बेत रहित केला व तो राजगडाला परत आला.

गोंवा.

स. १६७० मध्यें शिवाजीचें व मोगलांचें बिनसलें. त्यामुळें शिवाजी मोगलांकडेसच गुंतून राहिला व कानडी मुलुखाला १६७२ पर्यंत स्वस्थता मिळाली. परंतु लवकरच दुसरा अलीआदिलशहा मृत्यु पावल्यामुळें विजापुरी मुलुखांत शिवाजीनें पुनः धामधुम सुरू केली.

स्वस्थता.

सन १६६६ मध्यें रुस्तमाचें शिवाजीशीं बिनसल्याची माहिती मागें दिलीच आहे. परंतु या उभयतांचें सख्य पुनः लवकरच जुळलें. निदान अदिलशहाला तरी तसा संशय आला असें दिसतें. एक किल्लाहि त्यानें शिवाजीच्या स्वाधीन केला असें बादशहास कळलें, त्यामुळें सन १६७१ मध्यें त्याला नोकरीवरून कमी करण्यांत आलें. म्हणून सप्टेंबरमध्यें त्यानें बंडाचा झेंडा उभारिला आणि शिवाजीच्या गुप्त मदतीनें दरसाल तीन लक्ष होन उत्पन्नाचा विजापुरी प्रांतहि त्यानें बळकाविला. मराठ्यांनीं पूर्वी एकदां लुटलेलें

सख्य.

रामबाग शहरहि लुटून जाळून टाकिलें. परंतु एक महिन्याचे आंतच विजापुरी फौजांनीं रुस्तमचा बंदोबस्त केला. आणि पुढें कांहीं महिन्यांनीं त्याच्या ताब्यांत असलेले मिर्जण व अंकोला हे किल्लेहि सर केले. सन १६७२ च्या मध्याच्या सुमारास मुजफरखान याला विजापुरदरबारनें कानडी किनाऱ्याचा सुभेदार नेमिलें. त्यानें लवकरच बंडखोराशीं तह केल्यामुळें धामधुमी बंद झाल्या.

७ विजापुरी कानडा घेण्याचे निष्फळ प्रयत्न १६७३:—तारीख २४ नोव्हेंबर १६७२ रोजीं अली अदिलशहा मरण पावतांच सौंदे आणि बेदनूर येथील राजे बंडाचा झेंडा उभारून विजापुरी प्रांतांत चाल करून आले. परंतु मुजफरखानानें त्यांच्यावर स्वारी करून त्यांना शिक्षा केली. व सौंदच्या राजाला तर पदच्युत केलें. ह्या बंडाचा वींमोड होतो न होतो तोंच मराठ्यांनीं कानडी मुलुखांवर दुसरी स्वारी केली. त्या वेळीं हुबळी हें मोठें व्यापाराचें स्थळ होतें. प्रतापरावांनीं तें लुटलें. आणि एकट्या इंग्रजी वखारींतूनच ७८९४ होनाचा माल मराठ्यांना मिळाला. याप्रमाणें अगणित संपत्ती लुटून मराठे तेथून निघून गेल्यावर दुसऱ्याच दिवशीं मुजफरखान हुबळीच्या संरक्षणासाठीं धांवून आला. परंतु तो उशीरां आल्यामुळें तो शिवाजीस सामील झाला आहे, अशी त्याच्याबद्दल शंका आली आणि त्याचेच सरदार त्याला सोडून गेले व विजापूरकरांनीं त्यास नोकरींतून कमी केलें. त्यामुळें तो बंडखोर झाला व बळजबरीनें स्वतःची जहागिरी बळकावून बसला. बेळगांवचा मजबूत किल्ला व इतरहि बराच प्रांत त्याचे ताब्यांत होता. हें पाहून त्याचे पारिपत्यासाठीं अदिलशहानें मोठें सैन्य रवाना केलें.

बंड.

पुढें १६७३ च्या जून मध्यें विजापुरी सरदार बहलोलखान यानें कोल्हापुराकडे स्वारी करून अनेक चकमकींत मराठ्यांचा पराजय करून त्यांना कारवारांतून हांकलून लाविलें. व तो दक्षिण कोंकण व राजापुर इकडे स्वारी करण्याच्या विचारांत होता. ऑगस्टमध्यें त्यानें शिवाजीला बरेंच चेपिलें होतें असेंच दिसतें. परंतु पुढें लवकरच तो मिरजेस आजारी पडला व मोगलांचा सरदार बहादुरखान हा सप्टेंबरमध्यें विजापूर व गोवळकोंडा यांच्यावर एकदम चालून आल्यानें त्याच्या प्रतिकारार्थ या दोन्ही बादशहांनीं उलट शिवाजीचीच मदत मागितली. हा इतिहास मागें १४८–१४९ पृष्ठांवर आलाच आहे.

बहलोलखान.

सप्टेंबरच्या अखेरीस शिवाजीनें मोठें सैन्य जमवून मोगली प्रांतावर स्वारी करण्याचा बेत ठरविला. आणि लुटीचें सामान भरून आण-

बंकापुर.

—[illegible] पोतीं नवीन तयार केलीं. परंतु

इतक्यांत मूळचा बेत फिरवून दशहराच्या दिवशीं म्हणजे १० ऑक्टोबर रोजीं पंचवीस हजार सैन्यासह विजापुरी प्रांतावर स्वारी करून बंकापूर वगैरे सारखीं श्रीमंत शहरें लुटलीं व कानडी मुलखांवर चालून गेला. डिसेंबरच्या आरंभीं चार हजार पायदळ व दोन हजार घोडेस्वार इतक्या सैन्यानिशीं त्यानें कडरा येथें जाऊन चार दिवस मुक्काम केला. परंतु वहलोलखान आणि सर्जाखान या दोघांनींहि त्याच्यावर स्वारी करून वंकापूर आणि चांदगड अशा दोन ठिकाणीं त्याचा पराभव केल्यामुळें तो कानड्यांतून परत फिरला.

८ कानडी मुलखांतील यादवी १६७४:—याप्रमाणें मराठे कानड्यांतून निघून गेल्यावरसुद्धां कानडी मुलखाला शांतता प्राप्त झाली नाहीं. कारण कारवारचा फौजदार मियासाहेब यानें लागलेंच तेथें बंड उभारलें. मियासाहेबाला शिवाजीची चिथावणी होती असें म्हणतात. अदिलशहानें मियासाहेबावर सैन्य पाठविलें. त्यांच्या चकमकी बरेच दिवस चालू होत्या. १६७४ च्या फेब्रुवारी मध्यें विजापुरी सैन्यानें सौंदे काबीज केलें. त्यांत मियासाहेबाची बायकोहि त्यांच्या हातीं लागली. तथापि बंडखोर मियासाहेब इतर किल्ल्यांवरून लढाई चालवीतच होता. पुढें आबूखान उर्फ दुसरा रुस्तमे-जमान याला विजापुरकरांनीं कानडी मुलखाची सुभेदारी दिली. याच सुमारास मियासाहेब याच्या सैन्यास पगार न मिळाल्यामुळें तें त्याला सोडून गेलें. आणि २२ एप्रिल रोजीं मियासाहेब याच्या बंडाचा शेवट झाला. बकदरा, कारवार, अंकोला आणि शिवेश्वर हे किल्ले तोफेचा एकहि आवाज झाल्याशिवाय आबूखानाच्या हातीं आले. आबूखानानें मियासाहेबाची बायको तत्काळ मुक्त करावी असें या उभयतांच्या तहांत ठरलें होतें. या वेळीं शिवाजी कारवारपासून एक दिवसाच्या रस्त्यावर येऊन राहिला होता. आणि तेथें एका उंच टेकडीवर एक मोठा किल्ला बांधण्याचे विचारांत होता.

दुसऱ्या रुस्तमेजमानाची आपल्या बापाप्रमाणें, मराठ्यांशीं मैत्री नव्हती.

यादवी. १६७४ च्या ऑगस्टमध्यें त्यानें नर्सा येथील शिवाजीच्या प्रजेपैकीं एका श्रीमंत व्यापाऱ्याला पकडून नेलें. त्यामुळें शिवाजीनें त्याच्यावर स्वारी करण्याची तयारी केली. इतक्यांत ऑक्टोबरमध्यें रुस्तम यास विजापुरचा वजीर खवासखान यानें बोलाविलें. त्यामुळें आपली सुभेदारी जाणार असें रुस्तम यास वाटून त्यानें कारवारच्या अनेक व्यापाऱ्यांकडून मिळालें तेवढें कर्ज घेतलें, व नंतर तो विजापुराकडे निघून गेला. ऑगस्टच्या

शेवटच्या आठवड्यांत मराठ्यांचा सरदार अनाजी दत्तो तीन हजार फौजेनिशीं कुडाळमधून फोंड्यावर गेला. परंतु तेथें मामतखानाची तयारी चांगली असल्यामुळें अनाजी दत्तोनें विशेष गडबड केली नाहीं.

विजापूरी दरबारांत या वेळीं मनस्वी घोंटाळा माजून राहिला होता. मोठमोठ्या सरदारांचीं आपआपसांत भांडणें सुरू होतीं. वजीर खवास-खान याला अफगाण पक्षानें अगदीं जेरीस आणिलें. रुस्तम (दुसरा) या वेळीं विजापुरास पोंचला व त्याची सुभेदारी त्याच्या अंदाजाप्रमाणें त्याच्याकडून गेलीच. अर्थात्‌च ही संधि शिवाजीला मिळतांच त्यानें कानडी मुलुख सर केला व तो त्याच्याकडेस कायमचाच राहिला. त्यानें मोगल सुभेदार बहादुरखान याला तहाच्या नादीं लावून कसें फशीं पाडिलें हें मागें पृष्ठ १६४ वर आलेंच आहे.

घोंटाळा.

९. फोंडा सर व कानडा खालसा १६७५:—पंधरा हजार स्वार, चौदा हजार पायदळ आणि कुदळी, पावडे वगैरेसह दहा हजार बिनीचे लोक, इतक्या फौजेनिशीं तारीख २२ मार्च १६७५ रोजीं शिवाजी राजापुरास आला. तेथें तीन दिवस मुक्काम करून चाळीस जहाजें वेंगुर्ल्यास तयार ठेविण्यास सांगून अत्यंत त्वरेनें तो कुडाळांत गेला, आणि तारीख ८ एप्रिल रोजीं त्याच्या सैन्यानें फोंड्याच्या मजबूत किल्ल्याला वेढा दिला. हा किल्ला गोव्याजवळ असून विजापुरकरांच्या ताब्यांत होता. इकडे वेढ्याचें काम चालू असतां मराठ्यांनीं हैदराबादेजवळचीं दोन मोठीं शहरें व अटगिरी हीं लुटून अगणित संपत्ति मिळविली व पुष्कळ श्रीमंत लोकांना (= निष्क्रया-साठीं) दंडाच्या आशेनें कैद करून नेलें.

वेढा.

महंमदखान हा फोंड्यास किल्लेदार होता. आणि किल्ल्यांतून फक्त चार महिन्यांचीच बेगमी होती. विजापुराकडून त्याला मदत मिळण्याची आशा नव्हती. व पोर्च्युगीज कांहीं सहाय्य करतील म्हणावें तर मराठी सैन्याच्या पराक्रमाला पाहून त्यांच्याच तोंडचें पाणी पळून गेलें होतें व भीतीनें ते स्वतःच चळचळां कांपूं लागले होते. पावसाळ्यांत सुद्धां वेढा चालवावयाचाच अशा निश्चयानें दोन हजार स्वार व सात हजार पायदळ फोंड्यास वेढा घालून बसलें होतें. तथापि महंमदखानानें फोंडा मोठ्या शौर्यानें लढविला. एक दोन वेळां मराठ्यांनीं आंत शिरण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्यांची फारच हानि झाली. शेवटीं बारा फूट उंचीची मातीची भिंत रचून मराठी सैन्य फोंड्यापुढें अड्डा ठोकून बसलें. मराठ्यांनीं फोंडा घेतला कीं, आपला गोंवा सहज त्यांच्या

फोंडा.

हातीं जाईल हें पोर्च्युगीजांना दिसत असल्यामुळें त्यांनीं गुप्तपणें दहा बोटी भरून धान्य वगैरे सामान फोंड्यास पाठविलें. परंतु मराठ्यांनीं त्या बोटी मध्येंच पकडल्या. इकडे वेढयाचें काम जोरानें चालूच होतें. शिवाजीनें फोंडा सर करण्यास एक युक्ति योजिली. त्यानें पांचशें शिड्या तयार केल्या व अर्धाशेर सोन्याच्या वजनाचा एक असे पांचशें गोफ करविले. व शिडी लावून कोटावर चढून जाणारास ते इनाम देण्याचें ठरविलें. या वेळीं बहलोलखान मिरजेस होता. त्याला फोंड्याच्या वेढयाची वार्ता कळतांच तो पंधरा हजार फौजेनिशीं किल्लेदाराच्या मदतीस येण्यास निघाला. परंतु पूर्वीच शिवाजीनें हें जाणून मार्गात झाडें झुडपें वगैरे टाकून मार्गच बंद करून टाकिला होता त्यामुळें बहलोल परत फिरला. बहलोल यास शिवाजीनें लांच दिली असेंहि कित्येक म्हणतात. सरतेशेवटीं तारीख ६ मे रोजीं फोंड्याचा किल्ला शिवाजीच्या स्वाधीन झाला. किल्लयावरील सर्वांची कत्तल झाली. फक्त किल्लेदार महंमदखान व आणखी चार पांच असामी वांचले. आसपासचे इतर किल्ले महंमदखानानें शिवाजीस मिळवून दिले. अंकोल्याचा फौजदार इनायत-खान थोडी गडबड करूं लागला, परंतु आतां फोंड्याच्या वेढयांत गुंतलेली सगळी फौज मोकळी झाली असल्यानें इनायतखानाचें कांहीं चाललें नाहीं. अंकोला, शिवेश्वर, कारवार, कद्रा हे सगळे किल्ले शिवाजीच्या हस्तगत झाले. आणि तारीख २५ मेच्या सुमारास गंगावती नदीपर्यंतचा सगळा विजापुरी प्रदेश शिवाजीच्या स्वाधीन झाला.

१० कानडयांत वर घाटीं मराठेः—सन १६७५ च्या एप्रिलमध्यें मराठ्यांनीं कारवारावर स्वारी करून तें अगदीं जाळून टाकिलें, तथापि इंग्रजी वखारीला धक्का लाविला नाहीं. पुढच्याच महिन्यांत फोंडा पडतांच कारवारचा किल्लाहि स्वराज्यांत सामील झाला. लवकरच पावसाळा सुरू झाल्यानें लढाया बंद झाल्या. फौज मिरजेस ठेवून बहलोलखान विजापुरास गेला व शिवाजी राजापुरावरून रायगडास तारीख १२ जून रोजीं गेला.

कारवार.

मे अखेरीस मराठ्यांची एक तुकडी सौंदच्या राज्यांत होती. त्यांनीं त्या राज्याचे सुपें व उलवी हे प्रांत विशेष अडथळ्याशिवाय काबीज केलें. परंतु लवकरच खिजरखान पानी यानें व स्थानिक देसायांनी मराठ्यांवर हल्ले चढवून त्यांचीं तीनशें माणसें कापून काढिलीं आणि दोनहि प्रांत परत मिळविलें. अंकोल्यापासून ७ मैलांवर वरहुली येथें जकात वसुलीसाठीं मराठ्यांची एक तुकडी ठेविली होती. तिलाहि ऑगस्ट १६७५ मध्यें खिजर खानानें पळवून लाविलें.

खिजरखान.

बेदनूरच्या विधवा राणीचें व तिचा प्रियकर तिम्मया यांचें बिनसलें. परंतु सर्व सत्ता तिम्मयाचे हातीं असल्यानें राणीला त्याच्याशीं समेट करणें भाग पडलें. व हा समेट सन १६७५ च्या ऑगस्ट मध्यें झाला. परंतु राणीनें गुप्तपणें शिवाजीकडेस बोलणें लावून वार्षिक खंडणी कबूल करून आपलें संरक्षण करण्यास बोलाविलें. त्याप्रमाणें मराठी वकील बेदनूरच्या दरबारीं येऊन राहिला.

खंडणी.

उत्तर कानडांतील दळवी आणि देसाई यांनीं प्रथम शिवाजीला विजापुरकरां-विरुद्ध मदत केली होती. परंतु आतां त्यांना मराठ्यांचा कडक अंमल नकोसा झाला होता, त्यामुळें ते चळवळ करूं लागले व फौज जमवून मराठ्यांवर कारवार येथें त्यांनीं हल्लाहि केला. परंतु यावेळीं विजापुर दरबारांत यादवीचा जोर बराच झालेला असल्यानें दळवी वगैरेंचें कांहीं चाललें नाहीं आणि दक्षिण कोंकण व उत्तर कानडा शिवाजीकडेसच राहिले. तथापि बेदनूर कांहीं शिवाजीच्या छत्राखालीं आलें असें दिसत नाहीं. कारण बेदनूरच्या राणीचें सौंदच्या राजाशीं युद्ध होऊन शिर्सी, सेरा हे किल्ले व मिर्जान बंदर राजानें घेतलें असा उल्लेख तारीख २९ जुलई सन १६७९ च्या पत्रांत आहे.

दळवी.

प्रकरण ११ वें

दर्यास पल्याण.

[१ पश्चिम किनाऱ्यावरील सीदी. २ सन १६६१ पर्यंत मराठ्यांचे विजय. ३ शिवाजीचें आरमार. ४ जंजीरा घेण्याचे मराठ्यांचे प्रयत्न. ५ सीदी दंडा किल्ला परत घेतो. स. १६७१. ६ आरमारी लढाई. १६७२–१६७५. ७ जंजीऱ्यावर भयंकर मारा. १६७५–१६७६. ८ नौकायुद्ध. १६७६–१६८०. ९ खांदेरीसाठीं इंग्रजांशीं विग्रह. १६७९. १० मुंबईकर इंग्रजांची चिंता व युक्ति.]

पश्चिम किनाऱ्यावरील सीदीः—पश्चिम घाटावर किनाऱ्याच्या बाजूस स्वराज्याचा अंमल बसूं लागतांच पश्चिम समुद्रांतील आरमाराशीं शिवाजीचा संबंध आपोआप आला. विशेषतः शिवाजीचा इकडील संचार जंजीऱ्याच्या सीदीच्या डोळ्यांत अधिक खुपूं लागला. जंजीरा हें बेट मुंबईच्या दक्षिणेस ४५ मैलांवर आहे. खाडीच्या पूर्वेस अर्ध्या मैलावर राजपुरी असून तेथून आग्नेय दिशेस दोन मैलांवर दंडा हें शहर आहे; व यावरून दंडाराजपुरी हें संयुक्त नांव प्रचलित होऊन येथें सीदीचें मुख्य ठाणें वसलेलें होतें. हल्लींचा बहुतेक कुलाबा जिल्हा त्यावेळीं या सीदीच्या ताब्यांत असे.

परिस्थिति.

सीदी.

इसवी सनाच्या पंधराव्या शतकांत सीदीनें आपली वसाहत या बाजूला प्रथम केली. त्यावेळीं हा प्रदेश अहंमदनगरच्या निजामशाही राज्यांत मोडत होता. व त्या राजानें एका सीदीला आपला सुभा नेमिलें. परंतु हा प्रदेश मुख्य राज्याहून पुष्कळच दूर असल्यानें सीदी, जवळ जवळ स्वतंत्र असेच राहिले; आणि सन १६३६ मध्यें मोगल व विजापुरकर यांच्यांत झालेल्या तहानें सीदी विजापुरकरांचे अंकित झाले, तेव्हां अदिलशहानें त्यांस वजीर हा किताब देऊन नागोठण्यापासून बाणकोटापर्यंतच्या प्रदेशाची देखरेख करण्याचें काम त्यांना सोंपिलें, व त्याचे मोबदल्यांत त्यांनीं विजापुरकरांच्या व्यापाराचें व मक्केच्या यात्रेकरूंचें संरक्षण करावें असें ठरविलें.

वर्णन.

जंजीऱ्याचे सीदी हे मूळचे लढाऊ असून येथें सरदार बनले व बऱ्याचशा प्रदेशावर स्वामित्व गाजवूं लागले. त्यांनीं आपल्या लहानशा जातींत जे नियम करून ठेविले तेहि फार महत्त्वाचे होते.

मुख्य सत्ताधारी निवर्तल्यावर त्याचे जागीं त्याचा मुलगाच यावयाचा असा इतरत्र असलेला नियम येथें नसून मुख्याच्या जागीं जो सर्वांत अधिक पराक्रमी असेल तोच यावयाचा असा नियम येथें होता. हे सीदी शरीरानें कांटक, मोठे युक्तिबाज, धाडसी आणि जलयुद्धांत अत्यंत प्रवीण असे होते. मुसलमान समाजांत यांच्या एवढे जलयुद्ध प्रवीण असे दुसरे कोणीहि नव्हते. धैर्य आणि शौर्य या युद्धोपयोगी गुणाबरोबरच गांभीर्य आणि सत्ता चालविण्याचें कौशल्य त्यांच्यांत असल्यानें ते जसे उत्तम सेनापति होते तसेच ते राजकार्यधुरंधरहि होते.

आरमार.

जंजीऱ्याच्या सीदीचें लढाऊ आरमार मोठें जय्यत असल्यानें सतराव्या शतकांत ते प्रथम अदिलशहाचे व नंतर मोगलांचे आरमारी मुख्य सरदार म्हणून प्रसिद्ध होते. त्या वेळीं पश्चिम किनाऱ्यावर सीदीच्या तोडीचें दुसरें एकहि आरमार नव्हतें इतकें सांगितलें म्हणजे सीदीचें आरमार किती बलवान् होतें याची योग्य कल्पना येईल.

कारण.

अशी एकंदर परिस्थिति असल्यामुळें, ज्याच्या ताब्यांत कोंकण असेल त्यानें, एक तर सीदीशीं मैत्री केली पाहिजे, किंवा आपल्या आरमारी बळानें सीदीला दहशत तरी उत्पन्न केली पाहिजे. कोंकण जिंकल्यावर ही गोष्ट शिवाजीच्या लक्षांत आली व आपल्या व्यापारासाठीं व समुद्रकिनाऱ्यावरील आपल्या प्रजेच्या संरक्षणासाठीं त्यानें मजबूत आरमार उभारलें. त्या वेळीं समुद्रावरील चांचे लोक किनाऱ्यावरील शहरें लुटीत, जाळीत, लोकांच्या कत्तली करीत व लोकांना पकडून नेऊन गुलाम बनवीत, त्यांचाही बंदोबस्त शिवाजीनें या आरमाराच्या जोरावर केला. जंजीऱ्याच्या सीदीला आपल्या अस्तित्वासाठीं दंडाराजपुरी आपल्या ताब्यांत ठेवणें अवश्य होतें. यामुळें सीदी आणि मराठे यांच्यात वारंवार खटके उडाले. त्यांची हकीकत पुढें ओघाओघानेंच येणार आहे.

बाजी पासालकर.

२ सन १६६१पर्यंत मराठ्यांचे विजयः—कुलाबा जिल्ह्याचा पूर्व भाग शिवाजीनें आरंभींच जिंकला होता, तरी दंडाराजपुरी व त्या लगतचा प्रदेश सीदीच्या ताब्यांत होता. त्यामुळें मराठे आणि सीदी यांच्यामध्यें अनेक चकमकी झडल्या. परंतु यासंबंधीचे लेख आज उपलब्ध नाहींत. सीदीचें बळ जमिनीवर चालत नसे, आणि मराठे जलयुद्धांत निष्णात नव्हते. त्यामुळें सीदी वारंवार समुद्रावरून स्वराज्याच्या मुलखास त्रास देत असे. स. १६४२ पासून ५५ पर्यंत युसुफरखान हा जंजीऱ्यास राज्य करीत होता.

त्यानें विशेष चळवळ केल्याचें दिसत नाहीं. परंतु त्याच्या मागून गादीवर आलेला (उत्तर अधिकारी) फातखान हा मात्र शूर व कार्यकर्ता होता. स. १६५९ मध्यें अफजलखान शिवाजीवर चालून आला तेव्हां ती योग्य संधि जाणून फातखानहि कोंकणांत वळवळ करूं लागला होता. परंतु अफजलखान व विजापुरी सैन्य या दोघांचाहि नाश झाल्याचें वर्तमान कळतांच फातखानही स्वस्थ राहिला. तथापि दंडाराजपुरी मराठ्यांनीं घेतली. किल्ला मात्र त्यांचे हातीं आला नाहीं, असें इंग्रज लेखक म्हणतो. स. १६६० मध्यें शिवाजी पन्हाळ्यांत कोंडला गेला होता; त्यावेळीं फातखानानें पुन्हा उचल केली. " त्याजवरी राजपुरीहून (सीदीच्या तर्फेनें मराठ्यांशीं लढण्यासाठीं) पांच हजार फौजेनिशीं कायसावंत आला. मोठें युद्ध होतां बहुत रणकंदन झालें. कायसावंत खासा व बाजीपासलकर माहायोद्धा–याच्या मिशा दंडा येवढ्या. यास पीळ घालून वरी केशांच्या आधारें निंबे दोहींकडे दोन ठेवीत होता. असा शूर मर्द–यासी व कायसावंताशीं खासाखाशीं गांठ पडली. एकास एकानीं पंचवीस जखमा करून ठार पडले. मग उभयतांकडील दळ आपले जागियास गेले. "*

रघुनाथ बल्लाळ.

"पुढें राजियास राजपुरीचे शिदी घरांत जैसा उंदीर तैसा शत्रु, यांस कैसें जेर करावें म्हणून तजवीज पडली. तेव्हां रघुनाथ बल्लाळ सबनीस यांनीं आंगें अर्ज केला कीं, आपण सीदीवर स्वारी करितों. असें म्हणून सात पांच हजार मावळे खलक पाईंचे घेऊन राजपुरीवरी चालिले. त्यांनीं जाऊन राजपुरीं पावेतों तळें घोसाळें कुल देश मारून राजपुरी पावेतों दरिया किनारा मोकळा केला.* " व वेढा घालून दंडा किल्लाहि सर केला. नंतर जंजीऱ्यावर तोफा डागल्या. परंतु मराठ्यांच्या तोफा कमकुवत असल्यानें येथें त्यांचें कांहीं चालेना. तथापि सीदी घाबरा झाला होता व विजापुराकडून मदत मिळण्याची त्याला आशा नव्हती, म्हणून त्यानें "रघुनाथपंताशीं राजकारण करून सल्ला केला. देश थोडा बहुत मागून, पुढें सज्जन मनुष्य पाठवून, आण शपथ देऊन रघुनाथपंतास भेटीस नेलें. भेट जहाली. सल्लयाची बळकटी करून सख्य जहालें. रघुनाथपंतास वस्त्रें घोडा दिधला.* " तेथून रघुनाथपंत देशीं आला व लवकरच मृत्यु पावला. (यावरून हा रघुनाथपंत प्रभु असावा असें वाटतें. कारण ब्राह्मण रघुनाथपंत १६७८ च्या कर्नाटक स्वारींत हजर असल्याचा उल्लेख आहे.) या तहांत दंडाराजपुरी शिवाजीस मिळाली व त्या योगें सीदीचें बळ कमी झालें.

* सभासद.

परंतु हा तह फार दिवस टिकला असें दिसत नाहीं. कुलाबा जिल्हा गेल्यानें सीदीचें उत्पन्नाचें साधनच नाहींसें झालें व शिवाजीला जंजीरा घेऊन पश्चिम किनारा सगळा आपले स्वाधीन ठेवाचयाची मोठी महत्त्वाकांक्षा. त्यामुळें तह मोडला जाऊन सीदी पुनः किनाऱ्या लगतच्या खेड्यांवर छापे घालूं लागले व मराठे दर वर्षी जंजीऱ्यावर तोफा डागूं लागले परंतु त्या लागू मात्र झाल्या नाहींत.

भांडण.

व्यंकाजी दत्तो

कुलाबा जिल्ह्यावर राजानें व्यंकाजी दत्तो याला पांच सात हजार फौज देऊन सुभेदार नेमिलें. " त्यांनीं जाऊन त्याचा मुलुख मारून तलफ (=जप्त) केला. मग शिदीनें आपले जातीचे हबशी लष्कर, घोडेस्वार व हशम नामजाद व्यंकाजी दत्तोवर रवाना केले. यांशीं त्यांशीं युद्ध जालें. तीनशे हबशी व्यंकाजीपंतीं मारिलें. घोडे पाडाव केले. व्यंकाजी पंतीं कस्त फार केली. बारा जखमा व्यंकाजीपंतास लागल्या. असा चौका बसवून आले. शीदीनें सल्लयाचें नातें लाविलें होतें. परंतु राजियांनीं सल्ला केलाच नाहीं. त्याचे देशांत जागां जागां गडकोट नवेच बळावून राहिले. राजपुरी नजीक डोंगर बळाविला होता, तो घेऊन गड बांधून कुल्देश काबीज केला. ठाणीं ठेविलीं मग त्याचा इलाज चालेना. पांच सात हजार हशम व सुभे ठेविले. असें केलें. मग राजपुरीस मुलूख नाहीं. दाणे कोठून यावें ? त्यास पाणियांतील जहाजें होतीं. तेणें करून वरकड मुलूख मारून, सामान आणून खाऊं लागले.*" सीदीच्या या चांचेगिरीला आळा घालण्यासाठीं व आपल्या मुलुखाच्या संरक्षणासाठीं राजालाहि आरमार बांधणें अवश्य झालें.

३ शिवाजीचें आरमार:—शिवाजीच्या उदयाला प्रारंभ झाल्यावर लवकरच म्हणजे ठाण्याकडील प्रदेश काबीज करितांच त्यानें आपलें लहानसें आरमार बांधिलें. सन १६५९ च्या सुमारास तर मराठी आरमार कल्याण-भिवंडी-पनवेलच्या खाडींत सफरी करून पोर्च्युगीजांना सतावीत होतें. परंतु खालीं गोंव्यापर्यंत पश्चिम किनारा हस्तगत होतांच त्याच्या संरक्षणासाठीं आरमाराची अत्यंत आवश्यकता त्याला भासूं लागली. बरींचशीं बंदरें ताब्यांत आल्यानें आरमार ठेविण्यासहि सुरक्षित स्थळ झालें व तेथें आरमार ठेवून अगर तेथून मालाची ने आण करून मलबार किनाऱ्याकडील श्रीमंत शहरावर त्याला वचक बसवितां येणें शक्य होतें. तसेंच मजबूत आरमार

विचार.

* सभासद.

आपल्या सत्तेचें असल्याविना जमीनीवरसुद्धां आपकी सत्ता दृढ राहणार नाहीं हें त्या चाणाक्ष राजानें तेव्हांच ओळखिलें व तत्काळ–सभासदाच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे–त्यानें समुद्रास पल्याण (=खोगीर) घातलें.

शिवाजीचें लढाऊ आरमार चारशें जहाजांचें होतें असें बखरीवरून दिसतें.

आरमार.

हीं जहाजें निरनिराळ्या आकारांचीं व निरनिराळ्या प्रकारचीं होतीं. "राजियांनीं जहाजें पाणियांतील सजिलीं. गुरावा (=तोफा ठेविण्याचें दोन शिडांचें तारू), तरांडीं (=माणसें बसण्याचें मोठें जहाज.), तारवें, गलबतें (जलद चालणारें), शिबाडें (=व्यापारी जहाज.) पगार अशीं नाना जातीचीं जहाजें * " तयार केलीं. दोनदोनशें जहाजांचा एक काफला करून त्यावर एक एक सुभा 'असें आरमार सजलें.' एकंदर जहाजांवर दर्यासारंग म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणोन भंडारी असे सुभेदार नेमिले.*" शिवाजीनें आपल्या आरमारावर समुद्र किनाऱ्यावरील पुष्कळ हिंदु खलाशी चाकरीस ठेविले. हे खलाशी मोठे दर्यावर्दी असून इंग्रजांना सुद्धां यांचा धाक वाटत असे. जंजीऱ्याच्या सीदीपैकीं मिस्त्री आणि दौलतखान हे दोन मुसलमान शिवाजीस येऊन मिळाले त्यांनाहि आरमारावर चाकरीस ठेविलें.

"राजियाचीं जहाजें जागां जागां बंदरें शहरें मोंगलाई व फिरंगी व वलंदेज,

व्यापार.

इंग्रज, किलातान ऐशा सत्तावीस पादशहा पाणियांत आहेत. त्यांचीं शहरें...मारून पोट भरीत चालले. जागां जागां युद्ध करीत मालमत्ता मेळवून आपलें पोट भरून राजियास रसद द्रव्यें जिन्नस आणून देऊं लागले.*" उत्तर कोंकणांतील बंदरें हस्तगत होतांच शिवाजीनें इराण, बसरा, मक्का या देशांशीं धडक्यानें व्यापार सुरू केला. अफजलखानाचें एक जहाज राजापुराजवळ शिवाजीस आढळलें तेंहि त्यानें आपल्याच ताब्यांत घेतलें. सारांश, बंदराचा उपयोग स्वराज्याच्या व्यापाराच्या वृद्धीकडेस करण्यास शिवाजीनें सुरुवात केली.

स्वराज्याचें आरमार समुद्रावर सफरी करूं लागलेलें दिसतांच सीदी, इंग्रज,

सफरी.

आणि मोगल या तिघांच्याहि पोटांत धसका बसला. इंग्रजांचें आरमार व इंग्रजांच्या तोफा मराठ्यांपेक्षां सरस होत्या तरीहि मराठी आरमार त्यांच्या डोळ्यांत खुपूं लागलें. मक्केला जाणाऱ्या जहाजांना तर

---

* सभासद.

मराठी आरमार आरंभापासूनच लुटूं लागलें होतें. सन १६६५ मध्यें मराठी आरमारानें दक्षिण कानडी मुलुख लुटल्याचें मागें पृष्ठ १७३ वर आलेंच आहे. शिवाजी व जयसिंग यांचा पुरंदर येथें तह झाल्यावर मोगलांसाठीं आपण जंजीरा सर करितों असें शिवाजीचें म्हणणें पडलें. परंतु जंजीरा मराठ्याकडेस जाणें मोगलांस घातक आहे हें राजनिष्ठ जयसिंगाच्या तेव्हांच ध्यानांत आलें व शिवाजीच्या म्हणण्याला त्यानें संमति दिली नाहीं.

मारा.

४ जंजीरा घेण्याचे मराठ्यांचे प्रयत्नः—जंजीऱ्यावर डागलेल्या तोफा एक वेळीं कशा निष्फळ झाल्या हें मागें पृष्ठ १८४ वर सांगितलेंच आहे. त्यानंतर सन १६६९ मध्यें पुनः जंजीरा घेण्याचा प्रयत्न करण्यांत आला. या सालच्या आरंभींच सीदीचें व मराठ्यांचें बिनसलें आणि उभयतांत चकमकी सुरू झाल्या. 'रेड्यांची टक्कर आणि झाडांचा नाश' या म्हणीप्रमाणें या दोघांच्या भांडणांत प्रजेला मनस्वी दुःखें सहन करावीं लागलीं आणि व्यापार तर अगदीं ठार बुडाला. या वर्षाच्या ऑक्टोबरमध्यें मराठ्यांच्या मोऱ्यानें सीदी अगदीं रडकुंडीस आला व त्यानें इंग्रजांस कळविलें कीं, 'उपासमारीनें मी अगदीं मेटाकुटीस आलों आहें, तथापि शक्य तेवढा प्रयत्न करून शेवटीं चालेनासें झाल्यावर जंजीरा मोगलांच्या ताब्यांत देण्याचा मी निश्चय केला आहे.'

संबल.

सन १६७० मध्यें शिवाजीनें मराठ्यांची सगळी शक्ति एकवटून जंजीऱ्यावर निकराचा मारा चालविला. रात्रंदिवस युद्धाची धुमश्चक्री आणि तीयोगें प्रजेचा ऱ्हास यामुळें जंजीऱ्याचा मुख्य सीदी फातखान हा जेरीस आला आणि विजापुराकडोन मदत येत नाहीं हें पाहून जंजीरा मराठ्यांच्या ताब्यांत देऊन शिवाजीची सरदारी पतकरण्यास तो सिद्ध झाला. परंतु त्याच्या हाताखालच्या तीन सीदी गुलामास हा विचार नापसंत पडून त्यांनीं फौजेंत उठावणी केली व अदिलशहा आणि मोगल बादशहा यांना मदतीस येण्यास विनंतिपत्रें पाठविलीं. मोगल बादशहानें एकदम विनंति मान्य करून तीन गुलामांपैकीं एक सीदी संबल यास मुख्य सरदार नेमून त्याला आरमाराची मनसबदारी व तीन लाख रुपयांची जहागीर देऊन आपला सरदार बनविलें. त्याचे दोन साथीदार सीदी कासीम व सीदी खैरियत यांना अनुक्रमें जंजीरा व इतर प्रदेश यांवर मुख्य नेमिलें. याप्रमाणें सीदीचें आरमार विजापुरकरांकडोन मोगलांकडेस आलें. आणि सीदी व विजापुरकर यांच्यांत आरमाराच्या संबंधीं जे करारमदार होते तेच करारमदार सीदी व मोगल यांच्यांत कायम ठेविण्यांत आले. आरमाराच्या

मुख्याला याकुतखान ही नवीन पदवी निर्माण करून देण्यांत आली व ती पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत चालत होती. जंजीऱ्याची राज्यव्यवस्था व आरमारी खातें परस्परांपासून भिन्न करण्यांत येऊन जंजीऱ्यावर दुसऱ्या सीदीची नेमणूक करण्यांत आली. आणि आरमाराच्या मुख्याच्या जागीं त्याच्या मृत्यूनंतर जंजीऱ्याचा मुख्य नेमण्यांत यावा अशी पद्धति ठेविली. आरमाराचा मुख्य याकुतखान हा नांवाचाच मुख्य होता. कारण प्रत्येक आरमाराचा कप्तान हा आपल्या जहाजापुरता स्वतंत्रच ठेविण्यांत आला. एकंदर सर्वसाधारण व्यवस्था कौन्सिलच्या मतानें चालावी असें ठरवून दिलें. सारांश या लहानशा प्रजासत्ताक राज्याची याप्रमाणें अंतर्व्यवस्था होती. ही क्रांति स. १६७१ च्या जानेवारी–फेब्रुवारीमध्यें झाली असें खाफीखान म्हणतो. परंतु अन्य पुराव्यावरून फातखान हा १६७४ पर्यंत राज्यावर होता असें दिसतें. सीदी संबल मात्र स. १६७१ मध्यें आरमाराचा मुख्य झाला.

सुरत किल्ला.

इ. स. १६७० च्या नोव्हेंबरमध्यें शिवाजीनें सुरतेच्या किल्लेदारास लांच देऊन किल्ला स्वाधीन करून घेण्याचा प्रयत्न केला. ता. २९ नोव्हेंबर रोजीं, किल्ला स्वाधीन होण्याचें ठरलें. त्यासाठीं दहा हजार घोडेस्वार व वीस हजार पायदळ वेढ्याच्या तयारीनें जमीनीवरून रवाना झालें. आणि तीन हजार शिपाई १६० जहाजांतून येण्यासाठीं सज्ज ठेवून शिवाजीनें खुष्की व जल अशा दोन्ही मार्गांनीं सुरतेकडे चाल केली. आणि सुरत घेतल्यावर भडोच सर करावें असा राजाचा हेतु होता.

फसगत.

मराठे आरमार २४ नोव्हेंबर रोजीं नांदगांवाहून निघालें, ता. २५ रोजीं तें मुंबईला गेलें, आणि ता. २६ रोजीं तें माहीमला पोंचलें. खुष्कीवरून स्वतः शिवाजी सैन्य घेऊन निघाला होता. व या सैन्याचें कूच आरमाराबरोबर होत असे. ता. २६ रोजीं राजाच्या असें लक्षांत आलें कीं, सुरतेच्या किल्लेदारानें किल्ला स्वाधीन करण्याची युक्ति योजून अशारीतीनें मराठी सैन्याला कचींत पकडण्याचा हा डाव मांडिला आहे. या कारस्थानाचा वास येतांच शिवाजीराजानें आपला मूळचा बेत बदलून खानदेश वऱ्हाडाकडे तो वळला व डिसेंबरमध्यें तिकडे यथेच्छ लूट केली. इकडे मराठे आरमार दमणवरून पुढें चाललें व जातांना बारा हजार रुपये किंमतीचें सुरतेस जाणारें एक जहाज त्यानें पकडिलें. पोर्चुगीजांनीं याबद्दल मोबदला म्हणून बारा जहाजें पकडून नेऊन वसईला ठेविलीं, आणि मराठी आरमारांचा पाठलाग सुरू केला. परंतु तें दाभोळला निसटून गेलें.

५ सीदी दंडाकिल्ला परत घेतो, सन १६७१:—जंजीऱ्याचा नवीन सुभेदार सीदी कासीम हा शूर, धूर्त व लायक म्हणून प्रसिद्ध होता. विशेषतः आपल्या शेतकऱ्यांची काळजी तो फार वाहात असे. आपलें आरमार वाढविणें, युद्धसामुग्री जमविणें, आणि किल्लयाचा बंदोबस्त करणें या कार्यांत तो रात्रंदिवस गढलेला असे. तो हंमेश लष्करी पोषाखांत राहून मराठ्यांच्या जहाजावर छापे घालून कत्तली करून मराठ्यांचीं डोचकीं सुरतेस रवाना करी. त्यानें मराठ्यांपासून दंडा किल्ला घेतला त्यामुळें तर त्याची प्रसिद्धी फारच झाली. स. १६७१ च्या फेब्रुवारी मध्यें होळीच्या दिवसांत किल्लयावरील शिबंदी खानपानांत व नाचतमाशांत दंग आहे ही संधी साधून कासीमनें चाळीस जहाजें गुप्तपणें किल्लयाच्या धक्क्या-जवळ आणिलीं. आणि पांचशें शिपायांनिशीं जमिनीवरून हल्ला करण्यासाठीं सीदी खैरियत याला पाठवून दिलें. त्यानें मोठा गोंगाट करून हल्लयास सुरवात केली. हें पाहून वरील शिबंदी फसली व सर्वजण त्या बाजूला धांवून गेले. आणि समुद्राच्या बाजूस किल्ला उघडा पडला. कासीमनें एकदम जहाजांतून बाहेर येऊन किल्लयाच्या तटाला शिड्या लावून सैन्यानिशीं किल्लयांत प्रवेश केला. वरून मराठ्यांनीं बराच प्रतिकार केला. कित्येकांना समुद्रांत ढकलून दिलें व कित्येकांची कत्तल केली. तथापि बाकीची फौज वर चढली. इतक्यांत किल्लयावरील दारूच्या कोठाराला आग लागून तें उडालें. त्यांत किल्लेदार, कांहीं शिबंदी व कांहीं सीदी फौज नाश पावली. सीदी लोकांची रणगर्जना "खसु खसु" अशी आहे ती करीत सीदी कासीमनें आपली फौज एकत्र जमविली. तिकडून खैरियतहि किल्लयावर चढून आला. या दोघांच्या सैन्यानें किल्लयामधील लोकांची कत्तल केली व किल्ला सर करेला.

दंडा.

जंजीरा सर करण्याचा शिवाजीचा बेत होता परंतु दंडाहि त्याच्या हातून गेला, यामुळें त्याला फार वाईट वाटलें. ज्या रात्रीं दंड्यावरील दारूगोळा उडाला त्या रात्रीं शिवाजी राजा तेथून चाळीस मैलांवर होता. दारूचा मोठा धडाका ऐकून तो दचकून जागा झाला, व दंडा किल्लयावर कांहीं तरी अपघात आहे असें उद्गारला. परंतु या वेळीं नाशिक बागलाणकडे त्याचे मोगलांशीं युद्ध सुरू असल्यामुळें दंड्याकडे पाहाण्यास राजाला सवड नव्हती. कासीमनें ही संधी साधून शेजारचे सातहि किल्ले हस्तगत केले. पैकीं सहा किल्ले सहज त्याला मिळाले. परंतु सातव्या किल्लेदारानें एक

कासीम.

आठवडाभर किल्ला लढविला. शेवटीं कासीमनें किल्लयावरील लोकांस अभिवचनें देऊन किल्ला मिळविला. आणि किल्ला याप्रमाणें ताब्यांत आल्यावर विश्वासघातकीपणानें किल्लयावरील पुरुषांची कत्तल केली. म्हाताऱ्या आणि कुरूप वायकांना हांकून लाविलें आणि मुलें व सुंदर स्त्रिया यांना वाटवून मुसलमान करून गुलाम बनविलें. यानंतर कांहीं दिवस मराठे आपला बचाव करून राहिले.

दंडा गेला ह्या नुकसानीनें शिवाजीच्या मनाला मोठी चुटपुट लागून राहिली.

प्रयत्न. दंडा त्याच्या ताब्यांत राहणें हें राजकीय दृष्ट्या अत्यंत अवश्यक होतें. दंडा मिळविण्यासाठीं शिवाजीनें व संभाजीनें शेवटपर्यंत प्रयत्न केले, व मराठे आणि सीदी यांचे निकराचे भांडण येथून पुढे सतत वीस वर्षेंपर्यंत चाललें. परंतु दंडा मराठ्यांना परत मिळाला नाहीं. प्रत्येकानें आपल्या शत्रूच्या प्रजेवर अत्यंत क्रूरपणा दाखवून तिला सळो कीं पळो करून सोडिलें. लढाईंत सापडलेले कैदी व शेतकरी यांना मनस्वी छळिलें आणि त्यायोगें सगळा देश उद्ध्वस्त केला. अर्थात्च यायोगें सीदी अधिक जेरीस आला, व त्यानें तहाचें बोलणेंहि लाविलें. परंतु आपलें सर्वस्व मराठ्यांस सोंपून देऊन आपण मराठ्यांचा सरदार होऊन राहाणें ही अट सीदीला न पटल्यामुळें शेवटपर्यंत तह जमून आला नाहीं. १६७१ च्या सप्टेंबरांत दंडा सर करण्यासाठीं शिवाजीनें इंग्रजांची मदत मागितली. परंतु दंडा शिवाजीच्या ताब्यांत गेला कीं, मुंबई बंदर आपल्या हातांत राहाणार नाहीं, असें इंग्रजांना वाटल्यामुळें त्यांनीं मदतीची टाळाटाळी केली.

६ आरमारी लढाई १६७२-१६७५:—सन १६७२ च्या शेवटीं औरंगजेबानें छत्तीस जहाजांचें एक आरमार सुरतेहून सीदीच्या मदतीस पाठविले. या आरमारानें शिवाजीचीं सगळीं बंदरें लुटलीं व कित्येक शहरेंहि नष्ट केलीं, आणि पांचशें व्यापारी जहाजें पकडून बुडविलीं. या प्रसंगीं म्हणजे तारीख २१ डिसेंबर सन १६७२ च्या सुमारास शिवाजीचीं सहा लढाऊ जहाजें मुंबई बंदरांत नांगरलेलीं होतीं. मोगली आरमारानें याहि जहाजांची मागणी केली. परंतु सन १६६१ मध्यें राजापुर येथील वखार शिवाजीनें लुटली त्याच्या मोबदला हीं जहाजें आपणांस शिवाजीकडून मिळालीं आहेत असें इंग्रजानीं कळविल्यानें या जहाजांचा बचाव झाला. या वेळीं शिवाजी व औरंगजेब असे दोघेहि इंग्रजाजवळ दुसऱ्याचा नाश करण्यासाठीं मदत मागत होते. व ही संधी इंग्रजांस उत्तम होती. तरीहि त्यांनीं उदासीनता स्वीकारून कोणासच मदत

मोगली आरमार.

दिली नाहीं, हें एका अर्थीं उत्तमच झालें. सन १६७३ च्या ऑगस्टमध्यें एका फ्रेंच जहाजानें शिवाजीस ८० तोफा व दोन हजार मण शिसें विकत दिलें. सन १६७८ च्या नोव्हेंबरमध्येंहि पन्हाळ्याच्या संरक्षणासाठीं त्यांनीं ४० तोफा शिवाजीस विकल्या होत्या.

इंग्रज.

इंग्रजांकडून मदत न मिळाल्यामुळें शिवाजीस त्यांचा राग आला होता. याचा फायदा घेऊन सन १६७३ च्या मार्चमध्यें पोर्च्युगीजांनीं शिवाजीस आरमारी मदत देऊन दंडाराजपुरी घेऊन देण्याचें बोलणें लाविलें. व त्याचे मोबदल्यांत शिवाजीनें तीन हजार माणसें पोर्च्युगीजांच्या मदतीस देऊन मुंबई सर करून द्यावी अशी अट त्यांनीं घातली. आतांपर्यंत दंडाराजपुरीसाठीं मराठ्यांचा पुष्कळ पैसा व १५ हजार माणसें खर्च पडलीं होतीं तथापि शिवाजीस पोर्च्युगीजांचा विश्वास वाटला नाहीं व त्यामुळें वरील बोलणें तसेंच राहिलें.

कापाकापी.

सन १६७३ च्या मेमध्यें मोगलांचें एक आरमार सीदी संबल याच्या हाताखालीं दंडाराजपुरीला आलें व सगळा पावसाळा त्यानें तेथें काढिला. नंतर तेथून निघून त्यानें समुद्रावर चांचेगिरी चालविली व कांहीं मराठी व्यापारी जहाजें लुटलीं. तारीख १० ऑक्टोबर रोजीं तें मुंबई बंदरांत शिरलें व तेथून पेण नागोठण्याकडेस टोळ्या पाठवून तिकडे लुटालूट चालविली. या लुटींत पुष्कळ लोकांना त्यांनीं कैदी करून नेलें. या महिन्याच्या अखेरीस अशीच एक सीदींची टोळी किनाऱ्यावर उतरून साळीचीं उभीं शेतें कापीत होती. इतक्यांत राजगडावरून मराठ्यांची एक टोळी अचानक तेथें येऊन पोंचली व तिनें त्या लोकांना साळी सारखेंच कापून काढिलें व त्यांच्या मुख्यांची डोचकीं शिवाजीकडेस पाठवून दिलीं.

सीदी रंजीस.

सन १६७४ च्या फेब्रुवारीमध्यें सीदी व मराठे यांच्यांत लढाई चालूच होती. पण ती विशेष जोराची नव्हती. या वेळीं सीदी अगदीं रंजीस येऊन इंग्रजांनीं मध्यस्थी करून शिवाजीशीं तह घडवून आणावा असें त्यानें इंग्रजांशीं बोलणें लाविलें होतें, असें इंग्रजी पत्रावरून दिसतें.

आरमारी लढाई.

सन १६७४ च्या मार्चमध्यें मोगलांचा सीदी संबल व मराठ्यांचा दौलतखान यांचे रत्नागिरी तालुक्यांतील मुचकुंदी खाडींत चांगलेंच युद्ध होऊन दोघेहि नौकाध्यक्ष जखमी झाले. तथापि या वेळीं सीदीचा पराजय होऊन तो हरेश्वरच्या बंदरांत पळून गेला. याच सालच्या

मे महिन्यांत शिवाजीनें तोफा, दारूगोळा, सैन्य वगैरे पाठवून दंडाराजपुरीवर हल्ले चढाविले. व दक्षिण कोंकणांतील राजपुरीपासून वार्डेसपर्यंतचीं सगळीं ठिकाणें हस्तगत केलीं, परंतु दंडाराजपुरी कांहीं त्यास प्राप्त झाली नाहीं.

७ जंजीऱ्यावर भयंकर मारा. १६७५-१६७६:—सन १६७५ च्या सप्टेंबरमध्यें शिवाजीनें जंजीऱ्यावर समुद्रांतून व जमिनीवरून अशा दोनहि बाजूंनीं मारा करण्याची तयारी चालविली. या वेळीं मराठ्यांच्या आरमारी संख्येंत भर पडलेली होती. या वर्षाच्या जानेवारी फेब्रुवारीमध्यें सीदीच्या चांचेपणास मुळींच यश आलें नव्हतें. परंतु नोव्हेंबरमध्यें त्यानें अधिक सैन्य आणून वेंगुर्ल्यापर्यंत लुटालूट केली. हें पाहून विजयदुर्ग आणि राजापुर येथून मराठी आरमारानें त्याचा पाठलाग केला परंतु तो पळून गेला.

चांचे.

याच्यापूर्वीच कांहीं दिवस मराठ्यांनीं जंजीऱ्याला वेढा घालून आसपासच्या किनाऱ्यावर आपली ठाणीं ठेविलीं होतीं. तसेंच तराफ्यावरून कांहीं तोफा समुद्रांत नेल्या होत्या व जंजीऱ्यापर्यंत एक पूल बांधण्याचाहि प्रयत्न सुरू झाला होता. इतक्यांत सन १६७५ च्या अखेरीस सीदी संबल चालून आल्यानें हा वेढा उठवावा लागला. तथापि सन १६७६ मध्यें पुनः जोराचा वेढा घालण्यांत आला. सन १६७६ च्या ऑगस्टमध्यें दहा हजार फौजेनिशीं मोरोपंत पेशव्याला आरमाराच्या मदतीस पाठविलें. त्यांनीं आजूबाजूचें जंगल तोडून शिड्या व तराफे यासाठीं लाकडें जमविलीं व तटावर मारा करण्याचा विचार चालविला. परंतु सन १६७६ च्या डिसेंबरच्या अखेरीस सीदी कासिम आरमार घेऊन आला. त्यायोगें किल्ल्यावरील लोकांसहि धीर येऊन दोहींकडून जोराचा मारा मराठी सैन्यावर चालविल्यानें शेवटीं हाहि वेढा उठवून मराठ्यांस परत फिरावें लागलें.

वेढा.

७. नौकायुद्ध. १६७६-१६८०:—सीदी कासिम याला जंजीऱ्यावर नेमून सीदी संबल याला आरमारी मुख्य नेमिलें होतें, ही व्यवस्था मागें पृष्ठ १८७ वर आलीच आहे. परंतु सन १६७६ च्या एप्रिलमध्यें संबल व इतर सीदी यांच्यांत भांडण होऊन त्यांनी संबल यास नोकरींतून कमी केलें आणि त्याच्या जागीं सीदी कासिम याची नेमणूक केली. तथापि संबल आपला अधिकार तसाच बळकाऊन बसला. आणि ऑक्टोबरमध्यें त्यानें मराठी किनाऱ्यांवर लुटालूट करून डिसेंबरमध्यें राजापुर नदीच्या मुखाजवळील जैतापुर जाळून टाकिलें. परंतु पुढें त्याची प्रगति होऊं शकली नाहीं.

भांडण.

सीदी संबल आपला अधिकार सोडीत नाहीं व कामाचा हवाला आपणांस सोपून देत नाहीं अशी कासीमची तकरार दिल्लीपयत गेल्यामुळें संबल याच्या बरतर्फीचा हुकुम बादशहाकडून १६७७ च्या प्रारंभीं आला. परंतु संबलनें त्याहि हुकुमाला कित्येक दिवस धाब्यावर बसविलें. शेवटीं एकदां मुंबईस संबल आणि कासीम यांची प्रत्यक्ष मारामारी झाली व इंग्रजांच्या मध्यस्थीनें ऑक्टोबर अखेरीस संबलनें आपला अधिकार सोडिला, व एव्हांपासून सीदी कासीम आरमाराचा मुख्य बनला. या एकंदर प्रकारामुळें सीदी संबल अत्यंत नाराज होऊन आपलें कुटुंब व इष्टमित्र यांसह मराठ्यांच्या आश्रयास येऊन राहिला. सीदी संवलचा पुतण्या सीदी मिस्त्री हाहि यावेळीं मराठ्यांच्या नोकरींत शिरला. हा मिस्त्री अत्यंत पराक्रमी असल्याबद्दल याची ख्याति आहे.

फूट.

सीदी कासीमनें नोव्हेंबरमध्यें कोंकण किनाऱ्यावर फिरून लुटालूट केली व पुष्कळ ब्राह्मणांना पकडून नेऊन गुलाम बनविलें, इतकेंच नव्हे पण त्यांच्याकडून अत्यंत गलिच्छ अशीं कामें तो घेऊ लागला. सन १६७८ च्या एप्रिलमध्यें तो मुंबईस येऊन पावसाळाभर तेथेंच राहिला. इकडे ब्राह्मणांवरील अत्याचार शिवाजीस कळतांच त्यानें कासीमचीं जहाजें जाळून टाकण्यासाठीं चार हजार लोकांसह दौलतखान व दरियासारंग यांना पंनवेलीस पाठविलें. परंतु हा जुलई महिना असल्यानें पावसाच्या जोरामुळें व मराठ्यांचें आरमारहि थोडकेंच असल्यानें आणि पोर्च्युगीजांनींहि अडथळा केल्यामुळें मराठी आरमाराला रायगडास परत फिरावें लागलें. कासीमनें मात्र या वेळीं अलिबाग लुटलें.

लूट.

सन १६७८ च्या ऑक्टोबरमध्यें पूवापेक्षां उत्तम तोफा व पुष्कळ सैन्य देऊन शिवाजीनें दौलतखानास जंजीऱ्यावर मारा करण्यास पाठविलें. या वेळीं कासीमच्या लोकांचा पगार थकला असल्यानें ते सुस्तींच काम करीनात व कासीमला मुंबईस माशा मारीत बसावें लागलें होतें. मराठ्यांचीं लढाऊ जहाजें या वेळीं थोडीं वाढलीं होतीं. परंतु हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून जहाजांचा जो लहानसा आकार होता तोच अद्यापिहि कायम होता. आणि नौकायुद्धांत कसानाच्या कुशलतेपेक्षां किंवा पल्लेदार तोफांच्या माऱ्यापेक्षां नौकांच्या संख्याधिक्यावर जय अवलंबून असे. मराठी आरमारहि याच पद्धतीचें असल्यामुळें मराठ्यांचे प्रयत्न निष्फळ होत.

दौलतखान.

सन १६८० च्या फेब्रुवारीमध्यें कासीमनें पेणच्या बाजूला चांचेगिरी करून कित्येक खेडीं जाळून टाकिलीं व एक हजार लोक कैदी करून नेले. यामुळें शिवाजीनें इंग्रजांशीं तह करून, सीदी मराठी मुलुखास उपद्रव देईल तर त्याचीं जहाजें मुंबईत राहूं देऊं नयेत, असें इंग्रजांकडून कबूल करून घेतलें. परंतु हा तह शिवाजीच्या हयातीपर्यंतच टिकला. व पुढें संभाजीच्या कारकीर्दीत मराठ्यांचे जंजीरा घेण्याचे निष्फळ प्रयत्न व सीदीचा मराठी मुलुखावर जुलूम चालूच राहिला.

तह.

खांदेरी.

८ खांदेरीसाठीं इंग्रजांशीं विग्रह १६७९:—जंजीरा हस्तगत होईना तेव्हां मराठी आरमाराला राहण्यासाठीं दुसरें एकादें बंदर असणें अवश्य वाटूं लागलें. आणि शिवाजीनें खांदेरी बंदर पसंत केलें. हें बंदर दीड मैल लांब व अर्धा मैल रुंद आहे. हें बंदर खडकाळ असून मुंबईच्या दक्षिणेस ११ मैलांवर व जंजीऱ्याच्या उत्तरेस ३० मैलांवर आहे. खांदेरीला मराठे किल्ला बांधीत आहेत ही बातमी सन १६७२ च्या एप्रिलमध्यें सुरतेस सर्वतोमुखीं झाली होती. आणि खांदेरीला मराठ्यांनीं किल्ला बांधिला तर मुंबई बंदरांत येणारीं व तेथून बाहेर जाणारीं जहाजें खांदेरीवरूनच आलीं गेलीं पाहिजेत हें उघड होतें. परंतु असें होणें म्हणजे मुंबई बंदर सर्वस्वीं मराठ्यांच्या ताब्यांत जाण्यासारखें होतें व हें मुंबईच्या इंग्रज अध्यक्षाला अगदीं पसंत नव्हतें. सारांश खांदेरीच्या किल्ल्यानें सुरतेपेक्षां मुंबईसच अधिक धोका पोहोंचणार होता. परंतु किल्ल्याचें काम सावकाशीनें चालत असल्यानें सप्टेंबरमध्येंहि तें पूर्ण झालें नव्हतें. यावेळीं इंग्रज आणि सीदी या दोघांचें आरमार खांदेरीवर चालून आलें व किल्ल्याचें काम बंद करण्यास त्यांनीं सांगितलें. मराठी आरमाराचा मुख्य दौलतखान तेथें होता. परंतु हें संयुक्त आरमार चालून आलेलें पाहून तो मागें सरला व किल्ल्याचें काम तात्पुरतें बंद पडलें.

सन १६७९ च्या ऑगस्टमध्यें खांदेरीच्या किल्ल्याचें काम पुनः सुरू झालें. आणि सामानसुमानाची जमवाजमव चौल येथें करण्यांत आली. कल्याण व चौल येथील खजिन्यांतून एक लक्ष होन या किल्ल्याकडेस खर्च करावेत असें शिवाजीनें ठरविलें होतें. तारीख १५ सप्टेंबरच्या सुमारास ४ तोफा व १५० माणसें घेऊन मायनाइक भंडारी खांदेरीवर आला व त्यानें किल्ल्याच्या कामाला सुरुवात केली होती असें दिसतें. खांदेरी हें मुंबईच्या ताब्यांतील बंदर असल्यानें मराठ्यांनीं तेथें कोणतेंहि

समुद्र पुत्रांचा पराजय.

बांधकाम करतां कामा नये असें मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरानें सांगून पाठविलें. परंतु शिवाजीराजाच्या हुकुमाशिवाय आपणांस हें काम बंद करितां येणार नाहीं असा उलट जबाब त्यास मिळाला. त्यामुळें आतां आपणांस मराठी आरमाराशीं युद्ध करावें लागणार असें इंग्रजांस निश्चितपणें वाटलें. व त्याप्रमाणें या उभयतांच्या आरमाराचें पहिलें युद्ध तारीख १९ सप्टेंबर रोजीं झालें. इंग्रजांचें एक लढाऊ जहाज मराठ्यांचीं शंभर जहाजें सहज बुडवून टाकील असें इंग्रजांना आतांपर्यंत वाटत होतें. परंतु समुद्राचे पुत्र म्हणविणाऱ्या इंग्रजांचा पराजय या युद्धांत मराठी आरमारानें करून त्याला पळावयास लाविलें. फ्रान्सिस थॉर्प यानें एकदम चाल करून खांदेरीवर उतरण्याचा प्रयत्न केला. परंतु खांदेरीवरून तोफांच्या माऱ्यांत सांपडून तो, ब्रॅंडबरी व हेनरी वेल्च हे तीन युरोपियन अंमलदार मारले गेले. कित्येक जखमी झाले व जॉर्ज कोल वगैरे कित्येक जणांना मराठ्यांनीं कैद करून नेलें. इंग्रजांचें एक जहाज मराठ्यांनीं धरलें व दुसरीं दोन समुद्रांत पळून गेलीं. दुसरें दिवशीं सार्जंट गाइल्सचें जहाजहि असेंच मराठ्यांस सांपडलें. सार्जंट बिचारा भीतीनें अगदीं गंगारून गेल्यानें त्यानें मुळींच अडथळा केला नाहीं.

यानंतर एक महिन्यानें दुसरें आरमारी युद्ध झालें. ऑक्टोबरमध्यें मराठी आरमार घेऊन दौलतखान खांदेरीच्या संरक्षणासाठीं आला. इंग्रजांचें रिव्हेंज नांवाचें मुख्य लढाऊ जहाज असून त्याबरोबर इतरहि सात चांगलीं जहाजें होतीं. या जहाजांवर २०० इंग्रज शिपाई व त्याशिवाय इंग्रज खलाशी व लास्कर अनेक होते. तारीख १८ ऑक्टोबर १६७९ रोजीं सकाळींच युद्धास सुरुवात झाली व मराठा आरमारानें किनाऱ्याच्या बाजूनें चौलच्या उत्तरेकडून इंग्रज आरमारावर तोफा डागल्या व अर्ध्या तासांत एक इंग्रजी जहाज मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. बाकीचीं जहाजें पळून गेली व एकटें रिव्हेंज मात्र मराठ्यांशीं टक्कर देत भर समुद्रांत टिकून राहिलें. एकट्या रिव्हेंजनें चांगलाच पराक्रम गाजविला व मराठ्यांचीं पांच लहान जहाजें बुडविलीं. बाकीचें मराठी आरमार पळून गेलें. नोव्हेंबरच्या अखेरीस ३४ लढाऊ जहाजें घेऊन सीदी इंग्रजांच्या मदतीस आला व या दोघांनीं खांदेरीवर तोफांचा मारा पुढें बरेच दिवस चालविला.

पुनरावृत्ति.

या दुसऱ्या आरमारी युद्धांत इंग्रजांचा अंशतः विजय झाला असला तरी एकंदरीनें हा विजय त्यांना फारच महाग पडला यांत संशय नाहीं. कारण प्रत्येक वेळीं जर इंग्रज सोल्जर याप्रमाणें कमी कमी

सुविचार.

होऊं लागले तर वारंवार इंग्लंडांतून त्यांची भरती करणें अशक्य असल्यानें कांहीं दिवसांनीं आपण अगदीं क्षीण बल होऊन जाऊ व मुंबईचें सुद्धां रक्षण आपल्यानें होणार नाहीं असें त्यांस वाटलें. अशा प्रसंगीं जर शिवाजीराजा आपल्या सैन्यासह मुंबईवर चालून आला तर मग आपणांस हिंदुस्थानांत उभें राहण्यास सुद्धां जागा राहणार नाहीं अशीहि भीति त्यांना टोचूं लागली. दुसरें, पावसाळ्यांत इंग्रजी आरमार परत आपल्या ठिकाणीं जाणारच. व अशा वेळीं शिवाजी पुनः खांदेरीचा किल्ला बांधण्यास सुरुवात करील हेंहि भविष्य त्यांना दिसूं लागलें. सुरतेहून किंवा इतर कोणत्याहि ठिकाणाहून इंग्रजी शिपायांची मदत मुंबईस मिळणें शक्य नव्हतें. या एकंदर परिस्थितीचा विचार करून इंग्रजांनीं मोठ्या शहाणपणानें माघार घेऊन युद्धाची घोरपड सीदी किंवा पोर्च्युगीज यांच्या गळ्यांत अडकावून देण्याचा मनसुबा मोठ्या धूर्तपणानें निश्चित केला.

९ मुंबईकर इंग्रजांची चिंता व युक्तीः—खांदेरीजवळ इंग्रजांच्या आरमारानें मराठी जहाजांचें केलेलें नुकसान ऐकून शिवाजीराजा फार खवळून गेला व पनवेलच्या मार्गानें सन १६७९ च्या ऑक्टोबर अखेरीस त्यानें चार हजार लोक मुंबईवर पाठविले, हें ऐकून मुंबईकरांची पांचावर धारण वसली. शिवाजी मुंबईवर चालून येत आहे हें श्रवण करतांच मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नराचा तर जळफळाट झाला; परंतु शिवाजीच्या बळाची सुरतकर इंग्रजांस योग्य कल्पना असल्यानें त्यांनीं हरप्रयत्नानें लढाई टाळण्याचें ठरविलें. त्यांनीं शिवाजीस लिहून कळविलें कीं, "खांदेरीसारख्या क्षुद्र खडकावर किल्ला बांधण्यासाठीं शिवाजीसारख्या प्रतापी राजानें इतका हट्ट धरावा व मराठ्यांनीं मुंबईच्या इंग्रजांस इतका त्रास द्यावा हें राजाला अगदीं न शोभण्यासारखें कृत्य झालें आहे. वस्तुतः खांदेरी आमच्याच ताब्यांतील आहे. तथापि झाल्या गेल्या गोष्टी आपण विसरून जाऊं या. हें किरकोळ भांडण तावडतोब मिटवून टाकण्याबद्दल आम्हीं मुंवईच्या डेप्युटी गव्हर्नराला लिहून कळविलें आहे." हें सामाचें पत्र मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरास मुळींच पसंत नव्हतें. त्याच्या मनांतून, स्वराज्यांतील मुलुखावर स्वाऱ्या करून शिवाजीस जेर करावें, म्हणजे आपोआप हें भांडण थांबेल असें होतें. परंतु सुरतेच्या कौन्सिलला हा विचार अगदीं पोरकटपणाचा वाटून त्यांनीं तो मोडून काढिला व इतर हर युक्तीनें खांदेरीवर किल्ला न बांधण्याबद्दल शिवाजीचें मन वळवावें असेंच ठरविलें. यासाठीं शिवाजीशीं निराळा तह करावा किंवा सीदीला बगलेंत मारून परभारें त्याच्याकडून खांदेरीवर मारा

विचार.

गेल्या गोष्टी आपण विसरून जाऊं या. हें किरकोळ भांडण तावडतोब मिटवून टाकण्याबद्दल आम्हीं मुंवईच्या डेप्युटी गव्हर्नराला लिहून कळविलें आहे." हें सामाचें पत्र मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरास मुळींच पसंत नव्हतें. त्याच्या मनांतून, स्वराज्यांतील मुलुखावर स्वाऱ्या करून शिवाजीस जेर करावें, म्हणजे आपोआप हें भांडण थांबेल असें होतें. परंतु सुरतेच्या कौन्सिलला हा विचार अगदीं पोरकटपणाचा वाटून त्यांनीं तो मोडून काढिला व इतर हर युक्तीनें खांदेरीवर किल्ला न बांधण्याबद्दल शिवाजीचें मन वळवावें असेंच ठरविलें. यासाठीं शिवाजीशीं निराळा तह करावा किंवा सीदीला बगलेंत मारून परभारें त्याच्याकडून खांदेरीवर मारा

करवावा असा इंग्रजांनीं एक मतानें निश्चय केला. सन १६७९ च्या डिसेंबरच्या अखेरीस मराठ्यांनीं कित्येक मोठ्या तोफा, थळवर आणून ठेविल्या व तेथून उंदेरीस विश्रांतीसाठीं आणून ठेविलेल्या इंग्रजी जहाजांवर मारा चालविला.

दृढ निश्चय.

परंतु, खांदेरीवर किल्ला बांधण्याच्या विचारापासून शिवाजीला परावृत्त करावयाचे इंग्रजांचे सर्व प्रयत्न फोल ठरले, आणि जानेवारी १६८० मध्यें इंग्रजी आरमार तेथून परत फिरलें. सीदी आणि इंग्रज यांच्या दोघांच्याहि अडथळ्याला न गांठतां मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत खांदेरी शेवटपर्यंत कशी ठेविली याचें सर्वांनाच मोठें आश्चर्य वाटलें. उंदेरी बेट मात्र सीदीनें घेतलें. आणि तारीख ९ जानेवारी १६८० रोजीं १० जहाजें व तीनशें माणसें पाठवून तेथें ठाणेबंदी केली व थळ येथें असलेल्या मराठी तोफांवर मारा चालविला. हें पाहून नागोठणें नदींतून दौलतखान आरमार घेऊन उंदेरीवर चालून आला, व अचानकपणें हल्ला करून उंदेरी घेण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण सीदीच्या सावधगिरीमुळें त्यांत त्यास यश आलें नाहीं. तारीख २६ जानेवारी सन १६८० रोजीं त्यानें उंदेरीवर तीन बाजूंनीं हल्ला चढविला परंतु चार तासपर्यंत निकराची लढाई होऊन त्याला परत फिरावें लागलें. यांत मराठ्यांचीं आठ लहान मोठीं जहाजें बुडालीं व दोनशें माणसें कामास आलीं आणि १०० जखमी झालीं. त्या मानानें सीदीचें कांहींच नुकसान झालें नाहीं. उंदेरी पुढें कायमचेंच सीदीकडेस राहिलें. याप्रमाणें शिवाजीच्या आरमाराचा वृत्तांत आहे.

प्रकरण १२ वें

सापत्न बंधूंची भेट

सन १६७७–१६७८

[१ मद्रास किनारा व तेथील संपत्ति. २ वडिलोपार्जित संपत्तींत वांटा. ३ स्वारीची सिद्धता. ४ हैदराबादेस प्रयाण. ५ भेट. ६ संधि. ७ श्री शैलदर्शन. ८ वेलोरचा वेढा. ९ शेरखान लोदीशीं लढाई. १० कोलेरून नदीवर. ११ मुलाखत. १२ महाराष्ट्रांत प्रत्यागमन. १३ व्यंकोजीशीं लढाई. १४ युरोपियन व्यापारी. १५ व्यंकोजीची खरी योग्यता.]

मद्रास किनारा व तेथील संपत्तिः—इ. स. १६७४ च्या जूनमध्यें. टोलेजंग राज्याभिषेक होऊन लक्षावधि रुपयांचा दानधर्म झाल्यामुळें

कारण.

शिवाजीचा खजिना रिकामा झाला होता. त्यानंतर मराठी फौजा मुलुखगिरीसाठीं जरी भटकत होत्या तरी म्हणण्यासारखी लूट त्यांना मिळाली नाहीं. सन १६७४–१६७५ मध्यें विजापुरकर व मोगल यांच्याशीं झालेल्या युद्धांतहि खर्च फार झाला. फोंड्याला वेढा घालून तो किल्ला सर केला परंतु त्यांतहि आंतबट्ट्याचाच व्यापार झाला. सन १६७५ च्या मेमध्यें कर्नाटकावर स्वारी केली परंतु तींतहि यश आलें नाहीं. आणि सन १६७६ च्या आरंभीं स्वतः शिवाजीच आजारी पडल्यानें कांहीं दिवस सगळ्याच चळवळी बंद ठेवणें भाग पडलें.

शोध.

अशीं एकामागून एक कारणें उद्भवल्यामुळें स्वराज्याचा खजिना भरण्यास संधीच सांपडली नाहीं. परंतु हें अधिक दिवस चालणें शक्य नव्हतें. खजिना भरण्यासाठीं कोणत्या देशाकडे मोर्चा वळवावा याचा विचार शिवाजी आतां करूं लागला. दोन वेळां लुटल्यानें व जवळच रामा पुरास मराठ्यांचें कायमचें ठाणें ठेविल्यानें सुरतेची स्थिति 'रंग पिळुनि अळित जणुं देति फेंकुनी' अशी निःसत्व झाली होती. कानडी मुलुख व समुद्रकिनारा मूळचा श्रीमंत खरा, परंतु तोहि लुटून मराठ्यांनीं खंक करून टाकिला होता.

खवासखानाच्या कारकीर्दीत माजलेल्या यादवीमुळें विजापुराकडेस लक्ष देणेंहि शक्य नव्हतें. शिवाय मुख्य विजापुरावरच हल्ला केल्यास त्या इष्टापत्तीनें कदाचित् सर्व पक्ष एक होऊन राज्यांतील अंतस्थ यादवी आपोआपच नाहींशी होण्यास आपण कारणीभूत होऊ अशीहि भीति शिवाजीस वाटणें साहजिक होतें.

कर्नाटक.

विजापुरच्या राज्याची व खुद्द राजधानीची वरप्रमाणें स्थिति होती तरीहि त्यांच्या ताब्यांतील कर्नाटक प्रांत अद्यापि संपन्न व मराठ्यांच्या स्वाऱ्यांपासून अलिप्त असा राहिलेला होता. या प्रांताला त्यावेळीं सुवर्णभूमि असें म्हणत असत. इकडील जमीन अत्यंत सुपीक असून येथील लोकांची राहणी फारच साधी असल्यानें संपत्तीचा सांठा येथें चांगलाच झाला होता. इकडील समुद्रकिनाऱ्यावरील बंदरांतून फार प्राचीनकाळापासून परदेशाशीं व्यापार चालत असे आणि येथील खाणींचेंहि उत्पन्न चांगलेंच असे. सारांश द्रव्यप्राप्तीचीं इतकीं विविध साधनें येथें होतीं व द्रव्याचा व्यय मात्र कांहीं देवळें बांधण्यांत होत असे तेवढाच. बाकीची संपत्ति जमिनींत पुरून ठेविण्यांत येत असे. आणि या भूमिगत द्रव्याचा सुगावा इतरांस लागून त्यांनीं येथें येऊन किरकोळ लुटीहि केल्या होत्या. समुद्रगुप्त, चालुक्य, मलिक काफुर, मीर जुम्ला इत्यादींनीं या प्रांतांतून अगणित संपत्ति नेली होती तथापि येथें असलेल्या संपत्तीच्या मानानें या लुटी म्हणजे खंडीस नवटांकहि नव्हत्या. अशा या संपन्न प्रांताकडेस शिवाजीची दृष्टि वळली. येथील जहागिरदार स्वतंत्रच होते. त्यामुळें हा प्रांत नांवालाच विजापुरच्या ताब्यांत होता. शिवाय या प्रांतावर स्वारी करण्याला शिवाजीला एक निमित्तहि होतें, आणि तें म्हणजे भाऊबंदकी हें होय.

मादण्णा.

विजापुर दरबारांत चाललेल्या यादवीचा फायदा घेऊन कर्नाटकावर स्वारी करावी व तो प्रांत आपल्या ताब्यांत घ्यावा असें अलीकडेस गोवळकोंड्याच्या कुत्बशहालाहि वाटूं लागलें होतें. गोवळकोंड्याचा मुख्य वजीर मादन्ना हा होता. मादन्नाचा पुतण्या गोपन्ना हा मोठा वीर वैष्णव साधु म्हणून प्रसिद्ध होता. या मादन्नाच्या मनांत पुतण्याच्या इच्छेप्रमाणें कर्नाटक प्रांत मुसलमानी अंमलांतून निघून हिंदु राजाच्या ताब्यांत जावा असें फार होतें. आणि मादन्नाची ही इच्छा पूर्ण करणारा शिवाजीशिवाय दुसरा कोणीहि हिंदु राजा समर्थ नव्हता. मादन्नानें या बाबतींत मध्यस्थी करून शिवाजी आणि कुत्बशहा यांचें सख्य जुळवून आणिलें. आणि कर्नाटक जिंकण्या-

बद्दल पुढील अटी ठरविल्या. (१) शिवाजीनें कुत्बशहासाठीं आपल्या सैन्यासह कर्नाटकावर स्वारी करून तें जिंकावें; (२) या स्वारीचा खर्च व युद्धोपयोगी सामान कुत्बशहानें शिवाजीस पुरवावें आणि (३) लढाईंत मिळालेली लूट, खंडणी व म्हैसूर प्रांत हे स्वारीचा मोबदला म्हणून शिवाजीस मिळावेत. याप्रमाणें साधारणतः कच्च्या अटी ठरल्या, आणि कर्नाटकावरील स्वारीची तयारी सुरू झाली. पूव कर्नाटकावरील स्वारीचा विचार शिवाजीच्या मनांत १६७५ च्या जुलैपासून घोळत होता असें एक फ्रेंच लेखक म्हणतो.

२ वडिलोपार्जित संपत्तींत वांटा:—याप्रमाणें कर्नाटकावर स्वारी करण्याचा बेत नक्की ठरला. इतक्यांत 'साखरेचे खाई त्याला देव देई' या म्हणीप्रमाणें कर्नाटकांतील अंतस्थ बातमी शिवाजीला आपोआप मिळाली. शहाजीनें आपल्या पश्चात् रघुनाथ नारायण हणमंते याला व्यंकोजीचा पालक नेमून कर्नाटकांतील जहागीर त्याच्या स्वाधीन केली होती. पुढें व्यंकोजीला चांगलें समजूं लागल्यावर रघुनाथपंताचा वरचष्मा त्याला खपेनासा झाला. शिवाय रघुनाथपंतानें पुष्कळ वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत बराच पैसा अन्यायानें मिळविला होता, त्याचा हिशेबहि व्यंकोजी आतां मागूं लागला. याप्रमाणें आपल्या विरुद्ध वातावरण झालेलें पाहून राजीनामा देऊन रघुनाथपंत नोकरींतून मुक्त झाला व पुण्यस्थळांची यात्रा करण्यासाठीं तंजावराहून निघाला. आपली सर्व संपत्ति, कुटुंब व बंधु जनार्दन यांसहि त्यानें बरोबर घेतलें. परंतु सत्ता आणि संपत्ति यांच्यांत जन्मभर वागलेल्या रघुनाथपंतास हल्लींची अजागलस्तनासारखी स्थिति कशी मानवणार! त्यानें तंजावराहून निघाल्यावर विजापुरची यात्रा करून अदिलशहाच्या थडग्याचें प्रथम दर्शन घेतलें. रघुनाथ मोठा मुत्सद्दी असल्याची प्रसिद्धी होती. विजापुरच्या दिवाणगिरीचीं सूत्रें हातीं घेऊन पडती बादशाही सावरावी असें त्यास विजापुरी सरदारांनीं आग्रहानें विनविलें. परंतु विजापुरचें राज्य अगदींच जर्जर झालें असून त्याचा नाश जवळ आला आहे हें त्या जांबुवंत मुत्सद्याला तेव्हांच दिसलें. शिवाजीचेंहि आमंत्रण त्याला आलेंच होतें. म्हणून मुसलमानांच्या पदरीं न राहतां शिवाजीच्या पदरीं राहण्याचें निश्चित करून तो शिवाजीकडेस आला व तेथें त्याचा आदरसत्कार उत्तम प्रकारें झाला.

रघुनाथ.

मंथरा.

व्यंकोजीचा सूड उगवावा ही रघुनाथाची इच्छा तीव्र होती. त्यामुळें त्यानें शिवाजीस कर्नाटकाच्या संपत्तीची व तिकडील राज्याची अंतस्थ माहिती तपशीलवार दिली. शहाजीनें व्यंकोजीस

सोंपिलेल्या जहागिरींत शिवाजीनें कायदेशीरपणें वांटा मागावा असा मंथरेला शोभण्यासारखा सल्लाहि त्यानेंच शिवाजीस दिला. आणि शिवाजीनें जर कर्नाटकावर स्वारी केली तर आपलें तिकडेस असलेलें सव वजन खर्च करून ती स्वारी यशस्वी करून दाखवूं असेंहि रघुनाथानें सांगितलें. परंतु शिवाजीनें कर्नाटकावर जी स्वारी केली ती निव्वळ रघुनाथाच्या सांगण्यावरूनच केली असें कदापि म्हणतां येणार नाहीं. कारण शिवाजी जन्मतःच स्वतंत्र विचाराचा कर्तृत्वशाली पुरुष होता.

३ स्वारीची सिद्धता:—कर्नाटकाच्या स्वारीच्या वेळीं सभोंवतालची परिस्थिति मोठी अनुकूळ अशी जुळून आली होती. किंबहुना अशी अनुकूळ परिस्थिति पाहूनच शिवाजीनें स्वारीचा बेत नक्की केला असावा. औरंगजेब बादशहा पंजाबांत दोन वर्षें राहून तारीख २७ मार्च १६७६ रोजींच दिल्लीस परत आला होता. तथापि वायव्य सरहद्दीवरील दंगे चालूच असल्यानें बादशाही उत्तम लढाऊ फौज तिकडेच गुंतून राहिली होती. विजापुरास अफगाण सरदार बहलोलखान यानें, बालराजा शिकंदर याला तारीख ११ नोव्हेंबर १६७५ रोजीं आपल्या ताब्यांत घेऊन, तारीख १८ जानेवारी १६७६ रोजीं खवासखान याचा खून केला. परंतु बहलोलखानाचा ओढा अफगाण लोकांकडेस दिसून येतांच दक्षिणी आणि अबिसीनियन हे एक होऊन बहलोलखानास विरोध करूं लागले. खिजरखान नांवाचा एक सरदार मोठा हुषार व बहलोलखानाच्या अत्यंत विश्वासांतील होता. दक्षिणी मंडळींनीं त्याचा खून केला. त्यामुळें विजापुरच्या राज्यांत अफगाण व दक्षिणी यांच्यांत सन १६७६ च्या फेब्रुवारींत यादवी सुरू झाली. याच सुमारास मोगल सुभेदार बहादुरखान याशीं बहलोलखानाचें वांकडें आलें. त्यामुळें बहादुरखानानें मराठ्यांचा पक्ष घेऊन विजापुरावर स्वारी केली. या स्वारीची धामधुम पुढें एक वर्ष चालू होती. सारांश अदिलशाही राज्यांत अशी बेबंदशाही माजून राहिल्यामुळें या वेळीं शिवाजीचा प्रतिकार करण्यास ती अगदींच असमर्थ होती.

परिस्थिति.

बहादुरखान.

येऊन जाऊन बहादुरखानाकडून काय तो शिवाजीस अडथळा व्हावयाचा, परंतु एका अतर्क्य राजकारणामुळें शिवाजीनें त्याला अगदीं चीत करून टाकिलें. गेलीं दोन वर्षें त्याच्या लढाया शिवाजीशीं सारख्या चालू होत्या. त्यांतील जयापजयाची संख्या सारखीच असल्यानें या अखंड युद्धाला तो अगदीं कंटाळून गेला होता, व शिवाजीशीं मत्रीचें बोलणेंहि त्यानें सुरू केलें होतें. बादशहाकडून सहा हजाराची मनसब संभाजीच्या नांवें करून देऊन

शिवाजी आणि आरंगजेब यांच्यांत तह घडवून आणण्याचा प्रयत्न १६७५ च्या जूनपासून बहादुरशहा करीत होता, आणि १६७६ च्या मे मध्यें विजापुरावर स्वारी करण्याचें जेव्हां त्यानें ठरविलें तेव्हां शिवाजीकडून आपणांस हरकत होऊं नये म्हणून या तहाची त्याला अधिक आवश्यकता भासूं लागली. इकडे शिवाजीलाहि मोगलांच्या मैत्रीची अशीच जरूरी भासूं लागली होती. कारण ही कर्नाटकची मोहीम सरासरी वर्षभर चालणार असल्यानें शिवाजी तिकडेच गुतून राहणार होता. आणि आपल्या गैरहजिरींत मोगलांनीं स्वराज्याला पीडा देऊ नये, अशी त्याची इच्छा असणें सहाजिकच होतें. याप्रमाणें दोनहि पक्ष तहाविषयीं आतुर झाल्यावर तह घडून येण्याला किती उशीर लागणार होता ! शिवाजीनें आपला सर न्याया-धीश निराजी रावजी याजबरोबर किंमती नजराणे देऊन त्याला बहादुरखानाकडे पाठविलें. " (बहादुरखानासी) अंतरंगें सख्य (करून) एक वर्षपर्यंत आपणांस कर्नाटक साधावयास लागेल. तुम्हीं राज्यास उपद्रव न करणें असें सांगोन ठायीं ठेविलें.* " आणि बहादुरखानाला बरीचशी लांचहि दिली व खंडणीदाखल कांहीं रक्कम प्रसिद्धपणें देऊन तह घडवून आणिला.

याप्रमाणें राज्याची सुरक्षितता केल्यावर स्वारीची सिद्धता सुरू झाली. दहा वर्षांवर नेताजी पालकर मोगलांकडेस गेला असून बाटून मुसलमानहि झाला होता. आणि गेलीं दहा वर्षें त्यानें मोगलांच्या झेंड्याखालीं अफगाणिस्थानांत व इतर ठिकाणींहि बऱ्याच लढाया मारिल्या होत्या. जून १६७६ मध्यें तो महाराष्ट्रांत परत आला. ता. १९ जून १६७६ रोजीं त्याजकडून प्रायश्चित्त करवून त्यास हिंदुधर्मांत परत घेण्यांत आलें. प्रस्तुतच्या कर्नाटकाच्या स्वारींत नेताजी हजर होता. परंतु बखरकार त्याचा उल्लख करीत नाहींत. " मोरो त्रिंबक पेशवे आणि अनाजी दत्तो सुरनीस व वाक्‌नीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविलें.* " अनाजी दत्तोला पायदळ व फौज देऊन कोंकणपट्टीचें रक्षण करण्यास सांगितलें.

नेताजी.

" कनाटक साधावयास द्रव्य लागेल त्यास खजिन्यांतील द्रव्य वेंचूं नये, नूतन मिळवावें. आणि वेंच करून देश साधावा. असा विचार करितां भागानगरचें पातशाही द्रव्य उदंड आहे. तेथें निष्ठुरता करून द्रव्य मेळवावें तरी वर्षास (एक लक्ष होनांचा) करभार

द्रव्य.

---

* सभासद.

भागानगरकर देतात. तेथें निष्ठुरता करू नये. सख्य करून त्यांची भेट घ्यावी. भेटीनंतर सर्वहि अनुकूल करून देतील असा विचार करून भागानगरी प्रल्हाद निराजी हेजीब राजियाचे होते त्यासी हें वर्तमान लिहून भेट घ्यावी असा विचार केला*. " गोवळकोंड्याचा पादशहा अबूलहसन कुत्वशहा याच्याशीं त्याचा सर्वाधिकारी वजीर मादन्नापंडित याच्या मार्फतीनें शिवाजीनें सूत्र लावून ठेविलेंच होतें; त्यामुळें पुढील बार उडविण्यांत मुळींच हरकत आली नाहीं.

तानाशा.

४ हैदराबादेस प्रयाणः—" तानाशाहा पादशहा भागानगरकर यांनीं मनांत बहुत शंका धरिली कीं, 'जैसा अफजलखान बुडविला, कीं शास्ताखान बुडविला, दिल्लीस जाऊन आलमगीर पातशाहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जहाला तर काय करावें ? भेट मात्र राजियाची न घ्यावी. जें मागतील तें देऊं.' असें बोलिला. मग पातशहाशीं व अकण्णापंत व मादण्णापंत कारभारी यांशीं प्रल्हादपंतें आण, शपथ, क्रिया बहुत दिधल्या. अपाय नाहीं. स्नेहाची भट घेऊन जातील, अशी बळकटी केली.*"

हैदराबाद.

इतकें वचन प्रमाण झाल्यावर कुत्वशहानें भेटीस संमति दिली व सन १६७७ च्या जानेवारींत शिवाजी भागानगरास जाण्यास निघाला. " भागानगरची विलायत लागल्यावर (शिवाजीनें सर्व फौजेस) ताकीद केली कीं, एक काडी रयतेची तसनस न व्हावी, ऐसें केलें. कित्येक (लोकांनीं आरंभीं हा हुकुम न मानितां कांहीं लूट केली त्यांच्या) गर्दना मारून जाबता बसविला. आणि मजलीस जाऊन तेथें खुष–खरेदी सव पदार्थ घेऊन चालिले. लूट नाहीं. *" यावेळीं शिवाजीबरोबर पन्नास हजार फौज होती. पण ती सर्वहि वरील हुकुमानें अगदीं शिस्तीनें वर्तू लागली.

आदर.

सन १६७७ च्या फेब्रुवारीच्या आरंभींच शिवाजीची स्वारी हैदराबादेस पोंचली. " पातशहास खबर कळून बहुत संतुष्ट जाहला. पातशहा पुढें दोन चार गांव सामोरें यावें असें केलें. राजा मोठा साधक, आण घालून पातशहास सांगून पाठविलें कीं, 'तुम्हीं न येणें, आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ. आपण पुढें न यावें. ' असें सांगून पाठविल्यावरी पातशहा बहुत संतुष्ट जहाले. आणि मादंणापंत व अकंणापंत (व शहरांतील प्रतिष्ठित

---

* सभासद.

नागरिक इतके सामोरे जाऊन) राजियास घेऊन शहरास गेले. पातशहांनीं कुल-नगर शृंगारिलें. चौफेर बिदीस कुंकुम–केशराचें सडे रंगमाळा घातल्या. गुडिया 'तोरणें पताका निशाणें नगरांत लाविलीं. नगर-नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारींनीं मंगळ आरत्या अगणित उजळून राजियास वंदिलें. सोनें रुपियाचीं फुलें राजियावरी उधळलीं.''*

पोषाख.

हा आदरसत्कार पाहून मराठी सैन्यालाहि फार आनंद झाला. या प्रसंगीं मराठा सैनिकांचा नेहमींचा साधा पोषाख नसून त्यांनीं उत्तम पोषाख केलेला होता. शिवाजीनें आपल्या सरदारांस मोत्यांचे तुरे, गोफ व नवीन चिलखतें वांटिलीं होतीं. त्यायोगें सगळी मराठी सेना फारच खुलून दिसत होती.

मराठी सैन .

पातशहाच्या भेटीसाठीं जो उत्तम मुहूर्त नक्की केला होता, त्या सुमारास पन्नास हजार फौजेसह शिवाजीराजानें नगरींत प्रवेश केला. ज्या मराठी सैन्यानें दिल्लीपतीस दहशत बसविली व दक्षिणेंतील पातशाहांना जजर केलें, ज्यानें मोगली सरदार व विजापुरी दरबार या दोघांनाहि हताश केलें तें मराठी सैन्य कुत्बशहाची प्रजा सभय अंतःकरणानें परंतु उत्सुक मनोवृत्तींनीं पाहूं लागली. ज्या मराठी सैन्यानें उत्तरेस दिल्लीपर्यंतचा मुलुख हादरून सोडिला व दक्षिणेस विजापुरापर्यंत स्वाऱ्या केल्या तें सैन्य या वेळीं शहरांतून मिरवत चाललें होतें. ज्या मावळ्यांनीं आपल्या तरवारीचें पाणी मोठमोठ्या मी मी ह्मणविणारांसहि चाखवून नामोहरम केलें, व ज्यांच्या भयंकर माऱ्यापुढें एकहि किल्ला सुरक्षित राहूं शकला नाहीं आणि ज्यांच्या शौर्याचे पोवाडे सर्वत्र गाइले जात होते ते शूर मावळे नगरींतून 'आस्ते कदम' चालत होते. विचारपूर्वक हल्ला करण्यांत कुशल असा सेनापति हंबीरराव मोहिते, त्याच्या खालोखाल आनंदराव व मानाजी मोरे हे दोन योद्धे, प्रति भीम व प्रसंगीं हत्तीशींहि झुंज खेळणारे असे सूर्याजी मालुसरे व एसाजी* कंक हे दोन मावळे सरदार, द्वाररक्षक सोनाजी नायक, राजसंरक्षकांचा सरदार बाबाजी ढमढेरे या वीर पुरुषांना जनता जरी प्रत्यक्ष ओळखीत नसली तरी यांच्या शौर्यामुळें यांचीं नांवें सर्वतोमुखीं झालीं असून हे योद्धेहि या वेळीं शिवाजीबरोबर होते. आतांपर्यंत तंजावरचे अनभिषिक्त राजेच म्हणून प्रसिद्ध असलेले रघुनाथ नारायण व जनादन नारायण हणमंते, हैदराबादचा

---

* एसा निकम असें नाव असावें असें एक मित्र सुचवितात.

शिवाजीचा वकील प्रल्हाद निराजी, शिवाजीचा वाकेनिवीस दत्ताजी त्र्यंबक, केशवपंत, निळो मोरेश्वर व गंगाधरपंत हे दोघे मुजुमदार इत्यादि ब्राह्मण मुत्सद्दीहि या धारकऱ्यांच्या संमर्दामध्यें विस्तीर्ण आकाशांतील सजल मेघाप्रमाणें शोभत होते. याच मुत्सद्यांच्या राजकार्यकुशलतेमुळें मावळ्यांच्या विजयाला स्थैर्य प्राप्त झालें होतें हें जनता पूर्णपणें जाणत होती. यांच्या विशाल भुंवया व तीक्ष्ण परंतु वयोमानपरत्वें निस्तेज झालेले नेत्र त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष भरीत होते व त्यांच्या मस्तकावरील चंदन तिलक यांचें ब्राह्मण्य दर्शवीत होता. त्यामुळें हे संख्येनें थोडे होते तरी जनतेचें लक्ष आपल्याकडेस हटकून वेधून घेत होते. मुद्रारक्षक श्यामजी नाईक पुंडे याचाहि उल्लेख येथेंच करणें अवश्य आहे. कारण हाहि महत्त्वाची कामगिरी करणारा शिवाजीचा ब्राह्मण सेवक प्रसिद्ध होता. फारसी भाषाविशारद मुनशी नीलप्रभु व ज्याला शिवाजी सतत आपल्या सन्निध ठेवीत असे तो लेखकरत्न बाळाजी आवजी हे कायस्थ याच समुदायांत मेघमालेंतील विद्युल्लतेप्रमाणें चमकत होते. यांची अत्यंत साधी राहणी व प्रयत्नपूर्वक स्वीकारिलेली मूकवृत्ति जनतेच्या लक्षांत आल्याशिवाय राहत नव्हती.

सैनिक, मावळे, सरनौबत, सरदार, भीमपराक्रमी वीर, ब्राह्मण मुत्सद्दी, कायस्थ लेखक हे आपआपल्यापरी जनतेच्या विस्मयाला कारणीभूत झाले होतेच परंतु या सर्वांचा सूत्रधार व आत्मा राजा शिवाजी याच्या विषयीं जनपदाचें कुतूहल अवर्णनीय होतें. तेजस्वी मंत्रीमंडळ व पराक्रमी सेनापति यांच्या कड्यामध्यें श्रीरामचंद्राप्रमाणें शिवाजी राजाची प्रभावती अशी ठेंगणी मूर्ति घोड्यावर आरूढ झालेली होती. नुकताच आजारांतून उठल्यामुळें राजा शरीरानें कृश झाला होता व तीनशें मैलांच्या प्रवासानें त्याच्या चेहऱ्यावर मलिनत्व व म्लानत्व आलें होतें; तथापि त्याचा भेदक व तेजस्वी दृष्टिक्षेप सगळीकडे न्याहाळून पाहत होता आणि मधून मधून त्याच्या लंबगोल चेहऱ्यावर स्मित विलसत होतें. 'लहान मूर्ति पण थोर कीर्ति' अशा छत्रपतीला पाहतांच नागरिकांनीं एकदम त्याच्या नांवाचा जयजयकार केला आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या घरांच्या सज्ज्यांतून त्याच्यावर सोन्या-रुप्यांची पुष्पवृष्टी झाली. सुवासिनी वारंवार पुढें येऊन मंगलारत्या ओवाळूं लागल्या व स्तुतिपर गीतें म्हणूं लागल्या. यावेळीं शिवाजीराजानेंहि सोन्यारुप्यांच्या नाण्यांचा जनसमुदायावर पाऊस पाडिला, आणि महाजनांस किंमती पोषाख अर्पण केले.

आत्मा.

राजा शिवाजी याच्या विषयीं जनपदाचें कुतूहल अवर्णनीय होतें. तेजस्वी मंत्रीमंडळ व पराक्रमी सेनापति यांच्या कड्यामध्यें श्रीरामचंद्राप्रमाणें शिवाजी राजाची प्रभावती अशी ठेंगणी मूर्ति घोड्यावर आरूढ झालेली होती. नुकताच आजारांतून उठल्यामुळें राजा शरीरानें कृश झाला होता व तीनशें मैलांच्या प्रवासानें त्याच्या चेहऱ्यावर मलिनत्व व म्लानत्व आलें होतें; तथापि त्याचा भेदक व तेजस्वी दृष्टिक्षेप सगळीकडे न्याहाळून पाहत होता आणि मधून मधून त्याच्या लंबगोल चेहऱ्यावर स्मित विलसत होतें. 'लहान मूर्ति पण थोर कीर्ति' अशा छत्रपतीला पाहतांच नागरिकांनीं एकदम त्याच्या नांवाचा जयजयकार केला आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या घरांच्या सज्ज्यांतून त्याच्यावर सोन्या-रुप्यांची पुष्पवृष्टी झाली. सुवासिनी वारंवार पुढें येऊन मंगलारत्या ओवाळूं लागल्या व स्तुतिपर गीतें म्हणूं लागल्या. यावेळीं शिवाजीराजानेंहि सोन्यारुप्यांच्या नाण्यांचा जनसमुदायावर पाऊस पाडिला, आणि महाजनांस किंमती पोषाख अर्पण केले.

राजस्त्रिया.

५ भेटः—याप्रमाणें शिवाजीची स्वारी मिरवीत मिरवीत दाद-महाल ऊर्फ न्यायमंदिरांत येऊन दाखल झाली. तेथें मुख्य दरवाजापुढें सव सैन्य व्यवस्थेनें उभ राहिलें, व फक्त पांच सरदार बरोबर घेऊन शिवाजी न्यायमंदिराचा जिना चढून ज्या दिवाणखान्यांत कुत्बशहा शिवाजीची वाट पाहत बसला होता, तेथें गेला. सुलतान पुढें येऊन शिवाजीस क्षेमालिंगनपूर्वक भेटला व उभयतां एकासनीं बसले. दिवाण मादण्णा यासहि बसण्याचा हुकुम झाला. बाकी सगळे उभेच होते. उभयतांचें बोलणें जालें. 'पातशहाच्या स्त्रिया झरोकियांतून (शिवाजी) राजा पाहून बहुत थक्क जहाल्या.'

पराक्रम.

एक प्रहरपर्यंत शिवाजी व कुत्बशहा एकेठिकाणीं गोष्टी सांगत बसले होते. आरंभीं सलाम—रामराम व प्रकृतीविषयीं विचारपूस झाल्यावर कुत्बशहा पादशहा अबुलहसन यानें शिवाजीच्या आजपर्यंतच्या पराक्रमाच्या गोष्टी श्रवण करण्याची इच्छा दर्शविल्यावरून त्या त्याला क्रमशः कथन करण्यांत आल्या. रावणासारख्या गर्विष्ठ अफजलखानाशीं समोरासमोर लढून एकट्यानें त्याचा केलेला वध, शास्ताखानावरील रात्रीचा हल्ला, भर दरबारांत औरंगजेबाविषयीं व्यक्त केलेला संताप, आग्र्याच्या कैदेंतून कल्पनातीत युक्तीनें करून घेतलेली सुटका, सुरतेची लूट, अनेक डोंगरी किल्लयांवरील लढाया यांचीं अद्भुत वर्णनें ऐकून कुत्बशहा तर अगदीं आश्चर्यचकित होऊन गेला. या बादशहाचा सगळा जन्म जनानखान्यांतील नाचरंगांत गेलेला असून त्यानें चित्रांतच फक्त तलवार पाहिलेली होती आणि सुरतयुद्धाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि युद्धासाठीं कधींहि शय्यागराहून इतर रणभूमीवर त्यानें स्वप्नांतसुद्धां प्रवेश केला नव्हता. त्यामुळें शिवाजीराजाच्या पराक्रमाच्या कथांनीं तो अगदीं स्तिमित होऊन गेला. शेवटीं या सर्व पाहुण्यांस रत्नजडित अलंकार, घोडे, हत्ती, पोषाख वगैरे देऊन पानसुपारी व अत्तरगुलाब दिल्यानंतर त्या दिवसाचा दरबार बरखास्त करण्यांत आला. बादशहानें शिवाजीस जिन्यापर्यंत येऊन पोंचविलें.

आश्चर्य.

" महालाखालीं रघुनाथपंत व हंबीरराव वरकड सरदार लष्कर ठेविलें होतें, त्यांसहि समागमें घेऊन आपले जागियास आले. मार्गीं येतां नगरलोकांस खैरात केली. राजे उठोन गेलियावरी पातशहाचें समाधान झालें कीं, राजा प्रामाणिक, आपल्यास रक्षिलें. क्रिया जतन केली. ऐसें आश्चर्य मानून प्रल्हादपंतास कित्येक बक्षिसें पातशहांनीं दिलीं कीं, तुम्हीं प्रामाणिक."

"दुसरे दिवशीं मादंणापंतांनीं राजियास आपले घरास मेहमानीस नेलें. आणि आपले मातुश्रीचे हातीं पाक सिद्ध करून मादंणापंत व अकंणापंत जवळ बसून राजियास भोजन घातलें. वरकड राजियाकडील समुदाय होता त्यांसहि भोजनास घातलें. आणि अलंकार, वस्त्रें, हत्ती, घोडीं देऊन स्थळास पोहोंचविलें.* "

मेहमानी.

६ संधिः—यानंतर मुख्य मुद्यासंबंधानें बोलण्यास सुरुवात झाली. शिवाजीचे वैयक्तिक सद्गुण, चारित्र्य, तेजस्विता, त्याच्या फौजेचें बळ व शिस्त इत्यादिकांमुळें अबुल्हसन पादशहा तर अगदीं मंत्रमूढ सर्पाप्रमाणें भारून गेला व शिवाजीराजास काय पाहिजे तें द्या असा त्यानें आपला दिवाण मादंणा यास एकसहा आज्ञा देऊन ठेविली. वाटाघाटीनंतर आगामी स्वारीसंबधीं पुढीलप्रमाणें करार मदार ठरले.

अटी.

१ सुलतान अबुल्हसन यानें शिवाजीराजास स्वारीखर्चास म्हणून रोजीं तीन हजार होन किंवा दरमहा सव्वाचार लक्ष रुपये द्यावे. व ही रक्कम अगाऊ तसलमात म्हणून द्यावी.

२ एक हजार स्वार व चार हजार पायदळ मिळून पांच हजार फौज सरलष्कर मिर्जा महंमद याच्या हाताखालीं कर्नाटकच्या स्वारीपुरती शिवाजीराजाच्या मदतीसाठीं पाठवावी.

३ दारूगोळ्यासह तोफखाना शिवाजीराजास पुरवावा.

याच्या मोबदल्यांत

१ कर्नाटकांतील जेवढा प्रदेश मराठे जिंकतील त्यांपैकीं मूळचा शहाजीचा असलेला प्रदेश शिवाजीकडेस राहून बाकीचा सुलतानास द्यावयाचा.

याशिवाय मोगलांचा उपसर्ग गोवळकोंड्यास पोंचूं नये एवढ्यासाठीं पूर्वी केलेला बंदोबस्त अधिक बळकट असा शिवाजीनें करून सुलतानाच्या संरक्षणाची हमी घेतली. कुत्बशहानेंहि एक लक्ष होनांची खडणी पूर्वीप्रमाणेंच दरसाल पुढेंहि देण्याचें कबूल करून मराठ्यांचा वकील हैदराबादेस ठेविण्याचें मान्य केलें. याप्रमाणें शपथपूर्वक सव अटी उभयपक्षीं ठरून कर्नाटकच्या स्वारीची सिद्धता झाली.

---

* संमासद.

वरील करार अंतस्थपणें ठरत असतां प्रसिद्धपणें पाहुण्यांचा पाहुणचार,

देणगी.

मेजवान्या वगैरेंच्या रूपानें चालूच होता. " सुमुहूर्त पाहून मागती राजे भेटीस आणिले. कुल् सरकारकुन व हंबीरराव वरकड सरदार यांचे मुजरे महालावरी उभयतां छत्रपति बैसून, घेऊन, सरदारांचे पराक्रम नांव पाहून सर्वांस अलंकार वस्त्रें हत्ती, घोडे, मनुष्य पाहून दिधले. * " ज्या घोड्यावर राजा बसत असे त्या घोड्याच्या गळ्यांतहि कुत्बशहानें एक रत्नमाला घालून देणगीची सीमा केली.

तिसरे दिवशीं शहरांतील महाजनांनीं शिवाजी राजास थाटाची मेजवानी दिली.

हत्ती.

भोजनोत्तर गप्पा गोष्टी चालत असतां ' तुमच्याजवळ किती हत्ती आहेत ' असें सुलतानानें राजास विचारिलें. प्रत्येक मावळा हत्तीसारखा पराक्रमी असल्यानें ' जितके मावळे आपल्या फौजेंत असतील तितके हत्ती ' आपल्याजवळ आहेत असें राजानें उत्तर दिलें. यावर सुलतानाच्या खऱ्या हत्तीशीं राजाच्या मावळ्याची कुस्ती ठरली. हत्तीशीं लढण्यास येसाजी कंक सिद्ध झाला. या द्वंद्वानें सुलतानाचें मनोरंजन होऊन मावळ्यांचा पराक्रम जगास दिसेल व त्यायोगें आपला वचक वाढेल असाहि राजाचा हेतु होता. हातांत नगी समशेर घेऊन येसाजी कंक मैदानांत आला. त्यावर मदोन्मत्त हत्ती दुसरीकडून सोडण्यांत आला. कांहीं वेळ हत्तीस हुलकावण्या दाखविल्यावर लाग साधून येसाजीनें इतक्या सफाईनें तलवारीचा हात चालविला कीं त्यासरशीं हत्तीची सोंड तुटून खालीं पडली, व तो पर्वतप्राय प्राणी चीं चीं करीत मदानांतून पळून गेला.

याप्रमाणें मुख्य कार्याचें संधान राखून नाचरंगाच्या करमणुकींत शिवाजीनें

उपसंहार.

एक महिना हैदराबादेस घालविला, व तितक्या अवधींत सुलतानाकडून द्रव्य, फौज, तोफा व दारूगोळा घेऊन

७ श्रीशैलदर्शन:—हैदरावादेचा प्रवास वरप्रमाणें यशस्वी झाल्यावर सन

तीर्थें.

१६७७ च्या मार्चमध्यें शिवाजी तेथून पुढें जाण्यास निघाला. कृष्णेच्या कांठा कांठानें दक्षिणेस जाऊन त्यानें कनूलपासून पांच लक्ष होनांची खडणी वसूल केली. पुढें निवृत्तिसंगमावर स्वारी गेली. येथेंच भवनाशी नदी कृष्णेस मिळते. हें स्थान अत्यंत पवित्र क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

---

* सभासद.

तेथून चक्रतीर्थावर ही सेना गेली. दोनहि ठिकाणीं शिवाजीनें अवश्य ते क्षेत्रविधी यथासांग केले. 'तेथून अनंतपुरीं कुल लष्कर ठेवून गायमुखापासून पर्वत वेंघावा भीमकुंड उतरचढ मिळोन तीन कोस (प्रवास होतो तो करून) दो दिवसां श्रीशैल्यास राजे गेले.*'

श्रीमल्लिकार्जुन.

हें मंदिर कर्नूलपासून खालीं ७० मैलांवर नल्लमाल जंगलामध्यें समुद्र सपाटी-पासून १६०० फूट उंच पठारावर वसलेलें आहे. येथेंच खालीं कृष्णानदी पूर्वसमुद्रास मिळण्यास वळसा घेऊन वहात जाते. यात्रेकरूला कैलासद्वारांतून या पठारावर प्रवेश करावा लागतो. श्रीशैल्य मल्लिकार्जुनाचें देवालय फारच भव्य असून त्याच्या भोंवती वीस पंचवीस फूट उंचीच्या जाड भिंती घातलेल्या आहेत. जाड करड्या रंगाचे भिंतीचे चौकोनी दगड प्राचीन शिल्पकलेची साक्ष पटवितात. दगडावर हत्ती, घोडे, वाघ, शिकारी, योद्धे व योगी आणि दशावतार अशीं नानाविध चित्रें कोरलेलीं आहेत. या भिंतीच्या आंत मध्यभागीं मल्लिकार्जुनाचें चतुष्कोनी मंदिर आहे. श्रीशैल्य हें द्वादश ज्योति-र्लिंगापैकीं एक आहे व याच्या भिंती व छप्पर सुद्धां तांब्याच्या पत्र्यावर सोन्याचें पाणी देऊन त्यानें मढवून काढिलेलें आहे. पातालगंगा व नीलगंगा हीं पुण्यतीर्थें येथून खालीं जवळच आहेत. "नीळगंगेचें स्नान करून (राजानें) श्रीचें दर्शन घेतलें. तीथविधि झाला. राजियांनीं स्थळ देखोन परम आनंद झाला कीं, केवळ कैलास दुसरें, असें स्थळ वाटलें. तेथें हा देह श्रीस अर्पण करावा, शिरकमल वहावें ऐसें योजिलें.†" हें पाहून जवळच्या मंडळींनीं "नानाप्रकारें शास्त्रांतील पुराणां-तील (आधार) सांगोन नववे दिवशीं सावध केले†" व शिरकमल वाहण्याचा बेत रहित करविला. "नीलगंगेस संध्यामठ चिरेबंदी बांधविला" श्रीगणेश नांवाचा घाट व धर्मशाळाहि बांधिली. "धर्म बहुत केला. ब्राह्मण भोजन करून यात्रा सांग झाली. लक्ष ब्राह्मणांचा संकल्प करविला त्या उपर मजल दरमजल चंदी प्रांतास गेले.*"

८ वेलोरचा नासिर.

वेढाः—एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत मल्लिकार्जुनाहून शिवाजी निघाला व अनंतपुर येथून आपलें सैन्य बरोबर घेऊन दक्षिणेकडेस नंदियाल, कडाप्पा यांवरून तिरुपतीला गेला. तेथून पूर्वकिनाऱ्यावर उतरून कलहस्तीमधून मेच्या पहिल्या आठवड्यांत

शि- १४ * ९१ कलमीं. † सभासद.

मद्रासच्या पश्चिमेस सात मैलांवर पेडापोलम् येथें जाऊन पोहोंचला. तेथें कांहीं दिवस राहून तो नर्ऋत्येकडेस वळला व पांच हजार घोडदळ त्यानें तारीख ९ मे रोजीं कांजीवरम्वरून जिंजीकडेस पाठवून दिलें. या वेळीं जिंजीवर विजापुरकरांच्या तर्फे नासिर महंमदखान हा किल्लेदार होता. मराठी फौजेच्या सरदारानें त्याच्याशी बोलणें लावून पन्नास हजार रुपयांची जहागीर त्यास देण्याचें कबूल करून जिंजी किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. हा प्रकार तारीख १३ मेच्या सुमारास झाला. हा पहिला वार इतक्या यशस्वितेनें उडालेला ऐकतांच शिवाजी स्वतः धांवत जिंजीवर आला व त्यानें किल्ला गोवळकोंड्याच्या ताब्यांत न देतां स्वतःच्याच ताब्यांत ठेविला. परंतु याचा परिणाम नासिर महंमदखानास भोगावा लागून त्याला जहागीर वगैरे कांहीं न मिळतां शेष आयुष्य दुःखांत काढावें लागलें, व तो पुढें लवकरच निवर्तला.

जिंजीची तटबंदी.

जिंजी ताब्यांत घेतल्यावर तेथील बंदोबस्त शिवाजीनें उत्तम प्रकारें केला. तेथें, " रायाजी नलगे हवालदार ठेविले. तिमाजी केशव सबनीवीस ठेविले. इमारतीवर रुद्राजी साळवी ठेविले. विठ्ठल पिलदेव अत्रे गराडकर सुभेदार महालचे ठेविले. याप्रकारें जिंजीभोंवती नवीन कोट घातला, खंदक खणला व बुरूज चंदी घेतली.* " बांधिले. आणि हीं बांधकामें फारच मजबूद अशीं करण्यांत आलीं.

वेल्लूर.

जिंजीहून मागें वळून शिवाजी वेल्लूरवर चालून गेला व तारीख २३ मे रोजीं तेथें जाऊन पोहोंचला. वेल्लूर येथें अबदुल्लाखान हा विजापुरकरांचा अबिसीनियन किल्लेदार होता. हा मोठा इमानी असल्यानें त्यानें वेल्लूर किल्ला चौदा महिने लढविला. हा किल्ला मूळचाच फार मजबूत व अभेद्य असा होता. याच्या भोंवतालीं खोल खंदक असून त्यांत नेहमीं मगर वावरत असत. " तो (वेल्लूरचा) कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांत जीत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाहीं. उदकांत दहाहजार सुसरी. कोटाचे फांजियावरून दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुदी. पडकोटें तरी चारचार फेरीयावरी फेरे. ये जातीचा कोट.† " या कोटाला मराठ्यांनीं वेढा घातला. अशा मजबूत किल्ल्याला वेढा घालून तो सर करण्यासाठीं लागणारी सामग्री पुरेशी नसल्यामुळें हा वेढा फारच रेंगाळणार असें दिसून आल्यामुळें दोन हजार स्वार व पांच हजार पायदळ इतकें सैन्य नरहरि रुद्र याचे हाताखालीं

---

* ९१ कलमीं. † सभासद.

ठेवून स्वतः शिवाजी तारीख २० जून १६७७ च्या सुमारास शेरखान लोदीशीं लढण्यास निघून गेला. वेलोर किल्ला पुढें तारीख २१ ऑगस्ट सन १६७८ रोजीं मराठ्यांच्या स्वाधीन झाला.

९ शेरखान लोदीशीं लढाई:—शेरखान लोदी हा वालिगंडापुरम् येथें राहून विजापुरी कर्नाटकाच्या अर्ध्या दक्षिण भागावर सत्ता चालवीत असे. स्वभावतः तो शांत प्रकृतीचा असल्यामुळें कलहप्रिय असा मुळींच नव्हता. त्याच्या ब्राह्मण मंत्रीमंडळानें शिवाजीच्या बळाची त्याला अगदीं चुकीची माहिती देऊन तोच शिवाजीपेक्षां अधिक बलाढय आहे अशी त्याची समजूत करून दिली. त्याचा मुलगा इब्राहिमखान यानेंहि मंत्रीमंडळाच्याच म्हणण्याला दुजोरा दिला. यामुळें शेरखान शेवटपर्यंत भ्रमांतच राहिला व फ्रान्सिस मार्टिन हा फ्रेंच इसम जरी त्याला शिवाजीच्या सैन्याची योग्य कल्पना करून देत होता तरीहि त्यानें तिकडेस दुर्लक्ष्यच केलें.

शेरखान.

मराठ्यांशीं सामना देण्यासाठीं चार हजार स्वार व तीन चार हजार पायदळ घेऊन शेरखान तारीख १० जून रोजीं कुडलोरच्या पश्चिमेस तेरा मलांवर तिरुवाडी येथें येऊन वाट पहात बसला. तारीख २६ जून रोजीं शिवाजी सहा हजार घोडेस्वारांसह तेथें येऊन दाखल झाला. हें मराठी सैन्य दृष्टीस पडतांच शेरखानानें आपलें सैन्य लढाईच्या तयारीनें उभें करून त्याला मराठ्यावर चाल करून जाण्याचा हुकुम केला. युद्ध-शास्त्राच्या दृष्टीनें शेरखानाच्या सैन्याच्या हालचाली अगदीं चुकीच्या असल्यानें मराठी सेना त्या स्वस्थपणें पाहत उभी राहिली. आपल्या फौजेच्या इतक्या हाल-चाली होत असून मराठी सैन्य जागचें जागींच स्थिर उभें आहे हें पाहतांच झालेली चुकी शेरखानाच्या लक्षांत आली व त्यानें मराठ्यांवर चाल करून जात असलेल्या आपल्या फौजेस एकदम मागें परतण्याचा हुकुम दिला. तें सैन्य मागें परतूं लागतांच मराठ्यांनीं त्यावर चाल केली व त्याचा पराजय करून त्याला पळवून लाविलें.

१ युद्ध.

आपल्या सैन्याची ही दशा पाहून शेरखान थोडक्याशा लोकांनिशीं जवळच असलेल्या तिरुवाडी किल्ल्यांत शिरला, आणि रात्रीच्या वेळीं तिवेनापट्टम् येथें पळून जाऊं लागला. मराठी फौजेचें लक्ष त्याच्या हालचालीवर असल्यामुळें तिनें त्याचा पाठलाग केला. तो अकालनायकाच्या जंगलांत पळून गेला. येथें त्याच्या फौजेची व मराठ्यांची निकराची लढाई

पळ.

झाली. व तींत शेरखानाची फौज पराभव पावली. आणि मराठे पुन्हा शेरखानाच्या पाठीशीं लागले. ता. २७ जून रोजीं शेरखान बोनागीरपट्टम्च्या किल्ल्यांत शिरला. त्यामुळें तो ताबडतोब कोंडला गेला. शेरखानाशीं झालेल्या चकमकींत मराठ्यांना ५०० घोडे, दोन हत्ती, २० उंट आणि बैल, तंबू इत्यादि पुष्कळच लूट मिळाली.

तह.

तिरुवाडीच्या किल्ल्यांतून शेरखान पळून गेल्यावर त्याच्या सासऱ्यानें तो किल्ला कांहीं दिवस लढविला. हा किल्ला सर करण्यासाठीं बाबूसाहेबाच्या हाताखालीं कांहीं सैन्य ठेवून शिवाजी स्वतः बोनागिरपट्टम् येथें आला. बालडौल, तिवेनापट्टम् व इतर कित्येक किल्ले ता. ३० जून रोजीं मराठ्यांना मिळाले, हें पाहून शेरखानानें तहाचें बोलणें लाविलें. वीस हजार होन दंड भरून शेरखानानें त्या प्रांतांतून निघून जावें, असा करार ता. ५ जूलै रोजीं नक्की ठरला. दंडाची रक्कम वसूल होईपर्यंत शेरखानानें आपला वडील मुलगा मराठ्यांकडे ओलीस ठेविला. याच्या मोबदल्यांत शेरखानाला किल्ल्यांतून सुरक्षितपणें बाहेर जाऊं द्यावें व गोंडलूर कडील त्याची जहागीर त्याला परत मिळावी असें शिवाजीनें कबूल केलें होतें.

ओलिस.

आपला वडील मुलगा इब्राहिमखान यास मराठ्यांकडे ठेवून शेरखान बोनागिरपट्टम् मधून निघाला तो शिवाजीस भेटून बालीगंडापुरम् जवळ आरियालुरच्या जंगलांत गेला. तेथील कल्लार जातीच्या राजानें सालिना १५०० रुपये उत्पन्नाचे दोन गांव देऊन त्याला आपल्या पदरीं ठेविला. वीस हजार होन दंडादाखल मराठ्यांस द्यावयाचे परंतु ही रक्कम खानाजवळ नसल्यानें तो मोठ्या संकटांत पडला. हें पाहून मद्रासकडील हिंदु राजांनीं १६७८ च्या फेब्रुवारीमध्यें वर्गणी काढून दंडाची रक्कम पुरी केली. व त्याचा मुलगा इब्राहिमखान याची सुटका केली. पुढें एप्रिलमध्यें शेरखान मदुरेच्या नायक राजांच्या पदरीं राहिला.

चोक्कनाथ.

१० कोलेरून नदीवर:—शेरखानाची गडबड शांत होतांच शिवाजी जुलैच्या पहिल्या आठवड्यांत कुडलोरहून निघाला व वेलर ओलांडून कोलेरून नदीच्याकाठीं त्यानें आपल्या सैन्याचा ता. १५ जुलै रोजीं तळ दिला. येथून दक्षिणेस तंजावर १० मैलांवर आहे. मदुरेचा राजा चोक्कनाथ याचा वकील येथें शिवाजीस भेटला. शिवाजीनें त्याच्याकडेस फौजेच्या खर्चासाठीं एक कोट रुपयांची मागणी केली. वकीलाचें म्हणणें असें पडलें कीं, " आपल्या धन्याचा कांहीं मुलूख म्हैसूरनें घेतला आहे व कांहीं व्यंकोजीनें

बळकाविला आहे. तो मुलूख शिवाजीनें सोडवून दिल्यास आपला धनी सात लक्ष रुपये देईल. " याप्रमाणें वाटाघाटी चालू असतां महाराष्ट्रांतून रघुनाथपंत येऊन दाखल झाला. लगेच शिवाजीनें त्याला खंडणीची रक्कम ठरविण्यासाठीं नायकाच्या वकीलाबरोवर मदुरेस पाठविलें. रघुनाथानें सहा लक्ष होन खंडणी ठरवून तिच्यापैकीं दीड लक्ष होन रोकड घेतले व तो परत आला.

११ मुलाखत भेट.

मुलाखतः—नायक राजाच्या खंडणीची वाटाघाट चालू असतां व्यंकोजीशीं भेटीचें बोलणें शिवाजीनें लावून तंजावरच्या दिवाणास आपल्याकडेस वोलावून घेतलें होतें. त्याच्याबरोबर शिवाजीनें आपले तीन प्रधान देऊन व्यंकोजीला भेटीचें आमंत्रण पाठविलें. व्यंकोजीच्या सुरक्षितपणाबद्दल वचनप्रमाण झाल्यावर जुलई मध्याच्या सुमारास दोन हजार स्वारांसह व्यंकोजी तिरुमलवाडी येथें भेटीसाठीं येऊन दाखल झाला. शिवाजीहि तिरुमनूरपर्यंत त्यास सामोरा गेला. भेटी, परतभेटी, नजरनजराणे आणि अरसपरस मेजवान्या यांमध्यें उभयतां वंधूंचे कांहीं दिवस गेल्यावर मुख्य मुद्द्यासंवंधानें शिवाजीनें बोलणें काढून व्यंकोजीस असें कळविलें कीं, शहाजीराजाच्या सव मिळकतीपैकीं तीनचतुर्थांश भाग आपणांस देऊन बाकीचा एक चतुर्थांश व्यंकोजीनें स्वतःकडेस राहूं द्यावा. व्यंकोजीनें अर्थातच हें नाकारिलें. हें पाहून शिवाजीला फार राग आला, व त्यानें व्यंकोजीची बरीच खरडपट्टी काढिली. इतकेंच नव्हे परंतु आपलें म्हणणें कबूल करीपर्यंत त्याला अटकेंत ठेवण्याचीहि धमकी दिली. हें पाहून व्यंकोजी ताा २३ जुलैच्या सुमारें एके रात्रीं चार पांच लोकांनिशीं फिरण्याच्या मिषानें बाहेर पडला व कोलेरून नदीवर जाऊन पलीकडच्या तीरीं आपल्या राज्यांत निघून गेला.

पलायन.

व्यंकोजीच्या पलायनाची वातमी शिवाजीला दुसरे दिवशीं समजली. जगन्नाथपंत दिवाण, कोन्हेर महादेव आणि शिवाजी शंकर हे दोघे मुजुमदार आणि निळोजी नायक व्यापारी या व्यंकोजीच्या संडळींना बोलावून शिवाजीनें कैद केलें व 'रघुनाथ नारायण हणमंत्यांना पाठवून तंजावरचें राज्य आपल्या ताब्यांत घेऊं' असाही धाक त्यांस दाखविला. आपल्या भावाच्या विचित्र वागण्याचा शिवाजीला फार राग आला. विशेषतः आपण वचनप्रमाण केलें असतांहि व्यंकोजीस आपला विश्वास आला नाहीं यामुळें राजास बाईट वाटलें. तो म्हणाला, " काय निमित्त पळाले ? आम्हीं त्यास धरीत होतों कीं काय ? आम्हांस बिरुदें काय करावयाचीं ? आमचीं बिरुदें अष्ट दिशेस लागलीं

आहेत. समुद्रवलयांकिल भूमंडळी कीर्ति आपली झाली आहे. तेथें बिरुदें काय करावयाचीं ? वडिलांची वस्त असावी म्हणून मागितली होती. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं तर न देणें. उगेच उठून पळोन गेले. अति धाकटे ते धाकटे, बुद्धीहि धाकटेपणयोग्य केली.*" यानंतर व्यंकोजीनें पुनः भेटीस यावें म्हणून शिवाजीनें प्रयत्न करून पहिला, परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं.

संताजी.

"मग (व्यंकोजीचे) कारकुन व सरदार पळत होते ते राजियाच्या लोकांस सांपडले, त्यांस धरून आणिलें. मग त्या अवघियांस वस्त्रें, भूषणें, अश्व देऊन चंदावरास बंधूसन्निध पाठविलें. संताजी राजे म्हणून शहाजी महाराजांचे नाटकशाळेचे पुत्र होते. ते शूर पराक्रमी होते. ते राजियाच्या भेटीस आले. भेट झाली. त्यांस कर्नाटकांत हजार घोड्यांची दौलत दिधली. महाल मोकाशे दिले. हत्ती घोडे वस्त्रें देऊन *" पदरीं ठेविलें. कोलेरूनच्या दक्षिणेकडेस स्वारी करण्याचा बेत शिवाजीनें तूर्त तहकूब केला. परंतु त्या नदीच्या उत्तरेकडील सगळा प्रांत त्याच्या ताब्यांत आला होता. वेलोर व अरणी फक्त अद्यापपर्यंत लढत होती.

शिबिर.

फ्रेंचांचा वकील एम्. जर्मेन हा या वेळीं शिवाजीच्या सैन्याबरोबर कोलेरून नदीवरील मुक्कामांत तीन दिवस होता. तो त्या शिबिराचें सुंदर वर्णन देतो. "या शिबिरांत कुठल्याहि प्रकारचा डामडौल नसून अत्यंत साधेपणा मूर्तिमंत दिसत होता. यांत सामानाची अडगळ बिलकुल नव्हती व एकहि स्त्री या सैन्याबरोबर दिसत नव्हती. मजबूत परंतु लहानसेच असे फक्त दोनच तंबू या सगळ्या तळावर होते. त्यांपैकीं एक स्वतः राजा शिवाजीसाठीं असून दुसरा त्याच्या प्रधानासाठीं होता. फौजेंतील सगळे घोडे सरकारी पागेंतील असून बारगिरांना फक्त दरमहा दोन पॅगोडा पगार मिळत असे. दोन राउतांत तीन घोडे असा साधारण हिशेब असे. बातमी मिळविण्यांत शिवाजी फार दक्ष असे. किंबहुना त्याच्या सर्व विजयाचें श्रेय अचुक बातमी मिळविण्यांतच असे. व त्यामुळें तो आपल्या वार्ताहरांना सढळ हातानें देणग्या व पगार देत असे."

वृद्धाचलम्.

व्यंकोजी पुनः भेटण्यास येत नाहीं हें निश्चित झाल्यावर तारीख २७ जुलई १६७७ रोजीं शिवाजीनें कोलेरून नदीकांठचा आपला मुक्काम उठविला. नंतर वालिगंडापुरम् येथें थोडेंसें थांबून

---

* सभासद.

वेलार नदी त्यानें ओलांडिली व तुंदुंगुरी येथें एक दोन दिवस मुक्काम केला. येथेंच तिवेनापाटम् येथील डच लोकांचा मुख्य अंमलदार पुष्कळ नजर-नजराणा घेऊन तारीख ३१ जुलई रोजीं त्याला जाऊन भेटला. शिवाजीनें आपलें सैन्य येथूनच व्यंकोजीचा एलावेनासुर हा किल्ला हस्तगत करण्यास रवाना केलें, आणि स्वतः सिमाजी नायक व इतर कांहीं ठळक ठळक मंडळीसह वृद्धाचलम् येथील भगवान् महादेवाच्या दर्शनास निघून गेला.

अर्काट.

वानिकम्वाडीहून तारीख २२ सप्टेंबर १६७७ रोजीं शिवाजी मद्रास येथील इंग्रज गव्हर्नरास लिहितो. 'कर्नाटकांत मी जिंकिलेल्या किल्ल्यांवर नवीन सामान तयार करावयाचें आहे तरी तोफेसाठीं मोठमोठे गाडे तयार करणारे व सुरुंग तयार करणारे लोक तुमच्याकडेस असल्यास त्यास आमच्याकडेस ताबडतोब पाठवून द्यावें. विशेषतः सुरुंगाचें काम करणारीं माणसें आम्हांस अत्यंत निकडीनें पाहिजे आहेत. वीस पंचवीस निदान दहा पांच तरी माणसें पाठवून देणें. त्यांना योग्य वेतन देऊन किल्ल्यावर त्यांची नेमणूक करण्यांत येईल.' इंग्रजांनीं मोठ्या नम्रतेनें, "आपण व्यापारी असल्यामुळें अशा प्रकारची कोणतीहि कामगिरी आपणांस करितां येणार नाहीं" असें शिवाजीस कळवून त्याची मागणी नाकारिली. ता. ३ ऑक्टोबर रोजीं शिवाजी मद्रासपासून दोन दिवसांच्या वाटेवर होता. याच सुमारास त्यानें पोर्टोनोव्हो लुटून अर्काटचा दक्षिण प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला होता. ऑक्टोबर मध्यें त्यानें आरणी सर केली व उत्तर अर्काट मधील कांहीं किल्लेहि याच सुमारास त्याला मिळाले.

सल्ला.

१२ महाराष्ट्रांत प्रत्यागमनः—कर्नाटकांत येऊन दहा महिने होऊन गेल्यानें शिवाजीला आतां आपल्या राज्यांत परत जाण्याची आवश्यकता वाटूं लागली, व त्याच्या मंत्री मंडळाचाहि तसाच सल्ला पडला. इतक्यांत त्याच्या हेरांनीं अशी बातमी आणली कीं, "कुत्बशहानें बंडखोर शिवाजीला मदत केल्याचें एकून औरंगजेब बादशहा संतापून गेला आहे व त्यानें आपल्या दक्षिणेंतील सुभेदाराला गोवळकोंड्यावर स्वारी करण्याचा हुकुम केला असून त्याप्रमाणें मोगल व विजापुरकर यांच्या संयुक्त सैन्यानें, मालखेडजवळ गोवळकोंड्याच्या प्रांतावर स्वारी केली आहे." ही बातमी ऐकतांच १६७७ च्या नोव्हेंबरच्या प्रारंभीं शिवाजी आपलें मुख्य सैन्य कर्नाटकांतील जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लाविण्यास ठेवून व लवकरच परत येण्याचें सांगून तो चार हजार

स्वारांसह परत फिरला. जातां जातां त्यानें शहाजीच्या जहागिरीपैकीं कोलार, उस्कोटा, बंगलोर, बाळापूर आणि सेरा, हे हल्लींच्या म्हैसूरच्या राज्यांतील प्रांत आपल्या ताब्यांत घेऊन तिकडील जुलमी पाळेगारांना शिक्षा करून १६७८ च्या एप्रिलमध्यें तो धारवाड बेलवाडी या मार्गानें पन्हाळ्यावर येऊन पोंचला.

विजय.

ता. २१ ऑगस्ट १६७८ रोजीं, १४ महिन्यांच्या वेढ्यानंतर, वेलोर किल्ला मराठ्यांस मिळाला. किल्लेदार अबदुलाखानानें आपल्या २५०० लोकांनिशीं हा किल्ला १४ महिनेपर्यंत मोठ्या शौर्यानें लढविला. परंतु या १४ महिन्यांत विजापुराकडून त्याला कांहींच मदत मिळाली नाहीं व आंतील लोकांची संख्या ३०० शें वर येऊन ठेपली. तेव्हां रोकड ३०,००० पॅगोडा, एक लहान किल्ला व तीस हजार पॅगोडा उत्पन्नाचा मुलुख इतका मोबदला घेऊन त्यानें किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन केला.

व्यवस्था.

"कर्नाटकामध्यें सर केलेल्या प्रदेशांत शिवाजीनें जागा जागा गढीकोट घेतले. कित्येक नवे बसविले असे १०० त्याप्रांती केले. २० लक्ष होनांचे राज्य साध्य केले.*" १६७८ च्या ऑगस्टमध्यें मद्रासेहून इंग्रज लेखक लिहितो, " जिंजी आणि वेलोर या दोनहि किल्ल्यांजवळचा प्रदेश प्रत्येकीं दरसाल बावीस लक्ष पॅरडोस म्हणजे ५५० हजार पौंड सालीना उत्पन्नाचा आहे. हा सगळा प्रदेश मराठी सैन्यानें आपल्या ताब्यांत घेतला आहे. याशिवाय बहात्तर गढ्या व १४ किल्लेहि त्यांना मिळाले आहेत." या कर्नाटकाच्या स्वारींत शिवाजीला अगणित संपत्ती मिळाली, ती पाहून इंग्रज, फ्रेंच इत्यादि लेखकांची छाती अगदीं दडपून गेली व मराठ्यांनीं कर्नाटक प्रांत अगदीं पिळून काढिला असे उद्गार त्यांनीं काढिले आहेत.

जिंजी.

कर्नाटकांत सर केलेल्या प्रांतांवर सुभेदार नेमून जिंजी हें त्याचें मुख्य ठाणें केलें. " रघुनाथ नारायण हणमंते यास त्याची मजमू सांगितली. त्यापाशीं तूर्त फौज असावी म्हणून हंबीरराव, सेनापती सेनेसह ठेविले. कोल्हार, बाळापूर वगैरे प्रांतीं रंगो नारायण म्हणून सर सुभेदार ठेविले.*" त्यानेंहि जिंजी हेंच मुख्य ठाणें समजून आपला कारभार करावा असें ठरवून दिलें.

---

* सभासद.

१३ व्यंकोजीशीं लढाईः—नवीन जिंकिलेल्या प्रदेशांत शांतता प्रस्थापित होण्याला वेळ लागतो या नियमाला शिवाजीनें जिंकिलेला कर्नाटक कांहीं अपवाद नव्हता. शिवाजीची पाठ वळतांच व्यंकोजीनें कारस्थानें सुरू केलीं. प्रथम त्यानें मदुरा व म्हैसूर येथील नायक राजे व पाळेगार यांच्याशीं राजकारण लावून पाहिलें. नंतर विजापुर दरबारकडेस मदत मागितली. व शेवटीं कर्नाटकांतील मुसलमान राजांनीं शिवाजी विरुद्ध एक व्हावें असा प्रयत्न केला. परंतु त्याला कशांतहि यश आलें नाहीं. सन १६७७ च्या नोव्हेंबरमध्यें शिवाजीचें सैन्य कोलेरून नदी उतरून तंजावरांत प्रवेश करण्याचा विचार करूं लागलें, तेव्हां व्यंकोजीनें त्याला अडथळा केला. दोनाह फाजा नदीच्या दोनहि तटांवर कांहीं दिवस तळ देऊन राहिल्या. कोणीहि कोणावर चाल करून जाईना. एकी घडवून आणण्यासाठीं दोघांनींहि वकील पाठवून प्रयत्न करून पाहिले, परंतु त्यांतहि यश आलें नाहीं. व्यंकोजीच्या सैन्यांत गिधाडें फिरत असल्यानें तो अपशकुन मानून व्यंकोजी चाल करून जाईना. सारांश याप्रमाणें युद्ध लांबणीवर पडूं लागलें.

सामना.

युद्ध.

सरतेशेवटीं तारीख १६ नोव्हेंबर रोजीं पहांटेस चार हजार स्वार व दहा हजार पायदळ इतक्या सैन्यानिशीं व्यंकोजी कोलेरून नदी उतरून शिवाजीचे सरदार संताजी भोसले व सेनापति हंबीरराव मोहिते यांच्या बारा हजार लष्करावर चालून गेला. सगळ्या दिवसभर मोठ्या निकराचें युद्ध होऊन उभयपक्षीं पुष्कळ माणसें कामास आलीं. शेवटीं संध्याकाळीं संताजी फौजेसह पळाला. व्यंकोजीनें त्याचा एक मैलपर्यंत पाठलाग केला. व तो दूर गेला असें पाहून व्यकोजी परतला. दिवसभर चाललेल्या लढाईनें फौज थकून गेलीच होती. व शेवटीं विजय मिळाल्यानें त्या आनंदांत ती स्वस्थ घोरत पडली होती. इकडे संताजी दूर पळून गेल्यावर इतर सरदारांबरोबर त्यानें खलबत करून ह्या अपयशाचा डाग कसेंहि करून धुऊन टाकिलाच पाहिजे असा निश्चय केला व निराळ्या रस्त्यानें ही मराठी सेना रात्रीच्या गद अंधकारांत व्यंकोजीच्या गाफिल फौजेवर चालून आली व तिनें एकदम कत्तल केली. या कत्तलींत हजारों लोक मारिले जाऊन बाकी राहिलेले तंजावरास पळून गेले. मराठ्यांना या वेळीं एक हजार घोडे, तंबू व इतर सामान बरेंच मिळालें. व्यंकोजीचे तीन सरदारहि मराठ्यांनीं या हल्ल्यांत कैद केले.

यानंतर या दोनहि सैन्यांच्या चकमकी डिसेंबर महिनाभर चालल्या. व

समेट.

दोघांनींहि परस्परांचे मुलूख लुटून उद्ध्वस्त केलें. इतक्यांत खुद्द महाराष्ट्रावर औरंगजेबाची स्वारी होणार अशी बातमी शिवाजीस आली. तेव्हां तत्काळ त्याला आपलें कर्नाटकांतील सैन्य एकदम परत बोलाविणें भाग पडलें. या समयीं शिवाजीनें व्यंकोजीशीं तह करून भांडण मिटवून टाकिलें. या तहांत जिंजी व त्या लगतचा मुलूख आणि कांहीं किले व कोलार वगरे शहाजीच्या जहागिरीपकीं कांहीं प्रांत शिवाजीनें आपणांकडेस ठेवून कोलेरूनच्या दक्षिणेकडील व कांहीं उत्तरेकडील मुलूख व्यंकोजीपासून तीन लक्ष होन घेऊन त्याला कायमचा व निर्विवादपणें देऊन टाकिला. हंबीरराव मोहिते सेनापति याला सैन्यासह परत बोलावून नेल्यामुळें रघुनाथपंत हणमंत्यानें दहा हजार फौज नवीन ठेवून जिंजीच्या रक्षणाची योग्य व्यवस्था केली. याप्रमाणें उभयतां बंधूंचा विग्रह व समेट होऊन हें कर्नाटक प्रकरण समाप्त झालें.

१४ युरोपियन व्यापारीः—शिवाजी कर्नाटकांत उतरतांच युरोपियन

इंग्रज.

व्यापारी सन १६७७ च्या मेच्या प्रारंभींच त्याला प्रथम जाऊन भेटले व नजर नजराणा देऊन आपल्या वखारीकडेस त्याची कृपादृष्टि असावी अशी त्यांनीं तजवीज करून ठेविली. महादाजीपंत ब्राह्मणावरोबर एक पत्र देऊन शिवाजीनें विषाच्या उताराचीं औषधें मद्रासच्या इंग्रजांच्या गव्हर्नराकडून मागविलीं होतीं. तें पत्र तारीख १४ मे रोजीं गव्हर्नरास पोंचून त्याप्रमाणें त्यानें औषधें पाठवून दिलीं. व त्याबरोबर मालदीवचे नारळ आणि ६० होन किंमतीचा नजराणाहि पाठविला. हें सर्व पोंचलें असें तारीख २५ मेच्या शिवाजीच्या पत्रावरून दिसतें. हें पत्र बेलोरहून लिहिलें असून त्यांत शिवाजीनें गव्हर्नराचे आभार मानिले आहेत. व याच पत्रांत विषाच्या उतारावरील आणखी औषधें मागवून 'त्यांची किंमत मागण्यास मुळींच संकोच बाळगूं नये' असेंहि कळविलें आहे. शिवाजीनें गव्हर्नरास या पत्राबरोबर पोषाखहि पाठविला होता. तारीख १८ जून रोजीं गव्हर्नरानें ५२ होन किमतीचा दुसरा नजराणा पाठवून शिवाजीच्या कृपेची पुनः याचना केलेली आहे. इंग्रजांच्या तर्फे दोन ब्राह्मण शिवाजीबरोबर कर्नाटकच्या स्वारींत होते. त्यांनीं शिवाजीच्या सर्व हालचाली गव्हर्नरास लिहून कळवाव्यात असें ठरलें होतें. तारीख २२ सप्टेंबर रोजीं शिवाजीनें तोफांचे गाडे करणारे व सुरुंग तयार करणारे वीस पंचवीस कारागीर इंग्रजांकडेस मागितले व ते त्यांनीं देण्याचें टाळिलें ही माहिती पूर्वी पृष्ठ २१५ वर आलीच आहे.

इंग्रजांची कारवाई वर सांगितली. आतां फ्रेंचांनीं काय केलें तें आपण पाहूं.

फ्रेंच.

शिवाजीची स्वारी कर्नाटकांत उतरतांच जिकडे तिकडे पळापळी व गोंधळ माजून राहिला. या वेळीं पांडेचरी येथें फ्रान्सिस मार्टिन हा फ्रेंचांचा गव्हर्नर होता. त्यानें आपला एक ब्राह्मण वकील शिवाजीकडेस वेलोर येथें पाठविला. व त्याबरोबर पत्र देऊन शिवाजीस अशी विनंति केली कीं, ' खुद्द आपल्या राज्यांत ज्याप्रमाणें आपण फ्रेंचांच्या वखारीचें संरक्षण केलें आहे त्याचप्रमाणें येथें कर्नाटकांतहि आमचें रक्षण करावें. ' या वकीलानें तीन वेळां शिवाजीची मुलाखत घेतली. शेरखान लोदीशीं लढाई देण्यासाठीं फ्रेंचांनीं मदत करावी असें बोलणें प्रथम शिवाजीनें लाविलें. पुढें फ्रेंचांच्या वखारीस त्रास न दिल्यास आपणांस फ्रेंच काय मोबदला देतील असें शिवाजीनें विचारिलें. यावर नुकतीच आपली डच लोकांशीं मोठी लढाई झाली असून तीमुळें व्यापारहि मोडकळीस आलेला आहे त्यामुळें मोबदला देण्यास आपणांजवळ कांहींहि नाहीं असें फ्रेंचांनीं कळविलें. परंतु फ्रेंचांचें हें म्हणणें ढोंगीपणाचें होतें असें दिसतें. कारण द्रव्य अगर माल यांपैकीं फ्रेंचांजवळ कांहींच नव्हतें अशा स्थितींत त्यांच्या वखारीचें म्हणजे नुसत्या इमारतींचें संरक्षण शिवाजीनें करावें असें फ्रेंचांचें म्हणणें होतें कीं काय ? असो. तारीख २ जुलई १६७७ रोजीं मार्टिन यानें पुनः आपला ब्राह्मण वकील शिवाजीकडेस पाठविला. या वेळीं त्याच्याबरोबर फ्रेंचांचा मुख्य डायरेक्टर वॅरन यानें पत्र देऊन त्यांत फ्रेंच वखारींच्या संरक्षणासाठीं पुनः शिवाजीस विनविलें होतें. ब्राह्मण वकीलाऐवजीं इंग्रज वकील पाठवावा असें शिवाजीकडून सांगून आल्यावरून मि. जमन यास करल नांवाच्या दुभाष्यासह शिवाजीकडेस कोलेरूनच्या तळावर पाठविलें. तेथें जाऊन पोंहोंचल्यावर जनादन-पंतांनीं या वकीलांना शिवाजीपुढें नेऊन त्यांची मुलाखत करविली. हे वकील तेथें तीन दिवस राहिले होते. शिवाजीनें पांडेचरी येथील फ्रेंच वखारींच्या संरक्षणाचें फर्मान ऑगस्टमध्यें यांस दिलें व ते नंतर निघून गेले. इतकें झालें तरी स्थानिक मराठा अंमलदारांनीं लोकांपासून बळजबरीनें पैसे काढिले व त्यांस पुष्कळ त्रास दिला असें मार्टिननें लिहून ठेविलेंच आहे. व याबद्दल शिवाजीकडेस पत्रें पाठवून पुष्कळ वेळां तकरारी नेल्या परंतु त्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं असेंहि मार्टिन पुढें लिहितो. परंतु या बाबतींत मराठा अंमलदारांचें म्हणणें आपल्यापुढें नसल्यानें खरोखर कोणाकडेस दोष होता हें सांगणें कठिण आहे.

आतां डच व्यापाऱ्यांची हकीकत सांगावयाची राहिली आहे ती सांगून हें व्यापारी पुराण पूर्ण करूं. तारीख ३१ जुलई रोजीं तिवेना-पटम् येथील डच वखारीचा मुख्य तुदुमगुर्ती येथें शिवाजीस येऊन भेटला. त्यानें रेशीम, चंदन, गुलाबपाणी, मालदिवचे नारळ, लवंगा आणि तलवारीचीं पातीं यांचा नजराणा केला. शिवाजीनेंहि याबद्दल आनंद व्यक्त करून परत पोषाख दिले. तथापि त्यांच्या वखारींतून कांहीं माल मराठ्यांनीं लुटलाच. तो अगर त्याची किंमत परत मिळण्यासाठीं डच लोकांनीं मागणी केली; परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. फ्रेंचांचा गव्हर्नर मार्टिन लिहितोः "तिवेनापटम् येथें डच लोक जवळ जवळ मराठ्यांचे कैदीच होते. व आप-आपल्या घराच्या बाहेर जाण्यास व परत घरांत येण्यासहि त्यांना मोबदला द्यावा लागला."

डच.

१५ व्यंकोजीची खरी योग्यताः—'व्यंकोजी हा महामूर्ख होता. कोणतीहि उदात्त महत्त्वाकांक्षा त्याच्यांत नव्हती. तो स्वतः मंद, जड, आळशी व अकार्यक्षम असल्यानें रघुनाथपंत हणमंत्यासारख्या खऱ्या स्वामिनिष्ठ सेवकाची त्याला बूज करितां आली नाहीं.' असे आरोप व्यंकोजीवर कित्येक लेखकांनीं केले आहेत. परंतु हे सर्व लेख व्यंकोजीनंतर शेंदोनशें वर्षांनीं अस्तित्वांत आल्यामुळें व समकालीन लेखकांचे लेख याविरुद्ध उपलब्ध असल्यामुळें पूर्वोक्त लेख अविश्वसनीय आहेत असें निश्चितपणें वाटतें. समकालीन लेखांवरून आपली खात्री पटते कीं, व्यंकोजी हा शिवाजीला शोभण्या-सारखा भाऊ होता. सन १६६५ मध्यें विजापुरकर व मोगल यांच्यांत जें युद्ध झालें त्यांत विजापुरकरांतर्फे जयसिंगाशीं लढण्यास व्यंकोजी रणांगणावर आला होता. त्या वेळच्या त्याच्या शौर्याची तारीफ मुसलमान इतिहास लेखकांनींहि लिहून ठेविली आहे. तंजावरचें राज्य शहाजीनें मिळविलें नसून व्यंकोजीनें कमाविलें होतें हें आपण विसरतां कामा नये. व म्हणून या राज्यांत शिवाजीला वांटा मागण्याचा बिलकुल अधिकार नव्हता. तंजावरच्या जिंकिलेल्या राज्याची व्यवस्था त्यानें फार उत्तम रीतीनें लाविली असल्याबद्दल जेसुइट मिशनरी अँड्रे फ्रीयर यानें व्यंकोजीची स्तुती पुढीलप्रमाणें केली आहे. "व्यंकोजीनें केलेल्या सुधारणांमुळें प्रजेचें त्यावर निःसीम प्रेम जडलें होतें. त्यानें आपल्या राज्यांतील पाण्याचीं तळीं व जुने पाटबंधारे यांची दुरुस्ती करून शेंकडों एकर जमिनीची लागवड करविली." या जमिनीचें पीक पूर्वीच्या सर्व पिकांहून फारच जोरदार

चर्णन.

येऊं लागलें. "व्यंकोजी स्वतः फार शहाणपणानें व न्यायीपणानें राज्य करूं लागल्यामुळें त्याच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीत प्रजेला झालेलीं दुःखें व सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टा यांचा अगदीं विसर हल्लींच्या कारकीर्दीत प्रजेला पडला होता" असें इंग्रज लेखकांनीं लिहून ठेविलें आहे.

बनावट पत्रें.

रघुनाथपंत हणमंते हा द्रव्याच्या बाबतींत साधुवृत्तीचा नव्हता. शिवाजीच्या स्वारीनंतर एक वर्षपर्यंत रघुनाथपंतानें व्यंकोजीचा कारभार पाहिला असें रा. ब. पारसनीस यांनीं इतिहाससंग्रहांतील 'तंजावरच्या राजघराण्या'च्या कथनांत जें लिहिलें आहे त्याला अन्य पुरावा नसल्यानें तें विश्वसनीय मानितां येत नाहीं. आणि म्हणून शिवाजी व व्यंकोजी यांचा पत्रव्यवहार, तहाच्या अटी, व्यंकोजीस व त्याच्या पत्नीस शिवाजीची देणगी एतद्विषयीं जे कागद पाठविलेले आहेत ते सर्व बनावट अतएव त्याज्य होत.

प्रकरण १३ वें

महाप्रस्थान

[१ कर्नाटकच्या स्वारीनंतर. २ सन १६७७ तील मराठ्यांच्या चळवळी. ३ तुंगभद्रेच्या उत्तर तीरावरील विजय. ४ मोगल विजापुरकर व शिवाजी १६७८. ५ संभाजी मोगलांस मिळतो. ६ विजापूर घेण्याचे मराठ्यांचे प्रयत्न. ७ दिलेरखान भूपाळगड घेतो. ८ शिवाजीचें औरंगजेबास पत्र. ९ दिलेरची विजापुरावर स्वारी. १० दिलेरखानाचा उच्छाद व संभाजीचें पुनरागमन. ११ शिवाजीची शेवटची स्वारी. १२ कौटुंबिक क्लेश. १३ मृत्यु. १४ बायकामुलें.]

कर्नाटकच्या स्वारीनंतरः—मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें कर्नाटकच्या स्वारींत अद्‌भुत यश मिळवून शिवाजी सन १६७७ च्या नोव्हेंबर मध्यें मद्रासहून म्हैसूर येथें गेला व म्हैसूरचा पूव व मध्य भाग जिंकिता झाला. सन १६७८ च्या जानेवारींत म्हैसूर सोडून त्यानें तुंगभद्रा ओलांडिली व कोपळ, गदग मार्गानें धारवाड जिल्ह्यांतील लक्ष्मीश्वरास तो येऊन दाखल झाला. तेथें खान गौडा हा देसाई होता. त्यानें मराठ्यांच्या भीतीनें किल्ला खाली करून दिला व तत्काळ मराठ्यांनीं तो आपल्या ताब्यांत घेतला. सन १६७८ च्या जानेवारीच्या मध्याच्या सुमारास त्यांचा मोर्चा बंकापुराकडेस वळला. येथून पूर्वेकडेस वळून शिवाजीची स्वारी संपगांवीं आली. या प्रांतीं "बेलवाडी (येथें) कोट होता. तेथें देसाईण बायको होती. तिनें राजियाचे लष्करचे कहीकवाडी बैल नेले. हें वर्तमान राजियास कळलें. बेलवाडीस वेढा घातला *" सावित्रीबाई देसाइणीनें सत्तावीस दिवसपर्यंत किल्ला मोठ्या शौर्यानें लढविला. परंतु शेवटीं दारूगोळा खुंटल्यानें मराठ्यांनीं हल्ला करून किल्ला सर केला. या वेळीं जी हातघाईची लढाई झाली तींत सावित्रीबाईनें स्वतः तलवार चालविली होती व एक संबंध दिवसपर्यंत मराठ्यांस पुढें सरकूं दिलें नाहीं. शेवटीं तिचा पराजय झाला. तिला मराठ्यांनीं जिवंत पकडलें व सकुजी गायकवाडानें तिची विटंबना फार केली. ही हकीकत शिवाजीस कळतांच त्यानें सकूजीचे डोळे काढून

सावित्री बाई.

* सभासद.

टाकिले व त्याला जन्मभर कैदेंत ठेविलें. ही सावित्रीबाई कायस्थ प्रभु होती असें कित्येकांचें म्हणणें आहे.

कारस्थान.

यानंतर फेब्रुवारीमध्यें शिवाजीनें एक मोठें कारस्थान रचिलें होतें, परंतु तें फसलें. तारीख २३ डिसेंबर १६७७ रोजीं विजापुरचा मुख्य सरदार बहलोल मरण पावला व त्याचा हस्तक जमशेदखान हा तेथें मुख्य बनला. परंतु बालराजा सिकंदरअदिलशहा याला संभाळून राज्य-व्यवस्था ताब्यांत ठेविण्याइतकें सामर्थ्य त्याच्यांत नसल्यानें सहा लक्ष पॅगोडा घेऊन बालबादशहासह विजापुरचें राज्य शिवाजीचे ताब्यांत देण्याचें त्यानें ठरविलें. व या ठरावाप्रमाणें विजापुर ताब्यांत घेण्यासाठीं शिवाजी निघाला. परंतु ही बातमी फुटून विजापुरचा दुसरा एक सरदार सीदी मसाऊद याला कळली. त्यानें विजापुर आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं निराळीच युक्ति केली. प्रथम आपण अतीशय आजारी आहोंत असें त्यानें प्रसिद्ध केलें. नंतर त्याचा मृत्यु झाला असें जाहीर झालें. याप्रमाणें मुख्य सरदार निवर्तल्यानें त्याची चार हजार फौज त्याच्या चाकरींतून एकदम कमी होऊन जमशेदखानाकडेस आली. खानानें तिला आपल्या पदरीं ठेवून एकदम किल्लयावर घेतलें. आणि लागलीच म्हणजे तारीख २१ फेब्रुवारी सन १६७८ रोजीं या फौजेनें जमशेदखानास कैद करून सीदी मसाऊद याला फौजेसह किल्लयावर घेतलें व मसाऊद हा मेला नसून जीवंत आहे अशी लोकांची खात्री करून दिली. ही बातमी शिवाजीस कळतांच तो एकदम परत पन्हाळ्याकडेस वळला व सन १६७८ च्या एप्रिलमध्यें तेथें जाऊन पोहोंचला.

आढावा.

२ सन १६७७ तील मराठ्याच्या चळवळीः—सन १६७७ च्या जानेवारीपासून सन १६७८ च्या मार्चपर्यंत शिवाजीची स्वारी कर्नाटकच्या मुलुखगिरींत गुंतली होती. या सुमारें सव्वा वषाच्या अवधींत स्वराज्यांत काय काय चळवळी झाल्या यांचाहि अढावा येथें घेणें मनोरंजक आहे. शिवाजी कर्नाटकाकडेस रवाना झाल्यावर गोंव्याजवळचा पोर्च्युगीजांचा कांहीं मुलुख खालसा करण्यासाठीं संभाजी सैन्यासह तिकडेस गेला. मराठ्यांनीं फोंडा किल्ला सर केला होता. त्याच्या आसपासचीं साठ खेडीं आपणांसच मिळावीं अशी संभाजीनें पोर्च्युगीजांकडेस मागणी केली. परंतु ती त्यांनीं नाकारिल्यामुळें संभाजीनें एकदम त्यांच्यावर हल्ला चढविला. परंतु पोर्च्युगीजांची तयारी बरी असल्यानें संभाजीला मागें परतावें लागलें. नंतर संभाजी सन १६७७ च्या नोव्हेंबरमध्यें दमणकडेस वळला. परंतु तेथेंहि त्याची म्हणण्यासारखी टिकी

लागली नाहीं. यानंतर मराठ्यांकडून गोंव्यास शिष्टाई करण्यांत आली. तिचें वर्णन पुढें चवदाव्या प्रकरणांत करण्यांत येईल.

लुटालूट.

शिवाजीच्या गैरहजिरींत देशावर मोरो त्रिंबक आणि कोंकणांत आनाजी दत्तो सैन्यासह ठेविण्यांत आले होते. त्यांनींहि बारीकसारीक लुटालुटीच केल्या. नांव घेण्यासारखी एकहि मोहीम केली नाहीं. नवसरी, गणदेवी आणि पिंडवल येथें मराठ्यांचीं ठाणीं बसल्यानें सुरतेला कायमचाच शह उत्पन्न झाला होता. चाळीस पन्नास स्वारांनिशीं एकादा लहानसा सरदार सुरतेस वारंवार जाऊन तेथील फौजदाराकडून उघडपणें लागेल त्या वस्तू व द्रव्य मागून आणीत असे. दिलेरखान व बहलोलखान यांचा संपूर्ण पराजय गोवळकोंडेकरांनीं केल्याचें पाहून दत्ताजीनें सन १६७७ च्या नोव्हेंबरमध्यें कानड्यावर स्वारी करून हुबळी लुटली. सन १६७८ च्या जानेवारीच्या प्रारंभीं मोरोपंतानें नाशिक त्र्यंबक व अशींच इतर मोगली शहरें लुटलीं. त्याच्या पारिपत्यासाठीं दिलेरखान आपल्या मोडक्यातोडक्या फौजेनिशीं फेब्रुवारीमध्यें गेला होता.

मायणा.

३ तुंगभद्रेच्या उत्तरतीरावरील विजयः—सन १६७८ च्या एप्रिलमध्यें शिवाजी कनाटकाच्या स्वारीहून परत आल्याचें मागें पृष्ठ २१६ वर सांगितलेंच आहे. त्यानंतर महाराष्ट्रांतून मराठ्यांच्या हालचालीस सुरुवात झाली. कर्नाटकाच्या स्वारीमध्यें म्हैसूरच्या पूर्वेकडील वगैरे जो भाग शिवाजीनें जिंकिला होता तो स्वराज्यास जोडणें अवश्य होतें. परंतु याप्रमाणें सलंग स्वराज्य करण्यास विजापुरच्या राज्याचा दक्षिण कोपरा जिंकणें अपरिहार्य होतें. या बाजूनें तुंगभद्रेच्या उत्तरेकडील बेलवाडीच्या समोरचा कोपल प्रांत आणि बेळगांव व धारवाडप्रांतांतील कांहीं मुलुख इतका प्रदेश विजापुरकरांच्या ताब्यांत असून तेथें अनुक्रमें कोकनूरचा हुसेनखान मियाणा व त्याचा भाऊ कोपलचा कासमखान हे सरदार होते. हे दोघेहि पठाण बहलोलखानाचें हस्तक असून त्याच्या मृत्यूनंतर उपयुक्त सरहद्दीचें संरक्षण करण्यासाठीं यांची नेमणूक दरबारांतून झालेली होती. " विजापुरचा सरदार हुसेनखान मायणा पठाण तोलदार (होता. त्याचे पदरीं) पांच हजार पठाण तिरंदाज, बरचीवाले, आडहत्यारी (असून शिवाय) बंदुकी, तोफखानाहि होता. हुसेनखान म्हणजे जैसा नबाब बहलोलखान याच्या जोडीचा सरदार."* सन १६७७ च्या जानेवारीमध्यें

---

* सभासद.

बहिररावानें गदग प्रांतावर स्वारी केली हें पाहून हुसेनखान मियाणा हा आपल्या पांचहजार पठाणांसह त्यास आडवा आला, व येलबुर्गा येथें या दोघांची निकराची लढाई झाली. " मराठे म्हणजे मोठे हरीफ, त्यांनीं शर्त करून भांडण दिधलें. नीट घोडीं घालून मारामारी केली. हुसेन खानाचे कित्येक लोक मारिले, घोडीं मारिलीं व हत्ती रणास आले. मोठें युद्ध बळकट दोन प्रहर दिवसापासून चार प्रहर रात्रपर्यंत जालें. * " हुसेनखानाचें शरीर फार स्थूल असल्यानें त्याला घोड्यावर बसतां येत नसे. तो हत्तीवर बसूनच रणांगणावर आलेला होता. "दोन हजार घोडे व (बारा) हत्ती पाडाव जाले. युद्धसमयीं राजश्री नागोजी बिन सर्जाराव जेधे याणीं युद्धाची शर्त केली. (हुसेनखान) खाशांच्या हत्तीच्या सोंडेवरी वार करून हत्ती वळविला. तेव्हां हसनखानानें हत्तीवरून तीर मारिला. तो मस्तकी लागोन हणवटीजवळ निघाला ते जखमेनें (नागोजी जेधे) ठार जाले.†" तथापि या लढाईंत शेवटीं मराठ्यांस विजय मिळून त्यांनीं हुसेनखानास कैद केलें. ' कोपळचा किल्ला सोपल्यास तुझी सुटका होईल ' असें शिवाजीनें हुसेनखानास कळविलें परंतु आरंभीं तें त्याला मानवलें नाहीं. पुढें सन १६७८ च्या प्रारंभीं शिवाजीनें गदग प्रांत जिंकिला. नंतर मोरोपंत पेशव्यानें कोपळचा किल्लदार कासिमखान याजकडेस हुसेनखानाच्या मुलाच्या मार्फत बोलणें लावून कांहीं लांच देऊन तारीख ३ मार्च सन १६७९ रोजीं कोपळ किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत घेतला, व हुसेनखानानें पुढें मराठ्यांचीच नोकरी पत्करिली.

कोपळ.

"कोपल म्हणजे दक्षणचा दरवाजा. तक्ताची जागा. असा किल्ला घेतला. मोठें स्थळ प्राप्त जालें. कोपल म्हणजे तुंगभद्रेचे कांठीं. (हें स्थळ हस्तगत झाल्यानें बेलवाडी चित्रदुर्गपर्यंतचा सगळा प्रदेश स्वराज्यास जोडला गेला. आणि इकडील जे जमीनदार पूर्वी विजापुरकरास गांठत नव्हते त्यांस मराठ्यांनीं वठणीवर आणून खंडणी वसूल करण्यास प्रारंभ केला.) याप्रमाणें तुंगभद्रेपावेतों देश हस्तगत जहाला. (आणि कोपल ताब्यांत आल्यानें) कनकगिरी, हरपनहल्ली, रायदुग, चित्रदुर्ग, वियानगर (? प्राचीन विजयानगर), बुंदीकोट (? गुंडीकोट) बाजे पाळेगार रुजू जालें. असें कार्य झालें. *" इकडील जो प्रदेश स्वराज्यास जोडिला गेला त्यावर जनार्दन नारायण हणमंते यास सुभा नेमण्यांत आलें.

शि. १५ * सभासद. † जेधे.

मुंगी पैठण.

सन १६७८ च्या अखेरीस मराठ्यांनीं गोदावरीच्या तीरावर असलेलें मुंगी पैठण लुटलें. यानंतर शिवनेरी किल्ला घेण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पायथ्याचें खेडें हस्तगत करून अंधाऱ्या रात्रीं तीनशें मावळे डोंगर चढून शिड्यांच्या सहाय्यानें बुरुजावर दाखल झाले. या किल्लयावर अबदुल अझीजखान हा नामांकित किल्लेदार होता. किल्लयाच्या पायथ्याशीं मराठ्यांशीं लढण्यासाठीं यानें आपल्या मुलाबरोबर कांहीं फौज पाठविली असल्यानें किल्लयावर शिल्लक फौज अशी थोडीच होती. तथापि तेवढया फौजेनिशीं त्यानें रात्रीं बुरुजावरील मराठ्यांवर तुटून पडून त्यांची कत्तल केली. दुसरे दिवशीं सकाळीं डोंगरांच्या कपारींत लपलेल्या मावळ्यांस शोधून काढून बक्षिसें देऊन त्यानें शिवाजीकडेस पाठवून दिलें व "आपण किल्लेदार असेपर्यंत शिवनेरीचा किल्ला तुम्हांस मिळणार नाहीं" असा त्यांच्याबरोबर निरोपहि पाठविला.

४ मोगल, विजापुरकर व शिवाजी. १६७८:—कुत्बशहानें पैसा, दारूगोळा व तोफा यांचें सहाय्य करावें आणि या सहाय्याच्या जोरावर शिवाजीनें कर्नाटक सर करावें असा करार मादन्नाच्या मध्यस्थीनें ठरल्याचें मागें पृष्ठ २०७ वर नमूद केलें आहेच. या करारापमाणें कुत्बशहानें सर्वतोपरी सहाय्य केलें परंतु कर्नाटकांतील मुलूख, लूट अगर किल्ले यांपैकीं कांहींहि शिवाजीनें कुत्बशहास दिलें नाहीं; त्यामुळें शहाच्या मनांत वांकडें येऊन त्याचा शिवाजीशीं बिघाड झाला व मादन्नाचें सगळें कारस्थान फोल ठरलें. त्यांत विजापूर सर करण्याचें कारस्थान शिवाजीनें केलें हें कळतांच अबुल हसन कुत्बशहा तर अगदींच संतापून गेला. कारण तो स्वतःला विजापुरच्या बाल राजाचा मित्र व संरक्षक असें अलीकडेच म्हणवून घेत असे. सीदी मसाऊद यानें विजापुरचा कारभार आपल्या हातीं घेतला होता हें मागें पृष्ठ २२३ वर सांगितलेंच आहे. कुत्बशहानें सीदी मसाऊद व त्याचा प्रतिस्पर्धी शर्जाखान या दोघांशींहि सख्य करून त्यांच्या फौजेचा थकलेला पगार देण्याचें कबूल केलें. आणि त्याच्या मोबदल्यांत या दोघां विजापुरी सरदारांनीं शिवाजीवर स्वारी करून त्याला कोंकणांतच डांबून टाकावें असा करार केला होता. या कराराला अनुसरून विजापुरांत स्वारीची तयारी सुरू होऊन येत्या ऑक्टोबरांत पंचवीस हजार स्वार व असंख्य पायदळ उभारण्याचा जारीचा प्रयत्न सुरू झाला. परंतु दिलेरखानानें हा सगळा व्यूह बिघडवून टाकिला. तो कसा तें पहा.

कुत्बशहा.

सन १६७७ च्या नोव्हेंबरमध्यें दिलेरखानानें सीदी मसाउदाशीं तह करून ज्या सवलती मिळविल्या होत्या त्या विजापुर दरबारला असह्य आणि अपमानकारक अशा होत्या. त्यामुळें अशा तहाचें उत्तरदायित्व (जबाबदारी) मसाउदावर पडलें, म्हणून विजापुर दरबारांतील सगळी अव्यवस्था आणि प्रजेचीं गाऱ्हाणीं यांचें खापर मसाउदाच्याच डोक्यावर फुटूं लागलें. यावेळीं त्याची स्थिति फार अनुकंपनीय अशी झाली होती. कौटुंबिक कलह, अफगाण शिपायांच्या धमक्या आणि त्यांनीं केलेले अपमान या योगें तो अगदीं कंटाळून गेला होता. दरबारांतील यादवी व निर्धनता यायोगें तो शिवाजीशीं सामना देण्यास असमर्थ झाला होता. आणि मराठ्यांच्या मात्र स्वाऱ्यांवर स्वाऱ्या चालू असून ते विजापूर दरबारचा प्रांत बळकावीत होते. अशा एकंदर कारणसमुच्चयामुळें मसाऊद शिवाजीशीं तह करण्यास सिद्ध झाला. परंतु दिलेरखानानें पुनः त्याला घोंटाळ्यांत टाकिलें. त्यानें असें सांगून पाठविलें कीं, मराठ्यांशीं लढण्यास मोगली सैन्य सीदीस मदत करण्यास सिद्ध आहे. परंतु मराठ्यांनीं सगळीकडेस जो विच्छेद आरंभिला होता त्यायोगें सीदी अगदीं मेटाकुटीस येऊन त्यानें दिलेरचें सांगणें बाजूस ठेवून शिवाजीस असें लिहून कळविलें कीं

घालमेली.

" वस्तुतः आपण शेजारी आहोंत. आपण एकाच धन्याचें मीठ खाल्लेलें आहे. आणि विजापुरच्या राज्याबद्दल जितका मला अभिमान आहे तितकाच तुम्हांलाही असला पाहिजे. मोगल हे आपले शत्रू असून ते विजापुरचा नाश करण्यासाठीं अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. अशा प्रसंगीं आपण उभयतां एक होऊन मोगलांना दक्षिणेंतून हांकलून लाविलें पाहिजे. "

५ संभाजी मोगलांस मिळतोः—आपल्याशीं झालेला तह धाब्यावर बसवून मसाउदानें शिवाजीशीं पत्रव्यवहार सुरू केला व अशारीतीनें आपला विश्वासघात केला हें वृत्त दिलेरखानास कळतांच त्यानें विजापुरावर स्वारी करण्याचा निश्चय केला. आजपर्यंत त्यानें कधींच स्वारी केली असती परंतु तहाची अट त्याला आड येत होती. मसाउदानेंच तह मोडला हें निमित्त त्याला अनायासेंच सांपडलें. आणि इतक्यांत अकल्पितपणें त्याला मोठें सहाय्यहि मिळालें. शिवाजीचा वडील पुत्र संभाजी हा म्हणजे शिवाजीच्या पूर्वजन्मींच्या पापांचा मूर्तिमंत पुतळाच होता. यावेळीं तो एकवीस वर्षांचा तरुण बांड असून मोठा क्रूर, व्यभिचारी, चंचल बुद्धीचा, अविचारी आणि स्वैरवर्तनी होता. त्यानें एका ब्राह्मणस्त्रीवर अत्याचार केल्यामुळें शिवाजीनें त्याला

फूट.

पन्हाळ्यावर कैदेंत ठेविलें होतें. परंतु तारीख १३ डिसेंवर १६७८ रोजीं तो तेथून आपली पत्नी येसूबाईसह निसटून कांहीं मित्रांना बरोवर घेऊन दिलेरखानाकडेस यावयास निघाला. ही बातमी शिवाजीस लागतांच त्यानें संभाजीच्या पाठीवर सैन्य पाठविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इकडे संभाजी आपल्याकडेस येत आहे हें वृत्त दिलेरखानास कळतांच त्यानें इखलासखान व घैरियतखान त्यांच्या हाताखालीं चार हजार फौज देऊन त्यांना बहादुरगडाहून संभाजीस सामोरें पाठविलें. ते सुप्याजवळ संभाजीस भेटले. करकंब्यास दिलेरखानहि येऊन भेटला. मराठी राज्याचा वारस आपल्यास येऊन मिळाला हें पाहून दिलेरखान तर आनंदसमुद्रांत पोहूं लागला. सर्व दक्षिण आपण सर केली कीं काय असा त्याला हर्ष झाला. आनंदातिशयानें त्यानें दुंदुभी वाजविल्या व औरंगजेवासहि ही खबर कळविली. संभाजीस राजा ही पदवी देऊन सात हजारी मनसब बहाल करण्यांत आली व एक हत्तीहि बक्षिस दिला. या अनर्घ्य पाहुण्यासह दिलेरखान अकलूज येथें कांहीं दिवस राहून विजापुरावर स्वारी करण्याची तयारी करीत होता.

६ विजापुर घेण्याचे मराठ्यांचे प्रयत्नः—दिलेरखानाच्या स्वारीचा बेत

विजापुर.

सीदी मसाऊद यास कळतांच त्यानें पूर्वी ठरल्याप्रमाणें दिलेरशी तोंड देण्यासाठीं मराठ्यांची मदत मागितली. शिवाजीनें लागलीच सहा सात हजार घोडे स्वार विजापुरच्या संरक्षणासाठीं पाठवून दिले. परंतु मसाउदचा पूर्ण विश्वास या मराठी फौजेवर नसल्यानें त्यानें या स्वारांस इतंगिहल खेड्याजवळ मुक्काम करावयास सांगितलें. तथापि त्यांनीं शहराजवळ येऊन खानापुर आणि खुसरूपुर येथें मुक्काम केला व किल्ल्याच्या एका बुरुजाच्या दरवाजाचें रक्षण करण्याची कामगिरी आपणांवर सोंपवावी अशी मागणी केली. परंतु मसाउदानें ती शहाणपणानें नाकारिली. यामुळें ह्या मराठी फौजेनें आपला तळ हालवून जोहरपुरा येथें कोटाच्या बाहेर मुक्काम केला. या योगें तर मसाउदास त्यांचा अधिकच संशय आला. धान्याच्या गोणींत हत्यारें छपवून तीं किल्ल्यांत नेण्याचा प्रयत्न मराठे करीत आहेत व त्या गोणी ज्या बैलावर लादण्यांत आल्या होत्या त्या बैलास हांकून आणणारे लोकहि वणजारी नसून मराठे शिपाईच वेषांतर करून किल्ल्यांत प्रवेश करीत आहेत असें मसाउदास आढळून आलें. त्यामुळें शिवाजी व मसाऊद यांचें चांगलेंच बिघडलें. शिवाजीनें लागलीच आपलें उग्र स्वरूप प्रगट करून अदिलशाही प्रांत लुटण्याला प्रारंभ केला आणि दौलतपुरा, खुसरूपुरा, जोहरपुरा इत्यादि विजापुरचीं उपनगरें लुटून दंड वसूलीसाठीं श्रीमंत

लोकांना कैद करून नेलें. त्यांनीं शेख अहमद खवासखानी याच्या थडग्याजवळ अलीरेजा याला ठार करून सीदी याकूत यास जखमी केलें. याप्रमाणें मारामारी करीत ते इभराहिम अदिलशहाच्या थडग्याजवळ गेले. इतक्यांत किल्ल्यावरील तोफेच्या गोळ्यानें मराठी फौजेचा एक सरदार मारला गेला, त्यामुळें मराठे तेथून परत फिरले. इतका प्रकार झाल्यानंतर मसाउदनें दिलेरखानाशीं पुनः तह केला.

भांडण.

दिलेरखान व मसाऊद यांची याप्रमाणें मैत्री होतांच मराठ्यांच्या पारिपत्यासाठीं मोगली सैन्य विजापुरांत येऊन दाखल झालें व त्याचा मोठा मान सन्मानहि करण्यांत आला. सीदी मसाऊदचा हस्तक वेंकटाद्रि मुरारि याच्या हाताखालीं विजापुरी सैन्य देऊन मोगली सैन्यासह त्यास मराठ्यांवर पाठविण्यांत आलें. हें संयुक्त सैन्य तिकोट्यास पोंचलें तों त्यास, स्वतः शिवाजी सेल्गूर येथें येऊन, जें सैन्य अघाडीस येईल त्यावर रात्रीचा छापा घालण्याच्या तयारींत आहे, अशी बित्तंबातमी हेरांच्याकडून मिळाली. हें संयुक्त सैन्यहि प्रतिकाराच्या तयारींत होतें. इतक्यांत सीदी मसाऊद आणि शर्जाखान यांच्यांत भांडण होऊन विजापुरी सैन्य पक्षघात झाल्याप्रमाणें निर्बळ झालें.

७ दिलेरखान भूपाळगड घेतोः—भूपाळगड हा किल्ला शिवाजीनें मुद्दाम मजबूत असा बांधून तेथें संकटाच्या प्रसंगीं खजीना व इतर सामान ठेविण्याची व्यवस्था केली होती. मोगलांशीं लढाई सुरू झाल्यास मराठी कुटुंबानीं आश्रयार्थ येथेंच राहावें अशीहि योजना केलेली होती. अशा या किल्ल्यावर दिलेरखानानें चाल केली व रात्रभर खपून शेजारच्या उंच टेकड्यांवर कांहीं तोफा चढवून दिल्या. दुसरे दिवशीं सकाळीं ९ वाजेपासून तोफांचा मारा किल्ल्यावर सुरू होऊन किल्ल्याचा कोट आणि बुरूज हादरून गेले. दुपारपर्यंत मोठ्या शर्थीचें युद्ध होऊन उभयपक्षीं पुष्कळ मनुष्य-हानि झाली परंतु मोगलांनीं शेवटीं किल्ला सर केला. येथें मोगलांना मुबलक धान्य व पुष्कळ खजीना मिळाला. आश्रयार्थ येऊन राहिलेल्या हजारों कुटुंबांनाहि मोगलांनीं कैद केलें. लढाऊ फौजेपैकीं सातशें लोक बाकी राहिले होते त्या प्रत्येकाचा एकेक हात कापून टाकून त्यांना सोडून देण्यांत आलें. इतर लोकांना गुलाम म्हणूनहि विकण्यांत आलें.

भूपाळगड.

इखलासखान.

या किल्ल्याच्या मदतीसाठीं शिवाजीनें सोळा हजार स्वार पाठविले होते परंतु ते वेळेवर येऊन पोहोंचले नाहींत. तथापि त्यांनीं मोगली फौजेवर छापे घालण्यास कमी केलें नाहीं. इरजखान व

बजाजी निंबाळकर हे मोगली सैन्यासाठीं धान्य वगैरे घेऊन येत होते. ती बातमी मराठी सैन्यास लागतांच तें त्यांच्यावर चालून गेलें. परंतु दिलेरखानानें इरजखानाच्या मदतीसाठीं इखलासखानास पंधराशें स्वार देऊन ताबडतोब पाठविलें. भूपाळगडापासून बारा मैलांवर मराठे व इखलासखान यांची गांठ पडली. खानानें सभोंवतालीं कोट असलेल्या एका खेड्याचा आश्रय करून मराठी फौजेवर तोफा डागिल्या, त्या योगें मराठी फौजेचा फार नाश झाला. जवळ जवळ एक हजार मराठे कामास आले. इतक्यांत दिलेरकडून इखलासखानाच्या मदतीसाठीं आणखी फौज येऊन दाखल झाली ती पाहून मराठे तेथून पळून गेले. नंतर दिलेरखानानें भूपाळगडावरील अवजड सामानास आग लावून जाळून टाकिलें, किल्ल्याचे बंदोबस्ताचे कोट वगैरे पाडून टाकिले व तो धुलखेडास परत गेला.

इरजखान.

इखलासखानाशीं लढत असतां त्याच्या मदतीस आणखी सैन्य आल्याचें पाहून मराठे पळाल्याचें वर सांगितलें आहे. पळतां पळतां त्यांस करकंब येथें इरजखान सांपडला. त्यावर ते एकदम तुटून पडले व त्याच्या जवळील दाणागोटा सगळा त्यांनीं लुटून घेतला व त्याला थोडक्या लोकांनिशीं पळावयास लाविलें. तो एका लहानशा किल्ल्यांत आश्रयार्थ शिरला. तेथील किल्लेदार मीर महंमदखान यानें त्याचा बचाव केला म्हणून तो वांचला. नाहीं तर तो यावेळीं मारलाच गेला होता. तारीख २ एप्रिल सन १६७९ रोजीं दिलेरखानानें भूपाळगड घेतला. परंतु त्यानंतर त्याचें विजापुरी सरदारांशीं वांकडें पडलें. विजापुरांतहि मसाउदाचें शर्जाखान, दिलेर आणि व्यंकटाद्रि मुरारी यांच्याशीं भांडण सुरू होऊन यादवी माजली. त्यामुळें सर्वांचे मनोरथ जागच्या जागींच विरून गेले.

जिजिया.

औरंगजेबानें जिजिया नांवाचा एक कर मुसलमानेतरांवर नुकताच बसविला होता. त्या कराबद्दल नापसंति दर्शविणारें जोरदार व सयुक्तिक असें एक पत्र शिवाजीनें औरंगजेबास याच म्हणजे सन १६७९ च्या मध्याच्या सुमारास पाठविलें. हें पत्र वक्तृत्वपूर्ण असून पर्शियन भाषेंत लिहिलेलें आहे. या पत्राचा मसुदा नील प्रभूनें तयार केला होता. तें पुढें पुढें दिलें आहे.

संदर्भ.

८ **शिवाजीचें औरंगजेबास पत्र:**—" अलमगीर पादशहा यांसी—हा निश्चयी व निरंतरचा शुभचिंतक परमेश्वर दयेबद्दल सूर्यप्रकाशाहूनहि उज्ज्वल अशा पादशहाच्या कृपेचें आभार

मानून नम्रतापूर्वक कळवितो कीं, जरी पादशहाचा सेवक प्रतिकूल दैवयोगानें पादशहाची रजा घेतल्याशिवाय पादशहाच्या चरणापासून निघून आला व हुजूरच्या प्रतापशाली सान्निध्याला मुकला आहे, तरी स्वामिभक्तीचें व कृतज्ञतेचें कोणतेंहि कर्तव्य बजाविण्यास तो केव्हांहि अत्यंत उत्कटतेनें एका पायावर तयारच आहे.

लायकी.

हिंदुस्थानांतील राजेरजवाडे, खान, अमीर व राव हे राज्यासंबंधीं माझी उत्कृष्ट नोकरी व सोज्वल निष्ठा जाणत आहेत. इतकेंच नव्हे, पण इराण, मध्य एशिया, तुर्कस्थान व सीरिया येथील राज्यकर्ते, पृथ्वीवरील सर्व प्रजाजन आणि खुष्कीच्या मार्गातील प्रवासी व जलपयटन करणारेसुद्धां जाणत आहेत. बहुधा ही माझी नौकरी व निष्ठा हुजूरच्या उदार अंतःकरणालाहि पटली असेलच. म्हणून हुजूरची मर्जी संपादन करण्यासाठीं व आणखी उत्तम नौकरी बजाविण्याच्या हेतूनें मी पुढें सांगितल्याप्रमाणें सार्वजनिक कल्याणाच्या बाबतीचा अर्ज हुजूरपुढें नम्रतापूर्वक सादर करीत आहें.

भिन्न कारकीदा.

नुकतेंच माझ्या असें ऐकण्यांत आलें आहे कीं, माझ्याशीं युद्ध चालविण्यांत हुजूरच्या हजारों रुपयांचा चुराडा झाल्यामुळें रिकामा झालेला खजिना भरून काढण्यासाठीं जिजिया नांवाचा एक नवीन कर हिंदूंवर लादण्यांत येऊन त्याच्या उत्पन्नांतून साम्राज्याच्या गरजा भागविण्यांत येणार आहेत. साम्राज्यसंस्थापक जलालुद्दिन अकबर पादशहांनीं बावन (चांद्र) वर्षेंपर्यंत सार्वभौम नात्यानें राज्य केलें. त्यांनीं साम्राज्यांतील ख्रिस्ती, ज्यू, मुसलमान, फलाकी, मलाकी, अन्सारी, दहरी, ब्राह्मण व जैन साधू, दादूचे भक्त इत्यादि अनेकविध धर्मीयांना शांततेनें वागविण्यासाठीं आश्चर्यकारक राजनीति प्रकट केली. सर्व लोकांचें संरक्षण व संभाळ करणें हा त्यांच्या उदार अंतःकरणाचा हेतु असल्यामुळें जगद्गुरु या नात्यानें त्यांची प्रसिद्धी झाली. या नंतर दुसरे पादशहा नुरुद्दीन जहांगीर, यांनीं बावीस वर्षेंपर्यंत जगाला व त्यांतील रहिवाश्यांना आपल्या कृपाछत्राखालीं घेतलें व मित्रांना मदत देऊन व कार्यकर्त्यांना कर्तव्यतत्पर करून आपल्या इच्छा तृप्त केल्या. तिसरे पादशहा शहाजहान, यांनीं बत्तीस वर्षेंपर्यंत जगावर साम्राज्यसत्ता चालवून कीर्तिरूपानें अमरत्व प्राप्त करून घेतलें. त्यांच्या वेळेस जगावर जें सुख नांदत होतें, त्यामुळें त्यांच्या शुद्ध कीर्तीचें व भलेपणाचें याहून दुसऱ्या शब्दांनीं वर्णन करतां येणेंच शक्य नाहीं. कारण कवीनें म्हटलेंच आहे कीं, ज्यानें जन्मभर सत्कीर्तीच मिळविलेली

असते त्यानेंच शाश्वत संपत्ति प्राप्त करून घेतलेली असते, कारण त्याच्या पश्चात् त्याच्या सत्कृत्याच्या स्मरणानेंच त्याचें नांव अमर रहातें.

मूरतसे कीरत बडी बिनपंख उड जाय ।
मूरत तो जाती रही पण कीरत कभू न जाय ॥

अकबराच्या उदात्त शीलाचा यशःप्रद परिणाम होत असल्यामुळें त्याच्या सदि-

धमकी.

च्छचा कटाक्ष जिकडे जिकडे पडत असे, तिकडून तिकडून कीर्ति आणि विजयश्री त्यास माळ घालण्यासाठीं धांवत येत असत. त्याच्या कारकीर्दीत पुष्कळ मुलुख व किल्ले हस्तगत झाले. त्याच्या राजनीतीचें फक्त अनुकरण करण्यांतहि अलमगीर पादशहास अपयश आलें व ते गोंधळून गेले. यावरून त्यांची सत्ता व शक्ति यांचें सहज अनुमान होईल. त्यांनाहि जिझिया कर बसविण्याचें सामर्थ्य होतें; परंतु त्यांनीं आपल्या अंतःकरणांत हेकेखोरपणाला कधींहि थारा दिला नाहीं. कारण त्यांची अशी भावना असे कीं, उच्च व नीच अशीं सर्व प्रकारचीं मनुष्यें परमेश्वरानें उत्पन्न केलीं असून तीं विविध पंथ व भिन्न प्रकृति यांचीं निसर्गसिद्ध जिवंत उदाहरणेंच आहेत. या तीन पादशहांचा दयाळूपणा व त्यांची परोपकार बुद्धि यांनीं त्यांचें स्मारक कालपटावर लिहून ठेविल्यामुळें या तीन पुण्यात्म्यांची प्रार्थना व स्तुति लहान थोर अशा सर्व हृदयांत स्फुरण पावून वास करीत आहे. भरभराट हें सद्हेतूचें फळ आहे. त्यांच्या कारकीर्दीत परमेश्वराच्या सृष्टीला शांतता व सुरक्षितता यांच्या पाळण्यांतच जणूं झोंके घेत असल्याचें सौख्य प्राप्त झाल्यानें, त्या पादशहांचीं इच्छित कार्यें परिपूर्ण झालीं व त्यांची संपत्ति आणि त्यांचें एश्वर्य यांचा सतत उत्कर्षच होत गेला. परंतु आपल्या कारकीर्दीत आपले पुष्कळ किल्ले आणि आपला प्रदेश आपल्या हातांतून गमावला असून बाकी राहिलेलाहि लवकरच गमावेल; कारण त्यांची नासधूस व धूळधाण करण्यासाठीं मी शक्य तितके प्रयत्न नेटानें करणारच आहें. आपल्या शेतकऱ्यांची पायमल्ली झाली असून आपला मुलुख उद्ध्वस्त झालेला आहे. ज्या प्रांतांतून लक्ष रुपयांचा वसूल व्हावयाचा तेथें हजारच वसूल होऊं लागले आहेत व जेथें हजार वसूल व्हावयाचे तेथें दहा उत्पन्न होत आहेत. आणि हें कमी झालेलें प्रमाणसुद्धां मोठ्या मिनतवारीनें अप्रत्यक्ष वसूल होत आहे. दारिद्र्याची मजल पादशहाच्या व राजेरजवाड्यांच्या घरांपर्यंत जेथें पोंचली आहे, तेथें अमीरउमरावांची व रयतेची काय स्थिति असेल बरें ? सैन्याकडे पहावें तों सर्व शिपाई लोक कुरकुर करीत राहिलेलाहि लवकरच गमावेल; कारण त्यांची नासधूस व धूळधाण करण्यासाठीं मी शक्य तितके प्रयत्न नेटानें करणारच आहें. आपल्या शेतकऱ्यांची पायमल्ली झाली असून आपला मुलुख उद्ध्वस्त झालेला आहे. ज्या प्रांतांतून लक्ष रुपयांचा वसूल व्हावयाचा तेथें हजारच वसूल होऊं लागले आहेत व जेथें हजार वसूल व्हावयाचे तेथें दहा उत्पन्न होत आहेत. आणि हें कमी झालेलें प्रमाणसुद्धां मोठ्या मिनतवारीनें अप्रत्यक्ष वसूल होत आहे. दारिद्र्याची मजल पादशहाच्या व राजेरजवाड्यांच्या घरांपर्यंत जेथें पोंचली आहे, तेथें अमीरउमरावांची व रयतेची काय स्थिति असेल बरें ? सैन्याकडे पहावें तों सर्व शिपाई लोक कुरकुर करीत

आहेत, व्यापारी रडत आहेत, मुसलमान नाखूष, हिंदु निराश्रित व कोट्यवधि लोक इतके कंगाल झाले आहेत कीं, एक वेळ रात्रीचें जेवणहि मिळणें त्यांस मुष्किल झालें आहे. सर्व लोक दुःखानें, निराशेनें व त्वेषानें आपलीं डोकीं रात्रंदिवस पिटीत आहेत. प्रजेच्या संकटमग्न परिस्थितींत तिजवर जिझिया कर लादण्यास आपलें राजकीय शील प्रवृत्त तरी कसें झालें? ही आपली दुष्कीर्ति पृथ्वीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पसरेल व हिंदुस्थानच्या पादशहास गरीब बिचाऱ्या हिंदु साधूंचा मत्सर वाटत असल्यामुळें तो ब्राह्मण, जैन, साधू, योगी, संन्यासी, बैरागी, भिक्षेकरी, गोसावी इत्यादिकांवर कर लादीत आहे, दुष्काळ पीडितांवर तो आपलें शौर्य गाजवीत आहे व आपल्या तैमूरच्या सुप्रसिद्ध नांवाकडेस दुर्लक्ष करून एकांतवासी व निरुपद्रवी साधुसंतांवर आपल्या शक्तीचा तो प्रयोग करणार आहे, अशी त्याची दुष्कीर्ति सर्वतोमुखीं होऊन राहील. महाराज, ईश्वरप्रणीत धर्मपुस्तकावर (कुराणावर) जर आपला कांहीं भरंवसा असेल, तर त्यावरून महाराजांस समजेल कीं, ईश्वर हा एकंदर सर्व मानवजातीचा देव आहे. केवळ मुसलमानांचाच तो देव नाहीं. त्याच्या दृष्टीनें मुसलमान व: मुसलमानेतर लोक सारखेच आहेत. रंगभेद त्याच्याच आज्ञेनें झाला आहे. सर्वांस तोच देतो. आपल्या मशीदींतून आपण नामघोष करून स्तवन करितां आणि ज्या आमच्या देवालयांत मूर्तीपुढें घंटा वाजविल्या जातात, तेथेंहि त्याच प्रभूचें पूजन होतें. दुसऱ्या लोकांच्या धर्मास किंवा चालीरीतीस नांवें ठेवणें म्हणजे त्या सर्व शक्तिमान् प्रभूच्या कृतीस धाब्यावर बसविण्यासारखें आहे. एकाद्या चिताऱ्याचें चित्र जर आपण बिघडविलें तर आपणांवर त्याचा साहजिकपणें किती बरें राग होतो! म्हणूनच कवीनें म्हटलें आहें कीं, ईश्वरानें जीं नाना तऱ्हेचीं कामें निर्माण केलीं आहेत, त्यांस नांवें ठेविण्याचें धाष्टर्य करूं नका !

सारांश हिंदु लोकांवर जो पादशहांनीं कर लादला आहे तो न्यायास अनुसरून नाहीं. एकादी सुंदर तरुणी सुवर्णालंकार अंगावर घालून एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत ज्या राजाच्या कारकीर्दीत निर्भयपणें व सुरक्षितपणें प्रवास करूं शकते, त्याच राजाला असले कर कदाचित् बसवितां येतील. परंतु हल्लींच्या दिवसांत मोठमोठीं शहरें जेथें दिवसाढवळ्या लुटलीं जात आहेत, तेथें रानावनांच्याबद्दल तर बोलावयासच नको. शिवाय हा अगदीं नवीनच प्रकार असून हिंदुस्थानच्या कायद्याचें यानें उल्लंघन होत आहे व यामुळें देशास दारिद्र्य प्राप्त होणार आहे. स्वधर्माच्या कळकळीमुळें जर आपण

इच्छा.

हा कर हिंदूंवर लादण्याचा निश्चयच केला असेल, तर न्याय्य दृष्टीनें हिंदूंमध्यें श्रेष्ठ व प्रमुख म्हणून ज्याची गणना आहे, त्या राजसिंहावर प्रथम या कराची अंमल बजावणी व्हावी. नंतर पादशहांनीं या हितचिंतकाकडे वळावयाचें होतें. कारण मजपासून कराचा वसूल करण्यास पादशहास मुळींच अडचण पडणार नाहीं. गरीब मुंग्यामाशांस त्रास देणें आपल्यासारख्या शूर व उदार अंतःकरणास अयोग्य आहे. आपला मान व मरातब कशा रीतीनें राखावा यासंबंधानें प्रधानमंडळानें हुजुरास योग्य सल्ला देण्यास हयगय केल्यामुळें–म्हणजे जणूं काय प्रदीप्त विस्तव गवताच्या काड्यांनीं झांकण्याचा मूर्खपणाचा प्रयत्न केल्याबद्दल–मला आश्चर्य वाटतें !

हुजूरचा प्रतापसूर्य मोठेपणाच्या क्षितिजावर अखंड तळपत राहो ! ”

मैत्री.

९ दिलेरची विजापुरावर स्वारीः—दिलेरखानानें विजापुरावर स्वारी करण्याचा निश्चय करून तारीख १८ ऑगस्ट १६७९ रोजीं धुळखेडाजवळ भीमा ओलांडिली व मसाऊदशीं युद्ध सुरू केलें. मसाऊदची स्थिति आतां मोठी केविलवाणी झाली होती. त्यानें हिंदुरावाबरोबर एक पत्र देऊन त्यास शिवाजीकडेस पाठविलें. त्या पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर होता; “अदिलशाहीची सध्यां काय दुर्दशा आहे ती तुम्हांस ठाऊकच आहे. आमच्याजवळ सैन्य नाहीं, सैन्य उभारण्यास द्रव्य नाहीं, किल्लयावर दारूगोळा अगर बेगमी नाहीं आणि किल्लयांचें संरक्षण करण्यास आमचा कोणी कैवारी नाहीं अशी दीन स्थिति या राज्याची झालेली आहे. आणि राज्याचा शत्रू बलिष्ट असून आमच्याशीं युद्ध करण्याचा त्याचा निश्चय झालेला आहे. तुम्ही या राज्याचे पिढीजात सेवक असून तुमची उन्नति याच राज्यामुळें झालेली आहे. अर्थात् या राज्याबद्दल दुसऱ्या कोणाहिपेक्षां तुम्हांसच अधिक आपलेपणा वाटणार आहे. आतां आमच्या एकट्याच्यानें या राज्याचें संरक्षण होणें मुळींच शक्य नाहीं. तरी निमकहलाल होऊन आमच्या मदतीस धांऊन यावें अशी प्रार्थना आहे. तरी तुमची जी इच्छा असेल ती तत्काळ कळवावी म्हणजे त्याप्रमाणें एकदम इकडून व्यवस्था करण्याची तजवीज होईल.”

मदत.

कुत्बशहा यावेळीं मोगलांच्या विरुद्ध जाऊन अदिलशहास उघडपणें सहाय्य करण्यास सिद्ध नव्हता. तथापि तो गुप्तपणें शिवाजीस द्रव्य सहाय्य देण्यास खुषी होता. शिवाजीनें विजापुरकरांस मदत करण्याचा निश्चय करून एकदम दहा हजार स्वार मसाउदाच्या सहाय्यास पाठवून दिले. त्याचप्रमाणें दोन हजार बैलांवर धान्यहि रवाना केलें व विजापुरास दुष्काळ

भासूं नये म्हणून आपल्या व्यापाऱ्यांनीं तिकडेस लागेल तितकें धान्य पुरवावें अशी व्यवस्था केली. आणि विसाजी नीळकंठाला मसाऊदकडेस ही खूषखबर सांगण्यास रवाना करून दिलें, व असा निरोप पाठविला कीं, "तुम्हीं किल्ल्याचें संरक्षण उत्तम प्रकारें करा, मी दिलेरखानाची खबर घेतों." विसाजी नीळकंठानें आणखी असेंहि कळविलें कीं, शिवाजीनें आपल्या सैन्याचे दोन भाग करून एक पांच हजारांची तुकडी ऐनापुर येथें पाठविली असून दुसरी पांच हजारांची तुकडी भूपालगड येथें ठेविली आहे. जरूर लागेल तेव्हां तिलाहि बोलावून घ्यावें असा एकंदर बेत आहे.

सुजनसिंग.

मोगलांचा सरदार सुजनसिंग यानें सन १६७९ च्या सप्टेंबरच्या सुमारास मंगळवेढें घेऊन विजापुराजवळ मुक्काम केला. मोगलांच्या सैन्यास जाऊन मिळालेला संभाजी या वेळीं फौजेंतील घोड्यास घासदाणा मिळविण्यासाठीं विजापुरच्या जवळपास एका तुकडीसह फिरत होता. मसाउदानें साबाजी घाटग्यास कांहीं सैन्यासह इदीस पाठविलें. त्याची व संभाजीची रस्त्यांत चकमक झडून प्रत्येक बाजूचीं पंधरा पंधरा माणसें कामास आलीं व स्वतः घाटगेहि जखमी झाला. तथापि त्यानें ५० घोडे, ५० बैल आणि ४ उंट पकडून आणिले. याच सुमारास शिवाजीचा सेनापति आनंदराव हा अडीच हजार स्वारांनिशीं विजापुरास जाऊन पोहोंचला. मसाउदानें त्यांचा योग्य सत्कार करून विजापुरच्या उपनगरांत नसरापुर येथें त्यांना मुक्कामास स्थळ दिलें. शिवाजीचा व्याही बजाजी निंबाळकर या वेळीं मोगलांच्या चाकरींत होता. त्यानें अकलूजच्या किल्ल्यास वेढा दिला होता. परंतु विजापुरकरांचा सरदार बहादुरखान यानें सांगोल्याहून निघून बजाजीवर चालून जाऊन त्यास अकलूजहून हाकून लाविलें.

सहाय्य.

तारीख १५ सप्टेंबर रोजीं दिलेरखान धूळखेडहून निघून तारीख ७ ऑक्टोबर रोजीं विजापुराजवळ ६ मैलांवर येऊन त्यानें मुक्काम केला. आणि मसाउदाच्या वकीलाशीं बोलणें चालविलें. तारीख ३० ऑक्टोबर रोजीं दहा हजार स्वारांसह शिवाजी पन्हाळा व विजापुर यांच्यामध्यें सेलगूर येथें येऊन पोंचला. दुसरे दिवशीं नवरसपुरा माग टाकून तो पुढें निघाला. शिवाजीच्या मनांतून प्रत्यक्ष अदिलशहास भेटावयाचें होतें. व फक्त पांचशें लोकांनिशीं किल्ल्यावर येऊन शहास भेटावें अशी परवानगी मसाउदानें दिलीहि. परंतु अशा रीतीनें आपला जीव धोक्यांत घालणें योग्य नव्हे असें मोरोपंत पेशव्यानें परोपरीनें सांगून भेटीचा बेत रहित करविला.

पुढें तारीख ४ नोव्हेंबर १६७९ रोजीं शिवाजीनें आपल्या सैन्याचे दोन भाग करून आठ नऊ हजार सैन्यासह तो स्वतः मुस्ला व अलमाला या रस्त्यानें निघून गेला व बाकीच्या दहा हजार स्वारांसह आनंदरावास त्यानें मान नदीच्या किनाऱ्यानें सांगोल्यावरून मोगलांचा मुलुख लुटण्यास पाठवून दिलें. अशा रीतीनें मोगली मुलुखास उपद्रव पोंचतांच दिलेरखान त्याच्या संरक्षणास धांवून येईल असें शिवाजीस वाटत होतें. परंतु दिलेरखानाचें सगळें चित्त या वेळीं विजापुराकडेस वेधले होतें. मराठ्यांची लुटालूट कायमचीच आहे असें समजून त्यानें आपला रोख विजापुरावरच धरिला होता.

धामधूम.

१० दिलेरखानाचा उच्छाद व संभाजीचें पुनरागमनः—इकडे विजापुरच्या वेढयांत दिलेरचा पूर्ण हिरमोड झाला. त्यानंतर मसाउदाशीं त्यानें तहाची वाटाघाट केली परंतु तींतहि कांहीं निष्पन्न झालें नाहीं. म्हणून १४ नोव्हेम्बर रोजीं तो विजापुरचा नाद सोडून मिरज पन्हाळ्याकडील स्वराज्याचा मुलुख लुटण्यास निघून गेला. असें करण्यांत मोगली मुलखांत लुटालूट करीत फिरत असलेल्या शिवाजीला शह द्यावा असा दिलेरचा स्पष्ट हेतु होता. याच सुमारास मिरजेचा नायक मोगलांस मिळाला होता. आणि मराठी फौजेच्या जोरावर महाराष्ट्रांतील किल्ले आपण सहज हस्तगत करूं अशा बाता संभाजी मारीत होता. त्यामुळें स्वराज्याचा मुलुख लुटण्यास दिलेरखानास अधिकच स्फुरण चढलें होतें.

दिलेरचा बेत.

येथून निघून जाण्यापूर्वी अदिलशाही प्रदेशाचा अगदीं विध्वंस करून टाकावयाचा हें दिलेरखानाचें मुख्य काम होतें. म्हणून तो बहमनहली, मकनापूर, जलगेरी या रस्त्यानें, संपन्न अशा तिकोटा गांवीं जाऊन बसला. येथें पुष्कळ श्रीमंत हिंदुमुसलमान वसतीस येऊन राहिले होते. दिलेरखानाचा सरदार इखलासखान हा अचानकपणें तिकोटा लुटूं लागला, हें पाहतांच तेथील हिंदुमुसलमानांच्या स्त्रियांनीं कडेवरील मुलांसह भराभर विहिरींत उड्या टाकून जीव दिले. मोगलांनीं तिकोटा लुटून अगदीं उद्ध्वस्त करून टाकिला. आणि तीन हजार हिंदुमुसलमानांना कैद करून त्यांस गुलाम म्हणून विकण्यास घेऊन गेले. ता. १८ नोव्हेंबर रोजीं मोगलांनीं तिकोटा सोडला. व होनवड आणि तेलसंग या रस्त्यांनीं ते अथणीला गेले. जातांना त्यांनीं मार्गांतील प्रांत लुटून शेकडो लोकांस कैद करून नेलें. अथणी येथेंच दिलेरखान व संभाजी यांचें बिनसलें असें इंग्रजी पत्रावरून कळतें. अथणी गांवीं सर्व वसती हिंदूंचीच होती. दिलेरनें

नाश.

हा सगळा गांव लुटून जाळून पोळून टाकिला व येथील सगळ्या लोकांना गुलाम म्हणून विकण्याचें ठरविलें. संभाजीला हें अर्थात्च आवडलें नाहीं, व त्यानें दिलेरला हरकत केली. परंतु दिलेरनें तिकडेस लक्ष दिलें नाहीं, त्यामुळें संभाजीस वैषम्य वाटून त्याला दिलेरचा वीट आला. तारीख २१ नोव्हेंबर १६७९ रोजीं दिलेर अथणीहून ऐनापुरास जाण्यास निघाला. परंतु मार्गांतच, संभाजी आपणांस सोडून विजापुरास निघून गेला असें त्याला कळलें.

पुनरागमन.

सन १६७८ च्या डिसेंबरांत संभाजी मोगलाकडेस आला. तेव्हांपासून शिवाजीनें त्याच्याकडेस अनेक माणसें पाठवून त्यानें परत यावें अशासाठीं सारखे प्रयत्न चालू ठेविले होते. त्याला अनेक वचनें व प्रलोभनेंहि दाखविण्यांत आली होतीं. त्याचा मेहुणा महादाजी निंबाळकर या वेळीं मोगलांच्याच सैन्यांत चाकरीस होता. त्यानेंहि संभाजीस त्याच्या या कृत्याबद्दल दोष दिला होता. संभाजीनें महादाजीचें हें वर्तन दिलेरखानाच्या कानावर घातल्यामुळें दिलेरनें महादाजीस कांहीं दिवस कैदेंतहि ठेविलें, परंतु याच सुमारास संभाजी निसटून गेला. "(औरंगजेब) पातशहांनीं विचार केला कीं, (संभाजीस) हुजूर आणून कैदेंत ठेवावा. ऐसा विचार करून दिलेरखानास लिहून हुकुम पाठविला कीं, संभाजी राजियास घेऊन हुजूर येणें. तों अगोदर दिलेरखानाचा वकील पातशहाजवळ होता, त्यांनीं हें वर्तमान खानास लिहून पाठविलें. तें वर्तमान खानास कळतांच संभाजी राजियास सूचना करून पळविलें."* तारीख २० नोव्हेंबर रोजीं रात्रीं पत्नी येसूबाई व दहा स्वार बरोबर घेऊन संभाजी अथणीहून गुप्तपणें निसटला व दुसरे दिवशीं सबंध दिवसभर घोडीं पिटाळून विजापुरास येऊन दाखल झाला. मसाउदानें संभाजीचा उत्तम प्रकारें सत्कार केला. संभाजी पळाल्याची बातमी दिलेरखानास दुसरे दिवशीं म्हणजे तारीख २१ नोव्हेंबर रोजीं तो अथणीहून ऐनापुरास जात असतां वाटेंत कळली. लागलीच तो परत फिरला व विजापुराकडेस गेला. आणि त्यानें आपला हस्तक खाजा अबदुल रजक यास तारीख २८ डिसेंबर रोजीं मसाऊदकडेस पाठवून पुष्कळशी लांच देऊन संभाजीस स्वाधीन करून घेण्याचा प्रयत्न केला. संभाजीस कपटाचा वास येतांच तो रात्रीचा विजापुराहूनहि निसटला. त्याला घेण्यासाठीं शिवाजीनें कांहीं स्वार अगोदरच पाठविले होते. त्यांस तो भेटला व त्यांच्यासह तारीख ४ डिसेंबरच्या सुमारास सुखरूपपणें पन्हाळ्यास येऊन दाखल झाला.

* सभासद.

११ शिवाजीची शेवटची स्वारीः—तारीख ४ नोव्हेंबर सन १६७९ रोजीं शिवाजी सेल्गूरहून पुढें चालून गेला इतकी हकीकत मागें पृष्ठ २३५ वर आली असून त्यापुढील वृत्तांत आतां कथन करावयाचा आहे. या वेळीं शिवाजीजवळ अठरा हजार उत्तम लढाऊ स्वारांचें सैन्य होतें. त्यांचे दोन भाग करून दुसरा, आनंदरावाच्या हाताखालीं दिला. याप्रमाणें शिवाजी व आनंदराव असे उभयतां दोनहि बाजूंनीं मोगलांच्या मुलुखांत शिरून सपाटून लुटालुट करूं लागले. त्यांनीं पुष्कळ गांवें लुटून जाळून टाकिलीं व अगणित संपत्ति लुटींत मिळविली. नोव्हेंबरच्या मध्याच्या सुमारास यांनीं औरंगाबादेच्या पूर्वेस ४० मैलांवर असलेलें श्रीमंत व व्यापारी असें जालना शहर ताब्यांत घेऊन मनसोक्तपणें लुटलें.

जालना.

जालना येथें सय्यद जान महंमद नांवाचा एक फकीर राहात असे. जालना गांवाबाहेर याचा विस्तीर्ण मठ व बाग असे. शिवाजी आपल्या स्वारींत साधुसंतांना कधींहि त्रास देत नसे अशी त्याची प्रसिद्धी झाली असल्यानें जालना येथील पुष्कळ श्रीमंत कुटुंबें आपल्या मालमत्तेसह त्या फकीराच्या बागेंत येऊन राहिलीं होतीं. प्रत्यक्ष जालना शहराच्या लुटींत विशेष कांहीं प्राप्त झालें नाहीं असें पाहून मराठी फौज फकीराच्या मठाकडेस गेली व तेथें तिनें लुटालूट आरंभिली. फकीरानें पुष्कळ विनवून पाहिलें परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां त्यानें संतापून शिवाजीस शाप दिला व यामुळेंच पुढें सहा महिन्याचे आंत शिवाजी मरण पावला अशी समजूत प्रचलित आहे.

फकीर.

जालनाच्या लुटीमध्यें सोनेंरुपें, जडजवाहीर, कापडचोपड, हत्ती, घोडे आणि उंट यांची अगणित प्राप्ति शिवाजीस झाली. कारण हें लुटीचें काम सतत चार दिवस चाललें होतें. एवढी प्रचंड लूट घेऊन शिवाजी परत जात असतां त्याच्या पिछाडीवर रणमस्तखान चालून गेला. पांच हजार स्वारांसह सिदोजी निंबाळकरानें त्याला तीन दिवस अडवून धरिलें. परंतु शेवटीं सिदोजी मारला गेला. आणि औरंगाबादेहून पुष्कळ सैन्य रणमस्तखानाच्या मदतीसाठीं केसरीसिंग आणि सरदारखान यांच्या हाताखालीं पाठविण्यांत आलें. 'आपण खानाच्या मदतीस येत आहोंत. तरी तुम्हीं तत्काळ पळून जावें.' असा निरोप केसरीसिंगानें गुप्तपणानें शिवाजीस पाठविला असें म्हणतात. ही अधिक मदत येत असल्याचें पाहून बहिरजी नायकाचे मदतीनें तीन

पलायन.

अहोरात्र प्रवास करून मराठी सैन्य एकदांचें मोगलांच्या तडाख्यांतून निसटलें. तथापि पुष्कळशी लूट त्यांना गमवावी लागली. त्यांचे चार हजार स्वार मारले गेले व सेनापति आनंदरावही जखमी झाला. सारांश जालनाच्या स्वारींत म्हणण्यासारखें यश शिवाजीस प्राप्त झालें नाहीं. जालनाहून निघाल्यावर मराठी सैन्य पट्टयास तारीख २२ नोव्हेंबर रोजीं आलें. तेथें कांहीं दिवस विश्रांति घेतल्यावर डिसेंबरच्या प्रारंभीं शिवाजी रायगडास आला व सगळा डिसेंबर महिना त्यानें तेथेंच विश्रांतींत काढिला असें दिसतें.

मानसीक व्याधि.

१२ कौटुंबिक क्लेशः—मोगलांचा आश्रय सोडून संभाजी परत आला ही बातमी डिसेंबरच्या आरंभींच शिवाजीस कळतांच त्याची मोठी काळजी दूर झाली आणि डिसेंबरच्या अखेरीस तो संभाजीस भेटण्यास व उपदेशपर चार शब्द सांगण्यास पन्हाळ्यास आला. नवीन स्थापन केलेलें मराठी साम्राज्य आपल्या पश्चात् किती धोक्यांत येणार आहे हें संभाजीच्या बंडामुळें चांगलेंच प्रत्ययास आलें. शिवाजीला भविष्यत् कालांत निराशेचा अंधकार दिसूं लागला, संभाजीच्या वर्तनानें तो अगदीं विषण्ण होऊन गेला. संभाजीसारखा अविचारी, दुष्ट, स्वैर आणि दुराचारी राजा महाराष्ट्राच्या राज्यावर आपल्या पश्चात् बसणार ही कल्पनाच शिवाजीला उद्वेगकारक वाटूं लागली. बरें, संभाजीला राज्यावर न बसविलें तर अवघ्या दहा वर्षांच्या राजारामाला गादीवर बसविणें भाग आहे. व असें जर झालें तर प्रतिनिधिमंडळ नेमून सर्व राज्य त्याच्या स्वाधीन करावें लागणार आणि राजाराम हा नांवालाच फक्त राजा होणार! बरें, प्रतिनिधिमंडळ नेमिलें तरी त्यांत पेशवे मोरोपंत आणि अनाजी दत्तो हे दोघे येणारच. या दोघांमध्यें तर आडवा विस्तवहि जात नसल्यानें पुढें शंभर वर्षांनीं पेशवाईमध्यें बारभाईंनीं माजविलेली यादवी शिवाजीचा मृत्यु होतांच उद्भवली असती. सारांश, आपल्या पश्चात् या राज्याची काय अवस्था होणार याची भीषण चिंता शिवाजीस या वेळीं सतत जाचूं लागली. "या सर्व राज्याचे दोन विभाग करितों. एक चंदीचें राज्य. याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी. दुसरें तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत एक राज्य आहे. ऐशीं दोन राज्यें आहेत.*" त्यांतील कर्नाटकचें राज्य संभाजीस व महाराष्ट्राचें राज्य राजारामास द्यावें असाहि विचार चालू होता. परंतु तो तसाच राहिला.

---

* सभासद.

शिवाजीनें संभाजीस पुष्कळ उपदेशहि करून पाहिला. "लेंकरा, मला सोइूं नको. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला (त्याच्या मनां-तून) दगा करावयाचा होता. परंतु श्रीनें कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य झालें. आतां तूं ज्येष्ठ पुत्र थोर झालास. आणि सचंतर राज्य कर्तव्य हें तुझ्या चित्तीं आहे असें आपणांस कळलें तर मजला हें अगत्य आहे. (असें सांगून) पिता पुत्र बैसून कुल्ल राज्य आपलें देखिलें. कर्नाटक किती आहे व खजीना काय आहे व कारखाने व मुत्सदी सरकारकुन लोक कोण कोण ? लष्कर, पागा, शिलेदार किती ? सरदार काय काय ? गड कोठें ? किती ? हशम काय ? समुद्रांतील जंजिरे, पाणियांतील जहाजें किती ? इसमांचा आकार काय ?*" वगैरे सर्व माहिति संभाजीस देऊन त्याच्या उच्च भावना जागृत करण्याचा शक्य तो प्रयत्न शिवाजीनें केला. परंतु हा सर्व प्रयत्न पालथ्या घागरीवर पाणी ओतल्या-प्रमाणें झाला हें शितावरून भाताची परीक्षा करण्यांत अग्रेसर असलेल्या शिवाजीला तेव्हांच कळल्यावांचून राहिलें नसेल. तात्पर्य, संभाजीमुळें शिवाजीचे शेवटचे दिवस मोठ्या दुःखांत गेले असें दिसतें. सन १६७९ च्या डिसेंबर नंतर शिवाजीची प्रकृति दिवसें दिवस खालावत चालली आणि आपण आतां फार दिवस वांचत नाहीं असें त्यांस निश्चितपणें वाटलें. अर्थात् राज्यांत कारस्थानें सुरू झालीं.

उपदेश.

१३ मृत्युः—तारीख २३ मार्च सन १६८० रोजीं शिवाजीस ताप येऊन रक्ताचा अतिसार झाला. हें दुखणें बारा दिवस पर्यंत राहिलें. "राजा पुण्यश्लोक, कालज्ञान जाणें. विचार पाहतां आयुष्याची मर्यादा झाली असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यांस जवळ बोलाविलें.... सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक श्रवूं लागलें. परम दुःख झालें. त्या उपरी राजे बोलिले कीं, 'तुम्हीं चुकूर होऊं नका. हा तो मृत्यु लोकच आहे. या मागें किती उत्पन्न झाले तितके गेले. आतां तुम्हीं निर्मळ सुखरूप बुद्धीनें असणें. आतां अवघे बाहेर बसा. आपण श्रीचें स्मरण करितों.' म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्री भागीरथीचें उदक आणून स्नान केलें. भस्म धारण करून रुद्राक्ष धारण केले. आणि योगाभ्यास करून आत्मा ब्रह्मांडास नेऊन दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शु॥ १५ रविवारीं (तारीख ४ एप्रिल सन १६८० रोजीं) दोन प्रहरीं काळ रायगडीं जहाला. *"

शेवट.

---

* सभासद.

मृत्युसमयीं शिवाजीचे वयास त्रेपन्नावें वर्ष चालू होतें. जालना येथील सय्यद जान महंमद या फकीराच्या शापानें हा अकालीं मृत्यु आला असें मुसलमान लोक मानितात. राजारामाची आई सोयराबाई हिनें शिवाजीस विषप्रयोग केला असें मराठी बखरींत लिहिलें आहे. सभासद याबद्दल कांहींच लिहीत नाहीं. व राजारामाच्या आज्ञेनें व आश्रयानें तयार झालेल्या बखरींत त्याच्याच मातुश्रीविरुद्ध कांहीं उल्लेख असणें संभवनीयहि नाहीं. संभाजीनें पुढें सोयराबाईवर शिवाजीस विषप्रयोग केल्याचा आरोप ठेवून तिला ठार मारिल्यानें बखरींत तसा प्रवाद असणें साहजिक आहे. परंतु संभाजीनें केलेला आरोपहि खुनशीपणाचा होता असें स्पष्ट दिसतें. राजारामास गादीवर बसविण्याची खटपट ती करीत होती म्हणून संभाजीनें तिच्यावर कांहीं तरी कड्याळ आणून तिला ठार मारिलें.

लोकवार्ता.

आतां हें खरें आहे कीं, शिवाजी आपणांस विषबाधा होऊं नये म्हणून इतर राजांप्रमाणेंच अत्यंत सावध असे. कर्नाटक स्वारीमध्यें विषाच्या उतारावरील औषधें व मालदिवचे नारळ तो वारंवार मागवीत असे हें मागें पृष्ठ २१८ वर आलेंच आहे. परंतु यावरूनहि त्यास विषप्रयोग झालाच असेल असें मानितां येत नाहीं. कारण सर्वांविषयीं सावधपण ठेविण्यांत शिवाजी अत्यंत प्रख्यात होता. त्यामुळें कोणाहि कडून विषबाधा होऊं नये अशी सावधगिरी तो ठेवीतच असला पाहिजे.

आरोपाची निष्फळता.

१४ बायकामुलें:—शिवाजीच्या बायकामुलांची माहिती येथेंच सांगून हें प्रकरण आटोपूं. शिवाजीस एकंदर आठ बायका होत्या, त्यांचीं नांवें व इतर माहिती पुढें दिली आहे.

अष्टनायिका.

१ सईबाई, निंबाळकरांची मुलगी. हिला तारीख १४ मे सन १६५७ रोजीं संभाजी झाला, व पुढें तारीख ५ सप्टेंबर १६५९ रोजीं ही निवर्तली.

२ सोयराबाई, शिर्क्यांची मुलगी. हिला तारीख २४ फेब्रुवारी १६७० रोजीं राजाराम झाला. संभाजीनें या बाईस सन १६८० मध्यें भिंतींत चिणून ठार मारिलें.

३ पुतळाबाई, मोहित्यांची मुलगी. सती गेली.

४ सकवारबाई, गायकवाडांची मुलगी. सन १६५६ च्या जानेवारींत हिचें शिवाजीबरोबर लग्न झालें. ही पुढें येसूबाई व शाहू यांच्याबरोबर मोगलांच्या कैदेंत पुष्कळ वर्षेंपर्यंत होती.

५ नांव प्रसिद्ध नाहीं. परंतु तारीख १ मार्च १६७४ रोजीं ही बाई निवर्तल्याचें नारायण शेणवी याचे पत्रांत आहे.

६–७ राज्याभिषेकाचे सुमारास तारीख ३० मे सन १६७४ रोजीं वैदिक मंत्रांनीं दोन स्त्रियांशीं शिवाजीनें विवाह केला त्या या.

८ तारीख ८ जून १६७४ रोजीं विवाह केला ती.

याप्रमाणें अष्टनायिकांची माहिती मिळते.

संतति. शिवाजीस एकंदर पांच मुलें झालीं, त्यांची माहिती पुढील प्रमाणें आहे. १ संभाजी. २ राजाराम. हे दोनच मुलगे आणि १ सखूबाई मुलगी. ही बजाजी निंबाळकराचा मुलगा महादाजी यास दिली होती. २ अंबिकाबाई, हरजी महाडकांना दिली होती. ३ राजकुमारी बाई गणोजी शिर्क्यांना दिली होती. अशा तीन मुली मिळून एकंदर पांच मुलें होतीं.

प्रकरण १४ वें

पाश्चात्यांशीं संबंध

[इंग्रजांशीं धूळभेट (स. १६६०). २ राजापुरचे इंग्रज वखारवाले शिवाजीचे कैदी (स. १६६१-६३). ३ राजापुरच्या वखारीची नुकसान भरपाई. ४ ले. उस्टिकची वकीली, सन १६७२. ५ थॉमस निकोलसची शिष्टाई स. १६७३. ६ हेनरी ऑक्संडेन याची मध्यस्थी स. १६७४. ७ राजापूरच्या इंग्रज व्यापाऱ्यांची भेट स. १६७५. ८ राजापुरच्या भरपाईचा इतिहास. ९ शिवाजी आणि पोर्च्युगीज].

इंग्रजांशीं धूळभेट. (स. १६६०):—अफजलखानाच्या वधानंतर मराठ्यांनीं दाभोळ सर केल्यावर खानाचा तेथील सुभेदार आपली व खानाची मालमत्ता तीन जहाजांत भरून राजापुरास पळून गेला. हें पाहून मराठ्यांनीं त्याचा पाठलाग करून सन १६६० च्या जानेवारीच्या आरंभींच राजापुरहि काबिज केलें, आणि त्यामुळें मराठे व इंग्रज यांच्यांत पहिला खटका उडाला. तथापि ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराला अगर तिच्या नोकरचाकरांना यामुळें शिवाजीनें कधींहि अडथळा उत्पन्न केला नाहीं. मराठे व इंग्रज यांच्यांत पुढें जें वैमनस्य उत्पन्न झालें तें, फॅक्टरीचा मुख्य जो हेन्री रेव्हिंग्टन याच्या लोभामुळें व कुटिल नीतीमुळें होय. त्याचा प्रकार असा. हेनरीचा एक हिंदी अडत्या होता. त्यानें रुस्तमेजमान यास कांहीं कर्ज देऊन त्याच्यापासून कर्जरोखा मात्र लबाडीनें कंपनीच्या नांवचा लिहून घेतला. मराठे राजापुरावर चालून आले हें पाहतांच रुस्तमचा राजापुरचा सुभेदार जहाजांत बसून पळून जाऊं लागला. तेव्हां इंग्रजांच्या अडत्यानें रेव्हिंग्टन याला सांगून आपले पैसे वसूल करण्यासाठीं त्या सुभेदारास अटकवावें अशी मसलत केली. रेव्हिंग्टन यानें लगेच डायमंड नांवाचें जहाज पाठवून सुभेदाराचें जहाज अडविलें व लबाडीनें लिहून घेतलेल्या कर्जरोख्याच्या जोरावर रक्कम वसूल करण्यासाठीं तगादा लाविला. सुभेदारानें कांहीं माल देऊन थोड्या रकमेची फेड केली. इतक्यांत शिवाजीचे घोडेस्वार जहाजें ताब्यांत घेण्यासाठीं तेथें येऊन पोहोंचले, व त्यांनीं ज्यांत सुभेदार बसला होता तें जहाजहि स्वाधीन करून देण्यास

रेव्हिंग्टन.

इंग्रजांस सांगितलें. परंतु इंग्रजांनीं तें ऐकिलें नाहीं. मराठ्यांपेक्षां इंग्रज बलिष्ठ आहेत ही गोष्ट त्या सुभेदारास ठाऊक असल्यानें आपलीं दोन जहाजेंहि त्यानें इंग्रजांस ताब्यांत घेण्यास सांगितलीं. हेन्री रॉव्हिंग्टन यानें एक जहाज ताब्यांत घेऊन त्यास "राजापुरचा व्यापारी" हें नवीन नांव देऊन त्यावर इंग्रज कप्तानाची नेमणूकहि केली.

दोरोजी.

मराठा सेनापति दोरोजी यानें जहाज आपल्या ताब्यांत मिळण्यासाठीं इंजग्रांशीं बोलणें लाविलें. परंतु रुस्तमेजमान याजकडेस आपलें जें येणें बाकी निघत आहे तें वसूल करण्यासाठीं गांवचें उत्पन्न आपणांस लावून दिल्याशिवाय आपण जहाज सोडणार नाहीं असें इंग्रजांनीं स्पष्ट सांगितलें. इंग्रजांनीं एकच जहाज आपल्या ताब्यांत घेतलें होतें. दुसरें जहाज मोठें होतें, त्यांतून तीरावरील मराठ्यांवर तोफांचा मारा करून तें जहाज खाडींत मराठ्यांच्या माऱ्याच्या बाहेर नांगर टाकून राहिलें. याप्रमाणें मराठ्यांचा आशाभंग झाल्याकारणानें त्यांनीं शेवटीं इंग्रजांचा अडत्या वालजी यास जैतापुरास पकडून कैद केलें व अफजलखानाचें जहाज ताब्यांत येईपर्यंत त्यास सोडावयाचें नाहीं असें ठरविलें.

गायफर्ड.

आपला हस्तक वालजी यास पकडल्याचें कळतांच इंग्रजांनीं मराठ्यांकडेस आपला वकील फिलिफ गायफर्ड यांस वालजीच्या सुटकेसाठीं पाठविलें. परंतु मराठ्यांनीं गायफर्ड यासहि कैद केलें आणि वालजी व गायफर्ड यांना रातोरात खारेपाटणच्या किल्लयावर नेऊन ठेविलें. इंग्रजांनीं अफझलखानाचीं जहाजें पकडून त्यांतील माल मराठ्यांना सोंपीपर्यंत त्यांची मुक्तता करण्यांत येणार नाहीं असेंहि त्यांस बजाविलें. हा एकंदर प्रकार ता. १८ जानेवारी १६६० चे सुमारास झाला.

पत्र.

तारीख १३ फेब्रुवारी रोजीं रेव्हिंग्टन् यानें शिवाजीस पत्रानें असें कळविलें कीं, "दंडाराजपुरीवर हल्ला करण्यासाठीं आम्हीं तुम्हास मदत करूं. परंतु तुम्ही आमचीं दोन माणसें विनाकारण कैद करून ठेविलीं आहेत, त्यांची मुक्तता करावी." परंतु यापूर्वीच वालजी यानें शिवाजी व रुस्तमेजमान यांस आपल्या सुटकेबद्दल विनंति अर्ज पाठविले होते, त्यावरून त्याच्या सुटकेचा हुकुम आलाहि होता. आणि त्यावरून वालजीची तत्काळ सुटका करण्यांत आली. परंतु एका लवाड ब्राह्मणानें लांच मिळविण्याच्या आशेनें गायफर्ड यास खारेपाटण किल्लयावर अडकवून ठेविलें. रेव्हिंग्टन् यानें शिवाजी व रुस्तम

यांच्या कडेस याबद्दल तक्रारहि केली. परंतु तिचें उत्तर येण्यापूर्वीच मराठे हे गायफर्ड यास खेळण्यावर घेऊन जात असल्याची बातमी रेव्हिंग्टन् यास लागली. त्यानें तत्काळ तीस शिपायांची एक टोळी पाठवून राजापुरापासून दहा मैलांवर गायफर्ड याची सुटका केली.

२ राजापुरचे इंग्रजी वखारवाले शिवाजीचे कैदी (स. १६६१-६३):—

आगळीक.

सन १६६१ च्या मार्चमध्यें मराठ्यांनीं इंग्रजांवर दुसरा हल्ला केला परंतु आपल्या नोकरांनीं तटस्थ राहण्याबद्दल कंपनीचा स्पष्ट हुकूम असतांनाहि या प्रसंगींसुद्धां इंग्रजांनींच प्रथम आगळिक केल्यानें तेच दोषी ठरतात. तें कसे हें पहाः--सन १६६० मध्यें विजापुरकरांच्या तर्फेनें सीदी जोहर यानें पन्हाळ्याला वेढा घातला असतांना राजापुरच्या इंग्रजांनीं जोहर यांस गरनाळे पुरविले इतकेंच नव्हे परंतु कांहीं इंग्रजांनीं जोहरकडे जाऊन विजापुरी सैन्यांत स्वतःचा झेंडा रोवून प्रसिद्धपणें पन्हाळ्यावर तोफांचा भडिमार करण्यास मदतहि केली. पुढें शिवाजीनें तारीख ३ मार्च १६६१ रोजीं राजापुरावर स्वारी केली तेव्हां तेथील इंग्रजांची वखार लुटून इतर लोकांबरोबर हेन्री रेव्हिंग्टन्, रिचर्ड आणि रँडाल्फ टेलर व फिलिफ गायफर्ड या चौघां इंग्रजांनाहि कैद करून नेलें.

कैदी.

हे इंग्रज कैदी राजापुर येथें असतांना शिवाजीच्या ब्राह्मण अंमलदारानें त्यांना असें कळविलें कीं, " दंडाराजपुरी घेण्यासाठीं इंग्रजांनीं मदत केल्यास त्यांस शिवाजीकडून एक चांगलें मिठागर मोबदल्यांत मिळेल. " परंतु आपणांस मोकळे सोडल्याशिवाय आपण या बाबतींत यत्किंचित्हि वाटाघाट करण्यास सिद्ध नसल्याचें इंग्रज कैद्यांनीं सांगितलें. नंतर शिवाजीनें प्रत्येक असामीचा दंड ठरवून हिंदु, इराणी, अरब, मुसलमान व हे इंग्रज या सर्व कैद्यांना वासोटा किल्ल्यावर नेऊन ठेविलें व दंड वसुलीसाठीं त्यांचा पुष्कळ छळ करण्यांत आला.

मुत्सद्दी डावपेंच.

इंग्रज कैद्यांनीं अगदीं निश्चयानें दंड देण्याचें शेवटपर्यंत कबूल केलें नाहीं. मात्र कैदेंतून मुक्त झाल्यावर दंडाराजपुरी घेण्यास आपण (शिवाजीस) मदत करूं अशा वाटाघाटी चालविल्या. या वाटाघाटीहि मोठ्या धूर्तपणाच्या असून कराराची शब्दरचना अशी खुबीची असे कीं, प्रसंगविशेषीं त्यांतून निसटून जाण्यास भरपूर सवड असे. परंतु त्यावेळचे मराठी मुत्सद्दीहि कांहीं बोळ्यानें दूध पीत नसल्यानें इंग्रजांचें हें शब्दाचें गौड-

बंगाल त्यांनीं मुळींच चालूं दिलें नाहीं. हें पाहून मग ते मराठ्यांस धाक दाखवूं लागले. ' आपणांस जर कैदेंतून मुक्त न केलें तर सुरतेचे इंग्रज औरंगजेबाच्या इच्छेप्रमाणें मोगल सेना समुद्रमार्गें दक्षिणेंत आणून उतरवितील ' अशी भीति ते घालूं लागले. परंतु त्याचाहि उपयोग झाल्याचें दिसत नाहीं. या कैद्यांनीं एकदां सोनगडावरून पळून जाण्याचाहि प्रयत्न केला होता, परंतु तो उघडकीस आल्यानें त्यांना विशेष कडकपणानें वागविण्यांत येऊं लागलें.

रावजी पंडित.

या सुमारास शिवाजीनें रावजी पंडितास सोनगडावर पाठविलें व त्यानें तेथील सर्व कैद्यांना आपल्या ताब्यांत घेऊन त्यांची योग्य ती व्यवस्था करावी असें ठरविलें. याच कैद्यांत वरील चार इंग्रज कैदी होते. त्यांस चांगल्या प्रकारें वागविण्यांत आलें परंतु त्यांच्या कैदेची मुदत मात्र त्यांना असह्य होईपर्यंत वाढविण्यांत आली. शिवाजीनें राजापुर लुटल्यावेळीं आपण सर्वस्वीं नागविले गेलों असल्यानें दंड देण्यास आपण अगदीं असमर्थ आहोंत असें त्यांनीं कळविलें. सन १६६१ च्या जून मध्यें शिवाजी कल्याण परत घेण्याच्या मोहिमेवर असल्यानें सीदीविरुद्ध इंग्रजांची मदत घेण्याचा प्रश्न थोडा मागें पडला त्यामुळें इंग्रज कैदी रायगडावर एक वर्षपर्यंत खितपत पडले होते. शेवटीं वैतागून त्यांनीं सुरतेच्या अध्यक्षास व कौन्सिलास संतापून, शिव्यागाळी करून, अपमानकारक भाषेंत लिहिलें कीं, " आमच्या सुटकेसाठीं तुम्हीं कांहीं एक करीत नाहीं. तुम्हीं स्वस्थ झोंपा घेत आहां. " यावर सुरतेच्या कौन्सिलकडून तारीख १० मार्च १६६२ रोजीं पुढील आशयाचें स्पष्ट व योग्य असें सडेतोड उत्तर लिहून गेलें. " तुम्हीं मराठ्यांच्या कैदखान्यांत स्वतःच्या कर्मानें गेलां आहांत, त्यांत कंपनीचा कांहीं एक संबंध नाहीं. शिवाजीविरुद्ध सीदी जोहराला पन्हाळ्याच्या वेढ्याच्या प्रसंगीं उघडपणें मदत केल्याचें प्रायश्चित्त तुम्हीं भोगीत आहांत. कंपनीच्या मालाचें रक्षण करीत असतांना कांहीं तुम्हांस कैद झाली नाहीं. "

प्रयत्न.

याप्रमाणें सुमारें दीड वर्षपर्यंत ते कैदेंत कुजत पडले होते. या मुदतींत त्यांच्या सुटकेसाठीं सुरतकरांनीं पुष्कळ प्रयत्न केले. शिवाजीकडेस अर्ज पाठविले, अदिलशहालाहि विनवून पाहिलें, परंतु कशाचाहि उपयोग झाला नाहीं, तेव्हां सन १६६२ च्या मध्याच्या सुमारास त्यांनीं आपल्या खलाशांस हुकूम देऊन, शिवाजी अगर अदिलशहा यांपैकीं सांपडतील त्याचीं जहाजें लुटण्यास पाठविलें. विशेषतः विजापुरची बडेसाहेबीण ज्या जहाजांतून

मक्केहून येत होती तें जहाज लुटाव असा त्यांचा कटाक्ष होता. असें केल्यानें विजापुरकर हे शिवाजीस हरप्रकारें सांगून इंग्रज कैद्यांची मुक्तता करवितील असा सुरतकरांचा अंदाज होता, परंतु तो फसला. सन १६६२ च्या नोव्हेंबरच्या सुमारास दक्षिणेंत षाइस्ताखान शिवाजीस रगडीत होता हें पाहून सुरतकर इंग्रजांनीं सुरतेच्या मोगल सुभेदाराकडेस संधान लावून त्याच्या मार्फतीनें शास्ताखानावर शिफारस मिळविण्याचा प्रयत्न केला.

मुक्तता.

वादळांत सांपडून जीं जहाजें शिवाजीच्या बंदरास लागलीं होतीं त्यांतील माल मोठा किंमती होता. तो सर्व एकत्र करून दोन जहाजांतून जैतापुरच्या बंदरांतून मक्केला पाठविण्याची व्यवस्था शिवाजीचे अंमलदार करीत होते. ही बातमी सुरतकर इंग्रजांस कळतांच त्यांनीं तीं जहाजें पकडण्यासाठीं तारीख ३ फेब्रुवारी १६६३ रोजीं कॅप्टन कॉन्व्हर्टिट याची योजना केली. परंतु इतक्या निकराला ही गोष्ट जाण्यापूर्वीच तारीख ५ फेब्रुवारी रोजीं राजापुरचा सुभेदार रावजीपंडित यानें रायगडावरून इंग्रज कैद्यांस बोलावून आणून कैदेंतून मुक्त केलें, इतकेंच नव्हे, परंतु यापुढें शिवाजीचें कृपाछत्र इंग्रजांवर कायमचें राहील असेंहि आश्वासन दिलें. चार इंग्रजांना कैद केल्याबद्दल व वखारी लुटल्याबद्दल शिवाजीचा सूड उगवावा अशी सुरतेच्या इंग्रजांची फार इच्छा होती. परंतु वेळ, सैन्य व द्रव्य यांपैकीं एकहि त्यांस त्या वेळीं अनुकूल नसल्यानें शिव्याशाप देत व हातपाय चोळीत ते स्वस्थ बसले.

वकीली.

शिवाजीचा सूड उगविणें आपल्या आवांक्या बाहेर आहे असें पाहून इंग्रज स्वस्थ बसले असें वर म्हटलें. याचा अर्थ वखारीची नुकसान भरपाई मिळविण्याचा प्रयत्न त्यांनीं सोडिला असा मुळींच नव्हे. नुकसान भरपाई मिळविण्याची मात्र त्यांनीं यानंतर शिकस्त केलेली दिसते. इंग्रजांचें मागणें विचारांत घेण्याचा प्रश्न शिवाजीनें वारंवार पुढें ढकलल्यानें हें प्रकरण पुष्कळ वर्षें पर्यंत भिजत पडलें होतें. शेवटीं शेवटीं तर इंग्रज अगदीं कंटाळून गेले. पुढें नुकसान भरपाई देण्याचें शिवाजीनें कबूल केल्यावरहि प्रत्यक्ष रक्कम हातीं पडण्याचें, वेळोवेळीं लांबणीवरच पडत गेलें, आणि शेवटीं पूर्णपणें भरपाई झालीहि नाहीं. यासंबंधींचा पत्रव्यवहार इंडिया ऑफिसमध्यें लंडन येथें आहे. तो पाहिला म्हणजे नुकसान भरपाई मिळण्याची इंग्रजांची आशा व निराशा, त्यांच्या निरनिराळ्या पण परस्परविरुद्ध युक्त्या, त्यांनीं शिवाजीकडेस पाठविलेल्या वकिलांची मालिका आणि शिवाजीच्या मृत्यूनंतर त्यांची झालेली तीव्र निराशा

इत्यादि अनेक बावती आपल्या नजरेस येतात. इंग्रज व्यापाऱ्यांनीं शिवाजीशीं दीर्घकालपर्यंत केलेल्या पत्रव्यवहारांत त्यांचे शिवाजीविषयीं परस्पर विरोधी अभिप्राय वारंवार दृग्गोचर होत. तथापि इंग्रज व्यापाऱ्यांचा या बाबतींतील दीर्घोद्योग, त्यांची श्रमसहिष्णुता व त्यांचा अभिनिवेश हे मात्र या पत्रव्यवहारांतून प्रगट झाल्याशिवाय राहत नाहींत. सारांश, मनुष्यस्वभावाची परीक्षा ही परीक्षकाच्या मनोविकारांनीं विलसित असते हेंच खरें.

३ राजापुरच्या वखारीची नुकसान भरपाई:—मुंबईकर इंग्रजांनीं सुरतकर इंग्रजांना तारीख २५ नोव्हेंबर सन १६६८ रोजीं एक पत्र लिहिलें आहे त्यावरून इंग्रज व्यापाऱ्यांचें धोरण स्पष्ट होतें. तें पत्र पुढीलप्रमाणें आहे:—

भरपाई.

"तुमच्या हुकुमाप्रमाणें शिवाजीच्या माणसांशीं आम्हीं ते भेटतील तेथें नम्रतेनें वागूं, तरंतु कोणत्याहि प्रकारचे कोलकरार मात्र त्यांच्याशीं करणार नाहीं. प्रसंगीं त्यांस कंपनीच्या नुकसानीबद्दल स्पष्टपणें कळवून ती नुकसानी त्यांचेकडून भरून मिळेपर्यंत कुठल्याहि कराराची भाषा सुरू होणें शक्य नाहीं असेंहि सांगूं. या सव गोष्टी निःसंशयपणें त्याच्या (? शिवाजीच्या) कानावर जातील यांत शंका नाहीं. परंतु त्याला वठणीवर आणल्याशिवाय तो आपण होऊन मुकाट्यानें कंपनीचें म्हणणें कबूल करील असें आम्हांस वाटत नाहीं."

तारीख १७ मार्च १६६९ च्या पत्रांत मुंबईचें कौन्सिल लिहितें, "शिवाजीच्या लोकांशीं आमचा पत्रव्यवहार आहे आणि शिवाजीच्या मुलुखांतूनच आम्हांस धान्य वगैरेंचा बराच पुरवठा होतो. सगळ्यांत जळाऊ लाकडांचा पुरवठा फारच महत्त्वाचा होय. शिवाजीनें एकदां सुमारें तीनशें रुपयांच्या आयात मालाची आमचेकडेस त्याच्या लोकांमार्फत मागणी केली. व मागणी जूज असल्यानें आम्हीं ती पुरविली."

तारीख ५ मार्च १६७० च्या पत्रांत सुरतेचें कान्सिल लिहितें, "शिवाजी व मोगल यांच्यांत नुकतीच लढाई सुरू झाली आहे त्यामुळें कंपनीच्या ज्या मागण्या शिवाजीकडेस आहेत त्यांना अडथळा आलेला दिसतो. परंतु शिवाजीला प्रसन्न करून आपल्या मागण्या त्याच्याकडेस सुरू ठेविण्यांत आळस होतां कामा नये."

जंजीऱ्याच्या सीदीशीं शिवाजीची लढाई चालू असतां इंग्रजांनीं त्यास युद्धोपयोगी सामान—विशेषतः शिसें—न दिल्यानें शिवाजी इंग्रजांवर फार रागावला व सन १६७० च्या ऑक्टोबरमध्यें त्यानें

राग.

मुंबईकर इंग्रजांना जळाऊ लांकडें मिळण्याचें बंद केलें. असें तारीख १४ ऑक्टोबर १६७० च्या मुंबईच्या पत्रावरून दिसतें. इंग्रजांची दोस्ती शिवाजी कःपदार्थ समजतो असें मुंबईकर इंग्रजांनीं ता. १२ ऑगस्ट सन १६७१ च्या पत्रानें सुरतेस कळविलें आहे.

वकील.

सन १६७१ च्या सप्टेंबरमध्यें शिवाजीनें आपला वकील मुंबईस इंग्रजांकडेस पाठविला. असें करण्यांत त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, जंजीऱ्याच्या सीदीशीं लढण्यासाठीं इंग्रजांनीं गरनाळे, दारूगोळा आणि कपची इत्यादि वस्तु शिवाजीस द्याव्यात. हें सामान शिवाजीस दिल्यास राजापुरच्या वखारीची नुकसान भरपाई आपणांस तत्काळ मिळेल असें मुंबईच्या इंग्रजांस वाटलें. त्यावरून सुरतेच्या इंग्रजांनीं मुंबईस लिहून पाठविलें कीं, "स्वराज्याच्या बंदरांत आम्हांस व्यापारास परवानगी मिळाली तर आमच्यापासून इतरांस जो लाभ होतो तो शिवाजीसहि होईल. दंडाराजपुरी जर शिवाजीच्या ताब्यांत गेली तर मग मुंबईचें बंदर मुळींच सुरक्षित राहणार नाहीं हें लक्षांत ठेवून युद्धोपयोगी सामान त्यास देण्याची टाळाटाळ करावी. आपण तें सामान देत नाहीं असें मात्र त्यास वाटतां उपयोगी नाहीं. कारण त्यायोगें आपल्यास नुकसान पोंचेल, आणि सामान देण्याचें दिरंगाईवर टाकल्यास सामानाच्या आशेनें शिवाजी आपल्या मागण्या लवकर कबूल करील."

तह.

परस्पर विरुद्ध हेतूंनीं प्रेरित होऊन ज्या वाटाघाटी चालतात त्यांचा शेवट उभय पक्षांना समाधानकारक असा कधींच होत नसतो, या नियमानुसार शिवाजी व इंग्रज यांच्यामधील तहाचें बोलणें सन १६७१ च्या डिसेंबरपर्यंत रेंगाळतच होतें. या सुमारास शिवाजी मुलुखगिरीवर निघाला हें पाहतांच इंग्रजांचा धीर खचला व त्यांनीं लेफ्टनंट उस्टिक यास वकील म्हणून शिवाजीकडेस पाठविलें. या वकीलानें कंपनीच्या दर्जास शोभेल अशा इतमामानें जावें असें ठरून त्याच्याबरोबर दुभाष्या म्हणून रामशेणवी यास पाठविण्याचें नक्की झालें.

निराशा.

परंतु नोव्हेंबरमध्येंच सुरतकर इंग्रजांना शिवाजीशीं तह ठरण्याची अगदींच निराशा वाटूं लागली. तारीख ३० नोव्हेंबर १६७१ रोजीं त्यांनीं मुंबईस लिहून पाठविलें कीं, " आम्हांपासून काय मिळवावें व आम्हांस काय द्यावें यासंबंधीं शिवाजीचे हेतू रामशेणव्यानें आम्हांस मुलुखगिरीवर निघाला हें पाहतांच इंग्रजांचा धीर खचला व त्यांनीं लेफ्टनंट उस्टिक यास वकील म्हणून शिवाजीकडेस पाठविलें. या वकीलानें कंपनीच्या दर्जास शोभेल अशा इतमामानें जावें असें ठरून त्याच्याबरोबर दुभाष्या म्हणून रामशेणवी यास पाठविण्याचें नक्की झालें.

एकांतांत मोकळेपणीं सांगितले. त्यावरून या दोनहि बाबती अगदीं अनिश्चित, स्वार्थी, भंगुर आणि परस्पर विरुद्ध आहेत. म्हणून त्यांना अनुसरून शिवाजीशीं संबंध ठेविणें कंपनीला फार धोक्याचें आहे, व हा तह होऊन कामाचा निकाल लागेल असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. तरी पूर्वीचाच आमचा विचार निश्चित करून आम्हीं असें ठरवितों कीं, कंपनीचें व युरोपियन राष्ट्राचें जें नुकसान शिवाजीच्या लुटीमुळें झालेलें आहे तें भरून मिळेपर्यंत शिवाजीचें कोणतेंहि म्हणणें कंपनीनें मान्य करूं नये. ''

खानगी.

ले. उस्टिक यानें शिवाजीजवळ कंपनीचें नुकसान भरून मागावें व स्वराज्याच्या बंदरांत व शहरांतहि कंपनीचा व्यापार फक्त २ टके जकात घेऊन निर्वेधपणें व निर्धोकपणें चालावा अशासंबंधीं शिवाजीकडून कौल घ्यावा असें कंपनीनें ठरवून त्याची रवानगी करण्याची सिद्धता केली, व त्याप्रमाणें तो तारीख १५ जानेवारी १६७२ रोजीं निघणारहि होता, परंतु इतक्यांत '' आपण पुणें बागलाणच्या बाजूस मोगली फौजेशीं लढण्यांत गुंतलों असल्यानें तूर्त इंग्रजी वकीलानें इकडेस येऊं नये'' असें शिवाजीनें स्पष्ट कळविल्यामुळें उस्टिक यास मुंबईसच खोळंबून राहावें लागलें.

विक्री.

याच सुमारास शिवाजीच्या वकीलानें सुमारें सहा हजार रुपये किमतीचें कापड कंपनीस विकण्यासाठीं मुंबईस आणिलें. हें कापड शिवाजीस सन १६७० च्या ऑक्टोबरांत सुरतेच्या लुटींत मिळालें होतें. परंतु असा माल विकत घेणें हें कंपनीस कमीपणाचें आहे असें कळवून तो माल घेण्याचें कंपनीनें प्रथम नाकारिलें. परंतु यावेळीं शिवाजीस पैशाची जरूरी असल्यानें पुष्कळ वाटाघाटी नंतर या कापडाच्या गहाणावर दोन महिन्याच्या मुदतीनें कंपनीनें शिवाजीस पंधराशें रुपये दिले. हा एकंदर व्यवहार सन १६७१ च्या डिसेंबरांत झाला.

ले. उस्टिक.

४ ले. उस्टिकची वकीली, सन १६७२:—सरते शेवटीं तारीख १० मार्च सन १६७२ रोजीं ले. उस्टिक याची रवानगी करण्यांत आली. या वकीलीहून तारीख १३ मे रोजीं उस्टिक परत आला, व तोहि निराश होऊन परत आला. शिवाजीच्या दरबारांत त्याची काय संभावना झाली यांचें पुढील प्रमाणें वर्णन केलें आहे. ''शिवाजीच्या भेटीसाठीं तासन्तास खोळंबून कंटाळून गेल्यावर एकदां व तीहि फक्त अर्धा तासच भेट झाली त्याच्या ब्राह्मण कामगारांच्या भेटीसाठींसुद्धां असेंच तिष्ठत राहावें लागलें होतें. परंतु

या उभयतांच्याहि भेटीचा फारसा उपयोग झाला नाहीं. आमची नुकसान भरपाई म्हणून शिवाजीनें पांच हजार होन देण्याचें कबूल केलें. आणि राजापूर येथें वखार उघडली तर सर्व प्रकारच्या सवलती आम्हांस देण्यांत येतील असें राजा म्हणतो."

वाटाघाट.

ही नुकसान भरपाईची वाटाघाट विफळ होण्याचें मुख्य कारण तारीख २१ डिसेंबर सन १६७२ च्या कंपनीच्या पत्रांत पुढीलप्रमाणें नमूद केलें आहे. "एक लक्ष रुपये नुकसानभरपाई शिवाजीनें आम्हांस द्यावी असें आमचें मागणें असून फक्त वीस हजार रुपयेच शिवाजी आम्हांस देण्यास कबूल आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं, कंपनीचा जो माल आमच्याकडेस आला व नोंदला गेला त्याची किंमत यापेक्षां अधिक उत्पन्नच झाली नाहीं. म्हणून आपण अधिक कांहीं एक देणार नाहीं.' आमच्या नुकसान भरपाईच्या या वाटाघाटी चालू असतांनाच कोळी राजाच्या विरुद्ध शिवाजी कांहीं कारस्थान रचीत होता व त्यासाठीं त्यानें आमच्याशीं वाटाघाट करीत असलेला (शिवाजीचा) ब्राह्मण कारभारी यांस परत बोलावून घेतलें, त्यामुळें उस्टिकहि हात हालवीत परत गेला." ही नुकसान भरपाईची मागणी इंग्रजांनीं या वेळीं मुद्दामच नेटास लाविली नाहीं असें दिसतें. कारण एका पत्रांत ते म्हणतात, "सध्यां इकडे आड व तिकडे विहीर अशी स्थिति आमची झालेली आहे. कारण तूर्त औरंगजेब बादशहा शिवाजीवर फार खवळून गेलेला आहे. आणि आमचा शिवाजीशीं पत्रव्यवहार चालू आहे हें जर त्याला कळलें तर तो आम्हांस इकडेस दक्षिणेंत त्रास देईल इतकेंच नव्हे तर तिकडेस बंगालमध्यें सुद्धां सतावून सोडील. दुसरें, आम्हांस शिवाजीसहि नाराज करतां येत नाहीं. कारण त्याच्याच राज्यांतून आम्हांस अन्नसामग्री, इमारती व जळाऊ लांकडें इत्यादि मिळत असून त्याच्या मुलुखांत आमचा व्यापारहि चांगला चालतो. म्हणून तूर्त दोघांसहि खूष ठेविण्यास नुकसान भरपाईचें बोलणें मागेंच टाकणें अवश्य आहे....राजापुरच्या इतर इंग्रजांची मालमत्ता किती व कंपनीची किती हें जाहीरच आहे. आणि इतर इंग्रजांची मालमत्ता भरून देण्यास शिवाजी मुळींच कबूल नाहीं. त्यांचा प्रश्न जर सोडून दिला असता तर कंपनीच्या नुकसान भरपाईची वाटाघाट कधींच निकालांत आली असती."

५ थॉमस निकोलसची शिष्टाई. १६७३:—सन १६७३ च्या मे पासून डिसेंबरपर्यंतच्या आठ महिन्यांत शिवाजीकडून दोन वकील मुंबईस आले. सन १६७३ च्या फेब्रुवारीमध्यें पिलाजी नांवाचा तिसरा वकील मुंबईस आला. परंतु त्यासहि तसेंच परत जावें लागलें.

निकोलस.

पुढें मे मासांत कंपनीनें थॉमस निकोलस यास वकील म्हणून पाठविण्याचें ठरविलें. त्यानें एका दलालास बरोबर घेऊन जावें व राजापुरची नुकसान भरपाई आणि हुबळीस नुकतीच शिवाजीनें जी लूट केली तीमुळें झालेल्या नुकसानीची भरपाई शिवाजीजवळ मागावी असें ठरविलें.

आदर.

तारीख १९ मे रोजीं सदतीस मनुष्यांसह निकोलस मुंबईहून रायरीस जाण्यासाठीं निघाला. त्याला रायगडावर येण्याची परवानगी तारीख २३ रोजीं मिळाली. या वेळीं शिवाजी तेथें नसल्यानें तारीख २४ रोजीं फक्त संभाजीची व त्याची भेट झाली. तारीख २ जून १६७३ रोजीं शिवाजी रायगडावर परत आला व दुसरे दिवशीं त्यानें निकोलस यास भेटीस बोलाविलें. शिवाजी राजानें निकोलस यास हातीं धरून आपल्या डाव्या बाजूस लोडाशीं बसविलें व मग कार्याची पृच्छा केली. याप्रमाणें शिवाजीनें इंग्रज वकीलास चांगल्या आदर सत्कारानें वागविलें परंतु वकीलाचा इष्ट हेतु कांहीं तडीस गेला नाहीं, व तारीख ६ जून रोजीं त्यास हात हालवीत परत यावें लागलें. 'एक दोन दिवसांनीं आपण आपल्या भीमाजी पंडित नांवाच्या वकीलाबरोबर प्रेसिडेंटाकडेस उत्तर पाठवूं' असा निरोप फक्त शिवाजीनें निकोलसाबरोबर पाठविला. निकोलस तारीख १७ जून रोजीं मुंबईस येऊन दाखल झाला.

निकाल.

तारीख २१ रोजीं भीमाजी मुंबईस येऊन दाखल झाला. पुष्कळ वाटाघाटीनंतर नारायण शेणव्यानें या प्रश्नाचा समाधानकारक निकाल करावा असें ठरून हे उभयतां परत गेले. व पुनः दोघेहिजण सप्टेंबर महिन्यांत शिवाजीचें पत्र घेऊन परत मुंबईस आले. हें पत्र शिवाजीनें मुंबईचा गव्हर्नर जिराल्ड ऑंजियर यास लिहिलें असून पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर होता.

"भीमाजी पंडित व नारायण शेणवी यांच्याबरोबर तुम्हीं पाठविलेलें पत्र पावलें. राजापुरच्या वखारीसंबधीं या उभयतांनीं तुमचें म्हणणें मला कळविलें. त्यावर मीहि उत्तर लिहून यांचे बरोबर पाठवीत आहें. तुमच्या बुद्धिमत्तेबद्दल मला आदर वाटत असल्यानें आपल्या उभयतांच्या मैत्रींत अंतर येऊं नये अशी माझी इच्छा आहे. या सोबत भेटीच्या कांहीं वस्तु पाठवीत आहें त्यांचा स्वीकार व्हावा."

विचार.

या पत्राचा विचार करण्यासाठीं व शिवाजीनें दर्शविलेल्या अडचणींचा निरास करण्यासाठीं मुंबईच्या कौन्सिलनें तारीख १ ऑक्टोबर रोजीं जमून विचार करावा अस ठरलें. 'सात हजार होन

नुकसान भरपाई शिवाजीकडून मिळेल असें वकीलानें तारीख ३ ऑक्टोबर रोजीं कौन्सिलास कळविलें. परंतु तें मान्य झालें नाहीं. पुढें ही रक्कम १००२५ होना-पर्यंत वाढविली. मात्र ही रक्कम रोख यावयाची नसून जकातींत वसूल दिली जाईल असें सांगितलें.

पत.

आठपासून दहा हजार होनापर्यंत नुकसान भरपाई शिवाजीनें दिली तरी ती रक्कम एकंदर नुकसानीच्या एक चतुर्थांशाइतकीसुद्धां नाहीं असें सुरत व मुंबई येथील कौन्सिलांचें मत पडलें. तथापि जी मिळेल ती रक्कम घ्यावी. तिच्यापकीं आठ हजार होन रोख घ्यावेत. व बाकीच्या रकमेबद्दल राजापुरच्या बंदरांत पांच वर्षेंपर्यंत किंवा कमींत कमी तीन वर्षेंपर्यंत तरी इंग्रजी मालास जकातीची माफी मिळावी असें कौन्सिलचें मत पडलें.

उडवाउडवी.

परंतु शिवाजीनें कशासच दाद दिली नाहीं. त्याचीं उडवाउडवीचीं उत्तरें चालूच होतीं. आणि शेवटीं शेवटीं तर इंग्रजी व्यापारी त्या उत्तरांना कंटाळून गेले. तारीख २४ मेच्या पत्राच्या शेवटीं कौन्सिल लिहितें, "आतां शिवाजीशीं विग्रह करणेंच प्राप्त आहे. परंतु तूर्त डच लोकांशीं आपलें युद्ध चालू असतांना ही नवीन कटकट आतांच उपस्थित न करणें बरें." यानंतर तारीख १९ जुलई सन १६७३ च्या पत्रांत सुरत कान्सिल वैतागून लिहितें. "या मूर्तिपूजकाकडून (= शिवाजीकडून) नुकसान भरपाई मिळेल असें मुळींच दिसत नाहीं. इकडे राजापुरच्या वखारीच्या नुकसान भरपाईची चर्चा चालू असतां तो चोर (=शिवाजी) तिकडेस हुबळीची आमची वखार लुटण्यास हुकुम देतो याला काय म्हणावें ! आम्हांला तर असें वाटतें कीं, कपनी आणि इंग्रज राष्ट्र यांचा हक्क प्रस्थापित करण्यासाठीं आपण शिवाजीचीं जीं जहाजें बंदरांत असतील तीं बेलाशक पकडावींत." परंतु यानंतर पुनः इंग्रजांना आशा उत्पन्न झाली असें तारीख १ ऑक्टोबरच्या पत्रावरून दिसतें. ते म्हणतात, "शिवाजी व आम्ही आतां पुनः मित्र झालों असून आमच्यांतील गैरसमज दूर झालेला आहे. आणि राजापुरची भानगड आतां कंपनीस लाभदायक अशा रीतीनें मिटेल व आपल्या राष्ट्राची इज्जत संभाळिली जाईल असा भरंवसा वाटतो." तारीख २३ ऑक्टोबरच्या पत्रांत तर कौन्सिल मोठ्या उमेदीनें लिहितें, "राजा-पुरची नुकसान भरपाई बहुतेक मिळाल्यासारखीच आहे. हुबळीच्या लुटीचा प्रश्न तूर्त बाजूस ठेवून दुसऱ्या अनुकूल वेळीं काढूं. शिवाजीच्या मनांत इंग्रज राष्ट्राबद्दल आदर आहे. म्हणून त्यानें आतां सुरतेवर जरी स्वारी केली तरी आपल्या

वखारीलाच काय पण आपलें निशाण ज्या घरावर फडकत असेल त्या घरालासुद्धां शिवाजीपासून उपसर्ग पोहोंचणार नाहीं. " या प्रमाणें बहुतेक तह जुळत आला होता व ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत दोघांहि वकीलांमार्फत करारमदार नक्की झाले होते तरी हा तह शेवटीं फिसकटलाच. कारण यावर शिवाजीची सही झाली नाहीं आणि नंतर दोन महिन्यांनीं तो मुलुखगिरीवर गेला व तिकडेसच फार दिवस राहिला, त्यामुळें हें तहाचें घोंगडें तसेंच भिजत पडलें.

६ हेनरी ऑक्सडेन याची मध्यस्थी. १६७४:— जूनमध्यें शिवाजीला राज्याभिषेक होणार ही संधि साधून इंग्रजांनीं हेनरी ऑक्सडेन याची रवानगी केली. आणि हेनरी येत आहे असें नारायण शेणव्यामार्फत राजास रायगडावर सांगून पाठविलें. ऑक्सडेन शिवाजीकडेस तारीख १३ मे पासून तारीख १६ जूनपर्यंत राहिला. या मुदतींतील त्याचा पत्रव्यवहार उपलब्ध असून त्यांत पुष्कळशा गोष्टी अत्यंत सूक्ष्मपणें वर्णन केल्या आहेत. राज्याभिषेकाचेंहि सविस्तर वर्णन त्यांतच आढळतें. एकंदर वाटाघाट व शेवटीं तह कसा झाला हेंहि सविस्तरपणें त्यांत वर्णिलेलें आहे. इंग्रजांचीं अगर मुंबईकरांचीं जीं जहाजें स्वराज्याच्या बंदरांत येऊन फुटलीं होतीं तीं आपण परत देणार नाहीं असें प्रथम शिवाजीचें म्हणणें होतें. शिवाजीचा प्रधान निराजीपंडित इंग्रजांशीं यासंबंधीं रदबदली करीत होता. त्याच्या प्रयत्नानें शेवटीं तारीस ११ जून रोजीं हेंहि कलम मान्य केलें. आणि तारीख १२ जून रोजीं तह होऊन त्याखालीं अष्ट प्रधानांच्या सह्या झाल्या व तो तहाचा कागद निराजीपंडिताच्या घरीं ऑक्सडेन याच्या हवालीं करण्यांत आला. पुढें नोव्हेंबरमध्यें शिवाजीनें पन्नास साठ भारी तोफांची मागणी इंग्रजांकडेस केली. परंतु "अशा रीतीनें उघडपणें युद्धसामग्री दिल्यास औरंगजेब बादशहा चवताळून जाईल" असें कळवून इंग्रजांनीं ही मागणी मोठ्या नम्रतेनें नाकारिली, असें तारीख १३ नोव्हेंबरच्या पत्रावरून दिसतें.

ऑक्सडेन.

७ राजापुरच्या इंग्रज व्यापाऱ्यांची भेट १६७५:— वर सांगितलेल्या तहांत ठरल्याप्रमाणें सन १६७५ मध्यें राजापुर येथें इंग्रजांनीं पुनः वखार घातली. परंतु ही वखार घालतांनाहि त्यांना थोडीशी अडचण झालीच. तारीख ६ फेब्रुवारी १६७५ च्या राजापुरच्या पत्रांत पुढील मजकूर आहे :—

भेट.

"आम्हीं राजापुरास जाऊन तेथील सुभेदार अनाजी पंडित यास तशी वर्दी पाठविली. मि. वॉर्ड यानें आमची पूर्वीचीच इमारत मागीतली परंतु अनाजीनें ती देण्याचें साफ नाकारिलें. त्याला आमची मुळींच परवा नाहीं असें दिसतें. आम्हीं राजापुरास न राहिलों तर शिवाजीचे एक हजार होन वांचतील असें तो म्हणतो. अनाजी पंडित हा शिवाजीच्या मेहरबानींतील असून कोंकणचा सुभेदार असल्यानें त्याच्याशीं बिघडवून आमचें चालणार नाहीं. कारण कोंकणांत कोठेंहि त्याचीच सत्ता असणार."

सन १६७५ च्या मार्चमध्यें राजापुरच्या इंग्रजांना शिवाजीनें भेट दिली. या भेटीचा समग्र वृत्तांत जपून ठेविला असून तो मोठा हृदयंगम आहे. त्यांतील सारांश असा :—

वृत्तांत.

"तारीख २२ मार्च रोजीं दोन प्रहरींच शिवाजी राजाची स्वारी आली. त्याच्या बरोबर घोडेस्वार व पायदळ पुष्कळच असून १५० पालख्याहि होत्या. स्वारी जवळ आली असें ऐकतांच आम्हीं भेटण्यास गेलों. आम्हांला पाहून राजानें पालखी थांबविण्यास सांगितलें व आम्हांस अगदीं जवळ बोलावून आम्हीं भेटण्यास गेल्याबद्दल मोठा आनंद प्रदर्शित केला. दोन प्रहरीं उन्ह फार पडलें असल्यानें 'सायंकाळीं तुम्हांस परत भेटीस बोलावूं' असें आम्हांस सांगून जाण्याची परवानगी दिली."

"आम्हांला पाहतांच शिवाजी राजानें आपली पालखी थांबविली व आम्हांस अगदीं जवळ बोलाविलें. मी अगदीं जवळ गेल्यावर माझ्या झग्याच्या दशा हातांत घेऊन राजानें थोडा वेळ त्यांचें निरीक्षण केलें व मग मला कित्येक प्रश्न विचारिले. नंतर राजापुर कसें काय आवडतें असा प्रश्न टाकून राजा स्वतःच म्हणाला कीं, 'तुम्हांला राजापुर फारसें आवडत नाहीं असें ऐकतों. परंतु मागील गोष्टी आतां मनांत आणण्याचें कारण नाहीं. तुम्हीं येथें स्वस्थ रहा.' आमची योग्य व्यवस्था लाविण्याची तजवीज करण्याचें शिवाजी राजानें कबूल केलें आहे. आमची कोणतीहि योग्य मागणी नाकारिली जाणार नाहीं असेंहि राजानें आम्हांस अभिवचन दिलें आहे."

"दुसऱ्या दिवशीं म्हणजे तारीख २५ मार्च रोजीं सकाळीं पुनः राजाकडून बोलाविणें आलें. तेथें गेल्यावर आमची वर्दी लागून आम्हांस राजाजवळ नेलें. मला राजाच्या उजवीकडेस इतक्या जवळ बसविण्यांत आलें कीं, मी स्वतः राजाला स्पर्शहि करूं शकत होतों. राजाशीं आम्हीं सुमारें दोन तास गोष्टी बोलत

बसलों होतों, त्यांत विशेषतः राजाच्या अनेक व नानाविध प्रश्नांना आम्हीं उत्तरेंच देत होतों. सरते शेवटीं आम्हीं आमचा अर्ज राजास गुजरला. राजास तो अडखळत अडखळत वाचून दाखविण्यांत आल्यावर मोठ्या गंभीर नजरेनें आमच्याकडेस पाहून राजा म्हणाला, "या अर्जांतील सर्व मागण्या पूर्वीच तुम्हांस दिल्या आहेत. तथापि त्या सर्वांबद्दल एक फर्मान तुम्हांस देतों." परंतु यानंतर लवकरच फोंड्याचा वेढा सुरू झाल्यानें हें फर्मान मागें पडलें.

८ राजापुरच्या भरपाईचा इतिहासः—खानदेश जिल्ह्यांतील धरणगांवीं कंपनीची वखार होती. ती मराठ्यांनीं लुटल्यामुळें तिची नुकसान भरपाई मिळविण्यासाठीं मुंबईहून सॅम्युएल ऑस्टेन यास सन १६७५ च्या सप्टेंबरमध्यें रायगडावर पाठविण्यांत आलें. धरणगांवची वखार मराठ्यांनीं लुटली नसून इतर पेंढाऱ्यांनीं लुटली व त्यांचा आणि आपला कांहींएक संबंध नाहीं, असें शिवाजीनें सांगून भरपाई करण्याचें स्पष्ट नाकारिलें. पुष्कळ वाटाघाटीनंतर शिवाजीनें इंग्रजांस कौल देऊन त्यांच्या वखारीला मराठ्यांकडून अतःपर उपद्रव होणार नाहीं असें वचन दिलें.

कथा.

परंतु राजापुरची नुकसान भरपाई मात्र पुष्कळ दिवसपर्यंत मिळाली नाहीं. तारीख १९ जुलई १६७६ रोजीं सुरतेहून मुंबईस लिहून गेलें कीं, 'नारायण शेणवी हा दीर्घसूत्री असल्यानें दुसरा कोणी तरी शांत व हुषार असा इंग्रज इसम गिरिधरदासाबरोबर शिवाजीकडेस पाठवून नुकसान भरपाईची मागणी करावी.

गिरिधरदास.

नारायण शेणवी या वेळीं शिवाजीच्या दरबारांत होता. त्यानें तारीख ११ ऑक्टोबर रोजीं 'कंपनीची नुकसान भरपाई करून देण्यासाठीं वराता व इतर धान्य देण्यास शिवाजी कबूल आहे.' असें कळविलें. आणि इतर कांहींच मिळत नसल्यास हें घेऊन आपण समाधान मानावें असें कौन्सिलनें ठरविलें. यानंतर सहाच दिवसांनीं सुरतेच्या कौन्सिलनें राजापुरास पुढीलप्रमाणें कळविलें. " जोंपर्यंत तो लुटारू (शिवाजी) जिवंत आहे व जोंपर्यंत शत्रु-मित्र व देव-मानव यांचीहि त्याला क्षिती वाटत नाहीं तोंपयत त्याच्या राज्यांत व्यापाराला सुरक्षितता मिळणें शक्यच नाहीं. " ही एकप्रकारची शिवाजीच्या अंमलदारांस धमकीच होती. पुढें सन १६८२ मध्यें राजापुरची वखार काढून टाकण्यांत आली.

नारायण शेणवी.

या नुकसान भरपाईच्या बाबतींत पुढें पुढें इंग्रज अगदीं कंटाळून गेले व

निराशा.

तारीख २६ जानेवारी सन १६७७ रोजीं सुरतेहून मुंबईस पुढील आशयाचें लिहून गेलें. "अद्यापिहि जर शिवाजी-कडून नुकसान भरपाई मिळत नसली तर तुम्हीं बेलाशक दाभोळ, चौल, कल्याण अथवा इतर कोणत्याहि शिवाजीच्या बंदरांतून त्याचीं जहाजें पकडून आणा. त्यांवरील माणसांना सोडून द्या परंतु त्यांवरील माल सुरक्षितपणें ताब्यांत घेण्याची काळजी घ्या. आणि असें केलें म्हणजेच शिवाजी वठणीवर येईल." परंतु इंग्रजांनीं असें केल्याचें दिसत नाहीं. मुंबईच्या लोकांना स्वराज्यांतून इमारती लांकडें, जळाऊ लांकडें, धान्य व दुभतीं जनावरें यांचा पुरवठा होत असे व इंग्रजांनीं जर एकादी आगळीक केली असती तर शिवाजीनें या वस्तु मुंबईस जाण्याचें तत्काळ बंद केलें असतें; इतकेंच नव्हे परंतु कोंकण व कानडा यांतील बंदरें त्याच्याच ताब्यांत असल्यानें इंग्रजांचा सगळा व्यापार त्यानें सफाई बुडविला असता; इंग्रजांकडून स्वराज्यांत मीठ येत असे व कित्येक इंग्रजी मालहि पुरविला जात होता. राजारामाच्या लग्नांत तारीख १५ मार्च १६८० रोजीं शिवाजीनें इंग्रजांकडून दोन हजार मेणबत्या घेतल्याचा उल्लेख आढळतो.

सन १६७८ च्या जानेवारींत सुरतेच्या पत्रांत पुढील उल्लेख आहे. "राजा-

सुपारी.

पुरच्या नुकसान भरपाईबद्दल वखारीला शिवाजीच्या प्रधानांनीं ठरविलेल्या भावानें सुपारी देण्याचें ठरविलें." परंतु असें करूनहि नुकसान भरपाई झाली नाहीं ती नाहींच. शिवाजीच्या प्रधानांच्या भुलथापा व शिवाजीची टाळाटाळी यांनीं सुरतेचें कौन्सिल पुढें पुढें फार रागाऊन गेलें असें एप्रिल, मे व जूनच्या पत्रांवरून दिसतें. कारवार, हुबळी व राजापुर येथील वखारी काढून टाकाव्यात असेंहि कौन्सिलनें ठरविलें. तारीख १८ मार्च सन १६८० च्या पत्रांत मुंबईहून सुरतेस असें लिहून गेलें कीं, "जीं दोन जहाजें नाहींशीं झालीं त्यांच्या नुकसान भरपाईबद्दल शंभर खंडी सुपारी आपणांस शिवाजीकडून मिळावयाची आहे हें ऐकून आम्हांस आनंद वाटतो. हा सौदा एकंदरींत तुमच्या इच्छेप्रमाणेंच झालेला आहे." परंतु इतक्यांत तारीख ४ एप्रिल रोजीं शिवाजीच्या मरणाची बातमी येऊन धडकली.

सारांश इंग्रजांस नुकसान भरपाई अशी शिवाजीच्या हयातींत पूर्णपणें मिळाली नाहीं. व राजापुरची वखार संभाजीच्या कारकीर्दीत (सन १६८२ च्या डिसेंबरांत अथवा सन १६८३ च्या जानेवारींत) बंद करण्यांत आली.

सारांश.

सन १६८४ मध्यें मुंबईस रिचर्ड केगविन हा गव्हर्नर होता. हा मोठा लाड्या गंगाजी होता. यानें संभाजीशीं तह ठरविला त्यावरून संभाजीनें राजापुरच्या सुभेदारास पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें आहे. "कॅप्टन हेनरी गॅरी आणि थॉमस विल्किन्स हे दुभाषा राम शेणव्यासह मजकडेस इंग्रजांकडून वकील म्हणून आले असून त्यांनीं विनंतिपूर्वक मला कळविलें कीं, 'आमचे वडील शिवाजी राजे यांनीं राजापुरची वखार लुटली तिच्या भरपाईसाठीं दहा हजार बाहशाही होन इंग्रजांस देण्याचें ठरविलें होतें व त्यापैकीं ३३६७ त्यांजकडेस पावते केले व बाकी ६६३३ राहिले आहेत. ते आपणांस (इंग्रजांस) मिळावेत.' ही बाकीची रक्कम त्यांस देण्याचें मी कबूल केलें आहे. ही रक्कम रोख द्यावयाची नसून हिच्या मोबदल्यांत राजापुरची वखार त्यांस बांधून द्यावयाची आहे व बाकीच्या रकमेचे नारळ, सुपारी वगैरे जिन्नस सवडीप्रमाणें पावते करावयाचे आहेत."

संभाजी.

९ शिवाजी आणि पोर्च्युगीजः—शिवाजीचा पोर्च्युगीजांशीं अगदींच ओझरता संबंध आला असल्यानें स्वराज्याच्या इतिहासांत नमूद करून ठेविण्यासारखे विशेष प्रसंग घडल्याचें आढळत नाहींत. वसाहत संभाळण्यापुरतीहि पोर्च्युगीजांची लोकसंख्या नव्हती. सन १५८० पासून सन १६४० पर्यंत साठ वर्षांच्या दीर्घ कालांत स्पेन लोकांशीं झगडण्यांत त्यांचा उत्साह क्षीण झाला होता. सन १६५० पासून सन १६६३ पर्यंत हॉलंड देशाशीं त्यांचें आरमारी युद्ध झालें त्यांत पोर्च्युगीजांचा बहुतेक नाश झाला होता आणि आशिया खंडांत त्यांचा झपाट्यानें होत असलेला अधःपात या कारणसमुच्चयामुळें शिवकालीं पोर्च्युगीज म्हणजे जेम तेम धरून असलेली, मितभाषेपणानें दुसऱ्या सत्तेशीं मैत्री जोडून युद्ध टाळणारी, कारस्थानानें भांडणांतून निसटून जाणारी व सहनशील अशी एक मावळती सत्ता होती, एवढेंच तिचें वर्णन करितां येण्यासारखें आहे. फोंडा, बिचोलिम, पर्नेम आणि सिंकेलिम हे तेव्हां पोर्च्युगीजांच्या ताब्यांत नसल्यानें तेव्हांचा गोंवा प्रांत आजच्यापेक्षां फारच लहान होता. परंतु

पोर्च्युगीज.

चौलपासून दमणपर्यंतचा किनारा त्यांच्याच ताब्यांत होता त्यामुळें कोंकणांत त्यांचें बरेंच वर्चस्व होतें. परंतु यांपकीं सन १६६८ मध्यें मुंबई बंदर त्यांनीं इंग्रजांना आंदण दिलें. शिवाजीनें कोंकणांत मोगल व विजापुरकर यांच्यावर विजय मिळविल्यानंतर त्यानें पोर्च्युगीज प्रांतहि लुटला व त्यांच्या किरकोळ झटापटीहि झाल्या परंतु संभाजीच्या कारकीर्दीपर्यंत मराठे व पोर्च्युगीज यांचें प्रत्यक्ष युद्ध जुंपलें नव्हतें. शिवाजी व पोर्च्युगीज यांच्यांत तेढ उत्पन्न होण्यास पुढील चार कारणें झालीं.

१ हिंदी महासागरावर आपली सत्ता असल्यानें सर्व जहाजांनीं आपणांस कर देऊन दस्तक घ्यावें असें पोर्च्युगीजांचें म्हणणें होतें. पोर्च्युगीजांनीं शिवाजीविरुद्ध जरी जंजीऱ्याच्या सीदीस मदत दिली होती तरी त्यांचें मराठ्यांशीं आरमारी युद्ध असें झालें नव्हतें.

२ रत्नागिरीच्या दक्षिणेकडील देसायांस शिवाजीनें तेथून हांकून लाविल्यावर ते देसाई गोव्यास जाऊन राहिले व तेथून ते शिवाजीच्या मुलुखावर स्वाऱ्या करूं लागले. त्यामुळें पोर्च्युगीजांचा त्यांनां आश्रय आहे असें उघड झालें.

३ शिवाजीच्या लोकांनीं गोव्याशीं तांदळाचा वगैरे व्यापार सुरू केल्यानें पोर्च्युगीजांच्या व्यापाराला धक्का बसला.

४ दमणकडील प्रांत कोळी राजांच्या ताब्यांत होता त्यावर शिवाजीनें चौथ बसविली.

याप्रमाणें उभयपक्षीं जरी कारणें उपस्थित झालीं होतीं तरी मोगलांशीं व विजापुरकरांशीं शिवाजीचें युद्ध चालू असतां व त्या दोघांनीं पोर्च्युगीजांस आग्रह केला असतांहि त्यांनीं शिवाजीशीं युद्ध करण्याचें मनांत आणिलें नाहीं.

वाढती सत्ता.

शिवाजीनें कल्याण व पनवेल येथें कांहीं जहाजें बांधिलीं व त्यांच्यायोगें सन १६५९ मध्यें प्रथमच समुद्रांत व्यापार सुरू केला, तेव्हां पोर्च्युगीज व्हाइसरायानें आपल्या वसईच्या अंमलदाराकडून त्या जहाजांस अडथळा आणविण्याचा प्रयत्न केला. परंतु शिवाजीची वाढती सत्ता पाहून पोर्च्युगीजांनीं मोठ्या शहाणपणानें त्याच्याशीं मैत्री संपादन केली. मराठे व पोर्च्युगीज यांच्या आरमारांच्या किरकोळ चकमकी झाल्याचें वर्णन मागें अकराव्या भागांत पृष्ठ १८५ वर आलेंच आहे.

गोंव्याच्या उत्तरेकडेस लखम सावंत व इतर देसाई यांचीं लहान लहान राज्यें होतीं. सन १६६४ नंतर शिवाजीनें गोव्याच्या बाजूस स्वारी केली तेव्हां या सावंतांनीं त्याला जोराचा अडथळा केला. परंतु शिवाजीनें त्यांचा संपूर्ण पराजय करून त्यांना तेथून हांकून दिलें. तेव्हां ही देसाई मंडळी गोव्यांतील बारदेश प्रांतांत जाऊन राहिली, व आपला गेलेला प्रांत परत मिळविण्यासाठीं तेथून स्वराज्यावर हल्ल चढवूं लागली. पोर्च्युगीज व्हाइसरायानें देसायांना याबद्दल अनेक वेळां ताकिदी देऊन शांतता संरक्षणार्थ बजाविलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं तारीख १९ नोव्हेंबर १६६७ रोजीं शिवाजीच्या सैन्यानें बार्देशावर स्वारी करून पोर्च्युगीज रयतेपैकीं पुष्कळांना कैद करून नेलें व गाई वगैरे जनावरेंहि बरींच पळवून नेलीं. आपला सलोखा असतांना मराठ्यांनीं या प्रमाणें वर्तन केल्याबद्दल व्हाइसरायानें शिवाजीकडेस तकरार केली. त्यानें तारीख २४ नोंव्हेंबर रोजीं रामोजी शेणवी कोठारी यास शिवाजीकडेस वकीलीस पाठविलें. शिवाजीनेंहि त्यास सत्कारानें वागविलें. नंतर शिवाजीनें आपला वकील सखोपंत यास गोंव्यास पाठविलें व उभयतांत तह घडवून आणिला. या तहावर तारीख ५ डिसेंबर रोजीं व्हाइसरायाची सही झाली व तारीख ११ डिसेंबर रोजीं शिवाजीनें शिक्कामोर्तब केलें. फादर गोसालो मार्टिन यास व्हाइसरायानें शिवाजीच्या दरबारीं पाठवून कैदी सोडवून आणण्याची व्यवस्था केली. शिवाजीच्या अधिकाऱ्यांनीं घाटावर व इतरत्रहि पोच्युगीजांच्या व्यापारास त्रास देऊं नये असेंहि या तहानें ठरविण्यांत आलें. परंतु वारंवार स्वराज्यांतील मुलुखावर हल्ले करण्याचें काम देसायांनीं चालूच ठेविलें होतें. त्यामुळें शेवटीं सन १६६८ च्या जूनमध्यें त्यांना पोर्च्युगीज सरकारानें आपल्या प्रांतांतून बाहेर हांकलून दिलें.

लखम सावंत.

तह.

हा तह तारीख १० फेब्रुवारी १६७० रोजीं पुनः ताजा करण्यांत येऊन परस्परांच्या भांडणांमुळें एकमेकांचीं अडकविलेलीं जहाजें सोडून देण्याचें ठरलें; व याशिवाय पुढील कलमें तहांत नमूद आहेतः—

१ मराठ्यांच्या व्यापारी जहाजांस मोगलांच्या जहाजाप्रमाणेंच कर घेऊन दस्तकें देण्याचें ठरवून आजपर्यंतची मराठ्यांची तकरार पोर्च्युगीज व्हाइसरायानें निकालांत आणिली. किनाऱ्यावरील लहान लहान मचव्यांना अशा दस्तकांची आवश्यकता नव्हती.

२ सन १६६९ मध्यें शिवाजीनें जंजीऱ्यावर तोफा डागल्या त्या वेळीं पोर्च्युगीज व्हाइसरायानें सीदीस मदत केली होती परंतु आतां तोच दोघांचा समेट घडवून आणण्यासाठीं मध्यस्थी करूं लागला. शिवाजीचा वकील विठ्ठलपंडित हा या वेळीं मुद्दाम गोव्यांत येऊन पोर्च्युगीजांची मदत शिवाजीस मिळविण्याची खटपट करीत होता.

३ घांटावरील पोर्च्युगीजांच्या व्यापारास त्रास न देण्याबद्दल शिवाजीनें आपल्या अंमलदारांस पुनः ताकिदी दिल्या.

४ पोर्च्युगीजांच्या बाजूस सरहद्दीवर किल्ला अगर दगडी इमारत न बांधण्याचें शिवाजीनें कबूल केलें. मात्र ही सरहद्द जेव्हां एकाद्या नदीच्या योगें विभागलेली असेल तेव्हां किल्ला बांधण्यास हरकत नाहीं असें ठरलें.

चौथाई.

रामनगरचा कोळी राजा पुष्कळ वर्षांपासून दमणच्या लोकांपासून बळजबरीनें खंडणी वसूल करीत असे. या खंडणीस चौथ असें म्हणत असत. ही खंडणी सर्व ठिकाणाहून दहा टक्यापासून पंचवीस टक्केपर्यंत वसूल होत असे. व रामनगरच्या राजास यामुळेंच चौथाई राजा असें अभिधान असे. शिवाजीनें रामनगर खालसा केल्यावर ही चौथाई पोर्च्युगीजांकडेस हक्कानें मागितली. उत्पन्नाची आपण माहिती मागवीत आहोंत, जमाबंदीची तपासणी चालू आहे, उत्पन्नाचा तपशील नक्की होत आहे इत्यादि प्रकारच्या जबाबांनीं पोर्च्युगीज व्हाईसराय शिवाजीच्या मागणीला लांबणीवर टाकीत होता. याप्रमाणें ही चौथाईची मागणी दोन वर्षेंपर्यंत टाळली जात होती. या टाळाटाळीचा सोक्षमोक्ष लावण्यासाठीं शिवाजीचा वकील पीतांबर शेणवी सन १६७७ च्या डिसेंबरमध्यें गोव्यास गेला होता. पण तो १६७८ च्या ऑगस्टमध्यें मृत्यु पावला. त्याच्या जागीं त्याचा नातू जीवाजी आला, व पुढें जीवाजीच्या बदली गणेश शेणवी याची नेमणूक झाली, परंतु चौथाईचा कांहींच निकाल लागेना हें पाहून शिवाजीनें कंटाळून गोव्यावर स्वारी करण्याचा धाक घातला. परंतु इतक्यांत त्याचा मृत्यु झाल्यानें पोर्च्युगीजांचा जीव कांहीं काल तरी खालीं पडला.

प्रकरण १५ वें

राज्यव्यवस्था

[१ राज्यविस्तार. २ स्वराज्याचें उत्पन्न व संपत्ति. ३ सैन्यबळ. ४ अष्ट प्रधान. ५ सैन्य. ६ मुलकी. ७ देवस्थान–धर्मादाय. ८ रामदासस्वामी. ९ शिवाजीच्या कारकीर्दीचा परिणाम.]

राज्यविस्तारः—मृत्युसमयीं शिवाजीचा राज्यविस्तार पुढें लिहिल्याप्रमाणें होताः–१ उत्तरेस रामनगर (हें सुरत जिल्ह्यांत असून यास हल्लीं धरमपुर असें म्हणतात) २ दक्षिणेस कारवार अथवा गंगावती नदी. ३ पूर्वेस बागलाण, आणि ४ दक्षिणेस नाशिक, पुणें, सातारा कोल्हापुर. याप्रमाणें साधारणतः स्वराज्याची चतुःसीमा सांगतां येईल. शिवाजीनें अगदीं शेवटीं शेवटीं मिळविलेला प्रांत म्हणजे पश्चिम कर्नाटक हा होय. बेळगांवापासून तुंगभद्रेपावेतोंच्या प्रदेशाचा यांत समावेश होतो.

चतुःसीमा.

हें स्वराज्य तीन प्रांतांत विभागलें असून त्याची व्यवस्था पुढीलप्रमाणें होती.

विभाग.

"मोरोपंत पेशव्याचा हवाला कल्याण भिवंडीपासून देखील कोलवण सालेरीपर्यंत वरघाट व कोंकण, त्याचे स्वाधीन देश केला. लोहगड व जुन्नर देखील बारा मावळें हाराळ्याचे घाटापासून पेशव्याचा हवाला केला. अनाजी दत्तोचे स्वाधीन चऊलपासून दाभोळ, राजापुर, कुडाळ, बांदें, फोंड, कोपळपर्यंत कोंकण अनाजीपंत सुरनीस याचे स्वाधीन केलें. वरघांट वाईपासून कोपल तुंगभद्रापावेतों देश नेमून दत्ताजीपंत वाकनीस याचे स्वाधीन केला. दत्ताजी पंतास पन्हाळा ठेविलें. असा देश तीन सर कारकुनांच्या हवालां केला.*"

जिंजी.

तुंगभद्रेच्या पलीकडच्या तीरीं कोपळपासून वेलोर जिंजीपर्यंतचा प्रांत शिवाजीनें मरणापूर्वी दोनच वष सर केला होता. परंतु तेथें त्यास स्थिरस्थावर करितां आलें नाहीं. येथें ठेविलेल्या

---

* सभासद.

सैन्यानें येथील किल्ले आणि त्या खालचा प्रदेश मात्र आपल्या ताब्यांत ठेविला होता व बाकीचा प्रांत, मराठ्यांची सत्ता शिवाजीच्या मरणानंतर, मानिनासाच झाला.

कानडा.

या शिवाय कानडीमुलुखाच्या आधिपत्याबद्दल अद्यापि तंटा चालूच होता. येथील नबाब विजापुरचा सरदार असल्यानें शिवाजीनें त्याच्यावर कांहीं स्वाऱ्या करून त्यास जेरीस आणिलें होतें, परंतु तेथील मुख्य शहर जें बंकापुर तें शिवाजीच्या ताब्यांत आलें नव्हतें. बेदनूरहि नुसती खंडणीच देत होतें. हे प्रदेश कायमचे ताब्यांत घेण्यापूर्वीच शिवाजी मरण पावला.

चौथाई.

वर सांगितल्या शिवायचा प्रदेश म्हणजे स्वराज्याच्या शेजारीं असलेला प्रदेश होय. या प्रदेशावर शिवाजीची निर्विवाद सत्ता जरी स्थापन झाली नाहीं, तरी स्वराज्याच्या घोडेस्वारांना लुटालुटीला हा प्रदेश नेहमींच सोईस्कर असे. परंतु लूट टाळण्यासाठीं येथील प्रजा शिवाजीस वार्षिक खंडणी देत असे. या खंडणीस चौथ असेंहि म्हणत असत. चौथ म्हणजे जमीन महसुलाच्या उत्पन्नाचा एक चतुर्थांश हिस्सा. पूर्वी कागदावर उत्पन्नाचे आंकडे जरी फुगवून लिहिलेले असत तरी प्रत्यक्ष उत्पन्न कांहीं तितकें येत नसे. तथापि कागदावरील उत्पन्नाचाच एक चतुर्थांश शिवाजी घेत असे, त्यामुळें त्याला वाजवीपेक्षां नेहमीं अधिकच प्राप्ति होई. इतकें असूनहि चौथाई देणाऱ्या प्रांताचें रक्षण वगैरे करण्याची कोणतीच जबाबदारी मराठ्यांवर नसे.

किल्ले.

त्या वेळीं स्वराज्याच्या मुलुखांत एकंदर २४० किल्ले होते. त्यांपैकीं ११ किल्ले स्वतः शिवाजीनें बांधिले होते, आणि ७९ किल्ले कर्नाटक प्रांतांत होते.

उत्पन्न.

२ स्वराज्याचें उत्पन्न व संपत्तिः—शिवाजीच्या मरणसमयीं स्वराज्याचें उत्पन्न एक कोट होनांचें होतें असें सभासद म्हणतो. याशिवाय चौथाईचें सव उत्पन्न वसूल झाल्यास एशीं लक्ष होन मिळत असत. यावरून एकंदर उत्पन्न सात कोट रुपयांचें असावें असें दिसतें. परंतु हा आंकडा फक्त कागदीं मेळाचा दिसतो. प्रत्यक्ष उत्पन्न यापेक्षां फारच थोडें किंवहुना कमींत कमी या आंकड्याच्या एक दशांशापर्यंत जात असावें.

शिवाजीनें आपल्या पश्चात् ठेविलेल्या संपत्तीची यादी सभासदानें पृष्ठ ९५-९६ वर दिलेली आहे. तीवरून ती संपत्ति अगणित असावी असें दिसतें. शिवाजीनें लुटलेली संपत्ति निरनिराळ्या नाण्यांत असल्यानें तिची नक्की किंमत आजच्या नाण्यांत सांगणें प्रायः अशक्य आहे.

संपत्ति.

३ सैन्यबळः—शिवाजीजवळ आरंभीं सैन्य सुमारें तीन हजार होतें. त्याचा तपशील, " ते समयीं पागा बाराशें व शिलेदार दोन हजार जाहले. अशीं तीन हजार स्वारांची बेरीज झाली. "* याप्रमाणें होता. पुढें सन १६५६ मध्यें जावळी सर केल्यावर ही संख्या अर्थात्च वाढली. ती " सात हजार पागा, तीन हजार शिलेदार अशी दहा हजार फौज झाली. मावळे लोकांची संचणी दहा हजार पावेतों झाली." याच वेळीं विजापुराहून नोकरी सोडून आलेले सातशें पठाणहि शिवाजीनें आपल्या फौजेंत दाखल केले. पुढें सन १६५९ मध्यें अफजलखानाचा वध केला, " तेव्हां लष्करपागा सात हजार व शिलेदार आठ हजार, एकूण पंधरा हजार, हशम लोक बारा हजार ऐसी तोलदार फौज जमा जहाली. " ही फौज दिवसें दिवस वाढत जाऊन शेवटीं शिवाजीच्या मृत्युसमयीं हिची संख्या व तपशील पुढील प्रमाणें होता.

पागा.

१ पागा पंचेचाळीस हजार व तीवर २९ सरदार.

१ सिलेदार साठ हजार व त्यांचे सरदार ३१

१ एक लक्ष मावळे पायदळ व त्यांचे ३६ सरदार.

शिवाजीच्या पागेंत बत्तीस हजार घोडे होते व त्याशिवाय बारगिरांना पांच हजार घोडे दिले होते ते निराळेच. शिवाजीचें कायमचें घोडदळ तीस पासून चाळीस हजारांपर्यंत होतें. आणि त्याच्या पायदळाची संख्या जवळ जवळ एक लक्ष होती असें यावरून सिद्ध होतें. मात्र हें पायदळ कायमचें नसून वाटेल तेव्हां शेतकरीवर्गांतून उभें करितां येत असे. कांहीं पायदळ मात्र कायमचें असून त्याची नेमणूक निरनिराळ्या किल्ल्यावरून केलेली असे. या पायदळास त्या त्या किल्ल्याच्या आसपास जमिनी दिलेल्या असत. त्याच्या शिलेदारांची संख्या मात्र केव्हांहि मुकर नसे. जरूरीप्रमाणें व लुटीच्या आशेनें

---

* सभासद.

ती वेळोवेळीं कमी जास्त होत असे. शिवाजीच्या पराक्रमाच्या आरंभीं तर त्यास आसपासचे लहान लहान जमीनदारसुद्धां सामील होऊन धुमाकूळ माजवीत असत. सन १६६४ च्या सुरतेच्या लुटीच्या वेळीं व सन १६७७ च्या मद्रासवरील स्वारींत अशा रीतीनें वाढलेल्या सैन्याची संख्या पुष्कळच मोठी दिसते.

इतर.

शिवाजीच्या फीलखान्यांत १२६० लहान मोठे हत्ती होते असें सभासद म्हणतो. तारीखे शिवाजी या ग्रंथांत ही संख्या १२५ दिली असून चिटणीस ३०० चा आकडा सांगतो. यांत सभासदाचा आंकडा असंभवनीय दिसतो. उष्ट्रखान्यांत तीन हजार उंट होते असे तारीखे शिवाजीकार म्हणतो तर पंधराशें उंटांची संख्या चिटणीस सांगतो. शिवाजीजवळ युद्धासाठीं जय्यत अशा दोनशें तोफा असून त्याशिवाय प्रत्येक किल्ल्यावर तोफा होत्या त्या निराळ्याच. आणि याशिवाय प्रत्येक तोफेचे हत्ती, गोलंदाज, पायदळ फौज इत्यादि सरंजाम मुक्रर असे असें चिटणीस सांगतो. परंतु चिटणिसाचा आधार संशयित आहे.

४ अष्टप्रधानः—शिवाजी बारा वर्षांचा होतांच त्यास पुण्याच्या जहागिरीवर

नवीन जागा.

पाठविलें तेव्हां दादोजी कोंडदेवाच्या मदतीस पेशवे, मज्मुदार, डबीर व सबनीस असे चार अधिकारी दिले होते. दादाजीच्या मृत्यूनंतर शिवाजी स्वतंत्र होतांच त्यानें सरनौबत व डबीराची एक अधिक जागा याप्रमाणें दोन अंमलदार सन १६४७ मध्यें वाढविले. सन १६५६ मध्यें जावळी सर केल्यावर सुरनीस व वाकनीस या दोन जागा नवीन काढिल्या आणि घोडदळ व पायदळ यांचे सरनौबत पृथक् पृथक् केले. पुढें आग्र्याहून परत आल्यावर सन १६६७ मध्यें मुख्य न्यायाधीशाची नवीन जागा उत्पन्न करून न्यायनिवाड्याचीं कामें तिकडेस सोंपविलीं. आणि सन १६७४ मध्यें अष्टप्रधान ही संस्था अस्तित्वांत आली ती शिवाजीच्या अंतकालापर्यंत होती.

कामें.

शिवाजीनें अष्टप्रधान ही संस्था जरी स्थापन केली तरी तिला आजच्या 'कॅबिनेट'चें स्वरूप नव्हतें. या अष्टप्रधानांचा चालक किंबहुना सर्वाधिकारी स्वतः शिवाजीच होता. हे अष्टप्रधान म्हणजे शिवाजीचे एक प्रकारचे चिटणीसच होते. त्यांना स्वतंत्र असे कांहींच अधिकार नव्हतें. शिवाजीचे हुकुम अक्षरशः पाळणें, ते इतरांकडून तसेच पाळले जात आहेंत हें पाहणें व प्रसंगविशेषीं शिवाजीसें सल्ला मसलत देणें हीं

अष्टप्रधानांचीं कामें होतीं. यांच्या सल्ल्याप्रमाणें शिवाजी वागत असेच असें मात्र म्हणतां येत नाहीं. कारण कांहींहि असो, पण धार्मिक बाबत व हिशेबी बाबत यांत स्वतः शिवाजीनें कधींहि हात घातला नाहीं. पेशवा हा अष्टप्रधानांत मुख्य होय. तथापि बाकीचे सात प्रधान पेशव्याच्या हाताखालीं होते असें मात्र नव्हे.

अष्टप्रधानांचीं कामें पुढीलप्रमाणें होतीं:—

१ पेशवा अथवा मुख्य प्रधान. सर्व राज्यकारभारावर देखरेख ठेविणें. राजाच्या गैरहजिरींत त्याचा प्रतिनिधि या नात्यानें कामें करणें, शांतता राखणें, अंमलदारांत परस्पर स्नेह वृद्धिंगत करणें व राजपत्रावर शिक्का करणें.

२ मज्मुदार अथवा अमात्य. राज्यांतील सर्व जमाखर्चाची चौकशी करणें व राजास कळविणें.

३ वाकेनवीस अथवा मंत्री. राजाची रोजनिशी लिहिणें, भोजनाची तजवीज पाहणें, आमत्रणें करणें. राजाला अन्नांतून विषप्रयोग न होईल अशा-बद्दल खबरदारी ठेविणें.

४ सुरुनवीस अथवा सचिव. राजपत्रें योग्य प्रकारें लिहिलीं आहेत हें पाहणें, अधिक उणें अक्षर शोधणें. सर्व राजपत्रांवर सुरु सुद (म्हणजे येथून आरंभ) अशीं अक्षरें लिहिणें. महाल व परगण्याचे हिशेब तपासणें.

५ डबीर अथवा सुमंत. परराज्याशीं व्यवहार करणें. परदरबारास जाणारे व तिकडून येणारे खलिते ज्या जासुदाबरोबर जात येत त्यांची व्यवस्था ठेविणें. स्वराज्याची आबरू परराज्यांत रक्षण करणें व वाढविणें. बातम्या ठेविणें.

६ सरनौबत अथवा सेनापति.

७ सद्र आणि मुहतसिब अथवा पंडितराव व दानाध्यक्ष. दोन कामांची ही एक जागा होती. दक्षिणा वगैरे देऊन विद्वान् ब्राह्मणांचा आदर सत्कार करणें, शास्त्रार्थ सांगणें, जाती जातींतील तंटे तोडणें, सरकारांतून होणारे विधि व दानधर्म हे वेळच्यावेळीं पार पाडणें, प्रायश्चित्तें वगैरे करविणें.

८ काझी–उल्–कझत अथवा न्यायाधीश. दिवाणी व फौजदारी दावे चालवून न्याय देणें.

सेनापतीशिवाय बाकीचे सहाहि प्रधान ब्राह्मण असून पंडितराव आणि न्यायाधीश यांच्याशिवाय बाकीच्या सर्व प्रधानांस प्रसंगानुसार फौज घेऊन मुलुखगिरीवरहि जावें लागत असे. तह, राजपत्रें, सनदापत्रें यांवर राजा व पेशवा यांचे शिक्के होत असून सेनापति, पंडितराव व न्यायाधीश यांच्याशिवाय बाकीच्या प्रधानांच्या सह्या होत असत, असें चिटणीस म्हणतो. परंतु राज्याभिषेकाच्या सुमारास इंग्रजांशीं जो तह झाला त्यावर सर्व अष्ट प्रधानांच्याच सह्या आहेत असें ऑक्सडेन सांगतो.

सह्या.

राज्यकारभारासंबंधीचीं लिखाणें कायस्थ करीत असत. बाळाजी आवजी चिटणीस व निळो येसाजी मुनशी हे दोन कायस्थ लेखक प्रसिद्ध आहेत. यांतील मराठी लिखाण बाळाजी करीत असे व फारसी लिखाण निळोजी लिहीत असे. सैन्याची हजिरी व पगारपत्रकें सबनीस लिहीत असत. मोगलांच्या फौजेंतील बक्षी व हे सबनीस सारख्याच हुद्याचे होत. मात्र बक्षींचा दरज्जा सबनिसाहून बराच वरच्या प्रकारचा होता.

कायस्थ.

५ सैन्यः—आतां शिवाजीच्या सैन्याची माहिती द्यावयाची आहे. "जे जे गड घेतले त्या त्या गडावर राजियानें कारभारी बंदोबस्ती ऐसी पद्धत घातली कीं, गडावरी हवालदार एक, व सबनीस एक व सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनीं एका प्रतीचा करावा. गडावरी गल्ल्याचे सामानाचें अंबर करावें. त्यास कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, ज्या गडाचा घेरा थोर, त्या जागा सात पांच तट-सरनोबत ठेवावे. त्यास तट वांटून द्यावे. हुशारी खबरदारीस त्यांनीं सावध असावें. गडावरी लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. सबनीस ब्राह्मण व कारखाननीस प्रभू ठेवावे. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एका हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हरएक फितवाफांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना."

माहिती.

आपल्या हाताखालच्या लोकांच्या बदल्या करणें, सरकारी पत्रें लिहिणें व त्यावर स्वतःची मुद्रा करणें हे अधिकार हवालदारास दिले होते. सरकारांतून लिहावयाचीं पत्रें हवालदाराच्याच नांवानें लिहिण्यांत येत असत. रात्रीं किल्ल्याचे दरवाजे बंद करून त्यांस कुलुपें लावून

अधिकार.

किल्ल्या आपल्या उशाखालीं घेऊन निजावें व सकाळीं सूर्योदयीं दरवाजे उघडावेत, हीं कामेंहि हवालदारानेंच करावयाचीं असत. किल्ल्यामध्यें व किल्ल्याच्या बाहेरहि हवालदारानेंच वारंवार पाहणी करावयाची असे. पाहरेकरी आपला पाहरा बरोबर भरतात किंवा नाहीं हेंहि त्यानेंच पहावयाचें असे. या संबंधीं तपशीलवार हुकुम लिहून ठेविलेले होते. किल्ल्यावर दारूगोळा, दाणागल्ला, इमारती सामान व इतर उपयोगी वस्तू कशा रीतीनें ठेवाव्यात, त्यांची निगा कशी राखावी व त्यांवर देखरेख कशी ठेवावी यासंबंधींचे स्पष्ट व चोख नियम शिवाजीनें स्वतः करून ते प्रत्येक किल्ल्यावर पाठविले होते आणि त्या नियमांची अंमल बजावणी कडकपणानें करून घेण्यांत येत असे.

जामीन.

गडावर रक्षणासाठीं जे लोक ठेवावयाचे ते, " बंदुखी व इटेकरी व तिरंदाज व आड हत्यारी असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियांनीं नजरगुजर (करून) एक एक माणूस पाहून... त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यांपैकीं घेऊन मग ठेवावें."

पागा.

" पागेचें बळ तोलदार केलें. पागांच्या तोलदारीखालीं शिलेदार ठेविले. पागेमध्यें दर घोड्यासी बारगीर एक असे पंचवीस बारगिरांस मराठा धारकरी हवालदार एक केला. पांच हवाल्यांचा एक जुमला, म्हणून नांव ठेविलें. दहा जुमले म्हणजे एक हजारी. अशा पांचा हजारिया मिळोन एक पांचहजारी. अशा पांच हजारिया सरनोबताच्या हुकुमांत. पंचवीस घोड्यांस एक पखालजी व एक नालबंद. * "

सिलेदार.

सिलेदार म्हणजे स्वतःचा घोड बाळगणारा स्वार. अशा स्वारांचें पथक स्वतंत्रच असे. तथापि सरनौबताच्या हाताखालींच त्यांनीं काम करावयाचें असे. सिलेदारांचा दरज्जा पागेदाराच्या खालचा होय.

पायदळ.

" गडावरी लोक ठेवावे त्यांस दहा लोकांस एक नाईक करावा. नऊ पाईक दहावा नाईक, येणेंप्रमाणें जातीचे लोक ठेवावे." पांच नायकांवर एक हवालदार, दोन किंवा तीन हवालदारांवर एक जुमलेदार, दहा जुमलेदारांवर एक हजारी अशी व्यवस्था असे. पायदळांत पंच हजारी दिसत नाहीं. फक्त सप्त हजारीच होते, आणि त्यांवर सरनौबत हा मुख्य होय.

---

* सभासद.

देहरक्षक.

"पुढें राजियांनीं आपले पालखीबरोबर चखोट माणूस पाहून निवडक दोन हजार असामी ठेविले. तितके माणसांस साज करून दिले. डोईस मंदिल, अंगास सखलादी फतू, दोहों हातीं दोन सोन्याचीं कडीं, कोणास रुप्याचीं कडीं, तरवारांस अबनाळ तैनाळ सोने रुप्याचे, बंदुखीस कट रुप्याचे व विटियांसि कट तैसेच, कानास जोडीं कुडक्यांची येणेंप्रमाणें अवघे लोकांस सजविले. या लोकांनीं चालते वेळेस पालखीबरोबरि चौतर्फा चालत असावें.* " याप्रमाणें शिवाजीचे देहरक्षक होते.

पगार.

"पागेच्या जुमलेदारास (वार्षिक) पांचशे होन तैनात व पालखी, त्याच्या मज्मुदारास शें सवाशें होनांची तैनात असे. एक हजारी यास हजार होनांची तैनात, एक मज्मुदार व एक मराठा कारभारी व एक जमनीस प्रभु कायस्थ, त्यास पांचशे होन. याप्रमाणें असामीस तैनात व पालखी द्यावी. आला जमाखर्च चौघांचे विद्यमानें करावा. पंचहजारि-यास दोन हजार तैनात, तसेंच मज्मुदार, कारभारी, जमनीस करावें." याशिवाय हरकून, हरकारे, जासूद, गुप्त हेर हे सर्वांच्या ताब्यांत निरनिराळे असत. पांचदळाच्या जुमलेदारास शंभर होनांची तैनात असे. त्याला चाळीस होन तैनातीचा एक सबनीस असे. एक हजारीस पांचशे होनांची तैनात व त्याच्या सबनिसास शंभर किंवा सवाशें होनांची तैनात असे.

कैद.

मराठी सैन्यानें शत्रूच्या राज्यांतून आपली बेगमी मिळवावी ही शिवाजीची नीति प्रसिद्धच आहे. "लष्कर पावसाळिया दिवशीं छावणीस आपले देशांत यावें. त्यास दाणा, रतीब, औषधें घोडियांस व लोकांस घरें गवतानें शाकारून ठेविलीं असावीं. दसरा होतांच छावणीहून लष्कर कूच करून जावें. जातेसमयीं कुल् लष्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे जाबते करावे, आणि मुलुखगिरीस जावें. आठ महिने बाहेर लष्करांनीं पर मुलुखांत पोट भरावें. खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको व बटकी व कल्लावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. पर मुलुखांत पोर बायको न धरावी. मर्दाना सांपडला तरी धरावा. गाय न धरावी. बैल ओझ्यास मात्र धरावा. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागा ओळखि-यासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी बदअमल न करावा.* "

---

* सभासद.

"आठ महिने पर मुलुखांत स्वारी करावी. वैशाखमासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेश कुल् लष्करचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे जावते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कांत धरावी. थोर किंमतीची वस्तभाव असलिया दिवाणांत द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दखल सरदारास जहालियानें शासन करावें."

तपासणी.

"लष्कर छावणीस आलियावर हिशेब करून सोनेंरुपें, जड जवाहीर व कापड वस्तभाव कुल्ल सरदारांनीं बरोबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा. आणि लष्करच्या लोकांचे हिशेब देणें व फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम कष्ट मशागत केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. बेकैद वर्तणूक कोणी केली असेल आणि नामर्दी केली असेल त्यांची चौकशी करून, बहुतां मतें शोध करून त्यास दूर करून शासन करावें. चार मास छावणी करावी.*"

छावणी.

६ मुलकी:—"मुलखाची जमीन मोजणी करून चावर करून आकार केला. पांच हात व पांच मुठींची काठी. हात चौदा तसूंचा असावा. हात व मुठी मिळून बैंशीं तसूंची लांबी काठीची. वीस काठ्या औरसचौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशे वीस त्यांचा एक चावर. अशी जमीन मोजून आकारून गांवची गांवास मोजून चौकशी केली. बिघे यास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या. दोन तक्षिमा दिवाणांत घ्याव्या.*"

जमीन मोजणी.

"नवी रयत येईल त्यास गुरें ढोरें द्यावीं. बीजास दाणा पैका द्यावा. भक्षा-वयासि दाणे पैका द्यावा तो ऐवज दोहों चोहों वर्षांनीं आयुर्दाव पाहून उगवून घ्यावा. ये जातीचें रयतेचें पालग्रहण करावें. गांवचा गांव रयतेची रयत कारकुनानें कमावीस पाहून रयतेपासून वसूल पिकाचे पिकावर घ्यावा.*"

नवीन रयत.

शेतकरी आणि सरकार यांच्यांत तिसऱ्याची मध्यस्थी शिवाजीस नको होती, म्हणून शिवाजीनें आपल्या राज्याची अशी व्यवस्था केली कीं, "मुलखांत जमीदार, देशमुख, व देसाई यांचे जमी-

प्रत्यक्ष सत्ता.

---

* सभासद.

खालीं कैदेंत रयत नाहीं. यांणीं साहेबी करून नागवीन म्हटलियानें त्यांचे हाती नाहीं."

तीच व्यवस्था.

शिवाजीनें आपल्या मूळच्या राज्यांतच ही व्यवस्था केलीं असें नसून जे जे प्रांत जिंकून स्वराज्यास जोडिले, त्यांतहि अशीच पद्धत सुरू केली. "इदलशाही, निजामशाही, मोंगलाई देश कबज केला. त्या देशांत मुलकाचे पाटील कुळकर्णी यांचे हातीं व देशमुखांचे हातीं कुल् रयत. यांणीं कमाविसी करावी, आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गावीं मिरासदारांनीं घ्यावे ते गांवीं दोनशें तीनशें दिवाणांत खंडमक्ता द्यावा. त्यामुळें मिरासदार पैकेकरी होऊन गांवास हुडे, वाडे, कोट बांधून प्यादे बंदुखी ठेवून बळावले. दिवाणांस भेटणें नाहीं. दिवाणानें गुंजाईस अधिक सांगितल्यानें भांडावयास उभे राहतात. ये जातीनें पुंड होऊन देश बळावले. त्यास राजियानें देश काबीज करून हुडे (= बुरुज), वाडे, कोट पाडिले, नामांकित कोट जहाला तेथें ठाणें ठेविलें. आणि मिरासदाराचे हातीं नाहींसें ठेविलें. असें करून मिरासदार इनाम इजारतीनें मनास माने सारिखे आपण घेत होते तें सर्व अमानत करून जमीदारास गल्ला व नख्त गांव पाहून देशमुखास व देशकुळकर्णी यांस व पाटील कुळकर्णी यांसी हक्क बांधून दिले. जमीदारांनीं वाडा बुरजांचा बांधूं नये, घर बांधून राहावें, ऐसा मुलकाचा बंद केला."

सरदार.

सरदारांना सुद्धां आपल्या कुळाकडोन परभारें वसूल करण्याची सत्ता नसे. "सरनौबतास व मजमूदारास व कारकुनांस व हुजुरातील लोकांस तनखे वराता देत होते. शेत करीत होते त्याचा आकार रयतेप्रमाणें त्यांच्या हक्कांत धरीत होते. वरकड वांटणी हुजूर व मुलुकावरी वराता. येणेंप्रमाणें सालझाडा वरचेवर करीत होते. लष्करांत व हशमास व गडास एकंदर मोकाशे महाल गांव दरोबस्त देणें नाहीं. जें देणें तें वरातेनें द्यावें, अगर पोत्याहून रोख ऐवज द्यावा. मुलखांत साहेबी कारकुनाखेरीज कोणाची नाहीं. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनांनीं द्यावें. मोकाशी जहालियानें रयत अफरा होईल आणि बळावेल. कमाविशीची कैद चालणार नाहीं. रयत बळावली म्हणजे जागां जागां बंडें होतील, ज्यास मोकाशे द्यावे तो व जमीदार एक जहालियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेचे नाहींत."

---

* सभासद.

"दोन महाल मिळोन लाख, सव्वालाख, पाऊण लाख होन पाहून एक सुभेदार व एक कारकुन करावा. यास दर आसामीस चारशें होन तैनात करावी. मजमुदार सुभ्याचा करावा त्यास शभर सव्वाशें होन करावे. सुभेदारास पालखी चारशें होनांत करार करावी. मजमुदारास अबदागिरी द्यावी. तैनात सरकारची द्यावी."*

सुभेदार.

"मुलुखांत देश पाहून लाख रुपायास सुभा ठेविला. धामधुमीचा मुलूख सरदेचा पाहून मुलुखगिरीच्या कारकुनासमागमें लष्कर, स्वार, हशम जे जागां जितकी तोलदारी पाहिजे तितकी करून द्यावी. सगळे सुभेदार ब्राह्मण असून ते पेशव्यांचे आज्ञेंत ठेविले.*"

७ देवस्थान धर्मादायः—धार्मिक बाबतींत शिवाजीची राजनीति फारच उदार असे. "मुलुखांत देवदेवस्थानें जागजागां होतीं त्यांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविलें. मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्य स्थल पाहून चालविले. वैदिक ब्राह्मण यांसी योगक्षेम ब्राह्मण विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी गांवोगांवीं सत्पुरुष पाहून, त्यांचें कुटुंब पाहून अन्नवस्त्र ज्यांस लागेल त्याप्रमाणें, धान्य, द्रव्य त्यांस गांवचे गांवीं माहाली नेमून देऊन, साल दरसाल त्यास कारकुनांनी पाववावें." बाणकोटपासून चार मैलांवर केळोशी येथील मुसलमान सत्पुरुष बाबा याकूत याचेसाठीं झोंपडी वगैरे बांधून देऊन त्याच्या योगक्षेमाचीहि व्यवस्था शिवाजीनें केली होती हें प्रसिद्धच आहे.

दानधर्म.

"वेदशास्त्र अगदीं उच्छिन्न झालें (होतें), त्यास एक ग्रंथ अधीत जाला त्यास मणभर धान्य; दोन ग्रंथ (अधीत जाले) त्यास दोन मण धान्य (याप्रमाणें) परीक्षा करून (द्यावें) तसेंच पंडित जसा जो विद्वान् त्यास योग्यता पाहून, स्वदेशींचे त्यांस भात व द्रव्य, विदेशी यांसि द्रव्य याचीं वर्षासनें, श्रावणमासीं सर्वांस पंडितराव यांणीं परीक्षा करून (देत जावीं.). अधिक विद्या होईल त्यास अधिक मोईन वाढवावी. मोठे मोठे पंडित, वैदिक, प्रतिष्ठित येतील त्यांच्या सभा करून, सत्कार करून त्यांस शंभर पन्नास अधिकहि रुपये योग्यतेनुरूप द्यावे, ऐसें करून दिलें. याजमुळें दिवसें दिवस अधिक विद्या वृद्धीस पावती झाली.

वेदशास्त्राध्ययन.

---

* सभासद.

होत्रें घेणार, त्यांस तितकें द्रव्य देऊन घेवावें. त्यांची मोईन अधिक करावी. तसेंच यज्ञ करणार, त्यांस द्रव्य लागेल तसें मोईन बांधून देऊन यज्ञ करवावे. या प्रमाणें देवब्राह्मणांची स्थापना करून नित्यदानें व नैमित्य प्राप्त झालें असतां जेसें करावें (त्याप्रमाणें केलें.) तसेंच जागां जागां अन्नछत्रें व नित्य ब्राह्मण भोजन, इच्छा-भोजन ब्राह्मणांस, यांचा निबंध बांधून दिला. ब्राह्मण आपले राज्यांतील दुसरे राज्यांत याचना करावयास न जावें ऐसें केलें. "*

८ रामदासस्वामीः—शिवाजीच्या वेळीं महाराष्ट्रांत रामदास स्वामी ऊर्फ समर्थ हे प्रख्यात साधुपुरुष होते. यांचा जन्म सन १६०८ मध्यें झाला असून मृत्यु शिवाजीनंतर एक वर्षानें म्हणजे सन १६८१ मध्यें झाला. हे नैष्ठिक ब्रह्मचारी असून यांनींच महाराष्ट्रांत रामभक्ति प्रचलित केली. यांचें कडकडीत ब्रह्मचर्य, यांचा दीर्घोद्योग, यांचें सूक्ष्मावलोकन, यांची व्यवहारकुशलता, व यांची अवाढव्य ग्रंथरचना यायोगें कोणाचेंहि चित्त यांच्याकडेस आकर्षिलें जात असे. शिवाजीचे हे मोक्षगुरु होते. शिवाजीनें यांच्याच सल्लयानें स्वराज्यस्थापना केली असें अलीकडेस गेलीं पंचवीस वर्षें सिद्ध करण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु यासंबंधीं जो पुरावा पुढें करण्यांत येत आहे तो पुरेसा नाहीं, इतकेंच नव्हे पण जो अर्धवट आहे तोहि संशयग्रस्तच आहे. सारांश राजकीय बाबतींत रामदासांचा यत्किंचित्हि संबंध दिसत नाहीं. या सत्पुरुषाचें नित्य दर्शन, सहवास व सेवा घडावी या हेतूनें सातारा घेतल्यानंतर म्हणजे सन १६७३ च्या सुमारास शिवाजीनें समर्थांनीं परळीस ऊर्फ सज्जनगडास राहावें अशी व्यवस्था करून दिली. समर्थांच्या ठिकाणीं शिवाजीची भक्ति पुढें फारच जडली व आपल्या सगळ्या राज्याची भिक्षा त्यानें समर्थांच्या झोळींत टाकिली. समर्थांनींहि तितक्याच निःस्पृहपणानें त्याच राज्याची व्यवस्था पाहण्यास आपल्या तर्फे शिवाजीसच कुल मुखत्यार नेमिलें व आपली खूण म्हणून स्वराज्याचें निशाण भगव्या रंगाचें करविलें अशी मनोरम दंतकथा प्रचलित आहे.

समर्थ.

"रामदास व शिवाजी यांच्या संबंधाविषयीं महाराष्ट्रांत दोन मतें प्रचलित आहेत. एक मत असें आहे कीं, शिवाजीनें आपलें सगळें राजकारण रामदासाच्या सल्लयानें व उपदेशानें केलें. आणि दुसरें मत अर्थात्च याच्या अगदीं विरुद्ध आहे. तें असें कीं रामदासाचा व शिवाजीचा

दोन मतें.

---

* चिटणीस

राजकारणांत यत्किंचित्हि संबंध नव्हता. या उभय मतांचें जें वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे तें व समर्थांचा दासबोध व इतर वाङ्मय यांचें सूक्ष्म अवलोकन केलें म्हणजे असें दिसतें कीं, ब्रह्मचर्य, वैराग्य, प्रयत्नशीलता, सूक्ष्म निरीक्षण, श्रीरामभक्ति संप्रदाय पसरण्याची उत्कंठा, रामभक्तीपर वाङ्मय निर्मिती व जनतेच्या दुःस्थिती-विषयीं अत्यंत तळमळ या सर्व गोष्टी त्यांत दृग्गोचर होत असल्यानें रामदासास राष्ट्रीय साधुत्वाचें स्थान प्राप्त होणें अवश्य आहे. कामक्रोधादि षड्रिपूंना जिंकणें व ऐहिक सुखदुःखाविषयीं उदासीन असणें हीं हिंदुसाधूंचीं मुख्य लक्षणें असल्यानें रामदासानें प्रत्यक्ष कोणत्याहि राजकारणांत भाग घेणें शक्य नव्हतें व तसा तो त्यानें घेतल्याचें सिद्धहि होत नाहीं. इतकेंच नव्हे पण त्यांच्या शिष्यसांप्रदायांतहि राजकारणाची परंपरा दिसत नाहीं. यावरून रामदास हे राजकारणी साधुपुरुष नव्हते असेंच सिद्ध होतें.

राजकारण.

रामदासाच्या दासबोध ग्रंथांत राजकारण हा शब्द दहावीस वेळां आला आहे, परंतु तो चातुर्य या अर्थीं आला आहे असें रा. फाटक यांचें प्रतिपादन आहे व एक दोन अपवाद सोडिले तर रा. फाटक यांचा अर्थ बरोबर आहे असेंच वाटतें. तथापि शिवाजीचा स्वराज्यस्थापनेचा यशस्वी प्रयत्न रामदासांच्या सर्वनिरीक्षक दृष्टीस पडतांच त्यांनीं आपलें काव्य तत्कालीन राजकीय स्थितीवरहि करण्यास सुरुवात केली होती असें दिसतें.

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्याचे ॥ १ ॥
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पिरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपुले इच्छेने ॥ २ ॥
राज्य नेलें म्लेंच्छक्षेत्रीं । गुरुत्व गेलें कुपात्रीं ।
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥ ३ ॥

या वर्णनावरून त्यांना लोकस्थिति उत्तम प्रकारें अवगत होती व तिच्याबद्दल त्यांचें अंतःकरण तळमळत होतें असें स्पष्ट दिसतें.

जयास जिवाचें वाटे भये । तेणें क्षात्रकर्म करूं नये ।
कांहीं तरी करून उपाये । पोट भरावें ॥ १ ॥
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ २ ॥

जैसा भांड्याचा गलोला । निर्भय भारामध्यें शिरला ।
तैसा क्षत्री रिचविला । परसैन्यामध्यें ॥ ३ ॥
मर्दें तकवा सोडूं नये । म्हणिजे प्राप्त होतो जय ।
कार्यप्रसंग समय । वोळखावा ॥ ४ ॥
देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ ५ ॥
मराठा तितुका मेळवावा । आपला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ ६ ॥
देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥ ७ ॥
देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बुडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥ ८ ॥

या ओव्यांत धर्मसंरक्षणासाठीं क्षत्रियानें काय करावें हें सोज्वळपणें सांगितलें आहे. शिवाजीराजाचे पराक्रम पाहून रामदासास अशा प्रकारचा उपदेश करण्याची स्फूर्ती झाली असली पाहिजे असें निश्चितपणें वाटतें.

कांटीनें काटी झाडावी । झाडावी परी कळों नेदावी ।
कळकटेपणाची पदवी । असों न द्यावी ॥ १ ॥
जो दुसऱ्यावरी विश्वासिला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ २ ॥
मूख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें ।
कित्तेक खलक उगवावें । राजकारणामध्यें ॥ ३ ॥
बोलके पहिलवान कळकटे । तयासीच ध्यावे झटे ।
दुर्जन राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥ ४ ॥
समुदाव पाहिजे मोठा । तरी तणावा असाव्या बळकटा ।
मठ करूनि ताठा । धरूं नये ॥ ५ ॥
गनीमाच्या देखूनी फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा ।
ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्ष परमार्थी ॥ ६ ॥
हें धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ ७ ॥

हुंब्यास हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥ ८ ॥
घटासि आणावा घट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥ ९ ॥
जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ।
इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ॥ १० ॥

या ओव्यांवरून रामदासास त्यावेळचे शिवाजीचे पराक्रम किती आवडत होते हें स्पष्ट लक्षांत येतें. या प्रकारें रामदासाचा कार्यक्रम बरींच वर्षें चालत असून शिवाजीचें त्यांच्याकडेस लक्ष न गेल्यानें त्यांनीं शिवाजीस पुढील पत्र पाठविलें.

निश्चयाचा महामेरू । बहुतजनांसी आधारू ।
अखंडस्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्वासी । तुळणा कैची ॥ २ ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ३ ॥
आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणें सुशील । सकळाठायीं ॥ ४ ॥
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥ ५ ॥
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोलिली । धर्म गेला ॥ ६ ॥
देवधर्मगोब्राह्मण । यांचें करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥ ७ ॥
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमचे ठायीं ॥ ८ ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हां कारणें ॥ ९ ॥
आणिकहि धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ती । विश्वीं विस्तारिली ॥ १० ॥

कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सूटले ।
कित्येकांस आश्रय जाले । शिवकल्याण राजा ॥ ११ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणूं ॥ १२ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळिली पाहिजे ॥ १३ ॥
उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १४ ॥

याप्रमाणें पत्र गेल्यानंतर शिवाजी व रामदास यांची भेट होऊन शिवाजीनें रामदासास गुरु केलें. हा समय सन १६७३ च्या सुमाराचा होता असें आतां सिद्ध झालें आहे. स्वराज्य स्थापन होऊन शिवाजीस राज्याभिषेक झाल्यावर रामदासास अत्यंत आनंद झाला असें पुढील ओंव्यांवरून दिसतें.

जन्मदुःखें जरादुःखें । नित्य दुःखें पुनः पुन्हां ।
संसार त्यागणें जाणें । आनंद वनभूवना ॥ १ ॥
स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेचि होतसे ।
हिंडतां हिंडतां गेलों । आनंद वनभूवना ॥ २ ॥
ते साक्ष देखिली दृष्टी । किती कल्लोळ ऊठिले ।
विघ्नांचा प्रार्थिलें गेलों । आनंद वनभूवना ॥ ३ ॥
स्वधर्मा आड जें विघ्नें । तें तें सर्वत्र ऊठिली ।
लाटिलीं कुटिलीं देवें । दापिलीं कापिलीं बहु ॥ ४ ॥
विघ्नांच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरि लोटला ।
घर्डिलीं चिर्डिलीं रागें । रडविलीं बडविलीं बळें ॥ ५ ॥
खौळले लोक देवाचे । मुख्य देवचि ऊठिला ।
कळेना काय रे होते । आनंद वनभूवनीं ॥ ६ ॥
त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंद-विमोचनें ।
मोहीम मांडिली मोठी । आनंद वनभूवनीं ॥ ७ ॥
कल्पांत मांडिला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया ।
कैपक्ष घेतला देवीं । आनंद वनभूवनीं ॥ ८ ॥
बुडाले सर्वहि पापी । हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो जाला । आनंद वनभूवनीं ॥ ९ ॥

भीमची धाडिला देवें । वैभवें धांव घेतली ।
लांगूळ चालिलें पूढें । आनंद वनभूवनीं ॥ १० ॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला ।
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें । आनंद वनभूवनीं ॥ ११ ॥
गळाले पळाले मेले । जाले देशधडी पुढें ।
निर्मळ जाहली पृथ्वी । आनंद वनभूवनीं ॥ १२ ॥
उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया ।
जपतप अनुष्ठानें । आनंद वनभूवनीं ॥ १३ ॥
रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि उठिली ।
मर्दिले पूर्विचे पापी । आनंद वनभूवनीं ॥ १४ ॥

स्वराज्यस्थापनेबद्दल रामदासांना किती आनंद झाला होता व कसें समाधान वाटत होतें हें वरील उक्तींत उत्तम प्रकारें दृग्गोचर होतें.

शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजीच्या कृतीचा रामदासासहि वीट येऊन त्यांनीं **संभाजीस उपदेश.** पुढील उपदेशपर पत्र संभाजीस लिहिलें आहे.

अखंड सावधान असावें । दुश्चित्त कदापि नसावें ।
तजविजा करीत बसावें । एकांत स्थळीं ॥ १ ॥
कांहीं उग्र स्थिती सांडावी । कांहीं सौम्यता धरावी ।
चिंता लागावी परावी । अंतर्यामीं ॥ २ ॥
मागील अपराध क्षमावे । कारबारी हातीं धरावे ।
सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥
श्रेष्ठीं जें जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ।
मग जाणावें फावलें । गलिमांसी ॥ ४ ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यास जाये ।
धीर धरोनी महत्कार्य । समजोन करावें ॥ ५ ॥
राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊनि करावे सेवक ।
लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंच नये ॥ ६ ॥
बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे ।
कष्ट करोन घसरावें । म्लेंच्छावरी ॥ ७ ॥

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मेळवावें ।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ॥ ८ ॥
शिवराजास आठवावें । जीवित तृणवत् मानावें ।
इहपरलोकीं रहावें । कीर्तिरूपें ॥ ९ ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप ।
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ १० ॥
शिवराजाचें कैसें बोलणें । शिवाराजाचें कैसें चालणें ।
शिवराज्याची सलगी देणें । कैसें असे ॥ ११ ॥

यावरून शिवाजीबद्दल रामदासास किती अपरंपार आपलेपणा वाटत होता हें दिसतें. संभाजीच्या अनन्वित कृत्यांबद्दल त्यास दोष न देतां फक्त शिवाजीचा उत्कृष्ट कित्ता गिरविण्याचा रामदासानें त्याला उपदेश केला आहे हें रामदासांच्या व्यवहारकुशलतेचें निदर्शक आहे. असो; असा हा अद्वितीय राष्ट्रीय साधुपुरुष शिवकालीं होऊन गेला व शिवाजीच्या पराक्रमांची छाया त्याच्या काव्यावर पडली असें स्पष्ट दिसतें.

९ शिवाजीच्या कारकीर्दीचा परिणामः—मागें सांगितल्याप्रमाणें

नियम.

एकंदर राज्यव्यवस्थेचे नियम शिवाजीनें घालून दिले होते. लुटींत मिळालेले सर्व जिन्नस सरकारांत सोपावेत असा नियम असे. तथापि तो सर्वत्र सारखाच पाळला जात असेल असें दिसत नाहीं. धरणगांव येथील इंग्रजांची वखार शिवाजीच्या शिपायांनीं लुटली परंतु तेथें सांपडलेली लूट सरकारांत जमा झाल्याचें आढळत नाहीं, यावरून शिवाजीनें घालून दिलेले नियम कांहीं ठिकाणीं कांहीं अंमलदार तंतोतंत पाळीत नसत असें दिसतें. सर्वत्र आणि सर्व वेळीं शिवाजी स्वतः हजर असणें शक्यच नाहीं. अर्थात्च तो जेथें नसे तेथें अशी अव्यवस्था होणें साहजिक होय. लूटींत प्रत्यक्ष फौजेशिवाय बाजारबुणगेहि भाग घेत असतील व त्यांतूनच पुढें पेंढारी उत्पन्न झाले व नेहमींच लूट करणें एवढाच त्यांचा व्यवसाय होऊन राहिला.

लूट.

शेजारच्या राज्यांत स्वराज्याचे शिपाई नेहमींच लुटालूट करीत असत. व शिवाजीनें सन १६७२ मध्यें सुरतेच्या फौजदारास आपल्या लुटीचें असें समर्थन सांगितलें कीं, " माझ्या स्वराज्याचें व प्रजेचें संरक्षण करण्यासाठीं तुमच्या औरंगजेब बादशहानें मला एवढें सैन्य

ठेविण्यास भाग पाडिलें आहे. (कारण हें सैन्य नसलें तर मोगली फौज माझा प्रदेश लुटून प्रजेला नागवील.) अर्थात् या सैन्याचें पोषण तुमच्या मोगली मुलुखांतूनच झालें पाहिजे आणि त्याचसाठीं मी लुटालूट करितों. " हें शिवाजीचें समर्थन त्याच्या उदयाच्या प्रारंभीं व पुढें फारतर मोगली मुलुखापुरतें बरोबर आहे. परंतु विजापुरी प्रांत, गोवळकोंडेकरांचा प्रांत, कानडा, तंजावर इत्यादि प्रांत शिवाजीनें लुटले, त्या लुटीचें समर्थन वरील उत्तरानें होऊं शकत नाहीं. आणि नंतर पेशव्यांच्या मुलुखगिरीचें तर समर्थन यानें मुळींच होत नाहीं.

परिणाम.

शिवाजीनें स्वराज्यस्थापनेसाठीं उपयोगांत आणिलेले मार्ग नैतिकदृष्ट्या कसेहि असले तरी त्यानें मिळविलेले विजय पाहून कोणाचेहि नेत्र दिपूनच जातात. एका लहानशा जहागीरदाराचा चिमुकला मुलगा तो काय, पण मोगली साम्राज्याला तोच दुर्निवार असा ठरला. आणि याच एका पराक्रमामुळें शिवाजीचे हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानाबाहेरील समकालीन अगदीं चकित होऊन गेले होते. औरंगजेब तर किंकर्तव्यमूढच होऊन गेला होता हें पुढील एकाच नोंदीवरून स्पष्ट दिसतें. सन १६७० मध्यें एके दिवशीं राज्यांतील निरनिराळ्या ठिकाणच्या बातम्या आलेल्या बादशहा वाचीत असतां, दक्षिणेंतील एका बातमी पत्रांत शिवाजीनें मोगली मुलुख लुटल्याची हकीकत त्याच्या वाचण्यांत आली. तत्काळ बादशहा शून्यव्यवसाय होऊन स्वस्थ बसून राहिला. बादशहाची अशी शोचनीय स्थिति झाली होती. आपल्या सर्व पराक्रमी सरदारांनीं शिवाजीपुढें हात टेकले हें पाहून औरंगजेब नेहमीं शिवाजीच्या पारिपत्यासाठीं दक्षिणेंत आतां कोणास पाठवावें असें दरबारांत विचारीत असे. औरंगजेब धर्मवेडा असे व काझी अबदुल वहाब याचें याच कारणानें बादशहावर मोठें वजन असें. अर्थात्च इतरांना तें असह्य होतें. औरंगजेबाचा उपर्युक्त प्रश्न ऐकून महाबतखान एकदां मुद्दामच टोंचून म्हणाला, " शिवाजीच्या पारिपत्यासाठीं सरदार कशाला पाहिजे ? त्याला नामशेष करण्यास काजीचा फतवा पुरे आहे ! " इराणचा तरुण बादशहा दुसरा शहा अब्बास यानें तर औरंगजेबास मुद्दामच अधिक्षेपपूर्वक लिहून पाठविलें होतें कीं, "तूं स्वतःला आलमगीर (= जगताचा बादशहा) म्हणवितोस परंतु लहानशा जमीनदाराच्या मुलालाहि तुला जिंकतां येत नाहीं. मी लवकरच हिंदुस्थानांत येऊन बादशहाचीं कर्तव्यें कशीं करावींत हें तुला शिकविणार आहें. "

शिवाजीनें श्रुतिस्मृतींचें संरक्षण करून धर्ममर्यादा कायम ठेविली आणि हिंदूंचें धर्मचिन्ह जो 'तिलक' त्याचेंहि रक्षण केलें अशा अर्थाचें भूषण कवीनें जें वर्णन केलें आहे तें सत्य आहे.

थोरवी.

शिवाजीचा–व नंतर संभाजीचाहि–दरबार म्हणजे औरंगजेबाच्या शत्रूंचें निवासस्थानच होऊन राहिलें होतें. शिवाजी व औरंगजेब हे दोघेहि थोर पुरुष होते परंतु उभयतांच्या वर्तनांत जमीन अस्मानाचें अंतर होतें.

प्रकरण १६ वें

योग्यता

—०—

[१ राजनीति जुनीच होती काय ? २ शिवाजीला चिरस्थायी राज्य कां स्थापितां आलें नाहीं. ३ शिवकालीं राष्ट्रीयभावनेस अडथळे. ४ आर्थिक उन्नती-कडे मराठ्यांचें दुर्लक्ष. ५ डावपेंच व कारस्थानें यांचा अतिरेक. ६ शिवाजीचें वर्तन. ७ शिवाजीच्या बुद्धीचें पृथक्करण. ८ शिवाजीचें राजकीय ध्येय व अडचणी. ९ राष्ट्रभावनेवर शिवचरित्राचा परिणाम.]

राजनीति.

राजनीति जुनीच होती काय ?:—शिवाजीची राजनीतिसुद्धां त्याच्या राज्यव्यवस्थेप्रमाणेंच जुनीच होती. पुरातन कालापासून हिंदूंची राजनीति अशी ठरून गेली आहे कीं, दसरा होतांच सीमोल्लंघन करून शेजारच्या राजाचा मुलूख बळकवावा व आपलें राज्य वाढवावें. आणि क्षत्रियांच्यासाठीं अशाच तऱ्हेचे नियम मन्वादि स्मृतिकारांनीं घालून दिलेले आहेत. मोगल पादशहांनीं आणि दक्षिणेंतील मुसलमान राजकर्त्यांनींहि हाच क्रम चालू ठेवलेला आढळतो. परंतु मुसलमानांच्या मतें शेजारचें राज्य बळकाविणें हा प्रकार त्यांच्या धर्माला संमत असाच होय. कारण ते म्हणतात, कुराणांतील आज्ञेप्रमाणें मुसलमान राजा आपल्या शेजारच्या मुसलमानेतर राजाशीं शांततेनें वागणें शक्यच नाहीं. अशा राजाला कुराणांत दारुलहर्ब म्हणजे भांडण करण्यास योग्य अशी व्यक्ति किंवा स्थान असेंच म्हटलें आहे. अशांची कत्तल करणें व त्यांचा प्रदेश लुटणें हें मुसलमान पादशहाचें कर्तव्यच होय. मात्र तो शेजारचा राजा मुसलमान होऊन दारुल इस्लाम या संज्ञेस पात्र होईपर्यंतच त्याच्याशीं युद्ध प्रसंग व्हावयाचा, व नंतर ते एकमेकांचे संरक्षणकर्ते समजले जातात.

धोरण.

परराज्यसंबंधीं शिवाजीचें धोरण व मुसलमानी धर्माप्रमाणें मुसलमान राजाचें धोरण यांतील साम्य आश्चर्यजनक आहे. या धोरणाला मुलूखगिरी हा एकच शब्द दोघांच्याहि इतिहासांत वापरलेला आहे. फरक एवढाच, मुसलमान राजानें दुसऱ्या मुसलमान राजाचा प्रदेश

लुटूं नये व त्याचा रक्तपात करूं नये, असें मुसलमानी शास्त्र आहे. परंतु त्या शास्त्राप्रमाणें सर्वच मुसलमानी राजे वागतात असें नव्हे. परंतु तसें शास्त्र आहे हें खरें आहे. शिवाजीच्या मुलूखगिरींत असा कांहींच निर्बंध नव्हता. मुसलमान व हिंदु अशा दोनहि व्यापाऱ्यांपासून सारख्याच निर्दयतेनें संपत्ति काढण्यांत येत असे. दुसरें, मुसलमानी धर्मांत सांगितल्याप्रमाणें मुसलमान राजा शेजारच्या मुसलमानेतर राजाचा प्रदेश जिंकून तो आपल्या राज्यास जोडण्याची व तेथील प्रजेस मुसलमान करण्याची महत्वाकांक्षा ठेवितो. अर्थात् याप्रमाणें राज्य खालसा केल्यावर त्या प्रजेस मुसलमान राजाकडून कधींहि उपद्रव पोंहोचत नाहीं. परंतु शिवाजीचा उद्देश याप्रमाणें राज्य खालसा करण्याचा मुळींच नव्हता. शेजारच्या राज्यांत नेहमीं लुटालूट करावी किंवा सभासदाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "आठ महिने बाहेर लष्करांनीं परमुलुखांत पोट भरावें. खंडण्या घ्याव्या." एवढाच असे. सारांश शिवाजीची राजनीति तंतोतंत मुसलमानांच्या राजनीतिप्रमाणेंच असे. फरक मात्र एवढाच होता कीं, शिवाजीच्या राज्यांत सर्व जातीच्या प्रजेला समान दर्जानें वागविण्यांत येत असे. सर्वांना सारखा न्याय दिला जात असे. सर्वांचें संरक्षण एकच प्रकारानें करण्यांत येत असे. अशी स्वराज्याची राजनीति उदार असे हें मागें सांगितलेंच आहे.

२ शिवाजीला चिरस्थायी राज्य कां स्थापितां आलें नाहीं ?:—

प्रश्न. शिवाजीला चिरकालिक राज्य कां स्थापन करतां आलें नाहीं ? मराठ्यांना आपले इच्छित हेतु कां साध्य करतां आले नाहींत ? आपल्या सगळ्या राष्ट्राची एकी करून भक्कम राजकीय संस्था त्यांना कां अस्तित्वांत आणितां आली नाहीं ? हे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत.

अल्पायुत्व. याला सर्वांत मुख्य कारण म्हणजे शिवाजीचें अल्पायुत्व हेंच होय. शिवाजीचा मोगलांशीं कायमचा बिघाड सन १६७० मध्यें झाला. व यापुढें तो अवघ्या दहाच वर्षांनीं मरण पावला; अर्थात् चिरस्थाई राज्य स्थापनेला हा अवधि फारच अल्प होता यांत संशय नाहीं. परंतु एवढें एकच कारण चिरस्थाई राज्य न स्थापण्याला होतें असें मात्र म्हणतां येत नाहीं. जी राज्यविघातक नीति पेशवाईत अठराव्या शतकांत महाराष्ट्रांत होती तीच भावना सतराव्या शतकांतहि महाराष्ट्रांत असल्यानें शिवाजी अधिक कालपर्यंत जगला असता तरीहि त्याला चिरकालीन

राज्यस्थापना करतां आली असती किंवा नसती याचा संशयच आहे. शिवाजीनें दक्षिणेंत जें राज्य स्थापन केलें व शिवाजीच्या आणि पहिल्या बाजीरावाच्या पराक्रमांनीं जे राष्ट्रीय विजय व भरभराट त्या राज्याला प्राप्त झाली त्या योगें हिंदूंच्या धार्मिक दृष्टीनें तत्काल प्रतिक्रियाहि सुरू झाली, हें स्वराज्यावरील पहिलें संकट होय. राजकीय दृष्टीनें त्याकाळीं मराठे अगदीं खालावले होते त्यामुळें त्यांच्या साध्या राहणीला विरुद्ध असे धार्मिक आचारविचार पुढें येऊन जातिभेदाला वाचा फुटली. आणि त्यामुळें शिवाजीच्या राजकीय विजयाला या योगें मोठाच धक्का बसला.

उच्च नीचत्व.

स्वतंत्र मराठी राज्य स्थापन झाल्यानें मराठ्यांना सुरक्षितता, सत्ता आणि संपत्ति आपोआपच प्राप्त झाली. परंतु त्यामुळें अठराव्या शतकांतील मराठ्यांना, मुसलमानांनीं पूर्वी हिंदूंचा जो छळ केला होता त्याचा अगदीं विसर पडला आणि ते आपआपसांतच उच्चनीच भाव उत्पन्न करूं लागले. सह्याद्रीच्या पूर्वेकडील ब्राह्मण पश्चिमेकडील ब्राह्मणांना कमी प्रतीचे लेखूं लागले व घांटावरचे लोक देशावरील आपल्याच बांधवांना तुच्छ समजूं लागले. भट हे पेशवे झाल्यावरहि त्यांच्या निपणजाचा खापरपणजा दुसऱ्या एका देशस्थ ब्राह्मणाच्या निपणज्यापेक्षां प्राचीनकाळीं सामाजिक दृष्टीनें गरीबस्थितींत होता एवढयाचमुळें तो देशस्थ ब्राह्मण पेशव्यांना हलक्या प्रतीचे समजत असे. चित्पावन ब्राह्मणांनीं तर देशस्थांविरुद्ध सामाजिक युद्धच पुकारलें होतें. ब्राह्मण आणि कायस्थ यांच्यांत आडवा विस्तव जात नव्हता. या ब्राह्मणकायस्थांच्या झगड्याचें बीज शिवकालापर्यंत मागें गेलेंलें दिसतें. आपसांतील भांडणामुळेंच जातींची संख्या वाढून तीच राष्ट्रीयत्वाला विघातक ठरते. धर्मश्रद्धेवर शिवाजीनें स्वराज्याची स्थापना केल्यामुळेंच त्याच्या नाशाचें बीजहि स्थापनेबरोबरच रुजलें गेलें. डॉ. रवींद्रनाथ टागोर म्हणतात.

" क्षणिक उत्साहानें जेव्हां सर्व देश कार्योन्मुख होतो तेव्हां सर्व समाजाची एकी झाली आहे असें आपणांस वाटतें. परंतु त्या समाजरूपी शरीरांतील फटी आणि भोंकें आपलें कार्य गुप्तपणें करीतच असल्यानें कोणतीहि उदात्त नीति त्यांत वृद्धिंगत होऊं शकत नाहीं."

" पृथक् पृथक् धार्मिक आचार आणि लखोटबंद जातिव्यवस्था हें ज्या हिंदु समाजाचें जीवनसर्वस्व आहे त्या हिंदुसमाजांतील उपर्युक्त फटी कायम ठेवून

शिवाजीनें मोंगलांच्या पीडेपासून त्याचा बचाव करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगिली. जातिसंस्थेनें विभागलेल्या हिंदु समाजानें सर्व हिंदुस्थानावर विजय मिळवावा अशी शिवाजीची इच्छा होती. त्यानें वाळूंच्या कणांचा दोर वळून अशक्यास शक्य करण्याचा प्रयत्न केला. परंतु स्थिर जातिभेदानें जर्जर झालेल्या समाजानें हिंदुस्थानासारख्या विशाल द्वीपकल्पावर स्वराज्य स्थापन करणें हें कोणत्याहि मनुष्याच्या शक्तीबाहेरचें काम आहे इतकेंच नव्हे पण तें निसर्गनियमाच्याहि विरुद्ध आहे. ”

शूद्र.

शिवाजी आणि त्याचा सासरा गायकवाड हे दोघेहि मराठे होते. अर्थात् तिरस्कृत जातीपैकीं होते. एकुणीसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं पर्यंत म्हणजे दक्षिणेंत राष्ट्रीय भावना उदयाला येईपर्यंत महाराष्ट्रीय ब्राह्मणाला मराठा म्हटलें असतां आपला मोठा अपमान झाला असें वाटत असे. तो चटकन रागानें म्हणत असे, ‘ छे, छे, मी दक्षिणी ब्राह्मण आहें. ’ ज्या ब्राह्मणांच्या संरक्षणासाठीं व उत्कर्षासाठीं शिवाजीनें आपला जीवहि वाहिला होता, त्याच ब्राह्मणांनीं त्याला अशा प्रकारें वागविलेलें पाहून त्याला अत्यंत अपमान वाटला. मराठ्यांप्रमाणेंच कायस्थहि ब्राह्मणांच्या गर्वाला बळी पडले होते. आणि बाळाजी आवजी हा कायस्थांचा पुढारी होता. ब्राह्मण आपणांला शूद्र समजतात हें पाहून शिवाजीनें बाळाजी आवजीला हातीं धरिलें. बुद्धिमत्ता आणि विद्वत्ता यांत कायस्थ हे ब्राह्मणांना केव्हांहि हार न गेल्यामुळें ब्राह्मण त्यांचा द्वेष करीत. शिक्षण आणि सरकारी चाकरी यांत कायस्थच ब्राह्मणांचे प्रतिस्पर्धी असत. त्यामुळें कायस्थांस वैदिक कर्माचा अधिकार नाहीं, तेहि शूद्रच आहेत असें म्हणून ब्राह्मणांनीं त्यांना कमी प्रतीचे लेखण्यास सुरुवात केली. पुढें बाळाजीनें आपल्या मुलाची मुंज वैदिक विधीनें केल्यामुळें तर ब्राह्मणांनीं आकाशपाताळ एक करून सोडिलें. याप्रमाणें बाळाजी व शिवाजी समदुःखी असल्यानें बाळाजीला आपल्या धन्याबद्दल सहानुभूति वाटणें अगदीं साहजिक होय. त्यानें शिवाजीचा सामाजिक दरजा वाढविण्यासाठीं गागा भट्टाला अनुकूल करून घेऊन शिवाजीला शुद्ध क्षत्रियत्व प्राप्त करून दिलें. या एकंदर प्रकरणांत गागाला बरीच दक्षिणा मिळाली त्यामुळें गागाभट्टानें बाळाजीचे उपकार स्मरून कायस्थ धर्मदीप व कायस्थ धर्मप्रदीप असे दोन ग्रंथ लिहिले व एकांत कायस्थांचें श्रेष्ठत्व [illegible] पण इतर ब्राह्मणांचें कांहीं तो समाधान करूं शकला नाहीं.

जाति सुधारणांची एकादी विचारपूर्वक योजना, शिक्षणप्रसार अथवा जातिजातींत सख्य घडवून आणण्याचे प्रयत्न शिवशाहींत किंवा पेशवाईंतहि केल्याचे दिसत नाहीं. मराठी राज्यांत जनतेची दिसत असलेली एकी नैसर्गिक नसून कृत्रिम, आकस्मिक व म्हणूनच भंगुर होती. ही एकी राजकर्त्यांच्या असाधारण व्यक्तिविशेषावर अवलंबून होती; आणि राजकर्त्यांमध्यें असाधारण पुरुष उत्पन्न होण्याचें बंद होतांच ही एकीहि नष्ट झाली.

योजना.

एकाच व्यक्तीच्या समंजसपणावर चाललेलें राज्य स्वाभाविकपणेंच अस्थिर असणार. आणि एकंदर राज्यकारभारावर या अस्थिरतेचा फारच विनाशक परिणाम झाला. मूळचें राज्ययंत्र सुव्यवस्थित असो व त्यांतील कायदेकानू कितीहि विचारपूर्वक घडलेले असोत परंतु पुढें त्यांत नालायकी, वारंवार फेरबदल्या आणि लांच हा त्रिदोष उत्पन्न झाल्यानें त्याचा नाश ठरल्यासारखाच असतो. कारण अशा राज्यांत कोणालाहि आपल्या कृतीचें चीज होईल असें वाटत नाहीं आणि आपल्या जागेची शाश्वतीहि वाटत नाहीं. पौरस्त्य अगर पाश्चात्य देशांतील एकमुखी राज्यसत्तेच्या नाशाचें बीज याप्रमाणें आहे. फक्त जेथें स्वतः राजाच कर्तृत्ववान् असतो अथवा जेथें प्रजा सुशिक्षित, सुसंस्कृत आणि राष्ट्रीय भावनायुक्त असते तेथेंच वरील विनाशक बीज मूळ धरीत नाहीं.

राष्ट्रीयत्व

२ शिवकालीं राष्ट्रीय भावनेस अडथळे:—आजच्याहून शिवकालीन युग व देशहि भिन्न होता. व अशा युगाशीं शिवाजीला कशाप्रकारें झगडावें लागलें असेल याची कल्पना येण्यासाठीं कांहीं माहिती सांगणें अवश्य आहे. निसर्गाच्या क्षोभानें जरी प्रसंगविशेषीं नुकसान होतें किंवा राज्यक्रांतीनें याहूनहि अधिक भयंकर हानि होते, तरी नेहमीं बदलणाऱ्या या जगांत जमीन ही एकच वस्तु स्थिर संपत्तींत गणली जाते. राज्यक्रांति होऊन नवीन राजा आला तरी तो जुन्याच शेतकऱ्यांकडेस जमीन राहूं देतो व सरकारी सारा वसूल करणारे जुनेच अंमलदार आपआपल्या कामावर नेमितो. कारण, त्याला माहीत असतें कीं, धामधुमीच्या काळांत दुसरा कोणी नवीन इसम हीं कामें करूं शकणार नाहीं. शिवाय राज्यकर्ता स्वतः दूर राहत असल्यामुळें त्यानें स्वतः शेतसारा प्रत्यक्ष वसूल करणें मुळींच शक्य नसतें. यामुळें शेतसारा वसूल करणारे गांवोगांवचे अंमलदार पिढीजात एकच असून त्यांचा त्या कामावर व उत्पन्नावर एक प्रकारचा हक्कच प्रस्थापित झालेला होता.

स्थिति

त्याकाळीं व्यापार व उद्योगधंदा मुळींच नसल्यानें वंशपरंपरागत चालत आलेल्या जमिनीबद्दल विलक्षण आपलेपणा वाटत असे. यासंबंधीचें एक उदाहरण माझ्या पाहण्यांत आलें आहे तें सांगतों. एक ब्राह्मण पांच सहा पिढ्यांपासून रत्नागिरी सोडून अहमदाबादेस राहत असलेला मला भेटला. रत्नागिरीस त्याच्या मालकीचा एक तसूभरहि जमिनीचा तुकडा नव्हता. व व्यापारउद्योगासंबंधींसुद्धां तिकडेस त्याचा कसलाहि संबंध नव्हता. तथापि त्या जमिनीचीं दोनशें वर्षांचीं जुनीं खतपत्रें मात्र त्यानें आपल्याजवळ संभाळून ठेविलीं होतीं.

भांडणें.

त्या काळीं जमीनीसंबंधींचे हक्क नक्की ठरलेले नव्हते. किंबहुना एकाच जमीनीबद्दल अनेक भानगडीचे व गुंतागुंतीचे हक्कदार असत. विशेषतः दक्षिणेमध्यें अशीं उदाहरणें पुष्कळ असतः सावंतवाडीचें एक उदाहरण पहा. सोळाव्या शतकांत विजापुरकरांच्या तर्फे या प्रांतांतील शेतसारा वसूल करण्यासाठीं कुडाळ येथील प्रभूजातीचा एक देसाई असे. आणि त्याच्या हाताखालीं एक रजपूत दळवी अगर सेनापति या हुद्यानें, फौजेसह असे. या रजपूत सेनापतीनें तेथील सावंतांच्या सहाय्यानें देसायाविरुद्ध बंड पुकारलें. हे सावंत मराठा जातीचे होते. पहिल्याप्रथम देसायानें विजापुरकरांच्या मदतीनें हें रजपुतांचें बंड मोडिलें. परंतु तिसऱ्या पिढीला सावंतांचा एक वंशज कर्तृत्ववान् निघून त्यानें अदिलशहापासून बांद्याची देसाईगिरी मिळविली व नंतर बहुतेक प्रभुदेसायांचा उच्छेद करून कुडाळ प्रांत आपल्या राज्यास जोडून दिला. परंतु प्रभुदेसायांपैकीं कांहींनीं आपला हक्क पुनः प्रस्थापित केला. यानंतर शिवाजीनें सावंतांना हांकलून देण्याचा प्रयत्न केला. यापुढें दोन सख्ख्या भावांत तंटे होऊन अधिकाधिक गुंतागुंती झाली आणि हीं भांडणें त्यांच्या वंशजांनींहि पुढें चालविलीं.

विरुद्ध.

कोणती जमीन कोणाची व कोणत्या हक्कानें ती कोणाकडेस चालली आहे हें स्पष्टपणें कळत नसल्यानें किंवा तें ठरविण्यास साधन नसल्यानें जमीनीच्या हक्काच्या बाबतींत अनेक घोंटाळ्याचे प्रश्न उपस्थित झाले होते, अशा वेळीं शिवाजीच्या सत्तेचा उदय झाला. त्याच्या पुढें जमीनीसंबंधीं झालेल्या तकरारींचा निकाल त्याला कांहीं तरी देणें भागच होतें, व त्याप्रमाणें त्यानें दिलाहि. त्यामुळें ज्यांचे हक्क नष्ट झाले किंवा ज्यांचीं वतनें बुडालीं ते शिवाजीच्या शत्रूस जाऊन मिळाले व शिवाजीविरुद्ध कारस्थानें

रचूं लागले. त्यावेळीं राष्ट्रीयभावना नव्हती व कितीहि प्रामाणिकपणें केलेले कायदे सर्वमान्य झालेले नव्हते, त्यामुळें वरीलप्रमाणें स्थिति होणें अपरिहार्य होतें.

वतन.

त्या काळांत आपलें वतन हेंच सर्वस्व व त्याचीच शाश्वति अधिक भासे. त्यामुळें काल्पनिक व अमूर्त स्वदेशभक्तीपेक्षां प्रत्यक्ष व मूर्त-वतन साहजिकपणेंच विशेष प्रिय असे. आयुष्यभर केलेल्या श्रमाचें फळ व भूतलावरील सर्वांत मोठें बक्षिस जर कांहीं असेल तर तें वतनच होय असें वाटे. वतनामुळें मानसन्मान प्राप्त होई, अधिकार हातीं येई व आयुष्यांतील सुखें आपलींशी होत अशी भावना असे. व म्हणूनच त्याच्या लालसेपुढें मातृभूमि ही फक्त भावनाप्रधान वस्तु वाटे.

बहिष्कार.

एकराष्ट्रीयत्वाच्या आड येणारी दुसरी गोष्ट म्हणजे हिंदुस्थानांतील असंख्य पोटजाति. या पोटजातीमुळें विचार, आचार किंवा नफा तोटा यासंबंधीं सम-भावना उत्पन्न होणें अशक्य—किंबहुना अतर्क्यहि झालें आहे. हिंदु व मुसलमान हे एकाच देशांत व एकाच अंमलाखालीं राहतात तरी ते भिन्न आहेत ही गोष्ट बाजूस ठेविली तरी हिंदूमध्येंच कल्पनातीत पंथभेद असल्यानें हिंदुसमाजाच्या चिंधड्या उडालेल्या आहेत. याचा परिणाम असा झालेला आहे कीं, हिंदु-मुसलमानांत किंवा ब्राह्मणशूद्रांत तीव्र भावना आहे; इतकेंच नव्हे परंतु एकाच जातींत परस्परांविषयीं तुच्छता उत्पन्न झालेली दिसते. एकाच जातींतील कांहीं कुटुंबें स्वतःस कुलीन समजतात व इतरांस अवमानपूर्वक तुच्छ लेखतात. ब्राह्मणांना रगड दक्षिणा देऊन आपलें कुटुंब किंवा आपली पोटजात श्रेष्ठ आहे हें दाखविण्याची व आपल्याच इतर पोटजातींचा छळ करून त्यांना आहे त्याच स्थितींत ठेविण्याची किंवा त्याहूनहि खालीं ढकलण्याची आजसुद्धां हिंदूंची महत्वाकांक्षा असते. छळाचें मुख्य हत्यार म्हणजे बहिष्कार हें होय. या योगें कोणत्याहि कुटुंबाला गांवांतून कोणाचीहि मदत मिळण्याचें बंद होत असे. बहिष्कृत घरास क्रियाकर्मासाठीं ब्राह्मण मिळावयाचा नाहीं इतकेंच नव्हे पण धोबी, न्हावी, गडी, मोलकरीण, दळपीण इत्यादि कामकरीहि त्याच्या थाऱ्यास उभे राहावयाचे नाहींत. सारांश हा ग्रामण्याचा छळ प्रत्यक्ष मृत्यूपेक्षांहि अधिक भयंकर असे.

भावना.

अशा रीतीचें बहिष्कृत कुटुंब बहिष्काराला कंटाळून सूड उगविण्यासाठीं आपल्या देशाच्या अगर धर्माच्या शत्रूला मिळणें मनुष्यस्वभावाविरुद्ध नाहीं. परंतु जेथें खरी राष्ट्रीयभावना उदय पावलेली

आहे तेथें उच्च अगर नीच जाति असल्या तरी त्यांच्या मनांत वरील विकार उत्पन्न होणें शक्यच नसतें. शरीरसंबंधानें सुसंहत झालेल्या रजपुतासारख्या जातीशिवाय इतर जातींमध्यें देशाभिमानाची ज्योत पेटेल अशी हिंदुस्थानांत आशाच नको. जातिकल्याणापेक्षां किंवा देशहितापेक्षां सर्वस्वी स्वतःच्या सुखाचीच अभिलाषा हिंदुराजांमध्यें असल्यानें मूर्त व्यक्तीपेक्षां अमूर्त देशहिताची भावना हिंदुस्थानांत रुजणें शक्य नाहीं.

खजीना.

एका सूक्ष्मनिरीक्षक इंग्रजानें सन १८०३ मध्यें पुढीलप्रमाणें आपला अनुभव लिहून ठेविला आहे. "मराठी साम्राज्यांतील प्रत्येक संस्थानिक व जहागिरदार यांच्याजवळ पुष्कळ खाजगी खजिना आहे, व तो खजिना ते आपल्या ताब्यांतील एकाद्या उंच व चढण्यास अवघड अशा डोंगरावर बांधिलेल्या किल्ल्यांतील एका मजबूत भिंतींत गुप्तपणें सांठवून ठेविलेला असून तो नेहमीं वाढविण्याकडेसच त्यांची प्रवृत्ति असते. कोणत्याहि प्रसंगीं ते या खजिन्याला हात लावीत नाहींत. आपल्या देशाच्या संरक्षणासाठीं सुद्धां ते या पैशांतून सैन्य उभें करून लढण्यास सिद्ध नसतात; कारण देशाचें स्वातंत्र्य गमावण्यापेक्षां हा खजिना गमाविण्यास त्यांना अत्यंत दुःख वाटतें."

दोष.

अशा मनुष्यसमाजांत व त्यांच्याच सहाय्यानें शिवाजीनें स्वातंत्र्यप्रासाद उभारण्याचा प्रयत्न केला व उभारलेला अर्धवट प्रासाद पूर्ण करण्याचें काम याच समाजावर सोंपवून त्याला इहलोक सोडून जावें लागलें. त्यावेळीं स्वतःच्या कुळाविषयीं प्रत्येक पुढाऱ्यास वृथा अभिमान वाटे; परंपरागत श्रेष्ठतेच्या संरक्षणाची भावना कळसास पोंहोंचली होती, महत्त्वाकांक्षा तर विनाशक होती, सांघिक राजनिष्ठा व राजसत्तेस मान देणें ही सामान्य जनतेंत असणारी पात्रता पुढाऱ्यास मुळींच नव्हती, राजकीय ध्येय कांहींच नव्हतें व व्यवहारशून्यता मात्र मूर्तिमंत वसत होती. या एकंदर दोष-समुच्चयानें पुढारी लोक आंधळे झाले होते. आणि समाज पहावा तर तो मानव-देहधारी मेंढचांचाच असून वर सांगितल्या प्रकारच्या धनगरांनींच वळविण्याच्या योग्यतेचा होता. भावनाप्रधान बुद्धीनें रोज पुष्कळसे श्रम करावेत एवढेंच या मेंढचांना समजत असे.

अशक्य

अशा स्थितीमध्यें कोणी महान् व्यक्तीसुद्धां राष्ट्र निर्माण करून आपल्यामागें चिरस्थायी राज्य राहील अशी घटना करूं शकणार नाहीं. शिवाजीनें दीर्घकालपर्यंत शांततेनें राज्य केलें असतें (व

त्याच्यामागूनहि लायक राजेच गादीवर आले असते) तर त्यानें आपल्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेनें राष्ट्रीयत्वाचा व चिरस्थायी राज्याचा पाया घातला असता. परंतु राज्याभिषेकानंतर अवघ्या सहाच वर्षांनीं त्या थोर पुरुषाचा अंत झाला आणि त्याच्या मुलाच्या अंताबरोबरच त्यानें स्थापन केलेलें राज्यहि नष्ट झालें.

४ आर्थिक उन्नतीकडे मराठ्यांचें दुर्लक्षः—मराठी राज्यकर्त्यांनीं राज्याच्या आर्थिक उन्नतीकडेस अगदींच दुर्लक्ष केलें. शेतकऱ्यांपासून अन्यायानें द्रव्य उकळण्याच्या पद्धतीस कित्येकांनीं आळा घालण्याचा प्रयत्न केला व त्यामुळें शेतकीचा तेवढा उत्कर्षहि झाला. परंतु स्थानिक अंमलदारांनीं व्यापाराला वारंवार अडथळे आणिल्यामुळें कायदेशीर जकात भरूनहि दळणवळण धोक्याचें असे. म्हणून व्यापारी लोकांना अगदीं शाश्वति वाटत नसे. ज्या चिमुकल्या प्रांतांत उद्यम नाहीं, व्यापार नाहीं, जमीन नापिक, आणि जेथील शेती थोड्याशा व अनिश्चित पावसावर अवलंबून आहे असा प्रांत शिवाजीच्या किंवा साम्राज्य स्थापन करण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या पेशव्यांच्या अवाढव्य फौजेस कसा पोसूं शकेल !

दुर्लक्ष

राज्ययंत्र सुरळीत चालविण्यासाठीं व अवश्य असे सर्व खर्च भागविण्यासाठीं राज्याच्या बाहेरूनच द्रव्याचा ओघ राज्यांत आणणें अवश्य होतें. व तसा ओघ आणण्यास मार्ग म्हणजे एकामागून एक केलेल्या लुटीचाच होता. मुंबई सरकारच्या कडक सारावसुलीच्या कायद्यासंबंधीं बोलत असतां एकदां नामदार गोपाळ कृष्ण गोखले मला थट्टेनें म्हणाले, " हें पहा, मराठी राज्यांत या कायद्यासंबंधीं कधीं प्रश्नच उपस्थित होत नसे. कारण दुष्काळ पडून पिकें बुडालीं कीं, दुसऱ्या मुलखांत लुटालूट करून आपली दोन चार वर्षांची बेगमी मराठी राज्यांत सहज होत असे. परंतु आतां त्याच शिपायांना आपल्याच देशांत उपाशीं मरण्याची पाळी आली आहे. "

शेतसारा

मराठी राज्याची नीति याप्रमाणें असल्यामुळें सर्वांशींच त्यांचें वैर उत्पन्न झालें. त्यामुळें मराठी राज्यांत अनर्थकारक संहारदेवतेचें तांडव नेहमीं सुरू असणें अपरिहार्य होतें. त्याला पोट भरण्याला नेहमीं स्वाऱ्याच करणें अवश्य असे. आणि सतत स्वाऱ्या म्हणजे स्वाऱ्या करणारें व ज्यावर स्वाऱ्या होत तें अशीं दोनहि राष्ट्रें धुळीस मिळविणें होय. स्वाऱ्यांमुळें उभय राष्ट्रांतील उद्यम आणि संपत्ति यांचा नाशच होतो.

वैर.

द्रव्यप्राप्तीचा अखंड झरा म्हणजे शांतताच होय. त्यामुळें लुटीनें द्रव्य मिळविणें म्हणजे सुवर्णाचीं अंडीं देणाऱ्या हंसीसच ठार मारणें होय. याला उदाहरणच पाहिजे असल्यास सुरतेचें देतां येईल. शिवाजीला पहिल्या लुटींत सुरतेस जेवढें द्रव्य प्राप्त झालें त्या मानानें दुसऱ्या लुटींत फारच थोडी प्राप्ति झाली. आणि मराठ्यांच्या सतत भीतीमुळें सुरतेचा व्यापार शेवटीं ठार बुडाला; आणि तेथील द्रव्याचा झरा आटून गेला. सारांश आर्थिक दृष्टीनें विचार करितां मराठ्यांनीं कांहींहि स्थिर योजना केलेली नव्हती व राज्याची भरभराट होण्याचेंहि साधन त्यांचे जवळ नव्हतें असेंच दिसतें.

५ डावपेंच आणि कारस्थानें यांचा अतिरेकः—शेवटलें महत्त्वाचें कारण म्हणजे मराठी राज्यकर्ते कागदी डावपेंचावर सर्वस्वीं विश्वसून बसले हें होय. पुरुषार्थदर्शक निष्कपटीपणा आणि वचनाचा सच्चेपणा या दोन गुणांनींच कोणताहि समाज एकत्र राहूं शकतो हें साधें तत्त्व ते विसरले. कपटी वर्तन आणि मिथ्याभाषण राज्यसंस्थापनेच्या वेळीं अवश्य असतील, परंतु हेच प्रकार मराठ्यांची राज्यसत्ता स्थिर झाल्यावरहि चालू होते ही फार अनिष्ट गोष्ट होय. मराठ्यांच्या कारभाऱ्यावर अथवा सेनापतीवर कोणाचाहि विश्वास नसे. याला उदाहरणच पाहिजे असल्यास, राजापुरच्या इंग्रजी व्यापाऱ्यांना शिवाजीनें कसें चाळविलें हें दाखवितां येईल. तह ठरल्यावरसुद्धां मराठी राज्य त्याप्रमाणें वागेलच असा कोणासहि विश्वास नसे.

अविश्वास.

शिवाजी व कांहींसा पहिला बाजीराव यांनीं युद्ध व राजकारण सारख्याच प्रमाणांत आश्चर्यकारक रीतीनें चालविलें. परंतु त्यानंतरचे राज्यकर्ते कर्तृत्वहीन निघाले. राज्य हा एक शांतपणें खेळण्याचा बुद्धिबळाचा डावच आहे असें समजून ते कपटी राजकारणावरच सर्वस्वीं अवलंबून राहिले. फौजेच्या तयारीकडेस अगदींच दुर्लक्ष झालें. योग्य प्रसंगीं अवश्य युद्ध करण्याचें त्यांनीं टाळलें व सर्वांत वाईट म्हणजे त्यांच्या फौजेच्या लहान लहान टोळ्या वाटेल तेव्हां लुटालुटी करण्यांत मग्न झाल्या. किंबहुना हाच त्यांचा नित्य व्यवसाय बनला, व कपटी राजकारण हेंच सर्वश्रेष्ठ राजकारणी बुद्धिमत्तेचें लक्षण ठरलें. याप्रमाणें मराठी राजे आपल्या पोकळ दोस्तीचें आणि छद्मी राजकारस्थानांचें निर्मर्याद जाळें विणीत असतां त्याच्या कष्टसाध्य परंतु नादान राजकारणपटुत्वरूपी फुप्फुसांत वेलस्लीनें आपलीं पोलादी नखें खुपसलीं आणि

बुद्धिबळ.

थोडक्याशा परंतु जलद व युक्तिबाज चिमट्यांनीं मराठ्यांच्या रक्षणाचा पडदा फाडून त्यांचें असहाय बळ व्यक्त केलें. लवकरच निजाम निःशस्त्र झाला, टिपूला चिरडून टाकिलें आणि पेशव्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें. त्याच वेळीं शिंदे होळकर सगळें हिंदुस्थान पादाक्रांत करण्याच्या स्वप्नांत चूर असतां जागे होऊन पाहतात तों त्यांच्या स्वतःच्या संस्थानांतच ते परतंत्र झाल्याचें त्यांच्या प्रत्ययास आलें. कर्तृत्ववान्, शूर आणि राजकारणकुशल जो असतो तोच शत्रूच्या नुसत्या कणिकनीतिवर शेवटीं विजय मिळवितो. विश्वासघातानें शेवटपर्यंत कधींहि विजय मिळत नाहीं.

६ शिवाजीचें नीति.

वर्तनः—शिवाजीचें खाजगी वर्तन अत्यंत शुद्ध होतें. त्या कालीं अनेक विवाहित स्त्रिया असूनहि उपस्त्रिया ठेवण्याची चाल धर्मगुरु असलेल्या ब्राह्मण वर्णांतही होती त्या अर्थी क्षत्रियांसंबंधीं बोलावयासच नको. असें जरी होतें तरी शिवाजीला उपस्त्री नव्हती. फक्त त्याचे अनेक विवाह झाले होते. हें मागें पृष्ठ २४१ वर दिलेंच आहे. तथापि तो दक्ष पति, आज्ञाधारक पुत्र व प्रेमळ पिता म्हणून प्रसिद्ध होता. निसर्गतःच त्याची प्रवृत्ति धार्मिक असून शिक्षणहि तसेंच मिळाल्यानें लहानपणापासूनच तो श्रद्धावान्, मिताहारी, निर्व्यसनी, साधुसंतांविषयीं पूज्यबुद्धि बाळगणारा, भजनपूजनाचा भोक्ता व पोथ्यापुराणें भक्तियुक्त अंतःकरणानें श्रवण करणारा असा होता. तथापि तो कधींहि धर्मवेडा झाला नाहीं. उलट अखंड धार्मिकप्रवृत्तीनें त्याचे विचार उदात्त आणि वर्तन नीतिमान् असेंच राहिलें. इतरांच्या मतांविषयीं सहिष्णुता व कोणत्याहि जातीच्या वा पंथाच्या सत्पुरुषाविषयीं पूज्यबुद्धि यायोगें शिवाजीचा स्वधर्माविषयीं अकृत्रिम भाव प्रकट होतो. खाफीखान हा शिवाजीच्या चरित्राचा प्रतिकूल टीकाकार, पण त्यानेंसुद्धां स्त्रियांविषयीं शिवाजीची आदरबुद्धी व त्याच्या सैन्यांतील कडक नीतिमत्ता यांची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. कारण त्या काळांत हे दोनहि प्रकार अश्रुतपूर्वच होते.

नेता.

नेत्यामध्यें असलेला जन्मजात आकर्षकपणा शिवाजीमध्येंहि होता. ज्यांच्याशीं शिवाजीचा परिचय झाला ते शिवाजीचे पूजक बनले आणि देशांतील उत्कृष्ट बुद्धिमत्तेचीं माणसें त्यानें मिळवून आपल्या पदरीं ठेविलीं. त्याच्या अंमलदारांनीं त्याची सेवा एकनिष्ठेनें केली. दुसऱ्यास दिपविणारे त्याचे विजय आणि त्याचा हास्यमुख चेहरा यायोगें तो आपल्या

सैनिकांचा देवच बनला होता. सेनापति, सुभेदार, कारभारी, चिटणीस इत्यादिकांच्या त्यानें ज्या नेमणुका केल्या त्या अत्यंत योग्य होत्या. यावरून मनुष्यस्वभावाची परीक्षा तर त्याला अत्युत्कृष्ट होती हें सहज सिद्ध होतें. त्याच्या पूर्वीच्या मानानें त्याची राज्यव्यवस्था फारच सुधारलेली होती हें प्रसिद्धच आहे.

सेना. मराठी सेना हा कार्यक्षमतेचा नमुनाच शिवाजीनें तयार केला होता. अपेक्षित वस्तूची तरतूद अवश्य त्या जागीं अगोदरच करून त्या योग्य बंदोबस्तांत ठेविलेल्या असत. ज्या प्रदेशावर स्वारी करावयाची तेथील खडान्खडा माहिती त्याचे गुप्त हेर त्यास वेळींच व बिनचुकपणें पुरवीत असत. त्याच्या सैन्याच्या तुकड्या ठरीव ठिकाणीं व ठरीव वेळीं ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणें एकत्र होत, अगर विभागल्या जात असत. मराठी सैन्य शत्रूचा पाठलाग अथवा त्याला अडथळा परिणामकारक रीतीनें करून मिळविलेली लूट जलदीनें व सुरक्षितपणें ठरलेल्या ठिकाणीं नेऊन पोंचवीत असे. शत्रूची अंतर्व्यवस्था, त्या काळांतील शस्त्रें व देशस्थिति यांचा योग्य विचार करून त्यानें जी युद्धपद्धति निर्माण केली तीवरून युद्धशास्त्रासंबंधीं उपजत ज्ञान त्याच्यामध्यें वसत असलें पाहिजे हेंच सिद्ध होतें. विद्युद्वेगानें जाणारें त्याचें घोडदळ व सौदामिनीप्रमाणें चपळ पायदळ औरंगजेबाच्या काळांत सुद्धां अनिवार्य ठरलें होतें. शिवाजी नंतर शंभर वर्षांच्या अवधींत दक्षिणेंतील बहुतेक शहरांना कोट करण्यांत येऊन त्यांवर शहरांच्या संरक्षणासाठीं तोफा ठेवण्यांत आल्या, व प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर लांब पल्ल्याच्या व जलद हालवितां येणाऱ्या तोफा इंग्रजांनीं वापरण्याचें सुरू केलें. अशा वेळीं शिवाजीच्या युद्धकलेचें अंध अनुकरण करून दौलतराव शिंद्यानें इंग्रजांशीं युद्ध सुरू केलें व त्यांत त्याचा पूर्ण पराजय झाला.

७ शिवाजीच्या बुद्धीचें पृथक्करण:—विस्तीर्ण राज्य किंवा भरपूर

परीक्षा. खजिना यावरून शिवाजीच्या बुद्धिमत्तेची कल्पना करणें बरोबर नसून कसल्या परिस्थितींत त्यानें छत्रपतित्व प्राप्त करून घेतलें हें पाहणें अधिक महत्वाचें व ज्ञानदायक आहे. त्याच्यापुढें कोणाचाहि कित्ता नव्हता. तोच स्वतः त्याकाळीं स्वतःच्या कल्पनेनें अगदीं नवीन वळणाचा मार्ग उत्पन्न करणारा होता. जेव्हां शिवाजीनें स्वातंत्र्य पुकारलें तेव्हां मोंगली सत्ता शिगेस लागली होती; आणि मोंगली सत्तेविरुद्ध ज्यांनीं ज्यांनीं बंड केलें त्यांस चिरडून टाकण्यांत आलें होतें. शिवाजीसारख्या एकाद्या लहानशा

जहागीरदाराच्या मुलानें मोंगली सत्तेस धुडकाऊन लावणें म्हणजे शुद्ध वेडेपणा असून आत्मनाश करण्यासारखेंच होतें. तथापि शिवाजीनें तोच मार्ग पतकरून त्यांत विजय संपादन केला.

धूर्तता.

शिवाजीच्या राजकारणी बुद्धीचें पृथक्करण केलें म्हणजे त्याला यश कस प्राप्त झालें हें सहज कळतें. देशकालवर्तमान जाणणें व शक्याशक्यतेची बरोबर जाणीव असणें हीं राजकारणाचीं मुख्य तत्वें आहेत. आपल्या साधनांच्या जोरावर आपणांस किती साहस करतां येईल यासंबंधीं उपजत बुद्धि शिवाजीस होती. तसेंच कोणत्याहि राजकारणाची तार तुटेपर्यंत खेंचावयाची नाहीं. हें तो पूर्णपणें जाणून होता. ही दूरदृष्टि संभाजींत नसल्यानें शिवाजीच्या सर्व कृतींवर त्यानें पाणी फिरविलें. मनुष्याची उत्कृष्ट परीक्षा करणें व कोणत्या प्रसंगीं कसला उपयोग करणें याचें शिवाजीला जणू बाळकडूच मिळालें होतें. शिवाजीच्या गैरहजिरींत त्याच्या लोकांनीं ठिकठिकाणीं जें यश मिळविलें त्यावरूनहि हेंच सिद्ध होतें. दूर दूरच्या अनेक ठिकाणीं त्याच्या स्वाऱ्या होत, व प्रत्येक ठिकाणीं स्वतः शिवाजीच हजर असणें अशक्य होतें. तथापि त्याच्या सरदारांनीं त्याच्या आज्ञेबरहुकुम स्वाऱ्या करून ठरलेला कार्यक्रम सिद्धीस नेला ही आशियाखंडाच्या इतिहासांत अभूतपूर्व गोष्ट होय. कारण येथें सर्वच गोष्टी धन्याच्या प्रत्यक्ष हजिरीवर अवलंबून असतात. पण यालाहि शिवाजी अपवाद ठरला. स्वभावतः स्वतंत्र व कार्यक्षम अशा महाराष्ट्रीयांना शिवाजीच्या नोकरींत जें शिक्षण मिळालें त्यायोगें मूळचे अव्यवस्थित असलेलें महाराष्ट्र वीर राष्ट्रीय संरक्षणासाठीं अवश्य असलेल्या राजाच्या अगर राजधानीच्या अभावीं, बलाढ्य औरंगजेबाच्या सर्वसंहारक शक्तीशीं अठरा वर्षें झगडून अखेर यशस्वी झालें !

शांतता.

शिवाजीच्या कारकीर्दीनें महाराष्ट्रांत शांतता नांदूं लागली, स्त्रियांच्या अब्रूचें संरक्षण झालें, विविध जातींना आश्रयस्थान प्राप्त झालें, हिंदु मुसलमानांतील अगर कोणत्याहि जातींतील साधुपुरुषांना राज्यांतून सारख्याच पूज्य भावनेनें नेमणुका सुरू झाल्या आणि जातीचा अगर धर्माचा निर्बंध बाजूस सारून फक्त बुद्धिमत्तेवर व लायकीवर सर्वांना सरकारी नोकऱ्यांचीं द्वारें मोकळीं करण्यांत आलीं, हें हिंदूंच्या प्रमाणें मुसलमान अंमलदारहि त्याच्या राज्यांत अनेक होते यावरून सिद्ध होतें. मुनशी, हैदर

सीदी संबळ, सीदी मिस्त्री, दौलतखान, सीदी हलाल, नूरखान हे शिवाजीचे मुसलमान अंमलदार प्रसिद्धच आहेत. हिंदुस्थानासारख्या जातिविशिष्ट देशामध्यें ही राज्यव्यवस्था नमुनेदार होती यांत शंका नाहीं.

देणग्या

शांतता व उत्तम अंतर्व्यवस्था ह्या शिवाजीच्या मुख्य देणग्या होत. या दोहोंस स्थिरता आणून राष्ट्रीय ऐक्याचें वर्धन करणें एवढेंच कार्य बाकी होतें; परंतु एवढेंसुद्धां त्याच्या मागून येणाऱ्या राज्यकर्त्यांच्या हातून झालें नाहीं; फक्त त्याचें उदाहरण व नांव त्यांना स्फुरणदायक वाटे परंतु त्यांतहि व्यर्थ अभिमानाची झांक असे.

थोरवी

८ शिवाजीचें राजकीय ध्येय व अडचणी:—शिवाजीनें एक युध्यमान राज्य स्थापन केलें काय ? अलाउद्दीन खिलजीची किंवा तैमूरलंगाची तो सुधारलेली आवृत्ति होता काय ? मला वाटतें अशा तऱ्हेचा विचार मनांत आणणेंसुद्धां पाप होय. आपल्या राजकीय कल्पना कृतींत उतरविण्या एवढा अवकाश त्याला मिळालाच नाहीं हें आपण विसरून चालावयाचें नाहीं. त्याचें आयुष्य अल्प होतें व तेंहि शत्रूशीं झगडण्यांतच वेंचलें गेलें. सारांश सिद्धता करण्यांतच त्याचा काळ गेला. त्याचीं फळें चाखण्यास तो राहिलाच नाहीं. दैनिक संकटें व त्यांच्या निवारणार्थ करावी लागणारी तयारी यांतच त्याचें सगळें आयुष्य खर्च झालें.

जीवन.

गंगेचें विस्तीर्ण खोरें आणि दक्षिणमहाराष्ट्रांतून पूर्वेकडेस पसरलेला देश यांतील संस्थानांना नैसर्गिक मर्यादा अशा कांहींच नाहींत. शेजाऱ्याच्या बलाबलावर त्यांच्या मर्यादा नेहमीं बदलत असत. एका पिढीहून अधिक कालपर्यंत त्यांच्या सत्तेंत समतोलपणा कधींच राहूं शकत नसे. शेजाऱ्यानें आपल्यावर स्वारी करूं नये किंवा आपणांस गिळंकृत करूं नये म्हणून स्वसंरक्षणासाठीं किंवा कुरापत काढण्याच्या हेतूनें प्रत्येकजण शेजाऱ्याला चेंपीत असे. ज्या शेजाऱ्यांत रात्रंदिवस कलह सुरू असतात त्यांना स्वतःच्या अस्तित्वासाठीं सशस्त्र फौज, 'शुनकाची जागरूकता' आणि प्रथमप्रहाराची तयारी नेहमीं ठेवावी लागतेच. म्हणून ही यादवी नाहींशी करण्यास पूर्वसमुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत एकच साम्राज्य स्थापन करणें एवढाच उत्कृष्ट उपाय होता. तह झाल्यावरसुद्धां मोंगल त्याप्रमाणें वागतीलच असें शिवाजीस कधींच निश्चितपणें वाटलें नाहीं. मोगलांचें राज्य दक्षिणेंत वाढवावें हा अकबरा-

पासूनचा प्रयत्न सर्वश्रुत होता. दक्षिणेंतील सर्व राज्यें खालसा करून मोंगली साम्राज्यास जोडूस द्यावींत हा मोगलाचा हेतु शिवाजी, अदिलशहा व कुत्बशाहा अशा तिघांनाहि विदित होता. हा मोगलांचा हेतु तडीस जाण्यास फक्त कालावधि लागणार होता एवढेंच; आणि म्हणून दक्षिणेंतील प्रत्येक सत्तेला स्वतःच्या अस्तित्वासाठीं मोगलांशीं सतत युद्ध ठेविणें अपरिहार्य होतें. याचसाठीं मोगली मुलुख लुटण्याची एकहि संधि शिवाजीनें वांया जाऊं दिली नाहीं.

सख्य.

विजापुरकरांशीं शिवाजीचे संबंध कांहीं निराळ्या प्रकारचे होते. विजापुरकरांविरुद्ध बंडाळी करून त्यांचा मुलुख त्यानें बळकाविला. किंबहुना अदिलशाहीविरुद्ध बंडाळी करण्यावरच त्याचें अस्तित्व होतें. परंतु ही बंडाळी कांहीं एक मर्यादित कालापर्यंतच होती. इसवी सन १६६२ च्या सुमारास आदिलशहाशीं त्याचा तह झाल्यावर त्यानें विजापुरी प्रांतांस मुळींच त्रास दिला नाहीं. फक्त कोल्हापुर, उत्तर कानडा आणि दक्षिण कोंकण हस्तगत होईपर्यंतच त्याला कांहीं विजापुरी सरंजामदारांशीं झगडावें लागलें. धारवाड, बेळगांव इत्यादि कर्नाटकी मुलखांत शिवाजीच्या अंतापर्यंत असें भांडण चालूच होतें. प्रत्यक्ष विजापुरकरांशीं झगडा करण्याची त्याची इच्छा नसतांहि स्वराज्य वाढविण्यास जो प्रांत आड येई तेवढयाशींच त्याला निरुपायानें झगडावें लागे. परंतु हाहि प्रकार सन १६७२ मध्यें दुसऱ्या अलि आदिलशहाच्या मरणाबरोबर बदलला. कारण त्याच्यानंतर लहानगा शिकंदर अदिलशहा गादीवर बसला, सरदारांनीं आपसांतच यादवी माजविली आणि विजापुरी राज्याचा लय मूर्तिमंत दिसूं लागला. तथापि सन १६७९ मध्यें विजापुरावर मोंगलांनीं स्वारी केली तेव्हां शिवाजीनें विजापुरकरांसच पुष्कळ मदत केली.

महनीयता.

९ राष्ट्रभावनेवर शिवचरित्राचा परिणामः—शिवाजीची महनीयता, त्याच्या स्वतंत्र विचारप्रवर्तनांत किंवा विशाल राजकारणी दृष्टींत नसून, नीतिमत्तेंत व कर्तृत्वशालित्वांत आहे. दुसऱ्याची अचूक परीक्षा करणें, कार्यक्षम रचना करणें आणि प्राप्त परिस्थितींत कशा व किती परिश्रमांनीं फलप्राप्ति होईल हें निश्चित जाणणें हीं शिवाजीच्या यशाचीं मुख्य कारणें होत. या सद्गुणांत त्याच्या वैयक्तिक नीतिमत्तेची व उच्च ध्येयाची भर पडली होती. यामुळेंच त्या काळच्या कर्त्या पुरुषांचें चित्त शिवाजीकडेस आकर्षिलें गेलें. परमतसहिष्णुता व समान न्यायदानाची पद्धति यायोगें त्याची सर्व प्रजा

सुखी होती. त्यानें आपल्या राज्यांत प्रयत्नपूर्वक शिस्तीचें संवर्धन केलें व नैतिक बंधनें सर्व प्रजेस पाळावयास लाविलीं, त्यामुळें इतर कोणाच्याहि प्रजेपेक्षां त्याची प्रजा अधिक सुखांत होती यांत संशय नाहीं.

राष्ट्रभावना.

शीवाजीच्या प्रतापी विजयानें त्याच्या समकालीनांमध्यें भावनेचा उदय झाला व त्याच्या नांवानें मराठ्यांमध्यें नवचैतन्य आणिलें. त्याच्या मृत्यूनंतर अवघ्या नऊच वर्षांनीं त्याचें राज्य गेलें. तथापि याचें अवतारकार्य अमरच राहिलें. मराठ्यांमध्यें त्यानें स्वतंत्र आत्मविश्वास उत्पन्न केला व त्यांच्यांत ऐक्य स्थापन केलें. सर्वोत्कृष्ट परिणाम म्हणजे त्यानेंच मराठ्यांमध्यें राष्ट्रभावना जागृत केली हा होय.

स्वतंत्र.

दक्षिणेंतील तीन मुसलमानी सत्ता आंतून पोखरल्या होत्या व आपसांत भांडत होत्या त्यामुळें शिवाजीच्या उदयाला दुर्ग्यम प्रतीनें त्या कांहींशा कारणीभूत झाल्या असल्या तरी मुख्य कारण त्याहून अगदीं निराळें व फार श्रेष्ठ असें होतें. शिवाजीनंतर त्याच्या सारखा पुरुष अद्यापि निर्माण न झाल्यानें मी तर त्याला हिंदूंतील विधायक बुद्धिमत्तेचा व राष्ट्रोद्धारक असा शेवटलाच महात्मा समजतों. त्याची राज्यपद्धति त्यानेंच स्वतः निर्माण केलेली अशी होती. रणजीतसिंगाप्रमाणें त्यानें परकीयांचें अनुकरण केलें नव्हतें व मदतहि घेतली नव्हती. त्याचे सेनापतिहि फ्रेंच वगैरे परकीय नसून मराठेच होते व त्यांनींच त्याची मावळी सेना तयार केली होती. त्यानें ज्याची उभारणी केली तें दीर्घकालपर्यंत टिकलें. शंभर वर्षांनंतर म्हणजे पेशव्यांच्या भरभराटींतसुद्धां शिवकालीन संस्थांकडेस प्रशंसापूर्वक व विजिगीषा बुद्धीनेंच पहात असत.

उपजत बुद्धि.

शिवाजी अशिक्षित होता त्यामुळें अध्ययनानें असें त्यानें कोणतेंही ज्ञान प्राप्त करून घेतलें नव्हतें. कोणताहि राजदरबार, सुधारलेलें शहर, अथवा व्यवस्थित वसतिस्थान हें शिवाजीनें पाहाण्यापूर्वीच आपलें राज्य व राज्यव्यवस्था स्थापन केली होती. अनुभवी प्रधान अथवा सेनापति यांपैकीं कोणाचीहि मदत त्याला कधींहि मिळाली नव्हती. जमीनधारा वसूल करण्यापलीकडेस दादाजी कोंडदेवानेंहि शिवाजीस अधिक कांहीं शिकविणें शक्य नव्हतें. कारण दादाजींतच याहून अधिक कर्तृत्व नव्हतें. परंतु शिवाजीच्या उपजत बुद्धिमत्तेनें कोणाच्याहि मदतीशिवाय सुसंहत स्वराज्य, अजिंक्य सैन्य, तेजस्वी आणि हितकर राज्यव्यवस्था स्थापन केली.

अद्वितीयत्व.

शिवाजीच्या उदयापूर्वी मराठे हे अनेक दक्षिणी संस्थानांतून पसरले होते. व या वेळीं दक्षिणेंत मोगल, विजापुरकर, पोर्च्युगीज व जंजीरेकर सीदी अशा चार बलिष्ट सत्ता नांदत होत्या; तथापि त्या सर्वांच्या छातीवर पाय देऊन शिवाजीनें मराठ्यांचें एकीकरण केलें व त्यांच्या जोरावर बलाढ्य राष्ट्र निर्माण केलें. अर्वाचीन काळांत असला पराक्रम एकाहि हिंदूनें दाखविलेला नाहीं.

नोकरी.

शिवाजी पुढें सरसावण्यापूर्वी मराठे फक्त नोकरीच्या पेशानें कोणाच्यातरी पदरीं असत. राज्याची चाकरी ते करीत परंतु त्याच्या अंतर्व्यवस्थेंत त्यांना हात घालतां येत नसे. रणांगणावर ते आपल्या आहुती देत परंतु सेनापतित्व किंवा प्रधानपद त्यांना प्राप्त होत नसे. सारांश पुढारीपणाचा मान त्यांना कधींच मिळत नसे. हुकुमाचे तावेदार असेंच त्यांना वागविण्यांत येत असे.

लायकी.

शिवाजीनेंच प्रथम विजापुरकर आणि मोगल यांना युद्धाचें आव्हान दिलें व त्यावरून, स्वतंत्र पुढाकार घेऊन आपण युद्ध करूं शकतों याची जाणीव आपल्या बांधवांस करून दिली. नंतर त्यानें राज्याची स्थापना करून आपणांस राज्यांतर्गत सर्व खात्यांचीहि व्यवस्था स्वतंत्रपणें पाहतां येते हें दाखवून दिलें. त्यानें स्वतःच्याच उदाहरणानें सिद्ध करून दिलें कीं, राष्ट्र निर्माण करणें, राज्य स्थापणें, शत्रूंचा पराजय करणें व स्वतःचें रक्षण करणें, या गोष्टीसुद्धां हिंदु जाति करण्यास समर्थ आहे इतकेंच नव्हे तर हिंदूंच्या कारकीर्दीत वाङ्मय आणि कला व उद्यम आणि व्यापार यांचेंहि संरक्षण व भरभराट होऊं शकते, लढाऊ गलबतें व व्यापारी जहाजेंहि हिंदूंना बांधतां येतात आणि पाश्चात्यांशीं त्यांच्याच बरोवरीनें जलयुद्धहि करण्यांत ते कुशल आहेत व कालानुसार आपली उन्नति करून घेतां येते हें शिवाजीनें अर्वाचीन हिंदूंना उत्तम प्रकारें सिद्ध करून दिलें आहे.

उदाहरण.

शिवाजीच्या उदाहरणावरून सिद्ध झालें आहे कीं, हिंदूंमध्यें नुसते जमादार किंवा कारकूनच उत्पन्न होतात असें नसून छत्रपतीसारखा राजांचा राजाहि उत्पन्न होत असतो. जहांगीर बादशहानें प्रयाग येथील अक्षय्य वट कापून त्याच्या बुंधावर तापलेली कढई ठोकून बसविली व अक्षय्य म्हणविणाऱ्या वटवृक्षाचा आयुष्य क्षय केला असें अभिमानपूर्वक बोलून

दाखविलें. पण काय ! एका वर्षाच्या आंतच त्या बुंधांतून पुनः वटवृक्ष फोंफावला व त्यानें त्या अजस्र कढईस उलथून बाजूस फेंकून दिलें. ! !

सिद्धि.

गुलामगिरीच्या शृंखला, राज्यकारभारांतून हकालपट्टी, आणि कायदेशीर दडपशाही यांच्या वजनाखालीं शेंकडों वर्षें हिंदुत्वरूपी वृक्षाला जरी दडपून टाकिलें तरी तो वृक्ष न मरतां पुनः उद्भवून त्याला नवीन पानें व फांद्या फुटतात व थेट आकाशापर्यंत जाऊन तो भिडतो हें शिवाजीनें आपल्या उदयानें सिद्ध करून दिलें.

शिवचरित्रास आधारभूत असलेल्या ग्रंथांची यादी.

शिवचरित्रसाहित्याची चिकित्सा.

अठराव्या शतकांतील पेशवेकालापक्षां सतराव्या शतकांतील सन १६६० पासून सन १७०० पर्यंतचा मराठ्यांच्या इतिहासांतील ऐश्वर्याचा कालच अल्प आहे, एवढेंच नव्हे परंतु तत्संबंधीची ऐतिहासिक सामुग्रीसुद्धां थोडीच आहे. आणि आश्चर्य हें कीं, ही सामुग्री पर्शियन व पोर्च्युगीज भाषांत जेवढी आहे तिच्या मानानें मराठींत अगदींच अल्प आहे. राजारामाच्या अखेरीपर्यंतच्या मराठी सामुग्रीची ही दशा आहे. पन्नास वर्षेंपर्यंत इतिहाससमुंच्छकांनीं परिश्रम करूनहि शिवकालांतील एकहि राजकीय शिक्याचा कागद सांपडला नाहीं ही मोठी आश्चर्यावह गोष्ट आहे. कांहीं खाजगी दस्तऐवज, सनदा, महजर आणि अर्जांचे जबाब इत्यादि प्रकारचे कागद बरेच सांपडले आहेत. सरकारी दप्तरखाना फारच पूर्वी नष्ट झाला असल्यानें हे कागद त्यांतील नव्हेत यांत शंकाच नाहीं. ज्यांचे हित-संबंध या कागदांवर अवलंबून होते त्यांनीं ते संरक्षण करून ठेविलेले आहेत.

सतराव्या शतकांतील मराठे गरीब व अडाणी होते. अनेक राज्यांतून ते स्वतंत्रपणें नोकऱ्या करीत होते. कांहीं कहाण्या व धार्मिक गीतें याशिवाय त्यांचें असें वाङ्मयहि कांहीं नव्हतें. शांतता, संपत्ति आणि अदालत यांच्या योगानेंच राजदप्तरखाना अस्तित्वांत येतो. परंतु हीं साधनें शिवाजीनेंच मराठ्यांना प्राप्त करून दिलीं. मोगलांचें व मराठ्यांचें सन १६७० मध्यें अगदींच बिनसलें. व पुढें सन १६८९ मध्यें मराठ्यांचें राज्य औरंगजेबानें बुडविलें. अर्थात् शिवाजीनें निर्माण केलेलीं साधनें अवघ्या १८ वर्षांत लयास गेलीं. यानंतर सर्व किल्ले मोगलांच्या ताब्यांत जाऊन त्यांनीं तेथील सर्व कागदपत्रें जाळून टाकिलीं. सन १६७० पासून १६८९ पर्यंतच्या अठरा वर्षांच्या कालांतसुद्धां मराठे लेखणीपेक्षां तलवारीच अधिक वापरीत होते, आणि म्हणून ज्याला वाङ्मय म्हणतां येईल असें कांहींच त्या कालांत निर्माण होणें शक्य नव्हतें.

सारांश पेशव्यांच्या पूर्वीच्या मराठशाहींचे राजकीय कागदपत्र, दरबारी वाके, आत्मचरित्रें अथवा बारनिश्या वगैरे कांहीं कागद उपलब्ध नाहींत. मोगली दरबारांतील मात्र हे सर्व कागद आजहि कायम आहेत.

प्राचीन मराठी वृत्तांत.

शिवाजी आणि संभाजी यांच्या समकालीन वृत्तांत जो उपलब्ध आहे तो इंग्रजी व इराणी भाषेंतच आहे. मराठी भाषेंत असा नाहीं. शिवकालाविषयीं जुन्यांत जुना मराठी लेख म्हणजे सभासदी बखर हा होय. ही बखर सन १६९४ मध्यें नुसत्या स्मरणानें लिहिली असल्यानें फारच संक्षिप्त व संकीर्ण आहे. त्यामुळें समकालीन लेख या प्रशंसनीय अभिधानास ती पात्रहि नाहीं. बक्षिसांच्या आशेनें मनसोक्त स्तुतींनीं भरपूर असलेल्या भाटांच्या कविता, इतिहास ह्या नांवास पात्रच नाहींत. परंतु इंग्रजी व फार्सी लेख मात्र समकालीन आहेत इतकेंच नव्हे परंतु ते ज्या त्या वेळींच तपशीलवार लिहून त्यावर तारखा वगैरे घालून नीट व्यवस्थितपणें संभाळून ठेविलेले आहेत. मराठी, इंग्रजी व पर्शियन या तीनहि भाषांतील तत्कालीन लेख पाहिले म्हणजे इंग्रजी व पर्शियन लेखक मराठी लेखकापेक्षां बुद्धिमत्तेनें श्रेष्ठ व म्हणून अधिक योग्यतेचे होते असें दिसतें.

राजाराम जिंजीस पळून गेल्यावर तेथें सभासदानें आपली बखर सरकारी कागदपत्रांच्या आधाराशिवाय लिहिली. म्हणजे आपण जिला समकालीन म्हणतों ती बखर अशा प्रकारची आहे. कारण राजाराम दक्षिणेंतून जेव्हां पळून गेला व लपत छपत मोठ्या कष्टानें जिंजीस पोहोंचला तेव्हां त्यानें आपला दप्तरखाना बरोबर नेणें शक्यच नव्हतें. सारांश सभासदाची बखर म्हणजे संकटांतून निभावलेल्या एका वृद्धाच्या स्मरणांचें टांचण होय. तथापि सभासदानें शिवाजीच्या पदरीं चाकरी केली असल्यानें त्याच्या बखरीस मल्हार रामराव चिटणिसाच्या बखरीपेक्षां अधिक महत्त्व देणें योग्य आहे; कारण चिटणिसानें आपली बखर शिवाजीच्या मृत्यूनंतर १३० वर्षांनीं लिहिली आहे. चिटणीस एकाहि कागद-पत्राचा आधार देत नसल्यानें सभासदाच्या आधारानेंच त्यानें आपली बखर लिहिली असावी असें मला वाटतें, आणि म्हणून चिटणिशी बखर मी सर्वस्वीं त्याज्य मानिली आहे.

दत्ताजी-मलकरे प्रकार

विश्वसनीयता व कालानुक्रम यांच्या बाबतींत सभासदाच्या बखरीखालीं या बखरीचा क्रम लागेल. हिच्यांत लहान लहान कलमें आहेत व तीं एकाच मूळ

ग्रंथावरून घेतलेलीं दिसतात. मराठीमध्यें या ग्रंथाला ९१ किंवा ९६ कलमी बखर म्हणतात. ही बखर राजवाड्यांनीं प्रभातमध्यें, पारसनिसांनीं भारतवर्षांत व फ्रिजेलचें इंग्रजी भषांत रफॉरेस्ट यानें छापिलें आहे. हिलाच रायरीची बखर असें म्हणतात व गँट डफनें याच नांवानें हिचा उल्लेख केला आहे. तारीखे शिवाजी हें पर्शियन भाषांतरहि याच बखरीचें होय. मात्र भाषांतरकारापुढें हल्लींच्याहून विस्तृत अशी माहिती होती असें दिसतें. लंडन येथील इंडिया ऑफिसला हिचें एक हस्तलिखित वॉरन हेस्टिंग्जनें नजर केलें. हिच्या कांहीं प्रती ब्रिटिश म्यूझियममध्यें व इतरत्रहि आढळतात.

लंडन येथील हस्तलिखितांत शिवाजीच्या मुत्यूपर्यंतची हकीकत आहे, व शेवटीं दुसऱ्या रामराजापर्यंतची वंशावळ दिली आहे. या भाषांतराचा काळ किमानपक्ष सन १७२० व कमालपक्ष १७७० असावा.

या बखरीचें संक्षिप्त स्वरूप दत्ताजीपंत वाकेनिविसाजवळ होतें. अनाजी रंगनाथ मलऱ्याचा मुलगा खंडो अनाजीनें त्याची नक्कल करून घेतली. दत्ताजीपंताजवळ तपशीलवार हकीकत होती असें हा खंडोबा म्हणतो पण तें मला संशयास्पद दिसतें. या खंडोबानें नकलेंत वरीच भर घातली असावी असें वाटतें, मात्र आपण भर टाकिल्याचें तो कोठेंहि म्हणत नाहीं. त्याचा बाप अनाजी रंगनाथ शिवाजीजवळ एक लहानसा कारकुन होता. दत्ताजीनें त्याचें नांव आपल्या बखरींत घालणें शक्य नाहीं. परंतु खंडोबानें तें दोन चार वेळां घातलें आहे. यावरून खंडोबानें कांहीं भर घातली असावी असें अनुमान होतें. आणि म्हणून हिला मी दत्ताजीची वखर असें न म्हणतां मलकरे बखर असें म्हटलें आहे. कारण दत्ताजीची संपूर्ण बखर आज उपलब्ध नाहीं.

ही बखर शुद्ध करून छापिली असली तरी नक्कलकाराच्या व वाचनाच्या कांहीं चुका त्यांत राहून गेल्या आहेत. इंग्रजी भाषांतरांत तर विशेषनामाच्या व कालनिर्देशाच्या चुका भयंकर आहेत. परंतु शिवचरित्रसाहित्याचा ज्यांचा अभ्यास आहे त्यांना त्या सहज दुरुस्त करतां येतात. पर्शियन भाषांतर मलकऱ्याच्या प्रतीहून प्राचीन प्रतीचें असून दत्ताजीपेक्षां निराळीच प्रत भाषांतरकारापुढें होती असें दिसतें. विशेषनामें व तारखा यांत आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या व पृथक् पृथक् कथा शुद्ध केल्या म्हणजे जो वृत्तांत राहतो तो फारच श्रेष्ठ प्रतीचा इतिहास होय. आणि हा इतिहास कित्येक बाबतींत अत्यंत निर्दोष आहे असें शिवकालीन

कागदपत्रांच्या आधारानेंहि सिद्ध करितां येतें. विचारपूर्वक या बखरीचा उपयोग केल्यास सभासदाच्या बखरीला पुरवणी म्हणून ही बखर फार उपयुक्त आहे.

शकावल्या.

आज जी जेधे शकावली आपणांपुढें आहे ती सन १६१८ पासून सन १६९७ पर्यंतची आहे. तिला उपोद्घात व उपसंहार यांपैकीं कांहींच नाहीं. हिचा बिनचूकपणा तीन गोष्टींवर अवलंबून आहे. (१) जेध्यांनीं स्वतःच्या माहितीनें लिहिलेल्या नोंधी. (२) नुसत्या अंधुक स्मरणशक्तीवर न विसंबतां प्रसंग घडतांच टांचून ठेविलेल्या नोंधी. (३) आज जेधे शकावली जी आपणांपुढें आहे ती अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास नकललेली आहे. अर्थात् त्या नकलकारानें चौकसपणें नकलून ठेविलेल्या नोंधी. या त्या तीन गोष्टी होत. घडलेल्या गोष्टी एका पुस्तकांत नोंधून ठेविण्याचा प्रघात ज्याप्रमाणें जुन्या इंग्रज घराण्यांत आहे त्या प्रमाणें जेध्यांनीं आपल्या नोंधी कालक्रमानुसार पुस्तकांत लिहून ठेविलेल्या नसून निरनिराळ्या कागदांवर लिहिल्या असून नंतर ते कागद एकत्रित केलेले आहेत. या नोंधींना आधार काय व दोन नोंधींमध्यें किती गळल्या आहेत हें सांगतां येणें शक्य नाहीं. सन १६६० मध्यें शिवाजी आपल्या पायावर स्वतंत्रपणें व प्रसिद्धपणें उभा राहिला. त्या वेळीं त्याला व विजापुरकरांना खूष ठेविणें अगर दोघांपासूनहि अलिप्त राहणें यापेक्षां त्यास मिळणेंच अधिक सुरक्षितपणाचें आहे असें जेध्यांना वाटून ते त्याला मिळाले. त्यापूर्वीच्या म्हणजे सन १६६० पूर्वीच्या नोंधी उघडपणें चुकीच्या आहेत. उदाहरणार्थ इब्राहिम अदिलशहाचा मृत्यु, दौलताबाद पडल्याची मिति या नोंधी साफ चुकल्या आहेत. या नंतर बऱ्याच पुढच्या नोंधींत वर्ष व मास चुकले आहेत. कदाचित् ही नकलकाराचीहि चुकी असेल. उदाहरणार्थ वेलोर पडल्याची मिति चुकली आहे. १८ व १९ या शतकांत खानदान मुसलमान, मुसलमानी राज्यांच्या शकावल्या नकलून ठेवीत असत हें प्रसिद्धच आहे. अशीच एकादी नक्कल जेध्यांच्या कारकुनानें मिळवून त्यांतील नोंधी उतरून घेतलेल्या आहेत. म्हणून संशयास्पद मित्तीबद्दल इतर पुराव्याच्या अभावीं जेधे शकावलीवर नेहमीं विश्वास ठेविणें सुरक्षित नव्हे.

शिवाजीच्या जन्ममित्तीबद्दल मल्हार रामराव किंवा दत्ताजीपंत वाकेनिविसासारख्या शिवाजीच्या वंशपरंपरा नोकराच्या लिहिण्यावर अधिक विश्वास ठेविणें योग्य होय. शिवाजीचा वाढदिवस साजरा होत असून त्याची नोंध सरकारी कागदोपत्रीं ठेवीत असावेत व त्यावरून ही तिथि बखरींत आली असली पाहिजे.

अठराव्या शतकांत अशा शकावल्या अनेक घराण्यांतून असत. त्यांपैकीं कांहीं भाग आज सांपडतो. मुख्य मुख्य गोष्टी सर्व शकावल्यांत एकच असत. मात्र प्रत्येक घराणें आपल्या पूर्वजाची अगर आपल्या आसपासची माहिती तींत अधिक मिळवीत असे. त्यामुळें या शकावल्या सर्वस्वीं एकमेकीशीं मिळत्या असतच असें नाहीं. मोडी वाचनाच्या वगैरे चुका होत त्या निराळ्याच.

" The Sources of the History of Shivaji critically examined " या नांवाचा निबंध मी " Journal of the Bihar and Orissa Research Society, March 1924" यांत छापविला आहे तो जिज्ञासूंनीं अवश्य पहावा.

१९ व्या शतकांतील चार नवीं, चुकीचीं साधनें.

गेल्या शंभर वर्षांत इराणी, फ्रेंच, इंग्रजी व मराठी भाषेंतील समकालीन कागदपत्रें प्रसिद्ध झाल्यानें ग्रँट डफला अज्ञात अशी पुष्कळ माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु त्याबरोबरच संशोधकांना चकविणारी माहितीहि पुढें आली आहे, त्या माहितीचे प्रकार पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

(१) सन १८१७ मध्यें पेशवाई बुडाली, परंतु खरें म्हटलें असतां सन १८०३ मध्येंच पेशव्यांची सार्वभौम सत्ता नष्ट झाली. आणि सातारचे भोसले पुनः पुढें आले. इंग्रजांनींहि त्यांना उचलून धरिलें. त्यामुळें आपण पेशव्यांचे सरदार नसून मूळचे भोंसल्यांचेच सरदार आहोंत असें प्रत्येक भासवूं लागला. व असें भासविण्यांत पेशव्यांस कांहीं वाईट वाटेल अशी भीतिहि बाळगण्याचें कारण नव्हतें. त्या काळीं देशाभिमानाची लाट उसळून शिवाजीस मुख्य दैवत मानण्यांत येऊन प्रत्येकानें आपला पूर्वज स्वराज्यांतच उदयास आला अशा तऱ्हेचे इतिहास लिहून ठेविले. प्रत्येक ग्रीक संस्थान इलियडमध्यें उल्लेखित झालें आहे तशांतला हा प्रकार होय. कांहीं सरदार शिवकालांतीलच होते यांत वाद नाहीं. परंतु सर्वच घराणीं शिवकालांतील सरदारपटांत दाखल होतीं या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

बनावट सनदापत्रें.

(२) सन १८२४ मध्यें इनाम कमिशन बसलें त्यायोगें तर बनावट कागदपत्रांना ऊतच आला. कारण त्या कमिशनपुढें आपले हक्क सिद्ध करण्यासाठीं प्रत्येक वतनदारानें कैफियती, यादी, हकीकती व करीनें तयार केले. हे सगळें कागदपत्र

सन १८२० पासून सन १८३० पर्यंतच्या कालांत झाले. व त्यांत बहुतेकांनीं आपला इतिहास शहाजीपर्यंत (१६३७) मागें नेला. कांहींनीं तर मुसलमानांच्या पहिल्या स्वारीपर्यंत (सन १२९४) नेऊन भिडविला, व याला आधार म्हणजे दंतकथा, कुळकटें, उपाध्यायांची माहिती व ज्योतिष्यांचीं बाडें हे होते.

लहानसा जमीनदार किंवा गांवकीचा वतनदार हिंदु-मुसलमान राजांपासूनच्या सनदा आपल्या संग्रहीं असल्याचें सांगू लागला. त्यांपैकीं कांहीं अस्सल व कांहीं काझींनीं किंवा अंमलदारांनीं खरेपणाचे शेरे केलेल्या नकला आहेत असेंहि ते म्हणूं लागले. व असे हजारों कागद छापले गेले. यांतील शेंकडा ९८ कागद वैयक्तिक हितसंबंधाचे असल्यामुळें ऐतिहासिक दृष्ट्या निरुपयोगी आहेत. व कित्येक तर उघड उघड बनावट आहेत. त्या सर्वांची तपशीलवार माहिती येथें देणें अशक्य आहे.

बनावट सनदा करणारांपुढें शिवपश्चात्कालीन सनदा होत्या. त्यांतील भाषा कायम ठेवून फक्त मिति व सन बदलून त्या सनदा शिवपूर्वकालीन अथवा शिवकालीन बनविण्यांत आल्या. म्हणून इतर मजबूत पुराव्याच्या अभावीं या सनदांवर विश्वास ठेविणें धोक्याचें आहे, व इतर मजबूत पुरावाहि उपलब्ध असणें अशक्य आहे.

वतनावर हक्क प्रस्थापित करण्यासाठीं बनावट सनदापत्रें तयार करण्याचें काम प्राचीन कालापासून सुरू आहे. राजे व धर्मगुरु हेहि या पापापासून मुक्त नाहींत. (हर्षाचा ताम्रपट पहा.)

निरुपयोगी स्तावक काव्यें.

(३) कांहीं शिवकालीन संस्कृत काव्यें नुकतींच छापिलीं आहेत. स्तुत्यात्मक काव्यें व अतिशयोक्ति यांनीं सर्वच देशांतील इतिहास विकृत केले आहेत. मोगल बादशहा व हिंदुराजे यांच्या दरबारीं असलेल्या ब्राह्मण भाटांनीं आपली विद्वत्ता आपल्या धन्याला खूष करण्यांत अशा रीतीनें खर्च केली आहे कीं, ती पाहून किळस उत्पन्न होतो. असलें शिक्षण, राहणी आणि असलें वाङ्मयात्मक ध्येय यायोगें हे ब्राह्मण कवि ऐतिहासिक सत्यें नोंदून ठेविण्यास नालायक झाले आहेत. त्यांनीं स्वतः पाहिलेल्या गोष्टींत सुद्धां बराच भाग अविश्वसनीय असतो, मग ज्या त्यांनीं ऐकून लिहिलेल्या असतील त्यांच्याबद्दल सांगावयासच नको. घडलेल्या गोष्टी यथा. क्रम लिहून ठेविणें हें उपाध्याय किंवा कवि यांचें कामच नव्हे. फार तर ते प्रचलित दंतकथांचा संग्रह करतील एवढेंच.

द्रव्यप्राप्तीच्या आशेनें कवि आपल्या आश्रयदात्याची वाटेल ती स्तुति करितात. याला लाल कवीचें उदाहरण सांगण्यासारखें आहे. सन १६६९ मध्यें मोगलांनीं देवगडावर स्वारी केली. त्यांत मोंगलांच्या तर्फे छत्रसाल होता. पुढें युद्धांत सगळी मोगलसेना पराभव पावून पळून गेली. तेव्हां एकट्या छत्रसालानें पुढें होऊन शत्रूंचा पराजय केला असें छत्रसालाबद्दल लाल कवीनें लिहून ठेविलें आहे !

परमानंदाच्या शिवभारतांत असेंच उदाहरण भातवडीच्या लढाईचें आहे. त्या लढाईत (१६२४) शहाजीनें मलिक अंबराचा पराजय आपल्याच फौजेच्या जोरावर केला असें लिहून ठेविलें आहे. (शिवभारत अध्याय ४)

(४) ब्राह्मण व प्रभु यांच्यांतील तीव्र परंतु मूर्खपणाच्या भांडणानें मराठ्यांचा इतिहास कलुषित झाला आहे. शिवकालांत याचा उगम झाला, संभाजीच्या वेळीं हें भांडण वाढलें, अर्वाचीन काळीं छापखान्याच्या सोयीमुळें याचा जलद पसार झाला व जातिविषयक वर्तमानपत्रांनीं याला हातभार लाविला. प्रत्येक जात स्वतःची उच्चता व प्रतिस्पर्धी जातीची नीचता सिद्ध करण्यासाठीं जुने कागदपत्र शोधून प्रसिद्ध करूं लागली. चित्पावन, कऱ्हाडा, देशस्थ व प्रभू हा प्रत्येकजण ऐतिहासिक विधान किंवा प्रमाण निरनिराळ्या रीतीनें पारखूं लागला.

त्याज्य साहित्य.

वर सांगितलेल्या तीन प्रकारच्या साहित्यांचा मी माझ्या पुस्तकांत फारच जपून उपयोग केला आहे. कैफीयती व तंजावरचा शिलालेख हीं साधनें एकाद्या अफींबाजानें सांगितलेल्या गोष्टीहून वरच्या दरजाचीं नाहींत हें शक्य तेथें समकालीन पुरावा ताडून पाहिला म्हणजे लक्षांत येतें. कित्येक तारखांच्या चुका तर हास्यास्पद आहेत. त्यांतील निर्दिष्ट व्यक्ती जन्मास येण्यापूर्वी अथवा त्या मृत्यु पावल्यानंतरहि जगांत वावरत असतात.

अठराव्या अथवा एकूणिसाव्या शतकांत लिहिलेल्या बखरीहि कांहीं फारशा विश्वसनीय नाहींत. अस्सल कागदपत्रांच्या आधारानें आपण बखरी लिहील्या आहोंत, असा अभिमान बखरनवीस बाळगीतहि नाहींत. ऐकीव गोष्टी, दंतकथा व बाजारगप्पा यांचाच भरणा त्यांत विशेष असतो. बहुतेक बखरी कोणी व केव्हां लिहिल्या हें समजत नाहीं. कोणी बुद्धिमान् पुरुषानें त्या लिहिल्या असाव्यात असें दिसत नाहीं.

इंग्रजी वखारींतील कागदपत्रें.

मित्ति व सत्यकथन या दृष्टीनें मुंबई किनारा व त्या लगतच्या प्रदेशांतील इंग्रजी वखारी यांचे कागदपत्र फारच महत्त्वाचे आहेत. कित्येक वेळां त्या पत्र-लेखकांनींच स्वतः स्पष्टपणें कबूल केलें आहे कीं, 'परस्पर विरुद्ध बातम्या आपण ऐकत असल्यामुळें कोणती बातमी विश्वसनीय मानावी हेंच आपणांस कळत नाहीं.' राजापुर व कारवार येथील वखारींनीं तर आपले पगारी गुप्त हेरच ठेवून दिले होते. त्यांनीं स्वराज्यांत फिरून शिवाजीच्या हालचालीच्या बातम्या वखारीस पुरवाव्यात असें ठरलें होतें. निरनिराळ्या वखारींतील बातम्या एकमेकांस मुकाबल्या-सारख्या असून त्यांचा खरेखोटेपणा कळण्यास साधनीभूत आहेत. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे हीं सगळीं अस्सल पत्रें अद्यापिहि जपून ठेविलीं आहेत.

पांडेचरीच्या Francois Martin चा वृत्तांत तर शिवाजीच्या कर्नाटक स्वारीसंबंधीं अगदीं अप्रतिम आहे. त्यांचे हेर शिवाजीच्या शिबिरांत वारंवार फिरून तेथील खडान् खडा बातमी मार्टिन यास पुरवीत असत व तो ती तत्काळ आपल्या रोजनिशींत दाखल करी. मद्रासच्या इंग्रजांनीं दोन तीन वेळां एक हुषार ब्राह्मण शिवाजीकडेस पाठविला होता. आणि अशा मंडळीकडून आलेली माहिती मराठी पुस्तकांतील कर्नाटक स्वारींसंबंधींच्या गप्पाष्टकांना मूठमाती देण्यास पुरेशी आहे. सन १६७७ मधील जेसुइट पत्र अगदींच ऐकीव बातम्यांवर लिहिलें असल्यानें निव्वळ टाकाऊ आहे. मार्टिनच्या वृत्तांतापुढें हें पत्र अगदींच निरुपयोगी ठरतें.

साधनें.

(अ) मराठी.

१०१ शिवछत्रपतीचें चरित्र. राजारामाच्या आज्ञेवरून हें चरित्र कृष्णाजी अनंत सभासद यानें जिंजी येथें सन १६९४ मध्यें लिहिलें. का. ना. साने यांनीं तें छापून प्रसिद्ध केलें. तिसरी आवृत्ति सन १९१२ ची. हें पुस्तक सरासरीं १०० पृष्ठांचें आहे. कागदपत्रांच्या आधाराशिवाय नुसत्या स्मरणानें लिहिलेलें आहे. यांतील वृत्तांत कालानुक्रमानें लिहिलेला नाहीं. कांहीं बाबती चुकल्याहि आहेत. स्थलकालनिर्देश फारसे नाहींत. भाषा जुनी व सूत्रमय आहे.

तथापि शिवकालीन माहितीसंबंधीं मराठीमधील अतिशय महत्त्वाचें हें पुस्तक असल्यानें याचाच विशेष उपयोग आम्हीं केलेला आहे. यानंतरच्या बखरकारांनीं

याच बखरीच्या आधारानें आपल्या बखरी सजविल्या परंतु त्यांत पदरची काल्पनिक माहिती, संस्कृत ग्रंथांतील उतारे, काव्यात्मक वर्णनें, इत्यादींची गर्दी उडवून दिली आहे. (सान्यांच्या ४ थ्या आवृत्तीचें मूळ छापतांना फारच चुका झाल्या आहेत.)

यांचें इंग्रजी भाषांतर जे. एल्. मानकर यांनीं Life and Exploits of Shivaji या नांवानें छापिलें आहे. त्याची पहिली आवृत्ति सन १८८४ मध्यें व दुसरी सन १८८६ मध्यें निघाली.

१०२ चित्रगुप्त बखर. रचनाकाल सुमारें १७६०. सभासदाचाच मजकूर (व भाषासुद्धां) यांत आहे. इतर माहिती मध्यें बरीच सामील केली आहे. एकंदरींत निरुपयोगी.

१०३ शिवछत्रपतीचें सप्त प्रकरणात्मक चरित्र. मल्हार रामराव चिटणीस यांनीं ही बखर सन १८१० मध्यें लिहिली. संपादक नी. ज. कीर्तने. दुसरी आवृत्ति सन १८९४. पुष्कळ ठिकाणीं लेखन अंदाजाचें असल्यानें बऱ्याच चुका आहेत. लिहितांना सरकारी कागदपत्रांचा उपयोग केला नाहीं. कालानुक्रमाची कल्पनाहि नाहीं. मुसलमानी नांवें अपभ्रष्ट रूपानें व क्वचित् कालविपर्यासानें दिलीं आहेत. बागलाणांतील सत्तावीस किल्ले मारोपंतानें अनेक वेळां जिंकिले असून ते जिंकिण्याचे बाकीच राहतात (पहा पृ. ४१, ७१, १२४, १७६). अर्वाचीन रचना असल्यानें निरुपयोगी.

१०४ शिवदिग्विजय. संपादक, पा. रा. नंदुरबारकर व दांडेकर. (बडोदें १८९५) खंडो बल्लाळानें सन १८१८ मध्यें ही लिहिली असें खोटेंच लिहिलें आहे. वंकिमचंद्र चतर्जीच्या भाषेसारख्या भाषेंत कादंबरी लिहिणाराची नकल करणारानें ही बखर लिहिली असावी. अवांतर गप्पा पुष्कळ (पृ. २०८, ४४४, ४५३). अलंकारिक भाषा व विषयांतर. इंग्रजी सेनापति राज्याभिषेकाच्या वेळीं होता असें यांत आहे (पृ. ४३५) व सन १६७४ मध्यें कलकत्त्याच्या कापडानें दिवाणखाना सजविला होता (पृ. ४१७) ! ! ! जिजाबाईच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनीं शिवाजी तिला वंदन करितो (पृ. २९६) ! तान्हाजी मालुसरा स्वतःच्या मृत्यूनंतर सात वर्षांनीं हैदराबादेस जातो (पृ. ३०१).

१०५ शिवप्रताप. (बडोदें) अर्वाचीन बखर. निरुपयोगी.

१०६ श्रीमंत महाराज भोसले यांची बखर (शेडगांव). संपादक, वि. ल. भावे (ठाणें, स. १९१७). सभासदाची वाढविलेली आवृत्ति. काल्पनिक तपशील व बनावट पत्रें यांची भरती. निरुपयोगी.

१०७-८ दोन जुन्या बखरी. **मोरे यांची छोटी बखर** व **महाबळेश्वरची जुनी बखर.** (इतिहास संग्रह. स्फुट लेख १-२१-२९ व २-९-१२) क्रमांक १०६ प्रमाणें हेतुपूर्वक बनावट व चुकीची ऐतिहासिक माहिती.

१०९ जेधे यांची शकावली. संपादक, बाळ गंगाधर टिळक. चतुर्थ संमेलन वृत्त (पुणें.) भोरच्या जेध्यांनीं ठेविलेली नोंदवही.

शिवापुरकर देशपांड्यांच्या अशाच दोन शकावल्या आहेत. एक यादी व दुसरी त्यांच्या वहींत असलेली. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटींतील फोर्ब्स कलेक्शनमधील शिवापुरकर देशपांड्यांच्या लढ्ढ वहीची नक्कल मी मिळविली आहे. शिवचरित्र प्रदीप नांवाच्या लहानशा पुस्तकांत वरील तीन व इतर तीन अशा सहा शकावल्या व जेध्यांचा करीणा छापिला आहे. करीणा विशेषतः कौटुंबिक हकीकतीचा आहे. जेधे शकावलीचें व करीण्याचें चुकीचें इंग्रजी भाषांतर शिवाजी सूव्हनीरमध्यें छापिलें आहे.

११० सनदा पत्रें. संपादक मावजी व पारसनीस (१९१३) व

१११ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें. संपादक, राजवाडे; खंडें ८ व १५-२४. यांत शिवकालीन थोडकीं राजकीय पत्रें व बरींच खानगी खतेंपत्रें आहेत. इनाम कमीशन व इतर न्यायाधीशी यांना फसविण्यासाठीं तयार केलेलीं कांहीं पत्रेंहि यांत आहेत. पूर्वजांच्या दंतकथांना पुष्टिकारक अशींहि बनावट पत्रें यांत आढळतात.

बरींच अशीं पत्रें भारतइतिहास संशोधकमंडळाच्या वार्षिक अहवालांत, संमेलनवृत्तांत व त्रैमासिकांत छापिलीं आहेत. शिवचरित्रप्रदीप (१९२५) शिवचरित्र साहित्य (संपादक, कृ. वि. पुरंदरे १९२६), इतिहास आणि ऐतिहासिक वर्ष ५ (राजवाडे), मराठी दप्तर रुमाल ३ (वि. ल. भावे १९२८), शिवसंस्मृति व शिवाजी सूव्हनीर (इंग्रजी भाग, संपादक, गो. स. सरदेसाई १९२७) यांतूनहि अशीं पत्रें छापलेलीं आहेत.

११२ पोवाडे. (संपादक, एच्. ए. अॅक्वर्थ व एस्. टी. शालिग्राम) २ री (३ री ?) आवृत्ति (१९११). पौराणिक पद्धतीवर व तेहि शिवकालानंतर रचलेले.

अफजलवधाचा पोवाडा मात्र सर्वांत जुना, बहुधा संभाजीच्या कारकीर्दीत झाला असावा. फक्त दोन पोवाडे शिवाजीसंबंधीं आहेत. परंतु त्यांतील माहिती अनैतिहासिक आहे. गुणदोषविवेचक आवृत्ति य. न. केळकर यांनीं नुकतीच प्रसिद्ध केली आहे. (१९२७)

दहा पोवाड्यांचें इंग्रजी भाषांतर ॲक्वर्थ यांनीं सुंदर प्रस्तावनेसह केलें आहे. (लाँगमन. १८९४)

११३ सावंतवाडी संस्थानचा इतिहास. पिंगुळकरकृत (१९११) उपयुक्त. परंतु कित्येक पर्शियन फर्मानाच्या तारखा उतरवून घेण्यांत चुका झाल्या आहेत. पत्रावरील शिक्का मालकाच्या नांवाचा असून (हें नांव विनयानें बादशहाच्या नांवाच्या खालीं घातलें आहे.) तो बादशहाचा (हें नांव वर आहे.) म्हणून यांत दिला आहे

११४ रामचंद्रपंत अमात्याचें आज्ञापत्र. दुसरी आवृत्ति १९२३. उपदेशपर या दृष्टीनें पुस्तक वरें आहे. परंतु समकालीन लेखकाचा हा लेख नाहीं. नवीन माहितीहि कांहीं नाहीं.

११५ वि. ल. भावे यांनीं शिवचरित्रांतील कांहीं प्रसंगावर लहान लहान पत्रकें छापविलीं आहेत. त्यांतील विवेचन वकीली थाटाचें असलें तरी समाधानकारक नाहीं. अनेक निरनिराळ्या लेखकांनीं दिलेल्या तारखा संशोधनाशिवाय जशाच्या तशाच स्वीकारल्या आहेत.

११६ तंजावरचा शिलालेख. मराठींत सर्वांत मोठा शिलालेख. याच्या छापील ओळी २६५२ आहेत. हा सन १८०३ च्या डिसेंबरमध्यें तंजावर येथील बृहदीश्वराच्या देवळांतील एका भिंतीच्या दगडावर कोरला आहे. हा राजवाडे यांनीं प्रभातमध्यें छापिला. हाच त्यांचा ९ वा खंड होय. (१९०६) टी. सांबमूर्तिराव यांनीं हाच लेख सन १९०७ मध्यें पुनः छापिला आहे. तंजावरचें घराणें श्रेष्ठ आहे असें दाखविण्यासाठीं हा तयार झाला असून यांत शहाजी व शिवाजी यांचा बनावट वृत्तांत आहे. अगदींच निरुपयोगी.

११७ एक्याण्णव कलमी बखर. हिलाच ९६ कलमी असेंहि म्हणतात. या बखरींत ९१ च कलमें आहेत. ही राजवाडे यांनीं आपल्या ९ व्या खंडांत छापिली आहे. अनाजी रंगनाथ मलकऱ्याचा मुलगा खंडो अनाजी यानें ही नक्कल केली असें राजवाड्यांच्या प्रतींत आहे. अनाजी रंगनाथ हा हंबीरराव सेनापतीजवळ

मुजुमदार होता. भारतवर्षांत पारसनिस यांनीं ही बखर अशुद्ध छापली आहे. रायरीची बखर ती हीच. (फॉरेस्ट इंग्रजी भाषांतर भाग १ पृ. १-२२ सन १८८५). तारीखे शिवाजी हें याच बखरीचें वाढवून केलेलें भाषांतर होय. (हिच्या योग्यतेबद्दल आरंभीं ऊहापोह केलाच आहे.)

(ब) संकृत.

११८ राधामाधवविलास चंपू. जयराम पिंडये कृत. संपादक राजवाडे (१९२२) भाटानें लिहिलेल्या चाद्दत्ती यांत आहेत. उपयुक्त माहितीचा अभाव.

११९ शिवभारत. परमानंदकृत. मराठी भाषांतर, भरपूर टीपा व राजवाडेशाही म्हणजे अनेक दोषसंकुल अशी लद्द प्रस्तावना यांसह सुंदर आवृत्ति स. म. दिवेकर यांनीं छापिली (१९२७). मालोजी, शहाजी व शिवाजी यांच्यावर काव्य. ३२ अध्याय. सन १६६१ च्या एप्रिलमध्यें शिवाजीनें रत्नागिरी जिल्हा जिंकिला तेथपर्यंत येऊन पुढें अपूर्ण. कवि व काशीचे ब्राह्मण यांच्यांत झालेल्या संवादात्मक हें काव्य आहे. परमानंद सन १६६४ ते १६७३ पर्यंतच्या काळांत काशीस गेला होता तेव्हां त्यानें तेथील ब्राह्मणांस तें कथन केलें. त्या काळीं प्रवास धोक्याचा होता. सामानसुमान नेणें तर फारच कठिण होतें. अशा वेळीं म्हणजे सन १६७० मध्यें परमानंदानें इतिहासाचे साधनिक कागदपत्र बरोबर नेले असतील हें अगदीं असंभवनीय होय. तथापि हा कवि दोनहि तीनहि बाजूच्या सेनापतींची लांबलचक यादी इतर बारीकसारीक वर्णनासह देतो आणि तीहि यादी सन १६२४ किंवा त्याहि पूर्वी झालेल्या लढाईंतील सेनापतींची होय ! ही यादी खरी असली तर या ब्राह्मणाची स्मरणशक्ति अद्भुत असली पाहिजे !! आपल्या धन्याविषयीं तिरस्करणीय हांजीखोरपणा व मूखपणाची अतिशयोक्ति यासंबंधीचें विवेचन मी आरंभीं केलेंच आहे. असलें लेखन शब्दशः इतिहास म्हणून कधींहि ग्रहण करितां यावयाचा नाहीं.

१२० पर्णाल पर्वत ग्रहणाख्यानम्. जयरामकृत. संपादक स. मा. दिवेकर (१९२३). अतिशयोक्ति व शब्दावडंबररहित सरळ गोष्ट. पांच अध्यायांत शिवचरित्रापैकीं किंचित् भाग आलेला आहे. फार विश्वसनीय व उपयुक्त ग्रंथ.

१२१ शिवराज-राज्याभिषेक-कल्पतरु. २३४ श्लोकांचें काव्य. राज्याभिषेकाचें (१६७४) वर्णन. गोविंद व निश्चल यांच्या संवादात्मक. हे दोन ब्राह्मण

दक्षिण कोंकणांत तीर्थयात्रेस गेले होते अशी कल्पना. वर्णनात्मक पुस्तक. (एशियाटिक सोसायटी बंगाल येथील. हस्तलिखित ३०८८)

(क) हिंदी.

१२२ भूषण ग्रंथावली. संपादक श्याम बिहारी मिश्र व शुकदेवबिहारी मिश्र. (नागरी प्रचारिणी सभा, बनारस. १९०७).

स्तुतिपर काव्य. हिंदी भाषेंतील उपमा व समानार्थक कविता यांत आहेत. इतिहास असा कांहीं नाहीं. तारखाहि नाहींत. तथापि त्यावेळचें वातावरण व हिंदु अंतःकरण यांची चांगली ओळख पटते. नागरीप्रचारिणी पत्रिकेंत एका टीकाकारानें या काव्याच्या कर्त्याबद्दल संशय प्रदर्शित करून तें छत्रसालच्या दरबारांतील कवीचें (१७२५) असावें असें म्हटलें आहे.

१२३ छत्रप्रकाश. लालकविकृत (नागरी प्रचारिणी सभा, बनारस.) अध्याय ११ छत्रसाल व शिवाजी यांच्या भेटीचें वर्णन. इंग्रजी भाषांतर पॉग्सन्स हिस्टरी ऑफ बुंदेलाज. (कलकत्ता १८२६)

(ड) पर्शियन.

बहुतेक पर्शियन आधारांची चर्चा औरंगजेब भाग २ व ३ (पहिली आवृत्ति) यांत मीं केली आहे. येथें तेथील क्रमांक फक्त देतों.

२ पादशाहनामा. अबदुल हमीद लाहोरीकृत.

४ अमाले सालीह. कंबुकृत.

५ अलमगीरनामा. मिर्झा महंमद काझिमकृत.

६ मासिरी अलमगिरी. सकी मुस्ताइदखानकृत.

९ मुंतखाबुल्लुबाब. खाफीखानकृत.

१० नुस्खाहे दिलकशा. भीमसेन बऱ्हाणपुरी कृत.

११ फातुहाते अलमगिरी. ईश्वरदास नागर कृत.

२९ अखबारात दरबारे मुआला.

११६ महमदनामा (महमद आदिलशहाचा इतिहास. जाहुर कृत.)

(कपुरथळा येथील हस्तलिखितावरून मीं उतरून घेतलेली प्रत.)

२७ तारीख अलीअदिलशाहा २ रा. (फक्त पहिलीं दहा वर्षें.) सय्यद नुरुल्लाकृत. (इंडिया ऑफिस मधून हस्तलिखिताची मीं मागविलेली नक्कल.)

२५ बसातीने सलातीन. इब्राहिम अली जाहुरी कृत. शिळा प्रेस प्रत (हैदराबाद.) (पहिल्या दोन आवृतींत हस्तलिखिताचा उपयोग केला होता.)

१९ तारीखे शिवाजी. इंडिया ऑफिस पर्शियन हस्तलिखित. १८५७ (E The No. 485) Same as Rieu, p. 327. मॉडर्न रिव्ह्यूमध्यें (सन १९०७ व जानेवारी १९१०) मी इंग्रजी भाषांतर दिलें आहे.

१६ आदाबे अलमगिरी. काबिलखानकृत.

४४ हफ्त अंजुमन. उदयराज तालयारकृत. पॅरिस व बनारस येथील हस्तलिखितें.

४५ फैयाझुल कवानिन.

३९ खातूते शिवाजी. R. A. S. Ms.

२१ अहकामे अलमगिरी. हमीदुद्दिनखानकृत. याचें भाषांतर औरंगजेबाच्या गोष्टी या नांवानें मीं केलें आहे.

३३ रुकाते अलमगिरी. शिलालेख. बाजारी प्रत.

११७ पारसनिस संग्रह. मोगल दरबारांतून शिवाजीस व त्याच्या वंशजांस गेलेल्या पत्रांच्या नकला एका पुस्तकांत आहेत. (बहुधा त्या सातारच्या राजानें ग्रँट डफसाठीं केल्या असाव्यात.) यांतील कांहीं तारखा चुकीच्या आहेत. याचेंच इंग्रजी भाषांतर दुसऱ्या हस्तलिखित पुस्तकांत आहे.

(ई) इंग्रजी.

[Foster's series] या नांवाची इंग्रजी पत्रव्यवहाराची एक माला छापिली जात आहे. मी शिवाजीच्या कालाचा अभ्यास सुरू केला तेव्हां ही माला शिवकालापर्यंत आली नव्हती, त्यामुळें इंडिया ऑफिसमधून मला पुष्कळ खर्चानें शिवकालीन पत्रांच्या नकला मागवाव्या लागल्या. त्यांत कांहीं चुकाहि राहण्याचा संभव होताच. हल्लीं ही माला सन १६७० पर्यंत आली आहे. तथापि मी माझ्या मूळच्याच पत्रव्यवहाराचे संदर्भ दिलेले आहेत.]

१२४ Original Correspondence (O. C.) India Office Ms. Records. या मालेंत सुरत व मुंबई येथील वखारींतून लंडन येथें ईस्ट इंडिया कंपनीस गेलेल्या पत्रांचा संग्रह आहेः, तसेंच सुरत व मुंबई आणि इतर वखारी यांचा परस्परांत झालेला पत्रव्यवहार यांतच आहे. लेखक, स्थळ व तारीख

यांची पत्रवार एक जंत्रीहि आहे पण तिच्यांत पत्रांचा सारांश मात्र नाहीं. प्रत्येक वर्षाचा स्वतंत्र संग्रह अशी व्यवस्था बहुधा आहे. यांत बहुधा हिंदुस्थानांतील सर्व वखारींची माहिती आहे. सन १६८२ पासून १६८९ पर्यंतचीं पत्रें फॅक्टरी रेकॉर्डस्मध्यें आलेलींच बहुधा आहेत.

१२५ Factory Records (F. R.) India office Ms. Records. सुरत, मुंवई, राजापुर, फोट सेंट जॉर्ज इत्यादि वखारींच्या पत्रांचीं पृथक् पृथक् पुस्तकें यांत आहेत. त्यांत (अ) सल्लामसलत व (ब) इतर पत्रांच्या नकला एवढेंच आहे. १६६० ते १६८९ पर्यंतच्या कालांत बरींच तूटितें आहेत. तसेंच छापिलेले भागास सूचि नाहीं.

Surat consultation—१६३६-६०, ६४, ६७, ६८, ७१, ७३, ७५, ७६, ७८, ८०, ८१, ८४-९६ या सालचीं पत्रें नाहींत. परंतु हीं तूटितें आल्या गेल्या पत्रांच्या सहाय्यानें व O. C. च्या पत्रानें भरून काढतां येतात. १६६०-१६८३ च्या कालांतीलच फक्त चार पुस्तकें आहेत.

सुरतेचीं पत्रें:—शिवकालांतील वीस पुस्तकें आहेत.

फोट सेंट जॉर्जचा दप्तरखाना:—रोजनिशी व Consultation पुस्तक. सन १६७२-७८ व १६७८-७९ चीं पुस्तकें मद्रास येथें छापिलीं. (१९१० व १९११) इतर थोडीं पत्रें " Loves ' Vestiges of old Madras च्या तीन भागांत आहेत.

Orme Mss. इंडिया ऑफिस पुस्तकालयांत (S. C. Hill यांनीं यांची सूचि केली आहे.) वखारीचीं कित्येक पत्रें यांत छापिलीं आहेत. मूळ पत्रें नष्ट झालीं.

सन १६८३ नंतरचीं वखारीचीं पत्रें नाहींतच म्हटलें तरी चालेल. Diary of W. Hedges, Ed. by Yule (Hakluyt Soe) Vol. II P. CCXXVI gives Surat to Co. 20 Nov. 1670

१२६ डच फॅक्टरी रेकर्डसू इंडिया ऑफिस लंडन येथें आहे. Vols. २३-२९ यांत सन १६५९-७० चीं पत्रें इंग्रजींत भाषांतर केलेलीं आहेत. आणि Vols. 30-42 यांत सन १६७०-१६८९ चीं पत्रें डच भाषेंत आहेत. शिवाजीच्या कालास तीं निरुपयोगीच असून मराठ्यांसंबंधींसुद्धां त्यांत कांहीं माहिती नाहीं. सन १६७१ पासून पुढील भागांत हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यासंबंधीं कांहीं

माहिती आढळते. "सुमारें सन १६७४ पर्यंतचीं पत्रें, डाग रजिस्टरांत नकललीं आहेत. सन १६६५ पासून पुढचीं इतर रजिस्टरांत आहेत. 'आवक बारनिशी.' तपशीलवार माहितीसाठीं या बारनिशीचा दाखला वारंवार डाग रजिस्टरांत दिला आहे. एकादी बातमी उडत उडत यांत दिली आहे. परंतु बटेवियामध्यें आवक बारनिशी असेल किंवा कसें याची मला शंकाच आहे." (Moreland)

१२७ **स्टोरिआ डि मोगोर.** मनुचि. अर्विनचें भाषांतर ४ भाग.

१२८ **बर्नियर्स ट्रॅव्हल्स.** संपादक, कॉन्स्टेबल.

१२९ **टॅव्हर्निअर्स ट्रॅव्हल्स.** संपादक, बॉल. २ भाग.

१३० **जे फ्रीयरचा ईस्ट इंडिया कंपनीचा नवा वृत्तांत.** संपादक, क्रुक. २ भाग. (१९०९)

१३१ Orme's Historical Fragments of the Moghul Empire. London (1805)

१३२ मद्रास मॅन्युअल जुनी आवृत्ति व गॅझेटिअर नवी आवृत्ति. मराठी, पर्शियन किंवा हिंदी संदर्भाला इंग्रजी भाषांतराचा उल्लेख केला आहे.

पोर्च्युगीज.

१३३ Vida e accoens da Fomosa e felicissimo Sevagy escrita por Cosme de Guarda, natural de Murmugao (Lisbon 1730) हें १६८ पानाचें पुस्तक सन १६९५ मध्यें तयार झालें. इतर माहितीशीं पडताळून पाहिलें म्हणजे अव्यवस्थित मजकूर, चुकीचीं नांवें, निरुपयोगी भाकडकथा आणि इतर गप्पाष्टकें यांनीं हें पुस्तक नुसतें भरून काढलें आहे अशी खात्री पटते. यांत खरे प्रसंग, तारखा आणि तत्कालीन व्यक्तींचीं नांवें अत्यंत अल्प असून इतर खोगीरभरतीच अतीशय आहे. यामुळें या ग्रंथास शिवाजीची काल्पनिक नवलकथा हें नांव योग्य होय. कोणतीहि ऐतिहासिक सत्य गोष्ट या ग्रंथांतून मिळत नाहीं. किंबहुना गार्डा नांवाचा कोणी खरा मनुष्य या ग्रंथाचा लेखक होता हेंसुद्धां खरें नाहीं.

डॉ. D. G. Dalgado of the Academy of Sciences, Lisbon. या गृहस्थांनीं तारीख १५ फेब्रुवारी १९१९ च्या पत्रानें मला असें कळविलें आहे कीं, 'लिस्बन येथील दप्तरखाना आपण तपासला, त्यांत शिवाजी-संबंधीं एकंहि पत्र आपणांस आढळलें नाहीं.'

१३४ Colleccao de Tratados by J. F. J. Biker Tomo IV (Lisbon, 1884) यांत तह व राजकारणी पत्रव्यवहार आहे. गोव्याच्या सरकारानें हें प्रथम छापिलें. तें सन १९२४ मध्यें मीं तपासलें आहे.

१३५ Portugueses e Maratas i. Shivaji. संपादक, पांडुरंग पिसुलकर. (reprinted from the Boletim do Instituto Vasco da Gama.) पोर्च्युगीज व शिवाजी यांच्या संबंधाचें महत्त्वाचें पुस्तक. याचें संपादन फारच विद्वत्तापूर्ण रीतीनें झालें आहे. किंबहुना अशा प्रकारच्या सर्व पुस्तकांत यासच अग्रस्थान देणें उचित होय.

(g) French.

१३६ Voyage des Indes Orientales par M. Carre 2 Vols. (Paris 1699) सन १६७१–७२ मधील शिवाजीसंबंधीची ऐकीव माहिती यांत आहे.

१३७ La Mission du Madura par J. Bertrand tom ३ (Paris 1850) मदुरा मिशनमधील वार्षिक जेसुइटपत्रें यांत आहेत.

१३८ Memoires of Francois Martin 1664–1696 (Ms. T. 1169 of the Archives Nationales of Paris.) शिवाजीसंबंधीची हकीकत नकल करून मीं मिळविली व तिचें संक्षिप्त भाषांतर मॉडर्न रिव्ह्यूंत १९२४ फेब्रुवारीच्या अंकांत प्रसिद्ध केलें.

१३९ La Compagnie Indes Orientales et Francois Martin, par Paul Kaeppelin (Paris, 1908) मूळ कागदपत्रांचे उतारे व कांहीं सारांश यांत असल्यानें फार महत्त्वाची हकीकत यांत आहे.

१४० The Histoire de Sevagi et de son successeur, par g. Dorleans, S. J. appended to his Histoire des Dense conquerans Tartars. (Paris, 1688) शिवाजीचें पूर्व-चरित्र यांत आहे परंतु तें निरुपयोगी. याचें इंग्रजी भाषांतर मॉडर्न रिव्ह्यूच्या मे सन १९२४ च्या अंकांत मी छापिलें आहे.

ऑर्म्स फ्रॅग्मेंटस् मध्यें (१८०५ ची आवृत्ति) पृ. १७१-१७९ वर इतर फ्रेंच व डच ग्रंथकार शिवाजीची कांहीं माहिती देतात असें म्हटलें आहे पण त्या माहितींत मुळींच तथ्य नाहीं.

सनावली.

—०—

खालीं दिलेल्या सनावलींतील इंग्रजी तारखा जुन्या पद्धतीच्या आहेत. ही पद्धत इंग्लंडमध्यें सन १७५२ पर्यंत चालू होती. फ्रेंच, पोर्चूगीज आणि डच यांच्या दप्तरांत जुन्या काळीं सुद्धां नवीन पद्धतीच्या तारखा आहेत. नवीन आणि जुन्या पद्धतीमध्यें दहा दिवसांचें अंतर आहे म्हणून नवीन पद्धतीच्या तारखांतून दहा दिवस वजा करून त्या याखालीं दिल्या आहेत. यामुळें क्वचित् एकादे दिवसाची चूक होण्याचा संभव आहे. परंतु ही चुकी मूळ पत्रांतील नसून काल–गणनेंत आहे. मित्तीवरून तारखा ठरविण्याचें काम स्वामी कन्नु पीले यांच्या जंत्रीवरून केलें आहे. नक्षत्रचिन्हांकित तारखा संशयित समजाव्यात.

१६२६.

१४ मे. मलिकंबराचा मृत्यु. मुलगा फातखान निजामशाहींत वजीर होतो.

१६२७.

१० एप्रील. शिवजन्म.

१२ सप्टेंबर. इब्राहिम अदिलशाहाचा मृत्यु. महमद अदिलशाहा गादीवर बसतो.

२९ अक्टोबर. जहांगिराचा मृत्यू.

१६२८.

४ फेब्रुवारी. शहाजहानचा राज्याभिषेक.

* फेब्रुवारी. शहाजीची मोगली खानदेशावर स्वारी व हकालपट्टी.

१६३०.

* डिसेंबर. शहाजी मोगलांची चाकरी पतकरतो आणि सन १६३२ च्या जूनमध्यें ती सोडून जातो.

१६३३.

१७ जून. मोगल, हसन निजामशहासुद्धां दवलताबाद घेतात.

आगस्ट. शहाजी बाल निजामशहास गादीवर बसवितो.

१६३५.

जानेवारी-फेब्रुवारी. खानेदुरान शहाजीचा पाठलाग करतो.

* अक्टोबर. विजापुरास खवासखानाचा खून.

१६३६.

जुलै-अक्टोबर. खानेजमान विजापुरकरांच्या मदतीनें शहाजीचा माहुली येथें पराजय करतो. शहाजी वालनिजामशहाला सोडून विजापुरकरांची चाकरी पत्करतो.

१६३७.

जिजाबाईसह शिवाजीस शिवनेरीहून पुण्यास आणिलें.

१६३९.

बेंगलोर येथें शिवाजी बापास भेटतो. परंतु लगेच त्यास पुण्यास पाठविण्यांत येतें.

१६४६.

महमद अदिलशहाचा भयंकर आजार. पुढें दहा वर्षेंपर्यंत तो आजारीच राहून सन १६५६ मध्यें मृत्यु पावतो.

? शिवाजी तोरणा घेतो.

१६४७.

मे अगर जून. दादोजी कोंडदेवाचा मृत्यु.

? शिवाजी कोंडाणा घेतो.

१६४८.

२५ जुलई. अदिलशहा शहाजीस जिंजीजवळ कैद करितो.

१५ जुलई. मुरादबक्षास दक्षिणचा सुभेदार नेमण्यांत येतें.

१६४९.

सप्टेंबर. मुराद ऐवजीं शाहिस्तेखानास दक्षिणचा सुभेदार नेमण्यांत येतें. मुराद डिसेंबरमध्यें दिल्लीस पोंहोंचतो.

× डिसेंबर. शहाजीची सुटका (जेधे ता. १६ मे).

१६५६.

१५ जानेवारी. शिवाजी जावळी घेतो.

६ एप्रिल. शवाजी रायगडावर येऊन तो घेतो.

२८ आगष्ट. बाजी चंद्रराव मोरे शिवाजीच्या कैदेंतून निसटतो.

२४ सप्टेंबर. मोहित्यांना कैद करून शिवाजी सुपें घेतो.

४ नोव्हेंबर. महमद अदिलशहाचा मृत्यु. दुसरा अली अदिलशहा गादीवर बसतो.

१६५७

२८ फेब्रुवारी. औरंगजेब बेदरास येतो. ता. २ मार्च रोजीं वेढा घालतो, आणि २९ मार्च रोजीं सर करतो.

२७ एप्रिल. औरंगजेब कल्याणीस जाण्यास निघतो. ता. १ आगष्ट रोजीं कल्याणीचा किल्ला सर होतो.

* २७,२९ एप्रील. शिवाजी अहमदनगर लुटण्यास जातो. परंतु व्यर्थ.

३० एप्रील. शिवाजी जुन्नर लुटतो.

१४ मे. संभाजीजन्म.

४ जून. अहमदनगराजवळ नासिरीखान शिवाजीचा पराजय करतो.

२४ आक्टोबर. शिवाजी कल्याण भिवंडी घेतो.

११ नोव्हेंबर. विजापुरचा वजीर खानमहमद याचा खून.

१६५८

८ जानेवारी. शिवाजी माहुली घेतो.

१४ जानेवारी. शिवाजी राजगडास जातो.

२५ जानेवारी. राज्य मिळविण्यासाठीं आरंगजेब औरंगाबादेहून दिल्लीकडे जावयास निघतो. ता. २० मार्च रोजीं तो बऱ्हाणपुर सोडतो.

२१ जुलै. औरंगजेबाचें पहिलें राज्यारोहण.

३० आगष्ट. शिवाजी सोनाजी पंडितास दिल्लीस पाठवितो.

१६५९

१० मार्च. शिवाजी राजगडाहून शिवापट्टणास जातो.

* एप्रील. मावळच्या देशमुखांनीं अफझलखानास सामील व्हावें अशी फर्मानें अदिलशहा काढतो.

११ जुलै. शिवाजी जावळीस जातो.

५ सप्टेंबर. शिवाजीची पत्नी सईबाई हिचा मृत्यु.

१० नोव्हेंबर. अफझलखानाचा वध व त्याच्या सैन्याचा पराजय.

२८ नोव्हेंबर. शिवाजी पन्हाळा घेतो व तारीख २ डिसेंबर रोजीं त्यांत प्रवेश करितो.

? शिवाजी दंडा गांव घेतो.

२८ डिसेंबर. शिवाजी कोल्हापुराजवळ रुस्तम व फजल यांचा पराजय करितो.

१६६०.

*५ जानेवारी. शिवाजीची दाभोळवर स्वारी.

*१० जानेवारी. शिवाजीची राजापुरावर पहिली स्वारी.

१४ जानेवारी. शिवाजीची गदगच्या बाजूस विजापुरी प्रांतावर स्वारी.

२५ फेब्रुवारी. शाइस्ताखानें अहमदनगराहून कूच.

२ मार्च. शिवाजी पन्हाळ्यावर जातो. जोहरचा पन्हाळ्यास वेढा.

९ मे. शाइस्ताखानाचा पुण्यांत प्रवेश.

६ जून. शाइस्ताखान वासोटा घेतो.

२१ जून. शाइस्ताखान चाकणास येऊन वेढा घालतो आणि तारीख १५ ऑगष्ट रोजीं चाकण घेतो.

१३ जुलई. शिवाजी पन्हाळ्याहून निसटतो. बाजी प्रभूचा आत्मयज्ञ.

*२६ ऑगष्ट. शाइस्ताखान चाकणाहून पुण्यास येतो.

२२ सप्टेंबर. जोहर पन्हाळा घेतो.

२० नोव्हेंबर. विजापुरी किल्लेदार घालिब परेंडा किल्ला मोंगलांस विकतो.

१६६१.

३ फेब्रुवारी. उंबराखिंडींत शिवाजी कारतलबखानाचा पराजय करतो.

फेब्रुवारी. शिवाजी निजामपुर लुटतो आणि दाभोळ-प्रभावली हस्तगत करतो.

*३ मार्च. शिवाजी राजापुर घेऊन इंग्रजांना कैद करतो. त्यांची सुटका १६६३ च्या ता. ५ फेब्रुवारीच्या सुमारास होते.

२९ एप्रील. शिवाजी शृंगारपुरास जातो

* मे. मोगल शिवाजीपासून कल्याण घेतात.

*३ जून. शिवाजीचा माहाडास दोन दिवस मुक्काम.

शिवाजी वर्धनगडास उन्हाळा काढतो.

२१ आगस्ट. देइरी किल्लयास बुलाखीचा वेढा होता तो कावजी कोढाळकर उठवितो.

१६६२.

जानेवारी-मार्च ? शिवाजी मिऱ्या डोंगरांत नामदारखानाचा पराजय करतो. आणि पेणवर स्वारी.

१६६३.

मार्च नेताजीचा दूरवर पाठलाग मोगल करतात.

३० मार्च. शिवाजीचा रायगडावर (बहुधा राजगडावर) मुक्काम.

५ एप्रील. शाइस्ताखानावर हल्ला.

*मे. शिवाजी कुडाळच्या रस्त्यानें (ता. १८ च्या सुमारास) वेंगुर्ल्यास जातो व लागलीच परत येतो.

नोव्हेंबर. जसवंतसिंगाचा कोंडाण्यास वेढा.

१६६४.

६ ते १० जानेवारी. शिवाजी (पहिल्यानें) सुरत लुटतो.

*१५ जानेवारी. शास्ताखान औरंगाबाद सोडतो. शहाजादा मुअज्जम दक्षिणचा सुभा होतो.

२३ जानेवारी. शहाजीचा मृत्यु.

५ फेब्रुवारी. शिवाजी रायगडावर परत येतो.

* फेब्रुवारी. बेदनूरचा राजा भद्राप्पा याचा खून.

२८ मे. जसवंतसिंग कोंडाण्याचा वेढा उठवितो. तारीख ३० रोजीं शिवाजी कोंडाण्यास जातो.

जुलई. शिवाजीची अहमदनगरावर स्वारी.

ऑक्टोबर. शिवाजी मुधोळच्या घोरपड्यांची कत्तल करितो.

*२५ ऑक्टोबर. खवासखान शिवाजीचा पराजय करितो, परंतु शिवाजी लवकरच सावरतो.

नोव्हेंबर. शिवाजी वाडीच्या सांवतास जिंकतो.

* ५ डिसेंबर. शिवाजी वेंगुर्ला लुटतो.

* १० डिसेंबर. मराठे हुबळी लुटतात (पहिल्यानें)

१६६५

८ फेब्रुवारी. शिवाजी मालवणहून जहाजांतून निघतो, बसरूर लुटतो, परत जातांना गोकर्णाची यात्रा. तारीख २२ फेब्रुवारी रोजीं कारवार व पुढें भीमगडाकडेस रवाना.

३ मार्च. जयसिंग पुण्यास पोहोंचतो.

१४ मार्च. भीमगडास शिवाजी.

३० मार्च. दिलेरखान पुरंदराजवळ येऊन वेढा घालतो.

१४ एप्रिल. रुद्रमाळ पडतो.

११ जून. पुरंदराजवळ शिवाजी व जयसिंग यांची भेट. तारीख १२ जून रोजीं शिवाजी दिलेरखानास भेटतो.

१२-१३ जून. पुरंदरचा तह.

१४ जून. शिवाजी जयसिंगाकडून निघून राजगडास जातो.

१८ जून. संभाजी जयसिंगाजवळ पोहोंचतो. जून-जुलई. विजापुरचा प्रधान बहलोल (पहिला) याचा मृत्यु.

२७ सप्टेंबर. शिवाजी पुरंदरावर जयसिंगाकडेस पादशाही फर्मान घेण्यासाठीं येतो. तारीख ३० सप्टेंबर रोजीं फर्मांत घेतो.

ऑक्टोबर } कुडाळ व वेंगुर्ला याशिवाय सगळें दक्षिणकोंकण शिवाजी
नोव्हेंबर } विजापुरकरांकडून जिंकून घेतो.

२० नोव्हेंबर. जयसिंग व शिवाजी विजापुरावर स्वारी करण्यासाठीं निघतात.

२५ डिसेंबर. विजापुरकरांशीं पहिली लढाई. तारीख २८ डिसेंबर रोजीं दुसरी लढाई.

१६६६.

५ जानेवारी. विजापुराहून जयसिंगाची पीछेहाट.

११ जानेवारी. जयसिंग शिवाजीस पन्हाळ्यावर पाठवितो.

१६ जानेवारी. शिवाजीचा पन्हाळ्यावर हल्ला व पराभव.

फेब्रुवारी-मार्च. शिवाजीची फोंड्यावर पहिली स्वारी व पराजय.

५ मार्च. शिवाजीचें आग्र्यास प्रयाण.

२० मार्च. नेताजी पालकर विजापुरकराकडोन जयसिंगाकडेस येतो.

९ मे. शिवाजी आग्र्यास पोहोंचतो.

१२ मे. शिवाजी औरंगजेबाची दरबारांत भेट.

१९ ऑगस्ट. शिवाजी आग्र्याहून निसटतो.

२० ,, रघुनाथ कोर्डे यास आग्र्यास कैद.

२० नोव्हेंबर. शिवाजी राजगडावर परत येतो. ८ शिवापुर यादीप्रमाणें तारीख ११ डिसेंबरास.

डिसेंबर. पीरमीया आणि ताजखान यांचा देवरूख येथें वध.

१६६७

२३ मार्च. जयसिंगास दक्षिणेंतून परत बोलावणें व मुअज्जमची दक्षिणेंत नेमणूक.

एप्रिल. शिवाजीचें औरंगजेबास शरणपत्र.

३ एप्रिल. त्र्यंबक व रघुनाथ आग्र्याहून निसटतात.

* १-८ मे. बहलोल व व्यंकोजी यांचा रांगण्यास वेढा. शिवाजी वेढा उठवितो.

२ जुलई. बऱ्हाणपुर येथें जयसिंगाचा मृत्यु.

ऑगष्ट. शिवाजीचा अदिलशहाशीं तह.

२७ ऑक्टोबर. संभाजी औरंगाबादेस पोहोंचतो. तारीख २८ रोजीं जसवंत-सिंगास भेटतो. तारीख ४ नोव्हेंबर रोजीं मुअज्जम यास भेटतो; व तारीख ५ नोव्हेंबर रोजीं औरंगाबादेहून परत फिरतो.

१६६८.

९ मार्च. औरंगजेबानें शिवाजीस राजा ही पदवी दिल्याचें मुअज्जम शिवाजीस कळवितो.

५ ऑगष्ट. प्रतापराव फौजेसह औरंगाबादेस बादशाही चाकरीस जातो.

ऑक्टोबर. गोव्यावर हल्ला करण्याचा शिवाजीचा कट फुटतो.

*२० ऑक्टोबर. शिवाजी चौलजवळ अष्टीस जातो.

नोव्हेंबर. शिवाजी रत्नागिरी तालुक्यांतील आपले किल्ले तपासतो. डिसेंबरच्या प्रारंभीं राजगडावर परत येतो.

१६६९.

*१ मार्च. राजगडास विश्रांतीस्तव शिवाजीचा मुक्काम.

एप्रिल. शिवाजीच्या कांहीं किल्ल्यांस सीदीचा वेढा.

९ एप्रिल. मोंगली राज्यांतील सर्व मंदिरें पाडून टाकण्याबद्दल औरंगजेबाचा हुकूम—आगष्टमध्यें काशीच्या विश्वेश्वराचें मंदिर पाडलें. १६७० चे जानेवारींत मथुरेचे केशवरायाचें देऊळ पाडलें.

मे-ऑक्टोबर. जंजिऱ्याच्या सीदीवर शिवाजीचे निकराचे हल्ले.

ऑक्टोबर. लोदीखान कल्याणचें रक्षण करतो.

* १ नोव्हेंबर. शिवाजी पोर्चुगीजांचीं जहाजें पकडतो. पोर्चुगीजहि उलट तसेंच करतात.

१६७०

* १ जानेवारी. शिवाजी व मोगल यांचा बिघाड. प्रतापराव औरंगाबादेहून परत येतो.

४ फेब्रुवारी. गड आला पण सिंह गेला.

२४ फेब्रुवारी. राजारामाचा जन्म.

शिवाजी ता. ८ मार्च रोजीं पुरंदर, * १५ मार्च रोजीं कल्याण, १३ मे लोहगड, १६ जून माहुली, २२ जून कर्नाला, २४ जून रोहिडा हे किल्ले परत घेतो.

आगष्ट. शिवाजीची मोगली प्रदेशावर स्वारी, शिवनेरीचा वेढा व पराजय. जंजिऱ्यावर निकराचा मारा.

३-५ आक्टोबर. शिवाजी (दुसऱ्यांदा) सुरत लुटतो.

१७ आक्टोबर. दिंडोरीची लढाई.

*२५ आक्टोबर. मोरोपंत त्रिंबकचा किल्ला घेतो.

* २४ नोव्हेंबर. मुंबईच्या उत्तरेस शिवाजी चालून जातो. ता. २६ रोजीं परत फिरतो.

डिसेंबर. शिवाजी अहिवंत वगैरे किल्ले घेतो, खानदेश वऱ्हाडावर स्वारी, कारंजा लुटतो.

१६७१

५ जानेवारी. शिवाजी साल्हेर घेतो.

१० फेब्रुवारी. सीदीकासीम दंडा परत घेतो.

फेब्रुवारीच्या प्रारंभीं महाबत आणि दिलेर यांचा अहिवंतास वेढा.

मे. महाबत अहिवंत वगैरे किल्ले घेतो.

जून? बहादूर आणि दिलेर यांचा साल्हेरला वेढा, ऑक्टोबरांत वेढा उठतो.

सप्टेंबर. शिवाजीचा वकील मुंबईस जातो.

आक्टोबर. रायगडावर शिवाजी.

डिसेंबर. दिलेर पुणें लुटतो व पुण्याची कत्तल करतो.

१६७२

* १० जानेवारी महाडास शिवाजी. दिलेरशीं लढण्यास फौज जमवितो.

१६७२

* १–७ फेब्रुवारी. एकलासखान, मोहकमसींग इत्यादि मोगली सेनापतींचा पराजय करून मोरोपंत साल्हेरचा वेढा उठवितो, व नंतर मुल्हेर घेतो.

* १५ फेब्रुवारी. रायगडास शिवाजी.

* १५ मार्च—८ मे. ले. उस्तिक शिवाजीकडेस शिष्टाईस येतो. परंतु त्यास अपयश येतें.

२१ एप्रिल. अबदुला कुत्बशाहाचा मृत्यु. अबूलहसन गादीवर बसतो.

जून मोअज्जम दक्षिणेंतून निघून जातो, बहादुरखान १६७७ च्या आगस्टपर्यंत दक्षिणचा सुभेदार.

५ जून मोरोपंत जव्हार घेतो. * ता. १९ रोजीं रामनगर घेतो.

जुलई. नाशिक प्रांतावर मोरोपंताच्या स्वाऱ्या.

२४ नोव्हेंबर. दुसऱ्या अली अदीलशहाचा मृत्यु. शिकंदर अदिलशाहा गादीवर बसतो. खवासखान प्रधान होतो. (तीन वर्षेंपर्यंत)

नोव्हेंबर-डिसेंबर. वऱ्हाड तेलंगणावर स्वारी. मोगलांचा अडथळा.

२९ डिसेंबर. शिवाजी व अदिलशहा यांचा बिघाड. अदिलशाही प्रांतावर शिवाजीच्या स्वाऱ्या.

१६७३

६ मार्च. अनाजी पन्हाळा सर करितो.

९ मार्च. शिवाजी रायगडावर निघून * ता। १६ ला पन्हाळ्यास पोहोंचतो.

१एप्रिल. शिवाजी परळी घेतो.

* १५ एप्रिल. उमराणीची लढाई.

मे. प्रतापराव (दुसऱ्यानें) हुबळी लुटतो, बहलोल कानड्यांतून मराठ्यांना हाकलून देतो, कोल्हापुरास तळ ठेवितो व जून ते आक्टोबरपर्यंत मराठ्यांस चेपतो,

२ जून. शिवाजी यात्रेहून रायगडास परत येतो.

२७ जुलई. शिवाजी सातारा घेतो.

१० ऑक्टोबर. (दशाहारा.) शिवाजी कानड्याच्या स्वारीवर निघतो. तारीख १३ ला साताऱ्यास पोहोंचतो व त्याच दिवशीं पांडवगड घेतो. बंकापुर लुटतो. (शिवापुर यादींत तारीख ७ ला पांडवगड घेतो असें आहे.)

* १५ ऑक्टोबर ते १२ डिसेंबर. } शिवाजीची कानड्यांत स्वारी.

नोव्हेंबर. विठोजी शिंद्यास शर्जाखान लढाईंत ठार मारतो.

४-८ डिसेंबर. कदऱ्यास शिवाजी. अदिलशाही सैन्याचा शिवाजीच्या फौजेवर दोनदां विजय.

१६ डिसेंबर. शिवाजी कानड्यांतून परत येतो.

१६७४

* २० जानेवारी. कोंकणांत उतरत असतां दिलेरला परत फिरविला.

२४ फेब्रुवारी. नेसरीच्या लढाईंत प्रतापरावाचा मृत्यु.

* १ मार्च. शिवाजीच्या एका पत्नीचा मृत्यु.

२३ मार्च. संपगांवची पेठ आनंदराव लुटतो. खिजरखानाशीं युद्ध.

मार्च. मुचकुंदीच्या खाडींत सीदीच्या आरमाराचा दौलतखान पराजय करितो.

३ एप्रिल. रायगडावर नारायण शेणवी शिवाजीस भेटतो.

८ एप्रिल. शिवाजी चिपळूण येथें आपल्या फौजेची पाहणी करितो व कारवारा-जवळ येतो. (ता. २२) व केळंजा घेतो (ता. २४)

७ एप्रिल. खैबर घाटांतील बंडाळी मोडण्यासाठीं औरंगजेब हसन अबदल येथें जाण्यास दिल्लीहून निघतो. तारीख २७ मार्च १६७६ रोजीं परत येतो.

१२ मे. चिपळुणास परशुरामाचें दर्शन घेऊन शिवाजी रायगडावर परत येतो.

१६ मे. शिवाजी प्रतापगडावर देवीच्या दर्शनास जातो व तारीख २१ रोजीं परत येतो.

२८ मे. शिवाजीचें उपनयन. तारीख ३० रोजीं वैदिक विधीनें विवाह.

६ जून. राज्याभिषेक, शकास सुरुवात.

८ जून शिवाजीचा विवाह.

१८ जून जिजाबाईचा मृत्यु.

*१५ जुलई. बहादुरखानाचा पडेगांव येथील तळ शिवाजी लुटतो.

*२६ ऑगस्ट. अनाजी कुडाळास येतो. महमदखान त्यास परत फिरवितो.

२४ सप्टेंबर. शिवाजीचें दुसरें राज्यारोहण.

नोव्हेंबर-१५ डिसेंबर. शिवाजीची बागलाण व खानदेश यांवर स्वारी.

१६७५.

जानेवारी (शेवट.) दत्ताजीची कोल्हापुरावर स्वारी.

४ फेब्रुवारी संभाजीची मुंज.

* १५ फेब्रुवारी मोगल कल्याण लुटतात.

६ मार्च शिवाजी मुलुखगिरीवर निघतो. कोल्हापुर घेतो. ता. २२ रोजीं राजापुरास पोहोंचतो. तेथें चार दिवस राहातो. इंग्रज व्यापारी त्यास भेटतात. नंतर तो कुडाळाकडेस रवाना होतो.

८ एप्रिल शिवाजीचा फोंड्याला वेढा. बहुधा ता. ६ मे रोजीं फोंडा पडतो. ता. २६ एप्रिल रोजीं मराठे कारवार जाळतात.

मे. शिवाजी शिवेश्वर, अंकोला, कारवारकिल्ला घेतो.

मार्च–मे. तहाची हूल दाखवून बहादुरखानास शिवाजी चकवितो.

१२ जून. शिवाजी राजापुरावरून रायगडास येतो.

जून–आगस्ट. मराठ्यांची सुंदावर स्वारी.

जुलई–डिसेंबर. जंजिऱ्यावर भयंकर मारा. पण व्यर्थ.

७ सप्टेंबर. शिवाजीचा राजापुरास मुक्काम. ऑस्टिनची वकीली.

नोव्हेंबर. बहादुरखानाची उत्तर कोंकणावर स्वारी.

११ नोव्हेंबर. खवासखानास कैद करून बहलोल विजापुरचा वजीर होतो. (दोन वर्षें.)

१६७६.

१८ जानेवारी. बहलोलखान खवासवानाचा खून करितो. विजापुरांत यादवी.

जानेवारी–मार्च. शिवाजीचा आजार. तो आजारांतून उठल्याचें तारीख ७ एप्रिलचें पत्र सुरतेचें आहे.

मे. मोरोपंत रामनगर बळकावतो व या महिन्याच्या शेवटीं रायगडास परत येतो.

३१ मे. बहलोलवर हल्ला करण्याठीं बहादुरखान हलसंगीजवळ भीमा उतरतो.

१ जून. बहलोल हलसंगी येथें बहादुराचा पराजय करतो. इसलामखान मारला जातो. (मासिरी आलमगिरीमध्यें तारीख १३ दिली आहे.)

१९ जून. नेताजी पालकराचें शुद्धीकरण.

जून–डिसेंबर. जंजिऱ्यावर पुनः मारा.

ऑक्टोबर. (प्रारंभीं) नारायण शेणवी रायगडास जातो.
१ नोव्हेंबर. संभाजी शृंगारपुरास जातो.
डिसेंबर. सीदीसंबळ जैतापुर जाळतो.

१६७७.

जानेवारी. येलबुर्ग्याजवळ हुसेनखान मियाणाचा पराजय हंबीरराव करितो.
फेब्रुवारी. शिवाजी हैदराबादेस जाऊन एक मास राहतो.
*२४ मार्च–१ एप्रिल शिवाजी श्रीशैलास जातो.
४ मे. तिरुपतीच्या पुजाऱ्यास दानपत्र.
* ५ मे शिवाजी पेड्डापोलम येथें पोंचतो. त्याचें घोडदळ तारीख ९ मे रोजीं कांजीवरम् मधून जिंजीस जातें.
* १३ मे. शिवाजी जिंजी (लांच देऊन) घेतो. तो ता. १५ च्या सुमारास जिंजीस येतो.
* २३ मे. शिवाजी वेलोरास येऊन वेढा घालतो.
२६ जून. शिवाजी तिरुवाडीस येतो. शेरखानलोदीचा पराजय. तारीख २७ ला लोदी बोनागिरीपट्टणाला पळून जातो. शिवाजी तेथें वेढा घालतो.
५ जुलई. शेरखान आपला प्रांत शिवाजीस तहानें देतो.
७ जुलई. बहादुरखान गुलबर्गा घेतो. तारीख २ ऑगस्ट रोजीं नलदुर्ग घेतो. (मा. आ. तारीख १४ मे देते.)
* १२ जुलई. शिवाजी कोलेरूनच्या कांठीं तिरुपलवाडीस येतो.
* २३ जुलई. व्यंकोजी शिवाजीजवळून पळून जातो.
२७ जुलई. शिवाजी तिरुपलवाडीहून परततो. तारीख ३१ जुलई रोजीं तुंदुगुर्ती. तारीख १-३ ऑगस्ट रोजीं वृद्धाचलम्. तारोख २२ सप्टेंबर रोजीं वानिकमवाडी. तारीख ३ ऑक्टोबर रोजीं मद्रास.
ऑगस्ट. बहादुरखानास परत बोलाविलें. दिलेरखानाच्या ताब्यांत दक्षिण.
सप्टेंबर. दिलेरची गोवळकोंड्यावर स्वारी. मालखेड येथें पराजय, व नलदुर्गास परत येणें.
*२ सप्टेंबर. मराठे व दमणचे पोर्च्युगीज यांच्यांत चकमक.
ऑक्टोबर. शिवाजी अरणी घेतो.
*५ नोव्हेंबर. म्हैसुरांत शिवाजी.

१६ नोव्हेंबर. व्यंकोजी अहिरीजवळ शांताजीवर चालून जातो.
नोव्हेंबर. दत्ताजी तिसऱ्यानें हुबळी लुटतो.
नोव्हेंबर. मसाऊद विजापुरातर्फे दिलेरशीं अपमानास्पद तह करितो.
डिसेंबर. शिवाजीचा वकील पीतांबर शेणवी गोव्यास पोंचतो.
२३ डिसेंबर. बहलोलखानाचा मृत्यु.

१६७८

जानेवारी. मोरोपंत नाशीक त्र्यंबक लुटतो.
*१६ जानेवारी. लक्ष्मीश्वरास शिवाजी.
*२६ जानेवारी. २३ फेब्रुवारी शिवाजीचा बेलवाडीस वेढा.
२१ फेब्रुवारी. सीदी मसाऊद विजापूरचा वजीर होतो.
२ एप्रिल. हिंदूवर जिझियाकर पुनः औरंगजेब बसवितो.
*४ एप्रिल. शिवाजी पन्हाळ्यास जातो.
*२५ एप्रिल. मराठे मुंगीपैठण लुटतात.
मे ? शिवाजी शिवनेरी घेण्याचा प्रयत्न दुसऱ्यानें करितो पण व्यर्थ.
मे. शिवाजी रायगडास येतो.
२१ जुलई. शिवाजी वेलोर घेतो.
*१ सप्टेंबर. पीतांबर शेणव्याचा कुडाळ येथें मृत्यु.
१८ सप्टेंबर. मुअज्जम (शहा आलम) पुनः दक्षिणचा सुभेदार होतो.
ऑक्टोबर. दौलतखानाचा जंजिऱ्यावर मारा.
डिसेंबर. गोव्याहून रघुनाथ शेणवी कोठारी यास शिवाजीकडेस वकीलीस पाठविलें.
१३ डिसेंबर. संभाजी दिलेरखानाकडेस जातो.

१६७९.

२५ फेब्रुवारी. शहा अलम औरंगाबादेस पोहोंचतो.
३ मार्च. मोरोपंत कोपळचा किल्ला सर करतो.
२ एप्रिल. दिलेरखान भूपाळगड घेतो.
९ एप्रिल. आनंदराव बाळापुर जिंकतो.
१८ आगस्ट. दिलेरखान विजापुरावर स्वारी करण्यासाठीं भीमा ओलांडतो, व १६ सप्टेंबरपर्यंत मुक्काम करतो.

सप्टेंबर. मोगल मंगळवेढा घेतात

* १० सप्टेंबर. शिवाजी खांदेरी बेट घेऊन तेथें तटबंदी करतो.

१९ सप्टेंबर. शिवाजी व इंग्रज यांची पहिली आरमारी लढाई. दुसरी लढाई १८ आक्टोबर रोजीं झाली.

७ आक्टोबर. दिलेर विजापुरच्या किल्ल्याजवळ येतो व १४ नोव्हेंबरला परत फिरतो.

३० आक्टोबर. आदिलशाहाच्या मदतीसाठीं शिवाजी सेलगुर येथें येतो.

४ नोव्हेंबर. मोगली मुलखावर स्वाऱ्या करण्यासाठीं शिवाजी सेलगुरहून निघतो.

* १५ ते १८ नोव्हेंबर. शिवाजीची जालनावर स्वारी. रणमस्तखानाशीं तीन दिवस लढाई

* २१ नोव्हेंबर. शिवाजी पट्ट्यास पोहोंचतो, व एक पंधरवडा मुक्काम करतो.

२० नोव्हेंबर. दिलेर अथणी लुटतो. संभाजी ता। २१ रोजीं त्याच्याजवळून निसटतो.

३० नोव्हेंबर. संभाजी विजापुराहून सटकतो ता। *४ डिसेंबरचे सुमारास पन्हाळ्यास पोहोंचतो.

* २४-३० नोव्हेंबर. मराठ्यांची खानदेशावर स्वारी धरणगांव लुटतात.

* ४ते २५ डिसेंबर. रायगडावर शिवाजी ?

१६८०

* १ जानेवारी. पन्हाळ्यावर शिवाजी

१३ जानेवारी. पन्हाळ्यावर शिवाजी संभाजीस भेटतो.

२६ जानेवारी. दौलतखान उंदेरीवर जातो, परंतु पराजय.

फेब्रुवारी ? शिवाजी पन्हाळ्याहून रायगडास येतो.

७ मार्च. राजारामाची मुंज

१५ मार्च. राजारामाचें लग्न.

२२ मार्च. शिवाजी आजारी पडतो.

४ एप्रील. शिवाजीचा मृत्यू.

सूचि

अ.

अंकण्णा २०३, २०७.
अकबर २३२, २९५.
अचलसिंग (कचवाहा. अकबराची सासुरवाडी.) ८८, ९१.
अण्णाजीपंत–अनाजी दत्तो पहा.
अनाजी दत्तो–११९, १४७, १७९, २०२, २०३, २२४, २३९, २५५, २६२.
अफजलखान २६, २७. विजापुराहून प्रयाण ४१, ४२. वाई. ४३ ते ४७, वध ४९. दंतकथा ५२ ते ५४, ६७, ८०, ८२, १०४, १०९, १२०, १६७, १६८, १८४, १८६, २०३, २०६, २४३, २४४, २६४.
अबदुल अजीज १४६, १७५, २२६.
अबदुल महंमद. १४६.
अबदुल मुनीम. ३५.
अबदुल रसूल. ११९.
अबदुल वहाब (काजी) २८०.
अबदुल हमीद. ११९.
अबदुल्लाखान. (काशगरचा राजा)१३०. अबदुल्लाखान. वेलूरचा किल्लेदार. २१०, २१६.
अबदुल्ला भटारी–अफजलखान पहा.
अबुल हसन. (कुत्बशहा) २०७, २१५, २२६, २३४.
अबे कॅरे. (प्रवासी) ५२.
अमरसिंग (चोंडावत) ८८, १३८.
अदिलशहा (अली) ४०, ४१, ५७, ६०, १००. मृत्यु १४६, १६९ ते १७१, १७६, १७७, २९६.
अदिलशहा (इब्राहिम) २२९.
अदिलशहा (महंमद) मृत्यु ३१.
अदिलशहा (सिकंदर.) २२३.
अलाउद्दिन खिलजी २९५.
अहंमदखान १३५.

आ.

आत्माजी ८२.
आंध्रराजा (शातकर्णी) १५८.
आनंदराव ११६, १४०, १५०, १५१, २०४, २३६, २३८, २३९.
आबाजी सोनदेव ३८, ३९.
आबाभट १४६.
आबूखान १७८.

आलावर्दी बेग १२७.

इ.

इखलासखान २३३, १३४, १४०, १४१, १७३, ११४, २२८, २३०, २३६.

इख्तिखरखान १२८.

इंद्रमण (बुंदेला) ८५, ८६.

इनायतखान ७२, ७५, ७६, ८०.

इब्राहिमखान २११, २१२.

इमान्युएल (जेनाव्हाडो) १७३.

इरजखान ३४, २२९.

इस्माइलखान ६३.

उ.

उग्रसेन ९४, ९७,

उजदीन (पठाण) ५०

उजबेगखान १२६.

उदयभाण (गौर) ८६, ११८, १२५, १२६.

उदयराज (जयसिंगाचा चिटणीस) ९४, ९७.

उदाराम ६४.

उस्टिक (ले.) २४९, २५०.

ए.

एकनाथ ६.

एसाजीकंक २१, २०४.

एहतेशामखान (शेखजादा) ७८, ८४.

औ.

औरंगजेब १९, २२, ३२ ते ३७, ४०, ५६, ६३, ७०, ७१, ७८, ८०, ९३, ९५, ९८, १०२ ते १०४, १०६, १०८, ११२. शिवाजी निसटल्याबद्दल पश्चात्ताप ११७, १२३ ते १२५, १२७, १३०, १३२, १३६ ते १३८, १४१, १४३, १४६, १५२, १९०, २०१, २०६, २१५, २१८, २२८, २३७, २४६, २५४, २८०, २८१.

अं.[1]

अंबाजी गोविंदराव ८२, ८४.

अंबिकाबाई (शिवाजीची मुलगी) २४२.

अँड्रे फ्रीयर. (जेसुइट मिशनरी) २२०.

क.

कडतोजी गुजर–प्रतापराव पहा.

कर्ण राठोड ८६.

कर्माजी ९३.

कस्तुरी रंग (अफजलखानाच्या हातून खून) ४३.

कहर कोळी ८२.

कान्होजी जेधे ४६.

कायसावंत १८४.

कारतलबखान ३५, ६४.

कावजी कोंडाळकर ६६.

कान्हर्टिट (कॅप्टन) २४७.

कान्होजी जेधे ४६.

काशी (सरदार) ३३.
कासम १९०, १९४.
कासमखान (कोपळचा) २२४, २२५.
कीरतसिंग ७८, ८५, ८६, ९०, ९१, ९७, ९९, १००.
कुतुबुद्दिनखान ८४, ८६, ८९, १६३, २०६.
कुबेदखान ७८, ८५, ८९.
केदारजी खोपडा ४२.
केशवनायक १७२.
केशवपंत २०५.
केशवप्रभु १७२.
केसरीसिंग २३८.
कोन्हेर महादेव २१३.
कोंडाजी फर्जंद १४७.
कृष्णाजीपंत ४८, ११४, ११७.
कृष्णाजी बांदल २१.
कृष्णाजी भास्कर ४३, ४५, ४९, ५४.
कृष्णा सावन्त १७२.

ख.

खवासखान १३, ४०, ४२, ९९, १४७, १४८, १६५, १७१, १७२, १७४, १७८, १७९.
खाजा अबदुल रजक १३७.
खानगौडा (लक्ष्मीश्वराचा देसाई)२२१.
खानमहंमद ३७, ४०.
खानेजमान १८, १३५.
खानेजहान लोदी १३.
खाफीखान ११५, १८८, २९२.
खिजरखान १८०, २०१.
खेलोजी १२. मृत्यु २२.
खंडोजी खोपडा ४२, ५१.
खंडोजी गोंदजी १४०.

ग.

गणेश शेणवी (वकील) २६१.
गणोजी शिर्के २४२.
गागाभट्ट (राज्याभिषेक) १५५ ते १६६, २८५.
गाजी वेग ९४, १०५.
गायकवाड २८५.
गालिबखान ११९.
गिरधर पुरोहित ९०.
गिरिधरदास २५६.
गोतमी देवी (दुसरें शतक) १५८.
गोपन्ना १९९.
गोराकुंभार ६.
गोसालो मार्टिन (फादर) २६०.
गंगाजी मंगाजी ४०.
गंगाधरपंत २०५.

घ.

घैरियत खान. २२८.

च.

चतुर्भुज (चव्हाण) ८६.
चिमणाजी बापूजी ६८.
चेन्नमाजी १७१.
चोखामेळा ६.
चंद्रराव मोरे ५४.
चंपतराय (बुंदेला.) १३६.

छ.

छत्रसाल १३६.

ज.

जगपाळराव निंबाळकर १२.
जनार्दन नारायण हणमंते २००, २०४, २२५.
जगत्सिंग ८६.
जगन्नाथपंत २१३.
जनार्दनपंत २१९.
जमशेदखान २२३.
जयसिंग (मिर्झा राजा) ३०, ७८ ते ११९. मृत्यु, १२१, १३५, १३६, १७४, १८७, २२०.
जर्मेन (एम्.) फ्रेंच वकील. शिवाशिबिराचें वर्णन २१४, २१९.
जलालुद्दिन अकबर २३१, २३२.
जसवंतसिंग (पल्लीवनाचा राजा) ६४.
जसवंतसिंग (महाराजा, जोधपुर)६३, ६७, ७०, ७७, ७९, १०७, १२१ ते १२३, १२८, १३८.
जहांगीर २९८.
जाधवराव (कल्याणीचे) मृत्यु ९९.
जाधवराव (लुखजीचा पणतु) १४४.
जानकीबाई (राजारामपत्नी) १५०.
जानीबेग ९८.
जाफरखान १०९, ११९.
जॉर्ज ऑक्सेंडेन ७३.
जॉर्ज कोल १९५.
जिऊ महाला ४७, ४९, ५०.
जिजाबाई (मातुश्री) रंगपंचमी ११. विवाह १२, १५, १६, १९. शिवाजीवर वजन २१. पुरंदरावर २८, ३८, ४७. वीरमातृत्व ५२, १०५, ११६. शिवराज्याभिषेक सुख १५८. मृत्यु १६२.
जिरॉल्ड आंजीयर १४९, २५२.
जीवाजी २६१.
जेधे २१.

झ.

झुंजारराव ५१.

ड.

डिग मेलो. ८१.

त.

तम्मय्या १७१.
तानाजी (? बाबाजी) भोसले ११९.
तानाशा (कुत्बशहा) २०३.
तान्हाजी मालुसरा २१, ५६. सिंहगड १२५-१२६.
तिमाजी केशव २१०.
तिम्मय्या १८१.
त्रिंबकजी भोसले ११९.
त्रिंबकजी सोनदेव १०५.
त्रिंबक भास्कर (प्रधान) ५१, ६५.
त्रिंबकपंत डबीर ११३.
तुकाराम ६.

तुकोजी चोर (सरनौबत) २३.
तुर्कतजखान ८६.
तेलंगराऊ ११६.
तैमूरलंग. २९५.

थ.

थॉमस निकोलस २५१, २५२.
थॉमस विल्किंस २५८.

द.

दत्ताजी त्रिंबक (वाकेनिवीस) ५४, १०५, ११३, ११७, १३१, १६४, २०५, २६२.
दरियासारंग १८६.
दलपतराय (बुंदेला) १४५, १४६.
दळवी १८१.
दाउदखान (कुरेशी) ७८, ८५, ८६, ८७, ८९, ९७, १२५, १२६, १२७, १३३, १३४, १३५, १३६, १३८, १३९.
दादोजी कोंडदेव १४, १६ ते २१. उद्विग्नता २२. मृत्यु २३, २४, २६५, २९७.
दाराप ६३.
दावलजी गाडगे १०५.
दिलेरखान ७८, ८५ ते ९६, ९९, १०१, १२१, १२२, १२६, १२८, १२९, १३३, १३८. नऊ वर्षांवरील पुणेंकर पुरुषांची कत्तल १४०, १४१, १४२, १४४, १४५, १५०, १५१, १५२, १६०, २२४, २२६, ते २३०. विजापुरावर स्वारी २३४, २३५, २३६.
ध (धुळ्याचे) १९.
धौलतखान १८६, १९१ ते १९७, २९५.
धौलतराव २९३.

ध.

धारराय १४४.

न.

नरहरि रुद्र २१०.
नरहरि सोनार ६.
नागोजी जेधे मृत्यु २२५.
नागोजीपंडित (मुजुमदार) १४७.
नामदारखान ६६.
नामदेव ६.
नारसिंग गौर ८६.
नारायण शेणवी १६१, २५४, २५६.
नारोपंत कारखानीस २३.
नासिरमहंमदखान (जिंजीचा किल्लेदार) २१०.
नासिरीखान ३५ ते ३५.
निराजीपंत ११४ ते ११७, १६१, २५४.
निराजी रावजी (शहाणा) १०५, ११३, १२३, २०२.

निवृत्ति ६.
निळोजी नायक २१३.
निळोजी नीळकंठ २८.
निळोजी सोनंदेव १०५.
निळोपंत (पुरंदर) १२६, १३१.
निळो मोरेश्वर २०५.
निळो येसाजी—नील प्रभु पहा.
नील प्रभु (मुनशी) २०५, पत्र २३०, २६७.
नुरुद्दीन जहांगीर २३१.
नूरखान २९५.
नेकनामखान १३६.
नेताजी पालकर (सरनौबत) ४०, ४५, ५५, ६४, ६६- मोगलांकडून पाठलाग व जखमी ६७, ६८ ८९, ९९. मोगलांस मिळतो १०२, १०५ १०७, १११, १६९ स्वराज्यांत आगमन व शुद्धी २०२.

प.

परसोजी १२.
पिलाजी २५१.
पिलाजी नीलकंठ २८, ६५.
पीतांबर शेणवी २६१.
पुतळाबाई २४१.
पुरदिलखान ८८.
पोलादखान फुलादखान पहा.
पंताजी गोपीनाथ ४५, ४७, ४९.
प्रतापराव (सरनौबत) ५८, ६३, ११२, १२३, १२४, १३१, १३३, १४०, उमराणीची लढाई १४८. नेसरीची लढाई व मृत्यु १५०. हुबळीची लूट. १७७.
प्रभाकर भट्ट १५७.
प्रल्हाद निराजी २०३ ते २०६.

फ.

फजलखान (अफजलपुत्र) ५१, ५६, ५८, ५९, ८०, ८२, १६८.
फाटक (मुंबईचे) २७४.
फातखान (मलिकंबर पुत्र) १२, १३.
फातखान (षास्ताखान पुत्र) ६९. मृत्यु ७०, १८४, १८८.
फातजंगखान ९९.
फातुल्लाखान १३६.
फिरंगोजी नरसाळा २४, ६२.
फिलिप गायफर्ड २४४, २४५.
फुलादखान (आग्र्याचा कोतवाल) ११०, ११३.
फ्रान्सिल ८१.
फ्रान्सिस थॉर्प १९५.
फ्रान्सिस मार्टिन २११, २१९.

ब.

बजाजी निंबाळकर १४५, २३५, २४२.
बडे साहेबिण (बेगम) २४, ४० ते ४२, ५३, १६८, २४६.

बसव १७०.
बहरजी बोहरा ७४.
बहलोलखान ४१, १४६, १४८, १४९, १५०, १५१, १६५, १६६, १६९, १७१ ते १८०, २०१.
मृत्यु २२३, २२४.
बहादुरखान १३०, १३८, १४० ते १४६, १७७, १७९, २०१, २०२, २३५.
बहिरजी नायक २३२.
बहिरराव २२५..
बॅरन (फ्रेंच डायरेक्टर) २१९.
बाजी घोरपडे २५, २६. कत्तल १७२.
बाजी चंद्रराव (मोरे) ८२, ८४.
बाजी पासलकर २१. कायसावंताशीं युद्ध व मृत्यु १८४.
बाजी प्रभु (आत्मयज्ञ) ५९.
बाजीराव (पहिला) २८४, २९१.
बाजीराव (होनप देशपांडे) ६३.
बाबाजी बापूजी ६८.
बाबाजी (भोसले. मालोजीचा मुलगा) १०.
बाबाजी भोसले ६३.
बाबाजी नाईक पुंडे १४७.
बाबूमिया २१२.
बाळकृष्णपंत (मुजुमदार) २३.
बाळकृष्ण (सख्तावत) ९१.
बाळप्रभु–बाळाजी आवजी पहा.
बाबाजी ढमढेरे २०४.
बाळाजी आवजी १३१, २०५, २६५, २८५.
बाळाजी सिलीबकर ४७.
बाळंभट १५७.
बुऱ्हाण निजामशहा (खून) १३.
बुलाखी ६६.
ब्रॅडबरी १९५.

भ.

भद्राप्पा १६९. खून १७०.
भाऊसिंग (हाडा). ७७
भीमसेन १३७.
भीमाजीपंडित २५२.
भूपतसिंग पवार ९१.

म.

मकाजी आनंदराव १३१, १३३.
मदारी मेहेतर ११२.
मनुची ८२.
मनोहरदास गौरे १२६, २२७.
मलिकंबर १२, १८.
मालोजी १२.
महदीन (पठाण) ५०.
महंमद अदिलशहा २३, २५, ३८,४१
महमद इखलासखान १७०, १७१.
महमदखान १७५, १७९, १८०.
महमदजमान १३९.
महादाजी निंबाळकर ११९, २३७, २४२.
महादाजी (नीळकंठराव) २८.
महादाजीपंत २१८.
महाबतखान १३५ ते १४२, २८०.

माणकोजी धनगर ८२, ८४.
माणको हरि सबनिस १०५.
मादण्णा १६६, १९९, २०३, २०७. २२६.
मानाजी मोरे १४०, २०४.
मामतखान १७९.
मायनाइक १८६.
मालोजी (शहाजीचा पिता) १० ते १२.
मित्रसेन ८५, ८६.
मियासाहेब १७८.
मिर्जाखान ३४.
मिस्त्री (सीदी) १८६, १९३, २९५.
मीनाजी भोसले ३३, ३४.
मीर अबदुल्ल माबूद १३४.
मीर जुमला ३६.
मीर तुजुक ९४.
मीर महंमद २३०.
मुअज्जम (शहाजादा) ५६, ७१, ७६, ७८, ९८, १२१, १२३.
दिलेरशीं भांडण १२७, १२८, १२९, १३३, १३५, १३८, १४२.
मुकुंद बल्लाळ १४०.
मुक्ताबाई ६.
मुखलिसखान १०७.
मुजफरखान १४६, १७७.
मुरार जगदेव १३, १८.
मुरादबक्ष (शहाजादा) २६, २७, ७२.
मुरार बाजी ९१, आत्मयज्ञ ९२.
मुलतफतखान ३२, ३३, ३४.
मुल्ला अहंमद २७, ३८.
मुल्ला याहिया नवायत ७८.
मुस्तफाखान २५, २६.
मुहकमसिंग १४१.
मोरया (गोसावी) २८.
मोरे (अंबाजी गोविंदराव) ३०.
मोरे (कृष्णाजी) शिरःच्छेद ३०.
मोरे (चंद्रराव) खून २९, ३०.
मोरे (जावळीकर.) ३२.
मोरे (बाजी) ३०.
मोरे (सूर्याजीराव) खून २९.
मोरो तानदेव १८.
मोरो नागनाथ १४०.
मोरोपंत पेशवे ६, ४०, ४५, ५०, ५० १०५, ११४, १३१, १३३, १३४, १३६, १४० ते १४४, १६१, १६६, १९२, २०२, २२४, २२५, २३५, २३९, २६२.
मंबाजी १२.

य.

यशवंतराव (आसदखानी) २५.
याकुदखान ९९, १८८.
युसुफखान (चुकून युसुफुरखान असें छापिलें आहे) १८३.
येसाजीकंक (पायदळाचा सरनौबत) ४०, तत्तीशीं झुंज. २०८.

येसूबाई २२८, २३७.

र.

रघुनाथ २०१.

रघुनाथ नारायण हणमंते २००, २०४, २१८, २२०, २२१.

रघुनाथपंत २०६.

रघुनाथ बल्लाळ कोर्डे (सब्रनीस) २३, २७, २९.

जंजीऱ्याच्या सीदीवर ३८, ९३, ९४, १०८, १०९, ११३. मृत्यु १८४.

रघुनाथपंत वकील ३६, २१३.

रघूजी ६३.

रणजीतसिंग २९७.

रणदौलाखान २७, ४१, १०२, १६७.

रणमस्तखान २३८.

रवींद्रनाथ (टागोर. डॉक्टर) २८४.

रसूल बेग रोजवानी ८६, ९०.

रहमान (प्रो.) १५५

रॅंडॉल्फ २४५.

राघो मित्रा १०५, ११३, ११७, १२६.

राजसिंग गौर ८६.

राजाराम १५०, २३९, २४१, २४२, २५७.

राजा विठ्ठलदास १२६.

राजा सुजनसिंग बुंदेला ७८.

राझी उद्दीनखान १२६.

राम ८२, ८४.

रामदास १, ६, १५८, २७३ ते २७९.

रामशेणवी २४९, २५८, २६०.

रामसिंग ८६, १०५, ते ११०, ११४, ११७, ११८.

रामाजी पांगेरा १४१.

रायबागीण ६४.

रायराव १८.

रायसिंग (शिसोदिया) ७८, ८५, ८६, ८८, १०७, १०८.

रामाजी नलगे २१०.

राव अमरसिंग (चोंडावत) १४०, १४१.

राव कर्ण राठोड़ ३४, ३५, १२२.

रावजी पंडित ७०, २४६, २४७.

राव भाऊसिंग (हाडा) ६१.

राव मकरंद १३४.

रावळ शेणवी १७२.

रिचर्ड २४५.

रिचर्ड केगविग २५८.

रुद्राजी साळवी २१०.

रुस्तमेजमान ५६, ६७, (दुसरा) १६३, १६७, १६८, १७०, १७१, १७३, १७५, १७६, १७७, १७८, २४३, २४४.

रूपसिंग राठोड ९०.

रूपाजी भोसले. १४०.

रेव्हिंग्टन २४४, २४५.

ल.

लखमसावंत १७१, १७२, २६०.

लांबाजी भोसले. ५१.

लुखजी (जाधवराव) ११, १२. खून १३, १७.
लुदीखान ८८, १२७.

व.

वामन ६.
वालजी २४४.
वॉर्ड २५५.
विक्रमशहा १४२, १४४.
विठोजी (शहाजीचा काका) १० ते ११.
विठ्ठल पिलदेव अत्रे गारडकर २१०, २६१.
विश्वासराव नानाजी ५४.
विसाजी नीलकंठ २३५.
विसाजीपंत ११४.
विसाजी बल्लाळ १४०.
वेंकटाद्रि मुरारि २२९, २३०.
यंकाजी दत्तो १३१, १३३, १४०, १८५.
यंकोजी ७७, ९९. विजापुरकरांतर्फे शिवाजीशीं युद्ध १३०, २१३, शिवाजीशीं भेट. २१३, २१४, २१५. शिवसैन्याशीं युद्ध व पराजय २१७, २१८. योग्यता २२०, २२१.

श.

शर्जाखान ८८, ९९, २२६, २३०.
शहाजहान २७, ३५, ७९, २३१.
शहाजी रंगपंचमी ११. विवाह १२ ते १७, २२. बंदिवास २४ ते २८, ३८ ते ४१, ४८, ५४. मृत्यु ७७. पुनः कैद. १६९, १७२, २००, २०७, २१३, २१४, २१६, २१८, २२०.
शहा अब्बास (दुसरा इराणचा शहा) २८०.
शहा हाशिम उलुवी (फकीर) २३.
शामराज नीळकंठ २३, ४०.
शामराज पद्मनाभी ५१.
शिकंदर (अदिलशहा) १४६, २०१, २९६.

श.

शिवाजी (महाराज) ७, ८, १४. जन्म १५, १६. पुण्यास आगमन १९. शिक्षण २०. मावळ्यांची संगति व महत्वाकांक्षा २१, २२, २३. स्वातंत्र्याचा पुकारा २४, २५. मुरादशीं पत्रव्यवहार २६. पुरंदर घेतो २८. जावळी घेतो ३०. सुपें सर ३१, ३३. जुन्नर घेतलें. ३४, ३५, ३६, ३७, ३८, ४०, ४१. प्रतापगडावर ४३, ४४. अफजलखानाशीं लढण्याचा निश्चय ४५,

४६, ४७. मनःस्थिति ४९, ५०. स्तुती ५२. अफजलवधाची मीमांसा ५३. पन्हाळ्यांत ५६. थर्मापिली. ५९, ६५, ६६. षास्ताखानावर हल्ला ६९, ७१. सुरतेची पहिली लूट ७२ ते ७७, ७८. पन्हाळ्यावर पराजय १०१. जयसिंगाची स्वारी ७८ ते १०२. आग्र्यास प्रयाण १०३ ते १२०. आग्र्याचा दरबार १०६. अटक १०८. पलायन ११२. रायगडावर आगमन ११६. विश्रांति १२४, १२६, १२९. सुरतेची दुसरी लूट १३०, १३१, १३२. वणी दिंडोरीची लढाई १३३. वऱ्हाड बागलाणवर स्वारी १३५, १३६. छत्रसालाची भेट १३७, १३८, १३९, १४०, १४२, १४३, १४४, १४६, १५०. राज्याची चतुःसीमा १५२, १५३. राज्यारोहण १५४ ते १६६. बहादुरखानास चकविलें १६४. बसनूरची लूट १७३, १७७. फोंडा सर १७९. जंजीऱ्यासाठीं भांडण १८५, १८९, १९३. खांदेरीसाठीं युद्ध १९४ ते १९७, १९८, १९९. कुत्बशाहाशीं तह २००. हैदराबादेस सत्कार २०३, २०४. अटी २०७, २०९, २१२. व्यंकोजीशीं भेट व बिघाड २१३. परतणें २१७, २२०. कर्नाटकची स्वारी २२२ ते २२५, २२६. संभाजी मोगलांस मिळतो २२७. औरंगजेबास पत्र २३०, २३४. शेवटची स्वारी २३८. संभाजीस उपदेश व मृत्यु २४०. परिवार २४१. पाश्चात्यांशीं संबंध २४३ ते २४७. वखारींची भरपाई २४८ ते २५८. पोर्च्युगीजांशीं संबंध २५८ ते २६१. राज्यव्यवस्था २६२ ते २६३. सैन्यबळ २६४.

अष्टप्रधान ३६५. सैन्य २६७. देवस्थान धर्मादाय २७२. रामदास २७३. परिणाम २७९ ते २८१. योग्यता २८३ ते २९२. बुद्धीचें पृथक्करण २९३. राजकीय ध्येय व अडचणी २९५. राष्ट्रभावनेवर परिणाम २९६.

शिदोजी निंबाळकर १४०.

शिर्के (मोऱ्यांचे कारभारी) २९, ६६.

शिवाजी शंकर २१३.

शिवाप्पा नायक ८२, १६९.

शुभ करण (बुंदेला) ८८, १४५.

शेख अहंमद खवासखानी २२९.

शेरखान १७३, १७४.

शेरखान लोदी २११, २१२, २१९.

शेरसिंग (राठोड) ८६.

शेलारमामा १२६.

शेषापा नाईक ११.

शंकराजी नीळकंठ २८.

शंभू-संभाजी पहा.

शंभूजी कावजी ६३ मृत्यु.

श्यामजी नाईक पुंडे २०५.

ष.

षाइस्ताखान ३४. दक्षिणेस प्रयाण ५६. पुण्यास ६०, ६१- चाकण ६२. परेंडा ६३ ६४, ६७, ६८. दुर्दशा ६९, ७०, ७१, ७६, ७८, ८०, १०९, २०३, २०६, २४७.

स.

सईबाई (लग्न) ४०, २४१.

सकवारबाई (,,) २४१.

सकूजी गायकवाड २२२.

सखूबाई (शिवकन्या) ५४५.

सखोपंत (वकील) २६०.

समर्थ (रामदास पहा)

सय्यद अबदुल अझीज ८४.

सय्यद जान महंमद (फकीर) २३८, २४१.

सय्यद मकबुल आलम ८६.

सय्यद मसाऊद २१८.

सय्यद मुनव्वरखान ८४.

सय्यदलियास शर्जाखान १७१.

सर्जाखान ५७, १७८.

सलाबतखान (दक्षिणी) ६३.

सावित्रीबाई (बेलवाडीची किल्लेदारीण) २२२, २२२.

सावंत (वाडीचे) १५२.

सार्जंट गाइल १९५.

सालीहतारखान ८६.

जिमाजी नायक २१५.

सीदी कासीम १८७. दंडा परत घेतो १८९, १९२, १९३.

सीदी खवासखान १४६.

सीदी खैरियत १८७, १८९.

सीदी जोहर (सलाबतखान) ५७, ५८, ६०, ६४, १७५, २४५.

सीदी मसाउद १०२, १७५, २२३, २२६, २२७, २२८, २२९, २३४, २३६.
सीदी मिस्त्री–(मिस्त्री पहा.)
सीदी याकूद २२९.
सीदी संबल १८७, १८८, १९१ ते १९३, २९५.
सीदी हलाल ५८, १४४, २९५.
सुखमल चव्हाण ११८.
सुजनसिंग बुंदेला (जहांगिराच्या आज्ञेनें अबुल फजल यास मारणाऱ्या बीरसिंगाचा वंशज) १४५, २३५.
सूर्यराव काकडे १४०.
सूर्यराव (प्रभावल्लीचा राजा) ६४.
सूर्याजी मालुसरा २१, १२५, २०४.
सुलतान महंमद ४१.
सेक शिकनखान १०६.
सेना न्हावी ६.
सैद बांडा ४८, मृत्यु ५०.
सोनाजी नायक २०४.
सोनाजीपंत (डबीर) २३, ३३, ३६. १९३, २९५,
सोपान. ६.
सोमशहा १४२.
सोयराबाई १५९, २४१.
संग्रामखान घोरी १३४.
संताजी जगताप १४०.
संताजी भोसले (शहाजीचा दासीपुत्र) २१७.
संभाजी (शहाजी पुत्र) १३, १५. मृत्यु २१.
संभाजी (हुतात्मा) जन्म ४०, ४५, ९६, ९७, १०५ ते १११, ११६, ११९, १२३, १२४, १५९, १६१, १६४, १९०, १९४, २०१, २२३.
मोगलांस मिळतो २२७.
पुनरागमन २३७, २३९, २४१, २४५, २५८, २५९. समर्थांचें पत्र २७८, २९४.
संभाजी कावजी (हणमंतराव मोऱ्याचा) खून ३०, ४७, ४९, ५०.
संभाजी मोहिता ३१.
सॅम्युएल ऑस्टेन २५६.
स्मिथ. ७५.

ह.

हणमंत ८२, ८४.
हणमंतराव (चंद्रराव मोऱ्याचा भाऊ) खून ३०.
हमीरखान १२७.
हरिभान ८५.
हसनखान ११९.
हाजी कासिम ७४.
हाजी सैयद बेग ७३, ७४.
हालालखान ११९.
हिरोजी फर्जंद १०५, ११२, ११३.

हिंदुराव २३४.
हुसेनखानमियाणा (कोकनूरचा) २२४, २२५.
हुसेन निजामशहा १२.
हेज १३१.
हेनरी ऑक्सडेन १६१. वकीली २५४.
हेनरी गॅरी (कॅप्टन) २५८.
हेनरी रॉव्हिंग्टन १६८, २४४, २४५.
हेनरी वेल्च १९५.
हैदर (मुनशी). २९४.
हैबतराव. ४७.
हंबीरराव (मोहिते) (सरनौबत) १५१, २०४, २०६, २०८, २१६, २१७, २१८.
हंसाजी–(हंबीरराव पहा).
ह्युएनसंग ४.

ज्ञ.

ज्ञानदेव ६.

प्रकरण ५ वें

मध्यान्ह

—:०:—

[१ जयसिंगाची रवानगी. २ जयसिंगाचें चरित्र. ३ जयसिंगाच्या अडचणी. ४ शिवविरोधकांचा मेळा. ५ रणभूमी. ६ मोगलांचे मोर्चे. ७ युद्धाला सुरुवात. ८ पुरंदर. ९ वेढयास सुरुवात. १० वज्रगड घेतला. ११ मोंगली फौजेची लुटालूट. १२ मराठ्यांचे पराक्रम, किल्ल्याचा बचाव. १३ पुरंदरचा झगडा. १४ मुरार बाजीचा पराक्रम. १५ तहाची वाटाघाट. १६ शिवाजी व जयसिंग यांची भेट. १७ पुरंदरच्या तहाचीं कलमें. १८ मोगली बहुमान. १९ विजापुरावरील स्वारींत शिवाजीची मदत. २० पन्हाळ्याजवळ शिवाजीचा पराजय.]

जयसिंगाची योजना.

रवानगीः—शाइस्ताखानाचा पराभव आणि सुरतेची लूट यायोगें मोंगली दरबार आणि विशेषतः औरंगजेब बादशहा यांची जगांत फारच नाचक्की होऊन गेली. त्यामुळें शिवाजीचा कांटा समूळ उपटून टाकण्याचा निश्चय करून औरंगजेबानें आपले अत्यंत पराक्रमी असे हिंदु व मुसलमान सेनापती शिवाजीवर पाठविण्याचें ठरविलें. तारीख ३० सप्टेंबर १६६४ या तारखेस औरंगजेबाचा वाढदिवस होता. याच दिवशीं त्यानें जयसिंगाची योजना करून त्याच्याबरोबर दिलेरखान, दाऊदखान कुरेशी, राजा रायसिंग शिसोदिया, एहतेशामखान शेखजादा, कुबेदखान, राजा सुजनसिंग बुंदेला, जयसिंगाचा मुलगा कीरतसिंग, मुल्ला याहिआ नवायत असे करोल सेनापती चौदा हजार फौजेसह देऊन त्यांना दक्षिणेंत जाण्याचा हुकुम दिला.

याप्रमाणें हुकुम मिळाल्यावर स्वारीची अवश्य ती जमवाजमव करून जयसिंग

प्रारंभ.

आपल्या सरदारांसह दक्षिणेंत येण्यास मोठ्या त्वरेनें निघाला. त्यानें हांडिया येथें तारीख ९ जानेवारी १६६५ रोजीं नर्मदा नदी ओलांडिली आणि मोठमोठ्या मजली मारून तो तारीख १० फेब्रुवारी रोजीं औरंगाबादेस येऊन दाखल झाला. दक्षिणचा सुभेदार शहाजादा मुअज्झम हा तेथेंच होता. त्यास भेटून पुढील स्वारीची एकंदर योजना व इतरेहि

महत्त्वाच्या बाबती त्याच्याशीं नक्की करून अवघ्या तीनच दिवसांनीं जयसिंग तेथून निघाला व बादशहाच्या हुकुमाप्रमाणें तारीख ३ मार्च रोजीं पुण्यास येऊन महाराजा जसवंतसिंगास भेटून त्याच्याकडून कामाचा हवाला सोंपून घेऊन त्यास तारीख ७ रोजीं दिल्लीस रवाना करून दिलें. जयसिंगाचा कामाचा उरक व स्वारीची तडफ मोठी प्रशंसनीय होती.

२ जयसिंगाचें चरित्रः—जयसिंगाचा जन्म सन १६०५ मध्यें झाला. लहानपणींच आईबाप निवर्तल्यानें तो पोरका झाला होता. तथापि अवघा बारा वर्षांचा असतांनाच तो सन १६१७ मध्यें मोंगलांच्या फौजेंत दाखल झाला. तेव्हांपासून त्यानें मोंगलांच्या झड्याखालीं मध्य आशियांत बाल्खपासून दक्षिणेंत विजापुरापर्यंत व पश्चिमेस कंदाहारपासून पूर्वेस मोंगीरपर्यंत सर्व लढायांत हजर राहून तरवार गाजविली होती. शहाजहानच्या कारकीर्दीत तर या रजपूत योद्धयाला एकाहि वर्षी विश्रांति मिळाली नाहीं, आणि प्रत्येक वर्षी त्यानें लढायांत गाजविलेल्या मर्दुमकीबद्दल बादशहानें त्याची वढतीच केली होती. त्याच्या सर्वप्रसिद्ध कार्यक्षमतेनें त्याला दरवारांत शहाजाद्यांच्या बरोबरीचा मान मिळून तो बिनीचा सरदार झाला होता. हिंदुस्थानाबाहेरच्या स्वाऱ्यांत बहुशः तो अघाडीवरच असे. त्याच्या राजकारणपटुत्वानें तर त्याला शौर्यापेक्षांहि अधिक यश प्राप्त करून दिलें होतें. कोणत्याहि बिकट व नाजुक प्रसंगीं मोंगली दरवार जयसिंगाच्याच तोंडाकडेस पाहत असे. तो मोठा युक्तिबाज व सहिष्णु असे. मुसलमानाच्या चालीरीतींचा व मानमरातबांचा तो चांगलाच ज्ञाता होता. तुर्की, इराणी, उर्दू व रांगडी या भाषांचा तो मार्मिक तज्ज्ञ होता. मोगलांच्या अर्धचंद्राकृती झड्याखालीं जमलेल्या फौजेंत पठाण, तुर्क, रजपूत व हिंदुस्थानी या लोकांचाच भरणा असल्यामुळें अशा मिश्र सैन्यावर अधिकार गाजविणें व त्या सर्वांना आपल्या कह्यांत ठेविणें प्रायः दुष्कर असे. परंतु हेंहि कार्य जयसिंगच करण्यास समर्थ व तत्पर असे.

चरित्र.

रजपूत.

जयसिंग आतां वृद्ध झाला असल्यानें तारुण्यांतील धडाडी त्याच्या ठिकाणीं राहिली नव्हती. अलीकडेस तो युद्धाऐवजीं साम-दाम-भेदानेंच आपला कार्यभाग साधीत असे. रजपूत म्हटला कीं, औदार्य, साहस, शौर्य व सरळपणा हे सद्गुण कोणाच्याहि दृष्टीपुढें उभे राहतात. पण जयसिंग आपल्या दूरदृष्टीनें, धूर्तपणानें व मिठ्ठया भाषणानें रजपूत या नांवाला अपवादरूप झाला होता.